पुणे विद्यापीठ

मानस, नीती व समाजविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पी.एच्.डी.) पदवीकरिता सादर केलेला शोध-प्रबंध

"आदिवासी विकास योजनांचा सह्याद्री विभागातील आदिवासींच्या गुणात्मक जीवनमानावर झालेला परिणाम"

संशोधक

प्रा. सुरेश देशमुख

M.A. (Eco), SET

मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५

मार्गदर्शक

डॉ. राम खर्चे

M.Sc. (Agri), M.A. (Eco.), LL.B., H.D.C., G.D.C.&A, D.C.B.M., Ph.D (Economics)

संचालक (निवृत्त)

पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

संशोधन केंद्र

अर्थशास्त्र विभाग

पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-४११००७

जुलै २०११

● प्रमाणपत्र ●

प्रमाणित करण्यात येते की, प्रा. देशमुख सुरेश सोमनाथ यांनी पुणे विद्यापीठाच्या मानस, नीती व समाजविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पी.एच्.डी.) पदवीसाठी सादर केलेला "आदिवासी विकास योजनांचा सह्याद्री विभागातील आदिवासींच्या गुणात्मक जीवनमानावर झालेला परिणाम" या विषयावरील प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. हे सर्व संशोधन स्वतंत्रपणे व नव्याने केलेले असून प्रबंध लेखनात ज्या-ज्या संदर्भ साहित्याचा आधार घेण्यात आलेला आहे, त्याचा आवश्यक तेथे स्मरणपूर्वक निर्देश केलेला आहे. हा प्रबंध यापूर्वी कोणत्याही विद्यापीठात कोणतीही पदवी प्राप्त करण्यासाठी सादर केलेला नाही. तसेच कोठेही प्रकाशित केलेला नाही.

सदर प्रबंध पुणे विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती (पी.एच्.डी.) पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

डॉ. राम खर्चे
M.Sc. (Agri), M.A. (Eco.), LL.B., H.D.C., G.D.C.&A.,D.C.B.M., Ph.D. (Economics)
संचालक (निवृत्त)
पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

ठिकाण: पुणे
दिनांक:

● प्रतिज्ञापत्र ●

मी प्रा. सुरेश सोमनाथ देशमुख प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, "आदिवासी विकास योजनांचा सह्याद्री विभागातील आदिवासींच्या गुणात्मक जीवनमानावर झालेला परिणाम" या विषयावरील शोध-प्रबंध पुणे विद्यापीठाच्या मानस, नीती व समाजविज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पी.एच्.डी.) पदवीसाठी सादर केलेल्या शोध-प्रबंधातील माहिती मूळ संदर्भांतून संकलित केली असून त्याचा योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केलेला आहे. प्रस्तुत माहितीचा या प्रबंधाव्यतिरिक्त अन्यत्र कोठेही उपयोग केलेला नाही.

ठिकाण : पुणे
दिनांक :

प्रा. सुरेश सोमनाथ देशमुख
मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर,
पुणे-४११००५

● अर्पणपत्रिका ●

"माझ्या हाताची बोटे हातात धरून ज्यांनी
मला खापराच्या पाटीवर अक्षरे गिरवायला
शिकविले ते माझे आजोबा स्मृतीशेष
श्री. गोगा खंडू देशमुख
व
दारिद्र्यात जीवन जगत असतानाही माझ्या
शिक्षणात खंड पडू दिला नाही असे माझे वडील
श्री. सोमनाथ देशमुख व आई
सौ. शेवंताबाई देशमुख यांना
नम्रतापूर्वक
सादर अर्पण!!!"



ऋणनिर्देश

सह्याद्रीच्या विशाल पवर्तरांगांमध्ये, दऱ्या-खोऱ्यात, घनदाट जंगलांमध्ये वास्तव्य करणाऱ्या आदिवासींच्या जीवनावर संशोधन करताना ज्या ज्ञात व अज्ञात व्यक्तींचे हातभार लागले त्यांचे ऋण व्यक्त करणे मी माझे आदय कर्तव्य समजतो.

सर्वप्रथम माझे आदर्श, गुरु व शोध प्रबंधाचे मार्गदर्शक डॉ. राम खर्चे यांनी त्यांच्या अत्यंत व्यस्त वेळेतून वेळ काढून मला वेळोवेळी मार्गदर्शन केले, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. त्याचप्रमाणे डॉ. खर्चे सरांचे मार्गदर्शक डॉ. एस. डी. तुपे व मित्र डॉ. जी. के. शिरुडे यांनीही मला संशोधन कार्यात मदत केली त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो. माझे मित्र डॉ. अभय शेंडे यांनी मला संशोधनाची प्रेरणा दिली तसेच वेळोवेळी सर्वतोपरी मदत केली त्याबद्दल मी त्यांचे ऋण व्यक्त करतो.

त्याचप्रमाणे जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ, अर्थशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, मॉडर्न महाविद्यालय, पुणे, यशदा, पुणे या सर्व संस्थांनी वेळोवेळी आवश्यक ते संदर्भ ग्रंथ, संशोधन पत्रिका, मासिके व इतर साहित्य उपलब्ध करून दिले त्याबद्दल मी त्यांचे व तेथील कर्मचाऱ्यांचे आभार मानतो.

संशोधनासाठी आदिवासी गावे, वाड्या, वस्त्या, पाडे इ. मध्ये जाऊन माहिती मिळविण्यासाठी ज्यांनी मला वेळेची पर्वा न करता सतत मदत केली असे माझे मित्र प्रा. नवनाथ वायळ, श्री. तुकाराम देशमुख, श्री. श्याम देशमुख यांचाही मी ऋणी आहे. त्याचप्रमाणे संशोधनासाठी सतत प्रोत्साहन देणारे व मदत करणारे माझे मित्र प्रा. श्रीधर पटेकर, प्रा. शंकर भोईर, प्रा. गोरक्षनाथ बांबळे, प्रा. राधाकिसन मुठे, प्रा. विजय सुकटे, प्रा. बाळासाहेब धादवड, प्रा. विलास जाधव, प्रा. कैलास महाले, श्री. संजय देशमुख, श्री. श्रीनिवास देशमुख, श्री अविनाश वाजे यांचेही मी आभार मानतो. तसेच मॉडर्न महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. वाय. आर. वाघमारे व माझे सहकारी प्रा. दादासाहेब खोकले, प्रा. विजय गायकवाड, डॉ. अशोक कांबळे, डॉ. आर. डब्लू. कुलकर्णी, डॉ. राजेश कुलकर्णी यांनीही मला संशोधनासाठी सतत प्रोत्साहन दिले त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

संशोधनाच्या निमित्ताने ज्या-ज्या आदिवासी बांधवांशी संपर्क आला, त्यांनी अत्यंत आपुलकीने व गांभिर्याने आवश्यक ती सर्व माहिती उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. त्याचप्रमाणे डॉ. रॉबीन त्रिभुवन, सांस्कृतिक अधिकारी, टी.आर.टी.आय. पुणे, प्रकल्प अधिकारी श्री. ए. वाय. कापसे, ए.आ.वि.प्र., आंबेगाव, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, श्री. अशोक पठारे, ए.आ.वि.प्र., राजूर, श्री. संतोष ठुबे, ए.आ.वि.प्र., जव्हार, श्रीमती जागृती कुमरे, ए.आ.वि.प्र., नाशिक. आश्रमशाळा मुख्याध्यापक श्री. सी. बी. भांगरे, आश्रमशाळा शिरपुंजे, ता. अकोले, श्री. एस. बी. जोशी, आश्रमशाळा खेड, ता. इगतपूरी, सौ. एम. जी. आरु, आश्रमशाळा सोमालवाडी, ता. जुन्नर, श्री. रमेश कार्ले, आश्रमशाळा गोहे बु. ता. आंबेगाव, त्याचप्रमाणे आदिवासी सहकारी संस्थांचे पदाधिकारी श्री. सिताराम देशमुख, आ.वि.का.से.स.सं., राजूर, ता. अकोले, श्री. शिवाजी कोरडे, आ.वि.का.से.स.सं., वासाळी, ता. इगतपूरी, श्री. खंडू घोलप, आ.वि.का.से.स.सं., खामगाव ता. जुन्नर, सौ. जनाबाई उगले, आ.वि.का.से.स.सं., शिनोली, ता. आंबेगाव, श्री. अरविंद मुकणे, आ.वि.का.से.स.सं., मोखाडा, ता. मोखाडा या सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यालयीन माहिती उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

शोध प्रबंध प्रत्यक्ष रूपात आणण्यासाठी सौ. पुष्पा दादू बुळे यांनी अतिशय चिकाटीने व परिश्रमपूर्वक टंकलेखनाचे काम केले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तसेच प्रा. फटांगरे यांनी संख्याशास्त्रीय कामात मदत केली त्यांचाही मी आभारी आहे.

माझ्या संशोधनाच्या कालावधीत सतत प्रोत्साहन देऊन पाठीशी उभी राहणारी माझी पत्नी सौ. तेजश्री तसेच भाऊ गोरख व संदिप यांनीही मोलाचे सहकार्य केले त्यांचेही मनःपूर्वक आभार मानतो.

मला संशोधनासाठी प्रेरणा देणारे सर्व ज्ञात व अज्ञात आदिवासी बांधव यांचेही मी मनःपूर्वक आभार मानतो. धन्यवाद!!!

प्रा. सुरेश देशमुख
मॉडर्न महाविद्यालय,
पुणे

अनुक्रमणिका

प्रकरण	विषय	पान क्रमांक
प्रकरण १ ले : आदिवासी समाजाची ओळख		१-६२
१.१	प्रस्तावना	२
१.२	भारतीय आदिवासी : ऐतिहासिक पार्श्वभूमी	६
	१.२.१ आदिवासी संकल्पना	७
	१.२.२ आदिवासी समाजाच्या व्याख्या	८
	१.२.३ आदिवासी समाजाची वैशिष्टे	१३
१.३	भारतातील आदिवासींचे वर्गीकरण	१६
१.४	महाराष्ट्रातील आदिवासी	३१
	१.४.१ महाराष्ट्रातील आदिवासींचे भौगोलिक विभाग	३५
	१.४.२ सह्याद्रीतील प्रमुख आदिवासी जमाती	३८
	संदर्भ (References)	६१-६२
प्रकरण २ रे : सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी - एक जमात		६३-८९
२.१	प्रस्तावना	६४
२.२	महादेव कोळी जमातीचा पूर्वेतिहास	६५
२.३	महादेव कोळी जमातीचा राजकीय इतिहास	७१
२.४	महादेव कोळी जमातीची ओळख	७४
	२.४.१ महादेव कोळी जमातीचा आदिवासींमधील समावेश	८०
२.५.	आर्थिक परिस्थिती	८२
२.६	शिक्षण, आरोग्य आणि राहणीमान	८४
	संदर्भ (References)	८९

प्रकरण ३ रे : संशोधनाचे महत्व, उद्दिष्ट्ये आणि संशोधन पध्दती.		९०-११३
३.१	प्रस्तावना	९१
३.२	संशोधनाचे स्वरुप व व्याप्ती	९२
	३.२.१ संशोधन संकल्पना व अर्थ	९३
	३.२.२ व्याख्या	९४
	३.२.३ संशोधनाची वैशिष्ट्ये	९५
३.३	संशोधनाचे प्रकार	९६
३.४	संशोधनाचे महत्व	९९
३.५	सामाजिक संशोधनाचे महत्व	९९
३.६	आदिवासी संशोधनाचे महत्व	१०४
	३.६.१ आदिवासी संशोधनाची उद्दिष्ट्ये	१०७
	३.६.२ संशोधनाची गृहीतके	१०८
३.७	संशोधन पध्दती	१०९
३.८	संशोधनाची व्याप्ती	११२
३.९	संशोधनावरील मर्यादा	११२
	संदर्भ (References)	११३
प्रकरण ४ थे : साहित्याचे सिंहावलोकन		११४-१३७
४.१	प्रस्तावना	११५
४.२.	आंतरराष्ट्रीय पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन	११५
४.३	राष्ट्रीय पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन	११८
४.४	महाराष्ट्र राज्य पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन	१२३
४.५	विभागीय पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन	१२७
	संदर्भ (References)	१३७

प्रकरण ५ वे : विविध आदिवासी विकास योजना		१३८-१७९
५.१	प्रस्तावना	१३९
५.२	आदिवासी विकास विभागाची प्रशासकीय यंत्रणा	१४०
५.३	आदिवासी उपयोजनेची उद्दिष्ट्ये	१४४
५.४	आदिवासी विकास विभागाच्या योजना	१५०
	५.४.१ शैक्षणिक विकासाच्या योजना	१५१
	५.४.२ आर्थिक उन्नतीच्या योजना	१५१
	५.४.३ इतर योजना	१५२
५.५	महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या योजना.	१७६
	संदर्भ (References)	१७९
प्रकरण ६ वे : सामग्रीचे विश्लेषण आणि निर्वचन		१८०-२८८
६.१	प्रस्तावना	१८१
६.२	आदिवासी विकास योजनांचे लाभार्थी व बिगर लाभार्थी मुलाखत प्रतिसादाचे विश्लेषण	१८१
६.३	प्रकल्प अधिकारी मुलाखत – प्रतिसादाचे वर्णन	२६५
६.४	आश्रमशाळा मुख्याध्यापक मुलाखत – प्रतिसादाचे वर्णन	२७०
६.५	आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था पदाधिकारी मुलाखत – प्रतिसादाचे वर्णन	२७६
	संदर्भ (References)	२८८
प्रकरण ७ वे : निरीक्षणे, निष्कर्ष व सूचना तथा शिफारशी		२८९-३३०
७.१	प्रस्तावना	२९०
७.२	आदिवासी कुटुंब प्रमुखांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक अभ्यासाबाबतची निरीक्षणे व निष्कर्ष	२९०
७.३	प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मुलाखतीवरून काढलेले निष्कर्ष	३०६

७.४	आश्रमशाळा मुख्याध्यापकांच्या मुलाखतीवरून काढलेले निष्कर्ष	३०९
७.५	आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या मुलाखतीवरून काढलेले निष्कर्ष	३११
७.६	संशोधनावरून काढलेल्या निष्कर्षांची गृहीतकांशी पडताळणी	३१३
७.७	सूचना व शिफारशी	३१६
	संदर्भ (References)	३३०
	संदर्भ सूची	३३१-३३९
	परिशिष्ठे	३३९
	परिशिष्ठ-१ आदिवासी व्यक्तींसाठी प्रश्नावली	३४०-३५५
	परिशिष्ठ-२ प्रकल्प अधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली	३५६-३५९
	परिशिष्ठ-३ आश्रमशाळा मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली	३६०-३६५
	परिशिष्ठ-४ आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली	३६६-३७५
	परिशिष्ठ-५ संक्षिप्त रुपे	३७६

सारणी सूची

अ.क्र.	सारणी क्र.	विषय	पान क्र.
१.	१.१	भारतातील एकूण व अनुसूचित जमातींची राज्यनिहाय लोकसंख्या (जनगणना २००१)	९-१०
२.	१.२	महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातींची यादी	३४-३५
३.	१.३	महाराष्ट्र राज्याची मागील चार दशकांची आदिवासी व एकूण लोकसंख्या (१९६१,१९७१,१९९१,२००१)	३६
४.	१.४	महाराष्ट्र राज्यातील एकूण व आदिवासी लोकसंख्येचे १९८१,१९९१ व २००१ च्या जनगणनेप्रमाणे स्त्री-पुरुष निहाय वर्गीकरण	३७
५.	१.५	सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातींची लोकसंख्या	४३-५१
६.	२.१	महादेव कोळी जमातीचा भौगोलिक आढावा (१८३६)	६६
७.	२.२	महादेव कोळी जमातीची जिल्हा व तालुकानिहाय गावे आणि लोकसंख्या	७५-७६
८.	२.३	आदिवासी जमातीची कर्ज घेणारी कुटुंबे आणि कर्जाचे प्रमाण	८३
९.	३.१	संशोधनासाठी निवडलेली आदिवासी गावे	१०९-११०
१०.	५.१	महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार	१४५-१४६
११.	५.२	महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकूण अनुसूचित जमातींची कुटुंबे व दारिद्रय रेषेखालील कुटूंबे	१४९
१२.	५.३	सन २००१ च्या जनगणनेनुसार सर्वसामान्य व आदिवासी साक्षरतेचे प्रमाण	१५२-१५३
१३.	५.४	आदिवासी विकास विभाग व स्वयंसेवी संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळा, माध्यमिक आश्रमशाळा व वसतिगृहांची माहिती (सन २००३-२००४ पर्यंत)	१५८-१५९

१४.	५.५	आदिवासी शेतकऱ्यांना वाटप झालेल्या वीजपंप व तेलपंप इंजिनाची वर्षवार माहिती	१६२-१६३
१५.	५.६	महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तरतूद व खर्च	१६९-१७०
१६.	५.७	आदिवासींना वाटप केलेल्या खावटी कर्जाची वर्षनिहाय माहिती	१७२-१७३
१७.	६.१	कुटुंब प्रमुखांची लिंगनिहाय माहिती	१८२
१८.	६.२.	वयोगटानुसार वर्गीकरण	१८२
१९.	६.३	शैक्षणिक पातळी	१८४
२०.	६.४	शैक्षणिक गळतीचे प्रमाण	१८६
२१.	६.५	वैवाहिक स्थिती	१९०
२२.	६.६	कुटुंबातील व्यक्तींची संख्या	१९१
२३.	६.७	कौटुंबिक वार्षिक उत्पन्न	१९२
२४.	६.८	कौटुंबिक वार्षिक खर्च	१९५
२५.	६.९	अ) व्यसन करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण	१९६
		ब) प्रती कुटुंब व्यसनावरील सरासरी वार्षिक खर्च	१९७
२६.	६.१०	जमीनधारक आणि भूमिहीन कुटुंबांचे वितरण	१९९
२७.	६.११	शेती पाणीपुरवठ्याची साधने	२०१
२८.	६.१२	पीक रचना	२०३
२९.	६.१३	बियाणांचा वापर	२०४
३०.	६.१४	जमीन कसण्याची पध्दत	२०५
३१.	६.१५	शेती मशागतीच्या तांत्रिक माहितीचे स्त्रोत	२०७
३२.	६.१६	रोजगार हमी योजने अंतर्गत रोजगारासंबंधी वस्तुस्थिती	२०९
३३.	६.१७	रोजगार मिळालेल्या व्यक्तींची संख्या	२१०
३४.	६.१८	गौण वनौपजे गोळा करण्याकरिता पार करावे लागणारे अंतर	२१२

३५.	६.१९	गौण वनौपजांची विक्री करण्याचे ठिकाण	२१४
३६.	६.२०	अर्थार्जनासाठी होणाऱ्या स्थलांतराची स्थिती	२१५
३७.	६.२१	पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत	२१७
३८.	६.२२	पिण्याच्या पाण्याची उपलब्धता	२१९
३९.	६.२३	पिण्याच्या पाण्याचे शुध्दीकरण	२२०
४०.	६.२४	स्नानगृहांची उपलब्धता	२२१
४१.	६.२५	आंघोळीसाठी वापरण्यात येणारी साधने	२२२
४२.	६.२६	अ) मुलांचे आंघोळ करण्याचे प्रमाण	२२३
		ब) पुरुषांचे आंघोळ करण्याचे प्रमाण	२२४
		क) स्त्रियांचे आंघोळ करण्याचे प्रमाण	२२४
४३.	६.२७	शौचालयांची उपलब्धता	२२५
४४.	६.२८	वैद्यकीय उपचारांचे ठिकाण	२२६
४५.	६.२९	प्रसूतीचे ठिकाण	२२८
४६.	६.३०	प्रसूतीसाठी मदत	२३०
४७.	६.३१	० ते ६ वयोगटातील मुलांचे लसीकरण प्रमाण	२३१
४८.	६.३२	आहार सवयी	२३१-२३२
४९.	६.३३	राहत्या घराचा प्रकार	२३३
५०.	६.३४	घरांची मालकी	२३६
५१.	६.३५	घरांचे क्षेत्रफळ	२३६
५२.	६.३६	वीजमीटरची उपलब्धता	२३८
५३.	६.३७	प्रौढ शिक्षण योजनेची अंमलबजावणी	२३९
५४.	६.३८	आदिवासी विकास योजनांबाबत असलेली माहिती	२४०
५५.	६.३९	विविध योजनांमार्फत मिळालेला लाभ	२४१

५६.	६.४०	शेती विषयक योजनांपासून प्राप्त झालेला लाभ	२४९
५७.	६.४१	विविध शेती विकास योजनांपासून प्राप्त झालेला लाभ	२५०
५८.	६.४२	दुग्ध विकास योजनांपासून मिळालेला लाभ	२५३
५९.	६.४३	मृदसंधारण योजनांपासून प्राप्त झालेला लाभ	२५४
६०.	६.४४	फलोत्पादन योजनांपासून प्राप्त झालेला लाभ	२५५
६१.	६.४५	तलंग (कोंबडीची पिल्ले) वाटप योजनेपासून मिळालेला लाभ	२५६
६२.	६.४६	मत्स्यव्यवसायाच्या योजनांपासून प्राप्त झालेला लाभ	२५७
६३.	६.४७	मातृत्व अनुदान योजनेपासून मिळालेला लाभ	२५८
६४.	६.४८	पशुवैद्यकीय दवाखान्यांची उपलब्धता	२५९
६५.	६.४९	पशुवैद्यकीय दवाखान्यातून प्राप्त झालेल्या सोयी/सेवा	२६०
६६.	६.५०	रोग नियंत्रणासाठी जनावरांना दिलेल्या लसीकरणाचे प्रमाण	२६२
६७.	६.५१	वैरण उत्पादनासाठी मिळालेला आर्थिक लाभ	२६३
६८.	५.५२	एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून भेट देण्याचे प्रमाण	२६४

आलेख सूची

अ.क्र.	आलेख क्र.	विषय	पान क्र.
१.	६.१	वयोगट रचना	१८३
२.	६.२	कुटुंब प्रमुखांची शैक्षणिक पातळी	१८५
३.	६.३	शैक्षणिक स्थिती	१८९
४.	६.४	शैक्षणिक गळतीचे प्रमाण	१९०
५.	६.५	वार्षिक उत्पन्नाचे वितरण (रुपये)	१९४
६.	६.६	व्यसनावरील खर्च	१९९
७.	६.७	जमीनधारणा प्रमाण (हेक्टरमध्ये)	२०१
८.	६.८	पाणी पुरवठ्याची उपलब्धता	२०२
९.	६.९	पीक रचना	२०४
१०.	६.१०	जमीन कसण्याची पद्धत	२०७
११.	६.११	पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत	२१८
१२.	६.१२	वैद्यकीय उपचाराचे ठिकाण	२२८
१३.	६.१३	राहत्या घराचा प्रकार	२३५
१४.	६.१४	घरांचे क्षेत्रफळ	२३८
१५.	६.१५	विविध योजनांपासून मिळालेला लाभ	२४८
१६.	६.१६	विविध शेती विकास योजनांपासून आदिवासींना प्राप्त झालेला लाभ	२५२

नकाशा सूची

अ.क्र.	नकाशा क्र.	विषय	पान क्र.
१.	१.१	भारतातील आदिवासी लोकसंख्या वितरण (जनगणना २००१)	१२
२.	१.२	लोकसंख्येचे ठिकाणानुसार प्रमाण (जनगणना-२००१)	२४
३.	१.३	महाराष्ट्र राज्य आदिवासी क्षेत्र भौगोलिक नकाशा	३३
४.	२.१	सह्याद्रीतील आदिवासी : महादेवकोळी	८१

प्रकरण पहिले

आदिवासी समाजाची ओळख

१.१	प्रस्तावना	२
१.२	भारतीय आदिवासी : ऐतिहासिक पार्श्वभूमी	६
	१.२.१ आदिवासी संकल्पना	७
	१.२.२ आदिवासी समाजाच्या व्याख्या	८
	१.२.३ आदिवासी समाजाची वैशिष्टे	१३
१.३	भारतातील आदिवासींचे वर्गीकरण	१६
१.४	महाराष्ट्रातील आदिवासी	३१
	१.४.१ महाराष्ट्रातील आदिवासींचे भौगोलिक विभाग	३५
	१.४.२ सह्याद्रीतील प्रमुख आदिवासी जमाती	३८
	संदर्भ (References)	६१-६२

प्रकरण पहिले

आदिवासी समाजाची ओळख

१.१ प्रस्तावना

जगातील अनेक देशांत आदिवासी जमाती आढळून येतात. विकसित, विकसनशील व अल्पविकसित अशा सर्वच देशांत आदिवासी जमाती आहेत. या देशांतील आदिवासी जमातींचा विकासाच्या दृष्टीने विचार करता त्या कमी-अधिक फरकाने मागासलेल्याच आहेत. त्यांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय प्रगती झालेली नाही. ते प्रगत नागर समाजापासून दूर राहिलेले आहेत. तसेच त्यांना प्रगत समाजानेही दूर ठेवलेले आहे. त्यामुळे त्यांचा विकास झालेला नाही. आदिवासी हे दूर जंगलात, दऱ्याखोऱ्यात, कडे-कपारींत, नदी-नाल्यांत व गिरी-कंदरांत राहत असल्याने त्यांच्या विकासात अडचणी निर्माण झाल्या आहेत. परंतू अलिकडे जागतिक पातळीवर आदिवासी जमातींच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यात येत आहेत.

जगात २६० दशलक्षांपेक्षा जास्त मूळ रहिवासी किंवा आदिवासी जमातींचे लोक राहतात. १९९८ मधील आकडेवारीनुसार जगातील ७० देशांत मिळून जागतिक लोकसंख्येच्या ४ टक्के इतकी आदिवासी जमातींची लोकसंख्या आहे. या देशांपैकी बऱ्याच देशात हे आदिवासी किंवा आदिम जमाती ह्या अल्पसंख्यांक ठरल्या आहेत. ब्राझील, स्वीडन सारख्या देशात आदिवासींचे प्रमाण ०.१ टक्का, भारतात ८.२० टक्के (जनगणना २००१), ग्रीनलंडमध्ये ९० टक्के, पेरूमध्ये ४० टक्के व बोलिव्हियात ६६ टक्के आहे. आदिवासींची सर्वात जास्त संख्या आशिया खंडात आढळते. आदिवासीं जमातींची लोकसंख्या भारतात जवळ-जवळ ८.५ कोटी आहे. सध्या जगातील इतर कोणत्याही देशांपेक्षा भारतात आदिवासींची संख्या जास्त आहे.

भारत हा एक खंडप्राय देश आहे. भारतात अनेक अल्पसंख्याक लोक राहतात. या अल्पसंख्यांक लोकांचे अनेक प्रश्न आहेत. काही प्रश्नांचे स्वरूप फार विशाल आहे. भारतात संख्येने अल्प असणाऱ्या जवळजवळ ७५० आदिवासी जमाती राहतात. परंतू भारतातील

लोकांमध्ये या जमातींबद्दल भयंकर स्वरूपाचे अज्ञान आहे. मध्यवर्ती सरकार किंवा राज्य सरकार यांनाही आदिवासींचे प्रश्न पुर्णपणे समजलेले नाहीत. भारतात आदिवासी जमातींची संख्या मोठी आहे. यापैकी अनेक जमाती अत्यंत मागासलेल्या आहेत. या जमाती भौगोलिकदृष्ट्या, भाषिकदृष्ट्या व सांस्कृतिकदृष्ट्या वेगवेगळ्या पातळीवर असून सर्व भारतात विखुरलेल्या आहेत. आदिवासी हे प्रादेशिक तसेच सांस्कृतिकदृष्ट्या अलिप्त आहेत. ही अलिप्तता त्यांनी स्वतःहून पाळली आहे किंवा ऐतिहासिक काळात त्यांच्यावर लादली गेली आहे. आज राष्ट्रीय एकता व सामाजिक-सांस्कृतिक अभिसरणाच्या दृष्टीने आदिवासींना सदैव अलिप्त ठेवणे योग्य नाही. आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी त्यांचा बाह्य जगाशी संबंध येणे आवश्यकच आहे तसेच अपरिहार्यही आहे. भाषा, संस्कृती, अर्थकारण, राजकरण यांच्या संदर्भात आदिवासींना भारतीय जन-जीवनापासून अलिप्त ठेवणे योग्य नाही. आदिवासींना भारतीय जन-जीवनाशी समरस होण्यास सुलभ व्यवस्था करून देणे राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने आवश्यक आहे.

भारतातील बहुसंख्य आदिवासी अशिक्षित आहेत. त्यांना योग्य ते शिक्षण देण्याची गरज आहे. असे शिक्षण न देता त्यांच्या प्रादेशिक अर्थसाधनांचा वापर सुरू केल्यास आदिवासी प्रदेशांत बाह्य लोकांचा प्रवेश होऊन आदिवासींचे कळत-नकळत शोषण होण्याची भिती आहे. आदिवासींचा विकास करतांना व्यक्ती आणि प्रदेश यांचा एकाचवेळी विकास करणे आवश्यक आहे. सरकारचे धोरण आणि आदिवासींची आर्थिक गरज यांचा वेगवेगळ्या विकासाच्या साधनांअभावी मेळ बसविणे कठीण आहे. आदिवासींमध्ये प्रचलित असलेल्या आर्थिक उत्पादनाच्या साधनांमध्ये व पध्दतीत सुधारणा घडवून आणण्याकरिता त्यांच्यातील अंधविश्वास, बाह्य जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोण, शिक्षण, दळणवळण, कर्ज घेण्याची प्रवृत्ती, आरोग्य, स्वच्छता, घरांची मांडणी व बांधणी इत्यादींमध्ये सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. या घटकांत बदल घडवून आणण्याकरिता शासनाने ज्या काही योजना आखल्या आहेत त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

जागतिक आदिवासी वितरण

आर्क्टिक आणि उत्तर अमेरिका

१) अलास्का, कॅनडा, ग्रीनलंड, रशिया - एस्किमो

२) नॉर्वे, स्वीडन, फिनलंड, रशिया - सामी

कॅनडा आणि उत्तर अमेरिका

३) पॅसिफिक किनारा - हैडा, टिंगीट, बेल्ला, कूला.

४) मध्य कॅनडा - की, मेटी, ब्लॅकफूट, डेने.

५) पूर्व कॅनडा - रइ, क्री.

६) कॅनडा, यू. एस. ए. सीमा - मिकमॅक.

७) वायव्य यू. एस. ए. - मेझ, पर्सी.

८) नैऋत्य यू. एस. ए. - नावाजो, प्यूढलो, होपी, केरेस, डाईन.

९) मैदाने - क्रो, आरापाहो, पावनी, कोमाचे.

मध्य अमेरिका

१०) मेक्सिको - लॅकॉंडॉन, युकॅटिक.

११) ग्वांटेमाला - माया, चोलू, चून.

१२) पनामा – कुना, ग्वायमी.

दक्षिण अमेरिका

१३) पेरूचे पठार - केचुमा, अेमारा.

१४) अर्जेटिना, चिली - मापूचे.

१५) ॲमेझान खोरे (ब्राझील) - टुकानो, क्रीम, माळुक्सी, अगोरी, पानरी, सनेमा, अक्रोटे, कथापी, सिकोया, आचे, टोबा, मस्कोय, अरावाक, लकानो इ.

आफ्रिका

१६) सहारा - तुरेग, फुलानी.

१७) दक्षिण सुदान - डिंका, नुएर, शिलूक.

१८) अंगोला, बोत्स्वाना, निमिबीया - सॅन (बुशमेन).

१९) केनिया, टांझानिया - मसाई.

२०) एथिओपिया - ओरोमो, सोमाली, टिग्रायन, एरिट्रियन.

२१) सैरे, कॅमेरून कांगो - मबुटी, एफिलेसे.

दक्षिण आशिया

२२) भारत - भिल्ल, कोल, संथाळ, नागा, मिझो. इ.

२३) अफगाणिस्तान, पाकिस्तान - पठाण, पख्तून.

२४) श्रीलंका - वेद्दा.

२५) बांगलादेश (चितगाँव टेकड्या) - चकमा, मर्मा.

आग्नेय आशिया

२६) ब्रम्हदेश - केरेन, कचीन, शाह, चीन.

२७) थायलंड - केरेन, हमोंग, लिसू.

२८) मलेशिया - पेनन, कयांग, इबांन.

२९) फिलिपाईन्स - कलींगा, फुगाओ, हनूनू.

३०) इंडोनेशिआ - कालीमंतन, दयाक, केडांग, अस्मत, दानी.

३१) पापुआ, न्युगिनी - दानी, सेबांग.

३२) चीन - तिबेटी, हिगूट.

३३) मंगोलिया - मंगोलियन.

३४) जपान - येनू.

३५) रशिया - चुकची, याकूत.

महासागरी

३६) ऑस्ट्रेलिया - ॲबॉर्जिनीज.

३७) न्युझीलंड - माओरिस.

३८) पॅसिफिक बेटे - कनाक.

अशा प्रकारे वरीलप्रमाणे जगातील विविध ७० देशांत विविध प्रकारच्या आदिवासी जमातींचे लोक राहतात.

१.२ भारतीय आदिवासी : ऐतिहासिक पार्श्वभूमी

आर्यांचे भारतात आगमन होण्यापूर्वी आदिवासी हे या देशाचे मूळचे रहिवासी होते. त्या काळी आदिवासी टोळ्या-टोळ्यांनी राहत होते. प्राचीन वन्य टोळ्यांची धार्मिकता आर्यांपेक्षा भिन्न होती. त्यांच्या देवदेवतांच्या कल्पना, भुताखेतांच्या कल्पना, मृत्युनंतर मानवी जीवनाच्या कल्पना भिन्न होत्या. ते निसर्गाची पूजा करीत. निसर्गात आढळणाऱ्या व बुध्दीला न उमगणाऱ्या वस्तूला, वृक्षाला, पक्षाला ते देव मानीत. पूज्य मानलेल्या प्राण्यांची ते शिकार करीत नसत. त्यांची ते पूजा करीत. आनंदाच्या वेळी ते त्यांच्यासमोर नाचगाण्याचे कार्यक्रम करीत. त्याकाळी सर्वच आदिवासी टोळ्या निसर्ग आणि प्राणी पूजक होत्या.

नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले संबंधित प्रदेशातील मूळचे राहिवासी म्हणजे आदिवासी असे सामान्यपणे म्हटले जाते. सर्वसाधारणपणे जंगलात, दुर्गम दऱ्या-खोऱ्यांत व सुसंस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशांत ते तुरळक वस्ती करून राहतात. नागर संस्कृतीचा त्याचप्रमाणे वर्गश्रेणीबध्द समाजाचा संपर्क न झालेल्या वैशिष्टपूर्ण चालीरिती किंवा 'संस्कृती' आदिवासींमध्ये आढळतात. अनेक नागर संस्कृती उदयास येऊन लयाला गेल्या. आदिवासींचा त्यांच्याशी संपर्क न आल्यामुळे किंवा न साधल्यामुळे आदिवासी जमाती जशा होत्या तशाच राहिल्या आहेत. त्यांच्यात हजारो वर्ष परिवर्तन झालेले नाही.

भारतीय स्मृतीग्रंथांत आदिवासी जमातींचा उल्लेख सापडतो. स्मृतीकारांनी त्या अनुलोम-प्रतिलोम संस्कारातून निर्माण झाल्या आहेत असे म्हटले आहे. स्मृतीग्रंथांत उल्लेख केलेले, शबर, रक्श, निषाद, किरात यांसारखे पुष्कळसे गट आदिवासी होते त्यामुळे त्यांना हीन दर्जा प्राप्त झाला. रामायणात किरात, निषाद, शबर इत्यादी आदिवासी जमातींचा उल्लेख आहे. निषाद हे जंगलात राहणारे लोक असा उल्लेख सापडतो. बेटांवर राहणारे, कच्चे मांस खाणारे असा किरांताविषयीचा उल्लेख आहे. महाभारतात पुलींद व किरात हे हिमालयात राहणारे आदिवासी असा उल्लेख आहे. महाभारतातील एकलव्य हा आदिवासीच (भिल्ल) होता. हिंदूंच्या चार वेदांपैकी अथर्ववेद हा आर्य आणि आदिवासी यांच्या संपर्कातून उद्‌भवलेला वेद आहे असे म्हटले जाते. इतिहासात अनेक आदिवासी जमाती स्थानिक राजांच्या वतीने लढल्याची उदाहरणे आहेत. शिवाजी महाराजांना रामोशी व महादेव कोळी या जमातींनी

युध्दात बरेच सहाय्य केले होते. आदिवासींची पिळवणूक करणाऱ्यांविरूध्द बरीच बंडे झाली. १७७८ ते १९४७ च्या दरम्यान आसाम, बिहार, मध्यप्रदेश व आंध्रप्रदेशात सुमारे ७५ बंडे झाली. बहुतेक बंडे ही ब्रिटीशांविरूध्द होती. महाराष्ट्रातील भिल्लांनी ब्रिटीशांविरूध्द उठाव केला होता. १९५६ ते ५८ च्या दरम्यान ठाणे जिल्ह्यातील 'वारली' जमातीच्या लोकांनी जमीनदारांच्या विरूद्ध बंड पुकारले होते.

आदिवासींची वस्ती प्रामुख्याने जंगलात, दऱ्या-खोऱ्यांत आणि पर्वतांनी व्यापलेल्या प्रदेशांत आढळते. त्यामुळे त्यांना गिरीजन असे म्हणतात. ते मुळचे याच भूमीवरचे असल्याने त्यांना भूमीजन किंवा भूमीज असेही म्हणतात. नेहमी अरण्यात राहणारे म्हणून अरण्यक असेही संबोधले जाते. भारतीय संविधानाने त्यांना आदिम जनजाती, अनुसूचित जमाती, वन्यजाती असे संबोधले आहे. परंतु आदिवासी हे नाव राष्ट्रीय परिभाषेत प्रचलित आहे.

१.२.१ आदिवासी संकल्पना

नैसर्गिक पर्यावरणात राहणाऱ्या लोकांना कोणी 'जंगलचे राजे' म्हणतात. तर कोणी त्यांना 'धरतीची लेकरे' म्हणतात. याच लोकांचा उल्लेख 'आदिवासी किंवा आदिम समाज' म्हणून केला जातो. विचारवंत, अभ्यासक, प्रशासक व सामाजिक कार्यकर्ते यांनी सुध्दा या समाजाला विविध नावे दिलेली आहेत. रिसले, लॅस्सी, एल्वीन, ग्रीगसन, शुबर्न, सेडविक, मार्टीन, ए. व्ही. ठक्कर यांनी या लोकांना 'अगदी प्राचीन' (*Aboriginal*) किंवा अगदी मूळचे रहिवाशी असे म्हटले आहे. जे. एच हटनने 'आदिम अगर आदिवासी' (*Primitive Tribes*) नाव दिलेले आहे. डॉ. घुर्ये यांनी आदिवासी जमातींना 'तथाकथीत मुळचे रहिवाशी' (*So-called Aboriginal*) व 'मागासलेले हिंदू' (*Backward Hindus*) असे म्हटले आहे. परंतू भारतीय राज्यघटनेत केलेला 'अनुसूचित जमाती' (*Scheduled Tribes*) हा उल्लेख डॉ. घुर्ये यांना मान्य आहे. डॉ. दासांनी या आदिवासींचे वर्णन 'बुडत असलेल्या जमाती' (*Submerged Humanity*) असे केलेले आहे.

१.२.२ आदिवासी समाजाच्या व्याख्या

आदिवासी समाज म्हणजे 'अतिप्राचीन समाज' किंवा 'अतिशय अप्रगत व मागासलेला समाज' असे म्हणणे चुकीचे आहे. मानववंश शास्त्रज्ञांनी वैज्ञानिक पद्धतीने आदिवासी समाजाच्या व्याख्या करून आदिम समाजाविषयी असणारी चुकिची मते किंवा ग्रह दूर केले आहेत. आदिवासी कोणाला म्हणावे? यासाठी मानववंश शास्त्रज्ञांनी पुढील व्याख्या सांगितलेल्या आहेत.

१. **गिलीन व गिलीन** :- "एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणाऱ्या, समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समूहाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात."

२. **डब्ल्यू. जे. पेरी** :- "समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भू-प्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या समूहाला आदिम समाज म्हणतात."

३. **डॉ. रिव्हर्स** :- "ज्या समूहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात, युध्द वगैरेसारख्या उद्दिष्टपूर्तीकरिता एक होऊन झटतात अशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला, 'आदिवासी समाज' असे म्हणतात."

४. **इंपिरिअल गॅझेट**मध्ये आदिवासींची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे.

   "समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भूभागात राहणाऱ्या, सुरूवातीला अंतर्विवाही असण्याची शक्यता असलेल्या पण सर्वसाधारणपणे अंतर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटुंबांच्या समुच्चयाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात."

५. इ.स. १९६२ साली **शिलाँगमध्ये आदिवासी समितीच्या परिषदेने** आदिवासींची व्याख्या केली आहे ती पुढील प्रमाणे:

   "एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशाखीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या, अक्षर ओळख नसलेल्या व रक्त संबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रीतिरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनशी गटाला 'आदिवासी समाज' म्हणतात."

६. **मदन व मजुमदार** :- "समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टीने परस्पर संबंधित असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समुच्चयाला 'आदिवासी समाज' असे म्हणतात."

७. **बोगार्डस** :- "सुरक्षिततेची जरूरी, रक्तसंबंधाचे बंध, समान धर्म यावर आदिवासी समूह आधारलेला होता."

८. **डी. एन. मजूमदार** यांनी आदिवासींची सर्व लक्षणे विचारात घेऊन त्यांची विस्तृत व्याख्या केली आहे.

"समान नाव असणारा, एकाच भू-प्रदेशावर वास्तव्य करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करणाच्या दृष्टीने एक पध्दतशीर व्यवस्था स्विकारणाऱ्या कुटुंबांचे किंवा कुटुंब समूहांचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय"

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण व आदिवासी जमातींची राज्यनिहाय लोकसंख्या तक्ता क्र. १.१ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्रमांक १.१

भारतातील एकूण व अनुसूचित जमातींची राज्यनिहाय लोकसंख्या (जनगणना २००१)

आकडे लाखांत

अ.क्र	राज्य व केंद्रशासित प्रदेश	लोकसंख्या		आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण	राज्य व केंद्रशासित प्रदेश
		एकूण	आदिवासी		
	भारत	**१०२८६.१०**	**८४३.२६**	**८.२०**	**भारत**
	राज्य				**राज्य**
१.	आंध्र प्रदेश	७६२.१०	५०.२४	६.५९	आंध्र प्रदेश
२.	अरूणाचल प्रदेश	१०.९८	७.०५	६४.२१	अरूणाचल प्रदेश
३.	आसाम	२६६.५५	३३.०९	१२.४१	आसाम
४.	बिहार	८२९.९८	७.५८	०.९१	बिहार
५.	छत्तीसगड	२०८.३४	६६.१७	३१.७६	छत्तीसगढ
६.	दिल्ली	१३८.५१	- -	- -	दिल्ली
७.	गोवा	१३.४८	०.०१	०.०७	गोवा
८.	गुजरात	५०६.७१	७४.८१	१४.७६	गुजरात
९.	हरियाणा	२११.४४	- -	- -	हरियाणा

(तक्ता क्र. १.१ पान क्र. १० वरून पुढे)

१०.	हिमाचल प्रदेश	६०.७८	२.४५	४.०३	हिमाचल प्रदेश
११.	जम्मू आणि काश्मिर	१०१.४३	११.०६	१०.९०	जम्मू आणि काश्मिर
१२.	झारखंड	२६९.४६	७०.८७	२६.३०	झारखंड
१३.	कर्नाटक	५२८.५१	३४.६४	६.५५	कर्नाटक
१४.	केरळ	३१८.४१	३.६४	१.१४	केरळ
१५.	मध्यप्रदेश	६०३.४८	१२२.३४	२०.२७	मध्यप्रदेश
१६.	महाराष्ट्र	९६८.७९	८५.७७	८.८५	महाराष्ट्र
१७.	मनीपूर	२१.६७	७.१४	३४.१९	मनीपूर
१८.	मेघालय	२३.१९	१९.९३	८५.९४	मेघालय
१९.	मिझोरम	८.८९	८.३९	९४.३८	मिझोरम
२०.	नागालँड	१९.९०	१७.७४	८९.१५	नागालँड
२१.	ओरिसा	३६८.०५	८१.४५	२२.१३	ओरिसा
२२.	पंजाब	२४३.५९	- -	- -	पंजाब
२३.	राजस्थान	५६५.०७	७०.९८	१२.५६	राजस्थान
२४.	सिक्कीम	५.४१	१.११	२०.५२	सिक्कीम
२५.	तामीळनाडू	६२४.०६	६.५१	१.०४	तामीळनाडू
२६.	त्रिपुरा	३१.९९	९.९३	३१.०४	त्रिपुरा
२७.	उत्तर प्रदेश	१६६१.९८	१.०८	०.०६	उत्तर प्रदेश
२८.	उत्तरांचल	८४.८९	२.५६	३.०१	उत्तरांचल
२९.	पश्चिम बंगाल	८०१.७६	४४.०७	५.५०	पश्चिम बंगाल
	केंद्रशासित प्रदेश				**केंद्रशासित प्रदेश**
१.	अंदमान व निकोबार	३.५६	०.३०	८.४३	अंदमान व निकोबार
२.	चंदिगड	९.०१	- -	- -	चंदिगड
३.	दादरा, नगर हवेली	२.२०	१.३७	६२.२७	दादरा, नगर हवेली
४.	दिव व दमण	१.५८	०.१४	८.८६	दिव व दमण
५.	लक्षद्विप	०.६१	०.५७	९३.४४	लक्षद्विप
६.	पाँडेचरी	९.७४	- -	- -	पाँडेचरी

संदर्भ :- वार्षिक आदिवासी उपयोजना २००४-२००५ पान क्र. ३९८

तक्ता क्र. १.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे २००१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १०२८६.१० लाख असून आदिवासी लोकसंख्या ८४३.२६ लाख आहे. भारतातील एकूण लोकसंख्येत आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.२० टक्के इतके आहे. राज्याच्या दृष्टीने विचार करता सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या मध्यप्रदेशात (१२२.३४ लाख) राहते. त्याखालोखाल अनुक्रमे महाराष्ट्र, ओरिसा, झारखंड, गुजरात व राजस्थान या राज्यांचा क्रमांक लागतो. तर सर्वात कमी आदिवासी लोकसंख्या (०.०१ लाख) गोवा या

राज्यात आहे. दिल्ली, हरियाना व पंजाब या राज्यांत आदिवासी लोकसंख्या आढळत नाही. केंद्रशासित प्रदेशांचा विचार करता सर्वाधिक लोकसंख्या दादरा आणि नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशात (१.३७ लाख) राहते. तर सर्वात कमी लोकसंख्या दिव व दमण या केंद्रशासित प्रदेशात (०.१४ लाख) राहते.

भारतातील राज्यनिहाय एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण विचारात घेता सर्वाधिक प्रमाण (९४.३८ टक्के) मिझोराम या राज्यात आहे. त्यानंतर अनुक्रमे नागालँड (८९.१५ टक्के), मेघालय (८५.९४ टक्के), अरूणाचल प्रदेश (६४.२१ टक्के) या राज्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण (०.०६ टक्के) उत्तर प्रदेशात आहे. केंद्रशासित प्रदेशात सर्वाधिक लोकसंख्येचे प्रमाण (९३.४४ टक्के) लक्षद्वीपमध्ये आहे तर सर्वात कमी प्रमाण (८.४३ टक्के) अंदमान व निकोबार मध्ये आहे. वरील तालीकेवरून सर्वाधिक आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण भारताच्या पूर्वेकडील राज्यांत दिसून येते.

नकाशा क्र. १.१

भारतातील आदिवासी लोकसंख्या वितरण (जनगणना २००१)



Ref. Scheduled Tribe Atlas of India

१.२.३ आदिवासी समाजाची प्रमुख वैशिष्ट्ये

आदिवासी समाज म्हणून ज्या लोकांचा उल्लेख केला जातो, त्यांची वैशिष्ट्येही इतर समाजापासून वेगळी दिसून येतात. त्यामुळे त्यांचे वेगळेपण स्पष्टपणे दिसून येते. आदिवासी समाजाची प्रमुख लक्षणे (वैशिष्ट्ये) पुढील प्रमाणे आहेत.

१) **विशिष्ट भू-प्रदेश** – कोणताही समाज हा एक प्रादेशिक समूह असतो. आदिवासी जमाती या विशिष्ट प्रदेशातच आढळून येतात. काही आदिवासी हे अजूनही भटक्या अवस्थेत आहेत. उदा. जातसारी, थारू, नागा, कुकी, खासी, कचाटी इत्यादी. आदिवासी जमाती या भटक्या असल्या तरी त्यांची भ्रमंती विशिष्ट प्रदेशातच चालू असते. त्याच प्रदेशाला ते आपला मानतात.

सर्वसामान्यपणे बाह्य संर्पकापासून अलिप्त व डोंगराळ भागात आदिवासी लोकांचे वास्तव्य आढळते. या डोंगराळ भागात रस्ते नसतात तसेच पायवाटाही तुरळक असतात. नदी-नाले, दाट झाडेझुडपे, वन्य जनावरे यांचेही अस्तित्व असते. म्हणजेच आदिवासींच्या प्रदेशाला एक नैसर्गिक तटबंदी असते.

२) **प्रमाण लघुता** - आदिवासी समाज हा थोड्या लोकांचा समुदाय असतो. इतर कोणत्याही समाजाशी तुलना करता आदिवासी जमातींची संख्या ही अनेक बाबतीत लहान असते. आदिवासी जमातींची विशिष्ट भू-प्रदेशावरील लोकसंख्या शंभर ते दोनशे च्या आसपास असते. थोड्या लोकांचाच तो समुदाय असतो. ज्या विशिष्ट भू-प्रदेशावर आदिवासी राहतात तो प्रदेश मर्यादित असतो. समाजातील सदस्यांची संख्या मर्यादित असल्याने त्यांच्या सामाजिक संपर्काचे क्षेत्रही लहान असते. विशिष्ट भू-प्रदेश व कमी लोकसंख्या इत्यादींमुळे त्यांच्या सामाजिक संपर्कावरही मर्यादा पडतात.

३) **एकाच रक्तसंबंधावर आधारित** - आदिवासी समाजातील लोक एकमेकांना रक्त संबंधित मानतात. आदिवासी समाजातील लोकांची निर्मिती एकाच पुर्वजापासून झाली यावर त्यांचा पूर्ण विश्वास असतो. आपला पुर्वज एकच आहे ही भावना प्रबळ असते. त्यामुळेच त्यांच्यात विलक्षण बांधिलकी, प्रेम, एकमेकांबद्दल आपुलकी, एकमेकांना सहकार्य करण्याची भावना निर्माण झालेली असते.

४) **समान बोलीभाषा व लेखन कलेचा अभाव** - आदिवासी जमातींमधील लोकांची एक स्वतंत्र बोलीभाषा असते. त्या बोलीभाषेतून सामाजिक संबंध, श्रध्दा, नात्यागोत्याचे संबंध व्यक्त होतात. त्यांच्या भाषेला लिपी नसते. भाषेला लिपी नसल्याने त्यांची लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्यप्रचार, नृत्ये, कोडी, उखाणे हे साहित्य पुढील पिढीस मौखिक स्वरूपातच हस्तांतरित केले जाते. त्यामुळे आदिवासी जमातींमध्ये वाङ्मय निर्मिती झालेली दिसून येत नाही. कला, ज्ञान, धर्मशास्त्र इत्यादींची प्रगत समाजात जशी वाढ झाली तशी आदिवासी जमातींत झालेली दिसून येत नाही. बोली भाषेला लिपी नाही हे त्याचे महत्वाचे कारण आहे.

५) **वेगळी जीवनपध्दती** - आदिवासी समाजाची जीवन पध्दती ही इतर समाजांपेक्षा वेगळी आहे. त्यांचे सामाजिक संबंध रक्त व दर्जा यावर आधारलेले असतात. आप्तसंबंधांनाच त्यांच्या जीवनात महत्वपूर्ण स्थान असते. त्यांची सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था अत्यंत कार्यक्षम व मजबूत आढळते. रीतिरिवाज, रूढी, परंपरा, धर्मश्रध्दा इत्यादींनीच त्यांचे सामाजिक जीवन नियंत्रित झालेले असते. समान सांस्कृतिक जीवन असल्याने खाणे-पिणे, आचार-विचार, केश-भूषा, वेष-भूषा यांच्यात समानता आढळून येते. त्यामुळे इतर समाजात दिसून न येणारा सामाजिक ऐक्यभाव आदिवासी जमातींत दिसून येतो.

६) **साधी अर्थव्यवस्था** - आदिवासी जमातींची साधी अर्थव्यवस्था हे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यांची अर्थव्यवस्था ही निर्वाहप्रधान असते. दैनंदिन गरजांची पुर्तता करणे हे त्यांचे उद्दिष्ट असते. ते फक्त उपभोगापुरतेच उत्पादन करतात. उपभोग्य वस्तुंचे उत्पादनही अपुरे असल्याने त्यांच्या गरजाही व्यवस्थित पूर्ण होऊ शकत नाहीत. त्यांच्या अर्थव्यवस्थेत पैसा व बाजारपेठा यांचा अभाव आढळतो.

फायदा मिळविणे हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे वैशिष्ट्य आदिवासींच्या अर्थव्यवस्थेत आढळून येत नाही. ते एकमेकांना मदत करण्यास प्राधान्य देतात. स्त्री-पुरूषांमध्ये श्रम-विभागणी दिसून येते. परंतु विशेषीकरण दिसून येत नाही. आर्थिक क्रिया पार पाडतांना ते नैसर्गिक साधनांचा जास्तीत जास्त वापर करतात. ते स्वःताच्या परिश्रमांवर अवलंबून

असतात. त्यांच्या गरजा कमीत-कमी असल्याने त्यांच्या आर्थिक जीवनात स्थिरता व समतोल आढळतो.

७) **सीमित तंत्रविद्या**:- आदिवासी समाजाची अर्थव्यवस्था साधी असल्याने त्यांची तंत्रविद्या अत्यंत माफक असते. आदिवासी आर्थिक क्रिया पार पाडण्यासाठी वापरत असलेली हत्यारे व अवजारे अविकसित असतात. शेतजमिनीच्या मशागतीसाठी वापरली जाणारी अवजारे व साधने मागासलेली असतात. आदिवासींनी वापरली जाणारी सर्व हत्यारे व अवजारे स्वःताच निर्माण केलेली असतात.

८) **समान धर्म** - आदिवासी समाजात धर्म व धर्माचरण यांना अनन्यसाधारण महत्व आहे. आदिवासी सतत निसर्गाच्या सहवासात राहत असल्याने त्यांना निसर्गातील सुंदर घटकांविषयी विलक्षण आदर असतो. निसर्गातील गूढ घटनांविषयी त्यांच्या मनात कुतूहल असते. आदिवासी लोक पूर्वजपूजा, भूतपूजा, देवपूजा व निसर्गपूजा करतात. ते निसर्गशक्तींना मनोभावे शरण जातात. अतिमानवी शक्तींना आपलेसे करून घेण्याचे काम भगत, भूमका, पूजारी, जादूटोणा व तंत्रमत्र इत्यादींच्या साह्याने करू शकतो अशी त्यांची ठाम श्रध्दा असते. आदिवासी समाजाच्या या धर्मश्रध्देने त्यांचा जीवनाविषयक दृष्टीकोण निश्चित झालेला असतो. त्यामुळेच समान आचारधर्म हे आदिवासींचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

९) **सामाजिक एकजिनशीपणा** :- सामाजिक एकजिनशीपणा हे एक आदिवासी समाजाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. समान बोलीभाषा, समान धर्माचे आचरण, समान संस्कृती, समान सामाजिक नियम यामुळे आदिवासींच्या आचार-विचारात एकजिनशीपणा आढळून येतो. रीतिरिवाज, धर्मश्रध्दा, रुढी, परंपरा यांचा आदिवासी लोकांच्या मनावर प्रखर प्रभाव असतो. त्यांचे ते अत्यंत काटेकोरपणे पालन करीत असतात. त्यामुळेच जीवनात घडणाऱ्या कोणत्याही घटनेविषयी आदिवासींची प्रतिक्रिया एकच असते. वरील घटकांचा त्यांच्या जीवनावर प्रभाव पडलेला असल्याने त्यांच्या आचरणात भिन्नता आढळून येत नाही.

इतर वैशिष्ट्ये

१) प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र पंचायत असते. आदिवासी समाजाचे पूर्ण नियंत्रण पंचायत किंवा तिचा प्रमूख करतो.

२) आदिवासी अर्थव्यवस्थेत श्रमविभागणी व धंद्यानुसार वेगवेगळ्या सामाजिक गटांचा अभाव आढळतो. सर्व लोक सर्व प्रकारची कामे करतात. आदिवासी अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने प्राथमिक स्वरूपाची असतात उदा. पाटा, वरवंटा, सापळे, जाळी, गळ, दोऱ्या, हातोडा, कोयते, विळे, इत्यादी. आदिवासींची अर्थव्यवस्था वस्तू विनिमय पध्दतीवर आधारलेली असते.

३) आदिवासी अर्थव्यवस्थेत परंपरेला प्राधान्य असते. परंपरेचा ठेवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे गाणी, नृत्य, कथा, काव्य इत्यादी माध्यमांद्वारे दिला जातो.

४) आदिवासी जमाती या स्वयंकेंद्रीत असतात कारण त्यांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवन बाह्य संपर्कापासून शतकानुशतके अलिप्त आहे.

१.३ भारतातील आदिवासींचे वर्गीकरण

भारतात आदिवासींची संख्या मोठी आहे. आदिवासींची वैशिष्ट्ये भारतातील विविध राज्यात राहणाऱ्या आदिवासी जमातींमध्ये कमी-अधिक प्रमाणात आढळून येतात. काही ठराविक वैशिष्ट्ये सोडली तर देशाच्या विविध भागांत राहणाऱ्या आदिवासी जमातींमध्ये वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपण दिसून येते. भाषा, वंश, संस्कृती, आर्थिक स्थिती या सर्व बाबतीत भारतातील सर्वच आदिवासी जमाती एकाच समान पातळीवर नाहीत. तसेच शिक्षण, आर्थिक सुधारणा इत्यादींचा फायदा ज्या आदिवासींना मिळाला आहे त्यांचे वेगळेपणही दिसून येते. त्यामुळे प्रत्येक आदिवासी जमातीचे (जमातींचे) प्रश्न वेगवेगळे आहेत. भारतातील आदिवासी जमातींचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचे वर्गीकरण करणे आवश्यक आहे.

भारतातील आदिवासींचे वर्गीकरण

१) भौगोलिक वर्गीकरण

२) भाषिक वर्गीकरण

३) वांशिक वर्गीकरण

४) सांस्कृतिक वर्गीकरण

५) आर्थिकदृष्ट्या वर्गीकरण

१. आदिवासींचे भौगोलिक वर्गीकरण

भारत हा एक खंडप्राय देश आहे. भारताचा भौगोलिकदृष्ट्या विचार करता देशात सर्वत्र एक प्रकारचे हवामान तसेच नैसर्गिक रचना आढळून येत नाही. भारताचे एकूण क्षेत्रफळ ३२८७२६३ चौ. कि. मी. आहे. जगाच्या एकूण क्षेत्रफळापैकी २.४ टक्के भूभाग भारताच्या वाट्याला आला आहे. भारताची पूर्व-पश्चिम लांबी २९३३ कि. मी. आहे. उत्तर-दक्षिण लांबी ३२१४ कि.मी. आहे. भारताला १५२०० कि. मी. लांबीची भू-सरहद्द लाभली असून ६१०० कि. मी. लांबीचा सागरी किनारा लाभलेला आहे. क्षेत्रफळाच्या बाबतीत भारताचा जगात सातवा क्रमांक लागतो.

भारताच्या विविध भागात आदिवासींची वस्ती आढळते. आदिवासी जमाती या संपूर्ण भारतभर लहान-लहान गटाने विखुरलेल्या आहेत. आर्य आणि द्रवीड भारतात येण्यापूर्वी आदिवासी जमाती येथे राहत होत्या. ते येथील मूळचे रहिवासी आहेत. आर्य आणि द्रवीडांच्या आक्रमणासमोर आदिवासींचा टिकाव लागला नाही. त्यामुळे आदिवासींनी स्वतःच्या संरक्षणासाठी डोंगर, दऱ्या, नदी, नाले, कडे-कपारी यांचा आश्रय घेतला. त्यामुळेच आदिवासी जमाती या भारतातील दुर्गम, अतिदुर्गम प्रदेशात आढळतात. विंध्य व सातपुडा पर्वताशी समांतर व मध्य प्रदेशातील पठाराच्या दक्षिण भागातील जंगलात आदिवासी बहुसंख्येने वास्तव्य करून आहेत. आसाम या राज्याच्या परिसरातही मोठ्या प्रमाणात आदिवासींची वस्ती आढळते. तसेच ब्रम्हदेशाला अलग करणाऱ्या डोंगराळ भागातही मोठ्या प्रमाणात आदिवासींचे वास्तव्य दिसून येते. भारताचा भूगोल व ज्या विभागात आदिवासींची वस्ती आहे ते विभाग लक्षात घेऊन आदिवासींचे भौगोलिक वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात येते.

अ) उत्तर - ईशान्य भाग

ब) मध्य विभाग

क) दक्षिण विभाग

अ) उत्तर ईशान्य विभाग

या विभागात आदिवासी जमातींची विविधता मोठ्या प्रमाणात दिसून येते. खालील राज्यांचा समावेश या विभागात होतो.

१. जम्मू आणि काश्मीर २. हिमाचल प्रदेश ३. उत्तर प्रदेश ४. उत्तरांचल
५. मणिपूर ६. मिझोराम ७. मेघालय ८. आसाम ९. नागालँड
१०. त्रिपुरा ११. अरूणाचल प्रदेश १२. सिक्कीम

भौगोलिकदृष्ट्या बंगाल व बिहार या राज्यांमधील आदिवासींचा समावेश उत्तर-ईशान्य या विभागात होतो. परंतु या राज्यांमधील आदिवासी वांशिकदृष्ट्या वेगळे असल्याने या राज्यांमधील आदिवासींचा समावेश या विभागात केला जात नाही.

ब) मध्य विभाग

भारतातील बहुसंख्य आदिवासी जमाती या विभागात वास्तव्य करून आहेत. आदिवासी लोकसंख्येचा विचार करता जास्त लोकसंख्या या विभागात आढळते. नर्मदा व गोदावरी या नद्यांमधील प्रदेश, उत्तर व दक्षिण भारत यांना विभागणाऱ्या डोंगर रांगा, सह्याद्रीच्या पर्वतरांगा यामध्ये आदिवासींची वस्ती मोठ्या प्रमाणात आहे. या विभागात खालील राज्यांचा समावेश होतो.

१. बिहार २. बंगाल ३. राजस्थान ४. मध्यप्रदेश
५. महाराष्ट्र ६. गुजरात ७. ओरिसा ८. छत्तीसगड
९. झारखंड १०. गोवा

क) दक्षिण विभाग

प्रामुख्याने दक्षिण भारतातील राज्यांचा तसेच अंदमान व निकोबार या केंद्रशासित प्रदेशांचाही यामध्ये समावेश केला जातो. दक्षिणेकडील वायनाडपासून ते कन्याकुमारी पर्यंतचा म्हणजेच पश्चिम घाटातला प्रदेश या विभागात येतो. दक्षिण विभागात पुढील प्रमुख राज्यांचा समावेश होतो.

१. आंध्र प्रदेश २. तामीळनाडू ३. कर्नाटक ४. केरळ

अशा प्रकारे भारतातील आदिवासींचे भौगोलिक वर्गीकरण वरील तीन प्रकारात केले जाते.

भारतातील विविध राज्यांतील व केंद्रशासित प्रदेशांतील प्रमुख आदिवासी जमाती

अ) राज्य

* **आंध्र प्रदेश**

१) आंध २) बगाटा ३) भिल्ल ४) चेंचू ५) गदाबा ६) गोंड ७) गौदू ८) हिल रेड्डी ९) जटापू १०) कम्मार ११) कट्टनायकन १२) कौलम १३) कोंडा ढोर १४) कोंडा कापू १५) कोंडा रेड्डी १६) कोंध १७) कोटिया १८) कोया १९) कुलिया २०) माली २१) मन्ना ढोर २२) मुखा ढोर २३) नायक २४) परधान २५) पोरजा २६) रेड्डी ढोर २७) रोणा २८) सावरा २९) सुगली ३०) थोटी ३१) वाल्मिकी ३२) येनाडी ३३) येरूकूल

* **अरूणाचल प्रदेश**

१) अबोर २) अका ३) अपातनी ४) डफळा ५) गलोंग ६) खाम्टी ७) खोवा ८) मिश्मी ९) मोंबा १०) नागा जमाती ११) शेर्दुकपेन १२) सिंगफो

* **आसाम**

१) चकमा २) दिमासा ३) गारो ४) हजोंग ५) हमार ६) खास ७) कुकी जमाती ८) लाखेर ९) मान १०) मिझो ११) मिकीर १२) नागा १३) पावी १४) सिन्थेंग १५) बरमा १६) बोडो १७) देवरी १८) होजाई १९) कचारी २०) लालुंग २१) मेच २२) मिरी २३) राभा

* **बिहार**

१) असूर २) बैंगा ३) बंजारा ४) बाथुडी ५) बेदिया ६) भूमीज ७) बिंझिया ८) बिरहोर ९) बिरजिया १०) चेरो ११) चीक बराईक १२) गोंड १३) गोराईत १४) हो १५) करमाली १६) खारिया १७) खारवार १८) खोंड १९) किसान २०) कोरा २१) कोरवा २२) लोहरा २३) माहली २४) पहारिया २५) मुंडा २६) उराँव २७) परहायिया २८) संथाळ २९) सौरिया पहारिया ३०) सावर

* **गोवा**

१) धोडिया २) दुबळा ३) नाईकडा ४) सिद्दी ५) वारली

* **गुजरात**

१) बरडा २) बावचा ३) भारवद ४) भिल्ल ५) छरान ६) चौधरी ७) चोधरा ८) धानका, तडवी, तेतारिया, वळवी ९) धोडिया १०) दुबळा ११) गावित, मावची, पाडवी १२) गोंड १३) काथोडी १४) कोकणा १५) ढोर कोळी १६) टोकरे कोळी १७) कुणबी १८) नाईकडा १९) पढार २०) पारधी २१) पराधी २२) पटेलिया २३) पोमला २४) राबरी २५) राठवा २६) सिद्दी २७) वाघरी २८) वारली २९) विटोलिया, बरोडिया

* **हिमाचल प्रदेश**

१) भोट, बोध २) गद्दी ३) गुज्जर ४) लांबा, खाम्पा ५) कनौर ६) लहौल ७) पंगवाल ८) स्वांगला

* **जम्मू आणि काश्मीर**

१) बकरवाल २) वाल्ती ३) बेदा ४) बोतो ५) ब्रोकपा ६) चांगपा ७) गड्डी ८) गार्रा ९) गुज्जर १०) मोन ११) पुरिंग्पा १२) सिप्पी

* **कर्नाटक**

१) अदियन २) बरडा ३) बावचा ४) भिल्ल ५) चेंचू, चेंचूवार ६) चोधरा ७) दुबळा ८) गावित ९) गोंड १०) गोदळू ११) हक्की-पिक्की १२) हसलारू १३) इरूलर १४) इरूलिगा १५) जेनू कुरूंब १६) कडू कुरूंब १७) कम्मार १८) कनियन १९) काथोडी, कातकरी २०) कथ्युनायकन २१) कोकणा २२) ढोर कोळी, टोकरे कोळी, कोलचा २३) कोंडा कापू २४) कोरगा २५) कोटा २६) कोया २७) कुडिया २८) कुरुंब २९) कुरूमान ३०) महा मलासार ३१) मलईकुडी ३२) मलासार ३३) मलयकंदी ३४) मलेरू ३५) मराठा ३६) मारटी ३७) मेढा ३८) नाईकडा, नायका ३९) पल्लीयन ४०) पनीयन ४१) पारधी ४२) पटेलिया ४३) राठवा ४४) शोलगा ४५) सोलीगारू ४६) तोडा ४७) वारली ४९) विटोलिया ५०) येरवा

* **केरळ**

१) अदियन २) अरंदन ३) एरावल्लन ४) हिल पुलाया ५) इरूलर ६) कदर ७) कम्मार ८) कनीकरण, कनीक्कर ९) कट्टनायकन १०) कोचू वेलन ११) कोंडा कापू १२) कोंडा रेड्डी १३) कोरगा १४) कुदिया १५) कुरिच्छन १६) कुरूमन १७) कुरूंब

१८) कोता १९) महा मलासार २०) मलयरन २१) मलयपंदरन २२) मलयवेदन २३) मलंकुरवन २४) मलासार २५) मलयन २६) मलयरायर २७) मन्नन २८) मराती २९) मुथुवन ३०) पल्लेयन ३१) पल्लीयन ३२) पल्लीयार ३३) पनीयन ३४) उल्लदन ३५) उराली

* **मध्य प्रदेश**

१) अगारिया २) आंध ३) बैगा ४) भैन्ना ५) बहारिया ६) भत्रा ७) भिल्ल मिना ८) भिल्ल ९) भुंजिया १०) बियार ११) बिंझवार १२) बिरहूल १३) दमोर १४) धनवर १५) गदाबा १६) गोंड १७) हलबा, हलबी १८) कमार १९) कारकू २०) कवार २१) कीर २२) खैरवार २३) खारिया २४) कोंध २५) कोल २६) कोलाम २७) कोरकू २८) कोरवा २९) मझी ३०) मझवार ३१) मवासी ३२) मीना ३३) मुंडा ३४) नागेसिया ३५) उराँव, धानका ३६) पानिका ३७) पावो ३८) परधान ३९) पारधी ४०) पारजा ४१) सहारिया ४२) सावन्ता ४३) सौर ४४) सावरा ४५) सोनर

* **मणिपूर**

१) ऐमोल २) अनल ३) अंगामी ४) चिरू ५) चोथे ६) गांग्ते ७) हमार ८) काबुई ९) काचा नागा १०) कोइराव ११) कोइरेंग १२) कोम १३) लामगांग १४) माओ १५) मारम १६) मरींग १७) मिझो १८) मोनसांग १९) मोयोन २०) पायते २१) पुरूम २२) राल्ते २३) सेमा २४) सिमते २५) सुहते २६) तांगखूल २७) थादोउ २९) वायफुई ३०) झोउ

* **मेघालय**

१) बोडो कचारी २) चकमा ३) दिमासा ४) गारो ५) हाजोंग ६) हमार ७) खासी ८) कोच ९) कुकी १०) लाखेर ११) मान १२) मिझो १३) मिकीर १४) नागा १५) पावी १६) रावा १७) सिंतेंग

* **मिझोराम**

१) चकमा २) दिमासा ३) गारो ४) हजोंग ५) हमार ६) खासी ७) कुकी ८) लाखेर ९) मान १०) मिझो ११) मिकीर १२) नागा १३) पावी १४) सिंतेंग

* **नागालँड**

१) गारो २) काचारी ३) कुकी ४) मिकीर ५) नागा

* **ओरिसा**

१) बगाटा २) बैगा ३) बंजारा ४) बाथुडी ५) भोत्तदा ६) भूईया ७) भूमिया ८) भूमीज ९) भूंजिया १०) बिंझल ११) बिंझिया १२) बिरहोर १३) बोंडो पोरजा १४) चेंचू १५) दाल १६) देसुआ भूमजी १७) धारूआ १८) दिदायी १९) गदाबा २०) गांदिया २१) घारा २२) गोंड २३) हो २४) होलवा २५) जटापू २६) जुआंग २७) कंधा गौडा २८) कवार २९) खारिया ३०) खारवार ३१) कोंध ३२) किसान ३३) कोल ३४) कोल लोहार ३५) कोलहा ३६) मल्हार कोळी ३७) कोंडादोरा ३८) कोरा ३९) कोरूआ ४०) कोटिया ४१) कोया ४२) कुली ४३) लोढा ४४) माडिया ४५) महाली ४६) मानकिदी ४७) मानकिरदिया ४८) माटया ४९) मिर्धा ५०) मुंडा ५१) मुंडारी ५२) उमांत्य ५३) उराँव ५४) पारेंगा ५५) पारोजा ५६) पेंतिया ५७) राजूआर ५८) संथाळ ५९) साओरा ६०) शबर ६१) सौंती ६२) थारूआ

* **राजस्थान**

१) भिल्ल २) भिल्ल मीना ३) दामोर ४) धानका ५) गरासिया ६) काथोडी, कातकरी ७) कोकणा ८) ढोर कोळी, टोकरे कोळी ९) मीना १०) नाईकडा, नायका ११) पटेलिया १२) सहारिया

* **सिक्कीम**

१) भूतिया २) लेपचा

* **तमिळनाडू**

१) अदियन २) अरनदन ३) एरावल्लन ४) इरूलर ५) कदर ६) कम्मार ७) कनीकरण, कनिक्कर ८) कनियन ९) कट्टनैकन १०) कोचू वेलन ११) कोंडा कापू १२) कोंडा रेड्डी १३) कोरग १४) कोटा १५) कुडिया १६) कुरिच्छन १७) कुरूंब १८) कुरूमान १९) महा मलासार २०) मलयोअरयन २१) मलय पंदरम २२) मलय वेदन २३) मलंकुरवन २४) मलासार २५) मलायाली २६) मलायकंदी २७) मन्नन २८) मुदूगर २९) मुथुवन ३०) पल्लियन ३१) पल्लेयन ३२) पलियार ३३) पनियन ३४) शोलगा ३५) तोडा ३६) उराली

* **त्रिपुरा**

१) भिल्ल २) भुतिया ३) चाईमल ४) चकमा ५) गारो ६) हलाम ७) जमातिया ८) खासिया ९) कुकी १०) लेपचा ११) लुशाई १२) मग १३) मुंडा

१४) नोआतिया १५) ओरांग १६) रियांग १७) संथाळ १८) त्रिपुरी १९) उच्छै

* **उत्तर प्रदेश**

१) भोतिया २) बुक्सा ३) जौनसारी ४) राजी ५) थारू

* **पश्चिम बंगाल**

१) असूर २) बैगा ३) बेडिया ४) भूमिज ५) भूतिया, शेरपा ६) बिरहोर ७) बिरजिया ८) चकमा ९) चिरो १०) चिक बराईक ११) गारो १२) गोंड १३) गोरईत १४) हजांग १५) हो १६) करमाली १७) खारवार १८) खोंड १९) किसान २०) कोरा २१) कोरवा २२) लेपचा २३) लोढा, खारिया २४) लोहार २५) मग २६) महाली २७) महली २८) माल पहारिया २९) मेच ३०) म्रू ३१) मुंडा ३२) नागेसिया ३३) उराँव ३४) पहारिया ३५) राभा ३६) संथाळ ३७) सौरिया पहारिया ३८) सावर

* टीप :- महाराष्ट्रातील आदिवासींची यादी मुद्दा क्र. १.४ मध्ये स्वतंत्रपणे दिलेली आहे.

ब) केंद्रशासित प्रदेश

* **अंदमान आणि निकोबार बेटे**

१) अंदमानी, चारी, कोरा, ताबो, बो, बालवा, जुवाई, कोल
२) जारवा ३) निकोबारी ४) उँगे ५) सेंतिनिली ६) शाँम्पेन

* **दादरा आणि नगरहवेली**

१) धोडिया २) दुबळा ३) काथोंडी ४) कोकणा ५) ढोर कोळी ६) नायका ७) वारली

* **दमण आणि दव**

१) धोडिया २) दुबळा ३) नाईकडा ४) सिद्दी ५) वारली

* **लक्षद्विप**

लक्कदिव, मिनीकोय आणि अमिनदिवी बेटांवरील सर्व लोक आणि त्यांचे आईवडील जे याच बेटांवर जन्मलेले आहेत.

नकाशा क्र. १.२

लोकसंख्येचे ठिकाणानुसार प्रमाण (जनगणना-२००१)



Ref. Scheduled Tribe Atlas of India

२. भाषिक वर्गीकरण

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भारतात अनेक जाती, धर्म व पंथाचे लोक राहतात. भारतातील प्रत्येक राज्याची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भाषिक वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत. भारतात अनेक भाषा बोलल्या जातात. त्यामुळे भारत हा भाषांचे माहेरघर असलेला देश आहे असे म्हटले जाते. सर ग्रिअरसन यांनी इ.स. १८९० मध्ये भाषिक पाहणी केली होती. या पाहणीत त्यांना असे आढळून आले की भारतात १७९ भाषा व ५४४ बोलीभाषा आहेत. १७९ भाषांपैकी ११६ भाषा या आदिवासींच्या आहेत. भारतातील १ टक्के लोक या भाषा बोलतात.

भाषेच्या आधारावर भारतातील आदिवासींचे विभाजन

१. चिनी - तिबेटीयन भाषिक जमाती

भारताच्या उत्तर व ईशान्य भागात रहात असणाऱ्या आदिवासींचा या गटात समावेश होतो. नागा, कुकी, खासी, डफळा, मिरामी, मिकिर हे लोक चिनी तिबेटी भाषिक समजले जातात. तिबेटी व बर्मी भाषिक आणि सयामी व चिनी भाषिक असे त्यांचे दोन उपप्रकार केले जातात.

२. ऑस्ट्रिक भाषिक जमाती

भारताच्या मध्यवर्ती विभागात राहणाऱ्या आदिवासींचा या गटात समावेश केला जातो. कोल, मुंडा, खासी, निकोबारी, कोरकू, खरिया, सवरा, गडवा या जमातीच्या बोलीभाषा या गटात मोडतात. ऑस्ट्रिक भाषेच्या परिवारातील मुंडा ही बोली भारतात बोलली जाते.

३. द्राविड भाषिक जमाती

भारताच्या दक्षिण विभागातील आदिवासी द्राविडी भाषिक आहेत. तोडा, कोटा, गोंड, कोलाम, उराँव व राजमहल डोंगर भागातील काही जमाती द्राविडी भाषिक गटातील बोली वापरतात. या विभागातील आदिवासींच्या भाषांवर तामीळ, तेलगू, कन्नड, मल्यालम्,

या द्राविडी भाषांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. अंदमान व निकोबार भागात राहणारे आदिवासी निकोबारी भाषा बोलतात.

भाषेच्या दृष्टीने विचार केला तर भारतातील सर्व आदिवासी समान पातळीवर नाहीत. आदिवासींच्या भाषा विविध व भिन्न आहेत. परंतू अलिकडे आदिवासींचा नागर समाजाशी संपर्क वाढत असल्याने त्यांच्या अनेक पारंपारिक भाषा संकटात सापडल्या आहेत.

३. भारतातील आदिवासींचे वांशिक वर्गीकरण

संपूर्ण जगातील मानव जातीचा विचार करता मानवी समूह एकाच प्रकारचे आढळून येत नाहीत. धर्म, राष्ट्र, भाषा, संस्कृती व वंश या आधारे मानवी समूहात फरक आढळून येतो. वंश ही एक जीवशास्त्रीय कल्पना आहे. 'होबेल' यांच्या मते, "वंश हा एक असा जीवशास्त्रीय समूह आहे की, ज्यात विशिष्ट प्रकारच्या शारीरिक लक्षणांचा समुच्चय असतो. ही शारीरिक लक्षणे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत झालेली असतात." वंशाचे वर्गीकरण काही निश्चित शारीरिक लक्षणांवरून केले जाते.

भारतात अनेक वंशाचे लोक प्राचीन काळापासून राहतात. म्हणूनच भारताला वंशांचे संग्रहालय असे म्हणतात. भारताचा इतिहास प्राचीन असून भारतातील लोकांच्या वंशाविषयी निश्चित पुरावा उपलब्ध नाही. 'सर हर्बर्ट रिस्ले' यांनी इ.स. १९०१ मध्ये भारतीय लोकांचे वांशिक वर्गीकरण करण्याचा प्रथम प्रयत्न केला.

शारीरिक गुणधर्माच्या आधारावर डॉ. बी. एस. गुहा यांनी भारतीय आदिवासींचे ढोबळमानाने पुढील प्रमाणे वर्गीकरण केले आहे.

अ) मंगोलॉईड

उत्तर व ईशान्य क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासींची शारीरिक ठेवण मंगोलॉईड वंशाच्या लोकांसारखी आहे. हे लोक रंगाने पिवळे असतात. त्यांचे डोके लांब, नाक चपटे, उंची मध्यम व केस सरळ असतात. पूर्व काश्मिर, पूर्व पंजाब, उत्तर प्रदेश, आसाम, नागालॅण्ड, मनीपूर, मिझोराम, त्रिपुरा, अरूणाचल प्रदेश, मेघालय व सिक्किम या राज्यात

राहणारे आदिवासी मंगोलॉईड वंशाचे आहेत. जॉनसारी, थारू, नागा, कुकी, खासी, लेपचा, भोटिया या प्रमुख जमातींचा यामध्ये समावेश होतो.

ब) प्रोटो - ऑस्ट्रोलॉईड

मध्य विभागात राहणाऱ्या आदिवासींना त्यांच्या शारीरिक गुणधर्मावरून त्यांना प्रोटो - ऑस्ट्रोलॉईड वंशाचे लोक असे म्हणतात. या लोकांचा रंग काळा, डोके लांब व केस कुरळे असतात. सर्वसाधारणपणे हे लोक लहान व मध्यम उंचीचे असतात. बिहार, बंगाल, ओरिसा, मध्यप्रदेश, झारखंड, छत्तीसगड, महाराष्ट्र, राज्यस्थान व गुजरात या राज्यात राहणारे आदिवासी प्रोटो - ऑस्ट्रोलॉईड या वंशाचे आहेत. भुंज, मुंडा, उराँव, भुरया, गोंड, बैगा, कोडा, चेंचु, कोरवा, भिल्ल या आदिवासी जमातींचा यामध्ये प्रामुख्याने समावेश होतो.

क) निग्रिटो

दक्षिण विभागात राहणाऱ्या आदिवासी जमातींमध्ये निग्रिटो वंशाचे सर्व शारीरिक गुणधर्म आढळतात. या वंशाच्या लोकांचा रंग पक्का काळा, नाक चपटे, ओठ मोठे, डोके लांब ही शारीरिक वैशिष्ट्ये आढळतात. पूर्व आफ्रिकेतील निग्रो लोकांशी या गटातील लोकांचे शारीरिक वर्णन जुळणारे आहे. कोटा, कुरूंब, तोडा, कादर, उराली, इरुला ह्या आदिवासी जमाती वरील शारीरिक गुणधर्माच्या आहेत.

सर्वसाधारणपणे शारीरिक गुणधर्माच्या आधारावर भारतातील आदिवासींचे वरील प्रमाणे वर्गीकरण केले जात असले तरी इतर भारतीय लोकांप्रमाणे आदिवासींची सरमिसळ झाल्याने शारीरिक गुणधर्माच्या आधारावर आदिवासींचे विभाजन निश्चितपणे करता येत नाही.

४. भारतातील आदिवासींचे सांस्कृतिक वर्गीकरण

जगातील अगदी प्राचीन संस्कृतींमध्ये भारतीय संस्कृतीचा समावेश होतो. भारतातील नागर संस्कृतीपेक्षा वेगळ्या संस्कृती आदिवासी जमातींमध्ये आढळून येतात. भारतातील आदिवासींनी आपली संस्कृती, परंपरा आणि मुल्ये वर्षानुवर्षे टिकवून ठेवली

आहेत. डॉ. एल्विन यांनी भारतातील आदिवासींचे सांस्कृतिक वर्गीकरण चार गटांत केले आहे. ते पुढील प्रमाणे.

अ) खऱ्या अर्थाने गिरिजन किंवा अतिशय मागासलेले आदिवासी.

ब) स्थित्यंतर होत असलेले पण गिरिकंदरात राहणारे परंपराप्रिय आदिवासी.

क) बाह्य संपर्काने स्वतःची संस्कृती विसरत चाललेले आदिवासी.

ड) बाह्य संपर्कात येऊनही स्वतःची संस्कृती टिकवून धरलेले खानदानी आदिवासी.

अ) पहिला गटः- जे आदिवासी अजूनही दुर्गम प्रदेशात राहतात, अत्यंत मागासलेले जीवन जगतात, ते आदिवासी खरेखुरे गिरिजन आहेत. त्यांचा बाह्य जगाशी संपर्क आलेला नाही. जंगलांत, डोंगरदऱ्यांत, कडे-कपारींत, नदी-नाल्यांत निसर्गाशी सामना करीत त्यांनी आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. त्याचबरोबर त्यांनी आपल्या प्राचीन परंपरा, रुढी, आचार-विचारही अजून टिकवून ठेवले आहेत. त्यांचे संघटन, कलात्मक जीवनपध्दती, समूह नाच, पौराणिक दंतकथा, कार्यक्षम आहेत. त्यांच्या जीवनाचे स्वरूप सामुदायिक असते. त्यांचे खेडे म्हणजे एक कुटूंबच असते. त्यांचे आर्थिक जीवन, शेजघर, धान्यकोठारे व जमीनसुध्दा सामुदायिक मालकीची असते. ते बदलती कुऱ्हाड शेती करतात. त्यालाच स्थलांतरित शेती असेही म्हणतात. हे लोक खरेखुरे निसर्गपुत्र असून, अत्यंत प्रामाणिक व साधे आहेत. ते अत्यंत कमी कपडे वापरतात. माडिया, जुआंग, गदबा, बोंदी, बैगा या जमाती या गटात मोडतात.

ब) दुसरा गटः- या गटातील आदिवासी प्रगत समाजापासून दुर असलेले परंतु पहिल्या आदिवासींपेक्षा किंचीत पुढच्या अवस्थेत असणारे आहेत. या गटातील आदिवासी वनप्रदेशात राहतात. या गटातील आदिवासींचाही प्रगत समाजाशी संपर्क येत नसल्याने त्यांच्या प्राचीन परंपरा अजूनही जिवंत आहेत. त्यांची कुटुंबे सामुदायिक नसतात. ते व्यक्तिवादी असून त्यांची घरे वेगवेगळी असतात. ते पशुपालन तसेच शेतीही करतात. पहिल्या गटातील आदिवासींशी तुलना करता या गटातील आदिवासी अधिक कपडे वापरतात. बाह्य जगाशी या गटातील आदिवासींचा संपर्क येत चालल्याने ते कळत-नकळत बदलत आहेत. मारिया, भुईया व उराँव या जमाती याची उदाहरणे आहेत.

क) तिसरा गट - या गटातील आदिवासींची संख्या मोठी आहे. या आदिवासींचा बाह्य जगाशी सतत संपर्क येतो. विशेषतः प्रगत हिंदू समाजाच्या सानिध्यात हे आदिवासी येत असल्याने त्यांच्यात अमुलाग्र बदल घडून आलेले आहेत. त्यांची जुनी संस्कृती, रुढी, परंपरा, आचार-विचार, जीवन पध्दती, धर्मविषयक कल्पना व सामाजिक संघटना इत्यादी बाबी काळाच्या ओघात नष्ट होत चालल्या असून त्यांच्या जागी नवीन जीवनपध्दतीचा उदय झालेला आहे. परंतू त्यामुळे त्यांच्या जीवनात नवीन सामाजिक व सांस्कृतिक समस्या निर्माण झाल्या आहेत. काही संशोधकांच्या मते या गटातील आदिवासी हे केवळ नावापुरतेच आदिवासी राहिलेले आहेत.

ड) चौथा गट :- ज्या आदिवासी जमातींनी प्रगत समाजाच्या सुविधांचा स्विकार केलेला आहे. पण त्यांचे परंपरागत सांस्कृतिक जीवन टिकवून ठेवले आहे अशा आदिवासी जमातींचा समावेश या गटात केला जातो. स्वःपराक्रमावर व स्वःकर्तृत्वावर या गटातील आदिवासींनी समाजात मानाची स्थानेही पटकावलेली आहेत. खानदानी परंपरा, आर्थिक स्थैर्य, संपन्नता, बाह्य संपर्कातून मिळालेले प्रोत्साहन व आत्मविश्वास ही वैशिष्ट्ये या गटातील आदिवासींमध्ये आढळून येतात. भिल्ल व नाग जमातीचे प्रमुख, गोंड राजे, भुईया जमीनदार, कोटकी सरदार, श्रीमंत संथाळ, उराँव नेते व काही सुधारलेले मुंडा इत्यादी आदिवासींचा समावेश या गटात होतो.

संस्कृतीच्या वेगवेगळ्या टप्प्यांत असलेल्या आदिवासींचे प्रश्न वेगवेगळे आहेत. त्यामुळे ते प्रश्न सोडविण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजनांची गरज आहे. दुर्गम प्रदेशात राहणारे आदिवासीही आजच्या आधुनिक युगात प्रगत समाजापासून फार दूर राहू शकणार नाहीत. त्यामुळे त्यांचे प्रश्न सोडविताना आधुनिक जगाच्या संपर्काने त्यांचे जीवन विस्कटनार नाही, त्यांचे शोषण होणार नाही याची काळजी घेणे अत्यावश्यक आहे.

५. भारतातील आदिवासी जमातींचे आर्थिकदृष्ट्या वर्गीकरण

मानवाच्या गरजा या अमर्यादित आहेत. उत्पादनाची साधने ही मर्यादित आहेत. मानव आपल्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी सतत धडपडत असतो. त्यासाठी त्याला आर्थिक क्रिया कराव्या लागतात. आर्थिक क्रियांमध्ये आद्य पाषाण युगापासून सतत बदल होत आहेत.

जगाच्या दृष्टीने विचार करता रानटी अवस्थेपासून ते औद्योगिक अवस्थेपर्यंत मानवाची प्रगती झालेली आहे. परंतु आदिवासी लोकांची कोणत्याही प्रकारची प्रगती झालेली नाही. ते अजूनही पाषाणयुगातील अर्थव्यवस्थेतून बाहेर पडलेले नाहीत. भारतातील आदिवासी जमातींचा विचार करता सर्वच आदिवासी जमातींच्या आर्थिक क्रिया समान नाहीत. त्यामध्ये विविधता आढळून येते. त्यांच्या आर्थिक क्रियांच्या विविधतेवरून त्यांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले जाते.

१. खाद्य संकलन अवस्थेतील जमाती

खाद्य संकलन ही अवस्था अत्यंत प्रारंभिक स्वरूपाची आर्थिक क्रिया आहे. निसर्गात उपलब्ध असणाऱ्या वस्तूंवर गुजराण करणे एवढेच त्यांचे उद्दिष्ट असते. कंदमुळे, फळे गोळा करणे, लहान प्राणी मारणे, मध, मुंग्या, किटक यांचा अन्न म्हणून उपयोग करणे इत्यादींचा या आर्थिक क्रियेत समावेश होतो.

दक्षिण भारतातील कादर, मलपंतरम, पनियन, येनाडी, मध्य प्रदेशातील बैगा, ओरिसातील जुआंग, आंध्र-प्रदेशातील चेंचु, बिहारमधील बिरहोर, महाराष्ट्रातील कातकरी, माडिया इत्यादी. या जमाती अजूनही खादय संकलन अवस्थेत आहेत.

२. खाद्य संकलन व बदलती शेती

खाद्य संकलनाबरोबरच बदलती शेती करणाऱ्या आदिवासी जमातींचा यामध्ये समावेश होतो. शेती करण्यासाठी अत्यंत जुजबी स्वरूपाची अवजारे वापरली जातात. शेती करण्याची पध्दतीही टाकाऊ असते. भारतात कमार, बैगा, व बायझन टेकड्यांमधील रेड्डी लोक या अवस्थेमध्ये असल्याचे दिसून येते.

३. शेती व जंगल संपत्ती

शेतीवर व जंगलांमध्ये उपलब्ध होणाऱ्या साधन संपत्तीवर अनेक आदिवासी जमाती जगत असतात. भारतातील बहुसंख्य आदिवासींचा या गटात समावेश होतो. आसाममधील खासी, राजस्थानचे भिल्ल, मध्यप्रदेशातील गोंड व संथाल तसेच मुंडा, उराँव, थारू, महाराष्ट्रातील बहुतेक आदिवासी जमाती या गटात मोडतात.

४. मजूरी

अनेक आदिवासी जमातींमधील लोक विविध उद्योगधंदे, मळे, खाणी, रस्ते, धरणे, कालवे, शेती इत्यादीं क्षेत्रांत मजूरी करून आपली गुजराण करतात. आधुनिक जगाच्या संपर्कात येणाऱ्या आदिवासींना मजूरी हेच एक मोठे उदरनिर्वाहाचे साधन वाटते. आसाममधील चहा व कॉफीच्या मळ्यांत संथाळ, गोंड व कोंड हे लोक काम करतात. बंगाल, बिहार झारखंड, छत्तीसगड व मध्य-प्रदेशातील आदिवासी लोखंड, कोळसा व मँगेनीज खाणीत काम करतांना आढळतात. महाराष्ट्रतील बहुतेक आदिवासी जमातीचे लोक शेती क्षेत्रात मजूरी करताना दिसून येतात.

वरील वर्गीकरणावरून आदिवासींच्या आर्थिक प्रश्नांची गंभीरता स्पष्ट होते. प्रगत समाजाकडूनही आदिवासींचे मोठ्या प्रमाणात शोषण होत आहे. आदिवासींच्या अज्ञानाचा, भोळेपणाचा, असहाय्यतेचा गैरफायदा जमीनदार, कंत्राटदार व दलाल घेत असतात. त्यामुळे आदिवासींचे आर्थिक प्रश्न सोडविताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे.

१.४ महाराष्ट्रातील आदिवासी

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ या विभागांचे एकत्रित असे महाराष्ट्र राज्य स्थापन करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे एकूण क्षेत्रफळ ३,०७,६९० चौ. कि. मी. असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याचा देशात तिसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्राची लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार ९,६८,७९,००० इतकी होती. लोकसंख्येच्या बाबतीतही भारतात महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येपैकी ८.८५ टक्के (जनगणना २००१) आदिवासी राहतात.

महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवासी जमाती आहेत. या ४७ आदिवासी जमातींपैकी १९ जमाती लोकसंख्येच्यादृष्टीने विचार करता एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्येच्या आहेत. महाराष्ट्रातील १३ जिल्ह्यांत आदिवासी जमातींची दाट लोकवस्ती आढळते. ही दाट लोकवस्ती गडचिरोली, चंद्रपूर, अमरावती, ठाणे, नाशिक, धुळे, नंदूरबार, यवतमाळ, पुणे, अहमदनगर व रायगड या जिल्ह्यांत एकवटली आहे. आदिवासी जमातींचा विचार करता त्यात भिल्ल, महादेव

कोळी, गोंड, वारली, कोकणा, कातकरी, ठाकूर, गावीत, कोलाम, कोरकू, आंध, मल्हार कोळी, धोडिया, दुबळा, माडिया, परधान व पारधी या जमातींचा प्रामुख्याने समावेश होतो. महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचे लोक शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या फारच मागासलेले आहेत. त्यांचा मुख्य धंदा शेतीचा आहे. सुमारे ८५ टक्के लोक शेतीवर उपजिविका करतात. त्यामध्ये ४० टक्के लोक शेती करणारे व ४५ टक्के शेतमजूरी करणारे आहेत. शेती व्यतिरिक्त आदिवासी लोक चटया-टोपल्या तयार करणे, जंगलातील वनौषधे गोळा करणे, गवत कापणे, मजूरी करणे इत्यादी व्यवसाय करतात. त्यांची राहणी अत्यंत साधी व गरजा या मर्यादित आहेत.

तक्ता क्र. १.२ मध्ये महाराष्ट्रातील विविध आदिवासी जमातींची यादी दिलेली आहे. तक्ता क्रमांक १.२ अनुसार महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवासी जमाती राहतात.

नकाशा क्र. १.३

महाराष्ट्र राज्य आदिवासी क्षेत्र भौगोलिक नकाशा



तक्ता क्रमांक १.२

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातींची यादी

१.	आंध
२.	बैगा
३.	बरडा
४.	बावचा, बावची
५.	भैना
६.	भारिया, भुमिया, भुईनहार, पांडो
७.	भत्रा
८.	भिल्ल, भील, गारासिया, ढोली भिल्ल, डुंगरी भिल्ल, डुंगरी गारासिया, मेवासी भिल्ल, रावळ भिल्ल, भंगालिया, पावरा, वसावा, वसावे
९.	भुंजिया
१०.	बिंझवार
११.	बिरहूल, बिरहोर
१२.	चोधरा (अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ, औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी जिल्हे हे वगळता)
१३.	धानका, तडवी, तेतारिया, वळवी
१४.	धनवर
१५.	धोडिया
१६.	दुबला, तलाबिया, हलपाटी
१७.	गामीत, गामटा, गावित, मावची, पाडवी
१८.	गोंड, राजगोंड, अरख, आरख, अगारिया, असूर, बडी माडिया, बडा माडिया, भाटोला, भीमा, भुटा, कोयला भुटी, भर, बायसन माडिया, छोटा माडिया, दंडामी माडिया, धुरू, धुरवा, धोबा, धुलिया, डोरला, गायकी, गटा, गट्टी, गायता, गोंड गोवारी, हिल माडिया, कांदरा, कालंगा, खाटोला, कोयता, कोया, खिरवार, खिरवारा, कुचा माडिया, कुचकी माडिया, माडिया, माडिया माना, मानेवार, मोघ्या, मोघिया, मोंघ्या, मुडिया, मुरिया, नागची, नाईकपोड, नागवंशी, बोझा, राज, सोनझारी, झरेका, थाटिया, थोट्या, वाडे माडिया, बडे माडिया, छोटा माडिया.
१९.	हलबा, हलबी
२०.	कमार
२१.	काथोडी, कातकरी, ढोर काथोडी, ढोर कातकरी, सोन काथोडी, सोन कातकरी
२२.	कवर, कवंर, कौरचेरवा, राठिया, तनवर, छट्री
२३.	खैरवार
२४.	खारिया
२५.	कोकणा, कोकणी, कुकणा

तक्ता क्र. १.२ पान क्र. ३४ वरून पुढे

२६.	कोळ
२७.	कोलाम, मन्नेवारलू
२८.	ढोर काळी, टोकरे कोळी, कोलचा, कोलघा
२९.	कोळी महादेव, डोंगर कोळी
३०.	कोळी मल्हार
३१.	कोंध, खोंड, कांध
३२.	कोरकू, बोपची, मौआसी, निहाल, नहूल, बोंधी, बोंडिया
३३.	कोया, भीन कोये, राजकोया
३४.	नागेशिया, नागासिया
३५.	नाईकडा, नायका, चोळीवाला नायका, कपाडिया नायका, मोटा नायका, नाना नायका
३६.	ओराव, धनगड
३७.	परधान, पाथरी, सरोटी
३८.	परजा
३९.	पारधी, आडवी चिंचोर, फास पारधी, फासे पारधी, लंगोटी पारधी, बहेलिया, बाहोल्लिया, चिता पारधी, शिकारी, टाकणकर, टाकिया
४०.	पटेलिया
४१.	पोमला
४२.	राठवा
४३.	सावर, सावरा
४४.	ठाकूर, ठाकर, का. ठाकूर, मा. ठाकूर, मा. ठाकर
४५.	थोटी (औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी जिल्हे आणि चंद्रपूर जिल्ह्यातील राजूर तहसिलमधील)
४६.	वारली
४७.	विटोलिया, कोटवालिया, वारोडिया

संदर्भ - वार्षिक आदिवासी उपयोजना २००४-२००५ पान नं. ४९९/५००

१.४.१ महाराष्ट्रातील आदिवासींचे भौगोलिक विभाग

महाराष्ट्र राज्यात आदिवासी लोक ज्या भागांमध्ये राहतात त्या भागांचे भौगोलिकदृष्ट्या तीन विभाग पडतात.

अ) सातपुडा विभाग ब) गोंडवन विभाग क) सह्याद्री विभाग

अ) सातपुडा विभाग :- सातपुडा विभागात धुळे, नंदूरबार, जळगांव, औरंगाबाद, अमरावती या जिल्ह्यांचा समोवश होतो. या विभागात भिल्ल, कोकणा, गावित, दुबळा, कोरकू, धानका, तडवी, पावरा, मावची, या जमाती राहतात. महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी या विभागात ३३ टक्के आदिवासी लोक राहतात.

ब) गोंडवन विभाग :- या विभागात विदर्भातील डोंगराळ आणि जंगल विभागाचा समावेश होतो. गोंडवन विभागात चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ व नागपूर हे जिल्हे येतात. या विभागात गोंड, माडिया-गोंड, कोरकू, कोलाम, परधान, आंध या जमाती राहतात. महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येत त्यांचे प्रमाण २९ टक्के आहे.

क) सह्याद्री विभाग :- सह्याद्री विभागात नाशिक, अहमदनगर, पुणे, रायगड व ठाणे या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. या विभागात प्रामुख्याने महादेव कोळी, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी, मल्हार कोळी, या जमातींची वस्ती आढळते. महाराष्ट्राच्या एकूण आदिवासी लोकसंख्येत या विभागातील आदिवासींचे प्रमाण ३८ टक्के आहे.

तक्ता क्रमांक १.३

महाराष्ट्र राज्याची मागील चार दशकांची आदिवासी व एकूण लोकसंख्या
(१९६१,१९७१,१९९१,२००१)

(लोकसंख्या हजारात)

अ.क्र.	तपशिल	१९६१	१९७१	१९८१	१९९१	२००१
१	२	३	४	५	६	७
१.	महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या	३९५,५४	५०४,१२	६२७,८४	७८९,३७	९६८,७९
२.	महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या	२३,०७	३८,४१	५७,७२	७३,१८	८५,७७
३.	आदिवासी लोकसंख्येची राज्याच्या लोकसंख्येशी टक्केवारी	५.८३	७.६२	९.१९	९.२७	८.८५

तक्ता क्रमांक १.४

महाराष्ट्र राज्यातील एकूण व आदिवासी लोकसंख्येचे १९८१, १९९१ व २००१ च्या जनगणेप्रमाणे स्त्री-पुरुष निहाय वर्गीकरण

(लोकसंख्या हजारात)

अ.क्र.	जनगनणा वर्ष	एकूण आदिवासी	पुरुष	स्त्रिया	एकूण
१.	१९८१	एकूण	३२४,१५	३०३,६९	६२७,८४
		आदिवासी	२९,२४	२८,४८	५७,७२
२.	१९९१	एकूण	४०८,२५	३८१,१२	७८९,३७
		आदिवासी	३७,१८	३६,००	७३,१८
३.	२००१	एकूण	५०४,०१	४६४,७८	९६८,७९
		आदिवासी	४३,४८	४२,२९	८५,७७

वरील तक्ता क्रमांक १.३ मध्ये महाराष्ट्रातील मागील चार दशकांची आदिवासी व एकूण लोकसंख्यावाढ दर्शविली आहे. १९६१ मध्ये महाराष्ट्र राज्याची एकूण लोकसंख्या ३९५,५४ हजार होती तर आदिवासी लोकसंख्या २३,०७ हजार होती. एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येशी लोकसंख्येचे प्रमाण ५.८३ टक्के होते. २००१ मध्ये महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ९६८,७९ हजार पर्यंत वाढली तर आदिवासी लोकसंख्येत ८५,७७ हजार इतकी वाढ झाली. एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण १९६१, १९७१, १९८१, १९९१ व २००१ मध्ये अनुक्रमे ५.८३ टक्के, ७.६२ टक्के, ९.१९ टक्के, ९.२७ टक्के व ८.८५ टक्के होते. १९९१ नंतर आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात घट झालेली दिसून येते.

तक्ता क्र. १.४ अनुसार महाराष्ट्र राज्यात आदिवासी लोकसंख्या १९९१ मध्ये ५७,७२ हजार होती. त्यामध्ये पुरुष २९,२४ हजार तर स्त्रिया २८,४८ हजार होत्या. २००१ मध्ये आदिवासी लोकसंख्या ८५,७७ हजार होती. त्यामध्ये पुरुष ४३,४८ हजार तर स्त्रिया ४२,२९ हजार होत्या. म्हणजेच आदिवासी संख्येतही स्त्रियांपेक्षा पुरुषांची लोकसंख्या जास्त आढळून येते. भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कोकणा, कातकरी, ठाकर, गावीत, मल्हार कोळी, कोलाम, कोरकू, आंध या प्रमुख आदिवासी जमातींची लोकसंख्या महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येच्या ८० टक्के आहे.

१.४.२ सह्याद्रीतील प्रमुख आदिवासी जमाती

अ) महादेव कोळी	ब) कोकणा
क) वारली	ड) ठाकर
इ) कातकरी	ई) मल्हार कोळी

महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वताच्या रांगांमधील दुर्गम प्रदेशात, जंगलात, दऱ्या-खोऱ्यांत राहणाऱ्या आदिवासी जमातींचा समावेश सह्याद्री विभागात होतो. सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडील घाटमाथ्यावर व पश्चिमेकडील डोंगर उतारावर आदिवासींची वस्ती आढळते. सह्याद्री विभागात नाशिक, अहमदनगर, पुणे, रायगड व ठाणे या जिल्ह्यांचा समावेश होतो. या विभागात महादेव कोळी, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी व मल्हार कोळी या प्रमुख आदिवासी जमातींचे वास्तव्य आढळते. या जमातींमध्ये **महादेव कोळी** व कोकणा या आदिवासी जमाती विकसनशील म्हणून ओळखल्या जातात. इतर आदिवासी जमातींचा विचार करता या जमातींनी बऱ्यापैकी विकास साध्य केलेला आहे. वारली, ठाकर, कातकरी व मल्हार कोळी या आदिवासी जमाती अत्यंत मागासलेल्या आहेत. सह्याद्री विभागातील आदिवासी जमातींची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणेः-

अ) महादेव कोळी

*प्रस्तुत संशोधन हे **महादेव कोळी** या आदिवासी जमातीशी संबंधित असल्याने या जमातीचे स्वतंत्र विस्तृत विश्लेषण पुढे स्वतंत्र प्रकरणात करण्यात आले आहे.*

महादेव कोळी ही महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वताच्या डोंगराळ भागात दाट वस्ती करून राहणाऱ्या आदिवासी जमातींपैकी एक प्रमुख जमात आहे. ही जमात प्रामुख्याने नाशिक, अहमदनगर, पुणे, ठाणे आणि रायगड या जिल्ह्यांच्या काही विशिष्ट डोंगराळ भागात (*Specified Area*) आढळते. सह्याद्री पर्वताच्या रांगात विशेषतः पूर्व-पश्चिम उतारावर **महादेव कोळी** लोक लहान-लहान गावांत वस्ती करून राहतात. **महादेव कोळी** जमातीच्या या प्रदेशास मावळ, डांगण व नहेर या नावानेही ओळखले जाते. अनेक पठारी प्रदेशांतही त्यांची वस्ती आढळते.

महादेव कोळी जमातीच्या लोकांना **डोंगर कोळी** आणि **राजकोळी** या नावानेही ओळखले जाते. या जमातीच्या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती करणे हा आहे. त्याचप्रमाणे शेतमजूरी करणे, गुरे चारणे, दुग्ध व्यवसाय व कुक्कुटपालन हे जोडधंदेही ते करतात. जंगल व्यवसाय, गृह-उद्योग, व्यापार व वाणिज्य, वाहतूक व साठवणूक व्यवसाय यामध्येही काही लोक गुंतलेले आहेत परंतु त्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

महादेव कोळी लोकांची गावे, वाड्या आणि वस्त्या डोंगराच्या पायथ्याला असतात. या जमातीच्या वस्त्यांना वाडी, वस्ती, झाप या नावानेही ओळखले जाते. गावे सलग आणि एकजिनशी आढळतात. घरे झोपडीवजा, चौमौळी किंवा दोनपाखी असतात. घरांच्या भिंती दगड, माती किंवा विटांच्या असतात. तसेच काही घरांच्या भिंती कुडाच्याही असतात. घरांचे छप्पर हे उतरते असते. घरांचे छप्पर कौले, गवत किंवा भाताचा पेंढा यांनी आच्छादलेले असते. जनावरांसाठी घरातच पडवी किंवा स्वतंत्र झोपडी असते.

महाराष्ट्र राज्यातील **महादेव कोळी** जमातीची लोकसंख्या १९८१ मध्ये ७,८७,४४८ इतकी होती. तिचे राज्यातील आदिवासी लोकसंख्येशी प्रमाण १३.६४ टक्के एवढे होते. १९९१ मध्ये या जमातीची लोकसंख्या ९,९९,३२१ इतकी होती. २००१ च्या जनगणनेनुसार १२,२७,५६२ इतकी झाली आहे. लोकसंख्येच्यादृष्टीने विचार करता **महादेव कोळी** जमातीचा महाराष्ट्रात तिसरा क्रमांक लागतो तर सह्याद्री विभागात प्रथम क्रमांक लागतो.

ब) वारली

महाराष्ट्रातील आदिवासी जमातींमध्ये वारली ही एक प्रमुख आदिवासी जमात आहे. 'डॉ. विल्सन' यांच्या मते 'वारली' म्हणजे मूळचे 'वरले' किंवा वरच्या भू-भागात राहणारे लोक होते. वारली लोक महाराष्ट्र, गुजरात या राज्यात तर दादरा व नगर हवेली या केंद्र-शासित प्रदेशात आढळून येतात. ठाणे जिल्ह्यातील वरचा डोंगराळ भू-भाग तसेच सुरत, नाशिक व डांग जिल्ह्यातील डोंगराळ भूभाग हा वारली लोकांनी व्यापलेला आहे. शेती हा वारली लोकांचा प्रमुख व पारंपारिक व्यवसाय आहे. त्याचप्रमाणे वारली लोक शेतमजूरी करणे, जंगलातील मजूरी करणे, गवत कापणे इत्यादी कामेही करतात. वारली लोक कला-निपुन असून त्यांची वारली चित्रकला ही प्रसिध्द आहे.

वारली लोक प्रामुख्याने झोपड्यांमध्ये राहतात. त्यांच्या झोपड्या चौमौळी असतात. वारली झोपडीच्या भिंती या बांबू, कामट्या आणि कारवीच्या कुडाच्या असतात. वारली लोकांची खेडी विखुरलेल्या झोपड्यांच्या गटागटांनी वसलेली असतात. दहा-पंधरा झोपड्यांचा एक गट मिळून एक 'पाडा' होतो. तीन-चार ते दहाबारा 'पाडे' मिळून एक गाव होते.

लोकसंख्येनुसार **महादेव कोळी** जमाती नंतर वारली या आदिवासी जमातीचा दुसरा क्रमांक लागतो. २००१ च्या जनगणनेनुसार वारली जमातीची लोकसंख्या ६,२७,१९७ इतकी होती. वारली लोक इंडो-आर्यन भाषागटातील 'वारली' ही बोलीभाषा बोलतात.

क) कोकणा

कोकणा या जमातीस कोकणी, कुकणी, कुकणा या नावानेही ओळखले जाते. या जमातीच्या नावावरून ही जमात कोकणातून घाटमाथ्यावर आलेली असावी असे म्हटले जाते. इ.स. १३९६ ते १४०० चे दरम्यान या जमातीने कोकणातून उत्तरेकडे स्थलांतर केल्याचेही म्हटले जाते. कोकणा ही महाराष्ट्रातील एक प्रमुख जमात आहे. ही जमात नाशिक, धुळे व ठाणे या जिल्ह्यांत केंद्रीत झालेली आहे. नंदूरबार जिल्ह्यातील काही गावांतही या जमातीची वस्ती आढळते. त्याचप्रमाणे गुजरात राज्यातील डांग, बलसाड, व सुरत जिल्ह्यांत तसेच दादरा व नगर हवेली या प्रदेशांत बहुसंख्येने कोकणा समाज आढळतो.

कोकणा जमातीच्या लहान-लहान वस्त्यांना 'पाडा' असे म्हणतात. अनेक 'पाडे' मिळून एक गाव बनते. कोकणा समाजाची घरे 'चौमौळी' असतात. घरांच्या भिंती 'कुडाच्या' असतात. मोठी घरे दगड, माती व विटांच्या भिंतींची व नळीच्या कौलांची असतात. शेळ्या व जनावरे बांधण्यासाठी घराला जोडून पडवी बांधलेली असते. कोकणा लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती करणे हा आहे. तसेच ते शेतमजूरी करणे, शिकार करणे व वनौपजे गोळा करण्याचेही काम करतात. शेतीत नगदी पिके अधिक न पिकता तृण धान्ये उदा. वरई, नाचणी, सावा यांचे पीक क्षेत्र मोठे आहे. मुख्य पीक भात हे आहे.

लोकसंख्येच्या दृष्टीने विचार करता सह्याद्री विभागात कोकणा जमातीचा महादेव कोळी या जमातीनंतर तिसरा क्रमांक लागतो. २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील कोकणा

जमातीची लोकसंख्या ५,७१,९१६ इतकी होती. ते इंडो-आर्यन भाषा गटातील कोकणी भाषा बोलतात.

ड) ठाकूर (ठाकर)

ठाकूर (ठाकर) ही आदिवासी जमात फक्त महाराष्ट्र राज्यात आढळते. ही जमात प्रामुख्याने सह्याद्री पर्वताच्या पूर्व-पश्चिम उतारावर, ठाणे, पुणे, अहमदनगर, नाशिक, रायगड जिल्ह्यांच्या डोंगराळ व पठारी पट्ट्यात व अजिंठा पर्वताच्या रांगांमध्ये आढळते. सामाजिकदृष्ट्या हि जमात 'क' आणि 'म' अशा दोन गटांत विभागलेली आहे. 'ना. गो. चापेकर' आपल्या 'बदलापूर' ग्रंथात असे म्हणतात की, ठाकूर (ठाकर) लोकांच्या बोलण्यात अनुक्रमे 'म' व 'क' या वर्णांचा उपयोग वारंवार करण्यात येतो. त्यानुसार या लोकांना ही नावे पडलेली आहेत. या जमातीचे लोक 'ठाकरी बोली' बोलतात. 'क' आणि 'म' गटातील बोलीभाषेत उच्चारात फरक आढळतो.

ठाकूर (ठाकर) या आदिवासी जमातीचा मुख्य धंदा शेती आणि शेतमजूरी हा आहे. त्याचप्रमाणे हे लोक जंगलातील फळे, कंदमुळे, पळसाची व विड्यांची पाने गोळा करतात. बांबूपासून पाट्या, टोपल्या विणण्याचेही काम करतात. शिकार करणे हा त्यांचा आवडता छंद आहे.

महाराष्ट्र राज्यातील ठाकूर (ठाकर) जमातीची लोकसंख्या १९८१ च्या जनगणनेनुसार ३.२३ लाख होती व तिचे राज्यातील आदिवासी लोकसंख्येशी प्रमाण ५.६ टक्के एवढे होते. २००१ च्या जनगणनेनुसार ठाकूर (ठाकर) या जमातीची लोकसंख्या ४,८७,६९६ इतकी होती. सह्याद्री विभागात लोकसंख्येच्या दृष्टीने या जमातीचा चौथा क्रमांक लागतो.

इ) कातकरी

कातकरी ही आदिवासी जमात सह्याद्री विभागातील अत्यंत मागासलेली जमात आहे. ही जमात रायगड, ठाणे, आणि पुणे या जिल्ह्यांत केंद्रित आहे. अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांतही त्यांची वस्ती आढळून येते. कातकरी लोक झोपडी बांधून राहतात. आज इथे झोपडी तर उद्या तिथे झोपडी अशी त्यांची स्थिती आहे. ९५ टक्के कातकरी लोक भूमिहीन आहेत. ते शेतमजूरी व जंगलमजूरी करतात. त्याचप्रमाणे वनौपजे गोळा करणे, शिकार करणे,

कंदमुळे गोळा करणे ही कामे करतात. कातकरी लोकांत जवळजवळ शिक्षणाचा अभाव दिसून येतो. कातकरी लोकांचे साक्षरतेचे प्रमाण जेमतेम ७ ते ८ टक्के आहे. स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण २ ते ३ टक्के एवढेच आहे. कातकरी जमातीची आर्थिक, सामाजिक स्थिती अत्यंत दयनीय आहे. बहुसंख्य कातकरी लोक अर्धगुलामगिरीतच जीवन कंठीत आहेत. सह्याद्री विभागात लोकसंख्येच्या दृष्टीने त्यांचा पाचवा क्रमांक लागतो. २००१ च्या जनगणनेनुसार कातकरी जमातीची लोकसंख्या २,३५,०२२ इतकी होती. ते त्यांची 'काथोडी' ही बोली भाषा बोलतात.

ई) मल्हार कोळी

सर्वसामान्यपणे 'मल्हार कोळी' ही जमात 'कोळी-मल्हार' या नावानेही ओळखली जाते. या जमातीची वस्ती प्रामुख्याने ठाणे जिल्ह्यात आढळते. त्यांची वस्ती ठाणे जिल्ह्यातील पालघर, डहाणू, वाडा, जव्हार, वसई आणि भिवंडी या तालुक्यांत एकवटली आहे. 'रसेल आणि हिरालाल' यांच्या मते 'मल्हार कोळी' ही 'कोळी' जमातीची उपजमात आहे. शेती आणि शेतमजूरी करणे हा मल्हारकोळी जमातीचा प्रमुख व्यवसाय आहे. गवत कापणे, झाडे तोडणे, वनौपजे गोळा करणे, मासेमारी करणे व शिकार करणे हे त्यांचे जोड व्यवसाय आहेत. 'मल्हार कोळी' जमातीची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट आहे. 'मल्हार कोळी' लोक मराठी व 'मल्हार कोळी' ही बोली बोलतात. या जमातीचे बहुसंख्य लोक निरक्षर आहेत. लोकसंख्येच्या दृष्टीने 'मल्हार कोळी' जमातीचा सह्याद्री विभागात सहावा क्रमांक लागतो. २००१ च्या जनगणनेनुसार या जमातीची लोकसंख्या २,३३,६१७ इतकी होती.

वरील सर्व आदिवासी जमातींमध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय दृष्ट्या फरक आढळून येतो. त्यांचे प्रश्न पूर्णपणे एकमेकांपासून भिन्न आहेत. तेव्हा ते सोडविण्यासाठी स्वतंत्र उपायांची गरज आहे.

तक्ता क्र. १.५

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातींची लोकसंख्या (१)

अ.क्र.	जिल्हे	आदिवासी जमाती					
		अंध	बैगा	बरडा	बावचा	भैना	भारिया
		१	२	३	४	५	६
१.	नंदूरबार	३	०	७	०	२	०
२.	धुळे	०	०	१२	०	०	०
३.	जळगांव	१५५	४५	६	१४	०	२
४.	बुलढाणा	१४७४९	०	०	०	०	०
५.	अकोला	१९०८५	४	०	०	०	१४
६.	वाशिम	५१७८५	३०	०	०	०	१२
७.	अमरावती	५३८	११	०	०	१०१	१०
८.	वर्धा	११४८	८	०	०	७	०
९.	नागपूर	१४८	१२३	६	०	४३	५८
१०.	भंडारा	१९	२३	४	०	१०	०
११.	गोंदिया	०	१२१	०	०	४	०
१२.	गडचिरोली	२०	२३	०	०	०	०
१३.	चंद्रपूर	६८२	५	२८	०	५	२७
१४.	यवतमाळ	१२११३८	१९	०	०	०	१८
१५.	नांदेड	६७७४४	२	०	०	०	०
१६.	हिंगोली	७७४८६	०	०	०	५	०
१७.	परभणी	१२७११	०	०	०	०	१
१८.	जालना	२२३२	०	०	०	०	०
१९.	औरंगाबाद	४८०	६	०	०	०	२२
२०.	नाशिक	१९३	११	११	६	४	१४
२१.	मुंबई (उपनगर)	२०४	३५	८९	४०	११	७९
२२.	ठाणे	४२७	८	७	१२	१३	१३०
२३.	मुंबई	३१	०	६	१	०	१८
२४.	रायगड	८७	०	०	१०	०	१४
२५.	पुणे	४५५	६	४६	६	१८	२५
२६.	अहमदनगर	११५	०	०	०	१	०
२७.	बीड	४६०	०	०	०	०	०
२८.	लातूर	१९४	०	२७	०	०	०
२९.	उस्मानाबाद	१६७	०	१४	०	०	०
३०.	सोलापूर	८५	०	१५	०	११	९६
३१.	सातारा	२९	०	१५	४	०	०
३२.	रत्नागिरी	२४	०	०	०	०	०
३३.	सिंधुदुर्ग	१५९	०	४	३	०	०
३४.	कोल्हापूर	९६	१	२३	१	०	६४
३५.	सांगली	२६	०	०	०	०	४
		३७२८७५	४८१	३२०	९७	२३५	६०८

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातींची लोकसंख्या (२)

अ.क्र.	जिल्हे	आदिवासी जमाती					
		भन्ना	भिल्ल	भुंजिया	बिंझवार	बीरहूल	चोधरा
		७	८	९	१०	११	१२
१.	नंदूरबार	०	७१४१२७	०	२	४	१३
२.	धुळे	०	२९५२६६	१२४	१	०	०
३.	जळगांव	०	२५१६४३	२६७	३	३	१
४.	बुलढाणा	०	२४६०५	६५	०	०	०
५.	अकोला	०	४५८६	८४	४२	०	०
६.	वाशिम	०	४६	२५७	०	०	०
७.	अमरावती	०	३९४६	४३५	१०	०	०
८.	वर्धा	०	६९७	५२	५	०	०
९.	नागपूर	०	९९४	४४१	४१४	२	०
१०.	भंडारा	०	५८	५४	१९६४	०	०
११.	गोंदिया	३	१७	०	५२२५	०	०
१२.	गडचिरोली	०	८८	०	३५	०	०
१३.	चंद्रपूर	२३	३१६	६	८९	०	०
१४.	यवतमाळ	०	२७९३	१३९	४३	०	०
१५.	नांदेड	०	६८७७	०	०	०	०
१६.	हिंगोली	०	९५	०	०	०	०
१७.	परभणी	०	३१३	०	०	०	०
१८.	जालना	०	८८४०	०	०	०	०
१९.	औरंगाबाद	०	४६५९७	४	५९	०	०
२०.	नाशिक	९	३००४९५	५७	३०	०	४
२१.	ठाणे	२०	५३४३	४७	१	२१	९४
२२.	मुंबई (उपनगर)	४८	१४३१	६१	३०	०	३०
२३.	मुंबई	०	३३८	२६	०	१	१
२४.	रायगड	७	६३६	२४	८	२	१
२५.	पुणे	०	१४७७२	२७	२४	४	५४
२६.	अहमदनगर	०	१२३४९३	९	५८	०	२
२७.	बीड	०	६१३८	०	०	०	०
२८.	लातूर	०	३६९	०	०	०	०
२९.	उस्मानाबाद	०	२६७	०	०	०	०
३०.	सोलापूर	०	१५४६	९	०	०	०
३१.	सातारा	१९	५७५	२	१	०	०
३२.	रत्नागिरी	०	४३२	३	३७	०	४
३३.	सिंधुदुर्ग	०	२३५	०	०	३	०
३४.	कोल्हापूर	०	५७९	०	७५	०	१
३५.	सांगली	०	२३९	०	०	०	०
		१२९	१८१८७९२	२१९३	८१५६	४०	२०५

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातींची लोकसंख्या (३)

अ.क्र.	जिल्हे	आदिवासी जमाती					
		धानका	धनवर	धोडीया	दुबळा	गावित	गोंड/राजगोंड
		१३	१४	१५	१६	१७	१८
१.	नंदूरबार	२६३५७	२	३०५	६३५	६१७५४	१२३
२.	धुळे	६८४	०	०	०	१९८५०	५२६
३.	जळगांव	१३९४९	८०	४	१४	९०	२५६५
४.	बुलढाणा	७३	२८१७	०	०	०	२५९०
५.	अकोला	४७	३४९९	०	०	२	१४५०८
६.	वाशिम	४	५५७	१	२	६	३८५१
७.	अमरावती	१०	४३९०	१०	०	२८	९५३६३
८.	वर्धा	६	६८७	०	०	०	११५४४८
९.	नागपूर	६१	४७९	१६	०	४०	२५७११९
१०.	भंडारा	०	२९	०	०	७	६९९८६
११.	गोंदिया	०	३	०	०	०	१२७७१९
१२.	गडचिरोली	१	४२	०	०	११	३२८५०२
१३.	चंद्रपूर	२	२७२	०	१	७	२९५८०४
१४.	यवतमाळ	७	२३७६	४०	०	५	१७२४५८
१५.	नांदेड	२९९	४६	०	०	०	३८९०४
१६.	हिंगोली	४९	१२७	०	०	०	६१६
१७.	परभणी	५६३	४	०	०	१	१४२१
१८.	जालना	१४१	२०	१	०	२६	३८९
१९.	औरंगाबाद	२०१८	३७६८	०	१	१३	१७८०
२०.	नाशिक	३७२	२८	४	४	३४०	२६९४
२१.	ठाणे	३०१	११०	५३४२	१२२६१	१०७४	६३५३
२२.	मुंबई (उपनगर)	२६०	३४७	३८२८	३९६९	१८४९	४६३४
२३.	मुंबई	३५	८२	५७	११०	७२८	१८६५
२४.	रायगड	२५	१७	१२	९	१३०	६८२
२५.	पुणे	८६	७९	१०	७	६२	२७४४
२६.	अहमदनगर	३३	११	०	०	४०	६३६
२७.	बीड	२१३	६	०	०	१९	१२६९
२८.	लातूर	७५	०	०	०	२	१९९२
२९.	उस्मानाबाद	०	०	०	०	११	५१९
३०.	सोलापूर	५	३४	२	०	१७	४९४
३१.	सातारा	३	४८	०	०	२२	५६१
३२.	रत्नागिरी	५०	८२	०	४	८१	३०५
३३.	सिंधुदुर्ग	०	२२	०	०	५३०	३९
३४.	कोल्हापूर	८	५३	०	०	२६	३०८
३५.	सांगली	४	३	४	०	५	१२७
		४५७४१	२०१२०	९६३६	१७०१७	८६७७६	१५५४८९४

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातींची लोकसंख्या (४)

अ.क्र.	जिल्हे	आदिवासी जमाती					
		हलबा/हलबी	कमार	कातकरी	कवर	खैरवार	खारिया
		१९	२०	२१	२२	२३	२४
१.	नंदूरबार	१४	०	२६७	१९	०	५
२.	धुळे	४७	०	३६४	१६	४	५
३.	जळगांव	२१९	१	४२९	५९	१५	७
४.	बुलढाणा	५६२	६०	९५	११०५	०	१८
५.	अकोला	२६३४	५६०	१९	१८७	१	०
६.	वाशिम	८४६	२९१	१	३१	०	०
७.	अमरावती	९७७६	२२४	३२	४१९	५	२७
८.	वर्धा	१२३६६	१२४	१५	२७४	६	६
९.	नागपूर	१४७५३०	१५४७	४४	२८०१	५१	८७
१०.	भंडारा	२२९९४	३११	४	२६४	९	१२
११.	गोंदिया	५२४०३	६५	०	७७६६	६	०
१२.	गडचिरोली	१२४३५	१५	२	७०८४	४६	६२
१३.	चंद्रपूर	१८८२६	२८१	१७	५३१	७७	२५
१४.	यवतमाळ	५७२८	१२३	०	२५४	०	७४
१५.	नांदेड	३१९	७८	१२४६	२२७	०	१
१६.	हिंगोली	४२	३४	७७३	१९४	०	०
१७.	परभणी	१४	०	१९५४	३२	०	०
१८.	जालना	६	०	१०५०	४८	०	९
१९.	औरंगाबाद	२५३	२३	३८४	९९	१	१
२०.	नाशिक	१८१६	५	७१९४	१४७	६	०
२१.	ठाणे	४४५५	८४	९१४२९	५६८	९४	२७
२२.	मुंबई (उपनगर)	११०९	२३६	४९७	३७४	१५४	९१
२३.	मुंबई	३९६	३८	४३	२०६	१६	२९
२४.	रायगड	३३२	६	१०३२४४	१५८	१८	२
२५.	पुणे	१५१७	५२	११९३५	१६४	२९	१४
२६.	अहमदनगर	६९३	०	७९३	२०	०	०
२७.	बीड	४५	३	२१५९	५०	०	५
२८.	लातूर	१३	१०	१६३९	१७	०	०
२९.	उस्मानाबाद	३३	०	१८०	५	०	०
३०.	सोलापूर	९७	१७	४५८	५०	१	०
३१.	सातारा	५७	१३	२४४८	७४	०	४
३२.	रत्नागिरी	९८	५	६०३४	८	०	१८
३३.	सिंधुदुर्ग	५९	३	१६९	६३	२७९	०
३४.	कोल्हापूर	१३०	०	६२	३७	१	०
३५.	सांगली	५९	०	४२	१४	०	०
		२९७९२३	४२०९	२३५०२२	२३३६५	८१९	५२९

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातींची लोकसंख्या (५)

अ.क्र.	जिल्हे	आदिवासी जमाती					
		कोकणा	कोळ	कोलाम	ढोरकोळी	कोळी महादेव	कोळीमल्हार
		२५	२६	२७	२८	२९	३०
१.	नंदूरबार	४०८४८	६	०	७२४७	३४५	६
२.	धुळे	८९७५३	०	४५	२१७२३	९७७	९८
३.	जळगांव	५२७	७०	५६	१२६९११	७९६४	१३२९
४.	बुलढाणा	७	१	१२६	१११	३३०६७	५९
५.	अकोला	९	५३	१४५	३७	२२६५६	२१
६.	वाशिम	०	०	३१	२२	५०१९	६
७.	अमरावती	२४	२२९	५९०	२८	१९३२९	५१
८.	वर्धा	२	१७५	८२०८	७७	४२५	५०
९.	नागपूर	६४	३५९३	२८०	१४६	८९५	३५४
१०.	भंडारा	५	७३२	१२	७	६७	९
११.	गोंदिया	२	१०	०	४	१८	१९
१२.	गडचिरोली	०	४८	२२	१	५४	७
१३.	चंद्रपूर	८	३०१	६३७६	६०	११७६	४०५
१४.	यवतमाळ	३२	५५	९३९२९	५३	९६१५	१२८
१५.	नांदेड	७	१	५१६५३	३२९	६३७७१	८५८
१६.	हिंगोली	०	०	५३९	११	३८७५	१४
१७.	परभणी	३३	०	१८८१	२७	१०२७९	१०
१८.	जालना	७२	०	२५९१	१०१	६४९९	७३५२
१९.	औरंगाबाद	२३७	२५	२६५२	३१६	१०१३३	१९५९२
२०.	नाशिक	३६०७५५	३३	१४३	६९९	३९४६३१	३६६
२१.	ठाणे	६८५८३	१३९	५४८	९२५०	८१२७७	१९८२१६
२२.	मुंबई (उपनगर)	२७४१	१५१	२४२	४४८	२३४९०	३०१३
२३.	मुंबई	९७५	९	२६१	१२०	१११०३	२७६
२४.	रायगड	२१९७	४	२९	२७२	८२५०२	३८१
२५.	पुणे	३११८	२९	९८२	३६०	१५६५००	२१०
२६.	अहमदनगर	२७६	१	१६०	८३	११३३२९	३१८
२७.	बीड	१००	०	७११	११०	८४८०	६९
२८.	लातूर	१६	१	२४२	२१	३९७१२	९१
२९.	उस्मानाबाद	५४	०	२५२	४	१४८७४	२६
३०.	सोलापूर	९८	१	७९३	१२४	४८८५९	१३
३१.	सातारा	५२८	५	१२	१६०	१३८६४	५
३२.	रत्नागिरी	४३७	७	८९	२९६	१०९२०	११९
३३.	सिंधुदुर्ग	०	६	३६	५१	५७५	४०
३४.	कोल्हापूर	२०७	६	०	८४०	१६५९४	४०
३५.	सांगली	२०१	०	१०	६०७	१४६८८	६६
		५७१९१६	५६९१	१७३६४६	१७०६५६	१२२७५६२	२३३६१७

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातींची लोकसंख्या (६)

अ.क्र.	जिल्हे	आदिवासी जमाती					
		कोंध/खोंड	कोरकू	कोया	नागेशिया	नाईकडा	ओराव
		३१	३२	३३	३४	३५	३६
१.	नंदूरबार	०	१२८	०	०	१५८६	२२
२.	धुळे	३	७	०	०	३०	६२
३.	जळगांव	०	१०२८	०	१६	१२७९	२५८
४.	बुलढाणा	३	५८५४	०	०	९३४३	१२९
५.	अकोला	४	९०७७	१	०	८४	२०६
६.	वाशिम	०	७९	०	०	२८५०	२९४
७.	अमरावती	५	१९३१९९	९	७	१४	८६०
८.	वर्धा	०	६५३	८	०	७८	१२२
९.	नागपूर	३	७३०	१	१४	३५	२६०६
१०.	भंडारा	०	३२	०	०	४	३६
११.	गोंदिया	०	२	०	२४	४	३२
१२.	गडचिरोली	५	१६	२	०	१५	५१३३
१३.	चंद्रपूर	२१	१२७	५३	१५	१३९	८०७
१४.	यवतमाळ	०	१५४	१	०	४२५१	५३३
१५.	नांदेड	२	२४	१०	०	२५३२	९५२१
१६.	हिंगोली	४	०	०	०	३	१४८
१७.	परभणी	२	७	०	०	२०६६	४०६
१८.	जालना	०	१	०	०	२४	२०९
१९.	औरंगाबाद	५	६	०	९३	४२३	४३२
२०.	नाशिक	२३	३४	०	५	३७७	११३
२१.	ठाणे	६९	६८	१९	२२	३१४	९१५
२२.	मुंबई (उपनगर)	६१	६८	२१	६	४०१	१३३३
२३.	मुंबई	३	१४	२	१	९५	४१८
२४.	रायगड	५	५०	९	४	७३	१०८७
२५.	पुणे	३३	२६०	२४	५	४०७	५११
२६.	अहमदनगर	०	०	१	५	२४	१७०
२७.	बीड	०	८	१०	०	१२८	१९
२८.	लातूर	५	३	०	०	७७५	१११७
२९.	उस्मानाबाद	०	०	०	०	६	१९०
३०.	सोलापूर	१	६	६१	०	११०	२११
३१.	सातारा	०	८	५	०	२०	१९१
३२.	रत्नागिरी	३	२	०	०	१४०	८७
३३.	सिंधुदुर्ग	२५	०	०	०	६६	१४५
३४.	कोल्हापूर	०	३०	०	०	६९	५२२
३५.	सांगली	८	१७	४	०	२१	७६
		२९३	२११६९२	२४१	२१७	२७७८६	२८९२१

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातींची लोकसंख्या (७)

अ.क्र.	जिल्हे	आदिवासी जमाती					
		परधान	पारधी	परजा	पटेलिया	पोमला	राठवा
		३७	३८	३९	४०	४१	४२
१.	नंदूरबार	१४	१०४३	०	१	०	१५०
२.	धुळे	१०	९२३६	०	१	०	०
३.	जळगांव	३७	१६८४९	०	४०	०	२३
४.	बुलढाणा	१२१	१६४२८	२	२२	०	१७३
५.	अकोला	१७०	१७५७८	०	१	०	०
६.	वाशिम	२७	२८४४	०	१	०	१
७.	अमरावती	३९३	२०५६८	९३	६	१	१५८
८.	वर्धा	८३०७	२६१९	५	६	०	०
९.	नागपूर	१६८२	२१७९	४२	२२९	४	०
१०.	भंडारा	२५३	१२१	०	१	०	०
११.	गोंदिया	१०११	४७	०	०	०	०
१२.	गडचिरोली	१६६७८	१५३	०	०	०	०
१३.	चंद्रपूर	४३३०२	१६०४	२३	४	०	०
१४.	यवतमाळ	४८२९८	८१२९	०	७	१	०
१५.	नांदेड	४२७५	२७१३	२९	३००	०	०
१६.	हिंगोली	१०	१४०५	०	०	०	०
१७.	परभणी	२५	२२४१	०	०	०	०
१८.	जालना	५४	१२३९	०	०	०	२२
१९.	औरंगाबाद	१७	१६०३	१०	०	०	०
२०.	नाशिक	१३२	३५६६	१८	१५	०	५
२१.	ठाणे	३६६	२९११	७२	१०४	१०	४०
२२.	मुंबई (उपनगर)	१८४	२०८३	६२	३०२	११	५८
२३.	मुंबई	२८	१६३०	४१	१८	१	२
२४.	रायगड	१८०	३६४	०	४८	१५	५०
२५.	पुणे	१२०	७२३०	१९	३३	०	४
२६.	अहमदनगर	९८	६२९३	०	८	०	३
२७.	बीड	४१	३४४९	०	०	०	०
२८.	लातूर	४९	५४३	०	०	०	५
२९.	उस्मानाबाद	२७	९९५९	०	०	०	०
३०.	सोलापूर	१३४	९५१९	०	४	१९	०
३१.	सातारा	४	१४४२	३६	५	०	०
३२.	रत्नागिरी	१९	८९	१७	३५	०	८
३३.	सिंधुदुर्ग	४०	५६	०	०	०	३२
३४.	कोल्हापूर	२५	१०१७	०	०	०	७०
३५.	सांगली	३	११२५	०	०	०	६
		१२६१३४	**१५९८७५**	**४६९**	**११९१**	**६२**	**८१०**

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातींची लोकसंख्या (८)

अ.क्र.	जिल्हे	आदिवासी जमाती					
		सावर/ सावरा	ठाकूर/ ठाकर	भोटी	वारली	विटोलिया	सर्वसाधारण आदिवासी जमात
		४३	४४	४५	४६	४७	४८
१.	नंदूरबार	०	८४६	०	६	१५२	३५३५
२.	धुळे	०	४२१९	०	१२९	१	३७१
३.	जळगांव	०	७७०१	०	२६	१०	२२५६
४.	बुलढाणा	०	२९०९	०	१	८	५३
५.	अकोला	०	४५४४	०	१६	८९	१२५
६.	वाशिम	०	१९४२	०	०	०	१५१
७.	अमरावती	०	५५७७	०	८	०	४९
८.	वर्धा	१०	२६७२	०	७	०	१४२
९.	नागपूर	४०	१८५३७	०	२०	५	९७८
१०.	भंडारा	०	६५०	०	०	०	४१
११.	गोंदिया	०	१९४२	०	६	०	२
१२.	गडचिरोली	२२	७३८	०	०	०	४३६
१३.	चंद्रपूर	१४	३५८६	०	८	०	२०३
१४.	यवतमाळ	२	२६३५	०	०	०	३३२
१५.	नांदेड	२३	१५११	९	०	०	२८५
१६.	हिंगोली	०	९२८	०	०	०	५४०
१७.	परभणी	०	१०६३	०	०	०	१५६
१८.	जालना	०	९६०	०	३	०	२१४
१९.	औरंगाबाद	०	९२०९	१०	६	०	१३८
२०.	नाशिक	०	६२६२७	०	५७१३१	०	१५४
२१.	मुंबई (उपनगर)	३७	४८९०	०	९९९८	१४	१४३४
२२.	मुंबई	१	११८६	०	१२७	२६	३०२
२३.	ठाणे	९३	१४३०९३	०	५५८७८८	३६	६१३६
२४.	रायगड	६	७५००८	०	३२३	०	१०९३
२५.	पुणे	६	५८७७४	०	१७७	२२	७६२
२६.	अहमदनगर	०	५६४७४	०	३०	०	७८
२७.	बीड	०	६५२	०	६	०	४३
२८.	लातूर	०	८५३	०	१	०	६४
२९.	उस्मानाबाद	०	११९८	०	३	०	६८
३०.	सोलापूर	०	५८७५	०	६	०	२१८
३१.	सातारा	०	१६१९	०	८	०	१०९
३२.	रत्नागिरी	०	३२८	०	२९३	०	२८
३३.	सिंधुदुर्ग	०	२११२	०	३८	०	१६२
३४.	कोल्हापूर	०	४१५	०	१८	०	६९
३५.	सांगली	०	४२३	०	१४	०	५९
		२५४	४८७६९६	१९	६२७१९७	३६३	२०७८६

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातींची लोकसंख्या (९)

अ.क्र.	जिल्हे	जिल्हा निहाय लोकसंख्या	टक्केवारी	अनुक्रमांक निहाय टक्केवारी
		४९	५०	५१
१.	नंदूरबार	८५९५७४	१०.०२	३
२.	धुळे	४४३५६४	५.१७	६
३.	जळगांव	४३५९५१	५.०८	७
४.	बुलढाणा	११५१५६	१.३४	१७
५.	अकोला	१०००८८	१.१७	१८
६.	वाशिम	७०९८७	०.८३	२२
७.	अमरावती	३५६५३३	४.१६	१०
८.	वर्धा	१५४४१५	१.८०	१६
९.	नागपूर	४४४४४१	५.१८	५
१०.	भंडारा	९७७१८	१.१४	२०
११.	गोंदिया	१९६४५५	२.२९	१५
१२.	गडचिरोली	३७१६९६	४.३४	९
१३.	चंद्रपूर	३७५२५६	४.३८	८
१४.	यवतमाळ	४७३३७०	५.५२	४
१५.	नांदेड	२५३५९६	२.९६	१४
१६.	हिंगोली	८६८९८	१.०१	२१
१७.	परभणी	३५२१०	०.४१	२६
१८.	जालना	३२१०३	०.३७	२७
१९.	औरंगाबाद	१००४१६	१.१७	१९
२०.	नाशिक	११९४२७१	१३.९२	२
२१.	ठाणे	११९९२९०	१३.९८	१
२२.	मुंबई (उपनगर)	७०४५४	०.८२	२३
२३.	मुंबई	२०६६६	०.२४	३२
२४.	रायगड	२६९१२४	३.१४	१२
२५.	पुणे	२६१७२२	३.०५	१३
२६.	अहमदनगर	३०३२५५	३.५५	११
२७.	बीड	२४१९३	०.२८	२९
२८.	लातूर	४७८३६	०.५६	२५
२९.	उस्मानाबाद	२७८५७	०.३२	२८
३०.	सोलापूर	६८९८९	०.८०	२४
३१.	सातारा	२१८९६	०.२५	३१
३२.	रत्नागिरी	२०१०२	०.२३	३३
३३.	सिंधुदुर्ग	४९५२	०.०६	३५
३४.	कोल्हापूर	२१३८७	०.२५	३१
३५.	सांगली	१७८५५	०.२१	३४
		८५७७२७६	९९.९९	१००

Ref: TRTI, Pune

तक्ता क्र. १.५ मध्ये सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी जमातींची लोकसंख्या दर्शविली आहे.

१. **अंध** – या आदिवासी जमातीची सर्वाधिक लोकसंख्या यवतमाळ (१२११३८) जिल्ह्यात आहे. त्यानंतर हिंगोली (७७४८६), नांदेड (६७७४४), वाशिम (५१७८५) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. धुळे व गोंदिया या जिल्ह्यात या जमातीची लोकवस्ती आढळत नाही.

२. **बैगा** – या जमातीची लोकसंख्या अत्यंत कमी आहे. सर्वाधिक लोकसंख्या नागपूर (१२३) या जिल्ह्यात आहे. त्यानंतर गोंदिया (१२१), जळगाव (४५), भंडारा व गडचिरोली (२३) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. नंदूरबार, धुळे, बुलढाणा, हिंगोली, परभणी, जालना, मुंबई, रायगड, अहमदनगर, बीड, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व सांगली या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

३. **बरडा** – ही जमातही लोकसंख्येने अत्यंत कमी आहे. सर्वाधिक लोकसंख्या मुंबई उपनगर (८९) या जिल्ह्यात आढळते. त्यानंतर पुणे (४६), चंद्रपूर (२८), लातूर (२७), कोल्हापूर (२३) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, वर्धा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, औरंगाबाद, रायगड, अहमदनगर, बीड, रत्नागिरी व सांगली या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

४. **बावचा** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या मुंबई उपनगर (४०) जिल्ह्यात आहे. त्यानंतर जळगाव (१४), ठाणे (१२), रायगड (१०), नाशिक व पुणे (६), सातारा (४), सिंधुदुर्ग, (३) मुंबई व कोल्हापूर (१) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. उर्वरित जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

५. **भैना** – भैना या आदिवासी जमातीची सर्वाधिक लोकसंख्या अमरावती (१०१) जिल्ह्यात आहे. त्यानंतर नागपूर (४३), पुणे (१८), ठाणे (१२) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी लोकसंख्या अहमदनगर (१) जिल्ह्यात आहे. धुळे, जळगाव, बुलढाणा, वाशिम, अकोला, गडचिरोली, यवतमाळ, नांदेड, परभणी,

जालना, औरंगाबाद, मुंबई, रायगड, बीड, लातूर, उस्मानाबाद, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व सांगली या जिल्ह्यांत या आदिवासी जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

६. **भारिया** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (१३०) जिल्ह्यात आहे. त्यानंतर सोलापूर (९६), मुंबई उपनगर (७९), कोल्हापूर (६४), नागपूर (५८) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. नंदूरबार, धुळे, बुलढाणा, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, नांदेड, हिंगोली, जालना, अहमदनगर, बीड, लातूर, उस्मानाबाद, सातारा, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

७. **भन्ना** – या जमातीची लोकसंख्या अनुक्रमे मुंबई उपनगर (४८), चंद्रपूर (२३), ठाणे (२०), सातारा (१९), नाशिक (९), रायगड (७), गोंदिया (३) या प्रमाणे आढळते. उर्वरित जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

८. **भिल्ल** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नंदूरबार (७१४१२७) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर नाशिक (३००४९५), धुळे (२९५२६६), जळगाव (२५१६४३) अहमदनगर (१२३४९३) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी लोकसंख्या गोंदिया (१७) या जिल्ह्यात आढळते. उर्वरित सर्व जिल्ह्यांत भिल्ल जमातीची कमी अधिक प्रमाणात लोकवस्ती आढळते.

९. **भुंजिया** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नागपूर (४४१) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अमरावती (४३५), जळगाव (२६७), वाशिम (२५७) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. नंदूरबार, गोंदिया, गडचिरोली, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, सिंधुदुर्ग, कोल्हापूर व सांगली या जिल्ह्यांत भुंजिया जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

१०. **बिंझवार** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या गोंदिया (५२२५) या जिल्ह्यात आढळते. त्यानंतर भंडारा (१९६४), नागपूर (४१४) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. बुलढाणा, वाशिम, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, मुंबई, बीड, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सिंधुदुर्ग व सांगली या जिल्ह्यांत बिंझवार जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

११. **बीरहूल** – बीरहूल जमातीची सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (२१) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर नंदूरबार व पुणे (४), जळगाव व सिंधुदुर्ग (३), नागपूर व रायगड (२),

मुंबई (१) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. उर्वरित जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

१२. **चोधरा** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (९४) या जिल्ह्यात आढळते. त्यानंतर पुणे (५४), मुंबई उपनगर (३०), नंदूरबार (१३), नाशिक व रत्नागिरी (४), अहमदनगर (२) व जळगाव, मुंबई, रायगड, कोल्हापूर (१) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. उर्वरित जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

१३. **धानका** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नंदूरबार (२६३५७) या जिल्ह्यात आढळते. त्यानंतर जळगाव (१३९४९), औरंगाबाद (२०१८), धुळे (६८४), परभणी (५६३) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. गोंदिया, उस्मानाबाद व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत कमी-अधिक प्रमाणात लोकसंख्या आढळते.

१४. **धनवर** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या अमरावती (४३९०) या जिल्ह्यात आढळते. त्यानंतर औरंगाबाद (३७६८), अकोला (३४९९), बुलढाणा (२८१७), यवतमाळ (२३७६) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी लोकसंख्या नंदूरबार (२) या जिल्ह्यात आढळते. धुळे, लातूर व उस्मानाबाद या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

१५. **धोडिया** – धोडिया जमातीची सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (५३४२) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर मुंबई उपनगर (३८२८), नंदूरबार (३०५), मुंबई (५७) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. धुळे, बुलढाणा, अकोला, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, नांदेड, हिंगोली, परभणी, औरंगाबाद, अ. नगर, बीड, लातूर, उस्मानाबाद, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व कोल्हापूर या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

१६. **दुबळा** – दुबळा जमातीची सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (१२२६१) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर मुंबई उपनगर (३९६९), नंदूरबार (६३५), मुंबई (११०) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. जळगाव (१४), रायगड (९), पुणे (७), रत्नागिरी व नाशिक (४), वाशिम (२), चंद्रपूर व औरंगाबाद (१) हे जिल्हे वगळता उर्वरित जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

१७. **गावित** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नंदूरबार (६१७५४) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर धुळे (१९८५०), मुंबई उपनगर (१८४९), ठाणे (१०७४) या

जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. बुलढाणा, वर्धा, गोंदिया, नांदेड व हिंगोली या जिल्ह्यांत गावित जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

१८. **गोंड/राजगोंड** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या गडचिरोली (३२८५०२) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर चंद्रपूर (२९५८०४), नागपूर (२५७११९), यवतमाळ (१७२४५८), गोंदिया (१२७७१९), वर्धा (११५४४८) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. उर्वरित सर्व जिल्ह्यांत गोंड/राजगोंड या जमातीची लोकसंख्या कमी अधिक प्रमाणात आढळते.

१९. **हलबा/हलबी** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नागपूर (१४७५३०) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर गोंदिया (५२४०३), चंद्रपूर (१८८२६), गडचिरोली (१२४३५), वर्धा (१२३६६) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. उर्वरित सर्व जिल्ह्यांत या जमातीची कमी-अधिक प्रमाणात लोकसंख्या आढळते.

२०. **कमार** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नागपूर (१५४७) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अकोला (५६०), भंडारा (३११), वाशिम (२९१) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. नंदूरबार, धुळे, परभणी, जालना, अहमदनगर, उस्मानाबाद, कोल्हापूर व सांगली या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

२१. **कातकरी/काथोडी** – ही जमात प्राथमिक अवस्थेतील जमात म्हणून ओळखली जाते. या जमातीची लोकसंख्या रायगड (१०३२४४) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर ठाणे (९१४२९), पुणे (११९३५), नाशिक (७१९४), रत्नागिरी (६०३४) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. गोंदिया व यवतमाळ या दोन जिल्ह्यांमध्ये या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

२२. **कवर** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या गोंदिया (७७६६) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर गडचिरोली (७०८४), बुलढाणा (११०५), नागपूर (२८०१) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी लोकसंख्या उस्मानाबाद (५) जिल्ह्यात आढळते.

२३. **खैरवार** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या सिंधुदुर्ग (२७९) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अनुक्रमे मुंबई उपनगर (१५४), ठाणे (९४), चंद्रपूर (७७) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. नंदूरबार, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, नांदेड, हिंगोली, परभणी,

जालना, अहमदनगर, बीड, लातूर, उस्मानाबाद, सातारा, रत्नागिरी व सांगली या जिल्ह्यांत खैरवार जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

२४. **खारिया** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या मुंबई उपनगर (९१) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर नागपूर (८७), यवतमाळ (७४), गडचिरोली (६२) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. अकोला, वाशिम, गोंदिया, हिंगोली, परभणी, नाशिक, अहमदनगर, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सिंधुदुर्ग, कोल्हापूर व सांगली या जिल्ह्यांत खारिया जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

२५. **कोकणा** – कोकणा जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नाशिक (३६०७५५) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अनुक्रमे धुळे (८९७५३), ठाणे (६८५८३), नंदूरबार (४०८४८) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. वाशिम, गडचिरोली, हिंगोली व सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

२६. **कोळ** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नागपूर (३५९३) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर भंडारा (७३२), चंद्रपूर (३०१), अमरावती (२२९), वर्धा (१७५) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. धुळे, वाशिम, हिंगोली, परभणी, जालना, बीड, उस्मानाबाद व सांगली या जिल्ह्यांत कोळ जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

२७. **कोलाम** – कोलाम ही आदिम आदिवासी जमात म्हणून ओळखली जाते. या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या यवतमाळ (९३९२९) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर नांदेड (५१६५३), वर्धा (८२०८), चंद्रपूर (६३७६) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. नंदूरबार, गोंदिया व कोल्हापूर या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

२८. **ढोरकोळी** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या जळगाव (१२६९११) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर धुळे (२१७२३), ठाणे (९२५०) व नंदूरबार (७२४७) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी लोकसंख्या गडचिरोली (१) जिल्ह्यात आढळते.

२९. **महादेव कोळी/कोळी महादेव** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नाशिक (३९४६३१) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अनुक्रमे पुणे (१५६५००), अ.नगर (११३३२९) व ठाणे (८१२७७) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी लोकसंख्या गोंदिया (१८) जिल्ह्यात आढळते.

३०. **कोळी मल्हार/मल्हार कोळी** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (१९८२१६) जिल्ह्यात आढळते. सर्वात कमी लोकसंख्या सातारा (५) जिल्ह्यात आढळते.

३१. **कोंध/खोंड** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (६९) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर मुंबई उपनगर (६१), पुणे (३३), सिंधुदुर्ग (२५), नाशिक (२३) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. नंदूरबार, जळगांव, वाशिम, वर्धा, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, जालना, अहमदनगर, बीड, उस्मानाबाद, सातारा व कोल्हापूर या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

३२. **कोरकू** – कोरकू जमातीची सर्वाधिक लोकसंख्या अमरावती (१९३१९९) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अनुक्रमे अकोला (९०७७), बुलढाणा (५८५४), जळगाव (१०२८) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. हिंगोली, अहमदनगर, उस्मानाबाद व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

३३. **कोया** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या सोलापूर (६१) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर चंद्रपूर (५३), पुणे (२४), मुंबई उपनगर (२१) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. नंदूरबार, धुळे, जळगांव, बुलढाणा, भंडारा, गोंदिया, हिंगोली, परभणी, जालना, औरंगाबाद, नाशिक, लातूर, उस्मानाबाद, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व कोल्हापूर या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

३४. **नागेशिया** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या औरंगाबाद (९३) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर गोंदिया (२४), ठाणे (२२), जळगाव (१६), चंद्रपूर (१५), नागपूर (१४), अमरावती (७), मुंबई उपनगर (६), पुणे व अहमदनगर (५), रायगड (४), मुंबई (१) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. उर्वरित जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

३५. **नाईकडा** – महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळते. सर्वाधिक लोकसंख्या बुलढाणा (९३४३) जिल्ह्यात आढळते. सर्वात कमी लोकसंख्या हिंगोली (३) जिल्ह्यात आढळते.

३६. **ओराव** – ओराव जमातीची लोकसंख्या महाराष्ट्रात सर्वत्र आढळते. सर्वाधिक लोकसंख्या नांदेड (९५२१) जिल्ह्यात आढळतो. सर्वात कमी लोकसंख्या बीड (१९) जिल्ह्यात आढळते.

३७. **परधान** – या जमातीची लोकसंख्या महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत आढळते. सर्वाधिक लोकसंख्या यवतमाळ (४८२९८) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अनुक्रमे चंद्रपूर (४३३०२), गडचिरोली (१६६७८) व वर्धा (८३०७) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी लोकसंख्या सांगली (३) जिल्ह्यात आढळते.

३८. **पारधी** – पारधी जमातही महाराष्ट्रात सर्वत्र आढळते. सर्वाधिक लोकसंख्या अमरावती (२०५६८) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अनुक्रमे अकोला (१७५७८), जळगाव (१६८४९) व बुलढाणा (१६४२८) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी लोकसंख्या गोंदिया (४७) जिल्ह्यात आढळते.

३९. **परजा** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या अमरावती (९३) जिल्ह्यात आढळते. सर्वात कमी लोकसंख्या बुलढाणा (२) जिल्ह्यात आढळते. नंदूरबार, धुळे, जळगाव, अकोला, वाशिम, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ, हिंगोली, परभणी, जालना, रायगड, अहमदनगर, बीड, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सिंधुदुर्ग, कोल्हापूर व सांगली या जिल्ह्यांत परजा जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

४०. **पटेलिया** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या मुंबई उपनगर (३०२) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर नांदेड (३००), नागपूर (२२९) व ठाणे (१०४) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. गोंदिया, गडचिरोली, हिंगोली, परभणी, जालना, औरंगाबाद, बीड, लातूर, उस्मानाबाद, सिंधुदुर्ग, कोल्हापूर व सांगली या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

४१. **पोमला** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या सोलापूर (१९) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर रायगड, मुंबई उपनगर, ठाणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ व मुंबई या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळते. उर्वरित जिल्ह्यांत पोमला जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

४२. **राठवा** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या बुलढाणा (१७३) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अमरावती (१५८), नंदूरबार (१५०) व कोल्हापूर (७०) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. त्याचबरोबर जळगाव, वाशिम, जालना, नाशिक, ठाणे, मुंबई उपनगर, मुंबई, पुणे, रायगड, अहमदनगर, लातूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व सांगली या जिल्ह्यांतही राठवा जमातीची लोकसंख्या आढळते. उर्वरित जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

४३. **सावर/सावरा** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (९३) जिल्ह्यात आढळते. वर्धा, नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, नांदेड, मुंबई उपनगर, मुंबई, रायगड व पुणे या जिल्ह्यांतही या जमातीची लोकसंख्या आढळते. उर्वरित जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

४४. **ठाकूर/ठाकर** – या जमातीची लोकसंख्या महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत आढळते. सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (१४३०९३) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अनुक्रमे रायगड (७५००८), नाशिक (६२६२७), पुणे (५८७७४) व अहमदनगर (५६४७४) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी लोकसंख्या कोल्हापूर (४१५) जिल्ह्यात दिसून येते.

४५. **भोटी** – या जमातीची लोकसंख्या फक्त औरंगाबाद (१०) व नांदेड (९) या दोनच जिल्ह्यांत आढळते. महाराष्ट्रातील उर्वरित जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

४६. **वारली** – वारली जमातीची सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (५५८७८८) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अनुक्रमे नाशिक (५७१३१), मुंबई उपनगर (९९९८) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. वाशिम, भंडारा, गडचिरोली, यवतमाळ, नांदेड, हिंगोली व परभणी या जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

४७. **विटोलिया** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या नंदूरबार (१५२) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अनुक्रमे अकोला (८९), ठाणे (३६), मुंबई (२६), पुणे (२२), मुंबई उपनगर (१४), जळगांव (१०), बुलढाणा (८), नागपूर (५), धुळे (१) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. उर्वरित जिल्ह्यांत या जमातीची लोकसंख्या आढळत नाही.

४८. **सर्वसाधारण आदिवासी जमात** – या जमातीची सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (६१३६) जिल्ह्यात आढळते. सर्वात कमी लोकसंख्या गोंदिया (२) जिल्ह्यात आढळते.

महाराष्ट्रात आदिवासी लोकसंख्येच्या दृष्टीने ठाणे (११९९२९०) जिल्ह्याचा प्रथम क्रमांक लागतो. त्यानंतर अनुक्रमे नाशिक (११९४२७१) दुसरा व नंदूरबार (८५९५७४) तिसरा या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी आदिवासी लोकसंख्या सिंधुदुर्ग (४९५२)

जिल्ह्यात राहते. सिंधुदुर्ग जिल्ह्याचा आदिवासी लोकसंख्येबाबतीत सर्वात शेवटचा क्रमांक लागतो.

महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे सर्वाधिक प्रमाण ठाणे (१३.९८ टक्के) जिल्ह्यात आढळते. त्यानंतर अनुक्रमे नाशिक (१३.९२ टक्के), नंदूरबार (१०.२ टक्के), यवतमाळ (५.५२ टक्के), नागपूर (५.१८ टक्के), धुळे (५.१७ टक्के), जळगाव (५.०८ टक्के), चंद्रपूर (४.३८ टक्के), गडचिरोली (४.३४ टक्के), या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. अहमदनगर जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण (३.५५ टक्के) आहे. सर्वात कमी प्रमाण सिंधुदुर्ग (०.०६ टक्के) जिल्ह्यात आढळते.

***

१.५ संदर्भ (Refrences)

१) भारतीय संस्कृती कोष, खंड - १, पान नं – ४२८/२९

२) मराठी विश्वकोष, खंड - १ - पान नं. २४३

३) मराठी विश्वकोष, खंड - २ पान नं. २८/२९

४) डॉ. माडगूळकर अंबादास, प्रा. फडणिस शशिकांत - आदिवासी समाज, पान नं. ४९

५) डॉ. हुसैन माजिद - मानवी भूगोल, पान नं. ४३५

६) डॉ. गारे गोविंद - सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी, पान नं. १३/१४

७) कित्ता, पान नं. १

८) डॉ. नाडगोंडे गुरूनाथ - भारतीय आदिवासी, पान नं. १

९) कित्ता, पान नं. ३/४

१०) डॉ. गारे गोविंद - सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी, पान नं. ५

११) मराठी विश्वकोष, खंड - २, पान नं. ३०

१२) डॉ. घारपुरे विठ्ठल - भूगोल परिचय, पान नं. २५६

१३) डॉ. नाडगोंडे गुरूनाथ - भारतीय आदिवासी, पान नं. ३३४

१४) कित्ता

१५) कित्ता

१६) प्रा. कदम डी. एस., प्रा. दातीर आर. के. - भारतीय अर्थव्यवस्था, पान नं. ३३

१७) प्रा. डॉ. पिचड नलिनी - आदिवासींचे शिक्षण, पान नं. ४

१८) डॉ. गारे गोविंद - सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी, पान नं. १९

१९) डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित (आदिवासी) जमाती, पान नं.

२०) डॉ. गारे गोविंद - सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी, पान नं. २५

२१) डॉ. गारे गोविंद - बदलाच्या उंबरठ्यावर कोकणा आदिवासी, श्रीविद्या प्रकाशन पान नं.५

२२) डॉ. फडके सुधीर - महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे प्रश्न, प्रथम आवृत्ती, १९६३, पान नं. २५

२३) डॉ. गारे गोविंद - महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, पान नं. १७३/१३३

२४) डॉ. गारे गोविंद - वारली चित्र संस्कृती, श्रीविद्या प्रकाशन, पान नं. ४

२५) डॉ. गारे गोंविद - सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील ठाकूर (ठाकर) आदिवासी, पान नं १९/४०

२६) डॉ. गारे गोविंद - आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन, पान नं. ६६/६९.

२७) वार्षिक आदिवासी उप-योजना २००४-२००५

२८) कित्ता, पान नं. ४९९, ५००.

२९) दैनिक सम्राट - सोमवार ४ एप्रिल २००५, पान नं. ५

३०) दैनिक सम्राट - शुक्रवार ८ एप्रिल २००५, पान नं. ५

३१) Dr. Singh K. S. – The scheduled Tribes, Oxford University Press, New Delhi, page No. 573/74

३२) Ibid, page No. 252/53

३३) Ibid, page No. 1174 & 1176

३४) Census of India 2001, Scheduled Tribe Atlas of India Page No. 91-94

३५) Census of India 2001, Maharashtra Series - 28, Volume - II Page No. 586 & 592

प्रकरण दुसरे

सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी - एक जमात

२.१	प्रस्तावना	६४
२.२	महादेव कोळी जमातीचा पूर्वेतिहास	६५
२.३	महादेव कोळी जमातीचा राजकीय इतिहास	७१
२.४	महादेव कोळी जमातीची ओळख	७४
	२.४.१ महादेव कोळी जमातीचा आदिवासींमधील समावेश	८०
२.५.	आर्थिक परिस्थिती	८२
२.६	शिक्षण, आरोग्य आणि राहणीमान	८४
२.७	भौगोलिक आणि ऐतिहासिक प्रदेश	
	संदर्भ (References)	८९

प्रकरण दुसरे
सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी - एक जमात

२.१ प्रस्तावना

जगातील कोणत्याही देशापेक्षा सर्वाधिक आदिवासी जमाती आणि सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या भारतात राहते. २००१ च्या जनगणनेनुसार ८,४३,२६,२४० (८.२० टक्के) लोकसंख्या ही आदिवासी आहे. भारतीय मानववंशशास्त्राच्या पाहणीनुसार भारतात ७५० आदिवासी जमाती राहतात. भारतीय आदिवासी विकास मंत्रालयाच्या माहितीनुसार ६९८ आदिवासी जमाती भारतात आहेत. त्या संपूर्ण देशात विखुरलेल्या आहेत. भारतातील एकूण आदिवासी जमातींपैकी ७५ आदिवासी जमाती या अत्यंत मागासलेल्या आहेत. महाराष्ट्रात एकूण ४८ आदिवासी जमाती राहतात. या जमातींपैकी कातकरी, कोलाम, आणि माडिया या तीन जमाती अत्यंत मागासलेल्या आहेत. त्यांना प्राथमिक अवस्थेतील जमाती म्हणून संबोधतात.

महाराष्ट्रात सह्याद्री पर्वताच्या डोंगराळ भागात **महादेव कोळी** ही आदिवासी जमात दाट वस्ती करून राहते. ही जमात नाशिक, अहमदनगर, पुणे, ठाणे आणि रायगड या जिल्ह्यांच्या विशिष्ट भागातच आढळते. सह्याद्री पर्वताच्या पूर्व-पश्चिम उतारावर **महादेव कोळी** लहान-लहान गावात वस्ती करून राहतात. पठारी प्रदेशातही त्यांची वस्ती आढळते. त्यांच्या या वास्तव्याच्या प्रदेशास, मावळ, डांगण, नहेर व पठार असे म्हणतात. या जमातीत प्रादेशिक संलग्नता, कोळी या आडनावाचा अनुल्लेख, गोतरानी पद्धत व कुळांची पोटकुळांत (बाराबुडात) झालेली विभागणी ही चार प्रमुख वैशिष्ट्ये आढळतात. **महादेव कोळी** जमातीत उपजमाती नाहीत. सामाजिक, सांस्कृतिक, वांशिकदृष्ट्या ही एक स्वतंत्र जमात आहे. समान सामाजिक आणि सांस्कृतिक जिवनामुळे खाणे-पिणे, आचार-विचार, केशभूषा-वेशभूषा व जीवनविषयक दृष्टीकोन यामध्ये त्यांच्या भौगोलिक प्रदेशात समानता दिसून येते.

महादेव कोळी हे प्रामुख्याने शेतकरी व शेतमजूर आहेत, ते शेती पारंपारिक पध्दतीनेच करतात. अलिकडे सिंचन व्यवस्था, बाजार व्यवस्था, श्रममूल्य या संकल्पना रुजू लागल्या आहेत. स्त्री-पुरुषांमध्ये श्रमाची विभागणी ही सुस्पष्ट आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा यांचे अस्तित्व अद्यापही टिकून आहे. **महादेव कोळी** जमातीत परंपरेला प्राधन्य आहे. कथा,

काव्य, नृत्य, गाणी इत्यादींचा समृध्द वारसा आहे. मावळी व घाटी बोली भाषा बोलली जात असली तरी अलिकडे मराठी भाषा अधिकृत मातृभाषा बनली आहे. प्रगत समाजाशी तुलना करता **महादेव कोळी** ही जमात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या मागासलेली जमात आहे. शिक्षण, आरोग्य, राहणीमान हे निकृष्ट दर्जाचे आढळून येते.

२.२ महादेव कोळी जमातीचा पूर्वेतिहास

आर्य आणि द्रविडांच्या आगमनापूर्वी भारतात काही आदिवासी जमाती राहत होत्या. या जमाती टोळ्या-टोळ्यांनी राहत असत. शिकार करणे, कंदमुळे खाणे हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन होते. आदिवासी टोळ्यांचा उल्लेख रामायण व महाभारतात निषाद, किरात यांच्या रुपाने आलेला आहे. प्रत्येक टोळीचा प्रदेश ठरलेला असे. एक टोळी दुसऱ्या टोळीच्या प्रदेशात सहजा-सहजी जात नसे. एखादी टोळी दुसऱ्या प्रदेशात गेल्यास त्यांच्यात संघर्ष होत असे. आर्य संस्कृतीच्या अगोदर मध्यभारतात पुलींग, शबर, किरात, कोल आणि नाग वंशाच्या लोकांची जुनी परंतु संपन्न संस्कृती होती. आर्यलोक दंडकारण्य ओलांडून दक्षिणेकडे प्रविष्ट होण्यापूर्वी शेकडो वर्षे आधी त्या भागात भिल्ल, शबर, किरात व कोल या वंशाचे लोक राहत होते असे प्रा. सांकलिया यांचे मत आहे. मानववंश शास्त्रज्ञांच्या मते प्राचीन भारतातील लोक हे निग्रीटो वंशाचे असून मध्य भारतातील आदिवासी प्रोटो ऑस्ट्रेलाईड वंशाचे आहेत. सह्याद्रीच्या डोंगराळ प्रदेशात राहणारी **महादेव कोळी** ही जमात प्राचीन काळापासून वास्तव्य करून आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी विभागाचे सह्याद्री, सातपुडा व गोंडवन हे तीन प्रमुख भाग पडतात. त्यातील सह्याद्री विभाग हा लोकसंख्येने व क्षेत्रफळाने मोठा आहे. सह्याद्री विभागात **महादेव कोळी** लोकांची वस्ती आढळते. त्यांची वस्ती सह्याद्री पर्वताच्या पूर्व-पश्चिम उतारावर मोठ्या प्रमाणात आहे. त्यांच्या वस्तीचा सलग पट्टा घाटमाथ्यावर भिमाशंकर ते त्र्यंबकेश्वर या परिसरात पसरलेला आहे. घाटाखालील पट्टा जव्हार, मोखाडा, वाडा, शहापूर, मुरबाड या ठाणे जिल्ह्यातील तालुक्यांत तर रायगड जिल्ह्याच्या कर्जत, खालापूर, सुधागड, आणि महाडपर्यंत पसरलेला आहे. घाटमाथ्यावरील वस्तींच्या पट्ट्यांची विभागणी नहेर, मावळ, डांगण आणि खोरे यात झालेली आहे. वरील काही भागात **महादेव कोळी** लोकांची वस्ती विरळ तर काही भागात सलग गावेच्या-गावे आढळतात. या चार विभागांना मिळून कोळवण असे म्हणत असत. कोळवन म्हणजे कोळ्यांचे वन, कोळ्यांचे जंगल, कोळ्यांचे रान, कोळ्यांचा प्रदेश होय, म्हणजेच महादेव कोळ्यांची वस्ती जंगलात, दऱ्याखोऱ्यात दिसून येते. कॅप्टन मॅकिन्टोश यांनी १८३६

साली केलेल्या पाहणीतील **महादेव कोळी** जमातीचा भौगोलिक प्रदेश, खोरी (नहेर, डांगण) व सध्याचे तालुके, जिल्हे यांचा तुलनात्मक आढावा खाली दिला आहे.

तक्ता क्र. २.१

महादेव कोळी जमातीचा भौगोलिक आढावा (१८३६)

नहेर किंवा खोरे	उपखोरे/पठार	तालुका	जिल्हा
मुसा खोरे		मुळशी	पुणे
पवन मावळ		मावळ	पुणे
नाणे मावळ		मावळ	पुणे
अंदर मावळ		मावळ	पुणे
भामनेर		खेड	पुणे
बाराखोरे		खेड	पुणे
अरुला खोरे		खेड	पुणे
भीमनेर		खेड	पुणे
घोडनेर	बुब्रा खोरे	आंबेगाव	पुणे
	भिमाशंकर पठार	आंबेगाव	पुणे
मीननेर	हिवरे पठार	जुन्नर	पुणे
कुकडनेर		जुन्नर	पुणे
मढ खोरे		जुन्नर	पुणे
ओतूर खोरा	साराळे पठार	जुन्नर	पुणे
डांगाण खोरा	मुळनयी (नहेर)	अकोले	अहमदनगर
अकोला खोरा		अकोले	अहमदनगर
महाल देश	पेहेर-प्रवरा खोरे	अकोले	अहमदनगर
कोकण खोरा		इगतपूरी	नाशिक
टाकेद खोरा		इगतपूरी	नाशिक
धरुल खोरा		इगतपूरी	नाशिक
दक्षिण त्र्यंबक		इगतपूरी	नाशिक
त्र्यंबक खोरा		नाशिक	नाशिक
नाशिक खोरा		नाशिक	नाशिक
सिन्नर खोरा		सिन्नर	नाशिक
जव्हार (विभाग)	जव्हार संस्थान	जव्हार	ठाणे
	मोखाडा, पेठा	मोखाडा	ठाणे

महादेव कोळी ही इतिहासात सातशे वर्षे प्रसिध्द असलेली व मान्यता पावलेली जमात आहे. कोळी जात (*Caste*) व कोळी जमात (*Tribe*) हे भिन्न वांशिक, सामाजिक व सांस्कृतिक गट आहेत. डॉ. इरावती कर्वे यांच्या मानववंशशास्त्रीय संशोधनानुसार **महादेव कोळी** जमात ही वन्य टोळ्यांच्या वंशाची जमात आहे. **महादेव कोळी** लोकांसंबंधी १८३६ मध्ये कॅप्टन मॅकिन्टोश नावाच्या इंग्रज सेनाधिकाऱ्याने सर्वप्रथम माहिती लिहून ठेवली आहे. त्यानंतर १९५७ मध्ये डॉ. जी. एस. घुर्ये यांनी **महादेव कोळी** जमातीची पाहणी करून **'महादेव कोळी : ए शेड्युल्ड ट्राईब'** हे पुस्तक लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी सामाजिक व सांस्कृतिक माहिती, भौगोलिक क्षेत्र, शैक्षणिक, आर्थिक, जमिनीविषयी व राहणीमानाविषयी माहिती दिलेली आहे.

कोळी नावाची उत्पत्ती

कोळी जमातीच्या लोकांच्या उत्पत्तीविषयी अनेक कथा, दंतकथा, वेगवेगळ्या तज्ञांनी मांडलेली मते सांगितली जातात. 'व्हेना' नावाच्या राजाच्या मृत्यूनंतर त्याच्या पायापासून कोळी लोकांची उत्पत्ती झाली अशी दंतकथा सांगितली जाते. 'कुलीया' म्हणजे श्रम करणारा, मजूरी करणारा गरीब माणूस. नेपाळच्या तराई प्रदेशात 'कोलीया' नावाची जमात राहत असे. पूर्वीचे 'कोलीया' म्हणजेच कोळी असेही म्हटले जाते, पाली भाषेत 'कोलो' नावाच्या झाडाचा उल्लेख आहे. त्या झाडाच्या प्रदेशात राहणारे ते 'कोलीया' असेही म्हटले जाते. पंजाबात पूर्वी 'कोरी' नावाचे लोक राहत होते. हे कोरी लोक स्थलांतरीत होऊन महाराष्ट्रात स्थायिक झाले असावेत व तेच पुढे कोळी नावाने प्रचलित झाले असावेत. संस्कृतमध्ये 'कोला' म्हणजे होडी. होडी चालविणारे ते कोळी असेही म्हटले जाते. डुकराला संस्कृत मध्ये 'कोल' म्हणतात. **महादेव कोळी** लोक अजूनही रानडूकराची शिकार करतात. त्यावरूनही त्यांना कदाचित 'कोळी' म्हटले जात असावे. कोल लोकांच्या या प्रदेशाला 'कोलवन' किंवा 'कोळवन' म्हणत असत. संस्कृत वाङःमयात वारंवार उल्लेख असलेले 'निषाद' किंवा 'किरात' हे **महादेव कोळी** असावेत असा काहींचा तर्क आहे. रामायणातील संस्कृत काव्यात पक्षांची शिकार करणाऱ्या शिकाऱ्यास 'निषाद' म्हटलेले आहे. गणेश पुराणात दंडकारण्यात कोळी लोक राहत असल्याचा व ते वाहतूकीचे काम करत असल्याचा उल्लेख आहे. रामायणाचे लेखक, प्रसिध्द संस्कृत कवी वाल्मिकी ऋषी हे कोळी जमातीचे होते.

महादेव कोळी विभागात (सह्याद्री विभाग) मोठ्या प्रमाणात महादेवाची मंदिरे व प्रत्येक गावात मारुतीची मंदिरे आहेत. ती रामायण आणि **महादेव कोळी** यांच्यातील संबंध निर्देशित करतात.

महादेव कोळी

महादेव कोळी हे नाव कसे पडले याची निश्चित माहिती मिळत नाही. त्यासंबंधी काही दंतकथा सांगितल्या जातात. **महादेव कोळी** जमात सह्याद्रीच्या ज्या भागात घाटमाथ्यावर राहते त्या भागात शंकराची किंवा महादेवाची अनेक प्रसिध्द देवस्थाने आणि तीर्थक्षेत्रे आहेत. बारा ज्योर्तिलिंगापैकी त्र्यंबकेश्वर व भिमाशंकर ही दोन ज्योर्तिलिंगे याच भागात आहेत. महादेवाच्या सानिध्यात राहणारी व त्याची भक्ती करणारी ही जमात **महादेव कोळी** नावाने प्रसिध्दीस आली असावी. पूर्वी **महादेव कोळी** जमातीचे लोक गळ्यात शंकराची पिंड घालीत असत.

महादेव कोळी या नावास ऐतिहासिक पुराव्याचाही आधार मिळतो. हैद्राबाद आणि बिदरच्या सरहद्दीवर महादेव डोंगर रांगा आहेत. प्राचीन काळी **महादेव कोळी** जमात या डोंगर रांगात राहत असावी असे म्हटले जाते. तेथून ते बालाघाटाच्या रांगा ओलांडून महाराष्ट्रात आले असावेत. मध्यभारतातील कोल वंशाच्या जमातीशी त्यांचे बरेच साम्य असल्याने त्यांना कोलवंशी असे म्हणतात. त्यावरून पुढे त्यांना महादेव कोलवंशी, महादेव कुळी, **महादेव कोळी** असे म्हणण्याची प्रथा पडली असावी.

महादेव कोळी नाव कसे पडले याबाबत काही दंतकथा सांगितल्या जातात. त्यांचाही संबंध महादेव या दैवताशी जोडलेला आढळतो. एक दंतकथा अशी सांगीतली जाते की, पूर्वी 'निषाद' शिकार करून आपली उपजीविका भागवीत असे. एकदा एका शिकाऱ्याला शिकार मिळाली नाही. थकल्याने तो तळ्याकाठी येऊन बसला. जंगली जनावरे संध्याकाळी पाणी पिण्यासाठी तळ्याकडे येतील व आपल्याला आयती शिकार मिळेल अशी त्याला आशा होती. परंतु एकही जनावर तळ्याकडे फिरकले नाही. तळ्याशेजारील बेलाच्या झाडावर चढून त्याने चोहोबाजूला टेहळणी केली परंतु त्याला सावजाची कुठेही चाहूल लागली नाही. भूकेने व्याकूळ झाल्याने त्याच्या डोळ्यातून अश्रू गळू लागले. त्या बेलाच्या झाडाखाली महादेवाची एक स्वयंभू पिंड होती. त्या पिंडीवर त्याचे अश्रू पडत होते. देवाला शिकाऱ्याची दया आली. प्रसन्न होऊन देवाने त्यास आशिर्वाद दिला, "शिकारी माणसा! निराश होऊ नकोस! जोपर्यंत हे जंगल आहे.

तो पर्यंत या जंगलात तुला रोज शिकार मिळेल." तेव्हापासून तो शिकारी महादेवाचा भक्त बनला आणि स्वतःला महादेवाच्या कुळीचा म्हणून **महादेव कोळी** म्हणवून घेऊ लागला.

महादेव कोळी स्वतःला महादेवाचे वंशज मानतात. यादवांच्या कारकिर्दीत सह्याद्री विभागातील महादेवाच्या देवळांची व्यवस्था महादेव कोळ्यांकडे असल्याचा उल्लेख सापडतो. पूर्वी भिमाशंकर, त्र्यंबकेश्वर या देवस्थानाचे पुजारी, वतनदार, हक्कदार **महादेव कोळी** होते. पेशव्यांच्या काळापासून सर्व हक्क ब्राम्हणांकडे सुपूर्द करण्यात आले. **महादेव कोळी** प्रदेशात नाथपंथाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झालेला आहे. **महादेव कोळी** लोक रावळ गोसावी जमातीच्या लोकांना आपले धार्मिक गुरु करून घेत असत. **महादेव कोळी** व रावळ गोसावी यांच्या संबंधाविषयी विविध मते मांडली जातात. गोसावी गुरु केल्यानंतर ते गळ्यात लिंग धारण करत. १८ व्या शतकापर्यंत महादेव कोळ्यांचे पुजारी हे रावळ गोसावी होते. गोसावी संप्रदाय हा नाथ संप्रदायाशी निगडीत आहे. नाशिक, अहमदनगर, पुणे परिसरात नाथपंथियांच्या अनेक गाद्या किंवा भक्तीपिठे आहेत. नाथ संप्रदाय हा योगी संप्रदाय आहे. "पिंडी ते ब्रम्हांडी" हे नाथांचे तत्वज्ञान आहे.

सामाजिक पूर्वेतिहास

कोणत्याही समाजाच्या सर्वांगीण जीवनाची ओळख करून घेताना त्या समाजाची मूलभूत व प्राथमिक माहिती करून घेणे अपरिहार्य ठरते. समाज हा रक्तसंबंध व आप्तसंबंध यावर आधारलेला असतो. आदिवासी जमातींची रचना ही 'कुळावर' आधारलेली असते. कुटूंब व कुल (*clan*) यामध्ये समाविष्ट होणाऱ्या सर्व संबंधीतांचे एकमेकांशी असणारे नाते हे रक्ताचे असते किंवा आहे असे मानले जाते. रक्ताच्या नात्याची उभारणी ही एकपक्षीय किंवा द्विपक्षीय तत्वावर झालेली असते. आई व वडील या दोन्ही बाजूच्या नातेवाईकांचा विचार द्विपक्षीय तत्वात केला जातो. याउलट फक्त आई किंवा वडीलांकडील नातेवाईकांचा विचार एकपक्षीय तत्वात केला जातो. व्दिपक्षीय आप्तांचा समावेश कुटूंबात केला जातो. तर एकपक्षीय आप्तांचा समावेश कुलामध्ये (*clan*) केला जातो. "कुल म्हणजे एकपक्षीय वंशमालिकेने निश्चित केलेल्या स्त्री-पुरुषांचा समूह होय. ही वंशपरंपरा सत्य किंवा काल्पनिकही असू शकते. कुलातील प्रत्येक सदस्याच्या मनात एकमेकाबद्दल आदराची भावना असते." कुलाची उत्पत्ती ही स्त्री किंवा पुरुष पूर्वजापासून झालेली असते. कुलपूर्वज हा मानवप्राणी, मानवसदृष्य प्राणी, वनस्पती व अचेतन वस्तूही असू शकते. प्रत्येक व्यक्तीला जन्माने कुलाचे सदस्यत्व मिळते. प्रत्येक कुळाचे वेगळे

नाव असते. मूळ पूर्वज, त्यांचे वैशिष्ट्य, कुलाचे पारंपारिक व्यवसाय, कुलातील देवतांचे पूजन, कुलातील लोकांचे वस्तीस्थान इ. आधारावरून कुलाला नावे दिलेली असतात. एकाच कुलातील वेगवेगळी आडनावे असणारे लोक आपापसांत लग्नसंबंध करीत नाहीत. कारण ते एकमेकांचे रक्तसंबंधित नातेवाईक असतात.

महादेव कोळी जमातींची रचनाही कुल (*clan*) पध्दतीवर आधारीत आहे. कॅप्टन मॅकिन्टोशच्या मते या जमातीची विभागणी २४ कुळांमध्ये झालेली आहे. त्या प्रत्येक कुळातील उपकुळे, पोटकुळे, आडनावे मिळून त्यांची संख्या २१८ पर्यंत होते. काही भागात **महादेव कोळी** जमातीत मूळ **बारा कुळे** असल्याचे सांगितले जाते. त्यांना **बारा बुडे** असे म्हणतात. या कुळांना **'गोत'** किंवा **'गोत्र'** असेही म्हटले जाते. एका कुळातील बारा उपकुळे एकमेकांना गोतेभाऊ समजतात. गोतेभावांमध्ये लग्नसंबंध निशिध्द मानले जातात.

गोतरानी पध्दत

गोतरानी पध्दत म्हणजे गोत्र किंवा कुळ प्रमुखाची पंचायत तीला जातपंचायत, जातगंगा असेही म्हटले जाते. पंचायतीच्या सभासदांना गोतराने असे म्हणतात. समाजाच्या सामाजिक नितीनियमांची वाटणी केलेली असते. जमातीच्या नितीनियमांवर देखरेख ठेवण्याचे काम ही पध्दत करते. एखाद्या व्यक्तीने अनैतिक, समाजबाह्य, समाजद्रोही कृत्य केल्यास त्या व्यक्तीला शिक्षा करणे, दंड आकारणे, न्याय निवाडा करणे ही कामे या पध्दतीत केली जातात. जमातीचे नियम बदलणे. नवे नियम करणे, नव्या पंरपरा सुरू करणे, लग्नकार्य आणि मृत्यूविधी वेळी हजर राहणे, समाजाला एकत्र आणणे ही कार्ये गोतरानी पध्दतीत केली जात. गोतरानी पध्दतीत सरनाईक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, शिपाई, निरोपे, खबरे इत्यादी पदाधिकारी असत. जमात पंचायतीच्या अध्यक्षांना महत्त्वाचे सामाजिक अधिकार असत. गोतरानी पध्दत १९६० सालापर्यंत पुणे जिल्ह्यात परिणामकारक पध्दतीने चालू होती. अलिकडे ही पध्दत कुठेही आढळत नाही.

महादेव कोळी जमातीला हजारों वर्षांचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, पूर्वेतिहास लाभलेला आहे. ते डोंगरात राहत असल्याने त्यांना डोंगरकोळी, राज्यकर्ते असल्याने राजकोळी असेही म्हटले जाते.

२.३ महादेव कोळी जमातीचा राजकीय इतिहास

महादेव कोळी ही जमात इतिहासात प्रसिध्दीस पावलेली आहे. रामायण, महाभारतापासून ते आजपर्यंत या जमातीच्या नोंदी इतिहासात आढळतात. **महादेव कोळी** जमातीचे लोक प्रसिध्द रामायणकार वाल्मिकी ऋषी (वाल्ह्या कोळी) यांस आपला आद्य पूर्वज मानतात. **महादेव कोळी** जमातीच्या वस्तीप्रदेशात नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात कोदणी या गावी तातोबाचा मठ आहे. तो वाल्मिकी ऋषींचा मठ होता असे म्हटले जाते. जवळच त्राटिकादरा नावाचे ठिकाण आहे. ते राम व त्राटिका राक्षसीण यांच्या युध्दाचे ठिकाण समजले जाते. तेथून जवळच इगतपूरी तालुक्यात टाकेद हे तीर्थक्षेत्र आहे. त्यास सर्वतीर्थ टाकेद म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी जटायू आणि रावण यांची लढाई झाल्याचे सांगीतले जाते. टाकेद जवळच प्रसिध्द पट्टाकिल्ला आहे त्याचा उल्लेख रामायणात आलेला आहे.

इ. स. १३४० मध्ये महंमद तुघलकाने कोंडाणा व अहमदनगरचा डोंगरी किल्ला **महादेव कोळी** नायकाचा पराभव करून ताब्यात घेतल्याचा उल्लेख सापडतो. इ.स. १३४० ते १४७० मध्ये बहामनी राजांनी व इ. स. १५४० ते १६३६ मध्ये अहमदनगरच्या निजामशाहीने **महादेव कोळी** नायकांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य केलेले होते. शिवाजी महाराजांच्या काळात व त्या अगोदर जुन्नर प्रांतातील बहुतेक डोंगरी किल्ल्यांचे रखवालदार **महादेव कोळी** होते याचे पुरावे मिळतात. सिंहगड सर करणारा शूरवीर तान्हाजी मालुसरे हा **महादेव कोळी** होता अशी नोंद प्रसिध्द इतिहासकार 'ग्रँड डफ' याने केलेली आहे.

जव्हार येथील महादेव कोळी जमातीचे राज्य

मोघलांनी उत्तर हिंदुस्थान काबीज केल्यानंतर आपला मोर्चा दक्षिणेकडे वळविला. त्यांनी दक्षिणेवर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. त्यांचा त्रास सह्याद्रीतील **महादेव कोळी** जमातीलाही झाला. त्याच काळात सदानंद महाराज नावाचे नाथपंथी साधू त्या भागात प्रसिध्द होते. त्यांना मोघलांचा त्रास सहन झाला नाही. गावोगाव फिरून त्यांनी धर्मभ्रष्टतेविरूध्द लोकजागृती केली. मुसलमांनाचा त्रास कमी करण्याच्या उद्देशाने महाराजांनी इगतपूरी तालुक्यातील मुकणी गावच्या लोकांना कोकणात जाऊन जव्हार येथे राज्य स्थापन करण्याचा सल्ला दिला. महाराजांच्या आशिर्वादाने देवराम उर्फ जयाबा मुकणे यांनी आपल्या साथीदारांच्या मदतीने जव्हार येथे आपले राज्य स्थापन केले. जयाबा मुकणे हे पुढे जव्हारच्या राजघराण्याचे मूळ पुरुष म्हणून उदयाला आले.

इतिहासात **महादेव कोळी** जमातीचा उल्लेख हा स्पष्टपणे इ.स. १३०० च्या सुमारास आढळतो. इ.स. १३०६ मध्ये जयाबा मुकणे या **महादेव कोळी** नायकाने जव्हार येथे आपले राज्य स्थापन केले. इ.स.१३४२ मध्ये मुबारक खिलजीने जयाबाला 'राजा' ही पदवी बहाल करून उत्तर कोकणावरील त्याचे अधिपत्य मान्य केले. त्यावेळी जव्हारच्या राजाच्या ताब्यात बराच मोठा प्रदेश होता. जयाबाने ५००० चौ. मैलाच्या प्रदेशावर राज्य केले. जव्हार राज्यात २२ किल्ले होते व राज्याचा वार्षिक महसुल ९ लाख रुपये होता. जव्हारचे राज्य हे ठाणे नाशिक, अहमदनगर व पुणे जिल्ह्यात पसरलेले होते.

इतिहासात दुसरा उल्लेख इ.स. १५५९ मध्ये आढळतो. इ.स. १५५९ व इ.स. १५८२ मध्ये पोर्तुगिजांनी **महादेव कोळी** लोकांचे जव्हार येथील राज्य नामशेष करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यामध्ये त्यांचे खुप नुकसान झाले. शिवाजी महाराज सुरतेला जाताना जव्हार वरूनच गेले होते व जव्हारच्या **महादेव कोळी** राजाने महाराजांना खूप मदत केली होती असा तात्कालीन कागदपत्रांमध्ये उल्लेख आढळतो. **महादेव कोळी** ही लढवय्यी जमात असल्याने शिवाजी महाराजांनी अनेक गड व किल्ल्यांच्या पायथ्याशी व प्रवेशद्वारावरील रखवालदारी **महादेव कोळी** लोकांकडे दिलेली होती. तसेच काही किल्ल्यांचे रखवालदारही **महादेव कोळी** होते.

जव्हारचे राजे मुकणे यांचे मूळचे आडनांव पोपेरे असे होते व ते अकोले तालुक्यातील कोंभाळणे या गावचे मूळचे रहिवासी होते. पुढे ते इगतपूरी तालुक्यातील मुकणी या गावी स्थलांतरित झाले. जव्हारला राज्य स्थापन केल्यानंतर मुकणी या गावचे म्हणून पुढे त्यांचे मुकणे हे आडनांव रुढ झाले.

अठराव्या शतकापर्यंत जव्हारचे राज्य निर्वेधपणे चालू होते. पेशवाईचा अंत झाल्यावर जव्हारचे संस्थान इतर संस्थानांप्रमाणे ब्रिटीशांच्या सार्वभौमत्वाखाली गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर हे संस्थान १० जून १९४८ ला भारतीय संघराज्यात विलीन झाले.

महादेव कोळी लोकांचे स्वातंत्र्यलढे

आदिवासी जमाती या आपापल्या प्रदेशात आनंदाने जगत असतात. इतरांनी त्यामध्ये शिरकाव केल्यास त्या त्यास विरोध करतात. **महादेव कोळी** जमातीनेही बहिर्जनांना अशाच प्रकारे प्रखर विरोध केलेला आहे. अन्याय, अत्याचाराविरूध्द आवाज उठविलेला आहे. **महादेव कोळी** लोकांच्या स्वातंत्र्यलढ्याची नोंद इतिहासात 'बंड' अशी केलेली आहे.

बहामनी राजांनी (१३४० ते १४९०) व अहमदनगरच्या राजांनी (१४९० ते १६३६) **महादेव कोळी** जमातीला त्यांच्या परंपरागत भागात स्वातंत्र्य दिलेले होते. त्यांच्या प्रदेशाला बावन्न मावळांचा प्रदेश किंवा खोऱ्यांचा प्रदेश म्हणून आळखले जाई. प्रत्येक मावळाला स्वतंत्र नाईक व त्या सर्वांचा प्रमुख सरनाईक असे. त्याचे मुख्यालय जुन्नर येथे होते व ते बावनचावडी या नावाने ओळखले जाई. वरील राजांच्या काळात महादेव कोळ्यांना सरदार व मनसबदार असा शाही मानमरातब मिळत असे. १७ व्या शतकाच्या मध्यात महादेव कोळ्यांनी राजसत्तेविरूध्द उठाव केल्याचे उल्लेख इतिहासात सापडतात. इ.स. १६५७ मध्ये शिवाजी महाराजांच्या स्फुर्तीने जुन्नर भागातील **महादेव कोळी** संघटित झाले व त्यांनी मोगल बादशहाच्या विरोधात उठाव केला. या उठावाने बादशहा संतापला व त्याने हजारो महादेव कोळ्यांना पकडून त्यांचे जुन्नर येथे शिरकान केले. त्यांच्या मुंडक्यांच्या ढिगावर चबुतरा बांधला. त्यास 'काळा चबुतरा' असे म्हणतात. तो जुन्नर येथे आहे. इतिहासात त्याची नोंद काळा चौथरा म्हणून झाली आहे.

महादेव कोळी ही लढवय्यी जमात असल्याने मोगल काळात अनेकांना देशमुखीचे वतन मिळालेले होते. त्यात पेठचे राजे भगवंतराव, बारीचे खाडे, टाकेदचे बांबळे, राजूरचे बांबळे आणि पिचड, मुरबाडचे बोकड, आंदर मावळाचे मोरमारे यांचा समावेश होता. इ.स. १७६० मध्ये जावजी बांबळे याने पेशव्यांविरूध्द उठाव केला. पुढे पेशव्यांनी त्यास राजूर जवळील ६० गावांची जहागिरी बहाल केली. १७९८ मध्ये गोविंदराव, मनाजी आणि बालोजी भांगरे यांनी पेशव्यांविरूध्द उठाव केला. ब्रिटिश काळात रामजी भांगरा (भांगरे) आणि रामा किरवा (किरवे) यांनी ब्रिटिशांविरोधात बंड उभारले. त्यांच्या बंदोबस्तासाठी जानेवारी १८२९ मध्ये इंग्रजांनी कॅ. मॅकिन्टोश यांची नियुक्ती केली. इंग्रज राजवटीला विरोध करण्यासाठी पुणे, ठाणे, नाशिक, नगर या जिल्ह्यांच्या आदिवासी भागात **महादेव कोळी** व भिल्लांच्या संघटना स्थापन झाल्या होत्या. इंग्रजांनी अहमदनगर जिल्ह्यातील रामा किरवा (किरवे) याला पकडून नगर येथे १८३० साली फाशी दिले. १८३८ मध्ये क्रांतीकारक राघोजी भांगरे यांनी ब्रिटीशांच्या विरोधात नव्याने बंड उभारले. आदिवासींची पिळवणूक करणाऱ्या सावकारांवर, मारवाड्यांवर त्याने छापे घातले. त्यांच्याकडून खंडणी वसूल केली. थोड्याच अवधित राघोजी भांगरेचा दरारा संपूर्ण आदिवासी पट्ट्यात निर्माण झाला. त्याने गरिबांना त्रास न देता खूप मदत केली. २ जानेवारी १८४८ रोजी इंग्रज अधिकारी लेफ्टनंट 'गेल' याने चंद्रभागेच्या काठी राघोजीला अटक केली. २ मे १८४८

रोजी ठाणे (जिल्हा) मध्यवर्ती कारागृहात थोर क्रांतीकारक राघोजी भांगरे यांना फासावर देण्यात आले. राघोजी भांगरे यांच्या बंडानंतर सुमारे पंचवीस वर्षांनी वासुदेव बळवंत फडके यांचे बंड सुरु झाले.

सावकारशाही विरूध्द बंडाचे पहिले निशान १८७४ मध्ये आंबेगाव तालुक्यातील होन्या केंगले नावाच्या क्रांतीकारकाने उभारले. १८८९ मध्ये मोठा दुष्काळ पडला होता. सावकारांनी त्याचा गैरफायदा घेऊन आदिवासींना अधिक व्याजदराने कर्जे दिली. तसेच गहान जमिनी बळकावल्या त्याच्या विरोधात ढवळा भांगऱ्याने चळवळ उभी केली. सावकारांना सळो की पळो करून सोडले. १९३६ ते ४० च्या सुमारास जुन्नर परिसरात मोठ्या प्रमाणात सावकारशाही वाढली होती. त्या विरोधात १९३९ साली चळवळ उभी राहिली. त्याचे नेतृत्व कोंड्या नवले नावाच्या इसमाने केले. इतिहासात ते 'कोंड्या नवल्याचे बंड' म्हणून प्रसिध्द आहे. कोंड्या नवलेचे बंड संपते न संपते तोच १९४१-४२ च्या सुमारास भिमाशंकर परिसरात 'सत्तू मराड्याने' बंडाचे निशान उभे केले. त्याच्या बंडाच्या आठवणी आजही भिमाशंकर परिसरात ताज्या आहेत.

२.४ महादेव कोळी जमातीची ओळख

महादेव कोळी ही महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वताच्या डोंगराळ भागात दाट वस्ती करून राहणाऱ्या आदिवासी जमातींपैकी एक प्रमुख जमात आहे. ही जमात प्रामुख्याने नाशिक, अहमदनगर, पुणे, ठाणे आणि रायगड या जिल्ह्यांच्या डोंगराळ भागात आढळते. सह्याद्री पर्वताच्या पूर्व-पश्चिम उतारावर **महादेव कोळी** लहान-लहान गावात वस्ती करून राहतात. पुणे जिल्ह्यातील मुसा खोऱ्यापासून उत्तरेकडील त्र्यंबकेश्वर पर्यंत या जमातीची वस्ती आढळते. भिमाशंकर, कळसूबाई, हरिश्चंद्रगड, ढाक, त्र्यंबकेश्वर या उच्च शिखरांच्या परिसरात त्यांची दाट वस्ती आढळते. बारा ज्योर्तिलिंगांपैकी भिमाशंकर व त्र्यंबकेश्वर ही दोन ज्यार्तिलिंगे याच परिसरात आहेत.

लोकसंख्या

महाराष्ट्र राज्यातील **महादेव कोळी** जमातीची लोकसंख्या १९८१ च्या जनगणनेनुसार ७.८७ लाख एवढी होती. १९९१ मध्ये ती ९.९९ लाख इतकी होती. २००१ मध्ये त्यांची लोकसंख्या १२.२७ लाख एवढी वाढली आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने विचार करता **महादेव**

कोळी जमातीचा एकूण आदिवासी लोकसंख्येमध्ये महाराष्ट्रात तिसरा क्रमांक लागतो. तर सह्याद्री विभागात पहिला क्रमांक लागतो.

तक्ता क्र. २.२

महादेव कोळी जमातीची जिल्हा व तालुका निहाय गावे आणि लोकसंख्या.

जिल्हा	तालुका	महादेव कोळी वस्तीची गावे	कुटुंबाची संख्या	लोकसंख्या		
				पुरुष	स्त्रिया	एकूण
पुणे	जुन्नर	५५	५६३१	१६६९०	१५७८०	३२४७०
	आंबेगाव	५६	४३५८	१२१५०	११६५२	२३८०२
	खेड	२७	२२०१	६२७०	५९७३	१२२४३
	मावळ	१७	८३२	२५७६	२३७४	४९५०
	एकूण	१५५	१३०२२	३७६८६	३५७७९	७३४६५
अहमदनगर	अकोले	१०५	१०७३१	३३३७७	३१८३२	६५२०९
	संगमनेर	६	४१९	१३६९	११९१	२५६०
	एकूण	१११	१११५०	३४७४६	३३०२३	६७७६९
नाशिक	नाशिक	८२	६२७२	२०२०४	१९०९७	३९३०१
	दिंडोरी	१२६	९७२५	२८३०९	२६७०३	५५०१२
	पेठ	१३३	४४३८	१२७८२	१२३९७	२५१७९
	इगतपूरी	८४	६१५५	१९४५३	१८३०१	३७७५४
	सिन्नर	६	५६१	१८२०	१७६५	३५८५
	कळवण	४६	५९१	१८८१	१७३६	३६१७
	सुरगाणा	१६०	५२६२	१५२९२	१४६४९	२९९४१
	चांदवड	८	४१६	११२८	१०८२	२२१०
	एकूण	६४५	३३४२०	१००८६९	९५७३०	१९६५९९
ठाणे	जव्हार	४८	६७१	१७०५	१७३२	३४३७
	वाडा	२०	१६६	४०९	४१३	८२२
	मोखाडा	४४	२६००	७२३१	६९२७	१४१५८
	शहापूर	४५	९९८	२७००	२५३१	५२३१
	मुरबाड	२०	४०६	१०८६	९८०	२०६६
	इतर तालुके	१५	९८	२३१	२१४	४४५
	एकूण	१९२	४९३९	१३३६२	१२७९७	२६१५९

तक्ता क्र. २.२ पान क्र. ७५ वरून पुढे

रायगड	कर्जत	१६	४३३	१३७१	१२५०	२६२१
	इतर तालुके	९	४६७	१२०३	११९२	२३९५
	एकूण	२५	९००	२५७४	२४४२	५०१६
इतर जिल्हे		५	१०५	३०२	२७८	५८०
एकूण		**११३३**	**६३५३६**	**१८९५३९**	**१८००४९**	**३६९५८८**

Ref – Universal Bench Mark survey 1997-98 TR&TI Maharashtra state pune-2000

तक्ता क्र. २.२ नुसार **महादेव कोळी** जमात ही नाशिक, राजूर, घोडेगाव, पेण, शहापूर, जव्हार या सहा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातील वीस तालुक्यांतील सुमारे ११३३ गावांमध्ये विखुरलेली आहे. बेंच मार्क सव्हे १९९७-९८ नुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील **महादेव कोळी** कुटूंबाची संख्या ६३५३६ एवढी होती. तर एकूण लोकसंख्या ३६९५८८ असून पुरूष लोकसंख्या १८९५३९ व स्त्री लोकसंख्या १८००४९ इतकी होती.

कुळी आणि आडनावे

जगातील कोणत्याही समाजाची उत्पत्ती कशी व कोणापासून झाली हे निश्चितपणे सांगता येत नाही. **महादेव कोळी** समाजाची उत्पत्ती कोणातरी पूर्वजापासून झाली असावी असे ते लोक मानतात. परंतु त्या मूळ पुर्वजाचे नाव मात्र सांगता येत नाही. महादेव हा मूळ पुरुष असावा आणि त्या वरूनच **महादेव कोळी** हे नाव पडले असावे असे काहींचे मत आहे. **महादेव कोळी** जमातीची आडनावे किंवा कुळी या निसर्गातील विविध प्राणी, पक्षी व वृक्षांच्या नावांशी संबंधित आहेत.

वनस्पती – डहाळे, उंबरे, करवंदे, झाडे, डवणे इ.

प्राणी – कावळे, मोरमोरे, घारे इ.

निसर्गगुण – गवते, चिखले, जंगले, कचरे, काठे इ.

महादेव कोळी जमातीत समान कुळी किंवा आडनाव असणाऱ्या स्त्री-पुरुषांत विवाह होत नाहीत.

महादेव कोळी जमातीत गोत्रकुळीला महत्व आहे. या जमातीत काहींच्या मते बारा तर काहीच्या मते चोवीस गोत्रकुळी आहेत. परंतु या जमातीचा विस्तार प्रामुख्याने बारा गोत्राव्दारे झालेला आहे. प्रत्येक कुळाला बारा गोत्र कुळे जोडलेली असतात. त्यांना गोतेभाऊ/गोत्रबंधू असे

म्हणतात. मुख्य कुळाची बारा गोत्रकुळे अलिकडे कोणालाही सांगता येत नाहीत. गोत्रसाखळी थोडक्यात खालीलप्रमाणे.

असवले- भांगरे, कोंडार, विरणक, भवारी, पोटे, गोडे, शिंगाडे, भालचिम, रगतवान, भालिंगे इ.
बांबळे- भारमल, भोजने, गेंगजे, लांघी, तांबेकर, उंबरे इ.

गोत्रबंधूंमध्ये विवाह केले जात नाहीत. कारण गोत्रकुळाची निर्मिती एकाच पूर्वजापासून झाली असावी अशी त्यांची धारणा आहे. म्हणजेच ते एकाच रक्ताच्या नात्याचे आहेत.

महादेव कोळी - गाव, वाडी, वस्ती, झाप

सह्याद्रीच्या डोगराळ भागात **महादेव कोळी** वस्ती करून राहतात. त्यांच्या वस्तीस्थानाला गाव, वाडी, वस्ती, झाप असे म्हणतात. उदा. डोंगरगाव, खडकवाडी, भांगरेवस्ती, जंगल्याचा झाप इत्यादी. या जमातींची वस्ती अनेक वाड्या-वस्त्यांमध्ये विखुरलेली आढळते. शेतात घरे/झोपड्या बांधूनही काही लोक राहतात. दोन घरांमध्ये, झोपड्यांमध्ये पाच ते दहा फूट अंतर असते. घरे ही दगडमातीची असतात. काही घरांच्या, झोपड्यांच्या भिंती ह्या 'कुडाच्या' असतात. घरावर, झोपडीवर गवताचे छप्पर घातलेले असते त्यास 'कुहीट' असे म्हणतात. प्रत्येक घराला, झोपडीला अंगण असते. काही घरांना, झोपड्यांना 'वाडगे' बनविलेले असते. घरे ही झोपडीवजा, चौमौळी किंवा दोनपाखी असतात. गायी, बैल, शेळ्या, म्हशी यांच्यासाठी घराला, झोपडीला जोडून 'पडवी' बांधलेली असते. पडवी नसेल तर घरातच त्यांची व्यवस्था केली जाते. घराचा, झोपडीचा आकार ऐपतीप्रमाणे लहानमोठा असतो. धान्य साठविण्यासाठी घरात कणगा, कणगी, कोथळी, बलाद असते. घरात मोजकी भांडी, मडकी, शिंकी व पेट्या असतात. तसेच पाण्याची घागर, हंडा, पातेले, चाटू, तवली, परात, बाडगी, काठवट, शिकाळी हे साहित्य असते. मासेमारीसाठी मोडे, मळई, भोताड, ससे तसेच तितर पकडण्यासाठी 'वाघूर' (जाळे) असते.

स्वभाव वैशिष्ट्ये आणि शारीरिक ठेवण

महादेव कोळी जमातीचे लोक स्वभावाने शांत परंतु करारी वृत्तीचे असतात. संकोची वृत्ती, त्रयस्थाबरोबर बोलण्याचे टाळणे, फक्त आपल्यापुरताच विचार करणे ही स्वभाव वैशिष्ट्ये आढळतात. दऱ्याखोऱ्यातील वास्तव्य, अज्ञान, अडाणीपणा, जन्मजात बुजरेपणा, बाह्य समाजाबद्दल एक प्रकारची भिती, सांस्कृतिक वेगळेपणा यामुळे ते इतरांपासून अलिप्त आहेत.

शहरी समाजापासून ते फटकून राहतात. ते वाघाला घाबरत नाहीत परंतु शहरी लोकांना फार घाबरतात. साधे व सरळ जीवन जगणारा हा समाज आहे. गरीबी असूनही भीक मागण्याची प्रवृत्ती दिसून येत नाही. घरात अठराविश्वे दारिद्र्य असूनही सुखाने जगण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असतो. ते प्रामाणिक, पापभीरू, दैववादी, निसर्गाच्या सानिध्यात रमणारे आहेत.

महादेव कोळी वर्णाने काळेसावळे, उंचीने मध्यम, सडपातळ, काटक आणि कणखर असतात. त्यांचे नाक आखूड आणि सरळ, डोळ्यांच्या बुबुळात काळी छटा आणि करारी वृत्ती दिसते. तरीही ते नम्र आणि शांत प्रसंगी तापट स्वभावाचे दिसतात. स्त्री-पुरुषांचे केस काळे, ओठ मोठे व जाड असतात. डोंगराळ प्रदेशातील वास्तव्य, अधिक शारीरिक कष्ट यामुळे ते अत्यंत काटक असतात. स्त्रियाही वर्णाने काळ्या-सावळ्या क्वचित काही स्त्रिया गोऱ्यापान आणि सुंदर असतात. त्या अतिशय कष्टाळू मायाळू तसेच प्रेमळही असतात. थोडक्यात या जमातीचे लोक शांत, प्रेमळ, प्रामाणिक आणि पापभीरू असतात.

पोषाख आणि दागदागिने

समाजातील इतर स्त्री-पुरुषांपेक्षा **महादेव कोळी** लोकांचा पेहराव हा वेगळा आहे. जुन्या वळणाचे पुरुष कमरेला लंगोटी लावतात व अंगात कोपरी घालतात. हा त्यांचा दैनंदिन पोशाख असतो. सण समारंभ प्रसंगी तसेच बाजाराला जाताना ते धोतर नेसतात व अंगात बंडी घालतात. डोक्यावर फेटा असतो. त्यास पागोटे असेही संबोधले जाते. रानावनात भटकताना ते दैनंदिन पेहरावाबरोबर खांद्यावर घोंगडी व हातात काठी किंवा कुऱ्हाड ठेवतात. पुरुष कानामध्ये चांदीची भिकबाळी आणि पगरे वापरतात. कमरेला चांदीची साखळी असते. ज्यांची परिस्थिती गरीब आहे ते दागिने वापरत नाहीत. अलिकडे काही लोक चामड्याच्या चपला व जोडे वापरतात.

बाह्य समाजाच्या संपर्कामुळे अलिकडे पुरुष पायजमा किंवा लेहंगा घालतात व अंगात शर्ट घालतात. डोक्यावर गांधी टोपी परिधान करतात. सुशिक्षित तरुणांनी आधुनिक पध्दतीचा पोशाख वापरायला सुरुवात केली आहे.

महादेव कोळी स्त्रिया कमरेभोवती गुडघ्यापर्यंत आडवे लुगडे नेसतात. त्यास 'धांदुक' असे म्हणतात. डोक्यावर लाल रंगाची व पांढऱ्या टिपक्याची फडकी घेतात. अंगात चोळी किंवा झंपर घालतात. स्त्रियांमध्ये नऊवारी लुगडे नेसण्याची प्रथा प्रचलीत आहे. गरिबीमुळे नऊवारी लुगड्याची त्यांना दोन लुगडी करावी लागतात. लुगडे गुडघ्यापासून वरच नेसण्याच्या पध्दतीला

ते उबडवट्याचे नेसणे असे म्हणतात. अलिकडे घोळाची व निऱ्याची लुगडी नेसण्याची पध्दत दिसू लागली आहे.

विवाहित स्त्रियांमध्ये शृंगाराची विशेष आवड दिसत नाही. विवाहित स्त्रिया गळ्यात मणीमंगळसुत्र घालतात तसेच 'गाठी' घालतात. कानात बाळ्या, बुगड्या, कुड्या, कानफुले असतात. नाकात नथ घालतात. हातात पाटल्या, बाजूबंद, वेळा, घालतात. बोटात अंगठी, पायाच्या बोटात जोडवी, मासळी इ. दागिने असतात. स्त्रिया हातात काचेच्या बांगड्या व सऱ्याचे गोठ वापरतात. **महादेव कोळी** स्त्रियांची गळेसर व जोडवी ही सौभाग्यचिन्हे समजली जातात. स्त्रियांमध्ये गोंदून घेण्याची प्रथा आहे. कपाळावर, गालावर, हनुवटीवर व हातावर गोंदलेले असते. स्त्रिया बहूधा चांदीचे दागिने वापरतात. ज्यांची परिस्थिती चांगली आहे ते सोन्याचे दागिने वापरतात. बहुतेकांना गरिबीमुळे हे सर्व दुर्लभ आहे.

आहार

महादेव कोळी लोकांचे जेवण अत्यंत साधे असते. नाचणी, वरईची भाकरी, भात व त्याबरोबर उडीद, हुळगे किंवा वालाची आमटी, किंवा बेसन, चटणी, कांदा हे सर्वसामान्य जेवण मानले जाते. जेवणात भाजीपाला जवळपास नसतोच. पावसाळ्यात अन्नधान्याचा तुटवडा असतो तेव्हा चाईची भाजी, कुरडू, बरकी, रानआळू, फांजी, म्हसवेल, करटुली, बार, भोकरे, मोहट्या, पाचून कांदा, बडधा, घोळू, चंदनबटवा, खुरकुटी, हाईंद, घळू, कोऱ्हळ इ. रानभाज्यांचा आहारात उपयोग केला जातो. तसेच गव्हाचा किंवा ज्वारीचा घाटा किंवा आंबील रानकेळीचे कंद, कडू कांदा, पंदु, इ. रानकंद खाऊन त्यांना दिवस काढावे लागतात. **महादेव कोळी** लोक दिवसातून दोनदा जेवण घेतात. चटणी भाकरी हा नेहमीचा व आवडता आहार असतो. डाळीसाठी उडीद, मसूर, वाल, चवळी, हुळगे, तूर, वापरतात. घरी गाई, म्हशी असतील तर दुध, दही खातात. काकड भाकरी बनवतात. कधी-कधी त्यांच्या जेवणात मटण, मासे, बोंबील, सुकट, वाखठे, अंडी इ. मांसाहारी पदार्थ असतात. त्याला ते 'वस्याट' किंवा 'वशाट' असे म्हणतात. पावसाळ्यात खेकडे व मासे यावर त्यांचा अधिक भर असतो.

२.४.१ महादेव कोळी जमातीचा आदिवासींमधील समावेश

ईस्ट इंडीया कंपनीने भारतातील आदिवासींचे जमीनदारांकडून होणारे शोषण थांबविण्याकरीता १७८२ साली वेगळा प्रदेश व वेगळा कायदा केला. त्या प्रदेशाला डोंगरी प्रदेश असे नाव देण्यात आले. ब्रिटीशांना भारतातील आदिवासी प्रदेशात सर्वसामान्य कायद्याप्रमाणे कारभार करणे शक्य नव्हते. त्यामुळे १८७४ साली अशा प्रदेशांसाठी स्वतंत्र शेडूल्ड डिस्ट्रिक्ट ॲक्ट असा वेगळा कायदा करावा लागला. भारत सरकार कायदा १९१९ व इंडियन स्टाच्युटरी कमिशन १९२७ यांनी आदिवासी प्रदेश व आदिवासी क्षेत्र यांचे वर्गीकरण करून त्यांची निश्चिती केली. आदिवासी किंवा मागास प्रदेशांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक स्थितीची चौकशी करून सुधारणा सुचविण्यासाठी स्वतंत्र समित्या निर्माण करण्यात आल्या. त्यानुसार मुंबई सरकारने १९२८ मध्ये श्री. ओ. एच. बी. स्टार्ट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. या समितीने जुन्या मुंबई राज्याचा दौरा करून १९३० साली आपला अहवाल सरकारला सादर केला. सरकारने समितीचा अहवाल मान्य करून **'महादेव कोळी'** जमातीचा समावेश 'अबोरिजनल ॲन्ड हिल ट्राईब' या वर्गात केला.

भारतीय राज्यघटनेत कलम २४४ अन्वये अनुसूचित क्षेत्र निश्चित करण्यात आले. १९५० च्या अनुसूचित क्षेत्रानुसार महाराष्ट्र राज्यातील ९३८० चौ. मैलाचे क्षेत्र व ७३३९४३ आदिवासी लोकसंख्येचा प्रदेश जाहीर करण्यात आला. १९५६ मध्ये राज्य पुनर्ररचना कायदा अस्तित्वात आल्याने संविधान आदेश १९५० मध्ये बदल झाला. त्यानंतर अनुसूचित जाती, जमाती सुधारीत आदेश १९५६ अस्तित्वात आला. त्यानुसार **महादेव कोळी** जमातीला फक्त विशिष्ट क्षेत्रात अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला होता. ते क्षेत्र ठाणे, नाशिक, अहमदनगर, पुणे व रायगड या जिल्ह्यांच्या विशिष्ट भागापुरतेच मर्यादीत होते. मुंबई राज्य पुर्नरचना कायदा १९६० अन्वये राज्यातील अनुसूचित जाती-जमातींची पुनर्ररचना करण्यात आली. परंतु १९५६ च्या अध्यादेशानुसार निर्धारित झालेल्या **महादेव कोळी** जमातीच्या निर्दिष्ट क्षेत्रात कोणताही बदल करण्यात आलेला नव्हता. यावरून असे दिसते की फक्त सह्याद्री विभागातील **महादेव कोळी** जमातीचाच आदिवासींमध्ये समावेश केलेला आहे.

नकाशा क्र. २.१

सह्याद्रीतील आदिवासी : महादेवकोळी

महाराष्ट्रातील महादेवकोळी जमातीचे अधिक लोकसंख्येचे क्षेत्र

Areas of Concentration of Mahadeo Kolis In Maharashtra



आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सौजन्याने

२.५ आर्थिक परिस्थिती

महाराष्ट्रातील आदिवासी जमातींच्या उपजिवीकेचे मुख्य साधन शेतीच आहे. स्वतः:च्या मालकीची शेती असणारे, दुसऱ्यांची शेती खंडाने अथवा वाट्याने करणारे आणि शेतमजूरी करणारे असे त्यांचे वर्गीकरण करता येते. सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्यातील जमीन डोंगराळ, खडकाळ असून चढ-उताराची आहे. या विभागात ५० इंचापासून २०० इंचापर्यंत पाऊस पडतो. पावसाळ्यात येथील नद्यानाले दुथडी भरून वाहतात. परंतु उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई असते. अतिपावसामुळे पावसाळ्यात दळणवळण ठप्प होते. वाहतुकीची गैरसोय, कच्चे, चढ-उताराचे रस्ते यामुळे या भागात प्रवास करणे कठीण असते. अशा बिकट परिस्थितीत येथील आदिवासी आपले जीवन कंठीत असतात. अतिवृष्टीने ओला दुष्काळ तर कधी कमी पावसामुळे सुका दुष्काळ याचा त्यांना सतत सामना करावा लागतो.

महादेव कोळी जमातीत ७० टक्के लोक शेतीवर, २५ टक्के लोक शेतमजूरीवर आणि ५ टक्के लोक इतर किरकोळ व्यवसाय करून आपली उपजिवीका करतात. जोडधंदा म्हणून गवत कापणे, वनौपजे गोळा करणे, हिरडा, बेहडा गोळा करणे, सरपण गोळा करणे, जंगल मजूरी करणे, रस्ते दुरूस्तीची कामे करणे इ. कामे हे लोक करतात. बहुतेक लोकांच्या मालकीची जमीन असूनही पिकाखालील क्षेत्र अत्यंत कमी आहे. कोरडवाहू जमीनच अधिक असल्याने उदरनिर्वाहापुरतेही अन्नधान्याचे उत्पादन होत नाही. त्यामुळे इतर मजूरीवर अवलंबून रहावे लागते. सरासरी जमीन धारणा कमी असून जमिनीचे क्षेत्र सलग आढळत नाही, त्यामुळे दूर अंतरावरील जमिनीची देखभाल करता येत नाही, परिणामी ती पडीकच पडते. खरीप हंगामात भात, नाचणी, वरई, सावा, उडीद, खुरासणी ही पिके घेतली जातात. रब्बी हंगामात हरबरा, वाल ही प्रमुख पिके घेतली जातात. **महादेव कोळी** लोकांची शेती करण्याची पध्दत जुनीच आहे. डोंगर-उतारावर आजही दळी पध्दतीने शेती केली जाते. तिला स्थलांतरीत शेती असे म्हणतात. शेतीची दुसरी पध्दत म्हणजे 'राब' पध्दत होय. शेतीसाठी बैल व पारंपारिक अवजारे वापरली जातात. शेतीतून पुरेसे उत्पादन होत नसल्याने कोंबड्या, बकऱ्या पाळणे, गाई, म्हशी पाळणे, बैल भाड्याने देणे इ. जोडधंदा म्हणून केले जाते. दुय्यम व्यवसायापासून मिळणारे उत्पन्नही मर्यादितच असते.

शेतमजूर हा आदिवासींमधील सर्वात दुबळा आणि उपेक्षित असा घटक आहे. महाराष्ट्रातील आदिवासींमध्ये शेतमजूरांचे प्रमाण ६० टक्के आहे. शेतमजूराला मालकाकडे

अनेक कामे करावी लागतात. अधिक शारीरिक कष्टाची कामे पुरुष करतात तर हलकी कामे स्त्रिया करतात. आदिवासी शेतमजूरांत रोजंदारीवर काम करणारे सालदार किंवा घरगडी, लग्नाचे गडी, वेठबिगार असे ढोबळमानाने चार प्रकार आढळतात. शेतमजूरांना अत्यंत कमी उत्पन्न मिळते. त्यामुळे त्यांचे बहुतेक सर्वच आयुष्य दारिद्र्यातच जाते. शेतमजूर इतर जोडधंदेही करतात. परंतु त्यापासून मिळणारे उत्पन्न मामुलीच असते. आदिवासी लोकांचे उत्पन्न कमी व खर्च अधिक अशी परिस्थिती उपरिहार्यपणे निर्माण होते. परिणामी त्यांना कर्ज घेण्याशिवाय पर्याय नसतो. जमीनदार व सावकारांकडून केल्या जाणाऱ्या पिळवणूकीमुळे ते कर्जाच्या सापळ्यात अडकतात. **महादेव कोळी** जमातीत तुटीचेच अंदाजपत्रक असणाऱ्या कुटुंबांचाच भरणा अधिक असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. २.३

आदिवासी जमाती - कर्ज घेणारी कुटुंबे आणि कर्जाचे प्रमाण

जमात	पाहणी केलेली कुटुंबे	कर्ज घेणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी	कर्जाचे दर कुटुंबास प्रमाण रु.
पावरा	२२३	५५.६	२४५.५
वसावा	२८४	६३.३	१८७.०
मावची	३०८	४८.०	२४३.०
भिल्ल	१८२	३३.५	१५६.५
वारली	२५७	३०.४	११८.०
कातकरी	२७१	२१.४	९०.७
ठाकूर	३०१	१८.३	१६५.०
कोकणा	२६८	३५.४	१८१.७
महादेव कोळी	२६७	७१.९	२१४.४

संदर्भ - महाराष्ट्रातील आदिवासींची आर्थिक पाहणी, गांधी स्मारक निधी, १९५७, पान नं. ४५

वरील तक्ता क्र. २.३ वरून असे दिसते की **महादेव कोळी**, वसावा, आणि पावरा या जमातीत कर्ज घेणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अधिक आहे. कर्ज घेण्याचे सर्वाधिक प्रमाण **महादेव कोळी** जमातीत आहे. तसेच दर कुटुंबातील कर्जाचे प्रमाणही अधिक आहे.

पिढ्यान-पिढ्या कर्ज घेण्याची आणि ती फेडण्याची साखळी अव्याहत चालू असते. आदिवासी कर्जात जन्मतो, वाढतो आणि कर्जातच मरतो. आदिवासींच्या दुःखाचे मूळ त्यांच्या

आर्थिक शोषणात आहे. जमीनदार, सावकार, जंगल ठेकेदार, व्यापारी, दुकानदार, पुढारी इत्यादी आदिवासींच्या अज्ञान आणि दारिद्र्याचा फायदा घेऊन त्यांचे आर्थिक शोषण करीत असतात.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या युनिव्हर्सल बेंच मार्क सर्व्हे (१९९७ -९८) नुसार **महादेव कोळी** जमातीत ६० टक्के कुटुंबे शेती करणारी तर ३८ टक्के शेतमजूरी करणारी आढळली. स्वतःच्या मालकीची जमीन असणाऱ्यांची संख्या ६९.६२ टक्के एवढी आहे. तर भूमिहीन कुटुंबांची संख्या ३०.३८ टक्के एवढी आहे. **महादेव कोळी** जमातीत सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. याच सर्वेनुसार पाच जिल्ह्यातील सहा आदिवासी प्रकल्पातील ५७,०६९ कुटुंबांपैकी ६५.४८ टक्के **महादेव कोळी** लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. ६९.१७ टक्के लोकांचा शेती व शेतमजूरी आहे. ३३.२४ टक्के लोक दुग्ध व्यवसाय, नोकरी, लघुउद्योग, जंगल मजूरी करणारे आहेत. **महादेव कोळी** लोकांना विविध मार्गांपासून मिळणाऱ्या एकूण उत्पन्नापैकी ४६.८० टक्के उत्पन्न शेतीतून, २६.११ टक्के उत्पन्न शेतमजूरीतून, २१.२८ टक्के उत्पन्न नोकरी व्यवसायातून मिळते. बेंच मार्क सर्वे (१९९७ - ९८) नुसार **महादेव कोळी** जमातीत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या ८६ टक्के इतकी आहे.

२.६ शिक्षण, आरोग्य आणि राहणीमान

शिक्षण

आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगती करावयाची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. कोणत्याही समाजाच्या आत्मउन्नतीचा पाया शिक्षण हा आहे. ब्रिटीश पूर्व काळात ब्राम्हण व क्षत्रीय सोडून इतरांना ज्ञानार्जन करण्याचा अधिकार नव्हता. इंग्रजांच्या आगमनानंतर त्यांनी दलित, मागास, आदिवासी, यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. आदिवासींमध्ये शिक्षणाचे कार्य प्रथम मिशनरी लोकांनी सुरु केले. श्री. ठक्कर बाप्पा यांनी १९२२ साली गुजरात मध्ये 'भिल्ल सेवा मंडळ' नावाची संस्था काढली. त्यानंतर अनेक संस्थांनी आदिवासी भागात शिक्षणाचे कार्य सुरु केले. १९३८ साली 'सिमिंग्टन' या प्रशासकीय अधिकाऱ्याने आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सरकारला अनेक शिफारशी सादर केल्या. १९४७ मध्ये वांद्रेकर समितीनेही आदिवासी शिक्षणासंबंधी शिफारशी केल्या होत्या. सरकारने १९५३-५४ साली आश्रमशाळा योजना सुरु केली. महाराष्ट्रात शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या अशा एकूण १११४ आश्रमशाळा आहेत. त्यामध्ये ३.७२ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्याशिवाय आदिवासी

विकास विभागाच्या २९५ व समाज कल्याण विभागाच्या वसतीगृहांचा आदिवासी मुलांना लाभ मिळतो. **महादेव कोळी** प्रदेशात शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या एकूण २१२ आश्रमशाळा आहेत. त्यामध्ये शिक्षण घेणाऱ्या ७५ हजार विद्यार्थ्यांपैकी ३५ हजार विद्यार्थी **महादेव कोळी** आहेत. आश्रमशाळेमुळे आदिवासींना शिक्षणाची संधी उपलब्ध झालेली आहे. परंतु आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा हा चांगला नाही. मुलांच्या गळतीचे प्रमाण अधिक आहे. केवळ साक्षरता ही शिक्षणाचे मोजमाप होऊ शकत नाही. महाराष्ट्रात सन २००१ च्या जन-गणनेनुसार आदिवासी साक्षरतेचे प्रमाण ५५.२१ टक्के आहे. पुरुष साक्षरता ६७.०२ टक्के तर स्त्री साक्षरता ४३.०८ टक्के आहे. **महादेव कोळी** जमातीत स्त्रियांपेक्षा पुरुषांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अधिक आढळते. गेल्या ४० वर्षात या जमातीतील साक्षरतेचे प्रमाण १० टक्क्यावरून ४३ टक्क्यांपर्यंत वाढलेले आहे. पुरूष साक्षरता ५३.०१ टक्के तर स्त्री साक्षरता ३१.१२ टक्के आहे. इतर प्रगत समाजाशी तुलना करता **महादेव कोळी** जमातीत शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. परंतु इतर आदिवासी जमातींपेक्षा अधिक आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, दुर्गम प्रदेश, गरिबी, पायाभूत सुविधांचा अभाव, शिक्षणाबद्दल उदासिनता, शैक्षणिक वातावरणाचा अभाव या कारणांमुळे शिक्षणात अडचणी येतात.

आरोग्य

आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणानंतर आरोग्य हा महत्वाचा घटक आहे. सुदृढ शरीरात सुदृढ मन असते असे म्हटले जाते. आदिवासींच्या सामाजिक सुधारणेच्या मार्गात आरोग्य विषयक व औषधोपचारांविषयीची अनास्था हा एक मोठा अडथळा आहे. स्वच्छ राहणी, सकस व पोटभर आहार हे दोन घटक आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे मानले जातात. आदिवासी प्रदेशात उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई, दारिद्र्यामुळे उपासमार, कुपोषण, सोयी सुविधांचा अभाव, यामुळे त्यांचे आरोग्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असते. शेकडो वर्षे दारिद्र्यात अडकलेल्या आदिवासींना समतोल आणि पुरेसा आहार तर सोडाच पण पोटाला पोटभर अन्न देखील मिळत नाही. अनेक आदिवासींना रानफुले, कंदमुळे, रानभाज्या, आंबील किंवा घाटा खाऊन दिवस काढावे लागतात. स्वतःच्या मालकीची जमीन असणाऱ्यांनाही सकस आहार मिळत नाही. बहुतेकांना कधी उपाशी तर कधी अर्धपोटी रहावे लागते. मूठभर डाळीचे 'ढबळाभर' वरण त्यात फक्त मीठ आणि मिरची, नागली किंवा वरईची भाकरी, कधी कधी भात, कांदा आणि लाल मिरचीचा गोळा असा त्यांचा आहार असतो. तोही अपुराच!

शरीराचे आरोग्य चांगले राहण्यासाठी प्रथिने, पिष्टमय पदार्थ, स्निग्ध पदार्थ, क्षार आणि जीवनसत्वे पुरविणारे घटक आवश्यक असतात. हे घटक पुरविणारे अन्न पदार्थ आणि भाज्या आदिवासींना मिळत नाहीत. त्यामुळे त्यांना त्वचा रोग, डोळ्यांचे विकार, मुडदूस ॲनिमिया अशा व इतर अनेक रोगांचा सतत प्रादुर्भाव होत असतो.

सकस आहाराबरोबरच शुध्द व मुबलक पिण्याचे पाणी आरोग्यासाठी आवश्यक असते. आदिवासी भागात पावसाळ्यात नद्या, नाले, ओढे, झरे, डवरे, उभेड यांना मुबलक पाणी असते. परंतु उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असते. विहिरींमध्ये साठलेले पाणी खराब झालेले असते. तेच प्यावे लागते. अनेक खेड्यांतील लोकांना पाण्यासाठी २ ते ४ मैलांपर्यंत पायपीट करावी लागते. स्त्रियांचा दिवसातील बहुतेक वेळ पाणी आणण्यातच जातो. उन्हाळ्यात बहुतेक करून अशुध्दच पाणी प्यावे लागते. अशा प्रकारच्या पाण्यामुळे ढाळवात, कृमी, जळवा, नारु, कावीळ, कॉलरा यांसारखे भयंकर रोग होतात. वैद्यकीय सोयी-सुविधांअभावी अनेकांना आपला प्राण ही गमवावा लागतो.

पिण्याच्या पाण्याच्या टंचाई मुळे इतर वापरासाठी पाणी मिळणे अशक्य असते. रोज आंघोळ करणे, कपडे धुणे शक्य होत नाही. त्यामुळे वैयक्तिक अस्वच्छता राहते. गरिबीमुळे कपडेच कमी असल्याने ते वारंवार धुणेही शक्य होत नाही. रोज कपडे धुण्याने ते लवकर फाटतात अशी त्यांची कल्पना असते. योग्यवेळी कपडे न धुतल्यामुळे खरूज, नायटा व इसब असे त्वचा रोग होतात. जनावरांची सोयही घरातच केलेली असल्याने त्यांच्या मलमुत्रामुळे साथीचे रोग फैलावण्यास मदत होते. उपासमारीमुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी झालेली असते. रानातील फळे, कंदमुळे, भाज्या यांच्या अतिसेवनाने पोटदुखी, हगवण, खोकला, हिवताप, पडसे असे आजार अनेकांना होतात. जेव्हा विशिष्ट प्रकारचे आजार होतात, साथीचे रोग फैलावतात तेव्हा त्यांची अशी समजूत असते की देव कोपल्यामुळे किंवा कोणीतरी चेटूक केल्यामुळे हे झाले आहे. अंधश्रध्देपोटी ते भगत, मांत्रिकाकडे जातात व वैद्यकीय उपचारांकडे दुर्लक्ष करतात.

आदिवासींचा आहार निकृष्ट असतो, राहणी अस्वच्छ असते, तरीही बहुतेक आदिवासी प्रकृतीने निरोगी व सशक्त असतात. निसर्गाचे सानिध्य कष्टाची सवय, प्रचंड सहनशीलता यामुळे स्त्री-पुरुषांत काटकपणा व दमदारपणा असतो. स्वच्छ व मोकळी हवा, भरपूर सूर्यप्रकाश यामुळे त्यांची प्रकृती कणखर बनत असावी.

अलिकडे शासनाने आदिवासी भागात शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी व दळणवळण सुविधा पुरविल्यामुळे त्यांचे आरोग्य तसेच राहणीमान सुधारत आहे. तसेच अज्ञान, अंधश्रध्दा, भ्रामक कल्पना याबाबतीतही मतपरिवर्तन होत आहे.

राहणीमान

आदिवासी लोकांच्या घरांची स्थिती, घरांची रचना, घरांचा आकार, घरातील सामान आणि साहित्य यावरून त्यांच्या राहणीमानाची कल्पना येते. आदिवासींची घरे, गाव, वाडी, पाडा, वस्ती, झाप इत्यादी प्रकारात विभागलेली असतात. अनेक वाड्या किंवा पाडे मिळून गाव तयार होते. त्यांची घरे ही दगड, माती, विटा, कुडांची बनवलेली असतात. घरावर छप्पर म्हणून गवत, पळस, मोह, साग, कवदर यांच्या पानांचा उपयोग केला जातो. ही पाने जंगलात विपूल प्रमाणात मिळतात. बहुतेक आदिवासी हे छोट्या छोट्या झोपड्यांमध्येच राहतात.

आदिवासींच्या घराचे मुख्यता तीन भाग असतात. पहिला भागास ओटी किंवा ओसरी असे म्हणतात. दुसरा स्वयंपाक घराचा, तिसरा जनावरांच्या गोठ्याचा किंवा पडवीचा असतो. बहुतेक घरांना एकच दरवाजा असतो. खिडकी शक्यतो नसते. काही घरांना दोन दरवाजे असतात. त्यापैकी एक जनावरांच्या वापरासाठी असतो. प्रत्येक घराच्या किंवा झोपडीच्या समोर अंगण किंवा ओटा असतो. त्यावर मांडव टाकलेला असतो. घरे साधारणपणे मध्यम उंचीची असतात. घराच्या आड्याची उंची १० ते १५ फुट असते. घराच्या किंवा झोपडीच्या पाख्याची उंची किंवा उताराची जमिनीपासूनची उंची ३ ते ५ फुटांपर्यंत असते. खेड्यांमध्ये सर्वत्र कुडाची व गवताने शाकारलेली घरे दिसतात. आदिवासींच्या दारिद्र्याचे दर्शन घडविण्यास ती पुरेशी असतात.

आदिवासींची घरे ही गवताच्या छपराची व कुडांच्या भिंतीची असतात. अतिपावसामुळे छप्पर व भिंती प्रतिवर्षी खराब होतात. त्यामुळे प्रतिवर्षी घरांची डागडुजी करावी लागते. धाब्याच्या कौलांचे छप्पर असल्यास त्यांचीही पावसाळ्यापूर्वी डागडुजी करावी लागते. अति-पाऊस, उधई, भेंडूर, वाळवी इ. मुळे त्यांची घरे लवकर खराब होतात. त्यामुळे त्यांच्या घरांचे आयुर्मान कमी असते. पाच-दहा वर्षाच्या अंतराने नवीन घर बांधावे लागते. घर दुरूस्ती व बांधणीच्या खर्चाचा बोजा त्यांच्यावर सतत पडत असतो. घर बांधणीसाठी तसा कमी खर्च येतो. फक्त गवंडी व सुताराची गरज असते. काही आदिवासी गरिबीमुळे परवडत नसल्याने स्वतःचे घर स्वतःच बांधतात. घरांचा तसेच झोपड्यांचा आकार किंवा क्षेत्रफळ सरासरी २० x २०

किंवा ३० x २० इतके असते. एवढ्याशा जागेत माणसे, जनावरे, सरपण, वैरण, धान्यसाठा याची व्यवस्था आदिवासींना करावी लागते.

आदिवासींच्या घरांमध्ये स्वयंपाकासाठी दोन-चार ॲल्युमिनिअमची भांडी असतात. एक दोन पितळेची असतात. तसेच मडकी-गाडगी, रांजन, तवा, पळपट, काठवट, एवढेच साहित्य असते. धान्य साठविण्यासाठी कणगे, कणग्या, मोठे-मोठे मातीचे रांजन असतात. सुगीच्या दिवसांतच ते भरलेले असतात व इतर वेळी रिकामेच असतात. घराच्या कोपऱ्यात दाणे दळण्यासाठी जाते असते व भात सडण्यासाठी उखळ असते.

अन्न, वस्त्र व निवाऱ्याच्या स्थितीवरून आदिवासींची पराकोटीची गरिबी दिसून येते. अलिकडे सरकारच्या मदतीमुळे अनेकांच्या घरावर मंगलोरी कौले दिसू लागली आहेत. काही घरे सिमेंट, विटा, यांत बांधलेलीही आढळतात. बहुतेक गावांना-वीजपुरवठा झालेला आहे. परंतु काहींच्या घरातच वीज आढळते. इतर आदिवासी गरिबीमुळे आजही अंधारातच आहेत. ज्यांच्या घरात वीज आहे त्यांना फक्त उन्हाळ्यातच काही तास वीज मिळते. इतर कालावधीत त्यांच्याकडेही अंधकारच असतो. रात्री उजेडासाठी ते रॉकेलचा दिवा किंवा चिमणी वापरतात.

वरील परिस्थिती विचारात घेता आदिवासींच्या दारिद्र्याचे वर्णन करण्यास शब्दांचेच दारिद्र्य जाणवेल इतके भयाण, भेसूर, आयुष्य ते जगतात.

***

संदर्भः –

१) डॉ. गारे गोविंद - सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी, आदिम साहीत्य, पुणे. पृ. २५,३०

२) कित्ता, पृ. ५०, ३२

३) नारगोलकर कुसुम- जंगलचे राजे, मौनी विद्यापीठ प्रकाशन, गारगोटी, १९५५ पृ. नं. १७

४) डॉ. घुर्ये जी. एस.- महादेव कोळीः ए शेडुल्ड ट्राईब, पॉप्युलर बुक डेपो, १९५७ पृ. नं. ४,५

५) भारतीय संस्कृती कोश - महादेव शास्त्री जोशी, पृ. ५७४

६) डॉ. घुर्ये जी. एस. - पूर्व चर्चित, पृ. ८

७) डॉ. गारे गोविंद - पूर्व चर्चित, पृ. ४०,४१

८) नाडगोंडे गुरुनाथ - भारतीय आदिवासी, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, पृ. १३७, १४७

९) गॅझेटीयर ऑफ दी बॉम्बे प्रेसिडेन्सी, व्हा. नं. १७, अहमदनगर, पृ. १९

१०) डॉ. घुर्ये जी. एस.- पूर्व चर्चित, पृ. ९

११) डॉ. गारे गोविंद - पूर्व चर्चित, पृ. ६०

१२) डॉ. पिचड नलिनी- आदिवासींचे शिक्षण, पृ.१८

१३) नारगोलकर कुसुम - जंगलचे राजे, मौनी विद्यापीठ प्रकाशन, गारगोटी, १९५५ पृ. २०

१४) गॅझेटिअर ऑफ ठाणे जिल्हा

१५) गॅझेटिअर ऑफ बॉम्बे प्रेसिडेन्सी (पुणे, अहमदनगर, ठाणे आणि नाशिक)

१६) डॉ. घुर्ये जी. एस - द. महादेव कोळी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. ९७-१००

१७) डॉ. गारे गोविंद - पूर्व चर्चित, पृ. १५०,१५४

प्रकरण तिसरे

संशोधनाचे महत्व, उद्दिष्ट्ये, आणि संशोधन पध्दती

३.१	प्रस्तावना	९१
३.२	संशोधनाचे स्वरुप व व्याप्ती	९२
	३.२.१ संशोधन संकल्पना व अर्थ	९३
	३.२.२ व्याख्या	९४
	३.२.३ संशोधनाची वैशिष्ट्ये	९५
३.३	संशोधनाचे प्रकार	९६
३.४	संशोधनाचे महत्व	९९
३.५	सामाजिक संशोधनाचे महत्व	९९
३.६	आदिवासी संशोधनाचे महत्व	१०४
	३.६.१ आदिवासी संशोधनाची उद्दिष्ट्ये	१०७
	३.६.२ संशोधनाची गृहीतके	१०८
३.७	संशोधन पध्दती	१०९
३.८	संशोधनाची व्याप्ती	११२
३.९	संशोधनावरील मर्यादा	११२
	संदर्भ (References)	११३

प्रकरण तिसरे

संशोधनाचे महत्व, उद्दिष्ट्ये, आणि संशोधन पध्दती

३.१ प्रास्ताविक

'गरज ही शोधाची जननी आहे.' मानवाच्या अमर्याद गरजांमुळे संशोधनाचा पाया घातला गेला. मानवाच्या उत्क्रांतीबरोबरच अनेक समस्या निर्माण झाल्या. त्या समस्यांचे निराकरण करण्याचे कार्य संशोधनाने केले आहे. संशोधन ही गतीमान समाजाची अत्यंत महत्वाची अशी संकल्पना आहे. संशोधनाच्या साह्याने माणसाने पाषाण युगापासून ते आजपर्यंतच्या माहिती-तंत्रज्ञान व जैवतंत्रज्ञान युगापर्यंतचा प्रवास केलेला आहे. संशोधनाचा हा प्रवास मानवी समाजाने अजून आधुनिक प्रगतीसाठी, फलिते, उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी थांबविलेला नाही. ज्ञानाचा महासागर हा खोलातील खोल समुद्राप्रमाणे आहे. की ज्याची खोली ही माहिती नाही. माणूस हा अधिक खोलातील खोलात जाऊन त्या खोलीचा शोध घेण्याचा सतत प्रयत्न करीत आहे.

'संशोधन करणे' हे एक शोध कार्य आहे. त्या संशोधनाचे स्वरूप अगदी शुल्लक असो, किरकोळ असो, की मोठ्या स्वरूपाचे गुंतागुंतीचे असो! जगाच्या प्रगतीचा, आधुनिक सुधारणेचा, मूळ स्त्रोत संशोधन हाच आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान, खगोलशास्त्र, अभियांत्रिकी, वैद्यकीयशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, यांच्यात लागलेल्या शोधांमुळे जगाचे स्वरूप पालटले आहे. त्यांच्या जोडीला सामाजिक शास्त्रांतील संशोधनाला देखील गती मिळाली आहे. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, भाषाशास्त्र, राज्यशास्त्र व इतिहास इत्यादी विषयांमध्ये अलिकडे संशोधनाचे महत्व वाढले आहे आणि ते वाढतच राहणार आहे.

आधुनिक अर्थव्यवस्थेत संशोधन करणे हा प्रत्येक घटकाचा अत्यंत महत्वाचा भाग बनला आहे. आधुनिक क्षेत्रात प्रत्येक समाजात, प्रत्येक क्षेत्रात, प्रत्यक्षातील यश मिळविण्यात संशोधनाचा मोलाचा वाटा आहे. प्रशासक, व्यवस्थापक, व्यापारी, उद्योगपती, समाजशास्त्रज्ञ, वैज्ञानिक, प्रसारमाध्यमे, बाजार संघटना, सरकार, बिगर सरकारी संघटना, सल्लागार कंपन्या, रुग्णालये, बँका, विमा कंपन्या, व्यापारी संस्था, कायदेविषयक संस्था, शैक्षणिक संस्था हे सर्व घटक वेगवेगळ्या प्रकारचे संशोधन करीत असतात.

वरील पैकी कोणताही घटक हा पुरेशा आधुनिक कल्पना आणि सद्यःस्थितीतील संशोधन याशिवाय प्रगती करू शकत नाही हे सत्य आहे.

३.२ संशोधनाचे स्वरूप

संशोधन ही संज्ञा इंग्रजीतील '*Research*' या संज्ञेची पर्यायवाची संज्ञा म्हणून वापरली जाते. इंग्रजीतील '*Research*' या शब्दाचा अर्थ चौकशी अथवा शोध असा आहे. संशोधन या शब्दाला हिंदीमध्ये 'अनुसंधान' तर संस्कृत मध्ये 'परिशिलन' असे म्हटले जाते. एखाद्या विषयाची काळजीपूर्वक सखोल चौकशी करून काही तथ्ये शोधून काढणे म्हणजे संशोधन होय.

मनुष्य हा स्वभावतःच जिज्ञासू आहे. जेव्हा एखादी अपरिचित, अज्ञात अशी वस्तू किंवा गोष्ट माणसाच्या नजरेस पडते तेव्हा त्याला त्याबद्दल जिज्ञासा वाटते. त्याची जिज्ञासू वृत्ती त्याला स्वस्थ बसू देत नाही. त्या वस्तूचा शोध घेऊन तिच्याविषयी जास्तीत-जास्त माहिती मिळविण्याचा तो सतत प्रयत्न करतो. मानवाने आपल्या बुध्दीच्या जोरावर सतत नवीन गोष्टी उलगडून दाखविल्या आहेत. तेथूनच शोध प्रक्रिया सुरु झाली. प्रथमता निसर्गातील रहस्याचे शोध सुरु झाले आणि तेथून संशोधन ही बौध्दिक प्रक्रिया सुरु झाली. बौध्दिक प्रक्रियेच्या मुळाशी मानवाची जिज्ञासू वृत्ती असते. मानवाच्या विकासाबरोबरच वेगवेगळ्या समाजांची निर्मिती झाली. त्या समाजांच्या आंतर-संबंधातून सामाजिक संबंध प्रस्थापित झाले. माणूस आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधाची विचार प्रणाली निर्माण झाली. वेगवेगळ्या तथ्यांचा शोध घेण्याची अथवा त्या तथ्यांची सखोल चौकशी करण्याची बौध्दिक प्रक्रिया सामाजिक शास्त्रांत सुरु झाली. संशोधनात विविध प्रकारची माहिती गोळा केली जाते. त्या उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून त्यावरून तपशीलवार निष्कर्ष काढले जातात. त्या निष्कर्षातून नवीन तर्क किंवा सत्य शोधले जाते.

मानवाच्या जिज्ञासू वृत्तीमुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. तर्काच्या साह्याने तो ते प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतो. ज्याप्रमाणे पृथ्वीचा आकार कसा आहे? आकाशात विजा का चमकतात? विषुववृत्तावर अधिक पाऊस का पडतो? ऋतुंमध्ये बदल का होतात? अग्निची निर्मिती कशी होते? आरोग्याचे प्रश्न का निर्माण होतात? वेगवेगळ्या ठिकाणचे मानवी वर्तन हे वेगवेगळे का असते? जगात विविध वंशाचे लोक का आढळतात? वेगवेगळ्या देशांचे हवामान हे वेगवेगळे का असते? खनिजांची निर्मिती कशी झाली? समुद्र, सरोवरे, पर्वत, पठारे, मैदाने, नदी, नाले यांची निर्मिती कशामुळे झाली? विश्वाची उत्पत्ती कशी झाली? पृथ्वी, सुर्य, चंद्र, तारे

यांची रचना कशी आहे? सिमला, कुलू, मनाली, उटकमंड, माथेरान, महाबळेश्वर ही ठिकाणे इतर ठिकाणांपेक्षा थंड का आहेत? दिवस व रात्र आलटून पालटून का येतात? वेगवेगळ्या ग्रहांवर सजीव सृष्टी असेल का? भारत, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ, ब्रम्हदेश यासांरख्या आशियाई तसेच आफ्रिकन देशांत दारिद्र्याचे प्रमाण अधिक का आहे? व्यापारत तेजी, मंदी का निर्माण होते? यासारख्या असंख्य प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न मानवाने सातत्याने केला आहे व करीत आहे. त्यातही मानवी हिताच्या आड येणाऱ्या समस्या सोडविणे व सर्वांगीण प्रगतीसाठी उपयोगी पडणाऱ्या नवीन गोष्टी शोधून काढण्याचा प्रयत्न अधिक जोमाने केला जातो आहे.

३.२.१ संशोधन संकल्पना व अर्थ

संशोधन ही संकल्पना अभ्यासविषयक जागृती पेक्षाही मानवी मनातील अत्यंत जूनी अशी कल्पना आहे. माणूस सर्वकषपणे आपल्या इतिहासाकडे पाहत असतो म्हणजेच तो त्याच्या प्रगतीचे, विकासाचे, उत्क्रांतीचे सिंहावलोकन करीत असतो. त्याचे कारण म्हणजे त्याची सद्यःस्थितीतील अवस्थेपर्यंतची उत्क्रांती कशा प्रकारे झाली आहे. ते पाहण्यासाठी तो भूतकाळात घडलेल्या चांगल्या व वाईट घटनांचे सतत पुनर्परिक्षण करीत असतो. भुतकाळाकडून बोध घेऊन वर्तमान काळात अधिक काळजीपूर्वक व अधिक वैज्ञानिक दृष्टीने बौध्दिक प्रयत्नांना दिशा देण्याचे तो कार्य करतो. संशोधन ही संकल्पना मानवी प्रयत्नांशी अत्यंत निकट संबंधित अशी संकल्पना आहे. ती म्हणजे मानवी इतिहासाच्या वेगवेगळ्या अवस्थेतील उत्क्रांती, वातावरण, विकास व वृध्दी अधिक-अधिक समजण्यासाठी.

मानवाने भूतकाळात अभ्यासविषयक संशोधनाचा अखंडितपणे पाठपुरावा केला आहे. त्याचे दोन हेतू किंवा उद्देश आहेत. पहिला हेतू म्हणजे बौध्दिक उकल करणे आणि दुसरा हेतू म्हणजे नवीन सिध्दांत प्रस्थापित करणे. आजच्या गतीमान मानवी इतिहासाचे रहस्य हे संशोधनात दडलेले आहे. मानवाने आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, वैज्ञानिक व मानववंशशास्त्रीय अशी चौफेर प्रगती केली आहे.

प्रसिध्द ग्रीक तत्ववेत्ते सॉक्रेटीस, प्लेटो व ॲरिस्टॉटल यांनी माणूस व समाज यांच्यातील संबंधाचे संशोधनाच्या साह्याने विश्लेषण करून नवीन विचार मांडले, संकल्पना मांडल्या, त्यांचा विकास केला आणि तत्वज्ञानाला एक वेगळी दिशा दिली. रोमन संस्कृतीने कायदेशीर सामाजिक संघटनाच्या साह्याने पध्दतशीर विकासास मदत केली. गॅलिलिओ, न्युटन यांनी वैज्ञानिक

संशोधन करून बौद्धिक प्रक्रियेचा विकास केला. १६व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत जगात अनेक सामाजिक विचारवंतांनी संशोधनाच्या माध्यमातून आपला प्रभाव पाडला. त्या बुध्दीवंतामध्ये सर थॉमस मूर, सर फ्रान्सीस बेकन, थॉमस हॉब्ज, रूसो, व्हॉल्टेअर, मॉन्टेस्क्यू यांचा समावेश होतो.

आधुनिक सामाजिक शास्त्रांतील संशोधनात, विचारांत युरोप व अमेरिकेतील औद्योगिक क्रांतीचा समावेश केला जातो. 'ॲडम स्मिथने' 'राष्ट्राची संपत्ती' (*Wealth Of Nations*) हा ग्रंथ लिहून अर्थशास्त्राला एक स्वतंत्र शास्त्र म्हणून एक वेगळी ओळख निर्माण करून दिली. त्याने व त्याच्या अनुयायांनी सनातन अर्थशास्त्राचा पाया घातला. 'लॉर्ड केन्सने' १९३६ मध्ये "रोजगार, व्याज व पैसा यांचा सर्वसाधारण सिध्दांत" हा ग्रंथ लिहून स्थूल अर्थशास्त्राला महत्व प्राप्त करून दिले व नवसनातन अर्थशास्त्रीय विचारसरणी रुढ केली. प्रसिध्द तत्ववेत्ता, अर्थतज्ञ 'कार्ल मार्क्स' यांनी इतिहासाची भौतिकवादी मिमांसा करून साम्यवादाचा पाया रचला. १९ व्या शतकाच्या मध्यात चार्लस् डार्विनने उत्क्रांतीवादाचा सिध्दांत मांडून जगात बौद्धिक क्रांती घडवून आणली. तसेच २० व्या शतकातील सर्वोत्कृष्ट शास्त्रज्ञ डॉ. अल्बर्ट आईनस्टाईन यांनी अणुतंत्रज्ञानात क्रांती केली. मध्ययुगात संशोधन या संकल्पनेने सामाजिक शास्त्रीय शोध किंवा चौकशीस आकार दिला. तर आधुनिक युगात या बौद्धिक संकल्पनेचा झपाट्याने विकास झाला.

जे अज्ञात आहे ते ज्ञात करून घेणे. जे उपलब्ध नाही ते उपलब्ध करून देणे अथवा एखादा नवा सिध्दांत मांडणे, नवे तत्व शोधून काढणे किंवा एखादे रहस्य उलगडून दाखवणे असा संशोधनाचा अर्थ विचारात घेतला जातो. संशोधन ही संकल्पना शास्त्रीय चिकित्सेचा विकास करते. अनेक शास्त्रीय निरिक्षणे आणि उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी संशोधन ही संकल्पना उपयोगी पडते.

३.२.२ संशोधनाच्या व्याख्या

अनेक तज्ञांनी संशोधनाच्या व्याख्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे.

अ) "जिज्ञासू वृत्तीने एखाद्या प्रश्नाची सत्यन्वेषी भूमिकेवरून चिकित्सा करून अंतिम अथवा निर्णायक उत्तर शोधण्याची अथवा तथ्य निर्माण करण्याची जी पध्दती असते तिला संशोधन असे म्हणतात."

ब) "संशोधन म्हणजे काळजीपूर्वक केलेली चिकित्सक तपासणी अथवा परीक्षण होय."

इंग्रजीमध्ये शास्त्रज्ञांनी संशोधनाच्या केलेल्या काही व्याख्या खाली नमूद केल्या आहेत.

क) *John Best – "Research is a more systematic activity directed towards discovery and the development of an organised body of knowledge."*

ड) *Clifford woody – "Research is a careful enquiry or examination in seeking facts or principles a deligent investigation to assertain something."*

इ) *Whitney – "Research includes a study of human group relationship."*

३.२.३ संशोधनाची वैशिष्ट्ये

संशोधनाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. महत्वाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे.

१) तत्वांची किंवा मुल्यांची पध्दतशीर आणि नि:पक्षपातीपणे व काळजीपूर्वक चौकशी करणे म्हणजे संशोधन होय.

२) संशोधनात तथ्यांची हेतूपुर्वक चौकशी केली जाते. हेतूंचे वर्णन केले जाते तसेच त्यांच्या आंतर-संबंधाचे विश्लेषण केले जाते.

३) संशोधनात वैज्ञानिक पध्दती वापरली जाते.

४) संशोधन हे निरीक्षणीय अनुभव व अनुभवावर व प्रयोगावर आधारित प्रसंग यावर आधारित असते.

५) संशोधन हे योग्य प्रश्नांची उत्तरे आणि समस्या व त्यांचे उपाय यांच्याशी प्रत्यक्ष संबंधित असते.

६) संशोधन हे तत्वे व सिध्दांत यांचा विकास करून सामान्य विधान करण्यावर भर देते.

७) संशोधनाचा उद्देश हा फक्त उत्तरे शोधणे नसतो तर पुन्हा-पुन्हा पडताळणी करून गुणविवेचण करणे हा असतो.

३.३ संशोधनाचे प्रकार

सर्व प्रकारच्या अत्याधुनिक विकासाचे रहस्य हे वेगवेगळ्या प्रकारच्या संशोधनात दडलेले आहे. विविध क्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारचे सतत संशोधन चालू असते. संशोधनाच्या सर्वसाधारण स्वरुपानुसार संशोधनाचे काही ठळक प्रकार आढळून येतात. ते प्रकार थोडक्यात पुढील प्रमाणे.

अ) संशोधनाचे प्रमुख प्रकार

संशोधनाची विभागणी प्रामुख्याने चार गटात केली जाते.



वरील प्रत्येक क्षेत्राचे संशोधनात वेगळे स्थान आहे. या प्रकारांमुळे प्रत्येक क्षेत्राचा योग्य व सखोल अभ्यास करता येतो व त्या संशोधनाचा फायदा त्या क्षेत्राला अधिक होतो. वरील चार प्रकारांव्यतिरिक्त संशोधनाचे पुढील इतर प्रकार पडतात.

ब) संशोधनाचे इतर प्रकार

१) पायाभूत संशोधन

पायाभूत संशोधन म्हणजे एखादे रहस्य उलगडून दाखविणे. या प्रकारच्या संशोधनात कोणतेही जाणीव पूर्वक उद्दिष्ट ठेवले जात नाही. एखाद्या शास्त्रज्ञाने जिज्ञासेने केलेले शोधकार्य म्हणजे पायाभूत संशोधन होय. या पायाभूत/मूलभूत संशोधनाचा उद्देश हा एखादा सिध्दांत जगापुढे मांडणे हा असतो. नैसर्गिक शास्त्रे (पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र) मूलभूत संशोधनाच्या पायावर आधारलेली असतात. जगामध्ये जे मोठेमोठे शोध लागलेले आहेत, त्यांचा पाया याच प्रकारच्या संशोधनावर आधारित आहे. उदा. न्युटनचा गुरुत्वाकर्षणाचा नियम, दूरध्वनीचा शोध,

तारायंत्राचा शोध इत्यादी. आपल्या संशोधनाचा व्यवहारात कितपत उपयोग होईल याची काळजी मूलभूत संशोधक करीत नाहीत.

२) व्यवहारोपयोगी संशोधन

व्यवहारोपयोगी संशोधनात पायाभूत संशोधनात लागलेल्या शोधांचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग केला जातो. या प्रकारच्या संशोधनाचा मूळ उद्देश हा एखाद्या महत्वाच्या प्रश्नाची सोडवणूक करणे हा असतो. जसे आपल्या देशात दिवसेंदिवस पडणाऱ्या पावसाचे प्रमाण कमी-कमी होत आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा, शेतीला करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. ही आजची प्रमुख समस्या आहे. तसेच दिवसेंदिवस वीजटंचाईची समस्या वाढत आहे. आदिवासींचे कुपोषण, बालमृत्यू यांचे प्रमाणही उपाययोजना करूनही कमी होत नाही. हे आजच्या घडीला महाराष्ट्रा समोर प्रमुख प्रश्न आहेत. हे प्रश्न कशाप्रकारे सोडविता येतील? हे शोधण्याचे कार्य व्यवहारोपयोगी संशोधन करणारा संशोधक करीत असतो. अलीकडील काळात व्यवहारोपयोगी संशोधनाचे कार्य दिवसेंदिवस वाढत आहे.

३) वर्णनात्मक संशोधन

या प्रकारच्या संशोधनात सत्यशोधनासाठी जी माहिती गोळा केली जाते अथवा चौकशी केली जाते त्याचा समावेश होतो. एखाद्या गोष्टींची, प्रसंगाची अथवा घटनेची सद्यस्थिती काय आहे याचे सविस्तर वर्णन केले जाते. या प्रकारच्या संशोधनात संशोधक काय घडले आहे व काय घडत आहे याची नोंद घेण्याचे कार्य करतो. ज्याप्रमाणे लोकांना कोणत्या गोष्टी आवडतात. ते कोणत्या प्रकारच्या उपभोग्य वस्तूंची जास्त प्रमाणात खरेदी करतात इत्यादीचा समावेश होतो.

४) विश्लेषणात्मक संशोधन

या प्रकारच्या संशोधनात संशोधकाला जी माहिती उपलब्ध झालेली असते त्या माहितीचे फक्त वर्णनच केले जात नाही. गोळा केलेल्या माहितीचे काटेकोरपणे व चिकित्सकपणे मूल्यमापन केले जाते. स्पष्टीकरण करून काही नवीन सत्ये उजेडात आणण्याचा प्रमुख हेतू या प्रकारच्या संशोधनात असतो.

५) गुणात्मक संशोधन

या प्रकारच्या संशोधनाचा प्रमुख हेतू हा एखाद्या घटनेमागील किंवा वर्तनामागील प्रेरणा काय असेल ते शोधणे हा असतो. उदा. तरुणांमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढत असेल तर त्या मागची कारणे काय आहेत? एखादी गोष्ट लोकांना का आवडते किंवा का आवडत नाही याचे संशोधन गुणात्मक संशोधन करणारा संशोधक करीत असतो.

६) संख्यात्मक संशोधन

या प्रकारच्या संशोधनात संख्यामापन केले जाते. घडणाऱ्या घटनांची सांख्यिकीय नोंद केली जाते. एखादी घटना किती वेळा घडते, किती प्रमाणात घडते याची नोंद केली जाते. उदा. कांदा किंवा बटाट्याच्या भावातील चढउतार, महाराष्ट्रातील एखाद्या शहरात पडणाऱ्या पावसाची नोंद ठेवणे इत्यादी. या प्रकारच्या संशोधनात संख्येला, आकडेवारीला महत्व असते.

७) अनुभवाधिष्टीत संशोधन

हे संशोधन अनुभव, निरीक्षण यावर आधारित असते. या प्रकारात गोळा केलेल्या माहितीचा पडताळा प्रयोग अथवा निरीक्षण करून केला जातो. म्हणून या संशोधनास प्रायोगिक संशोधन असेही म्हणतात. यामध्ये संशोधक प्रथम एखाद्या उपसिध्दांतापासून सुरवात करतो. तो उपसिध्दांत सिध्द करण्याचा प्रयत्न करतो. एखाद्या गोष्टीचा दुसऱ्या एखाद्या गोष्टीवर खरोखर परिणाम होतो किंवा नाही हे पाहण्यासाठी अशा प्रकारचे संशोधन उपयोगी पडते.

८) ऐतिहासिक संशोधन

ऐतिहासिक संशोधन हे भूतकाळातील नोंदी व माहितीवर आधारित असते. भूतकाळात एखाद्या संस्थेचा विकास कसा झाला आहे. एखादी चळवळ कशी विकसित झाली. एखादी पध्दत कशी रुढ झाली. याचा अभ्यास या संशोधनात केला जातो. या संशोधनात भूतकाळात घडलेल्या घटनांचा संबंध हा वर्तमानकाळातील व भविष्य काळातील घटनांशी जोडला जातो. इतिहासकालीन घटनांच्या आधारे वर्तमानकालीन व भविष्यकालीन ध्येयधोरणे ठरविण्यासाठी या संशोधनाचा उपयोग होतो.

वरील प्रकारच्या संशोधनांनी त्या-त्या क्षेत्रात मोलाची भर घातली आहे.

३.४ संशोधनाचे महत्व

प्रगतीचा जन्म हा चौकशीतून झाला आहे. "संशय किंवा शंका ही अनाठायी आत्मविश्वासापेक्षा केव्हाही चांगली असते. कारण ती आपल्याला चौकशीच्या दिशेने नेते आणि त्याच चौकशीचे शोधात रुपांतर होते." हे 'हडसनचे' प्रसिध्द सुत्र आहे. जे संशोधनाचे महत्व चांगल्या प्रकारे विशद करते. संशोधनाचा वाढता आलेख प्रगतीला उंचावत नेतो. संशोधन शास्त्रीय दृष्टीकोनातून आणि परिस्थितीशी साधर्म्य ठेऊन विचार करण्यास कारणीभूत ठरते.

आधुनिक काळात व्यवहारोपयोगी अर्थशास्त्राच्या वेगवेगळ्या क्षेत्रात म्हणजेच उद्योग, व्यापार किंवा संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या संदर्भात संशोधनाच्या भूमिकेत लक्षणीय वाढ झाली आहे. आपल्या आर्थिक पध्दतीत संशोधन हे सरकारला धोरणात्मक पाया तयार करून देते. सरकार अंदाजपत्रकाच्या माध्यमातून लोकांच्या गरजा व इच्छा पूर्ण करण्यासाठी करावा लागणारा खर्च आणि अपेक्षित उत्पन्न यांच्यात मेळ घालीत असते. त्यासाठी संशोधनाचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. सरकारला अनेक धोरणे ठरवावी लागतात, निर्णय घ्यावे लागतात. चलनविषयक धोरण, वित्तीय धोरण, आयात-निर्यात धोरण, देशातील शेतकऱ्यांचे प्रश्न, लघुउद्योग, मोठे उद्योग, त्यांच्या असणाऱ्या समस्या, कामगार संघटनांची भूमिका, उत्पादनात येणाऱ्या अडचणी, वितरणातील समस्या, विक्री समस्या अशा इतर अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी संशोधनाचा उपयोग होतो.

जगातील प्रगत देशांचा विकास हा त्यांनी विविध क्षेत्रात केलेल्या संशोधनातूनच झालेला आहे. जपान व जर्मनीने दुसऱ्या महायुध्दात उध्वस्त होऊनही संशोधनाच्या माध्यमातून अल्पावधीतच आपली प्रगती घडवून आणली. इस्त्राईलसारख्या देशाचा बहुतेक भाग वाळवंटी असूनही त्या देशातील लोकांनी सतत नव-नवे प्रयोग करून, नवीन शोध लावून आपल्या देशाला प्रगत बनविले आहे.

थोडक्यात मानवाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व वैज्ञानिक प्रगतीत संशोधनाचे महत्व हे अनन्य साधारण असे आहे.

३.५ सामाजिक संशोधनाचे महत्व

सामाजिक संशोधनाचा संबंध हा लोकसमूहाच्या अभ्यासाशी येतो. समाजात संशोधनाचे महत्व फार मोठे आहे. विज्ञान किंवा शास्त्रीय संशोधनामुळे नवीन वस्तू किंवा बाबींची माहिती

होते. त्या वस्तू प्रत्यक्ष व्यवहारात उपयोगात आणल्या जातात. परंतु सामाजिक संशोधनाचे महत्व वेगळे आहे. समाजात कोणत्याही गोष्टीचे संशोधन करताना त्यापासून मानवाला भौतिक लाभ मिळतो. सामाजिक संशोधन हे ज्ञानवृध्दी करणे, जून्या ज्ञानाचे परीक्षण करणे या उद्देशाने केले जाते. त्यामुळे सामाजिक संघटन, सामाजिक प्रक्रिया, सामाजिक अवस्था, इत्यादी संबंधाचे आपले ज्ञान विकसित होते व त्याचा फायदा समाजाला मिळतो.

संपूर्ण जगाच्या दृष्टीने विचार करता जगात विविध प्रकारचे लोकसमूह आढळतात. त्या प्रत्येक लोकसमूहाची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, अनुवांशिक, धार्मिक, शारीरिक गुणवैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत. देशपरत्वे, स्थानानुसार, हवामानानुसार तसेच रुढी व परंपरेनुसार प्रत्येक समाजाच्या गरजा या वेगवेगळ्या आहेत. प्रत्येक लोकसमूहाचे प्रश्न वेगळे आहेत. वेगवेगळ्या लोकसमूहाचे असणारे आंतर-संबंध, आंतरक्रिया वेगवेगळ्या आहेत. प्रत्येक लोकसमूहाचा आर्थिक व सामाजिक स्तरही एकसारखा नाही. त्यामुळे संपूर्ण मानव जातीच्या विकासासाठी संशोधन महत्वाचे आहे.

भारतात अनेक धर्म, जाती व पंथाचे लोक राहतात. या सर्व जाती-धर्माच्या लोकांमध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक विषमता मोठ्या प्रमाणात आहे. तसेच आपला देश हा एक विकसनशील देश आहे. आपल्या देशाला विकसित बनवायचे असेल तर प्रत्येक लोकसमूहाचा चिरंतन विकास करण्याची गरज आहे. त्यासाठी प्रत्येक लोकसमूहाचे स्वतंत्ररित्या प्रश्न समजावून घेऊन त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. जगातील विकसित देशांच्या दृष्टीने विचार करता संशोधनाशिवाय आपल्या देशाचा विकास करणे अशक्य आहे. कारण विकसित देशांनी त्यांचा विकास सातत्याने नव-नवीन संशोधन करून केलेला आहे.

सामाजिक संशोधनाचे महत्व पुढील मुद्दयांच्या आधारे अधिक सविस्तरपणे स्पष्ट करता येते.

१) सामाजिक कल्याणासाठी मदत

सामाजिक पातळीवर विविध बाबींचा अभ्यास करताना कोणत्याही संशोधकाला किंवा संस्थेला वैज्ञानिक ज्ञान प्राप्त झाल्यास त्याचा फायदा समाजाला होतो. उदा. दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांच्या समस्या काय आहेत? त्यांच्या दारिद्र्य रेषेची कारणे कोणती आहेत? माहिती गोळा करून त्याचा शोध घेतल्यास दारिद्र्य रेषेखालील लोकांची समस्या

सोडविणे शक्य होईल. म्हणून सामाजिक कल्याणाच्या कार्यासाठी सामाजिक संशोधन करणे महत्वाचे आहे.

२) अज्ञानाचा नाश

ज्ञानामुळे अज्ञान दूर होते. जसे प्रकाशाशिवाय अंधार दूर होत नाही. त्याचप्रमाणे संशोधन केल्याशिवाय किंवा ज्ञान मिळविल्याशिवाय समाजातील अंधकार नष्ट होणार नाही. समाजातील कोणत्याही बाबींचे ज्ञान प्राप्त करून त्या ज्ञानाचा प्रसार केला पाहिजे. कारण समाजात अनेक प्रश्न अज्ञानामुळे निर्माण होतात. सामाजिक संशोधनामुळे संबंधित विषयाचे ज्ञान प्राप्त करून त्या विषयाबाबतचे अज्ञान दूर करता येते.

३) सिध्दांतिक उपयोगिता

समाजातील विविध घटक विचारात घेऊन त्यांचे वस्तूनिष्ठ पध्दतीने संशोधन केले तर समाजातील लोकांची ज्ञानवृध्दी होते. त्याच ज्ञानावर आधारित नवीन सिध्दांत मांडता येतात. त्यामुळे समाजाची योग्य दिशेने प्रगती होते. म्हणून सामाजिक संशोधन हे आवश्यक ठरते.

४) सामाजिक शास्त्रांचा विकास

सामाजिक शास्त्रांमध्ये मानववंशशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी शास्त्रांचा समावेश होतो. ही सर्वच शास्त्रे समाजाशी निगडित आहेत. ही शास्त्रे स्वतंत्र असली तरी त्यांचा परस्पर संबंध आहे. एका शास्त्राचा फायदा हा दुसऱ्या शास्त्राला होत असतो. या सर्व शास्त्रांचा मानवाशी संबंध असल्याने ही शास्त्रे विकसित झाली की समाज आपोआप विकसित होतो.

५) सामाजिक नियोजनाला उपयोग

सामाजिक नियोजनाला योग्य मार्गदर्शन करण्यासाठी सामाजिक संशोधनाचा उपयोग होतो. सामाजिक संशोधनामुळे नियोजनाला दिशा देता येते. समाजातील लोकसमूह विचारात घेऊन, त्यांच्या गरजा विचारात घेऊन देशातील साधन संपत्तीचा वापर कसा करावा याचे नियोजन करता येते. सामाजिक नियोजनासाठी आवश्यक माहिती प्राप्त झाल्यानंतर योग्य पध्दतीने नियोजन करता येते. या सर्व गोष्टींसाठी संशोधन उपयोगी पडते.

६) सामाजिक नियंत्रण ठेवण्यासाठी मदत

संशोधनातून मिळविलेल्या ज्ञानातून समाजावर नियंत्रण ठेवता येते. समाजातील समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय शोधता येतो व योग्य घटकांना न्याय देता येतो. समाजातील समस्यांचे स्वरूप गंभीर झाल्यास विघटन घडून येते व त्यावर नियंत्रण ठेवता येत नाही. सामाजिक संशोधन हे समाजावर नियंत्रण ठेवण्यास उपयोगी पडते. थोडक्यात संशोधनामुळे अधिक प्रभावीपणे सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करणे सहज शक्य होते.

७) सामाजिक प्रगतीला मदत

समाजात चांगल्या गोष्टी निर्माण करण्यासाठी केलेल्या परिवर्तनाला सामाजिक प्रगती असे म्हणतात. अशा प्रकारचे परिवर्तन हे समाजाकरिता कल्याणकारी असते. सामाजिक परिस्थितीचे खरे ज्ञान प्राप्त झाल्यास त्याचा सामाजिक विकासाच्या दृष्टीने अनुकूल परिणाम होतो. सामाजिक जीवनासंबधीच्या समस्या सोडविण्यासाठी आपल्या वैज्ञानिक ज्ञानाच्या आधारे प्रयत्न करणे महत्वाचे आहे. आपल्या कल्याणकारी प्रयत्नांना जोपर्यंत संशोधनाचा आधार दिला जात नाही तो पर्यंत सामाजिक प्रगती करणे अशक्य आहे.

अशा प्रकारे वरील मुद्यांच्या आधारे सामाजिक संशोधनाचे महत्व विशद करता येते. सामाजिक संशोधनाने सामाजिक प्रगती करता येते. समाज प्रगतीतूनच देशाचा विकास करणे शक्य आहे.

एखाद्या देशाचा आर्थिक विकास होतो आहे किंवा नाही, हे ठरविण्यासाठी काही अर्थतज्ञांनी आर्थिक विकासाचे निर्देशक घटक सांगितले आहेत. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथच्या मते, राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ हा आर्थिक विकासाचा महत्वाचा निर्देशक आहे. कार्ल मार्क्सच्या मते लोककल्याणात होणारी वाढ म्हणजे आर्थिक विकास होय. आर्थिक विकासाचे सर्वसाधारणपणे पुढील निर्देशक सांगता येतील.

१) **दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ** – दरडोई वास्तव उत्पन्नात वाढ हा आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. प्रो. फ्रायर यांच्या मते दरडोई वास्तव उत्पन्नावरून आर्थिक विकासाच्या स्तराचा अंदाज करता येतो.

२) **राहणीमानात वाढ** – राहणीमानातील वाढ ही दरडोई उत्पन्नाशी संबंधित असते. राहणीमानाची पातळी ही उपभोग पातळीवर अवलंबून असते. उत्पन्नात वाढ झाल्यास

उपभोग खर्च वाढून राहणीमानात वाढ होते. अमेरिकेतील 'ओव्हरसीज डेव्हलपमेंट कौन्सिल' ही संस्था 'राहणीमानाचा भौतिक गुणवत्ता निर्देशांक' तयार करते. त्यासाठी देशातील व्यक्तींचे सरासरी आयुर्मान, बालमृत्यचे प्रमाण, साक्षरता व इतर घटक विचारात घेऊन त्यांचे निर्देशांक तयार केले जातात. या घटकांच्या निर्देशांकात वाढ होत असेल तर राहणीमानात वाढ होते.

३) **जीवनावश्यक गरजांची पूर्तता** – एखाद्या देशात मोठ्या प्रमाणात दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता असेल तर जीवनावश्यक गरजांची पूर्तता करणे शक्य होत नाही. अन्नधान्याचा उपभोग, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, निवारा, वाहतूक व दळणवळण या सोयी सुविधांमध्ये वाढ होत असेल तर आर्थिक विकास होत आहे असे म्हटले जाते.

४) **आर्थिक कल्याणात वाढ** – आर्थिक कल्याण हा आर्थिक विकासाचा निर्देशक मानला जातो. आर्थिक कल्याणात उत्पादन अथवा उत्पन्नात वाढ, उपभोगात वाढ, उत्पन्नाचे न्याय वाटप, सुख सोयींमधील वाढ इत्यादी घटकांचा समावेश होतो. या घटकांत वाढ होत असेल तर आर्थिक कल्याणात वाढ होते व आर्थिक विकास होतो.

५) **लोकसंख्येच्या क्षेत्रवर विभागणीत बदल** – प्रो. फ्रायर यांनी लोकसंख्येच्या व्यावसायिक विभागणीतील बदल हा आर्थिक विकासाचा निर्देशक मानला आहे. प्राथमिक, व्दितीय, व तृतीय क्षेत्रात लोकसंख्येची झालेली विभागणी आणि विभागणीतील बदल यावरून आर्थिक विकासाची कल्पना येते. प्राथमिक क्षेत्रातील लोकांचे प्रमाण कमी होऊन द्वितीय व तृतीय क्षेत्रातील प्रमाण वाढत असेल तर ते आर्थिक विकासाचे द्योतक असते.

उपरोक्त आर्थिक विकासाचे निर्देशक घटक हे कोणत्याही समाजाच्या विकासास लागू पडतात. कारण समाजाच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून असतो. त्यासाठी भारतातील अत्यंत मागासलेल्या आदिवासी समाजाचा विकास करणे अत्यावश्यक आहे.

सुप्रसिध्द नोबेल पारितोषिक विजेते भारतीय अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांच्यामते दारिद्र्य व गरिबी ही उत्पनाच्या कमतरतेमुळे निर्माण होते तसेच क्षमतेच्या अभावामुळे ही निर्माण होत असते. त्यांच्या मते एखाद्या समाजाला रोजगार, शिक्षण, आरोग्य, सामाजिक सेवा सुविधा, सकस आहार, स्वच्छ पिण्याचे पाणी व निवारा या घटकांपासून जाणीव पूर्वक वंचीत ठेवले जात असेल तर तो समाज देश कितीही विकसित असला तरी मागासलेलाच राहतो.

अमेरिकेतील निग्रो लोकांना गोऱ्या लोकांनी वरील घटकांपासून वंचीत ठेवल्याने ते मागासलेलेच राहिले आहेत.

दारिद्र्य आणि उपरोक्त घटक यांच्यात एक निश्चित कार्यकारणभाव असतो. गरिबीमुळे वरील घटकांची दुर्मिळता निर्माण होते तर या घटकांअभावी दारिद्र्यात अजूनच भर पडते. त्यामुळे असे म्हटले जाते की, एखादा समाज गरीब आहे कारण तो, गरीब आहे. गरिबीचे कारण हे गरिबीच असते. हे एक दारिद्र्याचे दृष्ट चक्र आहे. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते एखाद्या समाजाला दारिद्र्यातून बाहेर काढायचे असेल तर वरील घटकांची उपलब्धता करून देणे आवश्यक आहे. एखाद्या समाजाला फक्त भौतिक सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या तर त्या समाजाच्या राहणीमानात सुधारणा होते परंतु जीवनमान सुधारत नाही. म्हणून जीवनमान सुधारण्यासाठी उपरोक्त घटकांत प्रगती होणे आवश्यक असते.

आर्थिक विकास ही संकल्पना फक्त दरडोई उत्पन्नाशी संबंधीत नसून अत्यंत व्यापक अशी संकल्पना आहे. मध्य पूर्वेतील खनिजतेल निर्यातदार देशांचे दरडोई उत्पन्न जास्त आहे परंतु त्या देशांचा समावेश हा विकसित देशांमध्ये तसेच विकसनशील देशांमध्येही केला जात नाही. त्यांचा समावेश अल्प विकसित देशांच्या गटात केला जातो. कारण त्या देशांत दरडोई उत्पन्न वगळता इतर आर्थिक विकासाच्या निर्देशक घटकांची कमतरता दिसून येते. त्यामुळे एखाद्या समाजाच्या किंवा देशाच्या आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्नांची गरज असते.

डॉ. अमर्त्य सेन यांच्या संशोधनास अनुसरून भारतातील आदिवासी समाजही अन्न, वस्त्र, निवारा, उत्पन्न, रोजगार, शिक्षण, आरोग्य, स्वच्छ पिण्याचे पाणी, व सामाजिक सेवा सुविधा यांच्यापासून वंचित आहे. त्यामुळे आदिवासींना दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोठ्या प्रमाणावर सामाजिक संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

३.६ आदिवासी संशोधनाचे महत्व

जगातील विविध देशात विविध प्रकारचे लोकसमूह दिसून येतात. बहुतेक देशात आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणात वास्तव्य करून आहेत. काळाच्या ओघात काही आदिवासी जमाती नष्ट होत आहेत. आधुनिक प्रगतीच्या दृष्टीने विचार करता किंवा प्रगत समाजाच्या दृष्टीने विचार करता ज्या-ज्या देशात आदिवासी जमाती राहतात, त्या सर्व जमाती आर्थिक व

सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या आहेत. त्याची कारणे देशपरत्वे वेगवेगळी आहेत. अमेरिकेतील रेड इंडियन, आफ्रिका खंडातील निग्रो, मध्यपूर्वेतील आदिवासी जमाती, भारतात आढळणाऱ्या अनेक आदिवासी जमाती, ऑस्ट्रेलियामध्ये असणारे आदिवासी या व इतर देशांतील सर्वच आदिवासी जमाती मागासलेल्या आहेत. जागतिक विकासाच्या दृष्टीने तसेच मानवी विकासाच्या दृष्टीने आदिवासी जमातींच्या प्रगतीत असणारे अडथळे शोधून ते दूर करण्यासाठी उपाययोजनांची आवश्यकता आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणात संशोधन करण्याची गरज आहे. जागतिक पातळीवर ज्या विविध देशात आदिवासी जमाती राहतात त्यांच्या जमातीनुसार असणाऱ्या समस्या वेगळ्या असल्याने प्रत्येक जमातीच्या विकासासाठी स्वतंत्रपणे संशोधनाची गरज आहे.

आदिवासी समाजाच्या अभ्यासाचे महत्व सामाजिक मानववंशशास्त्रज्ञांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. त्याच बरोबर समाजशास्त्रज्ञ, अर्थतज्ञ, इतिहासतज्ञ, राज्यकर्ते, प्रशासक, सामाजिक कार्यकर्ते, शैक्षणिक संस्था, आंतरराष्ट्रीय संघटना इत्यादी विविध थरातील व्यक्ती व संस्था आदिवासी जीवनाचे स्वरूप समजून घेऊन त्यांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करीत आहेत. सर्वांगीण दृष्टीने विचार करता त्यासाठी सविस्तरपणे संशोधन करण्याची गरज आहे.

इव्हान्स प्रिचर्ड म्हणतात- "आदिवासी समाजाच्या अभ्यासाने आधुनिक समाजाचे यथार्थ दर्शन घडू शकते. म्हणून प्रथमावस्थेत असलेल्या आदिवासी समाजाचे अध्ययन जाणीवपूर्वक करण्याची गरज आहे." आदिवासी हे नागर समाजापासून दूर डोंगरदऱ्यात, कडेकपारित, जंगलात राहत असल्याने त्यांच्या पर्यंत कोणतीही आधुनिक साधने पोहोचलेली नाहीत. अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, मर्यादित गरजा, तुटपुंजे उत्पन्न, यामुळे ते मागासलेले राहिले आहेत. आदिवासी समाजाच्या संशोधनाचे व्यवहारिक मूल्यही मोठे आहे. आदिवासींच्या विकासासंबंधी कोणतेही शासकीय धोरण अवलंबीताना आदिवासी जमातींविषयीची माहिती अत्यंत मोलाची ठरते. आदिवासींच्या परंपरा व रीतिरिवाज इत्यादींच्या अभ्यासानेच प्रशासकांना कोणत्याही धोरणाची अंमलबजावणी करता येऊ शकते. नवीन सुधारणा व प्रगत समाजाशी संपर्क यामुळे आदिवासी जीवन ढळवून निघत आहे. बदलत्या परिस्थितीशी मिळते-जुळते घेण्याची प्रवृत्ती कोणत्याही समाजात स्वाभाविक नसते. सर्व सामान्यपणे परिवर्तनविरोधीच मनोवृत्ती अधिक

प्रभावी असल्याचे दिसून येते. परंपरा व रीतिरिवाज अत्यंत निष्टेने पाळणाऱ्या आदिवासी समाजात सुधारणा कार्यवाहीत करताना प्रशासकांना अत्यंत जागरूक असण्याची गरज असते.

आदिवासींच्या अभ्यासाचे महत्व किती असते हे आफ्रिकेतील गोल्ड कोस्ट विभागातील 'अशांती' या आदिवासींनी निर्माण केलेल्या समस्यांवरून दिसून येते. या लोकांनी ब्रिटीश राज्यकर्त्यांविरूध्द बंड पुकारले होते. त्याचे कारण त्यांच्या धार्मिक भावना ब्रिटीश राज्यकर्त्यांनी नकळतपणे दुखावल्या होत्या. महाराष्ट्रातील वारली या आदिवासी जमातीत दारू पिण्याला धार्मिक महत्व आहे. विशेषता समारंभ प्रसंगी लहान थोरांचे दारूपान आवश्यक मानले जाते. अशा परिस्थितीत दारू बंदीचा कायदा कसा यशस्वी होईल? आदिवासी जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी संशोधन करून त्यांच्या जीवनाशी एकरूप होण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे त्यांच्याशी भावनिक बांधिलकी प्रस्थापित केली तरच ज्या सुधारणा घडवून आणावयाच्या आहेत त्यांचा ते स्विकार करतील.

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळातच ब्रिटीश राज्यकर्त्यांनी आदिवासी जमातीसंबंधी संशोधन करून त्यांच्या विकासासंबंधी प्रयत्न सुरु केले होते. स्वातंत्र्योत्तर काळातही केंद्र तसेच राज्य पातळीवर आदिवासींच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात येत आहेत. केंद्र सरकारमध्ये स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना करण्यात आली आहे. केंद्रीय तसेच राज्यस्तरीय पातळीवर आदिवासी विकासासाठी अनेक योजना राबविल्या जातात. महाराष्ट्र शासन विविध योजनांवर प्रतिवर्षी कोट्यावधी रुपये खर्च करते. तसेच देश पातळीवरही कोट्यावधी रुपये खर्च केले जातात. स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षात आदिवासींचा विकास ५० टक्केही झालेला नाही. अजूनही अनेक आदिवासी जमाती या विकासापासून वंचित आहेत व प्राथमिक अवस्थेतीलच जीवन जगत आहेत.

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी विकास विभागाकडे आदिवासींच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकासासाठी १९७५-७६ मध्ये आदिवासी उपयोजना सुरु केली. तसेच इतर अनेक योजनाही राबविण्यात येत आहेत. परंतु 'आदिवासींचा विकास' हा पुरेशा प्रमाणात झालेला नाही. राज्यात दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या लोकांत सर्वाधिक प्रमाण आदिवासींचे आहे. सर्वाधिक निरक्षरतेचे प्रमाण आदिवासींचे आहे. जन्मदर व मृत्युदरही जास्त आहे. अज्ञान, अंधश्रध्दा यांनी आदिवासी जीवन ग्रासलेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आजपर्यंतही आदिवासींच्या कुपोषण व बालमृत्यूचा प्रश्न सुटलेला

नाही. आधुनिक विकासासाठी ज्या योजना राबविण्यात येत आहेत त्या योजनांमुळे अगोदरच दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेल्या आदिवासींवर विस्थापीत होण्याची वेळ आली आहे. सरदार सरोवर प्रकल्प हे त्याचे महत्वाचे उदाहरण आहे. अशा योजनांमुळे अधिक-अधिक प्रश्न निर्माण होत आहेत. आदिवासी क्षेत्रात नक्षलवाद उफाळून आला आहे. त्याचे प्रमुख कारण आदिवासींच्या समस्यांकडे शासनाने केलेले दुर्लक्ष हे आहे.

आदिवासी दुर्गम प्रदेशात राहत असल्याने त्यांच्या पर्यंत दळणवळणाची साधने पोहोचलेली नाहीत. आरोग्याचे प्रश्न गंभीर आहेत. स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. व्यसनाधिनतेचे प्रमाण मोठे आहे. अनेक साथीच्या रोगांचा उद्‌भव वारंवार होत असतो. जमीन हे उपजिविकेचे प्रमुख साधन असले तरी त्यापासून मिळणारे उत्पन्न अत्यंत तुटपुंजे असते. त्यातही कधी अवर्षण तर कधी दुष्काळ अशी परिस्थिती असल्याने व इतरही रोजगाराची साधने उपलब्ध नसल्याने आदिवासी समाज हा दारिद्र्याच्या दुष्टचक्रात पुरता अडकलेला आहे.

अज्ञान व अंधश्रध्देमुळे आदिवासींना विकास योजनांचा लाभ घेता येत नाही. अनेक विकास योजना त्यांच्यापर्यंत पोहोचतही नाहीत. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा शासकीय अधिकारी घेतात. विकास योजनांवरील निधी मध्येच हडप केला जातो. या सर्व गोष्टींचा विचार करता सर्वांगीण आदिवासी विकासासाठी निःपक्षपातीपणे मोठ्या प्रमाणात संशोधन करण्याची गरज आहे.

३.६.१ संशोधनाची उद्दिष्टये

१) सह्याद्री विभागातील **'महादेव कोळी'** या आदिवासी जमातीचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

२) सह्याद्री विभागातील **महादेव कोळी** या आदिवासी जमातीस मिळालेल्या विविध आदिवासी विकास योजनांचा अभ्यास करणे.

३) आदिवासी विकास योजनांचा शेती उत्पादकतेवर झालेला परिणाम अभ्यासने.

४) आदिवासी विकास योजनांचा दरडोई उत्पन्नावर झालेला परिणाम अभ्यासने.

५) आदिवासी विकास योजनांचा उपभोग खर्चावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

६) आदिवासी विकास योजनांचा शैक्षणिक प्रगतीवर झालेला परिणाम अभ्यासने.

७) आदिवासी विकास योजनांचा आरोग्यावर झालेला परिणाम अभ्यासने.

८) सण, उत्सव, समारंभ, विधी इत्यादींच्या खर्चावर झालेला परिणाम अभ्यासने.

९) आदिवासी विकास योजनांचा स्त्री-पुरुषांच्या राहणीमान खर्चावर झालेला परिणाम अभ्यासने.

१०) आदिवासी विकास योजनांचा सामाजिक प्रगतीवर झालेला परिणाम अभ्यासने.

११) वरील सर्व घटकांचा विचार करून आदिवासींच्या एकूण गुणात्मक जीवनमानावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

१२) आदिवासींचे गुणात्मक जीवनमान सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

३.६.२ संशोधनाची गृहीतके

सह्याद्री विभागातील आदिवासी **'महादेव कोळी'** या जमातीचे आर्थिक व सामाजिक मागासलेपण हे अज्ञान, अंधश्रध्दा, निरक्षरता, बेकारी, व्यसनाधिनता, दारिद्र्याचे दुष्टचक्र यात दडलेले आहे. त्याचप्रमाणे आदिवासी विकास योजनांचा त्यांना लाभ घेता येत नसल्याने किंवा त्यांचे महत्व न कळल्याने किंवा योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचतच नसल्याने ते मागासलेले राहिलेले आहेत.

संशोधनासाठी पुढील गृहीतके निश्चित केली आहेत.

१) आदिवासी समाज आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेला आहे.

२) कोणत्याही समाजाचा गुणात्मक विकास हा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीत दडलेला असतो.

३) महाराष्ट्र शासनामार्फत आदिवासी जमातींसाठी अनेक विकास योजना राबविल्या जात असल्या तरी त्यांचा आदिवासींच्या विकासावर परिणाम झालेला नाही.

४) आदिवासी विकास योजना प्रभावीपणे राबविल्यास आदिवासी समाजाचा गुणात्मक विकास होतो.

वरील गृहीतके ही आदिवासी **'महादेव कोळी'** जमातीस तंतोतंत लागू पडतात. अलिकडे त्यांची शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगती हळूहळू होत आहे. महाराष्ट्र शासन त्यांच्या विकासासाठी ज्या उपाय-योजना करीत आहे, त्यांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास त्यांच्या विकासास मोठ्या प्रमाणात हातभार लागू शकेल.

३.७ संशोधन पध्दती

महाराष्ट्र राज्यात सह्याद्री विभागातील पर्वतरांगांमध्ये 'महादेव कोळी' या आदिवासी जमातीची लोकवस्ती आढळते. सह्याद्री विभागातील अहमदनगर, नाशिक, पुणे, ठाणे व रायगड या पाच जिल्ह्यांमध्ये 'महादेव कोळी' या आदिवासी जमातीची लोकवस्ती आहे. रायगड जिल्ह्यात या जमातीची लोकवस्ती कमी प्रमाणात आढळते. वरील पाचही जिल्ह्यांत **'महादेव कोळी'** या आदिवासी जमातीच्या दाट लोकवस्तीचा सलग पट्टा आढळून येतो. **'महादेव कोळी'** ही आदिवासी जमात आर्थिकदृष्ट्या मागासलेली असल्याने संशोधनासाठी या जमातीची निवड केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन हे फक्त सह्याद्री विभागातील आदिवासी **'महादेव कोळी'** या जमातीची संबंधित आहे.

संशोधनाच्या द्वितीयक सामग्रीसाठी (*Secondary Data*) आदिवासी विकास योजनांवरील महाराष्ट्र शासनाचे वार्षिक अहवाल, वार्षिक आदिवासी उपयोजना, आदिवासी संशोधन पत्रिका, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे वार्षिक अहवाल तसेच संदर्भ ग्रंथ, मासिके, त्रैमासिके, नियतकालिके, वृत्तपत्रे व इतर प्रकाशित व अप्रकाशित संदर्भ विचारात घेतले आहेत.

प्राथमिक सामग्री (*Primary Data*) मिळविण्यासाठी सह्याद्री विभागातील पुणे, अहमदनगर, नाशिक व ठाणे या चार जिल्हयांची निवड केलेली आहे. या चार जिल्ह्यांमधील जुन्नर, आंबेगाव, अकोले, इगतपुरी व मोखाडा या पाच तालुक्यांत **'महादेव कोळी'** या आदिवासी जमातीची दाट लोकवस्ती आढळते. त्यामुळे या पाच तालुक्यांची प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी निवड केलेली आहे. या पाच तालुक्यांतील ज्या गावांमध्ये १०० पेक्षा अधिक आदिवासी कुटूंबे राहतात अशी आदिवासी गावे संशोधनासाठी निवडलेली आहेत. सह्याद्री विभागातील पुणे, अहमदनगर, नाशिक व ठाणे या चार जिल्ह्यांतील तालुकानिहाय निवडलेली आदिवासी गावे खालीलप्रमाणे आहेत.

तक्ता क्र. ३.१
संशोधनासाठी निवडलेली आदिवासी गावे

जिल्हे	तालुके	गावे	
अहमदनगर	अकोले	१) कुमशेत	४) राजूर
		२) शिसवद	५) रतनवाडी
		३) शिळवंडी	६) टिटवी

तक्ता क्र. ३.१ पान क्र. १०९ वरून पुढे

नाशिक	इगतपुरी	१) अडसरे २) इंदोरे ३) काळुस्ते	४) सोनोशी ५) टाकेद ६) वासाळी
पुणे	जुन्नर	१) अंजनावळे २) आंबोली ३) गोद्रे	४) इंगळून ५) तांबे ६) तळेरान
	आंबेगाव	१) आहुपे २) जांभोरी ३) बोरघर	४) गोहे ५) शिनोली ६) तळेघर
ठाणे	मोखाडा	१) चिंचघर २) जोगलवाडी ३) खोडाळा	४) मोखाडा ५) पोशेरा ६) सुर्यमाळ

वरील तक्ता क्र. ३.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यांतील अकोले, इगतपूरी, जुन्नर, आंबेगाव व मोखाडा या पाच तालुक्यांतील आदिवासी बहुल अशी ३० गावे निवडलेली आहेत. निवड केलेल्या ३० गावांमधून प्रत्येकी १० व्यक्ती या प्रमाणे ३०० व्यक्तींची प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी निवड केलेली आहे. आदिवासी कुटुंबांची कौटुंबिक माहिती मिळविण्यासाठी सर्वप्रथम प्रत्येक गावातील ग्रामसेवक व तलाठी यांना भेटून गावातील कुटुंबांच्या नावनिहाय याद्या प्राप्त केल्या. त्या याद्यांवरून प्रत्येक गावातील एकूण आदिवासी कुटुंबे व कुटुंबप्रमुखांची नावे याची माहिती मिळविली. साध्या यादृच्छिक पद्धतीने (Random Sampling) आदिवासी कुटुंबांची नमुना निवड करून कुटूंबप्रमुखांकडून आवश्यक माहिती प्रश्नावलीद्वारे व मुलाखतीलद्वारे भरून घेण्यात आली आहे. प्राथमिक माहिती घेतलेल्या कुटुंबांमध्ये आदिवासी विकास योजनांचे लाभार्थी व बिगरलाभार्थी यांचा समावेश आहे.

आदिवासी विकास योजना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत राबविल्या जातात. अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यांत अनुक्रमे ए. आ. वि. प्र. कार्यालय राजूर, ता. अकोले, जि. अहमदनगर, ए. आ. वि. प्र. कार्यालय नाशिक, ता. व जि. नाशिक, ए. आ. वि. प्र. कार्यालय घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे व ए.आ.वि.प्र. कार्यालय जव्हार, ता. जव्हार, जि. ठाणे ही चार प्रकल्प कार्यालये कार्यरत आहेत. सर्वेक्षणासाठी निवडलेली गावे ज्या ए. आ. वि. प्र कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येतात त्या प्रकल्प कार्यालयाच्या प्रकल्प अधिकाऱ्यांकडून आदिवासी विकास योजना राबविताना कोणत्या आर्थिक,

सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व प्रशासकीय समस्या येतात याची माहिती मुलाखतीद्वारे घेतलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी भागात शासकीय आश्रमशाळा चालविल्या जातात. या आश्रमशाळांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत हातभार लावलेला आहे. शासकीय आश्रमशाळांची सद्यःस्थिती काय आहे हे जाणून घेण्यासाठी प्रत्येक तालुक्यातील एक आश्रमशाळा निवडलेली आहे. संबंधित आश्रम शाळेच्या मुख्याध्यापकांकडून मुलाखतीद्वारे माहिती घेतलेली आहे. प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी निवडलेल्या आश्रम शाळांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

१) शासकीय माध्यमिक आश्रमशाळा शिरपुंजे, ता. अकोले, जि. अहमदनगर.
२) शासकीय माध्यमिक आश्रमशाळा खेड, ता. इगतपूरी, जि. नाशिक.
३) शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सोमलवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे.
४) शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, गोहे बु.।।, ता. आंबेगाव, जि. पुणे.
५) शासकीय माध्यमिक आश्रमशाळा मोखाडा, ता. मोखाडा, जि. पुणे.

आदिवासी समाजातील लोकांची आर्थिक प्रगती व्हावी व त्यांच्या विविध गरजांची पुर्तता करता यावी यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना केली आहे. त्याचे मुख्यालय नाशिक येथे आहे. या महामंडळातर्फे आदिवासी भागात गाव पातळीवर आदिवासी विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांची स्थापना केलेली आहे. गावपातळीवरील सहकारी सोसायट्यांमार्फत म.रा.स.आ.वि. महामंडळाच्या विविध योजना राबविल्या जातात. आ.वि.का.स.सो. ची सद्यःस्थिति जाणून घेण्यासाठी प्रत्येक तालुक्यातील एक सहकारी सोसायटी निवडलेली आहे. त्या सहकारी सोसायट्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.

१) आ.वि.का.स.सो.लि. राजूर, ता. अकोले, जि. अहमदनगर.
२) आ.वि.का.स.सो.लि. वासाळी, ता. इगतपुरी, जि. नाशिक.
३) आ.वि.का.स.सो.लि. खामगाव, ता. जुन्नर, जि. पुणे.
४) आ.वि.का.स.सो.लि. शिनोली, ता. आंबेगाव, जि. पुणे.
५) आ.वि.का.स.सो.लि. मोखाडा, ता. मोखाडा, जि. पुणे.

वरील सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांकडून मुलाखतीद्वारे सह. संस्थांची सविस्तर माहिती घेतली आहे.

अशाप्रकारे आदिवासी विकास योजनांचे लाभार्थी बिगर लाभार्थी, प्रकल्प अधिकारी, आश्रमशाळांचे मुख्याध्यापक, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांचे पदाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून प्राथमिक माहिती (Primary Data) मिळविलेली आहे. त्यासाठी स्वतंत्र प्रश्नावल्या तयार केलेल्या आहेत.

३.८ संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधन महाराष्ट्रातील सह्याद्री विभागापुरते मर्यादित आहे. या विभागातील अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यांतील अकोले, इगतपुरी, जुन्नर, आंबेगाव व मोखाडा या आदिवासी बहुल तालुक्यांपुरते मर्यादित आहे. या तालुक्यांतील बहुसंख्य लोकसंख्या आदिवासी समाजाची असलेली गावे संशोधनासाठी निवडण्यात आली आहेत.

३.९ संशोधनावरील मर्यादा

सामाजिक शाखांतील कोणत्याही विषयावर संशोधन करताना अनेक मर्यादा पडतात. सह्याद्री विभागातील डोंगर रांगांमध्ये, दऱ्या-खोऱ्यांत व दुर्गम भागात आदिवासी समाज राहत असल्याने तसेच अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी व परंपरा यांचा पगडा अधिक असल्याने संशोधन करताना अनेक मर्यादा पडल्या आहेत.

१. प्रस्तुत संशोधन सह्याद्री विभागातील अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यांतील अकोले, इगतपुरी, जुन्नर, आंबेगाव व मोखाडा या आदिवासी बहुल तालुक्यांपुरते मर्यादित आहे.
२. सह्याद्री विभागातील सर्व आदिवासी कुटुंबांचा अभ्यास करणे शक्य नसल्याने साध्या यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवडण्यात आलेल्या कुटुंबांचाच समावेश करण्यात आला आहे.
३. प्रस्तुत संशोधन हे सह्याद्री विभागातील **'महादेव कोळी'** या आदिवासी जमाती पुरते मर्यादित आहे.
४. कोणत्याही संशोधकाचे निष्कर्ष हे त्याला मिळालेल्या माहितीवर व आकडेवारीवर अवलंबून असतात. आदिवासी व्यक्तींनी प्रामाणिकपणे व खरी माहिती दिली असेल तरच निष्कर्ष खरे ठरतील अन्यथा नाही.

संशोधनासाठी निवडलेल्या आदिवासी गावांची आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक स्थिती वेगवेगळी असल्याने मिळालेली माहिती वेगवेगळी आहे. त्यामुळे निष्कर्षांत फरक पडणे शक्य आहे.

संदर्भः (Referances)

१. Sadhu A.N. & Singh Amarjit - Research Methodology in social sciences, Himalaya publishing house, 1st Edition 1999, page No. 2

२. Dr. Borse M.N. - Research Methodology: Modern Methods and New Techniques, page No.1

३. Krishnaswami O.R. & M. Ranganathan - Methodology of research in social sciences, Himalaya publishing house, Second revised Edition, 2005, page No.1

४. डॉ. बोरुडे रा. र. - संशोधन पध्दतीशास्त्र, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, आवृत्ती पहिली - २००५, पान नं. २

५. Sadhu A.N. & Singh Amarjit - Research Methodology in social sciences, page No. 7&10

६. डॉ. बोरुडे रा. र. - संशोधन पध्दतीशास्त्र, पान नं. २

७. Gupta Santosh - Research Methodology and Statistical Techniques, page No. 4

८. Krishmaswami O. R. & M. Ranganaghan - Methodology of research in social sciences, page No. 32,36,38,47

९. Kothari C.R. - Research Methodology, Methods & Techniques, New age International publishers, 2nd Edition - 2004, page No. 3 & 4

१०. कित्ता

११. कित्ता

१२. डॉ. बोरुडे रा. र. - संशोधन पध्दतीशास्त्र, प. आवृत्ती, पान नं. ६

१३. Negi R. S. (I.A.S), Gaikwad John (Edited) - Socio Cultural Dynamics of Tribal Development, Tribal research and Traning Institute, Pune, page No. 45

१४. डॉ. नाडगोंडे गुरुनाथ - भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे- ३०. पान नं. २६

१५. Kothari C. R. - Research Methodology - Methods and Techniques, 2nd Edition - 2004, page No. 95 & 111

१६. Dr. Sen Amartya - Development as Freedom Oxford University press, New Delhi, Page No. 90, 95, 96, 99, 102

१७. मिरदाल गुन्नर (अनुवाद - सरला कारखानीस) - आर्थिक सिध्दांत व अर्धविकसित प्रदेश, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, पान नं. १२/१३

प्रकरण चौथे

साहित्याचे सिंहावलोकन

४.१	प्रस्तावना	११५
४.२.	आंतरराष्ट्रीय पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन	११५
४.३	राष्ट्रीय पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन	११८
४.४	महाराष्ट्र राज्य पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन	१२३
४.५	विभागीय पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन	१२७
	संदर्भ (References)	१३७

प्रकरण चौथे

साहित्याचे सिंहावलोकन

४.१ प्रस्तावना

संशोधनात समस्येची निवड केल्यानंतर त्या विषयाशी संबंधित साहित्याचे सिंहावलोकन करणे आवश्यक असते. एकाच विषयाचे पुन्हा पुन्हा संशोधन होऊ नये आणि नव्याने होणाऱ्या संशोधनात काहीतरी नावीन्य असावे, नवीन मुद्यावर अभ्यास व्हावा. हा त्यामागील उद्देश असतो. आदिवासी समाजाच्या आर्थिक कल्याणाकरिता आंतरराष्ट्रीय पातळीपासून ते स्थानिक पातळीपर्यंत प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे आदिवासी जमातींबाबत संशोधन करणे, त्यांच्या समस्या जाणून घेणे अपरिहार्य आहे. त्यानुसार अनेक संशोधकांनी, संशोधन संस्थांनी आदिवासी जमातींबाबत संशोधन केलेले आहे. जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्रसंघ, आंतरराष्ट्रीय श्रम संघटना, देश पातळीवर विविध राज्यांतील आदिवासी संशोधन संस्था, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था, राज्य सरकारे इत्यादी या संदर्भात संशोधन करीत आहेत. महाराष्ट्र राज्य पातळीवर 'आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे' ही संस्था प्रामुख्याने आदिवासींचे प्रश्न, त्यांचा विकास, त्यांचे जीवनमान व संस्कृती इत्यादी बद्दल संशोधन करते.

महाराष्ट्रातील सह्याद्री विभागातील आदिवासी जमातींबाबत काही मोजक्याच संशोधकांनी संशोधन केलेले आहे. त्यांचे संशोधन हे सामाजिक, सांस्कृतिक व मानववंश शास्त्रीय दृष्टीकोनावर अधिक भर देणारे आहे. आदिवासी विकास योजनांच्या संदर्भात फक्त दोन संशोधकांनी संशोधन केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी **महादेव कोळी**, ठाकर व कातकरी या जमातींचा एकत्रित विचार केलेला आहे. फक्त **महादेव कोळी** जमात व आदिवासी विकास योजना या संदर्भात आता पर्यंत संशोधन झालेले नाही. त्यामुळे प्रस्तूत संशोधनासाठी फक्त **महादेव कोळी** जमातीची निवड केलेली आहे.

४.२ आंतरराष्ट्रीय पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन

पहिल्या महायुध्दानंतर १९१९ मध्ये राष्ट्रसंघ व आंतरराष्ट्रीय श्रम संघटना या दोन जागतिक पातळीवरील संघटना स्थापन झाल्या. राष्ट्रसंघाची स्थापना आंतरराष्ट्रीय पातळीवर राजकीय व लष्करी शांतता प्रस्थापित करण्याच्या हेतूने करण्यात आली होती. तर आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेची स्थापना सामाजिक शांततेच्या उद्देशाने करण्यात आली होती.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटना

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या स्थापनेवेळी असे नमूद करण्यात आले होते की, "सामाजिक न्यायाशिवाय कोणतीही शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही." आंतरराष्ट्रीय श्रम संघटना ही प्रामुख्याने मूळच्या आणि आदिवासी लोकांशी व त्यांच्या कामगार म्हणून असणाऱ्या प्रश्नांशी संबंधित आहे.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने ५ सप्टेंबर १९९१ मध्ये एक करार केलेला आहे. सदरचा करार जगातील आदिवासी समाजाच्या सर्व समस्यांचा विचार करून आणि त्यासंबंधी अभ्यास करून करण्यात आला आहे. या कराराचा उद्देश आदिवासी समाजाची सर्वांगीण उन्नती व्हावी हा आहे. या करारात जगातील विविध देशात जे आदिवासी राहतात त्यांच्यात होत असलेल्या परिवर्तनासंबंधी विचार करण्यात आला आहे. जगातील सर्वच देशात आदिवासी बऱ्याच प्रमाणात मानव अधिकारांपासून वंचित आहेत. त्यांची मुल्ये, रीतिरिवाज, कायदे यांचा ऱ्हास होत आहे. या करारानुसार "आदिवासीचा आंतरराष्ट्रीय मापदंडानुसार विकास करण्यात येईल. जगातील आदिवासींना त्यांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक ओळखीनुसार तसेच त्यांच्या रुढी-परंपरांनुसार विकासात प्राधान्य देण्यात येईल. संबंधित देशातील आदिवासींना त्यांच्या विकासात प्राथमिकता ठरविण्याचा अधिकार असेल कारण त्याचा त्यांची मालमता, जमीन व अध्यात्मिक मूल्ये यावर परिणाम होतो. त्यांना त्यांचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास नियंत्रित करण्याचा पूर्ण अधिकार असेल. ज्या भागात आदिवासी राहतात त्या भागाचा आर्थिक विकास करतांना त्यांचे जीवनमान सुधारणा, आरोग्य आणि शिक्षण यांना प्राधान्य देण्यात येईल. संबंधित देशातील सरकारे विकासाचा वेळोवेळी आढावा घेतील व त्याचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणावरील परिणाम पडताळून पाहतील." अशा ठळक तरतुदी आहेत. याशिवाय या करारात खाली नमूद केलेल्या इतर महत्वाच्या तरतुदी आहेत.

विविध देशातील आदिवासी लोकांवर राष्ट्रीय कायदे आणि नियम लागू करतांना त्यांच्या रुढी, परंपरा, मूल्ये यांचा विचार केला जाईल. त्यांना त्यांचे संवर्धन करण्याचा अधिकार असेल. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार विचारात घेऊन आदिवासी लोकांनी केलेले गुन्हे व अपराध यांचे निराकरण केले जाईल.

ज्या जमिनीवर आदिवासी राहतात त्या जमिनीवरील त्यांचा हक्क मान्य केला जाईल. त्या व्यतिरिक्त ज्या जमिनीशी त्यांचा उदर-निर्वाह निगडीत आहे व ती जमीन ते पूर्वीपासून कसतात अशा जमिनींवर त्यांचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले जातील. आदिवासी भागातील नैसर्गिक साधन-संपत्तीचे संरक्षण केले जाईल. सरकारला त्या भागातील नैसर्गिक साधन संपत्तीचा देशाच्या विकासासाठी उपयोग करावयाचा असेल तर अगोदर आदिवासींशी विचार विमर्श करूनच तसे केले जाईल. त्यांच्या कोणत्याही प्रकारच्या हिताला बाधा पोहचणार नाही याची काळजी घेतली जाईल.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत असाधारण परिस्थितीत आदिवासींचे विस्थापण होत असेल तर ते त्यांच्या सहमतीनुसार करण्यात येईल. सहमतीनुसार होत नसेल तर त्यांचे विस्थापन करताना राष्ट्रीय नियम व कायदे यांचे उचित पालन केले जाईल. विस्थापित लोकांना त्यांच्या पूर्वीच्याच जमिनीप्रमाणे जमीन देऊन त्यांचे पुनर्वसन केले जाईल.

राष्ट्रीय नियम व कायद्यांचे पालन करून विकासाचे नियोजन केले जाईल. आदिवासींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सरकार प्रयत्न करेल. सामान्य कामगार व आदिवासी कामगार यांच्यात कोणताही भेदभाव केला जाणार नाही. कुशल रोजगारा व्यतिरिक्त सर्व प्रकारचा रोजगार आदिवासींना उपलब्ध करून देण्यासाठी सरकार प्रयत्न करेल. सर्व प्रकारच्या रोजगारासंबंधी प्रशिक्षण दिले जाईल. शिकार, मासेमारी, गौण वनौपजे गोळा करणे, हस्तोद्योग, ग्रामोद्योग यांना विकास प्रक्रियेत महत्वाचे घटक म्हणून मान्यता देण्यात येईल. आदिवासींच्या मागणीनुसार त्यांना तांत्रिक सहाय्य, वित्त सहाय्य करण्यात येईल. सामाजिक सुरक्षा योजनेत त्यांना समाविष्ट केले जाईल.

विविध देशातील सरकारे आदिवासींना पर्याप्त आरोग्य सुविधा व पर्याप्त संसाधने उपलब्ध करून देतील त्यामुळे ते शारीरिक व मानसिक स्वास्थ निर्माण करू शकतील. संबंधित लोकांसाठी शैक्षणिक कार्यक्रम राबविण्यात येईल व त्यामध्ये सर्व प्रकारच्या विषयांचा समावेश असेल. आवश्यक तेथे त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देण्यात येईल. या करारातील तरतुदींचा योग्य अंमल झाल्यास आदिवासी देशातील इतर विकसीत समाजाच्या मूळ प्रवाहात येतील आणि त्यांचा सर्वांगिण विकास होऊ शकेल असे स्पष्ट होते. थोडक्यात संबंधित देशातील सरकार आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, आरोग्य व समाज कल्याण या क्षेत्रांसाठी आवश्यक ते सर्व उपाय अंमलात आणेल.

संयुक्त राष्ट्रसंघ

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २००० मध्ये या सहस्त्रकातील विकासाची लक्ष्ये घोषित केली आहेत. या घोषणापत्रात असे नमूद केले आहे की, जगातील आदिवासी हे जागतिक आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत व व्यूहरचनेत समाविष्ट नाहीत. ते विकासापासून अलिप्त व वंचित आहेत. या सहस्त्रकातील विकास लक्ष्यांमध्ये आदिवासी लोकांना समाविष्ट करून घेण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने पुढील मुद्दे विचारात घेतले आहेत.

१. राष्ट्रीय अर्थव्यवस्था आणि संस्था शेवटच्या आदिवासी माणसाला जास्तीत जास्त फायदा मिळवूण देण्याचा प्रयत्न करतील.

२. आदिवासी लोकांसाठीची सहस्त्रकातील लक्ष्ये/ध्येये साध्य करण्यासाठी हक्क-आधारित दृष्टीकोन व चांगले शासन हे घटक महत्वाचे आहेत.

३. सहस्त्रकातील विकासाची लक्ष्ये गाठण्यासाठी आदिवासी लोकांना चर्चा, मूल्यमापन आणि व्यूहरचना यात समाविष्ट केले जाईल.

संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेली या सहस्त्रकातील विकास लक्ष्ये

१. अति दारिद्र्य आणि कुपोषणाचे निर्मुलन करणे.
२. वैश्विक प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करणे.
३. स्त्री-पुरुष समानता आणि महिलांचे सबलीकरण करणे.
४. बालमृत्यू दर कमी करणे.
५. मातृत्व आरोग्यात सुधारणा करणे.
६. पर्यावरणाचे चिरस्थायी संरक्षण करणे.
७. विकासाची जागतिक मैत्री विकसित करणे.

वरील लक्ष्ये २०१५ पर्यंत साध्य करावयाची आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर आदिवासी विकास या विषयावर उपलब्ध साहित्याचा परामर्श घेतला असता असे दिसते की, संयुक्त राष्ट्रसंघाने सुध्दा या विषयाकडे गांभिर्याने लक्ष दिलेले आहे.

४.३ राष्ट्रीय पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. अनेक जाती, धर्म, पंथ, समुदाय असलेले लोक येथे राहतात. तसेच बहुभाषिक, बहुसांस्कृतिक, बहुवांशिक गट येथे गुण्यागोविंदाने

राहतात. भारताच्या या विविधतेमुळेच येथे अनेक आदिवासी जमाती वास्तव्य करून आहेत. या जमातीही वैशिष्ट्यपूर्ण चालीरिती, भाषा, संस्कृती, पेहराव, रुढी, परंपरा यांनी नटलेल्या आहेत. परंतु त्या अत्यंत मागासलेल्या आहेत. काही जमाती या प्राथमिक अवस्थेतील जीवन जगतात. देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत त्यांचे स्थान नगण्य आहे.

भारताच्या सर्वांगीण विकासासाठी या आदिवासी जमातींचा आर्थिक विकास करण्याची गरज आहे. त्यासाठी संशोधन करून त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने आदिवासींच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केलेले आहेत. परंतु त्या प्रयत्नांना अपेक्षित यश लाभलेले नाही. देश पातळीवर सरकारने, विविध संस्थांनी, व्यक्तींनी आदिवासी जमातींबाबत संशोधन केलेले आहे. केंद्र सरकारमध्ये स्वतंत्र आदिवासी विकास खाते निर्माण करण्यात आले आहे. या खात्यामार्फत विविध राज्यांतील आदिवासींच्या परिस्थितीचा संशोधन करून आढावा घेतला जातो व देशपातळीवर उपाययोजना केल्या जातात.

जनतेच्या कल्याणाचा विषय हा राज्य सरकारच्या अखत्यारित येतो. त्यामुळे ज्या राज्यांत आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणात आहेत त्या राज्यांत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. या संस्थामार्फत त्या - त्या राज्यातील आदिवासी जमातींबाबत संशोधन केले जाते. संशोधित माहिती ही आदिवासी संशोधन पत्रिकेत प्रकाशित केली जाते. तसेच अनेक स्वयंसेवी संस्था विविध राज्यांतल्या आदिवासी-विभागात कार्यरत आहेत. त्या संस्थाही वेळोवेळी आपले संशोधित कार्यात्मक अहवाल प्रसिद्ध करीत असतात.

देशातील विविध विद्यापीठांत 'आदिवासी' जमातींवर झालेल्या संशोधनांचा गोषवारा

१. आसाममधील स्थलांतरीत शेतीचे अर्थशास्त्र

वरील विषयावर श्री. निरंजन शहा यांनी १९७० साली पुणे विद्यापीठात पी.एच्.डी. पदवीसाठी संशोधन केलेले आहे. संशोधनातून त्यांनी पुढील निष्कर्ष काढलेले आहेत.

१. जगातील बहुतेक देशांत स्थलांतरीत शेती केली जाते.
२. स्थलांतरीत शेती ही प्रामुख्याने आदिवासी जमाती करतात.
३. भारतातही स्थलांतरीत शेती केली जाते. पूर्वेकडील राज्यांमध्ये अशी शेती करण्याचे प्रमाण जास्त आहे.

४. स्थलांतरीत शेती करण्याचे काही फायदे तसेच तोटेही आहेत.

५. आसाममधील स्थलांतरीत शेती ही त्या भागातील लोकांचा सामाजिक, सांस्कृतिक दृष्टीकोण आणि हेतू याच्याशी निगडीत आहे.

६. तांत्रिक मागासलेपणा, निकृष्ठ राहणीमान, स्थिर अर्थव्यवस्था, भौगोलिक वातावरणीय स्थिती, लोकसंख्येची घनता, तुलनात्मक अलगता हे सर्व घटक स्थलांतरीत शेतीस कारणीभूत आहेत.

७. आसाममधील डोंगराळ भागातील ६० टक्के लोक हे स्थलांतरीत शेती करतात. तसेच शिकार करणे, गौण वनौपजे गोळा करणे, हस्तकला, कुक्कुटपालन इ. जोडधंदेही करतात.

८. कुटुंबाच्या उदर निर्वाहाच्या गरजा भागविण्यासाठी लागणारी उत्पादने या शेतीत घेतली जातात. कुटुंबातील सर्व सदस्य या शेतीत सहभागी होतात.

९. स्थलांतरीत शेतीमुळे जंगले नष्ट होतात तसेच जमिनीची धूप होते.

१०. काही सामाजिक शास्त्रज्ञांच्या मते स्थलांतरीत शेती ही एक जीवन जगण्याची पध्दती आहे. तो व्यवसाय नाही.

११. स्थलांतरीत शेतीला प्राथमिक अवस्थेतील शेती असेही म्हटले जाते.

वरील निष्कर्षांच्या आधारे श्री. निरंजन शहा यांनी असा अभिप्राय व्यक्त केला की, आसाममध्ये डोंगराळ भागातील ९० टक्के लोक शेती करतात. शेती विकास हा फक्त पीक शेतीवर अवलंबून नाही तर पशुपालन, कुक्कुटपालन, वनीकरण, रेशीम उत्पादन या इतरही घटकांवर अवलंबून आहे. झूम (स्थलांतरीत) शेती करणाऱ्या लोकांना लघुउद्योग, व्यापार, औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्र इ. मध्ये संधी उपलब्ध करून दिल्यास शेतीवरचे अवलंबित्वही कमी होईल व झूम शेतीचे प्रमाणही कमी होईल.

२. आदिवासी अर्थव्यवस्थेची काही दृश्ये : ओरिसा राज्यातील कोरापूट जिल्हाचा वस्तुनिष्ट अभ्यास

वरील विषयावर श्री. समल जगबंधू यांनी पी.एच्.डी पदवीसाठी १९९२ मध्ये संशोधन केलेले आहे. त्यांची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे :-

१. आदिवासी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये अभ्यासणे.

२. मध्यवर्ती आदिवासी पट्टा, विंध्य पर्वत रांगा तसेच इतर आदिवासी पट्ट्यातील दुष्काळग्रस्त विभाग इत्यादींचा अभ्यास करणे.

३. आदिवासी अर्थव्यवस्था, कोरापूट जिल्हातील आर्थिकस्तर, तेथील गावांची पाहणी, जंगले, पर्जन्यमान, हवामान इ. बाबतीत मध्यवर्ती आदिवासी पट्ट्याशी तुलना करणे.

४. आदिवासी लोकसंख्या, साक्षरता, आरोग्य, कर्ती लोकसंख्या, आर्थिक हालचाल, उलाढाल, शेती, जमीन मशागत, शेतीकाम, शेतमजूर, रोजगार, श्रमाची उत्पादकता, उत्पन्न पातळी इ. घटकांचा अभ्यास करणे.

श्री. समल जगबंधू यांचे संशोधनावरून त्यांनी खालील महत्त्वाचे निष्कर्ष काढले आहेत.

१) संशोधनासाठी ओरिसा राज्यातील कोरापूट जिल्ह्यामधील तीन खेडी व एक पुनर्रनिर्माण वसाहत यांचा अभ्यास केला.

२) कोरापूट जिल्ह्यात स्त्री-पुरुष प्रमाण चांगले असून विशेषता आदिवासींमध्ये स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक आहे.

३) संशोधनासाठी निवडलेल्या आदिवासी गावांमध्ये साक्षरतेचा दर अत्यंत कमी म्हणजे फक्त ६ टक्के होता.

४) शाळेत जाणाऱ्या लहान मुलांची संख्या अत्यंत कमी होती. मुलांना बसण्यासाठी पडक्याच शाळा होत्या.

५) चारही आदिवासी गावांत पुरुष, स्त्रिया, लहान मुले यांचा आर्थिक उत्पन्न मिळविण्यात सहभाग होता. बहुतेक सर्व मजूर होते.

६) सन १९८१ ची जनगणना व संशोधकाने प्रत्यक्ष केलेली पाहणी यांच्यात मोठ्या प्रमाणात तफावत होती. जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या कमी होती.

७) आदिवासी मजूरांना अवजड काम करूनही मोबदला अतिशय कमी मिळत होता. किरकोळ मजूरी दर फक्त ३ रु. प्रतिदिन होता.

८) चारही आदिवासी खेडयांमध्ये असणारे मजूरी दर वेगवेगळे होते व ते प्रतिदिन ३ रु. ते ७ रु. या दरम्यान होते.

९) चारही आदिवासी खेडयांमध्ये स्थलांतरीत शेती केली जात होती. स्थलांतरीत शेतीपासून अत्यंत तुटपुंजे उत्पन्न मिळत होते.

१०) आदिवासी लोकांची चारही खेडयांतील सरासरी जमीन धारणा ही २.४ एकर (१ हेक्टरपेक्षा कमी) होती.

११) आदिवासींना ओरिसा सरकारतर्फे बांबू, कॉफी, कोक, रबर यांसारख्या आर्थिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या झाडांची लागवड करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत होते. तसेच फळझाडे लागवडीसाठी प्रोत्साहन व मदत देण्यात येत होती.

१२) ओरिसा सरकारतर्फे आदिवासींना रस्तेबांधणी, जंगल कामगार, खाण व्यवसाय इ. ठिकाणी रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत होते.

३. भारतातील आदिवासी लोकसंख्येत झालेले सामाजिक आर्थिक बदल (१९६१-१९९१)

श्री एस. राजू क्रिश्णन यांनी वरील विषयावर संशोधन करून खालील निष्कर्ष काढलेले आहेत.

१. आदिवासी लोकसंख्येत १९६१ ते १९९१ या काळात १२७ टक्के वाढ झाली.

२. वरील काळात शहरी आदिवासी स्त्रिया व ग्रामीण आदिवासी स्त्रिया यांच्यातील फरक कमी झाला.

३. आदिवासी स्त्री-पुरुष प्रमाण उर्वरित लोकसंख्येपेक्षा चांगले आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार १००० पुरुषांमागे १०२९ स्त्रिया आढळतात.

४. देशातील इतर लोकसंख्येच्या तुलनेन आदिवासींची साक्षरता अत्यंत कमी आहे. सन १९६१ मध्ये साक्षरता फक्त ८.५ टक्के होती. ती १९९१ मध्ये ३२ टक्के इतकी वाढली.

५. शहरातील आदिवासींची साक्षरता ग्रामीण भागाच्या तुलनेत जास्त आहे. ग्रामीण भागात स्त्रियांची साक्षरता अत्यंत कमी आहे.

६. १९६१ ते १९९१ या काळात स्त्री-पुरुष साक्षरतेतील तफावत कमी झाली.

७. १९६१ ते १९९१ या काळात जिल्हा पातळीवर आदिवासी स्त्री-पुरुषांच्या कामातील सहभागाची सरासरी पातळी कमी झालेली आहे.

८. वरील काळात स्त्रियांच्या कामाचा दर पुरुषांपेक्षा अधिक वेगाने कमी झाला आहे.

९. देशाच्या पूर्वोत्तर राज्यात ग्रामीण भागात राहणाऱ्या आदिवासींचे प्रमाण ९२.१३ टक्के आहे. देशाच्या दक्षिण विभागात ते ३.८६ टक्के इतके आहे. देशाच्या पश्चिम विभागात शहरांत केंद्रीत झालेल्या आदिवासींचे प्रमाण जास्त आढळते.

१०. पूर्व विभागात स्त्री-पुरष साक्षरता अधिक आहे. स्त्रियांच्या बाबतीत उत्तर-पूर्व व मध्य विभागात साक्षरता अत्यंत कमी आढळते.

श्री. एस. राजू क्रिश्णन यांनी त्यांचे संशोधनावर आधारीत आदिवासींच्या विकासासाठी खालील शिफारशी केल्या आहेत.

१. आदिवासींची साक्षरता व विशेषत्वाने स्त्रियांची साक्षरता वाढविण्याची गरज आहे.

२. विभागीय पातळीवर नियोजित कार्यक्रम राबवून आदिवासींचा विकास करता येईल.

३. विकास कार्यक्रमांद्वारे आदिवासींचा कामातील सहभाग वाढविता येईल. विशेष करून स्त्रियांना कामात सहभागी करून घेता येईल.

४. विकासाच्या विविध योजनांद्वारे आदिवासींचा विकास करणे शक्य आहे.

५. आदिवासींच्या विकासासाठी वेळेत योग्य नियोजन करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

४.४ महाराष्ट्र राज्य पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी जमातींच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक संशोधनाचे प्रमुख कार्य आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेमार्फत केले जाते. ही संस्था आदिवासी संशोधन पत्रिका प्रकाशित करते व त्यामध्ये संशोधित माहिती प्रकाशित केली जाते. तसेच या संस्थेमार्फत बेंच मार्क सर्व्हे केले जातात.

गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे या संस्थेनेही राज्यपातळीवर अनेक संशोधन प्रकल्प केलेले आहेत. या संस्थेतर्फे १९६४-६५ मध्ये हरसूल (नाशिक) विकास गटातील आदिवासी गावांची पाहणी करण्यात आलेली होती.

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे या संस्थेमार्फत सुध्दा आदिवासी जमातींसंबंधी काही संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यात आलेले आहेत. मेळघाट मधील आदिवासींच्या कुपोषणा संदर्भात या संस्थेने मोठ्या प्रमाणात संशोधन केलेले आहे.

महाराष्ट्र राज्य सरकार, आदिवासी विकास विभाग यांच्यातर्फे वार्षिक आदिवासी उपयोजना हा संशोधित वार्षिक अहवाल प्रसिध्द केला जातो. सरकारी वार्षिक अहवाल, बेंच मार्क सर्व्हे (टी.आर.टी.आय.), आदिवासी संशोधन पत्रिका, विविध संस्थांचे संशोधन प्रकल्प, तसेच हाकारा, आदिवासी महासंघ वार्ता, समाज प्रबोधन पत्रिका, अर्थसंवाद, सुगावा इ. मासिके व त्रैमासिके त्याचप्रमाणे महाराष्ट्र टाईम्स, सकाळ व लोकसत्ता या दैनिकांतील आदिवासींवरील संशोधित लेख इत्यादी वरील सर्वांचे चिकित्सक वाचन करून अवलोकन केलेले आहे.

विद्यावाचस्पती पदवीकरिता अनेक संशोधकांनी विविध विद्यापीठांत संशोधन केलेले आहे. त्यातील काही संशोधने खालील प्रमाणे:

१. श्री. व्ही. व्ही. भोसेकर यांनी पी. एच्. डी. पदवी साठी १९७९ मध्ये 'धुळे जिल्ह्यातील सहकारी चळवळ' या विषयावर संशोधन केलेले आहे. त्यांचे निष्कर्ष खालील प्रमाणे:

१. धुळे जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ३८ टक्के लोकसंख्या आदिवासी आहे.

२. नंदूरबार, तळोदा, शहादा, शिरपूर आणि साक्री हे आदिवासी बहुल तालुके आहेत. तसेच केंद्र सरकारने नवापूर, अक्राणी आणि अक्कलकुवा हे पूर्ण आदिवासी क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे.

३. या जिल्ह्यातील ढाणका, भिल्ल, गावित, पारधी या जमाती अत्यंत मागासलेल्या आहेत. तर पाडवी, तडवी, वसावे, वळवी या जमाती सुधारलेल्या आहेत व त्या सपाट भू-प्रदेशात राहतात.

४. धुळे जिल्ह्यातील आदिवासींचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. फक्त ५ टक्के आदिवासींकडे शेतीयोग्य जमीन आहे.

५. आदिवासींना फक्त २ ते ३ महिनेच रोजगार मिळतो.

६. २५ टक्के आदिवासी भूमिहीन शेतमजूर आहेत.

७. बहुतेक आदिवासी शेती, शेळीपालन, लाकूड गोळा करणे, डिंक व लाख गोळा करणे तसेच हिरडा, बेहडा अशी आयुर्वेदिक उत्पादने गोळा करणे अशा छोट्या उद्योगधंद्यात गुंतलेले आहेत.

८. गरीब आदिवासी जमीनदार, सावकार यांच्याकडे सालगडी, घरगडी म्हणून काम करतात.

९. सहकारी चळवळीने आदिवासींना विकासाची संधी निर्माण केली आहे. या चळवळीमार्फत त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला जात आहे.

१०. व्यापारी, सावकार यांच्या पाशातून आदिवासींची मुक्तता करणे हे सहकारी चळवळीचे उद्दिष्ट आहे.

११. आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी विभागात आदिवासी सहकारी पतसंस्थांची स्थापना करण्यात आलेली आहे.

१२. आदिवासी सहकारी पतसंस्थामार्फत आदिवासींना सर्व प्रकारचा कर्जपुरवठा केला जातो.

१३. आदिवासी गोळा करीत असलेल्या गौण वनौपजांच्या खरेदी-विक्रीसाठी आदिवासी सहकारी खरेदी-विक्री संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत.

१४. आदिवासी भागात कामगार-करार सहकारी संस्था व जंगल कामगार सहकारी संस्था आढळून येतात.

१५. आदिवासी बहुल प्रदेशात सहकारी चळवळ पुरेशी फोफावलेली नाही.

१६. सहकारी संस्थांमध्ये आदिवासी सभासदांची संख्या कमी आहे.

१७. आदिवासी सहकारी संस्थांवर खाजगी कंत्राटदारांचे वर्चस्व दिसून येते.

१८. सरकारी विभाग खाजगी कंत्राटदारांनाच अधिक मदत करतात.

१९. सरकारकडून देण्यात येणारी अनुदाने, सूट, सुविधा या फक्त कागदावरच असतात. प्रत्यक्षात त्याचा आदिवासींना काहीच फायदा होत नाही.

२०. आदिवासी जंगल कामगार सह. सोसायट्यांमार्फत आदिवासींना फक्त २ ते ३ महिनेच रोजगार पुरविला जातो.

२१. बहुतेक आदिवासी सहकारी सोसायट्या तोट्यात आहेत.

२२. आदिवासी सहकारी संस्थांचे सभासद अशिक्षित असल्याने ते या संस्थांचे व्यवस्थित आर्थिक व्यवस्थापन करू शकत नाहीत त्यामुळे त्या तोट्यात चालतात.

२. **मुंबई विद्यापीठामध्ये श्री. अमृत वासुदेव पोळ यांनी १९८५ मध्ये 'आदिवासींमधील आर्थिक बदल'** या विषयावर संशोधन केले होते. त्यांनी ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील कोसबाड मधील 'वारली' आदिवासी या जमातीबाबत अभ्यास केला होता. आदिवासी भागातील धारण क्षेत्राचे स्वरूप, शेतीमाल बदल, जंगल संपत्ती, सांस्कृतिक घटकांचा प्रभाव इत्यादी बाबींविषयी त्यांनी अभ्यास केला होता.

३. **प्रा. बी. एन. कांबळे यांनी पुणे विद्यापीठात पी. एच्. डी. पदवीसाठी 'महाराष्ट्रातील विकास कार्यक्रमांची अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींवरील (आदिवासी) परिणामकारकता'** या विषयावर संशोधन केले आहे. त्यांच्या संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.

१. आदिवासींच्या उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध आदिवासी योजनांचा अभ्यास करणे.

२. अनुसूचित जाती/जमाती, त्यांचे दारिद्र्य, शैक्षणिक विकास, शैक्षणिक प्रगती, शैक्षणिक गुणवत्ता, शाळेतील गळती इ. घटकांचा अभ्यास करणे.

३. भारतातील जाती व्यवस्था, जातींची निर्मिती, जातींची रचना तसेच विविध राज्यातील आदिवासी जमाती, अस्पृश्यता निवारण इ. घटकांचा अभ्यास करणे.

४. विविध संस्थांकडून आदिवासींसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा अभ्यास करणे. आदिवासींच्या समस्या जाणून घेणे व विविध विकास कार्यक्रमांचा आदिवासींच्या जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे.

५. केंद्र व राज्य सरकारच्या अनुसूचित जाती व जमाती यांसाठी असणाऱ्या योजना, अस्पृश्यता निवारण कार्यक्रम इत्यादींचा अभ्यास करणे.

६. भारतातील वर्णव्यवस्था, अस्पृश्यता, जातीभेद, असमानता इत्यादी घटकांचा अभ्यास करणे.

७. आदिवासींची भारतातील आणि विविध राज्यांतील लोकसंख्या व आदिवासींच्या कल्याणासाठी भारतीय नियोजनातील तरतूद इत्यादींचा अभ्यास करणे.

८. आदिवासी कल्याणासाठी केला जाणारा खर्च आणि त्यांचे कल्याण किंवा प्रगती अभ्यासणे.

९. अनुसूचित जाती व जमातींचे जमीनधारणा क्षेत्र, व्यवसाय रचना, पीक पध्दती, जिल्हा व तालुका पातळीवरील पीक रचना इ. घटकांचा अभ्यास करणे.

१०. आदिवासींसाठी करण्यात आलेल्या सुधारणा व त्यांची झालेली प्रगती या घटकांचा अभ्यास करणे.

श्री. बी. एन. कांबळे यांनी संशोधना आधारे काढलेले ठळक निष्कर्ष खाली नमूद केले आहेत.

१) संशोधनासाठी १०५२ कुटुंबांची निवड केलेली होती.

२) अनुसूचित जातींमध्ये सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे.

३) आदिवासींमध्ये लहान व मध्यम शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

४) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांमुळे अनुसूचित जाती व आदिवासी मध्ये दारिद्रयरेषेखाली असणाऱ्या लोकांचे चित्र स्पष्ट होण्यास मदत झाली आहे.

५) अहमदनगर जिल्ह्यातील १३ तालुक्यांपैकी ६ तालुक्यांत एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (ए.ग्रा.वि.का.) अंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी झालेली आहे तर उर्वरित ७ तालुक्यांत त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही.

६) अहमदनगर जिल्ह्यातील सर्व खेडयांत प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

७) अहमदनगर जिल्ह्यातील एकूण कुटुंबांपैकी ५० टक्के कुटुंबे दारिद्रय रेषेखाली आहेत.

८) दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या लोकांमध्ये ४० टक्के लोक हे अनुसूचित जाती व आदिवासी जमातीचे आहेत.

९) ए.ग्रा.वि.का. मुळे १५ टक्के लोकांना दारिद्रयरेषा पार करण्यास मदत झालेली होती.

१०) ए.ग्रा.वि.का. लाभ ६० टक्के अनुसूचित जातीमधील व ३८ टक्के आदिवासी जमातींमधील कुटुंबांना झालेला होता.

११) जवळजवळ ४७ टक्के लोकांच्या उत्पन्नात कोणतीही वाढ झालेली नव्हती.

१२) एकूण १०५२ कुटुंबांपैकी ४६ टक्के लोक भूमिहीन होते.

१३) संशोधनासाठी निवडलेल्या सर्व कुटुंबांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १३००० रु. च्या जवळपास होते. त्यातील २/३ लोकांचे वार्षिक उत्पन्न २५०० रु. पेक्षा कमी होते.

१४) जवळजवळ ७० टक्के कुटुंबे झोपडीत राहत होती ५ टक्के कुटुंबे पक्क्या घरात राहात होती.

१५) कर्ज घेतलेले लोक ८ टक्क्यांपेक्षा जास्त नव्हते.

१६) कर्जदारांपैकी थकबाकी असणारे बहुतेक शेतमजूर होते. कारण त्यांचे उत्पन्न त्यांच्या खर्चापेक्षा कमी होते.

१७) संशोधनासाठी निवडलेल्या कुटुंबांचा ७५ टक्के खर्च हा अन्न, वस्त्र व त्या संबंधातील घटकांवर खर्च होत होता.

४.५ विभागीय पातळीवरील साहित्याचे सिंहावलोकन

महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यात **'महादेव कोळी'** ही आदिवासी जमात वर्षानुवर्षे वास्तव्य करून आहे. या जमाती विषयीचे सर्वप्रथम संशोधन १८३६ मध्ये कॅप्टन मॅकिन्टोश या इंग्रज सेनाधिकाऱ्याने समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून केलेले आहे. त्यानंतर १९५७ मध्ये मुंबई विद्यापीठाचे समाजशास्त्र विभागप्रमुख व प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ डॉ. जी. एस. घुर्ये यांनी **'महादेव कोळी'** या जमातीची पाहणी करून **'महादेव कोळी : ए शेडुल्ड ट्राईब'** हे पुस्तक

लिहिले आहे. त्यांच्या संशोधनाचा मुख्य उद्देश सामाजिक व सांस्कृतिक माहिती पुरविण्याकडे होता. डॉ. गोविंद गारे यांनी १९७४ मध्ये **'सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी'** हे पुस्तक लिहिले आहे. त्यांनी या जमातीच्या ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक बाबींवर प्रकाश टाकलेला आहे.

आदिवासी **महादेव कोळी** या जमातीविषयी विभागीय पातळीवर मोजक्याच संशोधकांनी संशोधन केलेले आहे. त्यांचे संशोधन हे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक बाबींवर प्रकाश टाकणारे आहे.

१. ***Economic Study of a region with Special Reference to the consumption pattern – A Tribal region in a Ahmednagar District, Maharashtra State.***

वरील विषयावर १९६७ मध्ये डॉ. एम. डी. साठे यांनी पी. एच्. डी. पदवीसाठी पुणे विद्यापीठात संशोधन केलेले होते. त्यांनी अकोले तालुक्यातील पठार, प्रवरा खोरे, मुळा खोरे (डांगण) या तीन विभागांतील २१२ कुटुंबांच्या उपभोग रचनेचा अभ्यास केला. डॉ. साठे यांनी संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणेः

१. वरील विभागातील आदिवासी लोक त्यांच्या शेतात उत्पादित होणाऱ्या अन्नधान्याचा जास्तीत जास्त उपभोग घेतात.
२. भाताचे (तांदूळ) उत्पादन सर्वाधिक होते व त्याचाच उपभोग सर्वाधिक घेतला जातो.
३. आदिवासी लोक दूध उत्पादन करीत असले तरी त्याचा उपभोग कमी प्रमाणात घेतला जातो. जास्तीत जास्त दुधाची विक्री केली जाते.
४. उत्पन्नाच्या तुलनेत मटण-मासे यांवरील उपभोग खर्च जास्त आहे.
५. उत्पन्नाच्या तुलनेत डाळींवर कमी खर्च केला जातो. शेतात उत्पादित होणाऱ्या डाळीच उपभोगासाठी वापरल्या जातात.
६. मिळालेल्या उत्पन्नापैकी शिक्षणावर अत्यल्प खर्च केला जातो.
७. कपडे-लत्ते यावर अधिक खर्च केला जातो.
८. खाद्यतेल व त्यासंबंधी पदार्थ यांवर जास्त खर्च केला जातो.
९. पालेभाज्यांचे उत्पादन त्यांच्या शेतात होत नसल्याने तसेच उत्पन्न कमी असल्याने पालेभाज्यांवर कमी खर्च केला जातो.

१०. विजेची उपलब्धता नसल्याने रॉकेल व इंधनाच्या पदार्थांवर उत्पन्नाच्या तुलनेत अधिक खर्च होतो. तो खर्च ते टाळू शकत नाहीत.

११. या विभागातील लोकांना गोड चहा पिण्याची सवय असल्याने त्यांचा चहा-साखरेवर अधिक खर्च होतो.

१२. तंबाखू, पान-सुपारी यांच्या व्यसनाधिनतेचे प्रमाण मोठे असल्याने त्यावर अधिक खर्च होतो.

थोडक्यात डॉ. एम. डी. साठे यांनी उत्पन्न, उत्पादन व उपभोग खर्च यांचा आदिवासी विभागाच्या संदर्भात सविस्तर अभ्यास केलेला आहे.

२. *Tribals in an Urban Settings – A Case Study of Mahadeo Kolis.*

वरील विषयावर डॉ. जी. एम. गारे यांनी १९७१ मध्ये पी. एच्. डी. पदवीसाठी पुणे विद्यापीठात संशोधन केलेले आहे.

शहरीकरणामुळे आदिवासींचे रोजागारासाठी शहरांत स्थलांतर होत आहे. या शहरीकरणाचा आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवनावर काय परिणाम झाला याचा अभ्यास या प्रबंधात केलेला आहे. विशेष स्तरावर पुणे शहर व **महादेव कोळी** ही आदिवासी-जमात निवडलेली आहे.

संशोधकाने संशोधन करून काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणेः

१. **महादेव कोळी** लोकांचे स्थलांतर हे प्रामुख्याने मुंबई, पुणे व नाशिक या औद्योगिक शहरांमध्ये झालेले आहे.

२. स्थलांतर करणाऱ्यांचा वयोगट हा २० ते २५ वर्षे इतका आहे.

३. स्थलांतरामागे आर्थिक हेतू बरोबरच शैक्षणिक हेतूही आहे.

४. स्थलांतरितांमध्ये साक्षर लोकांचे प्रमाण मोठे असून निरक्षरांचे प्रमाण अत्यल्प आहे.

५. स्थलांतरीतांमध्ये पुरुष-स्त्री प्रमाण हे जवळ जवळ ३ : १ इतके आहे. स्त्रियांचे स्थलांतर हे पत्नी या नात्याने झालेले आहे.

६. बहुतेक पुरुष हे अकुशल कामगार, अर्धकुशल कामगार होते व जे थोडेफार जास्त शिकलेले होते ते क्लार्क/लिपीक होते.

७. शहरात राहणाऱ्या **महादेव कोळी** लोकांची आर्थिकस्थिती ग्रामीण लोकांपेक्षा चांगली होती तसेच त्यांचे राहणीमानही चांगले होते.

८. शिक्षणावरील खर्च हा उत्पन्नातील वाढीबरोबर वाढलेला होता.

९. शहरात राहणारे काही लोक हे चाळी, वाडे यामध्ये राहत होते तर काही झोपड्या बांधून राहत होते.

१०. शहरी राहणीमानाचा प्रभाव **महादेव कोळी** लोकांवर पडून त्यांची वेशभूषा व केशभूषा ही सुधारलेली होती.

११. शहरी वातावरणामुळे **महादेव कोळी** लोकांच्या समाज व्यवस्थेत व कुटुंबव्यवस्थेतही बदल झालेला होता.

१२. लग्नविधी, प्रथा, परंपरा यांतही बदल झालेला होता.

१३. आदिवासी सण, समारंभ, उत्सव यांच्या ऐवजी हिंदू सण, समारंभ, उत्साह साजरे केले जात होते.

१४. शहराकडील स्थलांतरामुळे आदिवासी कला, काव्य, नृत्यप्रकार यांचा लोप झाला.

१५. शहरातील सर्व **महादेव कोळी** लोक आपले गावाकडील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संबंध टिकवून ठेवतात. लग्न, जत्रा, सार्वजनिक समारंभ मर्त्यकाचे विधी इत्यादी सर्व ते गावाकडेच साजरे करतात.

३. आदिवासी विकास योजनांचा अकोले तालुक्यातील आदिवासींच्या शेती, शेतकरी व संलग्न व्यवसायावर झालेला परिणाम

वरील विषयावर डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी पुणे विद्यापीठात पी.एच्.डी. पदवीसाठी सन २००४ मध्ये संशोधन केलेले आहे. त्यांच्या संशोधनाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१. आदिवासी विकास योजनांवरील खर्चात प्रतिवर्षी वाढ झाली आहे.

२. अकोले तालुक्यातील वित्तीय सुविधांमुळे आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील शेतीचा विकास झालेला आहे.

३. पाटबंधारे व पूर नियंत्रणामुळे सिंचन क्षेत्रात वाढ झाली आहे.

४. आदिवासी उपयोजनांमुळे शेतकरी व शेतमजूर यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे.

५. अकोले तालुक्यातील उपयोजना क्षेत्रातील सर्वच आदिवासी कुटुंबांच्या उत्पन्नात वाढ झालेली आढळत नाही.

६. आदिवासी उपयोजना क्षेत्रात मजूरी दरात वाढ झालेली आहे.

७. गौण वनौपजांच्या विक्रीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ झालेली आहे.

८. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या प्रमाणात घट झालेली आहे.

९. पशुधनात वाढ झालेली आढळली.

१०. आदिवासी शेतकरी व शेतमजूर सरासरीपेक्षा कमी खर्च करतात. अन्नावर जास्त खर्च होतो. शिक्षण, आरोग्य, कपडे यावर कमी खर्च केला जातो.

११. आदिवासी शेतमजूरांच्या राहणीमानात फारसा बदल झालेला नाही.

१२. आदिवासी उपयोजना क्षेत्रात आरोग्य सुविधा मिळविण्यात त्रुटी आहेत.

१३. पडीक जमीन लागवडीखाली आणली गेल्याने लागवडीखालील क्षेत्र वाढले आहे.

१४. शेतीत काही प्रमाणात आधुनिक अवजारे वापरली जातात.

१५. रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीची उत्पादकता वाढली आहे.

१६. वित्तीय संस्थांच्या वाढीमुळे सावकारांकडून घेण्यात येणाऱ्या कर्जात घट झालेली आहे.

१७. बहुतेक कुटुंबांनी वीजपंप व तेलपंप योजनेचा लाभ घेतलेला आहे.

१८. नव संजीवन योजनेचा लाभ माहिती अभावी अत्यंत कमी लोकांना मिळालेला आहे.

१९. रोजगारासाठी स्थलांतर केले जाते.

२०. शैक्षणिक उपाययोजनांमुळे शैक्षणिक विकास झालेला आहे. परंतु गुणवत्ता कमी आहे.

२१. साक्षर असलेल्या कुटुंबांनीच आदिवासी विकास योजनांचा अधिक फायदा घेतलेला आहे.

२२. अतिदुर्गम गावांत साक्षरता अत्यंत कमी आहे.

२३. अंधश्रध्देच्या प्रमाणात घट झालेली आहे.

२४. पारंपारिक गाणी, नृत्यप्रकार, लोककला कमी झालेल्या आहेत.

२५. बालविवाहाच्या प्रमाणात घट झालेली आहे.

२६. दुर्गम आदिवासी गावांत पारंपारिक वेशभूषा केली जाते तर इतर गावांत आधुनिक वेशभूषेचा प्रसार झालेला आहे.

२७. प्राथमिक बोलीभाषेचे प्रमाण दुर्गम गावांत ९५ टक्के आहे. तर इतर गावांत ते ७० ते ७५ टक्के आहे.

४. एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सन १९९०-९५ या कालखंडातील अभ्यास व मूल्यमापन – विशेष संदर्भ आंबेगाव तालुका, जिल्हा पुणे

वरील विषयावर प्रा. सौ. छाया जाधव यांनी पुणे विद्यापीठात पी. एच्. डी पदवीसाठी सन २००५ मध्ये संशोधन केलेले आहे. त्यांच्या संशोधनाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१. लाभार्थ्यांपैकी सर्वात जास्त प्रमाण **महादेव कोळी** जमातीचे (८७ टक्के) होते तर ठाकर जमातीचे प्रमाण (१२.७ टक्के) कमी होते.
२. पाच ते आठ सदस्य असलेल्या कुटुंबांची संख्या सर्वाधिक होती.
३. पाहणीतील ८६.१ टक्के कुटुंबांचा मुख्य व्यवसाय शेती होता तर १३.९ टक्के कुटुंबांचा शेतमजूरी होता.
४. जमिनीच्या धारण क्षेत्रानुसार १३.९ टक्के लाभार्थी भूमिहीन होते. अल्पभूधारक ३१.६ टक्के होते. अत्यल्प भूधारक ११.७ टक्के होते. मध्यम शेतकरी ३३.९ टक्के होते तर १.२ टक्के मोठे शेतकरी होते.
५. पाहणीतील लाभार्थ्यांपैकी ५८.९ टक्के लोकांना शेतीसाठी पाण्याची सोय नव्हती.
६. निरक्षरता, शैक्षणिक मागासलेपणा, कागदपत्रांची अपूर्णता इत्यादीमुळे ९.५ टक्के व्यक्तींना कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ झाला नाही.
७. कर्ज थकबाकीदारांचे प्रमाण जास्त होते.
८. अपूर्ण रोजगार, कर्जफेड, नैसर्गिक प्रतिकुलता इत्यादींमुळे विविध योजनांचा लाभ मिळूनही उत्पन्नात वाढ झाली नाही अशी माहिती आढळून आली.
९. नैसर्गिक व भौगोलिक प्रतिकुलतेमुळे आदिवासींच्या आर्थिक उन्नतीकरिता राबविण्यात येणाऱ्या योजना १०० टक्के यशस्वी होत नाहीत.
१०. पाहणी केलेल्या ४११ कुटुंबांपैकी २६० (६३.३ टक्के) कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत होती.
११. बहुतेक लाभार्थ्यांनी अधिकारी येऊन पाहणी करीत नाहीत व मार्गदर्शन करीत नाहीत असे मत नोंदवले.

विद्यानिष्णात (एम.फिल.) पदवीसाठी 'आदिवासी' जमातींशी संबंधीत विषयावर झालेल्या संशोधनांचा गोषवारा.

१) वाडा तालुक्यातील आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्थाः एक अध्ययन

श्री. विनायक नामदेव चौधरी यांनी वरील विषयावर पुणे विद्यापीठात १९९२ मध्ये 'विद्यानिष्णात' या पदवीसाठी संशोधन केलेले आहे. त्यांच्या संशोधनाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१) १९४७ मध्ये पहिली केमाड विभाग आदिवासी जंगल कामगार सहकारी सोसायटी स्थापन झाली.

२) ठाणे जिल्ह्यात एकंदरीत ७७ जंगल कामगार सहकारी संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी वाडा तालुक्यात ७ आहेत.

३) वाडा तालुक्यातील जंगल कामगार सहकारी संस्थांनी आदिवासींना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

४) जंगल कामगार सहकारी संस्थांनी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासावर मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला आहे. त्यामुळे आदिवासींच्या विकासास मदत झाली आहे.

५) १९८५-८६ या वर्षांत वरील संस्थांनी शिक्षण, औषधोपचार, बैलजोडी, बैलगाडी, मंगलोरी कौले, तेलपंप, खावटी कर्ज, भांडी व घोंगडया, जळीत ग्रस्त मदत, सामुदायिक विवाह, सामुदायिक भांडी, पाणीपुरवठा, कपडे वाटप, व्यसनमुक्ती इ. वर सभासदांच्या कल्याणाकरिता ५,९०,४९२ रु. खर्च केले आहेत.

६) आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्थांमुळे सावकार, लाकूड व्यापारी, दुकानदार मक्तेदार यांच्याकडून होणारी पिळवणूक कमी झाली.

७) जंगलतोडीमुळे आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्थाची चांगली आर्थिक स्थिती ढासळली आहे.

८) शासनाने वनविकास महामंडळ स्थापन करून आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्थांकडील उत्तम प्रतिची वनसंपत्ती असलेले कार्यक्षेत्र ताब्यात घेतले.

९) शासनाने १९८८-८९ या सालापासून 'कुप' तोडीचे काम बंद केले. त्यामुळे आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था केवळ लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करू लागल्या.

१०) वाडा तालुक्यातील सात आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्थांपैकी बहुतेक संस्था १९८८-८९ पासून तोट्यात चालत आहेत.

११) आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्थांची स्थापना आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात आली असली तरी या संस्था त्यामध्ये पूर्ण यशस्वी होऊ शकल्या नाहीत.

१२) आजही जमीनदार, व्यापारी, जंगल मक्तेदार व सावकार आदिवासींच्या निरक्षरतेचा, अज्ञानाचा, दुबळेपणाचा गैरफायदा घेऊन त्यांचे शोषण करीत आहेत.

१३) आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्थांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याची आवश्यकता आहे.

२) "महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या कार्याचे मूल्यमापन-विशेष संदर्भ साक्री तालुका"

श्री. अे. वाय. बच्छाव यांनी वरील विषयावर विद्यानिष्णात (एम.फिल.) पदवीसाठी पुणे विद्यापीठात संशोधन केलेले आहे. त्यांनी संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

आदिवासींची पिळवणूक थांबविण्यासाठी व त्यांचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १९७२ मध्ये 'महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ' स्थापन केले आहे. महामंडळामार्फत आदिवासींच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या जातात. प्रमुख योजनांचे निष्कर्ष खालील प्रमाणे.

अ) एकाधिकार खरेदी योजना

१) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासींच्या मालाची जी किंमत ठरविली जाते, ती पद्धती सदोष आहे.

२) मालाच्या खरेदीची किंमत नियंत्रित परंतु विक्रीची किंमत अनियंत्रित असल्याने अनेकदा महामंडळाला तोटा होतो.

३) महामंडळाकडे आदिवासींचा शेतमाल व गौण वनौपजे खरेदी करण्याचा एकाधिकार आहे. परंतु महामंडळ आदिवासींची तातडीची आर्थिक गरज भागवू शकत नसल्याने ते आपला माल व्यापाऱ्यांना विकतात व व्यापारी त्याचा गैरफायदा घेऊन त्यांचे आर्थिक शोषण करतात.

४) महामंडळाला विकलेल्या मालाच्या पैशातून पीक कर्जाची रक्कम कपात केली जाते. त्यामुळे आदिवासी आपला माल अन्यत्र विकण्यास प्रवृत्त होतात.

५) महामंडळाच्या एकाधिकार खरेदी केंद्रांवर विकलेल्या मालाची रक्कम उशिरा मिळते म्हणून ७२ टक्के शेतकरी आपला माल खाजगी व्यापाऱ्यांना विकतात. त्यामुळे शासनाने महामंडळाला आदिवासी शेतकऱ्यांच्या मालाचे पैसे त्वरित देण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा.

६) महामंडळाकडे माल साठवणूकीसाठी पुरेशी गोदामे नसल्याने मालाची नासाडी होते त्यामुळे महामंडळाचे नुकसान होते.

७) शेतमालाची प्रतवारी करताना पक्षपात केला जातो. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांवर अन्याय होतो.

ब) खावटी कर्ज योजना

१) बेरोजगारीच्या काळात आदिवासींना चरितार्थासाठी खावटी कर्ज दिले जाते.

२) सन १९७८-७९ ते १९८७-८८ या काळात लाभार्थ्यांची निव्वळ संख्या कमी झाली आहे. कर्जथकबाकीदारांचे व थकबाकी रक्कमेचे प्रमाणही सातत्याने वाढलेले आहे.

३) अल्पभूधारक आणि भूमिहीन लाभार्थी मिळून ९० टक्के लोकांना ही योजना फायदेशीर आहे.

४) लाभार्थ्यांमध्ये ७० टक्के थकबाकीदार असल्याने त्यांना पुन्हा कर्ज मिळाले नाही.

५) लाभार्थ्यांच्या दृष्टीने फायदेशीर असलेली योजना थकबाकीदारांमुळे महामंडळाला फायदेशीर ठरत नाही.

क) १०० टक्के अनुदानावर वीजपंप व तेलपंप वाटप

१) या योजनेचा लाभ घेण्यासाठी जमीन धारणेची मर्यादा अडीच एकर ते सोळा एकर असल्याने अडीच एकरापेक्षा कमी शेती असलेले शेतकरी गरज असूनही या योजनेचा लाभ घेऊ शकत नाहीत. सोळा एकरांपेक्षा जास्त जमीन असलेले शेतकरी जमिनीची आपल्या कुटुंबियांमध्ये विभागणी करून एकाच कुटुंबात एकापेक्षा अधिक वीजपंप व तेलपंप घेऊ शकतात.

२) या योजनेसाठी अर्ज केल्यानंतर तीन वर्षांचा कालावधी लागतो. तो कमी करण्यात यावा.

३) या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत विलंब लागत असल्याने मध्यंतरीच्या काळात अनेक कागदपत्रांची पुर्तता करावी लागते. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येतो. तो कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

४) अशिक्षित शेतकरी लाभ मिळविण्यासाठी मध्यस्थांची मदत घेतात हे मध्यस्थ त्यांची आर्थिक पिळवणूक करतात.

ड) केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना

१) आदिवासींच्या स्थानिक आर्थिक गरजा लक्षात घेऊन ही योजना राबविली जाते.

२) केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना ९० टक्क्यांपेक्षा जास्त लाभार्थ्यांना फायदेशीर ठरलेली नाही असे आढळून आले.

३) आदिवासींना दुभत्या गायी, म्हशी या योजनेअंतर्गत उपलब्ध करून दिल्या जातात. परंतु दुधाला बाजारपेठ उपलब्ध करून दिली जात नाही. त्यामुळे ही योजना फायदेशीर ठरत नाही.

४) स्वयंरोजगार मिळवून देणाऱ्या व्यवसायांवर भर दिला पाहिजे. परंतु त्यासाठी देण्यात येणाऱ्या कर्जाचे प्रमाण कमी आहे. त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

५) व्यवसाय प्रशिक्षण व रोजगार मार्गदर्शन यावर भर देणे आवश्यक आहे.

६) महामंडळामार्फत ज्या विविध योजना राबविल्या जातात त्यामध्ये समन्वयाचा अभाव आढळतो.

***

संदर्भ (References)

१. Dr. Sathe M. D. - "Economic Study of a region with Special Reference to the consumption pattern – A Tribal region in Ahmednagar District, Maharashtra State." University of Pune (1967)

२. Shah Niranjan - "Enonomics of Shifting Cultivation in Assam" – Pune University (1970)

३. Dr. Gare G. M. - "Tribals in an Urban Settings – A case study of Mahadeo Kolis" Gokhale Institute of Politics and Economics" Pune University (1971) (Published)

४. Dr. Bosekar V. V. - "Co-operative Movement in Dhulia District" Pune University (1979)

५. Dr. Kamble B. N. - "Effectiveness of Developmental Programme for Scheduled Caste and Scheduled Tribe in Maharashtra" Pune University (1995)

६. डॉ. देशमुख बी. वाय. - "आदिवासी विकास योजनांचा अकोले तालुक्यातील आदिवासींच्या शेती, शेतकरी व संलग्न व्यवसायावर झालेला परिणाम" एक चिकित्सक अभ्यास, पुणे विद्यापीठ (२००४)

७. डॉ. जाधव छाया - "एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सन १९९०-९५ या कालखंडातील अभ्यास व मूल्यमापन – विशेष संदर्भ आंबेगाव तालुका, जिल्हा पुणे, पुणे विद्यापीठ (२००५)

८. एम.फिल. पदवीसाठी सादर लघुप्रबंध/ लघुप्रबंधिका

   १. बच्छाव अे. वाय. – ***'महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या कार्याचे मूल्यमापन – विशेष संदर्भ साक्री तालुका (१९७८-७९ ते १९९०-९१)'*** पुणे विद्यापीठ, १९९३

   २. चौधरी विनायक नामदेव – ***'वाडा तालुक्यातील आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था : एक अध्ययन'*** पुणे विद्यापीठ, १९९२

९. वार्षिक आदिवासी उपयोजना (२००४-०५, २००५-०६, २००६-०७)

१०. आदिवासी संशोधन पत्रिका

११. http://www.ilo.org/indigenous

प्रकरण पाचवे

विविध आदिवासी विकास योजना

५.१	प्रस्तावना	१३९
५.२	आदिवासी विकास विभागाची प्रशासकीय यंत्रणा	१४०
५.३	आदिवासी उपयोजनेची उद्दिष्ट्ये	१४४
५.४	आदिवासी विकास विभागाच्या योजना	१५०
	५.४.१ शैक्षणिक विकासाच्या योजना	१५१
	५.४.२ आर्थिक उन्नतीच्या योजना	१५१
	५.४.३ इतर योजना	१५२
५.५	महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या योजना.	१७६
	संदर्भ (References)	१७९

प्रकरण पाचवे
विविध आदिवासी विकास योजना

५.१ प्रस्तावना

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. भारताने लोकशाही शासन पध्दतीचा स्विकार केलेला असून २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अंमलात आली. भारताची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक, राजकीय तसेच धार्मिक परिस्थिती एकसारखी नसल्याने भारताने पूर्णपणे भांडवलशाही व साम्यवादी अर्थव्यवस्थेचा स्विकार न करता मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. त्यामुळे ज्या क्षेत्राचा विकास खाजगी क्षेत्रामार्फत केला जाऊ शकत नाही, अशा क्षेत्राच्या विकासाची जबाबदारी सरकारवर येऊन पडली. स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात येऊ लागले. देशातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, विषमता विचारात घेऊन समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार करण्यात आला.

१९१७ मध्ये झालेल्या रशियन राज्यक्रांतीनंतर रशियाने पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून अल्पावधितच आपला विकास घडवून आणला. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून रशियाने केलेल्या विकासावर प्रभावित होऊन भारतानेही आपला सर्वांगीण विकास करण्यासाठी पंचवार्षिक योजना राबविण्याचा निर्णय घेतला. सन १९५१ पासून पंचवार्षिक योजना राबविण्यात येत असून भारताने आतापर्यंत दहा पंचवार्षिक योजना पूर्ण केल्या आहेत. अकराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी सन २००७-०८ ते २०१२-१३ असा आहे. तसेच तीन वार्षिक योजना राबविण्यात आल्या आहेत. भारताने पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून बऱ्यापैकी आर्थिक विकास साध्य केला आहे.

भारतातील आदिवासी समाज हा अत्यंत मागासलेला आहे. दारिद्र्य, उपासमार, कुपोषण, अज्ञान, अंधश्रध्दा, रोगराई इत्यादींच्या दुष्टचक्रात ते वर्षानुवर्षे अडकलेले आहेत. एकूण आदिवासी जमातींपैकी काही आदिवासी जमाती अत्यंत मागासलेल्या आहेत. त्यांना प्राथमिक अवस्थेतील जमाती (*Primitive Tribes*) म्हणून ओळखले जाते. आदिवासी व इतर मागासलेल्या समाज घटकांच्या विकासाची जबाबदारी घटनेतील तरतुदीनुसार केंद्र सरकार तसेच राज्य सरकारवर टाकण्यात आलेली आहे. राष्ट्रीय पातळीवर आदिवासी जमातींच्या

विकासासाठी सहाव्या पंचवार्षिक योजनेपासून विशेष तरतूद करण्यात येत आहे. तसेच विविध विकास विषयक धोरणे राबविण्यात येत आहेत. आदिवासी जमातींच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी तसेच त्यांचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी केंद्र सरकारमध्ये ऑक्टोंबर १९९९ मध्ये स्वतंत्र आदिवासी विकास मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. या केंद्रीय आदिवासी विकास मंत्रालयामार्फत आदिवासी जमातींच्या विकासासाठी विविध आदिवासी विकास योजना राबविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी विकास विभागाकडे राज्यातील आदिवासी जमातींच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. मध्यवर्ती सरकारच्या आदेशानुसार राज्यातील आदिवासी जमातींच्या विकासासाठी १९७५-७६ साली आदिवासी उपयोजना सुरू करण्यात आली. आदिवासी उपयोजनेतील व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींच्या विकासासाठी राज्य सरकारतर्फे विविध योजना राबविण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासनाने आदिवासींमधील कुपोषण आणि रोगराई घालविण्यासाठी १९९५ साली 'नव संजीवन' योजना सुरू केली आहे. या योजनेचा लाभ संवेदनक्षम आदिवासी क्षेत्रांना मोठ्या प्रमाणावर होत आहे. आदिवासी उप योजनेची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे. आदिवासी विकास विभागाला लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ 'रॅग्नर नर्क्स' यांनी म्हटल्याप्रमाणे 'एखादा माणूस गरीब असतो कारण तो गरीब असतो.' त्याचप्रमाणे, 'एखादा देश किंवा समाज गरीब असतो कारण तो गरीब असतो.' हे दारिद्र्याचे दुष्टचक्र आहे. अशा दारिद्र्याच्या दुष्टचक्रात वर्षानुवर्षे अडकलेल्या आदिवासी समाजाच्या विकासासाठी विशेष उपाययोजनांची आवश्यकता आहे. अशा उपाय योजनां अभावी त्यांचा आधुनिक जगातील प्रवेश अशक्य आहे.

५.२ आदिवासी विकास विभागाची प्रशासकीय यंत्रणा

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर राज्याचा कारभार पाहण्यासाठी शासनाने अनेक विभागांची स्थापना केली. राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागांतर्गत आदिवासी कल्याण हा विभाग १९७२ सालापर्यंत कार्यरत होता. १९७२ साली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. १९७३ साली समाजकल्याण विभागातून आदिवासी कल्याण हा विभाग वेगळा करण्यात आला. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार १९७५-७६ साली महाराष्ट्र राज्यात 'आदिवासी उपयोजना' लागू करण्यात आली. आदिवासी

उपयोजनेमुळे विकास कार्याची दिशा ही केवळ कल्याणकारी न राहता ती विकास योजना अशी करण्यात आली. आदिवासी जमातींचे मागासलेपण विचारात घेऊन फक्त व्यक्तीगत किंवा समूह विकास न करता आदिवासी जमाती ज्या प्रदेशात राहतात त्या प्रदेशांचाही विकास करण्यासाठी नियोजनाची आखणी करण्यात आली. प्रदेश विकास कार्यक्रमांमुळे त्या-त्या आदिवासी भागातील साधनसंपत्तीची वृध्दी होईल व त्याचा फायदा आजूबाजूच्या आदिवासींना होईल असे ठरविण्यात आले. आदिवासींचे जीवन जल, जंगल, जमीन, जंगलातील वनौपजे यावर अवलंबून असते. या घटकांमुळेच त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न सुटत असतो. अशा घटकांचा विकास केल्यास आदिवासींना संपन्न साधन सामग्रीचा फायदा मिळेल असा दृष्टीकोन स्विकारण्यात आला. विविध विकासाच्या योजनांबरोबरच १९७५-७६ पासून प्रदेश विकास कार्यक्रमावर विशेष भर देण्यात येत आहे. समूह तसेच प्रदेश विकास कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा निर्माण करण्यात आली. त्यासाठी संचालक, आदिवासी कल्याण विभाग, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ व संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था अशी राज्यपातळीवर वेगवेगळ्या कामांसाठी प्रशासकीय यंत्रणा उभी करण्यात आली. त्यातूनच पुढे प्रादेशिक व जिल्हा कार्यालये निर्माण झाली व आदिवासी विकासाची स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात आली.

आदिवासी विकासाचा अपेक्षित वेग साध्य झाला नाही. विकासाच्या कार्यक्रमाची परिणामकारकता विशेष परिणामकारक होऊ शकली नाही. राज्यातील अनेक आदिवासी भागात कुपोषणामुळे होणारे बालमृत्यूचे प्रमाण उपयोजना कार्यक्रम आटोक्यात आणू शकले नाही. आदिवासींना पुरेशा रोजगाराचीही उपलब्धता निर्माण होऊ शकली नाही ही परिस्थिती लक्षात घेऊन आदिवासी उपयोजना क्षेत्रात व क्षेत्राबाहेर आदिवासी विकासाच्या योजनांची जलद गतीने व परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने मंत्रालय पातळीवर १९८३ साली प्रथमच 'आदिवासी विकास विभाग' या नावाने स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. परंतु त्याचाही परिणाम आदिवासी उपयोजनेच्या अंमलबजावणीवर विशेषत्वाने दिसून आलेला नाही.

आदिवासी जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी आदिवासी विकास योजनांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करण्यासाठी, आदिवासी विभागांत असलेला असमतोल दूर करून सुसूत्रता साधण्यासाठी व आदिवासी विकास विभागाचे सर्वप्रकारे बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने आदिवासी विकास विभागातील प्रशासकीय यंत्रणेची

जानेवारी ११९२ मध्ये पुनर्रचना केली. या पुनर्रचनेनुसार संपूर्ण राज्यासाठी आयुक्तांचे नवीन पद निर्माण करण्यात आले. राज्याच्या आदिवासी विकास विभागाची चार विभागांत विभागणी करण्यात आली. त्यानुसार ठाणे, नाशिक, नागपूर व अमरावती या ठिकाणी अप्पर आयुक्तांची नवीन चार विभागीय कार्यालये निर्माण केली. या चार विभागीय कार्यालयांच्या अंतर्गत एकूण चोवीस प्रकल्प कार्यालयांची स्थापना करण्यात आली असून वीस प्रकल्प कार्यालये आदिवासी उपयोजना क्षेत्रात आहेत. उर्वरित चार प्रकल्प कार्यालये आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर आहेत.

प्रशासकीय यंत्रणा

आदिवासी विकास विभागाचे प्रशासन प्रभावी व गतिमान होण्याच्या हेतूने दि. १५ जानेवारी, १९९२ पासून आदिवासी विकास विभागाची पुनर्रचना करण्यात आलेली आहे. या विभागाचा नवीन आकृतीबंध खालीलप्रमाणे ठरविण्यात आलेला आहे.

मंत्री, आदिवासी विकास विभाग

सचिव, आदिवासी विकास विभाग

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे. उपसंचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती पुणे, नाशिक व नागपूर	महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक. प्रादेशिक कार्यालये (८) उपप्रादेशिक कार्यालये (३३)	आयुक्त आदिवासी विकास. अप्पर आयुक्त आदिवासी विकास (४) नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर. प्रकल्प अधिकारी (२४)

वरीलप्रमाणे राज्यातील आदिवासी विकास विभागाचे नियंत्रण केले जाते. त्याचप्रमाणे राज्य सरकारमधील इतर विभागांमार्फतही अनेक योजना राबविल्या जातात. राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या प्रशासकीय यंत्रणेचे विस्तृत स्वरूप पुढीलप्रमाणे.


आदिवासी विकास विभागाची प्रशासकीय यंत्रणा
सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, मर्यादित, नाशिक
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर
१ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. गोरेगाव, मुंबई
२ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. जव्हार, विक्रमगड, मोखाडा, वाडा,
३ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. डहाणू, पालघर,वसई,तलासरी
४ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. शहापूर, उल्हासनगर, भिवंडी, कल्याण, मुरबाड
५ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. पेण रायगड,रत्नागिरी, सिंधुदुर्ग
६ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. घोडेगांव, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर
७ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. नाशिक, पेठ,दिंडोरी,सिन्नर, इगतपूरी,देवळा,निफाड
८ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. कळवण, नांदगाव,मालेगाव, चांदवड,सरगाणा
९ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. राजूर, अहमदनगर जिल्हा
१० प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. तळोदा शहादा, अक्कलकुवा, अक्राणी,
११ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. नंदुरबार, साक्री, नवापूर,शिरपूर, सिंधखेडा, धळे
१२ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. यावल जळगाव जिल्हा
१३ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. अकोला, बुलढाणा, वाशिम
१४ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. धारणी अमरावती जिल्हा
१५ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र.पांढरकवडा यवतमाळ जिल्हा
१६ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. किनवट, नांदेड,परभणी,हिंगोली
१७ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र.औरंगाबाद, पूर्ण जिल्हे, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर व उस्मानाबाद
१८ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. नागपूर, पूर्ण जि.नागपूर,वर्धा
१९ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. चिमूर वरोला,भद्रावती, ब्रम्हपरी, नागभिड
२० प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र.चंद्रपूर,मूल सिंदेवाही, गोडपिंप्री
२१ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. देवरी, भंडारा व गोंदिया
२२ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र. गडचिरोली धानोरा,कुरखेडज,चामोशी आरमोरी, देसाईगंज
२३ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र.अहेरी, सिरोंचा, मूलखेडा
२४ प्रकल्प अधिकारी ए.आ.वि.प्र.भामरागड, भामरागड, एटापल्ली
उपसंचालक, अ.ज.जा.प्र.त.समिती, पुणे
उपसंचालक, अ.ज.जा.प्र.त.समिती, ठाणे
उपसंचालक, अ.ज.जा.प्र.त.समिती, नाशिक
उपसंचालक, अ.ज.जा.प्र.त.समिती, औरंगाबाद
उपसंचालक, अ.ज.जा.प्र.त.समिती, अमरावती
उपसंचालक, अ.ज.जा.प्र.त.समिती, नागपूर

५.३ आदिवासी उपयोजनेची उद्दिष्ट्ये

देशातील आदिवासींची सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन मध्यवर्ती सरकारने आदिवासी समाजाच्या विकासासाठी एकात्मिक क्षेत्र विकास पध्दतीचा अवलंब केला आहे. या पध्दतीनुसार १९७५-७६ साली 'आदिवासी उपयोजना' तयार करण्याचे मार्गदर्शन राज्य सरकारला करण्यात आले. केंद्र सरकारच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र शासनाने 'आदिवासी उपयोजना' तयार केली. ही योजना १९७५-७६ साली राज्याला लागू करण्यात आली. आदिवासी जमातींची वस्ती असलेल्या राज्यातील १५ जिल्ह्यांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला. ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा इत्यादी हे ते जिल्हे होत. या १५ जिल्ह्यांतील ७३ तालुक्यांमधील ६७६७ गावांचा 'आदिवासी उपयोजनेत' समावेश करण्यात आलेला आहे.

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्या ९,६८,७९,००० इतकी आहे. आदिवासींची लोकसंख्या ८५,७७,२७६ इतकी आहे. एकूण लोकसंख्येशी आदिवासी लोकसंख्येचे असलेले प्रमाण ८.८५ टक्के आहे. महाराष्ट्र राज्यातील एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी ६९ टक्के आदिवासी लोकसंख्या उपयोजना क्षेत्रात समाविष्ट करण्यात आलेली आहे. ही लोकसंख्या राज्यातील १५ जिल्ह्यांतील आदिवासी उपयोजना क्षेत्रात विखुरलेली आहे. या क्षेत्रातील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्के पेक्षा जास्त आहे. त्याचप्रमाणे आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्के पेक्षा जास्त असलेल्या खेड्यांच्या समूहाला 'माडा' (*MADA – Modified Area Development Approach*) म्हणजेच 'सुधारित क्षेत्र विकास पध्दती' असे म्हटले जाते. लहान खेड्यांचा समूह ज्याला 'मिनी माडा' (*Mini MADA*) असे म्हणतात. माडा व मिनी माडा क्षेत्रात राज्यातील ६ टक्के आदिवासी राहतात. उर्वरित आदिवासींची लोकसंख्या ही आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर आहे.

तक्ता क्र. ५.१
महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार

अ.क्र.	जिल्हा	आदिवासी लोकसंख्या २००१					
		आ.उ. क्षेत्रातील (टीएसपी)	अति.आ.उ. क्षेत्रातील (अेटीएसपी)	माडा क्षेत्रातील (माडा)	मिनीमाडा क्षेत्रातील (मिनीमाडा)	आ.उ. बाह्य क्षेत्रातील (ओटीएसपी)	एकूण आदिवासी लोकसंख्या
१.	ठाणे	९६७५४२	-	-	४३४१	२२७४०७	११९९२९०
२.	रायगड	-	६६१६	३१७५९	१७९२१	२१२८२८	२६९१२४
३.	नाशिक	६६५७२४	१४००	१२३४८	१२९०४	५०१८९५	११९४२७१
४.	नंदूरबार (तळोदा)	७३८०४७	-	-	-	१२१५२७	८५९५७४
५.	धुळे (नंदूरबार)	३०९१६२	४६६०	-	-	१२९७४२	४४३५६४
६.	जळगांव	४२९१८	-	-	-	३९३०३३	४३५९५१
७.	अहमदनगर	९०६९१	३७५०	-	४८७१	२०३९४३	३०३२५५
८.	पुणे	६८९४३	९७६	१२६२९	४९६२	१७४२१२	२६१७२२
९.	नांदेड	४४२९८	-	१४७४०	१३६३९	१८०९१९	२५३५९६
१०.	अमरावती	१८३२३५	-	१८८४९	७९७६	१४६४७३	३५६५३३
११.	यवतमाळ	८६९५९	४२१००	४३३५१	८८७२	२९२०८८	४७३३७०
१२.	नागपूर	-	१०८०३	५०४८४	३२५०	३७९९०४	४४४४४१
१३.	भंडारा	-	३१५०२	९५३३	-	५६६८३	९७७१८
१४.	चंद्रपूर	५०५६६	८१२२६	९४८९२	१९२०६	१२९३६६	३७५२५६
१५.	गडचिरोली	३२५१८८	९०५४	-	-	३७४५४	३७१६९६
१६.	हिंगोली	-	-	२९९२३	१६०९७	४०८७८	८६८९८
१७.	बुलढाणा	-	-	१८४२६	४८९८	९१८३२	११५१५६
१८.	वाशिम	-	-	१२१६८	-	५८८१९	७०९८७
१९.	अकोला	-	-	२९७४५	६९४४	६३३९९	१०००८८
२०.	वर्धा	-	-	७८४८	८९५३	१३७६१४	१५४४१५
२१.	गोंदिया	-	-	७४९३२	-	१२१५२३	१९६४५५
२२.	रत्नागिरी	-	-	-	-	२०१०२	२०१०२
२३.	सिंधुदुर्ग	-	-	-	-	४९५२	४९५२

तक्ता क्र. ५.१ पान क्र. १४३ वरून पुढे

२४.	सातारा	-	-	-	-	२१८९६	२१८९६
२५.	सांगली	-	-	-	-	१७८५५	१७८५५
२६.	सोलापूर	-	-	-	-	६८९८९	६८९८९
२७.	कोल्हापूर	-	-	-	-	२१३८७	२१३८७
२८.	औरंगाबाद	-	-	-	-	१००४१६	१००४१६
२९.	जालना	-	-	-	-	३२१०३	३२१०३
३०.	बीड	-	-	-	-	२४१९३	२४१९३
३१.	परभणी	-	-	-	-	३५२१०	३५२१०
३२.	उस्मानाबाद	-	-	-	-	२७८५७	२७८५७
३३.	लातूर	-	-	-	-	४७८३६	४७८३६
३४.	मुंबई उपनगर	-	-	-	-	२०६६६	२०६६६
३५.	बृहन्मुबई	-	-	-	-	७०४५४	७०४५४
	एकूण	३५७३२७३	१९२०८७	४६१६२७	१३४८३४	४२१५४५५	८५७७२७६

संदर्भ :- वार्षिक आदिवासी उपयोजना, २००४-०५ पान क्र. ४६४-६५

तक्ता क्र. ५.१ मध्ये २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येची जिल्हानिहाय विभागणी दर्शविली आहे. आदिवासी विकास विभागाने आदिवासी लोकसंख्येची विभागणी अदिवासी उपयोजना क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र, माडा क्षेत्र, मिनीमाडा क्षेत्र व आदिवासी उपयोजना बाहेरील क्षेत्र अशा पाच भागात केलेली आहे. योजना अंमलबजावणी व प्रशासनाच्यादृष्टीने अशी विभागणी करण्यात आलेली आहे.

तक्ता क्र. ५.१ नुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रात सर्वाधिक लोकसंख्या ठाणे (९,६७,५४२) जिल्ह्यात राहते व सर्वात कमी लोकसंख्या जळगांव (४२९१८) जिल्ह्यात राहते. अ.आ.उ.यो. क्षेत्रात सर्वाधिक लोकसंख्या चंद्रपूर (८१२२६) जिल्ह्यात राहते व सर्वात कमी लोकसंख्या पुणे (९७६) जिल्ह्यात राहते. माडा क्षेत्रातील सर्वाधिक लोकसंख्या चंद्रपूर (९४८९२) जिल्ह्यात राहते व सर्वात कमी लोकसंख्या वर्धा (७८४८) जिल्ह्यात राहते. मिनीमाडा क्षेत्रातील सर्वाधिक लोकसंख्या चंद्रपूर (१९२०६) जिल्ह्यात राहते व सर्वात कमी लोकसंख्या नागपूर (३२५०) जिल्ह्यात राहते. आ. उ. बाह्य क्षेत्रातील सर्वाधिक लोकसंख्या नाशिक (५०१८९५) जिल्ह्यात राहते व सर्वात कमी लोकसंख्या सिंधुदुर्ग (४९५२) जिल्ह्यात

राहते. सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या ठाणे (११९९२९०) जिल्ह्यात राहते व सर्वात कमी आदिवासी लोकसंख्या सिंधुदुर्ग (४९५२) जिल्ह्यात राहते.

महाराष्ट्रात आ. उ. यो. क्षेत्रात एकूण ३५७३२७३ लोकसंख्या राहते. अ. आ. उ. यो. क्षेत्रात एकूण १९२०८७ लोकसंख्या राहते. माडा क्षेत्रात एकूण ४६१६२७ लोकसंख्या राहते. मिनीमाडा क्षेत्रात एकूण १३४८३४ लोकसंख्या राहते. आ. उ. बाह्य क्षेत्रात एकूण ४२१५४५५ इतकी लोकसंख्या राहते. संपुर्ण महाराष्ट्रात सर्व क्षेत्रात मिळून एकूण ८५७७२७६ इतकी लोकसंख्या राहते. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, मुंबई उपनगर व बृहन्मुंबई या जिल्ह्यांत आ. उ. यो. क्षेत्र, अति. आ. उ. यो. क्षेत्र, माडा क्षेत्र, मिनीमाडा क्षेत्र या चारही क्षेत्रात आदिवासी लोकसंख्या आढळत नाही. हे सर्व जिल्हे पूर्णपणे बिगर आदिवासी जिल्हे म्हणून ओळखले जातात.

महाराष्ट्र राज्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची सर्वसाधारण टक्केवारी ३५ टक्के आहे परंतु आदिवासी कुटुंबांची दारिद्र्य रेषेखालील संख्या ६७ टक्के इतकी आहे. आदिवासी उ. यो. क्षेत्रात ती ९०.११ टक्के आहे. आदिवासी उपयोजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांमार्फत दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबांना पुढील १० ते १५ वर्षात दारिद्र्य रेषेच्या वर आणण्याचे आदिवासी विकास विभागाचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार आदिवासी उपयोजनेची पुढीलप्रमाणे उद्दिष्ट्ये ठरविण्यात आलेली आहेत.

अ) सर्व स्तरांवर होणारे आदिवासींचे शोषण थांबविणे व त्याकरिता प्रभावी योजना आखणे.

ब) समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आदिवासी समाज अलग पडलेला आहे. त्याला मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे. त्याकरिता दळणवळणाची साधने वाढविणे. शैक्षणिक विकास घडविणे व शास्त्रीय उत्पादन पध्दतीची माहिती करून देणे.

क) आदिवासींमध्ये आत्मविश्वासाचा अभाव आहे. त्यांच्यावर होणारा अन्याय व शोषण यांमुळे त्यांच्या जीवनात उदासीनता आहे. ती दूर करण्यासाठी आदिवासी तरूणांना व त्यांच्यातील नव्या नेतृत्वाला स्वतःचा विकास करण्याचा आत्मविश्वास निर्माण करण्याचे शिक्षण देणे.

ड) तोट्यात जाणारी आदिवासींची शेती किफायतशीर होऊ शकेल अशी उपाययोजना करणे व त्यायोगे आदिवासींचे जीवनमान उंचावणे.

इ) आदिवासी विभागांत शेती व्यवसायाला पूरक धंदयांचा अभाव आहे. तो दूर करणे.

ई) आदिवासींना लागणारा कर्जपुरवठा सहकारी पध्दतीने करणे व त्यासाठी सहकारी संस्थांचे जाळे पसरून त्याद्वारे पतपुरवठा करणे, आदिवासींच्या शेतीमालाला योग्य भाव मिळवून देणे व त्यांच्या दैनंदिन गरजा भागविणे.

वरील उद्दिष्ट्ये आदिवासी उपयोजनेत स्पष्ट करण्यात आलेली आहेत. ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आदिवासी उपयोजना क्षेत्राच्या अंमलबजावणीसाठी १) सह्याद्री विभाग व २) गोंडवन विभाग असे दोन विभाग करण्यात आले होते. सध्या मागे स्पष्ट केलेल्या प्रशासकीय यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना राबविण्यात येते.

आदिवासी उपयोजना क्षेत्राचा पायाभूत विकास घडवून आणण्यासाठी व आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींचे जीवनमान सुधारण्याच्या उद्देशाने स्वतंत्र आदिवासी उपयोजना राबविण्यात येत आहे. त्याकरिता एकूण नियत व्ययाच्या सुमारे ७५ टक्के व्यय हा आदिवासी उपयोजना क्षेत्रात खर्च केला जातो. त्यामध्ये माडा व मिनीमाडा क्षेत्राचाही समावेश असतो. उर्वरित नियतव्यय राज्याच्या एकूण नियतव्ययाच्या उद्दिष्टांच्या टक्केवारीच्या अनुसार आदिवासी उपयोजनेला निधी उपलब्ध करून दिला जातो. तसेच बिगर आदिवासी क्षेत्रातील आदिवासींच्या कल्याणासाठी उपयोगात आणला जातो. आदिवासी उपयोजनेतील जवळजवळ ९० टक्के व्यय हा शासनाच्या विविध विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांवर खर्च केला जातो.

तक्ता क्र. ५.२
महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकूण अनुसूचित जमातींची कुटुंबे व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे

अ.क्र.	एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प	अनुसूचित जमातींची कुटुंबे		दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची टक्केवारी (स्तंभ ४ ची स्तंभ ३ शी)	एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
		एकूण	दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे		
१	२	३	४	५	६
१.	ठाणे (डहाणू)	६६४४७	५९५९५	८९.६९	ठाणे (डहाणू)
२.	ठाणे (जव्हार)	४६५५६	४०९३९	८७.९३	ठाणे (जव्हार)
३.	ठाणे (शहापूर)	२२२६०	१९७४३	८८.६९	ठाणे (शहापूर)
४.	रायगड (पेण)	९९२९	९३९६	९४.६३	रायगड (पेण)
५.	नाशिक (कळवण)	४०४४६	३६७१७	९०.७८	नाशिक (कळवण)
६.	नाशिक (त्र्यंबक)	५८०१९	५२७७६	९०.९६	नाशिक (त्र्यंबक)
७.	धुळे (तळोदा)	६९६२२	६६३०५	९५.२४	धुळे (तळोदा)
८.	धुळे (नंदूरबार)	९१५८८	८३४९६	९१.१६	धुळे (नंदूरबार)
९.	जळगांव (यावल)	५९३५	५४७९	९२.३२	जळगांव (यावल)
१०.	अहमदनगर (राजूर)	१३२०८	११४८६	८६.९६	अहमदनगर (राजूर)
११.	पुणे (घोडेगांव)	१४३४०	१२०४२	८३.९७	पुणे (घोडेगांव)
१२.	नांदेड (किनवट)	२०२८८	१७८३७	८७.९२	नांदेड (किनवट)
१३.	अमरावती (अकोला)	९३७८	८६९२	९२.६९	अमरावती (अकोला)
१४.	अमरावती (धारणी)	२७३२६	२३९७७	८७.७४	अमरावती (धारणी)
१५.	नागपूर (रामटेक)	१५११०	१३७१८	९०.७९	नागपूर (रामटेक)
१६.	गोंदिया (देवरी)	२००९०	१८३९६	९१.५७	गोंदिया (देवरी)
१७.	यवतमाळ (पांढरकवडा)	३६५६१	३३५६२	९१.७९	यवतमाळ (पांढरकवडा)
१८.	चंद्रपूर (राजूरा)	२८६८२	२६२८७	९१.६५	चंद्रपूर (राजूरा)
१९.	चंद्रपूर (चिमूर)	११०९१	१०१६५	९१.६५	चंद्रपूर (चिमूर)
२०.	गडचिरोली (एटापल्ली)	१२४४५	११७७२	९४.५९	गडचिरोली (एटापल्ली)
२१.	गडचिरोली (धानोरा)	५४१३	४९२१	९०.९१	गडचिरोली (धानोरा)
२२.	भामरागड	११८४६	१०८३५	९१.४७	भामरागड
	राज्य एकूण आ.उ.यो.	६३६५८०	५७८१३६	९१.११	राज्य एकूण आ.उ.यो.

टिप: कंसातील शब्द एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे नाव दर्शवितात

संदर्भ: वार्षिक आदिवासी उपयोजना (२००४-०५) पान क्र. ४४७

तक्ता क्र. ५.२ मध्ये महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकूण अनुसूचित जमातीची (आदिवासी) कुटुंबे व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे सर्वाधिक प्रमाण धुळे (तळोदा) जिल्ह्यात ९५.२४ टक्के आहे. त्यानंतर अनुक्रमे रायगड (पेण) ९४.६३ टक्के, गडचिरोली (एटापल्ली) ९४.५९ टक्के, अमरावती (अकोला) ९२.६९ टक्के, जळगांव (यावल) ९२.३२ टक्के या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. उर्वरित जिल्ह्यांत दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ८३ टक्के ते ९२ टक्केच्या दरम्यान आहे. महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे सरासरी प्रमाण ९१.११ टक्के इतके आहे. वरील तालिकेतील आकडेवारीवरून आदिवासींच्या भिषण दारिद्र्याची कल्पना येते.

आदिवासी आर्थिक स्थिती सुधारणा कायदा, १९७६

आदिवासी क्षेत्रातील लोकांची सामाजिक व आर्थिक स्थिती लक्षात घेऊन त्यांचे जीवनमान सुधारणे तसेच आदिवासी व बाहेरील क्षेत्रातील प्रगतीच्या स्तरांतील अंतर कमी करणे हे आदिवासी उपयोजनेचे उद्दिष्ट आहे. आदिवासी क्षेत्रात सावकारी व सौदेबाजी अस्तित्वात असल्यामुळे पिळवणूक करणाऱ्या प्रथा दूर करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र आदिवासी आर्थिक स्थिती सुधारणा कायदा, १९७६' हा एक व्यापक स्वरूपाचा कायदा अधिनियमीत केला आहे. या कायद्यान्वये आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासींना भूतपूर्व कर्जांतून मुक्त करण्यात आले. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील सावकार व व्यापारी यांना दूर केल्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी बहुउद्देशीय आदिवासी सेवा सहकारी सोसायट्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. आतापर्यंत २७५ आदिवासी सहकारी सोसायट्या स्थापन करण्यात आल्या आहेत. तसेच आदिवासींची व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अन्नधान्य व किरकोळ जंगल उत्पादन यांची एकाधिकार खरेदी योजना सुरू केलेली आहे.

५.४ आदिवासी विकास विभागाच्या योजना

भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वांनुसार राज्यातील दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती/ आदिवासी लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घेण्याची तसेच त्यांची सामाजिक अन्याय व इतर पिळवणूकीपासून संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आलेली आहे. या

मार्गदर्शक तत्वांस अनुसरून राज्य शासन आदिवासी जमातींच्या विकासासाठी विविध योजना राबवित आहे. आदिवासी उपयोजनेत अनेक कल्याणकारी योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. या योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी तसेच या योजना यशस्वी होण्यासाठी अंदाजपत्रकात भरीव तरतूद केली जाते. राज्य सरकार आदिवासी उपयोजनेअंतर्गत शैक्षणिक विकासाच्या योजना, आर्थिक उन्नतीच्या योजना तसेच इतर योजना राबवित आहे. त्याचप्रमाणे शासन इतर विभागांमार्फतही अनेक योजना राबवित आहे. त्यामध्ये जिल्हा परिषद, पंचायत समिती, स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा विशेषत्वाने समावेश होतो.

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत पुढील योजना राबविण्यात येतात.

५.४.१ (अ) शैक्षणिक विकासाच्या योजना

१) शासकीय आश्रमशाळा समूह योजना.
२) स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य.
३) आदर्श आश्रमशाळा.
४) आदिवासी मुला-मुलींची शासकीय वसतिगृहे.
५) अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) विद्यार्थ्यांना शालान्त परिक्षोत्तर शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती)
६) अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करणे – योजना.
७) व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता देण्याची योजना.
८) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना.

५.४.२ (ब) आर्थिक उन्नतीच्या योजना

१) अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) शेतकऱ्यांना वीज पंप/तेलपंप पुरवठा योजना.
२) अनुसूचित जमातीच्या (आदिवासी) लोकांना घरावरील गवती छपरांऐवजी मंगलोरी कौले किंवा पन्हाळी पत्रे टाकण्याकरिता अर्थसहाय्य योजना.
३) केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना.
४) मोटार वाहनचालक प्रशिक्षण केंद्र योजना.
५) आदिवासी युवकांना पोलीस व लष्कर भरतीपूर्व प्रशिक्षण योजना.

६) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना.

७) स्वयंरोजगारासाठी कर्जपुरवठा योजना.

५.४.३ (क) इतर योजना

१) मागासवर्गीयांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य.

२) खावटी कर्ज योजना.

३) धान्य कोष योजना.

४) आदिवासी जमातीच्या उमेदवारांसाठी सेवायोजन नोंदणी.

५) आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना/संस्थांना आदिवासी सेवक/संस्था पुरस्कार.

६) आदिवासी हस्तकला प्रदर्शन.

७) आदिवासी पारंपारिक नृत्यस्पर्धा.

८) वारली चित्रकला स्पर्धा.

९) आदिवासी युवकांकरिता नेतृत्व प्रशिक्षण व स्पर्धापूर्व प्रशिक्षण योजना.

साक्षरतेचे प्रमाण व शैक्षणिक विकासाच्या योजना

तक्ता क्र. ५.३
सन २००१ च्या जनगणनेनुसार सर्वसामान्य व आदिवासी साक्षरतेचे प्रमाण

अ.क्र.	जिल्हा	सर्वसाधारण			आदिवासी		
		पुरुष	स्त्री	एकूण	पुरुष	स्त्री	एकूण
	महाराष्ट्र राज्य	८६.६	६७.०	७६.०८	६७.०२	४३.०८	५५.५
१.	मुंबई उपनगर	९१.६	८१.१	८६.४	८५.७	६६.७	७६.२
२.	बृहन्मुबई	९०.२	८१.४	८५.८	८६.८	७३.६	८०.२
३.	रायगड	८६.१	६७.७	७७.०	५५.५	३४.४	४५.०
४.	ठाणे	८७.१	७३.१	८०.१	५९.३	३४.५	४६.९
५.	रत्नागिरी	८५.९	६५.८	७५.८५	६२.७	३९.०	५०.८५
६.	सिंधुदुर्ग	९०.३	७१.२	८०.७	८२.५	६५.२	७३.९
७.	नाशिक	८३.६	६४.४	७४.०	६२.५	३८.६	५०.६
८.	नंदूरबार	६६.२	४५.२	५५.७	५२.७	३२.२	४२.५
९.	धुळे	८१.४	६१.४	७१.४	५६.५	३५.०	४५.८
१०.	जळगांव	८५.९	६४.३	७५.१	६५.१	३८.६	५१.९
११.	अहमदनगर	८५.७	६४.३	७५.०	६७.२	४०.२	५३.७

तक्ता क्र. ५.३ पान क्र. १५२ वरून पुढे

१२.	पुणे	८८.३	७१.९	८०.१	७४.६	४९.२	६२.०
१३.	सातारा	८८.२	६८.४	७८.३	७४.५	५५.२	६४.८५
१४.	सांगली	८६.३	६६.७	७६.५	८४.५	६२.७	७३.६
१५.	सोलापूर	८२.०	५९.८	७०.९	७६.७	४९.९	६३.३
१६.	कोल्हापूर	८७.५	६६.०	७६.८	८५.८	६४.०	७५.०
१७.	औरंगाबाद	८४.९	६०.१	७२.५	६७.६	४०.३	५४.०
१८.	जालना	७९.१	४९.०	६४.५	६९.४	४१.३	५५.४
१९.	परभणी	७९.६	५२.०	६५.८	७४.२	४३.१	५८.७
२०.	हिंगोली	८०.७	५१.२	६५.९	७२.३	४०.१	५६.२
२१.	बीड	८०.७	५४.५	६७.६	७२.३	४६.९	६०.०
२२.	नांदेड	८०.४	५४.३	६७.४	७३.९	४५.३	५९.६
२३.	उस्मानाबाद	८०.४	५६.९	६८.७	७१.२	४४.५	५८.०
२४.	लातूर	८२.९	५९.४	७१.५	७८.१	५१.६	६५.०
२५.	बुलढाणा	८६.९	६४.१	७५.५	७१.३	४२.७	५७.०
२६.	अकोला	८८.९	७३.४	८१.२	८१.५	५८.८	७०.५
२७.	वाशिम	८५.४	६०.६	७३.०	७४.७	४४.८	५९.७
२८.	अमरावती	८८.९	७५.७	८२.३	७५.३	५२.४	६४.०
२९.	यवतमाळ	८४.१	६२.५	७३.३	७४.३	४९.५	६२.०
३०.	वर्धा	८७.२	७२.५	७९.७	७८.४	५९.३	६८.८
३१.	नागपूर	९०.२	७७.४	८३.८	८४.५	६६.९	७५.७
३२.	भंडारा	८९.०	६७.८	७८.४	८५.९	६०.५	७३.२
३३.	गोंदिया	८९.६	६७.६	७८.६	८३.८	५६.१	६९.०
३४.	गडचिरोली	७१.९	४८.१	६०.०	६०.७	३७.१	४९.०
३५.	चंद्रपूर	८२.९	६२.९	७३.०	७६.०	५२.४	६४.२

संदर्भः वार्षिक आदिवासी उपयोजना (२००४-२००५) पान क्र. ४३७

तक्ता क्र. ५.३ मध्ये सन २००१ च्या जनगणनेनुसार सर्वसामान्य व आदिवासी साक्षरतेचे प्रमाण दर्शविले आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यातील सर्वसाधारण लोकसंख्येच्या साक्षरतेचे प्रमाण ७६.८ टक्के आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरतेचे प्रमाण ८६.६ टक्के आहे तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ६७ टक्के आहे. महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येच्या एकूण साक्षरतेचे प्रमाण ५५.५ टक्के आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरतेचे प्रमाण ६७.०२ टक्के आहे तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण फक्त ४३.०८ टक्के आहे. सर्वसाधरण व आदिवासी लोकसंख्येच्या साक्षरतेचा विचार करता आदिसींच्या साक्षरतेचे प्रमाण खुपच कमी आहे. पुरुष साक्षरतेपेक्षा स्त्री साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

२००१ च्या जनणनेनुसार सर्वसाधारण लोकसंख्येच्या एकूण साक्षरतेचे सर्वाधिक प्रमाण मुंबई उपनगरे (८६.४ टक्के) येथे आहे. त्यानंतर अनुक्रमे मुंबई (८५.८ टक्के), नागपूर (८४), अमरावती (८२.३ टक्के), अकोला (८१.२ टक्के), ठाणे (८०.१ टक्के), सिंधुदुर्ग (८०.७ टक्के) व वर्धा (७९.७ टक्के) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी साक्षरतेचे प्रमाण गडचिरोली (६०.० टक्के) या जिल्ह्यात आहे. सर्वसाधारण पुरुष साक्षरतेचा विचार करता सर्वाधिक साक्षरता प्रमाण मुंबई उपनगरे (९१.६) येथे आहे. त्यानंतर सिंधुदुर्ग (९०.३), मुंबई (९०.२), नागपूर (९०.२), गोंदिया (८९.६) व भंडारा (८९.०) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी पुरुष साक्षरता गडचिरोली (७१.९) या जिल्ह्यात आहे. सर्वसाधारण स्त्री साक्षरतेचे सर्वाधिक प्रमाण मुंबई (८१.४) शहरात आहे. त्यानंतर अनुक्रमे मुंबई उपनगरे (८१.१), नागपूर (७७.४), अमरावती (७१.९), अकोला (७३.४), ठाणे (७३.१) व वर्धा (७२.५) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वसाधारण स्त्री साक्षरतेचे सर्वात कमी प्रमाण गडचिरोली (४८.१) या जिल्ह्यात आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येच्या सर्वाधिक साक्षरतेचे प्रमाण मुंबई (८०.२) येथे आहे. त्यानंतर अनुक्रमे मुंबई उपनगरे (७६.२), नागपूर (७५.७), कोल्हापूर (७५.०), सांगली (७३.६) भंडारा (७३.२) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. आदिवासी लोकसंख्येच्या सर्वात कमी साक्षरतेचे प्रमाण नंदूरबार (४२.५) या जिल्ह्यात आहे. आदिवासी पुरुष साक्षरतेचे सर्वाधिक प्रमाण मुंबई शहर (८६.८) येथे आहे. त्यानंतर अनुक्रमे भंडारा (८५.९), कोल्हापूर (८५.८), मुंबई उपनगरे (८५.७), नागपूर (८४.५), सांगली (८४.५) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. आदिवासी पुरुष साक्षरतेचे सर्वात कमी प्रमाण नंदूरबार (५२.७) या जिल्ह्यात आहे. आदिवासी स्त्री साक्षरतेचे सर्वाधिक प्रमाण मुंबई (७३.६) येथे आहे. त्यानंतर अनुक्रमे नागपूर (६६.९), मुंबई उपनगर (६६.७), सिंधुदुर्ग (६५.२) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. आदिवासी स्त्री साक्षरतेचे सर्वात कमी प्रमाण नंदूरबार (३२.२) या जिल्ह्यात आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार आदिवासींची साक्षरता सर्व साधारण साक्षरतेपेक्षा कितीतरी प्रमाणात कमी आहे. आदिवासी पुरुष साक्षरतेपेक्षा स्त्री साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे.

५.४.१ (अ) शैक्षणिक विकासाच्या योजना

१) शासकीय आश्रमशाळा समूह योजना

भारतीय संविधानाच्या कलम ४६ प्रमाणे शासनावर अनुसूचित जमातीच्या/आदिवासी लोकांसाठी शिक्षणाच्या व आर्थिक उन्नतीच्या दृष्टीकोनातून खास जबाबदारी टाकण्यात आलेली आहे. आदिवासी जमातींमध्ये निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे आहे. महाराष्ट्रात आदिवासी जमातींचे साक्षरतेचे प्रमाण १९६१ च्या जनगणनेनुसार फक्त ७.२१ टक्के होते. तर एकूण साक्षरतेचे प्रमाण २९.८२ टक्के होते. १९७१ च्या जनगणनेनुसार आदिवासी जमातींच्या साक्षरतेचे प्रमाण ११.७४ टक्के होते. तर एकूण साक्षरतेचे प्रमाण ३९.१३ टक्के होते. म्हणजेच एकूण साक्षरता व आदिवासींची साक्षरता यात फार मोठी तफावत होती. शिक्षण हा आदिवासी विकासाचा पाया समजून महाराष्ट्र शासनाने १९७२ पासून आश्रमशाळा समूह योजना सुरू केली.

डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींची सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रगती व्हावी हा समूह आश्रमशाळा सुरू करण्यामागचा उद्देश आहे. डोंगराळ भागात आदिवासी जमातींची ५००० ते ७००० लोकसंख्या असलेल्या विभागात आश्रमशाळा सुरू करण्यात येते. आश्रमशाळा समूहात शाळा आणि वसतिगृह यांचा समावेश असतो. इयत्ता १० वी पर्यंत वर्ग असलेल्या आश्रमशाळेस पोस्ट-बेसिक आश्रमशाळा असे म्हणतात. आश्रमशाळेत शिकणाऱ्या मुलांची राहण्याची व जेवणाची मोफत सोय केली जाते. तसेच वह्या-पुस्तके, शालेय साहित्य, वैद्यकीय मदत दिली जाते. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्यात १११४ निवासी आश्रमशाळा आहेत. त्यापैकी ५६० शासकीय आश्रमशाळा, २ आदर्श आश्रमशाळा, १३ इंग्रजी माध्यमाच्या निवासीशाळा शासनाकडून चालविण्यात येतात. उर्वरित ५५४ आश्रमशाळा स्वेच्छा संस्थांमार्फत चालविल्या जातात. शासकीय आश्रमशाळांमध्ये सुमारे २ लाख मुले-मुली मोफत शिक्षण घेत आहेत. अतिमागासलेल्या जमातींच्या मुलांना प्राधान्याने प्रवेश दिला जातो. त्यानंतर दारिद्र्य रेषेखालील, गरीब कुटुंबातील, शेतमजूर, भूमिहीन व लहान शेतकरी कुटुंबातील आदिवासी मुलांना प्राधान्य दिले जाते.

२) स्वेच्छा संस्थांना आश्रमशाळा चालविण्यास अर्थसहाय्य

आदिवासी जमातींच्या शैक्षणिक विकासाकरिता अनेक स्वेच्छा संस्था कार्यरत आहेत. अशा संस्थांमार्फत स्थापन करण्यात आलेल्या आश्रमशाळांना १९५३-५४ पासून अनुदान देण्यात येत आहे. या आश्रमशाळांत आदिवासी विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य व इतर सवलती मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. अशा आश्रमशाळा चालविण्यासाठी स्वेच्छा संस्थांना सरकारकडून विहित प्रमाणात अनुदान दिले जाते. स्वेच्छा संस्थांमार्फत अनुदान तत्वावर ५५४ आश्रमशाळा चालविण्यात येत आहेत. अशा अनुदानित आश्रमशाळांमध्ये सध्या १ लाख ७७ हजार मुले-मुली शिक्षण घेत आहेत.

३) आदर्श आश्रमशाळा

महाराष्ट्र शासनातर्फे चालविण्यात येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा तसेच स्वेच्छा संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळांमधील हुशार आदिवासी विद्यार्थ्यांची निवड करून अशा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाकडे विशेष लक्ष देणे हा आदर्श आश्रमशाळा सुरू करण्यामागे सरकारचा उद्देश आहे. आदर्श आश्रमशाळांमुळे आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक विकासासाठी स्पर्धा निर्माण होऊन त्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. तसेच त्यांना विविध क्षेत्रातील उच्च पदावर पोहोचण्यासही मदत होईल. महाराष्ट्र शासनाने अशा दोन आदर्श आश्रमशाळा १९९०-९१ मध्ये सुरू केल्या आहेत. या शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, गणवेश व सर्व शैक्षणिक साहित्य पुरविण्यात येते.

४) आदिवासी मुला-मुलींची शासकीय वसतिगृहे

आदिवासी जमाती या नागरी समाजापासून दूर डोंगर-दऱ्यात, कडे-कपारीत, जंगलात, दुर्गम प्रदेशात राहतात. अशा प्रदेशातील आदिवासी होतकरू विद्यार्थ्यांना त्यांच्या गावाजवळ उच्च शिक्षणाची सोय नसते. आदिवासी समाजाची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीब आहे. तसेच त्यांची शहरात राहण्याची सोय नसल्याने व गरिबीमुळे शहरात राहून उच्च शिक्षण घेणे परवडत नसल्याने हुशार होतकरू विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. असे हुशार आदिवासी विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून शासनाने तालुका आणि जिल्हा स्तरांवर तसेच मुंबई, पुण्यासारख्या महानगरांतही आदिवासी मुला-मुलींची वसतिगृहे चालविली आहेत. सन २००४-०५ च्या आकडेवारीनुसार राज्यात २९५ वसतिगृहे चालविण्यात येतात. अलिकडे त्यांच्यात वाढ

करण्यात आलेली आहे. अशा वसतिगृहांचा फायदा जवळ-जवळ १५ हजार विद्यार्थी घेत आहेत.

आदिवासी मुला-मुलींना शासकीय वसतिगृहात राहण्याची व भोजनाची मोफत व्यवस्था केली जाते. त्याशिवाय पाठ्यपुस्तके, संदर्भ पुस्तके, शैक्षणिक साधनसामग्री तसेच इतर आवश्यक साहित्य मोफत दिले जाते. शासकीय वसतिगृहांच्या सुविधांमुळे वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापनाशास्त्र, शिक्षणशास्त्र, कला, वाणिज्य व विज्ञान तसेच विधी महाविद्यालयांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होत आहे.

५) आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती

ग्रामीण डोंगराळ भागांत राहणाऱ्या आदिवासी जमातीच्या गरीब तसेच आर्थिकदृष्ट्या कमकुवत अशा विद्यार्थ्यांना वरील शिष्यवृत्ती दिली जाते. आदिवासी विद्यार्थ्यांना शालांत परिक्षोत्तर उच्च शिक्षणाकरिता प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने व त्यांना उच्च शिक्षणाचा खर्च भागविणे शक्य व्हावे म्हणून भारत सरकारव्दारा ही योजना राबविण्यात येते. या योजनेखाली विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, शिक्षण फी, नोंदणी शुल्क, ग्रंथालय फी, परीक्षा फी, प्रयोगशाळा फी व अन्य मान्य फी मंजूर केल्या जातात. शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्य दराच्या १/३ एवढाच निर्वाह भत्ता दिला जातो. ही योजना प्रकल्प अधिकाऱ्यांच्या स्तरावरून राबविली जाते.

६) आदिवासी जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करणे-योजना

कोणत्याही स्तरावर आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण घेता यावे हा या योजनेमागील उद्देश आहे. उत्पन्नाच्या मर्यादेमुळे भारत सरकारच्या शिष्यवृत्ती योजनेचा सर्वच विद्यार्थ्यांना फायदा मिळू शकत नाही. असा फायदा मिळू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराने मान्यता प्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असताना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची शिक्षण संस्थेस प्रतिपूर्ती करण्यात येते.

७) व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची योजना.

सर्वसाधारण अभ्यासक्रमापेक्षा उच्च व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी जास्त खर्च येतो. आदिवासी विद्यार्थी गरीब असल्याने असे जास्त खर्चिक असलेले व्यावसायिक शिक्षण घेत नाहीत. काही विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने मध्येच शिक्षण सोडून

देतात. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या इतर आर्थिक सवलतींशिवाय उच्च व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणारा जादा खर्च भरून काढण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आलेली आहे.

८) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना

आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांमध्ये औद्योगिक किंवा तांत्रिक प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे. औद्योगिक किंवा तांत्रिक प्रशिक्षण घेतल्याने नोकरीच्या किंवा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. आदिवासी क्षेत्रात असे अभ्यासक्रम उपलब्ध नाहीत. तसेच या शिक्षणासाठी सर्वसाधारण शिक्षणापेक्षा जास्त खर्च येतो. त्यामुळे आदिवासी विद्यार्थी अशा शिक्षणापासून वंचित राहतात. परिणामी त्यांच्या स्वयंनिर्भरतेवर मर्यादा पडतात. म्हणून औद्योगिक प्रशिक्षण घेण्यास आदिवासी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येते.

तक्ता क्र. ५.४

योजनेचे नांव : आदिवासी विकास विभाग व स्वयंसेवी संस्थाद्वारे चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळा, माध्यमिक आश्रमशाळा व वसतिगृहांची माहिती (सन २००३-२००४ पर्यंत)

अ.क्र.	जिल्हा	आश्रमशाळा संख्या		माध्यमिक आश्रमशाळा		कनिष्ठ महाविद्यालये		शासकीय वसतिगृहे
		शासकीय	अनुदानित	शासकीय	अनुदानित	शासकीय	अनुदानित	
१.	बृहन्मुबई	०	०	०	०	०	०	०
२.	मुंबई उपनगर	०	०	०	०	०	०	३
३.	ठाणे	१९	२६	५४	२५	६	३	३२
४.	रायगड	३	९	६	३	१	०	५
५.	रत्नागिरी	१	०	१	०	०	०	०
६.	सिंधुदुर्ग	०	०	०	०	०	०	०
७.	नाशिक	१५	४७	५३	३१	६	१	३७
८.	धुळे	४	१५	११	१९	१	०	१९
९.	नंदूरबार	२७	२५	३८	२३	५	३	३१
१०.	जळगांव	६	२१	९	७	१	१	१०
११.	अहमदनगर	५	५	१५	१०	१	२	९
१२.	पुणे	४	४	१२	४	१	०	१३
१३.	सातारा	२	०	०	०	०	०	०
१४.	सांगली	०	०	०	०	०	०	०

तक्ता क्र. ५.४ पान क्र. १५८ वरून पुढे

१५.	सोलापूर	२	०	०	१	०	०	०
१६.	कोल्हापूर	१	०	१	०	०	०	०
१७.	बुलढाणा	१	४	२	५	०	०	१
१८.	अकोला	१	०	१	४	०	१	३
१९.	वाशिम	२	३	१	२	०	०	२
२०.	अमरावती	६	१८	१४	१०	१	०	८
२१.	यवतमाळ	५	२१	२०	२१	३	४	१७
२२.	नागपूर	३	१३	४	८	१	१	८
२३.	वर्धा	२	२	४	६	०	०	६
२४.	भंडारा	१	७	१	२	०	०	८
२५.	गोंदिया	०	२०	११	६	१	०	१२
२६.	चंद्रपूर	२	२६	१२	१६	१	२	२०
२७.	गडचिरोली	५	१७	३७	३४	५	५	३१
२८.	औरंगाबाद	१	०	३	३	०	०	४
२९.	जालना	०	२	०	०	०	०	०
३०.	बीड	१	०	१	०	०	०	०
३१.	परभणी	०	२	०	३	०	०	१
३२.	हिंगोली	०	४	४	२	०	२	४
३३.	नांदेड	२	१०	१३	७	२	०	९
३४.	उस्मानाबाद	०	१	०	०	०	०	१
३५.	लातूर	०	१	०	०	०	०	१
	एकूण	१२१	३०३	३२८	२५२	३६	२५	२९५

संदर्भ : वार्षिक आदिवासी उपयोजना (२००४.२००५) पान क्र. ४३८

तक्ता क्र. ५.४ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत व स्वयंसेवी संस्थाद्वारे चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळा, माध्यमिक आश्रमशाळा व शासकीय वसतिगृहांची माहिती दिलेली आहे. शासकीय आश्रमशाळा, कनिष्ठ महाविद्यालये व वसतिगृहे आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येतात. अनुदानित आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालये ही स्वयंसेवी संस्थाद्वारे चालविण्यात येतात. सरकारकडून त्यांना अनुदान मिळते.

वरील तक्ता क्र.५.४ नुसार सर्वाधिक शासकीय आश्रमशाळा या नंदूरबार जिल्ह्यात (२७) आहेत. त्यानंतर ठाणे (१९), नाशिक (१५) या जिल्ह्यांत आहेत. इतर जिल्ह्यांत त्यांची संख्या दहा पेक्षा कमी आहे. मुंबई, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, सांगली, गोंदिया, जालना, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्यात एकही शासकीय आश्रमशाळा नाही. सर्वाधिक अनुदानित आश्रमशाळा या नाशिक जिल्ह्यात (४७) आहेत. त्यानंतर ठाणे (२६),

चंद्रपूर (२६), नंदूरबार (२५), जळगाव (२१), अमरावती (१८), गडचिरोली (१७) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो.

शासकीय माध्यमिक आश्रमशाळा या सर्वाधिक ठाणे (५४) या जिल्ह्यात आहेत. त्यानंतर नाशिक (५३), नंदूरबार (३८), गडचिरोली (३७), यवतमाळ (२०), अहमदनगर (१५), या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा या सर्वाधिक गडचिरोली (३४) जिल्ह्यात आहेत. त्यानंतर नाशिक (३१), ठाणे (२५), नंदूरबार (२३), यवतमाळ (२१) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वाधिक शासकीय कनिष्ठ महाविद्यालये ठाणे (६), नाशिक (६), नंदूरबार (५), गडचिरोली (५), या जिल्ह्यांत आहेत. अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये गडचिरोली (५), यवतमाळ (४), ठाणे (३) या प्रमाणे आहेत. शासकीय वसतिगृहे ही सर्वाधिक नाशिक (३७) जिल्ह्यात आहेत. त्यानंतर ठाणे (३२), नंदूरबार (३१), गडचिरोली (३१), चंद्रपूर (२०), धुळे (१९) व यवतमाळ (१७) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो.

तक्ता क्र. ५.४ मधील आकडेवारीवरून असे दिसते की, ज्या जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे त्या जिल्ह्यांत आश्रमशाळा, माध्यमिक आश्रमशाळा, कनिष्ठ महाविद्यालये, शासकीय वसतिगृहे यांची संख्या अधिक आहे. सिंधुदुर्ग व सांगली या जिल्ह्यांत आदिवासींसाठी कोणतीही शैक्षणिक संस्था नाही.

५.४.२ (ब) आर्थिक उन्नतीच्या योजना

महाराष्ट्र राज्यातील आदिवासींची आर्थिक परिस्थिती गरिबीची आहे. त्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन शेती, शेतमजूरी आणि जंगलकाम हे आहे. शेती व्यवसाय करणाऱ्यांमध्ये स्वतःचे शेत असणारे, कूळ म्हणून शेती करणारे आणि शेतमजूर अशी विभागणी दिसून येते. कूळ कायद्यापूर्वी अनेक लोक शेतमजूर होते. कूळ कायद्याच्या आधारामुळे ते आता शेतमालक झालेले आहेत. महाराष्ट्र शासनाने कायदेशीर व बेकायदेशीर जमीन हस्तांतरणाचा कायदा केल्यामुळे ज्या आदिवासींना आपल्या जमिनी गमवाव्या लागल्या होत्या ते आता जमिनी मिळाल्याने जमीनमालक झालेले आहेत. महाराष्ट्र राज्यात आदिवासी शेतकरी हे प्रामुख्याने सीमांत व लहान शेतकरी आहेत. आदिवासी शेतकऱ्याचा सरासरी जमीन धारण आकार हा ३ ते ४ हेक्टर आहे. जवळजवळ ८५ ते ९० टक्के आदिवासी लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे. त्यामध्ये ४० ते ४५ टक्के शेतमजूर आहेत.

शेती व्यतिरिक्त दुसरा धंदा म्हणजे मजूरी, लाकूड वाहतूक, जंगलातील वस्तू गोळा करणे, उदाहरणार्थ - मध, डिंक, तेंदूची पाने, मोहाची फुले, कढीपत्ता, शिकेकाई, हिरडा, बेहडा, कोकम, जंगली फळे इत्यादी. याशिवाय रोजगार मिळवून देणारा दुसरा जोडधंदा आदिवासींना मिळत नाही. शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. बहुसंख्य लोकांना जमिनी अपुऱ्या असल्याने शेतीतून उत्पन्नही अपुरेच मिळते. त्याचा परिणाम म्हणून आदिवासींना उदरनिर्वाहासाठी बँकेकडून, सावकाराकडून किंवा जमीनमालकाकडून कर्ज घ्यावे लागते. अशा कर्जावर सावकार, जमीनमालक अधिक दराने व्याज आकारतात. अपुरे शेती उत्पादन, अपुरा रोजगार आणि सण, समारंभ, लग्नविधी इ. वरील खर्च यामुळे त्यांना जास्त व्याजदराने कर्ज घेण्याशिवाय पर्यायच नसतो. परिणामी ते कर्जाच्या दुष्टचक्रात अडकतात व त्यातून त्यांना बाहेर पडता येत नाही. कर्जफेड करण्यासाठी काही आदिवासींना सावकार किंवा जमीनमालकाच्या घरी आयुष्यभर 'घरगडी' किंवा 'लग्नगडी' म्हणून काम करावे लागते.

आदिवासी जमाती दुर्गम प्रदेशांत व जंगल दऱ्याखोऱ्यांत राहतात. त्यामुळे त्यांना वर्षातून कित्येक दिवस पिण्यासाठी शुध्द, स्वच्छ व भरपूर पाणी मिळत नाही. गरिबीमुळे अपुरा व निकृष्ट आहार, अस्वच्छ पाणी यामुळे मलेरिया, हगवण, क्षय, ताप, पोटाचे विकार, कातडीचे विविध रोग यांच्याशी त्यांना वारंवार सामना करावा लागतो. आदिवासी जमातींमध्ये कुपोषणही मोठ्या प्रमाणात आढळून येते.

अशा प्रकारे वरील परिस्थिती विचारात घेऊन महाराष्ट्र शासन आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी जमातींच्या आर्थिक कल्याण्यासाठी पुढील योजना राबविते.

१) आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंपाचा पुरवठा

शेती हा आदिवासींचा मुख्य व्यवसाय आहे. महाराष्ट्रातील जवळजवळ ८५ ते ९० टक्के आदिवासी शेतीवर अवलंबून आहेत. त्यांची शेती ही पावसावर अवलंबून असल्याने त्यांना वर्षातून फक्त एकच पीक घेता येते. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला 'जुगार' असे म्हटले जाते. आदिवासींचे जमीन धारण क्षेत्र अत्यंत कमी असल्याने तसेच आर्थिक परिस्थिती गरिबीची असल्याने ते आपल्या शेतात भांडवल गुंतवणूक करू शकत नाहीत. भांडवलाअभावी त्यांना आपल्या शेतात विहीर खोदणे, जमिनीचे सपाटीकरण करणे, बांध बंधिस्ती करणे, जलसिंचनाच्या सुविधा पुरविणे शक्य होत नाही. आदिवासी

शेतकऱ्यांना वर्षातून दोन ते तीन पिके काढणे शक्य व्हावे म्हणून तसेच जलसिंचनाची सोय उपलब्ध व्हावी म्हणून त्यांना त्यांच्या शेतातील विहिरींवर अथवा जवळपासच्या नदी-नाल्यांवर मोफत वीजपंप बसवून देण्याची योजना सन १९७३-७४ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. साधारणपणे ज्या शेतकऱ्याला स्वतःच्या मालकीची कमीत-कमी दोन एकर व जास्तीत-जास्त १६ एकर जमीन असेल अशा शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा घेता येतो.

ज्या गावातील शेतकऱ्यांच्या शेतात नजीकच्या भविष्यात विजेची लाईन जाण्याची शक्यता नसते अशा गावांतील आदिवासी शेतकऱ्यांना मोफत तेलपंप (ऑईल इंजिन) पुरविला जातो. विजेअभावी आदिवासी शेतकऱ्यांची शेती अविकसित राहू नये हा त्यामागील उद्देश आहे. ही योजना १९७६-७७ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. साधारणतः ज्या शेतकऱ्यांना स्वतःच्या मालकीची दोन ते सोळा एकर जमीन असेल अशा शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा घेता येतो.

मोफत वीजपंप व तेलपंपाच्या योजनेमुळे आदिवासींना त्यांची शेती विकसित करण्यास मदत होत आहे.

तक्ता क्र. ५.५

आदिवासी शेतकऱ्यांना वाटप झालेल्या वीजपंप व तेलपंप इंजिनांची वर्षवार माहिती

वर्ष	वीजपंप	तेलपंप
१	२	३
१९८० - १९८१	५४६	१०३
१९८१ - १९८२	५८६	९३
१९८२ - १९८३	८०६	१२४
१९८३ - १९८४	८८३	९५
१९८४ - १९८५	१००४	१९४
१९८५ - १९८६	१३९९	१५३
१९८६ - १९८७	१४६४	३०९
१९८७ - १९८८	१४११	३१४
१९८८ - १९८९	२१०५	४२२
१९८९ - १९९०	२१२१	३८०
१९९० - १९९१	२२७२	३५१
१९९१ - १९९२	१९८०	५०४

तक्ता क्र. ५.५ पान क्र. १६२ वरून पुढे

१९९२ - १९९३	१४९७	५१६
१९९३ - १९९४	१५३०	४९०
१९९४ - १९९५	२७४३	१३०२
१९९५ - १९९६	२७२५	१३६२
१९९६ - १९९७	३३४२	१६१९
१९९७ - १९९८	४२१८	१९३४
१९९८ - १९९९	५२४४	२७७२
१९९९ - २०००	३६७३	१६७०
२००० - २००१	३८४५	२५६९
२००१ - २००२	१४४१	२३६०
२००२ - २००३	१३५९	२६८४
२००३ - २००४	१०१३	१६२४
२००४ - २००५	००	५०००

संदर्भः वार्षिक आदिवासी उपयोजना (२००४-२००५) पान क्र. ४५५

तक्ता क्र. ५.५ मध्ये आदिवासींना शेती ओलीताखाली आणण्यासाठी वाटप केलेल्या वीजपंप व तेलपंपाची माहिती दिलेली आहे.

सन १९८०-१९८१ मध्ये आदिवासींना ५४६ वीजपंपांचे व १०३ तेलपंपांचे वाटप करण्यात आले होते. १९९०-९१ मध्ये २२७२ वीजपंपांचे व ३५१ तेलपंपांचे वाटप करण्यात आले होते. सन १९९८-९९ मध्ये ५२४४ वीजपंपांचे म्हणजेच सर्वाधिक वाटप करण्यात आले होते. सन २०००-२००१ मध्ये ३८४५ वीजपंपांचे व २५६९ तेलपंपांचे वाटप करण्यात आले होते. सन २००४-२००५ मध्ये एकही वीजपंपांचे वाटप केले गेले नाही परंतु तेलपंपांचे सर्वाधिक म्हणजे ५००० तेलपंप इतके वाटप करण्यात आले.

वीजपंप व तेलपंपाच्या वाटपात प्रत्येक वर्षी तफावत दिसून येते. सरकारने आदिवासींची जमीन ओलीताखाली आणण्यासाठी आजपर्यंत मोठ्या प्रमाणात वीजपंप व तेलपंपांची वाटप केलेली दिसून येते.

२) आदिवासी लोकांना घरावरील गवती छपराऐवजी मंगलोरी कौले किंवा पन्हाळी पत्रे टाकण्याकरिता अर्थसहाय्य योजना.

दुर्गम व डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या आदिवासी लोकांची घरे किंवा झोपड्या पूर्वीपासून गवती छपराने किंवा झावळ्यांनी आच्छादलेली असतात. पावसाळ्यात व हिवाळ्यात या घरांमध्ये किंवा झोपड्यांमध्ये राहणे अत्यंत कठीण असते. पावसापासून,

थंडी-वाऱ्यापासून पुरेशे संरक्षणही होत नाही. गवती झावळ्यांमुळे घरांना/झोपड्यांना आग लागण्याचाही धोका असतो. विविध धोक्यांपासून आदिवासींचे संरक्षण व्हावे म्हणून गवती छप्परे असलेल्या घरांवर/झोपड्यांवर आच्छादनासाठी गवताऐवजी मंगलोरी कौले किंवा पन्हाळी पत्रे पुरविले जातात. आदिवासींना चांगला निवारा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १९८५-८६ पासून ही योजना राबविण्यात येत आहे.

३) केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना

महाराष्ट्र राज्यात वेगवेगळ्या विभागात राहणाऱ्या विविध आदिवासी जमातींच्या विकासाच्या प्रगतीमध्ये फरक आहे. प्रत्येक क्षेत्रातील विकासाच्या अवस्था वेगवेगळ्या असल्याने विकास कार्यक्रमांच्या गरजाही भिन्न आहेत. प्रत्येक प्रकल्प क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक साधन संपत्तीतील विपुलता, त्रुटी, योजना यांमध्ये भिन्नता व तफावत असल्याने समान विकासाच्या दृष्टीने एकच प्रकारचे कार्यक्रम उपयुक्त ठरणार नाहीत. आदिवासी विकास योजनांमध्ये स्थल, कालानुरूप लवचिकता व अभिनवता आणणे आवश्यक असल्याने विविध विकास कार्यक्रम स्थानिक पातळीवरच मंजूर करून तातडीने कार्यान्वित व्हावेत या उद्देशाने सन १९८१-८२ पासून 'केंद्रवर्ती अर्थसंकल्प' (न्युक्लिअस बजेट) ही योजना सुरू करण्यात आली.

अर्थसंकल्पात समाविष्ट नाहीत अशा आदिवासी विकासाच्या नाविन्यपूर्ण व स्थानिक विकासाच्या दृष्टीने महत्वाच्या योजना तांत्रिक औपचारिकतेमुळे शासन दरबारी दिर्घकाळ मंजूरीसाठी अडकून पडतात. अशा योजना स्थानिक पातळीवरच मंजूर करून त्यांचा लाभ तातडीने गरजू आदिवासींना मिळवून देणे. ज्या योजना आदिवासींच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत, अशा योजनांचे स्थानिक महत्व लक्षात घेऊन त्या प्रभावीपणे कार्यान्वित करणे व त्यांचा लाभ गरजू आदिवासींना मिळवून देणे हा केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचा महत्वाचा उद्देश आहे. आदिवासी व्यक्ती व कुटुंब केंद्रबिंदू मानून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने ही योजना महत्वाची आहे.

आदिवासींचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचे खालीलप्रमाणे चार गट पाडण्यात आलेल आहेत.

अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना

या स्वरूपाच्या योजनांमध्ये आदिवासींच्या आर्थिक उन्नतीच्या योजनांचा समावेश केला जातो. त्या योजना पुढील प्रमाणे आहेत.

१) आदिवासी शेतकऱ्यांना फळझाडे व वनझाडे लागवडीसाठी अर्थसहाय्य
२) वीटभट्टी व्यवसायाकरिता अर्थसहाय्य
३) तरूणांना वाद्य संच घेण्यासाठी अर्थसहाय्य
४) तरूणांना स्वस्त धान्य दुकान चालविण्यासाठी अर्थसहाय्य
५) महिलांना कुक्कुटपालन व्यवसायासाठी अर्थसहाय्य
६) किराणा दुकानासाठी अर्थसहाय्य
७) भाजीपाला व्यवसायासाठी अर्थसहाय्य
८) पी. व्ही. सी. पाईप खरेदीसाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य
९) सुतार व्यवसायाकरीता हत्यारे खरेदीसाठी अर्थसहाय्य
१०) मधुमक्षिका पालनासाठी अर्थसहाय्य

ब) प्रशिक्षण योजना

आदिवासी विद्यार्थ्यांना रोजगार संधी उपलब्ध व्हावी, स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा त्यासाठी प्रशिक्षण योजना राबविण्यात येतात त्या खालीलप्रमाणे.

१) बेकरीचे प्रशिक्षण
२) आदिवासी तरूणांना मराठी/इंग्रजीचे लघुलेखन प्रशिक्षण
३) संगणक प्रशिक्षण
४) टंकलेखन प्रशिक्षण
५) आदिवासी तरूणांना बसवाहकाचा बिल्ला काढून देण्याचे प्रशिक्षण
६) आदिवासी तरूणांना पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण
७) अंगणवाडी कर्मचारी प्रशिक्षण
८) पशुसंवर्धनाचे प्रशिक्षण
९) टी. व्ही. दुरूस्तीचे प्रशिक्षण
१०) चालकपदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षण
११) शिवणयंत्र कामकाजाचे प्रशिक्षण

१२) कार्यालयीन कामकाजाचे प्रशिक्षण

१३) वाहन चालक प्रशिक्षण

१४) बहुउद्देशीय आरोग्यसेवा प्रशिक्षण

१५) जनरल नर्सिंग प्रशिक्षण

१६) आदिवासी शेतकऱ्यांना आंबा व काजू लागवड प्रशिक्षण

१७) आदिवासी शेतकऱ्यांना डाळींब लागवड प्रशिक्षण

१८) दुग्ध व्यवसाय व पशुसंवर्धन प्रशिक्षण

१९) मधमाशी पालन प्रशिक्षण

२०) कृषी प्रशिक्षण

२१) स्वयंरोजगार प्रशिक्षण

२२) सेवापूर्व प्रशिक्षण शिबिर

२३) सुतारकाम व गवंडीकाम प्रशिक्षण

२४) गालिचा विणकाम प्रशिक्षण

२५) आदिवासी तरूणांना रेशिम उद्योग प्रशिक्षण

२६) आदिवासी तरूणांना बांबूपासून वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण

२७) आदिवासी उमेदवारांना स्पर्धा परिक्षांकरीता प्रशिक्षण

क) मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना

कोणत्याही देशाच्या तसेच समाजाच्या विकासात मानवी साधनसंपत्तीला महत्वाचे स्थान असते. कुशल मनुष्यबळ असेल तर वेगाने विकास होतो. म्हणून 'केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजने' अंतर्गत आदिवासी मानवी साधन संपत्तीच्या विकासासाठी पुढील योजना राबविल्या जातात.

१) नृत्य स्पर्धेसाठी अर्थसहाय्य

२) १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर

३) शिक्षकांना अध्यापनास आधुनिक साधनांचा उपयोग करण्यासाठी मार्गदर्शनास अर्थसहाय्य

४) निसर्गोपचार प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य

५) शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी संभाव्य प्रश्नोत्तरांचे संच पुरविणे.

६) आदिवासी खेळाडूंच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अर्थसहाय्य

७) आदिवासी महिलांच्या जागृती मेळाव्यास अर्थसहाय्य

८) ग्रामीण भागातील कलापथकांना अर्थसहाय्य.

ड) आदिवासी कल्याणात्मक योजना

या योजनांमध्ये आदिवासींच्या स्थानिक गरजा व समस्यांवर आधारित अशा वैयक्तिक/ सामूहिक कल्याणाच्या योजनांचा समावेश होतो. आदिवासींच्या घरांचे विद्युतीकरण, महिला व बालकल्याण, आपत्कालीन किंवा अत्याचार प्रकरणी अर्थसहाय्य, आदिवासींचे सामूहिक विवाह आणि नव-दांपत्यांना संसारोपयोगी वस्तूंचे सहाय्य इत्यादी. तसेच इतर पुढील योजनांचा समावेश होतो.

१) जळीतग्रस्त आदिवासी कुटुंबांना आर्थिक मदत देणे.

२) आदिवासी लोकांमध्ये आरोग्य, शिक्षण, पर्यावरण संरक्षण, व्यसनमुक्ती व कुटुंबकल्याण कार्यक्रमांचा चित्रपटांच्या माध्यमातून प्रसार करणे.

३) मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करणे.

४) मिनी अंगणवाडी सेविकांना अतिरिक्त मानधन देणे.

५) उपचार केंद्र उघडण्यास अर्थसहाय्य

६) धान्य कोष योजना राबविणाऱ्या संस्थांना साधने खरेदीसाठी अर्थसहाय्य.

केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेमुळे आदिवासींची स्थानिक गरज तसेच विविध समस्या सुटण्यास मोठ्या प्रमाणात मदत होत आहे. निधीची तात्काळ उपलब्धता होत असल्याने तातडीच्या गरजांची पुर्ततादेखील तात्काळ होत आहे.

४) मोटार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र योजना

मोटार चालकाचे प्रशिक्षण घेणे खर्चिक आहे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने आदिवासी तरूण ते घेऊ शकत नाहीत. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातील शिल्लक असलेला अनुशेष भरून काढला जावा तसेच आदिवासी तरूणांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा किंवा खाजगी क्षेत्रात नोकरी मिळावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास विभागाने मोटारवाहन चालक प्रशिक्षण केंद्र योजना सुरू केली आहे. या केंद्रामध्ये आदिवासी तरूणांना मोफत निवास, भोजन व प्रशिक्षण दिले जाते. महाराष्ट्रात खालील ठिकाणी ही प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आलेली आहेत.

१) पांढरकवडा, जिल्हा - यवतमाळ

२) गडचिरोली, जिल्हा - गडचिरोली

३) चंद्रपूर, जिल्हा - चंद्रपूर

४) शहादा, जिल्हा - धुळे

५) नाशिक, जिल्हा - नाशिक

५) आदिवासी युवकांना पोलीस व लष्कर भरतीपूर्व प्रशिक्षण योजना.

सैन्यदल, राज्य पोलीस दल, राज्य राखीव पोलीस दल, केंद्रीय राखीव पोलीस दल, औद्योगिक सुरक्षा दल, सीमा सुरक्षा दल इत्यादींमध्ये आदिवासी उमेदवारांचा मोठ्या प्रमाणावर अनुशेष आहे. आदिवासी तरूण हे धाडसी, काटक, चपळ, व शारीरिकदृष्ट्या सक्षम असल्याने त्यांना वरील दलांमध्ये मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. या दलांमध्ये भरती होण्यासाठी आदिवासी तरूणांना कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन, प्रशिक्षण मिळत नाही. त्यामुळे ते या संधीचा फायदा घेऊ शकत नाहीत. त्यासाठी शारीरिकदृष्ट्या सक्षम व पात्र उमेदवारांना योग्य ते शिक्षण, प्रशिक्षण व मार्गदर्शन करून या दलांमध्ये नोकरी मिळविण्याच्या दृष्टीने तयार करणे व प्रोत्साहीत करणे हा या प्रशिक्षण केद्रांचा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्रात अशी नऊ केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत.

६) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना

रोजगाराअभावी आदिवासी समाज मागासलेला राहिला आहे. त्यामुळे आदिवासी युवकांना लहान-लहान व्यावसायिक अभ्यासक्रम राबवून स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे. तसेच आदिवासी भागातील लोकांना आवश्यक व अत्यंत गरजेची यंत्रे व अवजारे स्थानिक पातळीवरच दुरूस्त करून घेण्याच्या दृष्टीने कुशल कारागीर उपलब्ध करून देणे हा या योजनेमागील प्रमुख उद्देश आहे. यामध्ये इलेक्ट्रीशिअन, ऑईल इंजिन/इलेक्ट्रीक मोटार दुरूस्ती, मोटार मेकॅनिक इत्यादी अभ्यासक्रमांचा समावेश केला जातो.

७) स्वयंरोजगारासाठी कर्जपुरवठा योजना

आदिवासी बेरोजगार तरूणांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा म्हणून तसेच त्यांनी स्वावलंबी व आत्मनिर्भर व्हावे म्हणून अनेक प्रशिक्षण योजना राबविल्या जातात. स्वतःचा उद्योग किंवा व्यवसाय सुरू करावयाचा असेल तर मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते. स्वयंरोजगार निर्माण करू इच्छिणाऱ्या आदिवासी तरूणांकडे असे भांडवल नसते. म्हणून विविध व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या आदिवासी तरूणांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे हा या योजनेमागचा मुख्य उद्देश आहे. ही योजना एन.एस.एफ.डी.सी. नवी दिल्ली या राष्ट्रीय स्तरावरील वित्तीय व विकास संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येते. तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य या संस्थेमार्फतही अर्थसहाय्य पुरविण्यात येते.

अशा प्रकारे आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आदिवासी विकास विभागामार्फत वरील आर्थिक कल्याणाच्या योजना राबविल्या जातात.

तक्ता क्र. ५.६

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तरतूद व खर्च

(रु. लाखात)

अ.क्र.	वर्ष	अर्थसंकल्पीय तरतूद	प्रत्यक्ष खर्च	तरतुदीची प्रत्यक्ष खर्चाची टक्केवारी
१	२	३	४	५
१.	१९८० - १९८१	५११३.२०	५०२५.३०	९८.२८
२.	१९८१ - १९८२	६२५४.६२	५१५१.२६	९८.३५
३.	१९८२ - १९८३	७१४७.९२	८२५८.७५	११५.५४
४.	१९८३ - १९८४	७३९९.८९	९२९७.५०	१२५.५४
५.	१९८४ - १९८५	८०८९.७६	९३८८.८०	११६.०६
६.	१९८५ - १९८६	८९७१.४१	१०४५४.६३	११६.५३
७.	१९८६ - १९८७	१११८७.८९	१०६२१.६३	९४.९४
८.	१९८७ - १९८८	१४७८९.००	१३९६८.००	९४.४५
९.	१९८८ - १९८९	१७९३६.३४	१७०२५.२८	९४.९२
१०.	१९८९ - १९९०	१७७४३.५९	१७४९०.९८	९८.५८
११.	१९९० - १९९१	१६६३९.९०	१६११३.२१	९६.८३
१२.	१९९१ - १९९२	२००५०.३२	१९६०४.७७	९७.७८
१३.	१९९२ - १९९३	२१६९४.०८	२०६०४.९४	९४.९८
१४.	१९९३ - १९९४	३०५४६.६०	२६६३९.२४	८७.२१

तक्ता क्र. ५.६ पान क्र. १६९ वरून पुढे

१५.	१९९४ - १९९५	३२१८२.७९	२७५००.००	८५.४४
१६.	१९९५ - १९९६	४३६०८.३७	४१२००.००	९४.४७
१७.	१९९६ - १९९७	४२७६१.७७	५३५००.००	१२५.११
१८.	१९९७ - १९९८	५०३५५.७८	४९८००.००	९८.९०
१९.	१९९८ - १९९९	५७३९०.६४	५२०००.००	९०.६१
२०.	१९९९ - २०००	५८००६.०६	४६७००.००	८०.५१
२१.	२००० - २००१	५२५००.००	४४४१८.००	८४.६१
२२.	२००१ - २००२	४४४००.००	३६६७७.००	८२.६१
२३.	२००२ - २००३	२९२७५.०८	३२३४२.००	११०.४८

संदर्भ: वार्षिक आदिवासी उपयोजना (२००४-२००५) पान क्र. ४५१

तक्ता क्र. ५.६ मध्ये महाराष्ट्र राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी करण्यात आलेली खर्चाची तरतूद व प्रत्यक्ष झालेला खर्च दर्शविला आहे.

अर्थसंकल्पीय तरतूद ही १९८०-८१ मध्ये ५११३.२० लाख रु. होती. ती १९८९-९० मध्ये १७७४३.५९ लाख रु. होती. मधल्या वर्षांत अर्थसंकल्पीय तरतूदीत उत्तरोत्तर वाढ झालेली आहे. सन १९९०-९१ मध्ये अर्थसंकल्पीय तरतूदीत घट होऊन ती १६६३९.९० लाख रु. इतकी झाली आहे. सन १९९५-९६ पर्यंत अर्थसंकल्पीय तरतुदीत पुन्हा वाढ झालेली आढळून येते. सन १९९६-९७ मध्ये अर्थसंकल्पीय तरतुदीत ४३६०८.३७ लाख रु. वरून ४२७६१.७७ लाख रु. पर्यंत घट झालेली आहे. त्यानंतर अर्थसंकल्पीय तरतुदीत २००१-०२ पर्यंत ४४४००.०० लाख रु. पर्यंत वाढ झालेली आहे. २००२-०३ सालापासून अर्थसंकल्पीय तरतुदीत घट झाल्याचे दिसून येते. सरकारने आदिवासी विकास विभागाचा निधी इतर विभागांकडे वळविल्याने तरतुदीत घट झालेली आहे.

अर्थसंकल्पीय तरतुदीचे प्रत्यक्ष खर्चाशी असणारे प्रमाण विचारात घेता असे दिसते की, सन १९८२-८३, १९८३-८४, १९८४-८५, १९८५-८६, १९९६-९७, २००२-०३ या वर्षांत अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा प्रत्यक्ष खर्च अधिक झालेला आहे. उर्वरित वर्षांमध्ये तो अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा कमी झालेला आढळून येतो.

५.४.३ (क) इतर योजना

आदिवासी समाजाच्या विकासासाठी अनेक व्यक्ती व संस्था स्वयंस्फुर्तीने प्रयत्न करतात. त्यांना प्रोत्साहन देणे. आदिवासी समाजात काही उपजत गुण आहेत, त्यांचा

विकास करणे. त्यांच्या काही इतर अनेक समस्या आहेत, त्या सोडविणे जसे उपासमार टाळणे, निवाऱ्याचा प्रश्न सोडविणे, त्याचप्रमाणे त्यांच्यातील कलागुणांना वाव देऊन त्यांचे सवर्धन व विकास करणे यासाठी काही इतर योजना राबविल्या जातात. प्रमुख योजना खालील प्रमाणे.

१) मागासवर्गीयांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य

ही योजना अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त व भटक्या जाती/जमाती यांच्याकरिता मूळच्या समाजकल्याण विभागाने सुरू केलेली आहे. शहरी, निमशहरी व ग्रामीण भागातील आदिवासींचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून आदिवासी जमातीच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना आदिवासी विकास विभागामार्फत अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. आदिवासींना महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामीण भागात सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करून चांगल्या प्रकारची निवासस्थाने उपलब्ध करून देणे हा योजनेमागील मुख्य उद्देश आहे. या योजनेअंतर्गत शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या क्षेत्रावर कमाल मर्यादेपर्यंत बिनव्याजी कर्ज व अनुदान उपलब्ध करून दिले जाते. त्याचप्रमाणे सरकारी जागा किंवा खरेदी करावयाच्या जागेची सरकारने ठरवून दिलेली किंमतही अर्थसहाय्याच्या स्वरूपात देण्यात येते.

२) खावटी कर्ज योजना

राज्यात खावटी कर्ज योजना १९७८ पासून आदिवासी क्षेत्रात सुरू करण्यात आली. बहुसंख्य आदिवासी शेतीवर अवलंबून असून त्यांची शेती ही पावसावरील जुगार आहे. जमीन धारणा क्षेत्र कमी आहे. त्यामुळे शेतातून वर्षभर उदरनिर्वाह होईल इतकेही उत्पादन होत नाही. शेतीतून झालेले अन्नधान्याचे उत्पादन जेमतेम उन्हाळ्या पर्यंत पुरते. रोजगारही उपलब्ध नसल्याने त्यांना सराफ, सावकार यांच्याकडून जगण्यासाठी कर्ज काढावे लागते. कर्ज देणारे जास्त व्याजदर आकारून त्यांची पिळवणूक करतात.

महाराष्ट्र राज्य आदिवासी आर्थिक स्थिती सुधारणा कायदा १९७६ च्या तरतुदीनुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील धनकोंकडून आदिवासी बांधवांची होणारी परंपरागत आर्थिक पिळवणूक व शोषण थांबविण्यासाठी व ऐन पावसाळ्यात आदिवासींची उपासमार होऊ नये म्हणून शेतमजूर व अल्प भूधारक यांना खावटी कर्ज देण्यात येते. या योजनेत ९० टक्के धान्य रुपाने व १० टक्के रक्कम रोख स्वरूपात देण्यात येते.

३) धान्यकोष योजना

सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या खावटी कर्ज योजनेला पर्याय म्हणून १९९५ पासून ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. खावटी कर्जाची वसूली वेळेवर होत नसल्याने सरकारवर आर्थिक बोजा पडतो. शासनाची आर्थिक बचत व्हावी व धान्यकोष योजनेव्दारे आदिवासी भागातील गावकऱ्यांमध्ये अन्नधान्याच्या संदर्भात आत्मनिर्भरता निर्माण व्हावी हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तीन ते चार गावांचा समूह केला जातो. या परिसरातील सेवाभावी संस्था, सहकारी संस्था किंवा ग्रामपंचायत यांच्या सहकार्याने धान्य कोष स्थापन केला जातो. या धान्य कोषाचे सभासदत्व आदिवासी व इतर सर्वांसाठी खुले असते. धान्यकोषातून कुटुंबांना आवश्यक तेव्हा गरजेनुसार धान्य उपलब्ध करून दिले जाते. धान्यकोषातून कर्ज घेणारे धान्यरूपाने किंवा रोखीने आपल्या कर्जाची परतफेड करतात. धान्यकोषाचे भूधारक सभासद १/३ हिस्सा धान्य रुपाने व भूमिहीन कुटुंबे रोखीने वर्गणी देऊ शकतात. आदिवासी सभासदांच्या जमा झालेल्या धान्य साठ्याच्या २/३ हिस्सा शासनाकडून आदिवासी विकास महामंडळाच्या माध्यमातून देण्यात येतो.

खावटी कर्ज योजना व धान्यकोष योजना यामुळे आदिवासींची उपासमार टाळण्यास मदत झाली आहे. तसेच सावकारांच्या कर्जाच्या पाशातून सुटका होण्यास मदत झाली आहे.

तक्ता क्र. ५.७
आदिवासींना वाटप केलेल्या खावटी कर्जाची वर्षनिहाय माहिती

अ.क्र.	वर्ष	लाभार्थींची संख्या	कर्ज वाटप लाखांत
१	२	३	४
१.	१९७८ - १९७९	१६०८४३	१७७.७३
२.	१९७९ - १९८०	५४६६५	६६.६३
३.	१९८० - १९८१	४३३४६	६१.१८
४.	१९८१ - १९८२	४२४१५	४६.६१
५.	१९८२ - १९८३	१७९१४	२६.०३
६.	१९८३ - १९८४	१४११३	२१.२७
७.	१९८४ - १९८५	१३१५५	१८.३५

तक्ता क्र. ५.७ पान क्र. १७२ वरून पुढे

८.	१९८५ - १९८६	१६१८१	२२.२०
९.	१९८६ - १९८७	११२११	१९.७२
१०.	१९८७ - १९८८	१४५६२	२०.५७
११.	१९८८ - १९८९	१३६५१	२०.०८
१२.	१९८९ - १९९०	६२५०६	८५.५५
१३.	१९९० - १९९१	४१४५७	६२.३९
१४.	१९९१ - १९९२	४३२४१	८२.०९
१५.	१९९२ - १९९३	१०३०२७	३९९.६८
१६.	१९९३ - १९९४	५०७७३	२११.३३
१७.	१९९४ - १९९५	-	-
१८.	१९९५ - १९९६	४२००७	१६८.२३
१९.	१९९६ - १९९७	५१०९६	२४०.००
२०.	१९९७ - १९९८	९४०२४	२०२.६८
२१.	१९९८ - १९९९	४५०७६	५६७.००
२२.	१९९९ - २०००	७५७०२	५३१.२७
२३.	२००० - २००१	१५३६७७	१०५९.००
२४.	२००१ - २००२	१७२३८५	११६६.९४
२५.	२००२ - २००३	३७४०१	२८४.७१
२६.	२००३ - २००४	८६६८२	६८०.०१
२७.	२००४ - २००५	२०००००	६०००.००

संदर्भः वार्षिक आदिवासी उपयोजना (२००४-२००५) पान क्र. ४५२

तक्ता क्र. ५.७ मध्ये आदिवासींना वाटप केलेल्या खावटी कर्जाची वर्षनिहाय माहिती दर्शविली आले. सन १९७८-७९ मध्ये लाभार्थींची संख्या १६०८४३ होती व कर्ज वाटप १७७.७३ लाख रू. होते. सन १९८४-८५ मध्ये लाभार्थींची संख्या १३१५५ पर्यंत कमी झाली व कर्ज वाटपाचे खर्च प्रमाण १८.३५ लाख रू. पर्यंत कमी झाले. सन १९९२-९३ मध्ये लाभार्थींची १०३०२७ पर्यंत वाढली व कर्ज वाटपाची रक्कम ३९९.६८ लाख रू. पर्यंत वाढली. सन २००१-०२ मध्ये लाभार्थींची संख्या १७२३८५ होती व कर्ज वाटपाची रक्कम ११६६.९४ लाख रू. होती. सन २००४-०५ मध्ये लाभार्थींची संख्या २,००,००० पर्यंत वाढली. त्यामुळे कर्ज वाटपाच्या रक्कमेतही वाढ होऊन ती ६०००.०० लाख रू. पर्यंत वाढली.

वरील तक्त्यावरून खावटी कर्जाच्या लाभार्थ्यांची संख्या व कर्ज वाटपाची रक्कम यामध्ये मोठ्या प्रमाणात चढ-उतार दिसून येतात.

४) आदिवासी उमेदवारांसाठी सेवायोजन नोंदणी

आदिवासी सुशिक्षित तरूणांना विविध क्षेत्रात अनेक ठिकाणी नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. पुरेशा माहितीअभावी त्यांना त्या संधीचा लाभ मिळत नाही. पूर्वी सेवायोजन कार्यालयात आदिवासी उमेदवारांची नाव नोंदणी केली जात होती. परंतु या उमेदवारांना संधी मिळण्यास होणारा विलंब लक्षात घेऊन शासनाने हे काम समाजकल्याण विभागाकडे सोपविले. सन १९८३-८४ मध्ये आदिवासी विकास विभाग स्वतंत्र झाल्यावर नाव नोंदणीचे काम प्रकल्प कार्यालयांकडे सोपविण्यात आले. सुशिक्षित व गरजू आदिवासी उमेदवारांची नाव नोंदणी करून नोकरीच्या संधी उपलब्ध असलेल्या ठिकाणी त्यांच्या नावांची शिफारस करणे व त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

५) आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना/ संस्थांना आदिवासी सेवक/ सेवा संस्था पुरस्कार योजना

आदिवासी क्षेत्रात आदिवासींच्या विकासासाठी स्वयंस्फुर्तपणे काम करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था आहेत. अशा व्यक्ती व संस्था स्वतःचे हित बाजूस ठेऊन आदिवासींसारख्या अत्यंत मागासलेल्या समाजाच्या विकासासाठी अविरत प्रयत्न करीत आहेत. आदिवासी विकासासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांची निवड करून त्यांच्या कार्याचा जाहीर गौरव करणे व इतर व्यक्ती व संस्थांना प्रोत्साहित करणे या उद्देशाने आदिवासी सेवक/ आदिवासी सेवा संस्था पुरस्कार देण्याची योजना १९८५ पासून सुरू करण्यात आली आहे. आदिवासी संस्कृती संवर्धन, शिक्षण, अत्याचार निर्मुलन, अंधश्रध्दा निर्मुलन इ. क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार प्रतिवर्षी आदिवासींचे हितकर्ते परमपुज्य ठक्करबाप्पा यांच्या जयंती दिनी (२९ नोव्हेंबर) निवड झालेल्या व्यक्ती/ संस्थांना देण्यात येतो. रोख रक्कम, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्रक असे या पुरस्काराचे स्वरूप असते.

६) आदिवासी हस्तकला प्रदर्शन

आदिवासी जमातींमध्ये अनेक उपजत गुण असतात. त्यांच्या साह्याने ते निसर्गातील विविध घटकांचा उपयोग करून सुंदर हस्तकलेच्या वस्तूंची निर्मिती करतात. विविध सुंदर हस्तकलेच्या वस्तूंना शहरी भागात मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. दुर्गम भागात राहणारे आदिवासी व शहरी भागातील ग्राहक यांना एकत्र आणणे व आदिवासींनी हस्तकलेने तयार

केलेल्या वस्तू प्रदर्शित करून त्यांची विक्री करणे व झालेल्या विक्रीतून आदिवासी कलाकारांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे तसेच आदिवासींच्या हस्तकलांचे संवर्धन करणे हा योजनेमागील मुख्य उद्देश आहे.

७) आदिवासी पारंपारिक नृत्य स्पर्धा

वेगवेगळ्या आदिवासी जमातींमध्ये नृत्य व संगिताचे विविध प्रकार अस्तित्वात आहेत. नृत्य आणि संगीताला आदिवासींच्या जीवनात महत्वाचे स्थान आहे. त्यांचे सामाजिक, धार्मिक विधी, सण, समारंभ व सामूहिक आनंदाचे क्षण विविध नृत्य प्रकारांनी साजरे केले जातात. आदिवासींनी त्यांची नृत्ये, विविध वाद्ये, गीते परंपरेने सांभाळली आहेत. आदिवासींचा हा सांस्कृतिक ठेवा भारतीय संस्कृतीचा अमूल्य भाग आहे.

आदिवासी संस्कृतीचा हा ठेवा जतन करण्यासाठी व त्याचे संवर्धन तसेच त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना तयार करण्यात आलेली आहे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे आदिवासींच्या पारंपारिक नृत्य स्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धा आयोजनाचा सर्व खर्च शासनाकडून केला जातो. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख स्वरूपात बक्षिसे दिली जातात.

८) वारली चित्रकला स्पर्धा

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यात वारली ही अत्यंत मागास आदिवासी जमात वास्तव्य करून आहे. त्यांची 'वारली' चित्र संस्कृती प्रसिध्द आहे. या आदिवासी जमातींच्या भिंती चित्रांना व चित्रकलेस जगभर मान्यता मिळाली आहे. वारली चित्रकलेचा प्रसार करण्यासाठी तसेच या चित्रकलेचे संवर्धन करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना तयार करण्यात आली आहे. वारली चित्रकला स्पर्धा प्रतिवर्षी घेण्यात येतात व स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात येतात.

९) आदिवासी युवकांकरीता नेतृत्व प्रशिक्षण व स्पर्धापूर्व प्रशिक्षण योजना.

सुशिक्षित आदिवासी तरूणांना आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती व्हावी तसेच समाजाचे नेतृत्व करण्याकरिता आवश्यक बाबींचे प्रशिक्षण या योजने अंतर्गत दिले जाते. महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, कर्मचारी चयन आयोग, निवड समिती यांच्या मार्फत विविध स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. या स्पर्धा परीक्षांची

तयारी कशी करावी यासाठी महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या, शिक्षण पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते व तयारी करून घेतली जाते. प्रामुख्याने आदिवासी वस्ती असलेल्या परिसरात आदिवासी उमेदवारांसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या योजने अंतर्गत निवास, भोजन व प्रशिक्षणाचा सर्व खर्च शासनाकडून करण्यात येतो.

५.५ महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या योजना

महाराष्ट्र सरकारने 'महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित' ही संस्था १९७२ साली स्थापन केली आहे. हे महामंडळ महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा, १९६० अन्वये स्थापन करण्यात आले आहे. महामंडळाचे कार्यक्षेत्र पुणे, अहमदनगर, नाशिक, ठाणे, रायगड, धुळे, जळगाव, नागपूर, अमरावती, यवतमाळ, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर व नांदेड या जिल्ह्यांतील ६२ तालुक्यांमध्ये पसरलेले आहे. महामंडळाच्या ४० तालुका शाखा व ९ प्रादेशिक कार्यालये- जुन्नर, नाशिक, नंदूरबार, जव्हार, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ, चंद्रपूर, व भंडारा येथे आहेत. त्यांच्यामार्फत महामंडळ आपला कार्यभार चालवते.

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाला सहाय्य करण्यासाठी आदिवासी सहकारी संस्थांची मदत घेतली जाते. महामंडळाच्या कार्यक्षेत्रात २७५ आदिवासी सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. 'महाराष्ट्र राज्य आदिवासी आर्थिक स्थिती सुधारणा कायदा, १९७६', नुसार आदिवासी क्षेत्रातील अन्नधान्य व किरकोळ जंगल उत्पादन यांच्या एकाधिकार खरेदीसाठी आदिवासी सहकारी विकास महामंडळ सरकारचा मुख्य मध्यस्थ म्हणून काम करते.

म. रा. सह. आ. वि. मं. मार्फत पुढील योजना राबविण्यात येतात.

१) एकाधिकार धान्य खरेदी योजना

आदिवासी लोक हे अशिक्षित व अज्ञानी आहेत. त्यांना विविध वस्तूंच्या बाजारातील किंमती, वजन, मापे इत्यादींची माहिती नसते. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून त्यांच्या अज्ञानाचा गैर फायदा घेतला जातो व त्यांची पिळवणूक केली जाते. त्यांचा शेतीमाल कमी किंमतीला विकत घेतला जातो. वजनमापांमध्येही फसवणूक केली जाते. पावसाळ्यापूर्वी जेव्हा आदिवासींच्या घरातील धान्याचा साठा संपुष्ठात येतो तेव्हा ते व्यापारी व दुकानदारांकडून कर्ज घेतात. अशा

परिस्थितीत व्यापारी कर्जाच्या मोबदल्यात धान्य देण्याची अट घालतात. शेती उत्पादन झाल्यावर अटीप्रमाणे ते अत्यंत कमी भावात खरेदी केले जाते. व्याजही जास्त आकारले जाते. अशा रितीने व्यापारी आदिवासींना कर्ज देऊन पिळवणूक करतात. आजपर्यंत आदिवासी या दुष्टचक्रात सापडलेला होता. आदिवासींची ही पिळवणूक थांबवण्यासाठी व त्यांच्या शेतमालाला योग्य भाव देण्यासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. एकाधिकार खरेदी योजनेनुसार आदिवासींना रास्त भाव देण्यासाठी त्या विभागातील प्रमुख बाजारपेठांतील शेतमालाचे दर लक्षात घेऊन संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत दर निश्चित केले जातात. त्यामुळे आदिवासींना रास्त भाव मिळतो. थोडक्यात महामंडळाच्या या योजनेमुळे आदिवासींची व्यापारी, सावकार, दलाल यांच्या तावडीतून सुटका होण्यास मदत झाली आहे. आदिवासी सहकारी संस्था महामंडळाच्या वतीने मालाची खरेदी करतात.

महामंडळाने सन २००४-०५ मध्ये एकाधिकार व आधारभूत मिळून एकूण २१ कृषी उपज वस्तूंची ७,४४,२७५ क्विंटल इतकी खरेदी केली होती. त्याची किंमत ४,८९६.२० लाख रू. इतकी होती. सन २००५-०६ मध्ये महामंडळाने कृषी उपज वस्तूंची १२,०६,८६९ क्विंटल वजनाची, रक्कम रूपये ७,९५२.०९ लाख इतक्या किंमतीची खरेदी केली होती.

अ) आदिवासी सोसायट्यांमार्फत धान्य खरेदी

महामंडळाने २७५ आदिवासी सोसायट्यांमार्फत ७५ तालुक्यांमध्ये धान्य खरेदी केंद्रे सुरू केली आहेत. या केंद्रामध्ये भात, तांदूळ, ज्वारी, भुईमूग शेंगा, तूर, वरई, नागली, खुरासनी, तीळ, उडीद, हरभरा इ. धान्यांची खरेदी केली जाते. जवळच्या बाजारातील धान्यांचे भाव लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांकडून दर निश्चित केले जातात.

ब) गौण वनोत्पादनांची खरेदी

आदिवासी जंगलातून गौण वनोत्पादने गोळा करण्याचे काम करतात. ही गौण उत्पादने जंगलातून गोळा करणे अतिशय कष्टाचे काम असते. या गौण उत्पादनांमध्ये हिरडा, डिंक, मोहाची फुले, मध, तेंदूची पाने, कढीपत्ता, शिकेकाई, टोळंबी इ. समावेश होतो. ही गौण वनोत्पादने ते बाजारात विकतात. व्यापारी ही वनोत्पादने अतिशय कमी किंमतीला खरेदी करून आदिवासींची फसवणूक करतात. आदिवासींची फसवणूक व पिळवणूक होऊ नये म्हणून ही गौण वनोत्पादने आदिवासी सहकारी संस्था महामंडळाने निश्चित केलेल्या केंद्रावर खरेदी करतात.

महामंडळाने सन २००४-०५ मध्ये १४,६६४.२१ क्विंटल गौण वनोत्पादनांची, रूपये ३३५.२४ लाख किंमतीला खरेदी केली होती. सन २००५-०६ मध्ये २६,०३१ क्विंटल गौण वनोत्पादनांची, रूपये २७३.२६ लाख इतक्या किंमतीची खरेदी केली होती.

२) शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांसाठी जीवनाआवश्यक वस्तूंचा पुरवठा

महाराष्ट्र शासनातर्फे राज्यातील आदिवासी मुलामुलींसाठी आश्रमशाळा, वसतिगृहे चालविली जातात. या शाळा व वसतिगृहांना जीवनाआवश्यक वस्तूंचा पुरवठा, उदा. धान्य, किराणा माल, शैक्षणिक साहित्य इ. महामंडळाकडून करण्यात येतो.

३) सुशिक्षित बेकार आदिवासी तरूणांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना

सुशिक्षित बेकार आदिवासी तरूणांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा, त्यांनी आर्थिक बाबतीत आत्मनिर्भर व्हावे या दृष्टीकोनातून महामंडळ काही आर्थिक विकासाच्या योजना राबविते. या योजना एन. एस. एफ. डी. सी, नवी दिल्ली या राष्ट्रीय स्तरावरील वित्तीय व विकास संस्थेच्या सहकार्याने सुरू करण्यात आल्या आहेत. या योजनांअंतर्गत म. रा. स. आ. वि. म. मंडळ एकलव्य मिनी ट्रक योजना, ऑटोरिक्षा, झेरॉक्स मशीन, टेम्पो ट्रॅक्स, ट्रॅक्टर, ट्रक इ. खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देते. या योजनांचा फायदा घेणाऱ्यांना प्रकल्प योजनेच्या सुमारे १० टक्के पर्यंत वैयक्तिक सहभाग द्यावा लागतो. उर्वरित ९० टक्के रक्कम कर्जरूपाने देण्यात येते. या कर्जावर ६ टक्के दराने व्याज आकारणी केली जाते.

म. रा. स. आ. वि. म. मंडळातर्फे वरील प्रमुख योजना राबविल्या जातात. तसेच इतर अनेक लहान मोठ्या योजना राबविल्या जातात. या योजना राबविण्यामागे आदिवासी जमातींचा सर्वांगीण विकास करणे हा महामंडळाचा प्रमुख उद्देश आहे.

***

संदर्भ (References)

१) डॉ. गारे गोविंद (संपा.)- आदिवासी विकास योजना, प्रकाशक - आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे. पृ. १०/१४

२) कित्ता, पृ. ११/१३

३) http://trti.mah.nic.in

४) नागरिकांची सनद, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय. मुंबई, पृ. ७

५) डॉ. गारे गोविंद - पूर्व चर्चित, पृ. २८

६) Dr. Jain Navinchandra & Dr. Tribhuwan Robin - Mirage of Health and Development Vidya Nidhi Publication Pune – 37, page No. 30, 31, & 62

७) डॉ. गारे गोविंद - पूर्व चर्चित, पृ. ३२/३३

८) नागरिकांची सनद - पूर्व चर्चित, पृ. १०

९) http://tribal.maharashtra.gov.in

१०) डॉ. गारे गोविंद - आदिवासी विकास योजना, पृ. ५९/६०

प्रकरण सहावे

सामग्रीचे विश्लेषण आणि निर्वचन

६.१	प्रस्तावना	१८१
६.२	आदिवासी विकास योजनांचे लाभार्थी व बिगर लाभार्थी मुलाखत प्रतिसादाचे विश्लेषण	१८१
६.३	प्रकल्प अधिकारी मुलाखत – प्रतिसादाचे वर्णन	२६५
६.४	आश्रमशाळा मुख्याध्यापक मुलाखत – प्रतिसादाचे वर्णन	२७०
६.५	आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था पदाधिकारी मुलाखत – प्रतिसादाचे वर्णन	२७६
	संदर्भ (References)	२८८

प्रकरण सहावे
सामग्रीचे विश्लेषण आणि निर्वचन

६.१ प्रस्तावना

संशोधन प्रक्रिया ही केवळ तथ्यसंकलन करणे, त्यांचे वर्गीकरण व सारणीकरण करणे एवढ्या पुरतीच मर्यादीत नाही. गोळा केलेल्या तथ्यांचे योग्यप्रकारे विश्लेषण व निर्वचन करणे आवश्यक असते. त्या विश्लेषणाच्या व निर्वचनाच्या आधारावर नवीन नियमांचे प्रतिपादन करता येते. सामाजिक संशोधनाचा उद्देश नवीन नियम व नवीन संकल्पना शोधून काढणे हा असतो. तसेच जुने नियम व संकल्पनांची पुनर्रपरीक्षा करणे हा ही असतो. गोळा केलेल्या तथ्यांचे शास्त्रीय दृष्टीकोणातून विश्लेषण व निर्वचन केले नाही तर सामाजिक संशोधनाचा उद्देश पूर्ण होत नाही. तसेच कोणत्याही विषयाचे, घटनेचे, किंवा समस्येचे कार्यकारणभाव जाणून घेणे हेही संशोधनात महत्वाचे कार्य असते. हे कार्य गोळा केलेल्या तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन केल्याशिवाय सफल होऊ शकत नाही.

प्रस्तुत संशोधनात आदिवासी विकास योजनांचे लाभार्थी, बिगर लाभार्थी, प्रकल्प अधिकारी, शासकीय आदिवासी आश्रमशाळांचे मुख्याध्यापक, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे अध्यक्ष/ संचालक यांच्याकडून प्रश्नावलींच्या माध्यमातून माहितीचे संकलन केलेले आहे. त्या माहितीचे शास्त्रीय दृष्टीकोणानुसार विश्लेषण व निर्वचन केलेले आहे.

६.२ आदिवासी विकास योजनांच्या लाभार्थ्यांसाठी व बिगर लाभार्थ्यांसाठी प्रश्नावली

सह्याद्री विभागातील अहमदनगर, नाशिक, पुणे, व ठाणे या चार जिल्ह्यांतील अकोले, इगतपूरी, जुन्नर, आंबेगाव व मोखाडा या पाच तालुक्यांची तथ्य संकलनासाठी निवड केलेली आहे. प्रत्येक तालुक्यातील सहा गावे व त्या प्रत्येक गावातील दहा कुटुंबप्रमुख व्यक्ती अशा एकूण तीस गावांतील ३०० व्यक्तींकडून प्रश्नावल्या भरून घेण्यात आलेल्या आहेत. व्यक्तींची निवड ही साध्या नमुना निवड पध्दतीप्रमाणे केलेली आहे. त्यामध्ये आदिवासी विकास योजनांचे लाभधारक व बिगर लाभधारक व्यक्तींचा समावेश आहे. सर्व ३०० कुटुंबप्रमुखांनी दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण व निर्वचन खालीलप्रमाणे.

तक्ता क्र. ६.१ कुटुंब प्रमुखांची लिंग निहाय माहिती

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
लिंग	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
पुरुष	५९	९८.३	५९	९८.३	६०	६०	१२०	१००	६०	१००	२९८	९९.३
स्त्री	१	१.७	१	१.७	०	०	०	०	०	०	२	०.७
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.१ मध्ये लिंगनिहाय वर्गीकरण केलेले आहे. त्यानुसार एकूण ३०० कुटुंबांपैकी २९८ कुटुंब प्रमुख पुरुष आहेत. तर फक्त २ स्त्रिया कुटुंबप्रमुख आहेत. त्यापैकी एक अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील आहे व दुसरी नाशिक जिल्ह्यातील इगतपूरी तालुक्यातील आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव व ठाणे जिल्ह्यातील मोखाडा या तालुक्यांत सर्व कुटुंबप्रमुख हे पुरुष आहे. वरील माहितीनुसार ज्या दोन स्त्रिया कुटुंबप्रमुख आहेत त्यांच्या पतीचे निधन झाल्यामुळे त्यांच्यावर कुटुंबप्रमुख पदाची जबाबदरी पडलेली आहे.

तक्ता क्र. ६.२ वयोगटानुसार वर्गीकरण

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
वयोगट	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
२०- ४०	१५	२५	३३	५५	२९	२९	५८	४८.३	०	०	१०६	३५.३
४०- ६०	३६	६०	२४	४०	३१	२५	५६	४७.७	४३	७१.७	१५९	५३
६०चे वर	९	१५	३	५	०	६	६	५	१७	२८.३	३५	११.७
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२ मध्ये प्रत्यक्ष भेट देऊन माहिती गोळा केलेल्या कुटुंब प्रमुखांचा वयोगट दर्शविला आहे. एकूण ३०० कुटुंबापैकी १०६ (३५.३) कुटुंबप्रमुखांचा वयोगट हा २० ते ४० वर्षे होता व १५९ (५३ टक्के) लोकांचा वयोगट हा ४० ते ६० वर्षे होता. उर्वरित ३५ (११.७ टक्के) लोकांचा वयोगट ६० वर्षांपेक्षा जास्त होता. म्हणजेच ४० ते ६० या वयोगटातील कुटुंबप्रमुखांची संख्या सर्वाधिक होती. तर ६० वर्षांपेक्षा जास्त वय असणाऱ्या कुटुंबप्रमुखांची संख्या सर्वात कमी होती. २० ते ४० वर्षे या तरूण वयोगटातील कुटुंबप्रमुखांची संख्याही बरीच मोठी होती. तरूणांच्या वयोगटात नव्याने संसार सुरू केलेल्या व एकत्र कुटुंबातून विभक्त झालेल्या व्यक्तींचा समावेश होता. ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात तरूणांच्या वयोगटात एकही व्यक्तीचा समावेश नव्हता. ६० वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील जे कुटुंबप्रमुख होते त्या कुटुंबात संयुक्त कुटुंब पध्दती आढळून आली.

वरील तक्ता क्र. ६.२ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.१) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.१
वयोगट रचना



तक्ता क्र. ६.३ शैक्षणिक पातळी

जिल्हे	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुके	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
शैक्षणिक पात्रता	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
निरक्षर	३०	५०	३६	६०.०	२८	३१	५९	४९.२	३५	५८.३	१६०	५३.३
प्राथमिक	२२	३६.७	१३	२१.७	२१	१३	३४	२८.३	१३	२१.७	८२	२७.३
माध्यमिक	७	११.७	७	११.७	१०	११	२१	१७.५	९	१५.०	४४	१४.७
उच्च माध्यमिक	०	०	३	५.०	१	५	६	५.०	३	५.०	१२	४.०
पदवी	१	१.७	१	१.७	०	०	०	०.०	०	०.०	२	०.७
पदव्युत्तर	०	०	०	०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
पी.एच.डी.	०	०	०	०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.३ मध्ये शैक्षणिक पातळी दर्शविण्यात आली आहे. एकूण कुटुंबांपैकी १६० (५३.३ टक्के) कुटुंबप्रमुख हे अशिक्षित होते. अहमदनगर, नाशिक व ठाणे या जिल्ह्यातील अशिक्षितांची टक्केवारी ही अनुक्रमे ५० टक्के, ६० टक्के व ५८.३ टक्के इतकी होती. पुणे जिल्ह्यात अशिक्षितांचे प्रमाण हे ४९.२ टक्के होते. नाशिक व ठाणे जिल्ह्यात अशिक्षितांचे प्रमाण हे सर्वाधिक होते. प्राथमिक शिक्षण घेतलेल्यांचे एकूण प्रमाण हे २७.३ टक्के होते. प्राथमिक शिक्षण घेतलेल्या लोकांचे सर्वाधिक प्रमाण हे अहमदनगर जिल्ह्यात तर सर्वात कमी प्रमाण हे नाशिक व ठाणे जिल्ह्यात होते. माध्यमिक शिक्षण घेतलेल्यांचे एकूण प्रमाण १४.७ टक्के होते. सर्वाधिक प्रमाण (१७.५ टक्के) पुणे जिल्ह्यात होते. तर सर्वांत कमी प्रमाण (११.७ टक्के) अहमदनगर व नाशिक जिल्ह्यात होते. उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेल्यांचे एकूण प्रमाण ४ टक्के होते. पदवी पर्यंत शिक्षण घेतलेले नगर जिल्ह्यात एक व नाशिक जिल्ह्यात एक असे दोन कुटुंबप्रमुख होते. उच्च शिक्षित एकही कुटुंबप्रमुख नव्हता.

शैक्षणिकदृष्ट्या विचार केला असता आदिवासींमध्ये अशिक्षितपणाचे प्रमाण अधिक आहे. ४० ते ६० व ६० वर्षांपेक्षा जास्त या वयोगटातील लोकांचे अशिक्षितपणाचे प्रमाण जास्त आहे. २० ते ४० या तरूण वयोगटात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच पदवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या व्यक्तींचे प्रमाण जास्त आहे. अलिकडे करण्यात आलेल्या शैक्षणिक सुधारणा त्यास कारणीभूत आहेत. ज्या व्यक्तींनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले होते त्यांना आर्थिक परिस्थितीमुळे व जवळ शिक्षणाची सोय उपलब्ध नसल्याने शिक्षण अर्धवट सोडावे लागले होते. दोन पदवीधर शेती करीत होते. शेतीतून फारसे उत्पन्न मिळत नसल्याने ते नोकरीच्या शोधात होते.

वरील तक्ता क्र. ६.३ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.२) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.२
कुटुंब प्रमुखांची शैक्षणिक पातळी



तक्ता क्र. ६.४ शैक्षणिक गळतीचे प्रमाण

अ.क्र.	जिल्हा	अहमदनगर			नाशिक			पुणे						ठाणे			एकूण		एकूण	गळतीचे प्रमाण %		
	प्रकल्प	राजूर			नाशिक			घोडेगांव						जव्हार								
	तालुका	अकोले			इगतपूरी			जुन्नर			आंबेगांव			मोखाडा								
	शैक्षणिक पात्रता	मुलं	मुली	एकूण	मुलं	मुली	एकूण	मुलं	मुली	एकूण	मुलं	मुली	एकूण	मुलं	मुली	एकूण	मुलं	मुली		मुलं	मुली	एकूण
१	मुलांची संख्या	८७	८२	१६९	८५	८०	१६५	८०	७०	१५०	८३	७७	१६०	९६	१०४	२००	४३१	४१३	८४४	-	-	-
२	१ ली ते ४ थी	८५	७५	१६०	८१	७२	१५३	७८	६८	१४६	८१	७२	१५३	८९	८९	१७८	४१४	३७६	७९०	३.९	९.०	६.४
३	५ वी ते ७ वी	७९	६५	१४४	७५	६५	१४०	७५	६१	१३६	७६	६४	१४०	७१	६९	१५०	३७६	३२४	७००	९.८	१३.८२	११.४
४	८ वी ते १० वी	७४	५६	१३०	७०	६२	१३२	७०	५१	१२१	६६	४९	११५	६०	३७	९७	३४०	२५५	५९५	९.५७	२१.२९	१५.०
५	११ वी ते १२ वी	४३	१७	६०	३०	२४	५४	४९	२१	७०	४०	२२	६२	३५	७	४२	१९७	९१	२८८	४२.०५	६४.३१	५१.६
६	पदवीधर	०७	३	१०	५	१	६	९	७	१६	१०	६	१६	५	०	५	३६	१७	५३	८१.७२	८१.३१	८१.६
७	आय.टी.आय	५	१	६	२	१	३	७	३	१०	७	४	११	५	१	६	२६	१०	३६	-	-	-
८	पदविका	१	-	१	-	-	-	२	-	२	१	-	१	-	-	-	४	०	४	-	-	-
९	अभियांत्रिकी	-	-	-	१	-	१	१	-	१	१	-	१	-	-	-	३	०	३	-	-	-
१०	वैद्यकीय	-	-	-	१	-	१	१	१	२	१	-	१	-	-	-	३	१	४	-	-	-
११	पी.एच्.डी.	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-	-
	एकूण																					

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.४ मध्ये शैक्षणिक गळतीचे प्रमाण दर्शविण्यात आले आहे. समाजाच्या प्रगतीत शिक्षणाचा महत्वाचा वाटा असतो. कोणत्याही समाजात उच्च शिक्षणाचे प्रमाण जेवढे जास्त असते तेवढा तो समाज प्रगत असतो. आजच्या स्पर्धेच्या युगात उच्च शिक्षण हा प्रगतीतील मैलाचा दगड ठरला आहे. आदिवासी समाजाचा विचार करता त्यांच्यात उच्च शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. कारण त्यांच्यात शैक्षणिक गळतीचे प्रमाण मोठे आहे.

वरील तक्त्यात अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यांतील मुलांच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दर्शविली आहे. वरील चारही जिल्ह्यांत एकूण ३०० कुटुंबांत जन्माला आलेल्या एकूण ४३१ मुलांपैकी ४१४ मुलांनी पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतलेला होता. म्हणजेच १७ मुले शाळेत जातच नव्हती. त्याचप्रमाणे एकूण ४१३ मुलींपैकी ३७६ मुली पहिलीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या आढळल्या म्हणजेच ३७ मुलींनी शाळेत प्रवेशच घेतलेला नव्हता. एकूण ८४४ मुला - मुलीं पैकी ७९० मुले-मुलींनी शाळेत प्रवेश घेतलेला होता. मुलांच्या गळतीचे प्रमाण ३.९ टक्के होते. मुलींच्या गळतीचे प्रमाण ९ टक्के होते. तर एकूण गळतीचे प्रमाण ६.४ टक्के होते. अगोदरच्या मुलांच्या जन्मानंतर जन्माला आलेल्या मुला - मुलींचा सांभाळ करण्याकरीता त्यांना शाळेतच पाठविले जात नव्हते.

पहिलीच्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या ४१४ मुलांपैकी ३७६ मुले पाचवीच्या वर्गात गेलेली आढळली. तर ३७६ मुलींपैकी ३२४ मुली पाचवीच्या वर्गात गेल्या होत्या. एकूण ७९० मुला - मुलींपैकी ७०० मुला - मुलींनी ५ व्या इयत्तेत प्रवेश घेतला होता. मुलांच्या गळतीचे प्रमाण ९.८ टक्के होते. मुलींच्या गळतीचे प्रमाण १३.८२ टक्के होते. एकूण गळतीचे प्रमाण ११.४ टक्के होते. पाचव्या इयत्तेत प्रवेश घेणाऱ्या ३७६ मुलांपैकी ३४० मुलांनी आठव्या इयत्तेत प्रवेश घेतला होता. तर ३२४ मुलींपैकी २५५ मुलींनी आठव्या इयत्तेत प्रवेश घेतला होता. एकूण ७०० मुला-मुलींपैकी ५९५ मुला-मुलींनी आठव्या इयत्तेत प्रवेश घेतला होता. मुलांच्या गळतीचे प्रमाण ९.५७ टक्के होते. मुलींच्या गळतीचे प्रमाण २१.२९ टक्के होते. एकूण मुला-मुलींच्या गळतीचे प्रमाण १५ टक्के होते. आठव्या इयत्तेत प्रवेश घेणाऱ्या ३४० मुलांपैकी १९७ मुलांनी ११ वीच्या वर्गात प्रवेश घेतलेला होता. २५५ मुलींपैकी फक्त ९१ मुलींनी ११ वी च्या वर्गात प्रवेश घेतला होता. एकूण ५९५ मुला - मुलींपैकी २८८ मुला - मुलींनी ११ वी च्या वर्गात प्रवेश घेतला होता. मुलांच्या गळतीचे प्रमाण ४२.०५ टक्के होते. मुलींच्या गळतीचे प्रमाण ६४.३१ टक्के होते. एकूण गळतीचे प्रमाण ५१.६ टक्के होते. ११ वीच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या १९७ मुलांपैकी ३६ मुले पदवीधर झालेली होती. ९१ मुलींपैकी १७ मुली पदवीधर

झालेल्या होत्या. एकूण २८८ मुला - मुलींपैकी फक्त ५३ मुले-मुली पदवीधर झालेले होते. पदवीनंतर मुलांच्या गळतीचे प्रमाण ८१.७२ टक्के होते मुलींच्या गळतीचे प्रमाण ८१.३१ टक्के होते एकूण गळतीचे प्रमाण ८१.६ टक्के होते.

उच्च आणि तांत्रिक शिक्षणाचा विचार करता असे दिसते की, अहमदनगर जिल्ह्यातील ५ मुले व एका मुलीने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून पदविका प्रशिक्षण घेतलेले होते. फक्त एका मुलाने अभियांत्रिकी पदविका मिळविली होती. अभियंता, डॉक्टर व विद्यावाचस्पती (पी.एच्.डी) पदवी मिळविलेला एकही विद्यार्थी अहमदनगर जिल्ह्यात आढळला नाही. नाशिक जिल्ह्यात २ मुले व एका मुलीने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पदविका पूर्ण केली होती. एक मुलगा अभियंता व एक मुलगा डॉक्टर झालेला होता. पी.एच्.डी. पदवीधारक कोणीही नव्हते. जुन्नर तालुक्यात ७ मुले व ३ मुलींनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून पदविका घेतली होती. २ मुले अभियांत्रिकी पदविका प्राप्त केलेली होती. एक मुलगा अभियंता होता. एक मुलगा डॉक्टर होता व एक मुलगी डॉक्टरचे शिक्षण घेत होती. विद्यावाचस्पती (पी.एच्.डी.) पदवी मिळविलेले कोणीही नव्हते.

आंबेगाव तालुक्यातील ७ मुले व ४ मुलींनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून पदविका मिळविली होती. एक मुलगा अभियांत्रिकी पदविकेचे शिक्षण घेत होता. एक मुलगा अभियंता झालेला होता तर एक मुलगा डॉक्टरचे शिक्षण घेत होता. पी.एच्.डी. पदवी मिळविलेले कोणीही नव्हते. ठाणे जिल्ह्यात ५ मुले व एका मुलीने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून पदविका मिळविली होती. अभियांत्रिकी पदविका, अभियांत्रिकी पदवी, डॉक्टर व पी.एच्.डी. पदवी यांचे शिक्षण घेत असलेले वा मिळविलेले कोणीही नव्हते.

शैक्षणिक गळतीचा विचार करता असे दिसून येते की आदिवासी मुला - मुलींमध्ये शैक्षणिक गळतीचे प्रमाण मोठे आहे. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी या शिक्षणाच्या चढत्याक्रमाने गळतीचे प्रमाणही वाढत जाते. मुलांपेक्षा मुलींमध्ये गळतीचे प्रमाण अधिक दिसून येते. इयत्ता दहावी पर्यंत मुलांमध्ये होणारी गळती ही गुरे सांभाळणे, शेती कामात मदत करणे, लहान मुलांचा सांभाळ करणे वारंवार मुलाने नापास होणे या कारणांमुळे होत असते. मुलींमध्ये होणारी गळती ही प्रामुख्याने लहान मुलांचा सांभाळ करणे, घर सांभाळणे, घरकामात मदत करणे, गुरे वळणे, मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा पालकांचा संकुचित दृष्टीकोण, गरिबी या कारणांमुळे होत असते. इयत्ता दहावी व बारावी मध्ये आदिवासी मुलांचे नापास होण्याचे प्रमाण अधिक आहे. गुणवत्ता पूर्ण शिक्षणाचा अभाव हे त्या मागचे प्रमुख

कारण आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेण्याची सोय आदिवासी भागात नाही. त्यामुळे अनेक पालक आपल्या मुलांना गरिबीमुळे तालुक्याच्या ठिकाणी किंवा शहरात शिक्षणासाठी पाठवीत नाहीत. इयत्ता दहावी व बारावी नंतर मुलींची अल्पवयातच लग्ने लावून दिली जातात. या सर्व कारणांमुळे दहावी व बारावी नंतर मुला-मुलींचे शैक्षणिक गळतीचे सर्वाधिक प्रमाण दिसून येते. ज्या मुलांचे पालक सुशिक्षित आहेत किंवा ज्यांची आर्थिक परिस्थिती बरी आहे किंवा ज्यांच्या मुलांना गुणवत्तेवर शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला आहे, त्याच पालकांची मुले पदवीपर्यंतचे किंवा उच्च शिक्षण घेतात.

उच्च शिक्षणाच्या बाबतीत असे दिसून येते की आदिवासी मुला-मुलींमध्ये उच्च व तांत्रिक शिक्षण घेण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. गरिबी, शैक्षणिक जाणीवेचा अभाव, शिक्षणाकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टीकोण, अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा ही सर्व कारणे त्यास कारणीभूत आहेत. शैक्षणिक मागासलेपण हे आदिवासींच्या सर्वांगीण विकासात प्रमुख अडथळा ठरले आहे. वरील तक्ता क्र. ६.४ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.३ व आलेलख क्र. ६.४) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.३ शैक्षणिक स्थिती



आलेख क्र. ६.४
शैक्षणिक गळतीचे प्रमाण



तक्ता क्र. ६.५ वैवाहिक स्थिती

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
वैवाहिक दर्जा	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
अविवाहित	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
विवाहित	५८	९६.६	५९	९८.३	६०	५९	११९	९९.२	५९	९८.३	२९५	९८.३
विधवा	१	१.७	१	१.७	०	०	०	०	०	०	२	०.७
विधूर	१	१.७	०	०	०	१	१	०.८	१	१.७	३	१
विभक्त	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
घटस्फोटीत	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
इतर	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.५ मध्ये वैवाहिक स्थिती दर्शविली आहे. एकूण ३०० कुटुंबप्रमुख व्यक्तींपैकी २९५ (९८.३ टक्के) व्यक्ती या विवाहित होत्या. अहमदनगर व नाशिक या दोन जिल्ह्यात प्रत्येकी एक कुटुंबप्रमुख ही विधवा स्त्री होती. अहमदनगर, पुणे व ठाणे या जिल्ह्यात प्रत्येकी १ व्यक्ती विधुर होती. थोडक्यात सर्व व्यक्ती या विवाहित होत्या. आदिवासींमधील रुढी, परंपरा, चालीरीती, कमी वयातील विवाह, विवाहाचा सार्वत्रिकपणा इ. मुळे सर्व व्यक्ती विवाहित आढळून आल्या.

तक्ता क्र. ६.६ कुटुंबातील व्यक्तींची संख्या

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
कुटुंबाचा आकार	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
१ - ४	२०	३३.३	२५	४१.७	२५	२७	५२	४३.३	२७	४५	१२४	४१.३
५ - ६	३०	५०.०	२८	४६.७	२६	२५	५१	४२.५	२७	४५	१३६	४५.३
७ - ८	१०	१६.७	७	११.७	९	८	१७	१४.२	६	१०	४०	१३.४
८ पेक्षा जास्त	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.६ मध्ये कौटुंबिक रचना दर्शविली आहे. एकूण तिनशे कुटुंबांपैकी १ ते ४ व्यक्ती असलेल्या कुटुंबांचे प्रमाण ४१.३ टक्के होते. ५ ते ६ व्यक्ती असलेल्या कुटुंबाचे प्रमाण ४५.३ टक्के होते. ७ ते ८ व्यक्ती असलेल्या कुटुंबांचे प्रमाण १३.४ टक्के होते. ८ पेक्षा जास्त व्यक्ती असलेले एकही कुटुंब आढळले नाही.

अहमदनगर, नाशिक पुणे व ठाणे या चार जिल्ह्यातील प्रत्येकी एकूण ६० कुटुंबांपैकी १ ते ४ व्यक्ती असलेल्या कुटुंबाचे प्रमाण अनुक्रमे ३३.३ टक्के, ४१.७ टक्के, ४३.३ टक्के व ४५ टक्के इतके होते. ५ ते ७ व्यक्ती असलेल्या कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे ५० टक्के, ४६.७

टक्के, ४२.५ टक्के व ४५ टक्के इतके होते तर ७ ते ८ व्यक्ती असलेल्या कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे १६.७ टक्के, ११.७ टक्के, १४.२ टक्के व १० टक्के इतके होते. आठ पेक्षा अधिक व्यक्ती असलेल्या कुटुंबांची संख्या ०.० टक्के होती. थोडक्यात मोठ्या कुटुंबांचे प्रमाण जास्त होते.

शिक्षित असलेल्या २० ते ४० या वयोगटातील व्यक्तींच्या कुटुंबांचा आकार लहान होता. अशिक्षित असलेल्या कुटुंबांचा आकार मोठा होता. ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात २० ते ४० या वयोगटात एकही व्यक्ती नसताना १ ते ४ व्यक्ती असलेल्या कुटुंबांची संख्या ६० पैकी २७ इतकी आहे. मोखाडा तालुक्यात दारिद्र्य, अशिक्षितपणा, अज्ञान, अंधश्रध्दा, कुपोषण इत्यादींचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण सर्वाधिक आहे. परिणामी लहान कुटुंबे आढळून आली, परंतु त्यांनी कुटुंब नियोजन मात्र केलेले नव्हते.

तक्ता क्र. ६.७ कौटुंबिक वार्षिक उत्पन्न

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
कौटुंबिक उत्पन्न	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
५००० पर्यंत	२	३.३	१	१.७	१	२	३	२.५	१	१.७	७	२.३
५००१ ते १००००	३१	५१.७	२५	४१.७	२५	३२	५७	४७.५	४३	७१.७	१५६	५२.०
१०००१ ते १५०००	१९	३१.७	२७	४५.०	२५	२३	४८	४०.०	१५	२५.०	१०९	३६.३
१५००१ ते २००००	३	५.०	३	५.०	५	२	७	५.८	०	०.०	१३	४.३
२०००० चे वर	५	८.३	४	६.७	४	१	५	४.२	१	१.७	१५	५.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.७ मध्ये वार्षिक उत्पन्न दर्शविले आहे. प्रत्यक्ष भेट देऊन माहिती गोळा केलेल्या एकूण ३०० कुटुंबांपैकी ५००० रु. पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेली ७ (२.३ टक्के) कुटुंबे होती. ५००१ ते १०,००० रु. वार्षिक उत्पन्न असलेली १५६ (५२ टक्के) कुटुंबे होती. १०,००१ ते १५,००० रु. वार्षिक उत्पन्न असणारी १०९ (३६.३ टक्के) कुटुंबे होती. १५००१ ते २०,००० रु. वार्षिक उत्पन्न असणारी १३ (४.३ टक्के) कुटुंबे होती. २०,००० रु. पेक्षा जास्त उत्पन्न असणारी १५ (५ टक्के) कुटुंबे होती.

वार्षिक ५००० रु. पर्यंत उत्पन्न असणारी अहमदनगर जिल्ह्यात दोन, नाशिक जिल्ह्यात एक, पुणे जिल्ह्यात तीन व ठाणे जिल्ह्यात एक अशी एकूण सात कुटुंबे होती. या कुटुंबांमध्ये भूमिहीन, शेतमजूर, अल्प-भूधारक, विधवा स्त्रिया इ. समावेश होता. ही सर्व कुटुंबे अत्यंत हलाखीत जीवन जगत होती. वार्षिक ५००१ ते १०,००० रु. उत्पन्न असणाऱ्यांचे प्रमाण अनुक्रमे अमहदनगर (५१.७ टक्के), नाशिक (४१.७ टक्के), पुणे (४७.५ टक्के) व ठाणे (७१.७ टक्के) होते. वार्षिक १०,००१ ते १५,००० रु. उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे अहमदनगर (३१.७ टक्के), नाशिक (४५ टक्के), पुणे (४० टक्के) व ठाणे (२५ टक्के) इतके आहे. वार्षिक २०,००० रु. पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अनुक्रमे अहमदनगर (८.३ टक्के), नाशिक (६.७ टक्के), पुणे (४.२ टक्के) व ठाणे (१.७ टक्के) आहे. बेंचमार्क सर्वेक्षण १९९६-९७ नुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील रु. २०,००० पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४.९७ टक्के आहे. हे प्रमाण संशोधनाशी (५ टक्के) मिळते-जुळते आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांचे वार्षिक सरासरी उत्पन्न १०,८७५ रू. आहे. नाशिक जिल्ह्यातील कुटुंबाचे ११,३६० रू. आहे. पुणे जिल्ह्यातील कुटुंबांचे १०,६९० रू. आहे व ठाणे जिल्ह्यातील कुटुंबांचे ८,९६० रू. आहे. वार्षिक उत्पन्नाच्या आकडेवारीवरून असे दिसते की, अहमदनगर, पुणे व ठाणे या जिल्ह्यांच्या तुलनेत नाशिक जिल्ह्यातील व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न अधिक आहे. ठाणे जिल्ह्यातील व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. नाशिक जिल्ह्यात सरासरी जमीन धारणा प्रमाण जास्त (३ हेक्टर), जमिनीची प्रत चांगली व पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध असल्याने वार्षिक उत्पन्न जास्त आहे. तसेच चारही जिल्ह्यात ज्या व्यक्तींकडे अधिक जमीन आहे, ते शिक्षित आहेत, पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध आहेत त्यांचे वार्षिक उत्पन्न इतरांच्या तुलनेत अधिक आहे. ठाणे जिल्ह्याचा विचार करता त्या जिल्ह्यातील लोकांचे वार्षिक उत्पन्न अत्यंत कमी आहे. सरासरी

जमीन धारणेचे प्रमाण कमी (१ हेक्टर), पाणी पुरवठ्याच्या अपुऱ्या सुविधा, कोरडवाहू व खडकाळ जमिनीचे प्रमाण जास्त, अशिक्षितपणा, अज्ञान, अंधश्रध्दा इ. कारणांमुळे शेतीचे उत्पन्न कमी आहे. त्यामुळे त्यांचे वार्षिक उत्पन्न कमी आहे.

वरील तक्ता क्र. ६.७ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.५) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.५



तक्ता क्र. ६.८ कौटुंबिक वार्षिक खर्च (रुपये)

जिल्हा	अहमदनगर	नाशिक	पुणे	ठाणे	एकूण खर्चाशी घटक निहाय सरासरी खर्च (%)
प्रकल्प	राजूर	नाशिक	घोडेगांव	जव्हार	
तालुका	अकोले	इगतपूरी	जुन्नर व आंबेगांव	मोखाडा	
घटक बाबी	खर्च	खर्च	खर्च	खर्च	
अन्न	५२४१	३९०६	४७९२	४५११	४१.२
कपडालत्ता	११४५	८५३	१०४७	९८६	९.०
किराणा, रॉकेल, दिवाबत्ती	१९७२	१४६९	१८०३	१६९७	१५.५
आरोग्य	२५४	१९०	२३३	२१९	२.०
शिक्षण	३१८	२३७	२९१	२७४	२.५
सामाजिक सेवा	१६५	१२३	१५१	१४२	१.३
लग्न	३१८	२३७	२९१	२७४	२.५
उत्सव	१५२६	११३८	१३९६	१३१४	१२.०
रुढी परंपरा	५०९	३७९	४६५	४३८	४.०
इतर	१२७२	९४८	११६३	१०९५	१०.०
एकूण	१२७२०	९४८०	११६३०	१०९५०	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.८ मध्ये कौटुंबिक खर्च दर्शविण्यात आलेला आहे. अमर्याद गरजा व मर्यादित साधने यांचा मेळ घालण्यासाठी मानवाला नेहमीच प्रयत्न करावे लागतात. आदिवासी जमातींच्या गरजांच्या मानाने त्यांची उत्पन्नाची साधने अत्यंत तुटपुंजी आहेत. त्यामुळे त्यांनी आपल्या गरजांनाच मर्यादित करून घेतले आहे. तरीही किमान जीवन जगण्यासाठी त्यांना किमान खर्च करावाच लागतो. आदिवासी **महादेव कोळी** जमातीच्या सरासरी उत्पन्नाचा विचार करता त्यांचा सरासरी खर्च हा जास्त आहे. कर्ज काढून, उसनवारी करून त्यांना आपल्या वाढीव खर्चाची तोंड मिळवणी करावी लागते. थोडक्यात त्यांचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक हे तुटीचेच आढळते.

अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यांचा वार्षिक सरासरी खर्च हा वेगवेगळा आहे. अहमदनगर जिल्ह्यात वार्षिक सरासरी कौटुंबिक खर्च १२७२० रु. आहे. तोच नाशिक जिल्ह्यात ९४८० रु. पुणे जिल्ह्यात ११६३० रु. व ठाणे जिल्ह्यात १०९५० रु. आहे. प्रत्येक जिल्ह्यात सरासरी ३ ते ४ च कुटुंबे बचत करणारी आढळली. उर्वरित कुटुंबांचा वार्षिक सरासरी खर्च, वार्षिक सरासरी उत्पन्नापेक्षा जास्त होता. म्हणजेच त्यांचे वार्षिक अंदाजपत्रक तोट्याचे होते. येणारी तूट भरून काढण्यासाठी त्यांना खावटी कर्ज घेणे, सावकाराकडून किंवा व्यापाऱ्यांकडून कर्ज घेणे, उसनवारी करणे, नातेवाईकांकडून मदत घेणे इत्यादी मार्गांचा अवलंब करावा लागत होता. अहमदनगर, पुणे व ठाणे या जिल्ह्यांचा विचार करता नाशिक जिल्ह्यातील जमीन इतर जिल्ह्यांच्या तुलनेत चांगली असल्याने अन्नधान्याचे उत्पादन चांगले होते. त्यामुळे त्यांचा अन्नधान्यावरील खर्च कमी आहे. तसेच इतर सुविधांचीही उपलब्धता असल्याने इतर बाबींवरीलही सरासरी खर्च कमी आहे.

आदिवासी **'महादेव कोळी'** कुटुंबांचा सर्वाधिक खर्च हा अन्नधान्यावर (४१.२ टक्के) व किराणा मालावर (१५.५ टक्के) होतो. कपडालत्ता यावर सरासरी ९ टक्के खर्च केला जातो. सण, समारंभ, उत्सव, परंपरा व इतर खर्च यावरही अधिक खर्च केला जातो. थोडक्यात दैनंदिन उपभोग्य वस्तुंवर अधिक खर्च केला जातो. विकासाच्या दृष्टीने आवश्यक घटक आरोग्य व शिक्षण या बाबींवर अत्यंत कमी खर्च केला जातो. इतर बाबींवरील खर्चात व्यसनावरील खर्चाचा समावेश करण्यात आलेला आहे. व्यसन करणाऱ्या व्यक्ती व त्यांचा खर्च याचे सविस्तर वर्णन पुढील तक्ता क्र. ६.९ मध्ये करण्यात आलेले आहे.

तक्ता क्र. ६.९ अ) व्यसन करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर व आंबेगांव				मोखाडा			
व्यसन	व्यक्ती	%	व्यक्ती	%	जुन्नर	आंबेगांव	एकूण व्यक्ती	%	व्यक्ती	%	व्यक्ती	%
तंबाखू	५९	९८.३	५९	९८.३	५८	५९	११७	९७.५	६०	१००	२९५	९८.३३
बिडी	७	११.७	९	१५.०	९	८	१७	१४.२	१३	२१.७	४६	१५.३३
दारू	३६	६०.०	३५	५८.३	३३	३७	७०	५८.३३	५०	८३.३३	१९१	६३.६७
इतर	१५	२५.०	२४	४०.०	१३	२१	३४	२८.३	३६	६०.०	१०९	३६.३३

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.९ अ मध्ये व्यसन करणाऱ्या व्यक्तींची संख्या व प्रमाण दर्शविले आहे. एकूण ३०० कुटुंबांपैकी २९५ (९८.३३ टक्के) कुटुंबांमध्ये तंबाखूचे सेवन केले जात होते. अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांत तंबाखू सेवन करण्याचे प्रमाण ९८.३ टक्के होते. पुणे जिल्ह्यात ९७.५ टक्के होते. ठाणे जिल्ह्यात तंबाखू सेवनाचे प्रमाण १०० टक्के म्हणजे सर्वाधिक होते. चारही जिल्हे मिळून बिडी पिणाऱ्या व्यक्तींची संख्या ४६ (१५.३३ टक्के) होती. अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यांत बिडी पिण्याचे प्रमाण अनुक्रमे ११.७ टक्के, १५ टक्के, १४.२ टक्के व २१.७ टक्के होते.

चारही जिल्ह्यातील एकूण ३०० कुटुंबांपैकी १९१ (६३.६७ टक्के) कुटुंबांमध्ये दारूचे सेवन केले जात होते. अहमदनगर, नाशिक व पुणे या जिल्ह्यांत दारूचे सेवन करण्याचे प्रमाण अनुक्रमे ६० टक्के, ५८.३ टक्के व व ५८.३३ टक्के असे होते. ठाणे जिल्ह्यात दारूचे सेवन करण्याचे प्रमाण ८३.३३ टक्के म्हणजे सर्वाधिक होते. गुटखा खाणे, सिगारेट ओढणे, चिलीम ओढणे व मशेरी लावणे या इतर व्यसनांचे एकूण प्रमाण ३६.३३ टक्के होते. अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यांत इतर व्यसने करण्याचे प्रमाण अनुक्रमे २५ टक्के, ४० टक्के, २८.३ टक्के व ६० टक्के असे होते.

वरील आकडेवारीवरून असे दिसते की, आदिवासी समाज व्यसनाधिनतेच्या विळख्यात अडकलेला आहे.

तक्ता क्र. ६.९ ब) प्रतिकुटुंब व्यसनावरील वार्षिक खर्च (रुपये)

जिल्हा	अहमदनगर	नाशिक	पुणे	ठाणे	सरासरी खर्च (%)
प्रकल्प	राजूर	नाशिक	घोडेगांव	जव्हार	
तालुका	अकोले	इगतपूरी	जुन्नर व आंबेगांव	मोखाडा	
व्यसन	खर्च	खर्च	खर्च	खर्च	
तंबाखू	३८२	२८४	३४९	३२९	३०
बिडी	१२७	९५	११६	११०	१०
दारू	५०९	३७९	४६५	४३८	४०
इतर	२५४	१९०	२३३	२१९	२०
एकूण	१२७२	९४८	११६३	१०९५	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.९ मध्ये व्यसनावरील खर्च दर्शविण्यात आलेला आहे. आदिवासी समाजात व्यसनाधिनतेचे प्रमाण अधिक आहे. आदिवासींचे कोणतेही कार्य दारू शिवाय पार पडत नाही. तंबाखू खाणे हे प्रत्येक व्यक्तीचे आद्य कर्तव्य समजले जाते. अहमदनगर जिल्ह्यात व्यसनावरील सरासरी वार्षिक खर्च १२७२ रु. आहे. तोच खर्च नाशिक जिल्ह्यात ९४८ रु. पुणे जिल्ह्यात ११६३ रु. तर ठाणे जिल्ह्यात १०९५ रु. आहे. नाशिक जिल्ह्यात काही गावांत दारूबंदी केलेली आढळली तसेच वारकरी संप्रदायाचा प्रसारही झालेला आढळला त्यामुळे व्यसनावरील खर्च कमी आहे. अहमदनगर, पुणे या जिल्ह्यांतही काही गावांत वारकरी संप्रदायाचा प्रसार झालेला आढळाला. त्या गावात दारू पिणाऱ्यांचे प्रमाण कमी होते. परंतु ठाणे जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची जाणीव व जागृती झालेली नसल्याने तसेच दारिद्र्याचे प्रमाण अधिक असल्याने व्यसनाधिनतेचे प्रमाण अधिक आढळले.

अहमदनगर जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांचा व्यसनावरील वार्षिक सरासरी खर्च एकूण सरासरी वार्षिक उत्पन्नाच्या ११.८९ टक्के आहे. नाशिक जिल्ह्यात हा खर्च सरासरी ८.३५ टक्के आहे. पुणे व ठाणे जिल्ह्यात अनुक्रमे १०.८७ टक्के व १२.२२ टक्के इतका आहे. चारही जिल्ह्यातील कुटुंबांच्या एकूण वार्षिक सरासरी खर्चापैकी सरासरी १० टक्के खर्च व्यसनावर होतो. आदिवासींचा सर्वाधिक खर्च दारू पिण्यावर (४० टक्के) होतो. त्यानंतर तंबाखुवर (३० टक्के) खर्च होतो. बिडी पिण्यावरील खर्च (१० टक्के) आहे. इतर व्यसनावरील खर्चात गुटखा, सिगारेट यांचा समावेश होतो. अलिकडे तरूणांमध्ये गुटखा खाण्याचे व सिगारेट ओढण्याचे प्रमाण वाढलेले आहे. स्त्रियांमध्ये तंबाखु खाण्याचे प्रमाण अधिक आहे. मात्र स्त्रियांना याशिवाय इतर कोणतेही व्यसन आढळले नाही.

व्यसनाधिनतेचा आदिवासींच्या आरोग्यावर प्रतिकुल परिणाम होतो. अनेकांना दुर्धर आजार होतात. नाजूक आर्थिक परिस्थितीमुळे ते योग्य ते उपचार घेऊ शकत नाहीत. त्यामुळे अनेकांचा त्यातच बळी जातो. एकूणच आदिवासींचे सामाजिक स्वास्थ्य व्यसनाधिनतेमुळे अडचणीत सापडले आहे. त्यातून आदिवासींना बाहेर काढण्यासाठी त्यांच्यात जाणीव व जागृती निर्माण करण्याची गरज आहे.

वरील तक्ता क्र. ६.९ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.६) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.६



तक्ता क्र. ६.१० जमीनधारक आणि भूमिहीन कुटुंबांचे वितरण

जिल्हा	अहमदनगर	नाशिक	पुणे		ठाणे	एकूण	%
प्रकल्प	राजूर	नाशिक	घोडेगांव		जव्हार		
तालुका	अकोले	इगतपूरी	जुन्नर	आंबेगांव	मोखाडा		
एकूण कुटुंबे	६०	६०	६०	६०	६०	३००	१००
जमीनधारक	५९	६०	५९	६०	५९	२९७	९९
भूमिहीन	१	०	१	०	१	३	१.०
बागायत	५	१४	१०	७	२	३८	१२.८
जिरायत	५४	४६	४९	५३	५७	२५९	८७.२
० - १ (हेक्टर)	१२	७	११	१४	१७	६१	२०.५
१ - २ (हेक्टर)	२२	१९	२५	२३	२१	११०	३७.०
२ - ३ (हेक्टर)	१३	२१	१५	१२	१२	७३	२४.६
३ - ५ (हेक्टर)	९	६	५	७	५	३२	१०.८
५-१० (हेक्टर)	३	५	२	३	४	१७	५.७
१० हे. पेक्षा जास्त	०	२	१	१	०	४	१.३

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.१० मध्ये भूधारक व भूमिहीन कुटुंबे दर्शविण्यात आलेली आहेत. जमीन धारणेचे प्रमाण तपासले असता असे आढळते की तीनशे कुटुंबांपैकी २९७ (९९ टक्के) कुटुंबांकडे स्वतःच्या मालकीची जमीन होती.

सरासरी जमीन धारणेचा विचार करता अल्पभूधारक शेतकऱ्यांचे सर्वाधिक प्रमाण ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात आहे. सर्वांत कमी प्रमाण नाशिक जिल्ह्यातील इगतपूरी तालुक्यात आहे. अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यांत १ ते २ हेक्टर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक (३७ टक्के) आहे. म्हणजेच सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. त्या खालोखाल २ ते ३ हेक्टर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे एकूण प्रमाण (२४.६ टक्के) आहे. ३ ते ५ हेक्टर जमीन असणाऱ्यांचे प्रमाण १०.८ टक्के होते. ५ ते १० हेक्टर जमीन असणाऱ्यांचे प्रमाण ५.७ टक्के होते. या सर्वांचा समावेश मध्यम शेतकऱ्यांमध्ये होतो. दहा हेक्टर पेक्षा जास्त जमीन असणारे मोठे शेतकरी नाशिक जिल्ह्यात दोन व पुणे जिल्ह्यातील जुन्नर व आंबेगाव तालुक्यात प्रत्येकी एक असे एकूण ४ शेतकरी होते. अहमदनगर व ठाणे जिल्ह्यात एकही मोठा शेतकरी सर्व्हेक्षणात आढळून आला नाही.

थोडक्यात आदिवासी **महादेव कोळी** जमातीत जमीन मालकीचे प्रमाण अधिक असले तरी सरासरी जमीन धारणा कमी आहे. बागायती क्षेत्र १२.८ टक्के आहे. महाराष्ट्र राज्यातील बागायत क्षेत्र १६ टक्के आहे. दोन्हींची तुलना करता फक्त ३.२ टक्के फरक दिसून येतो. परंतु महाराष्ट्रातील बागायत क्षेत्र हे बारमाही सिंचनाखालील आहे. आदिवासी विभागातील प्रत्यक्ष भेट दिलेल्या शेतकऱ्यांपैकी एकही शेतकऱ्याला बारमाही पाणीपुरवठा उपलब्ध नव्हता. रब्बी हंगामातील काही पिकांना पाणी उपलब्ध होते व त्याचे प्रमाणही कमी असते. एकूण जमिनी पैकी फक्त एका जमिनीच्या तुकड्याला विशिष्ट हंगामात सिंचन सुविधा उपलब्ध असेल तर आदिवासी लोक त्याला अज्ञानापोटी बागायत जमीन समजतात. प्रत्यक्षात त्यांना उन्हाळ्यात पिण्याचे पाणीही पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसते. वरील कारणांमुळे आदिवासींचे बागायती क्षेत्र महाराष्ट्र राज्याच्या बागायती क्षेत्राच्या जवळपास दिसून येते.

वरील तक्ता क्र. ६.१० चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.७) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.७



तक्ता क्र. ६.११ शेती पाणीपुरवठ्याची साधने

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
पाणी पुरवठा साधने	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
विहीर	३	५.१	९	१५.०	६	५	११	९.२	१	१.७	२४	८.१
धरण	१	१.७	१	१.७	१	०	१	०.८	०	०.०	३	१.०
कुपनलिका	०	०	१	१.७	२	१	३	२.५	०	०	४	१.४
नदी/ओढा	१	१.७	३	५.०	१	१	२	१.७	१	१.७	७	२.३
पाणी उपलब्ध नाही	५४	९१.५	४६	७६.६	४९	५३	१०२	८५.७	५७	९६.६	२५९	८७.२
एकूण	५९	१००	६०	१००	५९	६०	११९	१००	५९	१००	२९७	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.११ मध्ये शेती पाणी पुरवठ्याची साधने दर्शविण्यात आलेली आहेत. शेतीस केल्या जाणाऱ्या चारही जिल्ह्यातील एकूण पाणीपुरवठ्याचा विचार करता सर्वाधिक पाणीपुरवठा विहिरींपासून (८.१ टक्के) केला जातो. त्यानंतर नदी / ओढा (२.३ टक्के), विंधन विहीर (१.४ टक्के) व छोटे-मोठे तलाव (१ टक्के) यांचा क्रमांक लागतो.

सह्याद्री विभागातील आदिवासी पट्ट्यातील जमीन ही डोंगराळ, खडकाळ व रेताड आहे. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी अत्यंत खोल व कमी आहे. परिणामी विहिरी व विंधन विहिरी यांचे प्रमाणही अत्यंत कमी आहे. पावसाळ्यात प्रचंड पाऊस पडतो परंतु पाण्याची अडवणूक व साठवणूक केली जात नसल्याने उन्हाळ्यात पिण्यासही पाणी मिळत नाही.

वरील तक्ता क्र. ६.११ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.८) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.८



तक्ता क्र. ६.१२ पीक रचना

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण	%	मोखाडा			
पिके	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
खरीप	५९	९८.३	६०	१००	५९	६०	११९	९९.२	५९	९८.३	२९७	९९.०
रब्बी	५५	९१.७	५७	९५.०	५९	५९	११८	९८.३	५	८.३	२३५	७८.३
व्यापारी	७	११.७	१७	२८.३	९	६	१५	१२.५	५	८.३	४४	१४.७

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.१२ मध्ये पीक रचना दर्शविण्यात आलेली आहे. शेती हा आदिवासींचा पारंपारिक व्यवसाय आहे. त्यांचा उदरनिर्वाह शेतीवरच अवलंबून आहे. आदिवासींची जमीन ही मूरमाळ, खडकाळ व रेताड आहे. तसेच ती उंचसकल भागात असल्याने पाणी पुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्यांना पूर्णपणे पावसावर अवलंबून रहावे लागते. परिणामी त्यांना खरीप व रब्बी पिकेच घ्यावी लागतात. चारही जिल्ह्यांचे खरीप पिके घेण्याचे सरासरी प्रमाण ९९ टक्के आहे. रब्बी पिके घेण्याचे प्रमाण ७८.३ टक्के आहे. ठाणे जिल्ह्यात खरीप पिकेच घेतली जात असल्याने रब्बी पिके घेण्याचे प्रमाण फक्त ८.३ टक्के आहे. चारही जिल्ह्यांत नगदी पिके घेण्याचे प्रमाण १४.७ टक्के आहे. रब्बी पिके ही पाऊस चांगला पडला तरच घेता येतात. ज्या कुटुंबांना आदिवासी विकास योजनांच्या माध्यमातून पाणी पुरवठ्याच्या सोयी उपलब्ध झालेल्या आहेत ती कुटुंबे अलिकडे काही प्रमाणात नगदी पिके घेताना आढळतात.

वरील तक्ता क्र ६.१२ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.९) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.९



तक्ता क्र. ६.१३ बियाणांचा वापर

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण	%	मोखाडा			
बियाणांचा वापर	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
पारंपारिक	५९	९८.३	६०	१००	५९	६०	११९	९९.२	५९	९८.३	२९७	९९.०
संकरीत	२०	३३.३	४०	६६.७	२७	३३	६०	५०.०	१३	२१.७	१३३	४४.३
प्रामाणित	७	११.७	१८	३०.०	११	९	२०	१६.७	४	६.७	४९	१६.३
औषधेयुक्त	२	३.३	७	११.७	२	०	२	०.७	०	०.०	११	३.७

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.१३ मध्ये बियाणांचा वापर दर्शविण्यात आलेला आहे. शेतीची उत्पादकता ही जमिनीचा प्रकार, शेती करण्याची पध्दत, बियाणांचा वापर व पाणीपुरवठ्याच्या सुविधा यावर अवलंबून असते. आदिवासी जमातींमध्ये पारंपारिक बियाणांचा वापर करण्याचे सरासरी प्रमाण हे ९९ टक्के आहे. संकरीत बियाणे वापरण्याचे प्रमाण हे ४४.३ टक्के आहे. प्रामाणित बियाणे वापरण्याचे प्रमाण १६.३ टक्के आहे. औषधेयुक्त बियाणे वापरण्याचे प्रमाण फक्त ३.७

टक्के आहे. अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यांचा विचार करता संकरीत, प्रमाणित व औषधेयुक्त बियाणे वापरण्याचे सर्वाधिक प्रमाण नाशिक जिल्ह्यात आहे. तर सर्वात कमी प्रमाण ठाणे जिल्ह्यात आहे. शेतकरी एकाच वेळेस पारंपारिक, संकरीत, प्रामाणित व औषधेयुक्त बियाणे वापरतात त्यामुळे एकूण प्रमाण अधिक दिसून येते.

नाशिक जिल्ह्यातील जमीन इतर जिल्ह्यांच्या तुलनेत चांगली असल्याने व शेतकरीही जागरूक असल्याने आधुनिक बियाणांचा वापर करण्याचे प्रमाण अधिक आहे. ठाणे जिल्ह्यातील जमीन खडकाळ व एकपिकी असल्याने तसेच शेतकरी अज्ञानी व गरीब असल्याने आधुनिक बियाणे वापरण्याचे प्रमाण कमी आहे.

महाराष्ट्रातील आधुनिक शेतीचा विचार करता आदिवासींमध्ये आधुनिक बियाणांचा वापर करण्याचे प्रमाण कमी आहे. आधुनिक बियाणे महागडी आहेत. त्यांच्या वापराचे ज्ञान आदिवासी शेतकऱ्यांना नाही. जे वापरतात ते शास्त्रीय दृष्टीकोनाचा वापर करीत नाहीत. पारंपारिक बियाणे ही वर्षानुवर्षे पुन्हा-पुन्हा वापरता येतात त्यामुळे त्यांचा वापर सर्वाधिक प्रमाणात केला जातो.

थोडक्यात वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की आदिवासी शेतकरी पारंपारिक बियाणांचा अधिक प्रमाणात वापर करतात. आधुनिक बियाणांचा वापर कमी प्रमाणात करतात.

तक्ता क्र. ६.१४ जमीन कसण्याची पध्दत

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण	%	मोखाडा			
पध्दत	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
पारंपारिक	५९	९८.३	६०	१००	५९	६०	११९	९९.२	५९	९८.३	२९७	९९.०
आधुनिक	२	३.३	७	११.७	२	३	५	४.२	०	०.०	१४	४.७
खतांचा वापर	४०	६६.७	६०	१००	४८	४३	९१	७५.८	३४	५६.७	२२५	७५.०
औषधांचा वापर	१३	२१.७	२५	४१.७	१२	१५	२७	२२.५	७	११.७	७२	२४.०

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.१४ मध्ये जमीन कसण्याची पध्दत दर्शविण्यात आलेली आहे. जमीन कसण्याची पध्दत जर आधुनिक असेल तर शेतीची उत्पादकता अधिक राहते. पारंपारिक पध्दतीने शेती केली जात असेल तर शेतीची उत्पादकता कमी राहते.

आदिवासींच्या शेती कसण्याच्या पध्दतींचा विचार करता अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यांत पारंपारिक पध्दतीने शेती करण्याचे प्रमाण ९९ ते १०० टक्के आहे. आधुनिक पध्दतीने शेती कसण्याचे प्रमाण फक्त ४.७ टक्के आहे. आधुनिक पध्दतीने शेती कसण्याच्या माहितीचा अभाव, निरक्षरता, अज्ञान, जमिनीचे विभाजन व तुकडीकरण तसेच जमीन धारणेचे प्रमाण कमी यामुळे पारंपारिक पध्दतीने शेती करण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. काही शेतकरी पारंपारिक पध्दतीने शेती करण्याबरोबरच आधुनिक पध्दतीनेही शेती करतात. अहमदनगर जिल्ह्यामध्ये दोन शेतकरी, नाशिक जिल्ह्यामध्ये सात शेतकरी, पुणे जिल्ह्यात पाच शेतकरी संयुक्त पध्दतीचा वापर करीत होते. ठाणे जिल्ह्यात कोणाताही शेतकरी आधुनिक पध्दतीचा वापर करीत नव्हता.

खतांचा वापर करण्याचे प्रमाण वरील चारही जिल्ह्यांत सरासरी ७५ टक्के होते. नाशिक जिल्ह्यातील सर्व शेतकरी खतांचा वापर करीत होते. ठाणे जिल्ह्यात खतांचा वापर करण्याचे प्रमाण सर्वात कमी (५६.७ टक्के) होते. खतांच्या वापरात शेणखताचा वापर चारही जिल्ह्यांत अधिक होता तर रासायनिक खतांचा वापर अल्पप्रमाणात होता. बहुतेक शेतकऱ्यांकडे जनावरे असल्याने शेणखताचा वापर अधिक होता. औषधांचा वापर करण्याचे प्रमाण चारही जिल्ह्यांत सरासरी २४ टक्के होते. नाशिक जिल्ह्यात सर्वात जास्त ४१.७ टक्के होते. सर्वात कमी प्रमाण ठाणे जिल्ह्यात ११.७ टक्के होते. अलिकडे अनेक पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव होत असल्याने शेतकऱ्यांना पिके वाचवण्यासाठी औषध फवारणी करावी लागते.

आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती गरिबीची असल्याने ते महागडी रासायनिक खते व औषधे खरेदी करू शकत नाहीत. तसेच त्यांच्या शास्त्रीय वापराची माहितीही त्यांना नसल्याने रासायनिक खतांचा व औषधांचा वापर कमी प्रमाणात आहे. जे शेतकरी शिकलेले आहेत व त्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे, तेच फक्त औषधांचा फवारणीसाठी वापर करतात.

वरील तक्ता क्र. ६.१४ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.१०) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.१०



तक्ता क्र. ६.१५ शेती मशागतीच्या तांत्रिक माहितीचे स्त्रोत

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण	%	मोखाडा			
स्त्रोत	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
पंचायत समिती	१३	२१.७	२३	३८.३	१५	१४	२९	२४.२	९	१५.०	७४	२४.७
कृषि विस्तार अधिकारी	७	११.७	१०	१६.७	९	१३	२२	१८.३	५	८.३	४४	१४.७
आदिवासी विकास विभाग	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
दूरदर्शन	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
रेडिओ	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
वर्तमानपत्र	२	३.३	०	०.०	०	१	१	०.८	०	०.०	३	१.०

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.१५ मध्ये शेती मशागतीच्या तांत्रिक माहितीचे स्त्रोत दर्शविण्यात आलेले आहेत. भारतीय शेतीची उत्पादकता कमी आहे. ती वाढविण्यासाठी भारतातील कृषी विद्यापिठांमार्फत सतत संशोधन केले जाते. त्या संशोधनाची माहिती शेतकऱ्यांना सरकारच्या विविध विभागांमार्फत तसेच सहकारी साखर कारखाने, दूरदर्शन, रेडिओ व वर्तमानपत्रांतून दिली जाते. अधिक-अधिक शेतकऱ्यांनी तांत्रिक पध्दतीने शेती करावी व शेती उत्पादन वाढवावे हा त्यामागील उद्देश आहे.

अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यांतील आदिवासी शेतकऱ्यांना शेती मशागतीची तांत्रिक माहिती पुढील प्रमाणे मिळाली होती. पंचायत समितीमार्फत ७४ शेतकरी, कृषी विस्तार अधिकाऱ्यांमार्फत ४४ शेतकरी, आदिवासी विकास विभाग ०० शेतकरी, दूरदर्शन ०० शेतकरी, रेडिओ ०० शेतकरी वर्तमानपत्र-३ शेतकरी इत्यादी. वरील आकडेवारीवरून आदिवासी शेतकऱ्यांना शेती मशागतीची तांत्रिक माहिती मिळण्याचे प्रमाण खूप कमी दिसून येते.

आदिवासी शेतकरी निरक्षर, अज्ञानी असल्याने त्यांना संबंधित विभागांची माहिती नसते. कृषी अधिकारी आदिवासी भागात जात नाहीत, तालुक्याच्या ठिकाणी राहूनच काम पाहतात. त्यामुळे शेती मशागतीच्या तांत्रिक माहितीचे प्रमाण कमी आहे. आदिवासी विकास विभागातर्फे आदिवासी शेतकऱ्यांना शेती मशागतीची साधने उपलब्ध करून दिली जातात. परंतु शेती मशागतीची तांत्रिक माहिती देण्याची यंत्रणा या विभागाकडे नाही. बहुतेक आदिवासी दुर्गम भागात राहत असल्याने त्या गावांत रेडिओ व दूरदर्शन चालत नाही. गरिबीमुळे आदिवासी ही साधने खरेदी करू शकत नाहीत. तसेच ज्या मोजक्या शेतकऱ्यांकडे रेडिओ व दूरदर्शन आहे ते त्यांचा उपयोग मनोरंजनासाठी करतात. या कारणांमुळे दूरदर्शन व रेडिओ यांच्या माध्यमातून कोणताही शेतकरी शेती मशागतीची तांत्रिक माहिती घेत नाही. वर्तमान पत्रातून शेती मशागतीची तांत्रिक माहिती अहमदनगर जिल्ह्यातील दोन व पुणे जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने घेतलेली होती. बहुतेक आदिवासी शेतकरी निरक्षर असल्याने तसेच त्यांच्या गावात दैनंदिन वर्तमानपत्र उपलब्ध होत नसल्याने वर्तमान पत्रातून माहिती मिळण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. वरील तीन शेतकरी आठवडे बाजाराला गेल्यानंतर वर्तमानपत्र विकत घेऊन त्यात त्या दिवशी शेती मशागतीची असलेली तांत्रिक माहिती त्यांनी वाचलेली होती.

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले व पुणे जिल्ह्यातील जुन्नर व आंबेगाव या तालुक्यात सहकारी साखर कारखाने आहेत. सहकारी साखर कारखान्यांमार्फतही शेतकऱ्यांना शेती विकासाच्या विविध योजना उपलब्ध करून दिल्या जातात. ऊस या पिकाच्या बाबतीत तांत्रिक माहिती दिली जाते. अकोले, जुन्नर व आंबेगाव या तालुक्यातील काही आदिवासी शेतकरी सहकारी साखर कारखान्यांचे सभासद आहेत. त्यांना सरकारमार्फत सहकारी साखर कारखान्यांचे समभाग देण्यात आलेले आहेत. वरील तीन तालुक्यांतील आदिवासी भाग हा सिंचित क्षेत्रात येत नसल्याने ऊसाचे उत्पादन होत नाही. त्यामुळे सहकारी साखर कारखान्यांमार्फत देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा व तांत्रिक माहितीचा आदिवासी शेतकऱ्यांना उपयोग होत नाही.

तक्ता क्र. ६.१६ रोजगार हमी योजने अंतर्गत मिळालेला रोजगार

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
रो.ह.यो. अंतर्गत काम मिळाले	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
होय	३७	६१.७	१८	३०.०	८	१४	२२	१८.३	१६	२६.७	९३	३१.०
नाही	२३	३८.३	४२	७०.०	५२	४६	९८	८१.७	४४	७३.३	२०७	६९.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.१६ मध्ये रोजगार हमी योजने अंतर्गत मिळालेला रोजगार/काम दर्शविण्यात आले आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्य व बेकारी कमी करण्यासाठी सरकारतर्फे रोजगार हमी योजना राबविली जाते. या योजनेचा आदिवासींना कमी प्रमाणात फायदा मिळाला आहे. सर्व्हेक्षित चार जिल्ह्यांना ग्रामीण रोजगार हमी योजनेचा फायदा अनुक्रमे अहमदनगर ३७ (६१.७ टक्के), नाशिक १८ (३० टक्के), पुणे १८ (१८.३ टक्के), व ठाणे १६ (२६.७ टक्के), मिळाला आहे. एकूण ३०० कुटुंबांचा विचार करता फक्त ९३ (३१ टक्के) कुटुंबांना रोजगार हमी योजनेचा फायदा मिळाला आहे. उर्वरित २०७ (६९ टक्के) कुटुंबांना कोणताही

लाभ मिळालेला नाही. अहमदनगर जिल्ह्यात आदिवासींना राजकीय जाणीवेमुळे व नेतृत्वामुळे रोजगार हमी योजनेचा अधिक फायदा मिळालेला आहे. रोजगार हमी योजना आदिवासींपर्यंत न पोहोचल्यामुळे त्यांना दारिद्र्यातच जीवन जगावे लागत आहे.

तक्ता क्र. ६.१७ कुटुंबातील काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या (रो.ह.यो./मजुरी/स्वतःच्या शेतावर/ नोकरी)

जिल्हा	अहमदनगर	नाशिक	पुणे			ठाणे	एकूण
प्रकल्प	राजूर	नाशिक	घोडेगांव			जव्हार	
तालुका	अकोले	इगतपूरी	जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	मोखाडा	
काम करणाऱ्या व्यक्ती	संख्या	संख्या	संख्या	संख्या		संख्या	संख्या
रो.ह.यो.	३७ (६०)	१८ (६०)	८ (६०)	१४ (६०)	२२ (१२०)	१६ (६०)	९३ (६०)
स्वतःच्या शेतावर	१५० (६०)	१७० (६०)	१३५ (६०)	१४७ (६०)	२८२ (१२०)	१२३ (६०)	७२५ (६०)
दुसऱ्याच्या शेतावर	१३० (६०)	७५ (६०)	११० (६०)	१२४ (६०)	२३४ (१२०)	१४७ (६०)	५८६ (६०)
इतर ठिकाणी	७५ (६०)	४० (६०)	५० (६०)	६७ (६०)	११७ (१२०)	८४ (६०)	३१६ (६०)
नोकरी	७ (६०)	५ (६०)	१० (६०)	८ (६०)	१८ (१२०)	०३ (६०)	३३ (६०)

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.
टिप:- कंसातील आकडे एकूण कुटुंबे दर्शवितात.

तक्ता क्र. ६.१७ मध्ये आदिवासी व्यक्तींना वेगवेगळ्या ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या रोजगाराची स्थिती दर्शविली आहे. महाराष्ट्र शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या रोजगार हमी योजनेत एकूण ३०० कुटुंबांतील फक्त ९३ व्यक्तींना रोजगार मिळाला होता. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील ६० कुटुंबांपैकी ३७ व्यक्तींना रोजगार हमी योजनेत काम मिळालेले होते. नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यातील व्यक्तींना रोजगार हमी योजनेत काम मिळाल्याचे प्रमाण कमी होते. ते अनुक्रमे १८ (६० कुटुंबे) व्यक्ती, २२ (१२० कुटुंबे) व्यक्ती

व १६ (६० कुटुंबे) व्यक्ती असे होते. रोजगार हमी योजना आदिवासी विभागात प्रभावीपणे राबविली जात नसल्याने या योजनेतून रोजगार मिळण्याचे प्रमाण कमी दिसून येते.

स्वतःच्या शेतात व दुसऱ्याच्या शेतावर काम करण्यात सर्वाधिक व्यक्ती गुंतलेल्या होत्या. लहान मुले वगळता काम करण्यास पात्र असणाऱ्या कुटुंबातील सर्व व्यक्ती स्वतःच्या शेतात उपजीविकेसाठी काम करत होत्या. शेतीच्या हंगामातच त्यांना स्वतःच्या शेतात काम उपलब्ध होते. आदिवासींचे धारण क्षेत्र लहान असल्याने आवश्यकतेपेक्षा अधिक व्यक्ती शेतात काम करत होत्या. लपलेल्या/सुप्त बेकारीचे मोठे प्रमाण आदिवासींच्या शेतीत आढळून आले. अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यातील स्वतःच्या शेतात काम करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण अनुक्रमे १५० (६० कुटुंबे) व्यक्ती, १७० (६० कुटुंबे) व्यक्ती, १८२ (१२० कुटुंबे) व्यक्ती व १२३ (६० कुटुंबे) व्यक्ती असे होते. स्वतःच्या शेतातील कामाची 'पल' संपल्यावर ते दुसऱ्याच्या शेतावर मजूर म्हणून काम करतात किंवा आपल्या शेजाऱ्याला त्याच्या 'पलीत' मदत करतात. पेरणी, खुरपणी, आवणी, कापणी तसेच शेती मशागतीची इतर कामे जेव्हा हातघाईवर येतात तेव्हा त्यांना ते 'पल' असे म्हणतात. पलीत ते एकमेकांना मदत करतात. दुसऱ्याच्या शेतावर शेतमजूर म्हणूनही ते काम करतात. अहमदनगर जिल्ह्यात १३० (६० कुटुंबे) व्यक्ती, नाशिक जिल्ह्यात ७५ (६० कुटुंबे) व्यक्ती, पुणे जिल्ह्यात २३४ (१२० कुटुंबे) व्यक्ती व ठाणे जिल्ह्यात १४७ (६० कुटुंबे) व्यक्ती दुसऱ्याच्या शेतावर काम करताना आढळल्या. शेतमजूरीपासून मिळणारा मजूरी दर अत्यंत कमी होता. कुटुंबातील अनेक सदस्यांना स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध नसल्याने रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत होते. स्थलांतरीतांमध्ये बहुतेक व्यक्ती शेतमजूर होत्या. रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्यांमध्ये पुरुष, स्त्रिया व मुले यांचा समावेश होता. स्त्रिया व मुले यांचे प्रमाण कमी होते. आदिवासी लोकांना शेती हंगामातच स्वतःच्या शेतावर काम व दुसऱ्याच्या शेतावर अल्प प्रमाणात रोजगार उपलब्ध होता. पावसाळ्यातील शेती हंगाम संपल्यानंतर त्यांना हिवाळ्यात व उन्हाळ्यात सक्तीने बेकार राहावे लागते.

इमारत बांधकाम, वीटभट्टी, लाकडे फोडणे, विहीर खोदणे, किराणा/कपड्याच्या दुकानात काम करणे, चर खोदणे, दगडी फोडणे तसेच इतर ठिकाणी रोजगार मिळण्याचे प्रमाणही कमी होते. चारही जिल्ह्यांतील एकूण ३०० कुटुंबांतील फक्त ३१६ व्यक्तींना वरील ठिकाणी रोजगार मिळाला होता. ते सर्व अकुशल कामगार होते. अकोले तालुक्यातील राजूर,

इगतपूरी तालुक्यातील घोटी, जुन्नर तालुक्यातील जुन्नर, आंबेगाव तालुक्यातील घोडेगांव व मोखाडा तालुक्यातील मोखाडा या बाजारपेठांच्या आसपासच्या गावांतील लोकांनाच वरील क्षेत्रात बाजार पेठेच्या ठिकाणी रोजगार उपलब्ध आहे. बाजार पेठांपासून दूर असणाऱ्या दुर्गम व अतिदुर्गम आदिवासी गावांतील लोकांना इतर ठिकाणी रोजगार उपलब्ध नाही.

सरकारी व खाजगी क्षेत्रात नोकरी करणाऱ्यांचे प्रमाण अंत्यत कमी आहे. अहमदनगर जिल्ह्यातील ७ (६० कुटुंबे) व्यक्ती, नाशिक जिल्ह्यातील ५ (६० कुटुंबे) व्यक्ती, पुणे जिल्ह्यातील १८ (१२० कुटुंबे) व्यक्ती व ठाणे जिल्ह्यातील ३ (६० कुटुंबे) व्यक्ती अशा एकूण ३३ व्यक्ती नोकरी करणाऱ्या होत्या. मोखाडा तालुका आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला असल्याने नोकरी करणाऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. नोकरी करणाऱ्या व्यक्ती शहरात राहत आहेत. त्यामुळे गावाकडील कुटुंबांना त्यांच्याकडून कमी प्रमाणात आर्थिक मदत केली जाते.

तक्ता क्र. ६.१८ गौण वनौपजे गोळा करण्याकरिता पार करावे लागणारे अंतर

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
अंतर	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
० ते १ किमी	३	५.०	१०	१६.७	७	५	१२	१०.०	१४	२३.३	३९	१३.०
१ ते २ किमी	६	१०.०	४०	६६.७	२३	४०	६३	५२.५	३	५.०	११२	३७.३
२ ते ५ किमी	३०	५०.०	१०	१६.७	२१	१५	३६	३०.०	४३	७१.७	११९	३९.७
५ ते १० किमी	२१	३५.०	०	०.०	९	०	९	७.५	०	०.०	३०	१०.०
१० पेक्षा जास्त	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.१८ मध्ये गौण वनौपजे गोळा करण्याकरिता पार करावे लागणारे अंतर दर्शविण्यात आलेले आहे. गौण वनौपजांपासून आदिवासींना उत्पन्न मिळत असले तरी ते गोळा करण्याकरिता त्यांना दूर अंतरावर जावे लागते. तसेच ते मिळविण्यासाठी खूप कष्ट करावे लागतात. गौण वनौपजे गोळा करण्याकरिता ३०० कुटुंबापैकी ३९ (१३ टक्के) कुटुंबांतील व्यक्तींना १ कि.मी. पर्यंत अंतर पार करावे लागते. १ ते २ कि.मी. पर्यंतचे अंतर ३७.३ टक्के लोकांना जावे लागते. २ ते ५ कि.मी. ३९.७ टक्के व ५ ते १० कि.मी. १० टक्के लोकांना अंतर पार करावे लागते. २ ते ५ कि.मी. पर्यंतचे अंतर अहमदनगर जिल्ह्यातील ३० (५० टक्के) लोकांना, नाशिक १० (१६.७ टक्के), पुणे ३६ (३० टक्के) व ठाणे ४३ (७१.७ टक्के) या प्रमाणे अंतर पार करावे लागते. ५ ते १० कि.मी. अंतर अहमदनगर २१ (३५ टक्के), नाशिक ०० (० टक्के), पुणे ९ (७.५ टक्के) व ठाणे ०० (० टक्के) या प्रमाणे जावे लागते. १० कि.मी. पेक्षा जास्त अंतर चारही जिल्ह्यातील सर्व ३०० कुटुंबांपैकी कोणीही जात नव्हते. अहमदनगर व ठाणे जिल्ह्यात गौण वनौपजे गोळा करण्यासाठी २ कि.मी. पेक्षा जास्त अंतर जावे लागण्याचे प्रमाण जास्त आहे.

गौण वनौपजांची उपलब्धता अहमदनगर व ठाणे जिल्ह्यात जास्त आहे. परंतु ती दूर जंगलातून गोळा करावी लागतात. अहमदनगर व ठाणे या जिल्ह्यांतील आदिवासी दुर्गम भागात राहत असल्याने त्यांना अधिक अंतर जावे लागते. पुणे व नाशिक जिल्ह्यात गौण वनौपजांची उपलब्धता कमी असून तेथील आदिवासी मोठ्या प्रमाणत गौण वनौपजे गोळा करीत नाहीत. गौण वनौपजांची उपलब्धता निसर्गावर अवलंबून असल्याने ती गोळा करण्यासाठी आदिवासींना कमी अधिक अंतर जावेच लागते. थोडक्यात आदिवासींना गौण वनौपजे गोळा करण्यासाठी मिळणाऱ्या मोबदल्याच्या मानाने अधिक कष्ट करावे लागतात.

तक्ता क्र. ६.१९ गौण वनौपजांची विक्री करण्याचे ठिकाण

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार		एकूण	
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
गौण वनौपजे विक्री ठिकाण	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
आ.वि.म.	३१	५१.७	२०	३३.३	२०	२०	४०	३३.३	१९	३१.७	११०	३६.७
स्थानिक व्यापारी	०	०.०	४०	६६.७	३८	३७	७५	६२.५	४१	६८.३	१५६	५२.०
बाजार/जत्रा	२९	४८.३	०	०.०	२	३	५	४.२	०	०.०	३४	११.३
इतर	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.१९ मध्ये गौण वनौपजांची विक्री करण्याची ठिकाणे दर्शविण्यात आलेली आहेत. आदिवासी लोकांचा उदरनिर्वाह हा शेती आणि गौण वनौंपजांवर अवलंबून असतो. जंगलातून गोळा केलेल्या गौण वनौंपजांची विक्री ते आदिवासी विकास महामंडळ, स्थानिक व्यापारी, जत्रा/बाजार व इतर ठिकाणी करीत असतात. गौण वनौपजांच्या विक्रीपासून त्यांना काही प्रमाणात उत्पन्न मिळत असते. आदिवासी विकास महामंडळाला गौण वनौपजे विक्री करण्याचे प्रमाण अहमदनगर जिल्ह्यात ५१.७ टक्के आहे. नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यांत ते जवळ-जवळ ३५ टक्के आहे. चारही जिल्ह्यांचे सरासरी एकूण प्रमाण ३६.७ टक्के आहे. स्थानिक व्यापाऱ्यांना गौण वनौपजे विक्री करण्याचे प्रमाण अहमदनगर ० टक्के, नाशिक ६६.७ टक्के, पुणे ६२.५ टक्के व ठाणे ६८.३ टक्के असे आहे. बाजार किंवा जत्रेत विक्री करण्याचे प्रमाण अहमदनगर ४८.३ टक्के, नाशिक ० टक्के, पुणे ४.२ टक्के व ठाणे ० टक्के असे आहे. चारही जिल्ह्यांचा एकत्रित विचार करता गौण वनौपजांची सर्वाधिक विक्री स्थानिक व्यापारी ५२ टक्के, आदिवासी विकास महामंडळ ३६.७ टक्के व बाजार/जत्रा ११.३ टक्के याप्रमाणे केली जाते.

गौण वनौपजांची सर्वाधिक विक्री स्थानिक व्यापारी व बाजार / जत्रेत केली जाते. कारण

१. स्थानिक व्यापारी अधिक किंमत देतात.

२. केव्हाही विक्री करता येते.

३. व्यापाऱ्यांकडून आदिवासींनी पैशाची अगोदरच उचल घेतलेली असते.

४. स्थानिक व्यापारी त्यांच्या नेहमीच्या परिचयाचे असतात.

५. व्यापारी आदिवासींना रात्री / अपरात्री केव्हाही पैशाची मदत करतात.

व्यापाऱ्यांकडून आदिवासींची पिळवणूक होऊ नये म्हणून आदिवासी विकास महामंडळची स्थापना करण्यात आलेली आहे. व्यापारी हिशोबात फसवतात, वजनमापे खोटी वापरतात, मालाचे पैसे कमी देतात इत्यादी. परंतु आदिवासी वरील कारणांमुळे व्यापाऱ्यांनाच माल विकतात. आदिवासी विकास महामंडळातर्फे फक्त कार्यालयीन वेळेतच मालाची खरेदी केली जाते. मालाचे पैसे त्वरित दिले जात नाहीत. बाजारपेठेपेक्षा कमी भावाने मालाची खरेदी केली जाते. त्यामुळे आदिवासी विकास महामंडळाला विक्री करण्याचे प्रमाण कमी आहे.

तक्ता क्र. ६.२० अर्थार्जनासाठी होणाऱ्या स्थलांतराची स्थिती

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
अर्थार्जनासाठी स्थलांतर	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
होय	४५	७५	५०	८३.३	५२	४८	१००	८३.३	४२	७०	२३७	७९.०
नाही	१५	२५	१०	१६.७	८	१२	२०	१६.७	१८	३०	६३	२१.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२० मध्ये रोजगारासाठी स्थलांतर दर्शविण्यात आलेले आहे.

आदिवासी **महादेव कोळी** जमातीचे उत्पन्न तुटपुंजे असल्याने व शेतीत बारमाही रोजगार उपलब्ध नसल्याने त्यांना उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करावे लागते. एकूण ३०० कुटुंबांपैकी २३७ (७९ टक्के) कुटुंबांतील काही व्यक्तींना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत होते. तर ६३ (२१ टक्के) कुटुंबांना स्थलांतर करावे लागत नव्हते. स्थलांतरितांचे सर्वाधिक प्रमाण नाशिक व पुणे जिल्ह्यात (८३.३ टक्के) दिसून येते व त्या खालो-खाल अहमदनगर (७५ टक्के) व ठाणे (७० टक्के) यांचा क्रमांक लागतो.

पावसाळ्यातील शेती हंगाम संपल्यानंतर मोठ्या प्रमाणात स्थलांतर घडून येते. कारण त्यानंतर स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध नसतो. जमीन धारणा कमी असलेले व ज्यांची जमीन नापिक, रेताड व कमी उत्पादकता असलेली आहे ते सर्व हंगामात (ऋतूत) स्थलांतर करताना दिसून येतात. नाशिक व पुणे जिल्ह्यात आदिवासी पट्टयालगत बागायती क्षेत्र व विकसित औद्योगिक क्षेत्र असल्याने शेतमजूर व कारखान्यात अकुशल कामगार म्हणून रोजगार उपलब्ध होतो. त्यामुळे या जिल्ह्यांत स्थलांतरितांचे प्रमाण अधिक आहे. अहमदनगर जिल्ह्यातील ७५ टक्के लोक हे शेतमजूर म्हणून स्थलांतर करताना आढळून आले. ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील लोकांची जमीन धारणा कमी आहे. ते अशिक्षित आहेत व त्यांचे उत्पन्न कमी आहे, तरीही त्यांच्या स्थलांतराचे प्रमाण कमी दिसून येते. कल्याण, डोंबिवली, ठाणे, उल्हासनगर, मुंबई हा औद्योगिकदृष्ट्या विकसित विभाग त्यांना जवळ असला तरी अशिक्षितपणा व अकुशलतेमुळे त्या ठिकाणी रोजगार मिळत नाही. तसेच ठाणे जिल्ह्यात बागायती क्षेत्र अत्यंत कमी असल्याने पावसाळ्यानंतर त्यांना दुसऱ्यांच्या शेतावर शेतमजूर म्हणूनही पुरेसा रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील आदिवासींना सक्तीने बेकार रहावे लागते. थोडक्यात एक प्रकारे ते दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेले आहेत.

तक्ता क्र. ६.२१ पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
विहीर	९	१५.०	२०	३३.३	८	११	१८	१५.८	२	३.३	५०	१६.७
हातपंप	०	०.०	०	०.०	१०	५	१५	१२.५	०	०.०	१५	५.०
कुपनलिका	१	१.७	०	०.०	०	०	०	०.०	१०	१६.७	११	३.७
नदी	१९	३१.७	०	०.०	२	१	३	२.५	०	०.०	२२	७.३
झरा/ओढा	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	८	१३.३	८	२.७
नळ	३१	५१.७	४०	६६.७	४०	४०	८०	६६.७	४०	६६.७	१९१	६३.७
इतर	०	०.०	०	०.०	०	०३	०३	२.५	०	०.०	३	१.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२१ मध्ये पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दर्शविण्यात आलेले आहेत. आरोग्याच्यादृष्टीने शुध्द व चांगले पिण्याचे पाणी आवश्यक असते. पाण्याची शुध्दता पाणी कोठून उपलब्ध होते यावर अवलंबून असते. संशोधनासाठी निवडलेल्या आदिवासी विभागातील तीस गावांतील १९१ (६३.७ टक्के) कुटुंबांना सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेमार्फत पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जात होते, ५० (१६.७ टक्के) कुटुंबे विहिरीच्या पाण्याचा वापर पिण्यासाठी करीत होती. हातपंप १५ (५ टक्के), विंधन विहीर ११ (३.७ टक्के), नदी २२ (७.३ टक्के), झरा ८ (२.७ टक्के) व इतर ३ (१ टक्के) इत्यादी स्त्रोतांद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होत होते.

अहमदनगर जिल्ह्यातील ६० कुटुंबांना पुढील प्रमाणे पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होती. सार्वजनिक पाणी पुरवठा योजना ३१ (५१.७ टक्के), नदी १९ (३१.७ टक्के), विहीर ९ (१५ टक्के), विंधन विहीर १ (१.७ टक्के) व हातपंप, झरा व इतर ० (० टक्के) इत्यादी. नाशिक जिल्ह्यातील ६० कुटुंबांना सार्वजनिक पाणी पुरवठा योजना ४० (६६.७ टक्के), विहीर २० (३३.३ टक्के) व इतर ० (० टक्के) इत्यादी पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत उपलब्ध होते. पुणे

जिल्ह्यातील दोन तालुक्यातील १२० कुटुंबांना पुढीलप्रमाणे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत उपलब्ध होते. सार्वजनिक पाणी पुरवठा योजना ८० (६६.७ टक्के), विहीर १८ (१५.८ टक्के), हातपंप १५ (१२.५ टक्के), नदी ३ (२.५ टक्के), इतर स्त्रोत ३ (२.५ टक्के) व विंधन विहीर ० (० टक्के) इत्यादी. ठाणे जिल्ह्यातील ६० कुटुंबांना सार्वजनिक पाणी पुरवठा योजना ४० (६६.७ टक्के), विंधन विहीर १० (१६.७ टक्के), झरा ८ (१३.३ टक्के), हातपंप ० (० टक्के), नदी ० (० टक्के) व इतर ० (० टक्के) इ. स्त्रोतांद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध होत होते. प्रत्येक जिल्ह्यातील नैसर्गिक व भौगोलिक परिस्थितीनुसार पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वेगवेगळी होती. सरकारने अलिकडे राज्यातील बहुतेक सर्व गावांना, वाड्यांना व वस्त्यांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून दिली असली आणि आदिवासी विभागालाही त्याचा फायदा झाल्या असला तरी अजूनही ३६.३ टक्के गावांना नळाच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे.

वरील तक्ता क्र. ६.२१ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.११) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.११



तक्ता क्र. ६.२२ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता (बारमाही)

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
पिण्याच्या पाण्याची उपलब्धता	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
होय	४३	७१.७	४२	७०.०	४०	४०	८०	६६.७	४२	७०.०	२०७	६९.०
नाही	१७	२८.३	१८	३०.०	२०	२०	४०	३३.३	१८	३०.०	९३	३१.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२२ मध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता (बारमाही) दर्शविण्यात आलेली आहे. पाणी हे जीवन आहे असे म्हटले जाते. त्यामुळे वर्षभर पुरेसे व शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध असणे आवश्यक असते. सह्याद्री विभागातील ३०० कुटुंबापैकी २०७ (६९ टक्के) कुटुंबांना वर्षभर पिण्याचे पाणी उपलब्ध होते. तर ९३ (३१ टक्के) कुटुंबांना वर्षभर पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध नव्हते. सह्याद्री विभागात पाऊस भरपूर पडत असल्याने पावसाळ्यात व हिवाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत नाही. उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची बहुतेक गावांना तिव्र टंचाई जाणवते. अशा गावातील लोकांना दोन ते तीन कि.मी. अंतरावरून व तेही डोक्यावरून पाणी आणावे लागते. सरकारतर्फे टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो, परंतु तो अनियमीत असतो. पिण्याचे पाणी शुध्द व पुरेसे उपलब्ध नसल्याने अनेक आजार निर्माण होतात. अस्वच्छतेमुळेही अनेक विकार निर्माण होतात. अमहदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यांत पिण्याच्या पाण्याची परिस्थिती जवळपास सारखीच आढळून आली.

तक्ता क्र. ६.२३ पिण्याच्या पाण्याचे शुध्दीकरण.

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
पिण्याच्या पाण्याचे शुध्दीकरण करतात	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
होय	३१	५१.७	४०	६६.७	४२	३८	८०	६६.७	४०	६६.७	१९१	६३.७
नाही	२९	४८.३	२०	३३.३	१८	२२	४०	३३.३	२०	३३.३	१०९	३६.३
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२३ मध्ये पिण्याच्या पाण्याचे शुध्दीकरण दर्शविण्यात आलेले आहे. उपलब्ध पिण्याचे पाणी शुध्द करून पिणे आरोग्यास हितकारक असते. भारतीय लोक त्याकडे दुर्लक्ष करतात. तीच परिस्थिती आदिवासी लोकांमध्येही दिसून येते. सह्याद्री विभागातील संशोधनासाठी निवडलेल्या ३०० आदिवासी कुटुंबांपैकी १९१ (६३.७ टक्के) कुटुंबांनी पिण्याच्या पाण्याचे शुध्दीकरण करतो असे सांगितले तर उर्वरित १०९ (३६.३ टक्के) कुटुंबांनी शुध्दीकरण करत नाही असे सांगितले. परंतु शुध्दीकरण हे पूर्ण वर्षभर केले जात नाही तर घरात कोणी आजारी असेल तरच व तेवढ्याच काळापुरते शुध्दीकरण केले जाते. शुध्दीकरणाची पध्दतही पाणी उकळण्यापुरती मर्यादीत असते. ज्या व्यक्तींनी शुध्दीकरण करतो असे सांगितले त्यांना सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेतून जे पाणी पुरवले जाते ते शुध्द करून पुरवले जाते असे सांगितलेले आहे. प्रत्यक्षात कोणतेही कुटुंब शास्त्रीय पध्दतीने पाण्याचे शुध्दीकरण करून पाणी पित नाही.

तक्ता क्र. ६.२४ स्नानगृहांची उपलब्धता

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
स्नान गृह उपलब्धता	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
होय	४६	७६.७	४५	७५	४०	४२	८२	६८.३	३२	५३.३	२०५	६८.३
नाही	१४	२३.३	१५	२५	२०	१८	३८	३१.७	२८	४६.७	९५	३१.७
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२४ मध्ये स्नानगृहाची उपलब्धता दर्शविण्यात आलेली आहे. निरोगी आरोग्यासाठी वैयक्तिक स्वच्छता महत्वाची असते. त्यासाठी स्नानगृहाची उपलब्धता आवश्यक असते. वरील तक्ता क्र. ६.२४ वरून असे दिसते की अहमदनगर जिल्ह्यात ४६ कुटुंबांना स्नानगृह उपलब्ध होते. नाशिक - ४५ कुटुंबे, पुणे - ८२ कुटुंबे व ठाणे - ३२ कुटुंबे या प्रमाणे स्नानगृहांची उपलब्धता होती. एकूण ३०० कुटुंबांपैकी २०५ कुटुंबांना स्नानगृह उपलब्ध होते. त्याचे एकूणाशी प्रमाण ६८.३ टक्के होते. म्हणजेच ३१.७ टक्के (९५) कुटुंबांना स्नानगृह उपलब्ध नव्हते.

कुटुंबांची वाईट आर्थिक परिस्थिती, घरांचा लहान आकार, सांडपाणी जाण्यासाठी घरात व्यवस्था नसणे, स्वच्छतेच्या बाबतीत उदासीनता, पाण्याची कमतरता इत्यादी कारणांमुळे बहुतेक कुटुंबांना स्नानगृहाची उपलब्धता नव्हती. ठाणे जिल्ह्यातील लोक इतर तीन जिल्ह्यांच्या तुलनेत अधिक गरीब असल्याने या जिल्ह्यातील ५३.३ टक्के कुटुंबांना स्नानगृहाची उपलब्धता नव्हती.

तक्ता क्र. ६.२५ आंघोळीसाठी वापरण्यात येणारी साधने

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
साधने	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
साबण	५७	९५.०	६०	१००.०	५७	६०	११७	९७.५	६०	१००.०	२९४	९८.०
दगड	४०	६६.७	१०	१६.७	२०	१७	३७	३०.८	१६	२६.७	१०३	३४.३
काथ्या	०	०.०	४१	६८.३	३५	३६	७१	५९.२	४०	६६.७	१५२	५०.७
रिठा	१	१.७	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	१	०.३
इतर	१	१.७	०	०.०	१	०	१	०.८	०	०.०	२	०.७

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२५ मध्ये आंघोळीसाठी वापरण्यात येणारी साधने दर्शविण्यात आलेली आहेत. आदिवासी लोक आंघोळीसाठी साबण, दगडाची घासणी, काथ्या, रिठा इत्यादी साधने वापरत असतात. काही व्यक्ती एकाच वेळेस दोन-दोन साधने वापरतात.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, अहमदनगर जिल्ह्यातील ९५ टक्के कुटुंबांतील व्यक्ती आंघोळीसाठी साबण वापरत होत्या व त्याच वेळेस ६६.७ टक्के व्यक्ती दगडी घासणी वापरत होत्या. तसेच १.७ टक्के लोक रिठा वापरत होते व १.७ टक्के लोक इतर साधने वापरत होते. म्हणजेच बहुतेक लोक एकाच वेळेस साबण, दगडी घासणी, रिठा व इतर साधनांचा वापर करीत होते.

नाशिक जिल्ह्यात आंघोळीची साधने वापरण्याचे प्रमाण अनुक्रमे साबण-१०० टक्के, दगडी घासणी-१६.७ टक्के, काथ्या-६८.३ टक्के, रिठा-०० टक्के व इतर-०० टक्के असे होते.

पुणे जिल्ह्यात हेच प्रमाण अनुक्रमे साबण-९७.५ टक्के, दगडी घासणी-३०.८ टक्के, काथ्या-५९.२ टक्के, रिठा-०० टक्के व इतर-०.८ टक्के असे होते. त्याच प्रमाणे ठाणे जिल्ह्यातील प्रमाण अनुक्रमे साबण-१०० टक्के, दगडी घासणी-२६.७ टक्के, काथ्या-६६.७ टक्के, रिठा-०० टक्के व इतर-०० टक्के असे होते.

थोडक्यात वरील चारही जिल्ह्यातील कुटुंबे आंघोळीसाठी अनेक साधनांचा वापर करतात. एकूण कुटुंबांपैकी ९८ टक्के कुटुंबे साबण वापरत असली तरी सर्वच कुटुंबे अंगाला लावण्याचा साबण वापरत नाहीत. बहुतेक कुटुंबे कपड्याचा साबणही अंगाला लावण्यासाठी वापरतात. त्यामुळे सर्वच जिल्ह्यात साबण वापरण्याचे प्रमाण अधिक दिसून येते.

तक्ता क्र. ६.२६ अ) मुलांचे आंघोळ करण्याचे प्रमाण

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
मुले	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
दररोज	५८	९६.७	६०	१००	५९	५९	११८	९८.३	६०	१.००	२९६	९८.७
दिवसाआड	२	३.३	०	०.०	१	१	२	१.७	०	०.०	४	१.३
३दिवसांतून	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१.०	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२६ 'अ' मध्ये लहान मुलांचे आंघोळ करण्याचे प्रमाण दर्शविण्यात आलेले आहे. शरीर निरोगी राहण्यासाठी, त्वचा रोग होऊ नयेत म्हणून शरीरिक स्वच्छता महत्वाची असते. लहान मुलांची त्वचा कोवळी असल्याने त्यांच्या आरोग्याची अधिक काळजी घ्यावी लागते. अहमदनगर जिल्ह्यात लहान मुलांचे दररोज आंघोळ करण्याचे प्रमाण ९६.७ टक्के होते, तर दिवसाआड आंघोळ करण्याचे प्रमाण ३.३ टक्के होते. तीन दिवसांतून एकदा आंघोळ करण्याचे प्रमाण हे ०० टक्के होते. नाशिक जिल्ह्यात दररोज आंघोळ करण्याचे प्रमाण १०० टक्के होते. पुणे जिल्ह्यात दररोज आंघोळ करण्याचे प्रमाण ९८.३ टक्के होते, तर दिवसाआड आंघोळ करण्याचे प्रमाण १.७ टक्के होते. ठाणे जिल्ह्यात दररोज आंघोळ करण्याचे प्रमाण १०० टक्के होते.

अलिकडे आदिवासींना स्वच्छतेचे महत्व पटू लागल्यामुळे आंघोळ करण्याचे प्रमाण वाढलेले आहे. परंतु उन्हाळ्यात पिण्यासच पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने सक्तीने आंघोळीविना रहावे लागते.

तक्ता क्र. ६.२६ ब) पुरुषांचे आंघोळ करण्याचे प्रमाण

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
पुरुष	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
दररोज	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००
दिवसाआड	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
३दिवसांतून	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२६ 'ब' वरून असे दिसते की पुरुषांचे दररोज आंघोळ करण्याचे प्रमाण सर्व जिल्ह्यांत १०० टक्के आहे. कोणताही पुरुष दिवसा-आड अथवा तीन दिवसांतून एकदा आंघोळ करीत नाही.

तक्ता क्र. ६.२६ क) स्त्रियांचे आंघोळ करण्याचे प्रमाण

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
स्त्रिया	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
दररोज	५०	८३.३	५१	८५.०	५५	५३	१०८	९०.०	४४	७३.३	२५३	८४.३
दिवसाआड	१०	१६.७	९	१५.०	५	७	१२	१०.०	१६	२६.७	४७	१५.७
३दिवसांतून	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२६ 'क' नुसार स्त्रियांचे दररोज आंघोळ करण्याचे प्रमाण लहान मुलांच्या व पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. अहमदनगर जिल्ह्यातील ६० कुटुंबांपैकी ५० कुटुंबातील स्त्रिया दररोज आंघोळ करतात व त्याचे प्रमाण ८३.३ टक्के आहे. नाशिक जिल्ह्यात ६० कुटुंबांपैकी ५१ कुटुंबातील स्त्रिया दररोज आंघोळ करतात व त्याचे प्रमाण ८५ टक्के आहे. पुणे जिल्ह्यातील १२० कुटुंबांपैकी १०८ कुटुंबातील स्त्रिया रोज आंघोळ करतात. त्यांचे प्रमाण ९० टक्के आहे. ठाणे जिल्ह्यातील ६० कुटुंबांपैकी ४४ कुटुंबातील स्त्रिया रोज आंघोळ करतात व त्यांचे प्रमाण ७३ टक्के आहे. एकूण ३०० कुटुंबांपैकी २५३ स्त्रिया रोज आंघोळ करतात व त्याचे प्रमाण ८४.३ टक्के आहे. दिवसाआड आंघोळ करण्याचे प्रमाण अहमदनगर-१६.७ टक्के, नाशिक-१५ टक्के, पुणे-१० टक्के व ठाणे-२६.७ टक्के असे आहे. तीन दिवसांतून एकदा आंघोळ करण्याचे प्रमाण चारही जिल्ह्यांत शून्य टक्के आहे.

दररोज कामाच्या व्यापातून न मिळणारा वेळ, स्नानगृहांची अनुपलब्धता, आंघोळीसाठी पाण्याचा अभाव, दूरवरून डोक्यावर आणावे लागणारे पाणी म्हणजेच पाण्याची दुर्मिळता, दैववादी वृत्ती, अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी व परंपरा या सर्व कारणांमुळे स्त्रियांचे दररोज आंघोळ करण्याचे प्रमाण कमी आहे.

तक्ता क्र. ६.२७ शौचालयांची उपलब्धता

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
शौचालयांची उपलब्धता	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
होय	३	५	२०	३३.३	७	१०	१७	१४.२	३	५	४३	१४.३
नाही	५७	९५	४०	६६.७	५३	५०	१०३	८५.८	५७	९५	२५७	८५.७
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२७ मध्ये शौचालयांची उपलब्धता दर्शविण्यात आलेली आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने उघड्यावर शौचास बसणे अपायकारक असते. विविध रोगांचा प्रादुर्भाव

होऊ नये म्हणून शौचालयांची उपलब्धता असणे आवश्यक असते. परंतु आदिवासी भागात शौचालयांची उपलब्धता कमी प्रमाणात दिसून येते.

अहमदनगर जिल्ह्यात फक्त ३ (५ टक्के) कुटुंबांकडे शौचालय होते. तर नाशिक-२० (३३.३ टक्के) कुटुंबे, पुणे १७ (१४.२ टक्के) कुटुंबे व ठाणे-३ (५ टक्के) कुटुंबे या प्रमाणे शौचालयांची उपलब्धता होती. एकूण ३०० कुटुंबांपैकी फक्त ४३ (१४.३ टक्के) कुटुंबांकडे शौचालय होते. म्हणजेच २५७ (८५.७ टक्के) कुटुंबांना शौचालयांची उपलब्धता नव्हती.

अलिकडे शासनातर्फे राबविण्यात येणारी हागणदरी मुक्त गाव योजना नाशिक जिल्ह्यातील काही गावांत चांगल्या प्रकारे राबविली गेली आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यात इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अधिक शौचालयांची उपलब्धता आढळते. दारिद्र्य, दैववादीवृत्ती, पुरेशा पाण्याचा अभाव, स्वच्छतेच्या महत्वाची न झालेली जाणीव, घराजवळ शौचालय असणे, किळसवाणे वाटणे इत्यादी कारणांमुळे आदिवासी कुटुंबांकडे शौचालयांची अनुपलब्धता मोठ्या प्रमाणात आढळते.

तक्ता क्र. ६.२८ वैद्यकीय उपचारांचे ठिकाण

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
उपचार	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
प्राथमिक आरोग्य केंद्र	३३	५५.०	४०	६६.७	३२	४ ०	७२	६०.०	३१	५१.७	१७६	५८.७
उपकेंद्र	०	०.०	०	०.०	७	४	११	९.२	०	०.०	११	३.७
ग्रामीण रुग्णालय	२	३.३	१०	१६.७	०	०	०	०.०	१०	१६.७	२२	७.३
औषधांचे दुकान/खाजगी दवाखाना	२३	३८.३	९	१५.०	२१	१३	३४	२८.३	१२	२०.०	७८	२६.०
भगत	२	३.३	१	१.७	०	३	३	२.५	७	११.७	१३	४.३
इतर	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२८ मध्ये वैद्यकीय उपचार घेण्याचे ठिकाण दर्शविण्यात आले आहे. सह्याद्री विभागातील आदिवासी भागात वैद्यकीय सेवा सुविधा अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. सरकार मार्फत वैद्यकीय सेवा पुरविली जाते. आदिवासी लोक सरकारी व इतर सेवांचा खालील प्रमाणे लाभ घेतात.

प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार घेण्याचे प्रमाण अहमदनगर जिल्ह्यात ५५ टक्के आहे. तर नाशिक जिल्ह्यात ६६.७ टक्के, पुणे जिल्ह्यात ६० टक्के व ठाणे जिल्ह्यात ५१.७ टक्के आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार घेण्याचे एकूण प्रमाण ५८.७ टक्के आहे. ग्रामीण रुग्णालयात उपचार घेण्याचे एकूण प्रमाण फक्त ७.३ टक्के आहे. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधांच्या दुकानातून गोळ्या, औषधे घेण्याचे प्रमाण चारही जिल्ह्यात अधिक आहे. ते अनुक्रमे अहमदनगर ३८.३ टक्के, नाशिक १५ टक्के, पुणे २८.३ टक्के व ठाणे २० टक्के असे आहे. एकूण प्रमाण २६ टक्के इतके आहे. भगत (अंगात वारा येणारा व अंगारे धुपारे देणारा तसेच क्वचित आयुर्वेदिक औषधे देणारा), वैद्य (फक्त आयुर्वेदिक औषधे देणारा) यांच्याकडून उपचार घेण्याचे प्रमाण कमी आहे. ते अनुक्रमे अहमदनगर ३.३ टक्के, नाशिक १.७ टक्के, पुणे २.५ टक्के व ठाणे ११.७ टक्के इतके आहे.

आदिवासी लोकांच्या वैद्यकीय उपचारांचा विचार करता निरिक्षणाअंती असे आढळून आले की, थंडी, ताप, सर्दी, जुलाब, अंगदुखी, डोकेदुखी या सारख्या सर्वसाधारण आजारांचा प्रादूर्भाव झाल्यास ते तात्काळ दवाखाण्यात जात नाहीत. ३ ते ४ दिवस ते दुखणे अंगावर काढतात. त्यानंतर नाहीच बरे वाटले तर दवाखाण्यात जातात किंवा औषधांच्या दुकानातून दुकानदाराला आजाराचा प्रकार सांगून त्यावरील गोळ्या औषधे विकत घेतात. असाधारण आजार झाला असेल व तो पारंपारिक औषधांनी बरा होत नसेल तरच दवाखाण्यात जातात. विलंबामुळे अनेकांचा त्यात मृत्यूही होतो. भगत, वैदू यांच्याकडून उपचार घेण्याचे प्रमाण शिक्षण प्रसारामुळे कमी झालेले असले तरी त्याचे पूर्ण उच्चाटन झालेले नाही.

दुर्गम व डोंगराळ प्रदेश, दळणवळणाच्या साधनांची कमतरता, दवाखाण्यांची अपूरी संख्या, गावापासून दवाखाण्याचे जास्त अंतर, गरिबी व अंधश्रद्धा या कारणांमुळे आजाराचा प्रादुर्भाव झाल्याबरोबर दवाखाण्यात जाऊन उपचार घेण्याचे प्रमाण कमी आहे.

वरील तक्ता क्र. ६.२८ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.१२) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.१२



तक्ता क्र. ६.२९ प्रसूतीचे ठिकाण.

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
प्रसूतीचे ठिकाण	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
घर	४०	६६.७	४१	६८.३	३३	३८	७१	५९.२	४०	६६.७	१९२	६४.०
प्राथमिक आरोग्य केंद्र	१५	२५.०	१७	२८.३	२१	२२	४३	३५.८	१५	२५.०	९०	३०.०
उपकेंद्र	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
ग्रामीण रुग्णालय	०२	३.३	०	०.०	५	०	५	४.२	५	८.३	१२	४.०
खासगी प्रसूतीगह	०३	५.०	०२	३.४	१	०	१	०.८	०	०.०	६	२.०
इतर	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.२९ मध्ये प्रसूतीचे ठिकाण दर्शविण्यात आलेले आहे. निरोगी व सुदृढ मुले जन्माला येण्यासाठी स्त्रियांची गरोदरपणात काळजी घेणे आवश्यक असते. बालमृत्यू व मातामृत्यु टाळण्यासाठी सुयोग्य पध्दतीने प्रसूती होणे आवश्यक असते. आदिवासी समाजाचा विचार करता सर्व्हेक्षण केलेल्या ३०० कुटुंबांपैकी ६४ टक्के कुटुंबांतील स्त्रियांची प्रसूती ही घरीच होत असल्याचे आढळून आले. प्राथमिक आरोग्य केंद्रात ३० टक्के, उपकेंद्र ० टक्के, ग्रामीण रुग्णालय ४ टक्के व खासगी नर्सिंग होम २ टक्के असे प्रसूती ठिकाणाचे प्रमाण होते. अहमदनगर, नाशिक व ठाणे जिल्ह्यात घरीच प्रसूती होण्याचे प्रमाण हे ६६ टक्के पेक्षा अधिक आहे. फक्त पुणे जिल्ह्यात ते प्रमाण ६० टक्के पेक्षा कमी आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूती होण्याचे प्रमाण पुणे जिल्ह्यात ३५ टक्के पेक्षा जास्त आहे. उर्वरित तीन जिल्ह्यांत ते २५ ते २९ टक्के या दरम्यान आहे. ग्रामीण रुग्णालयात प्रसूती होण्याचे प्रमाण व खाजगी नर्सिंग होममध्ये प्रसूतीचे प्रमाण अनुक्रमे अहमदनगर ३.३ टक्के व ५ टक्के, नाशिक ० टक्के व ३.४ टक्के, पुणे ४.२ व ०.८ टक्के व ठाणे ८.३ व ० टक्के असे आहे. प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांमध्ये प्रसूतीचे प्रमाण सर्व जिल्ह्यात ० टक्के आहे.

अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्र्य, डॉक्टरांबद्दल वाटणारी भिती व लाज, वाहतूक व दळणवळण साधनांचा अभाव, गावापासून दवाखाण्यापर्यंतचे अंतर जास्त या कारणांमुळे घरीच प्रसूती होण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे अर्भकमृत्यू व मातामृत्यू होण्याचा धोका संभवतो. एखाद्या स्त्रिला प्रसूतीच्या वेळी फारच त्रास होत असेल किंवा घरी प्रसूती होणे अशक्य वाटत असेल तेव्हाच जवळच्या सरकारी दवाखाण्यात नेले जाते. त्या ठिकाणी तज्ञ डॉक्टर्स नसतील, आवश्यक त्या सुविधा उपलब्ध नसतील किंवा सरकारी दवाखान्यातील डॉक्टरांनी/कर्मचाऱ्यांनी खाजगी दवाखान्यात नेण्यास सांगितले तरच खाजगी नर्सिंग होममध्ये नेले जाते. घरच्या प्रसूतीला प्रथम पसंती दिली जाते. अंतिम पर्याय हा खाजगी दवाखाना असतो.

सरकारी दवाखाण्यांचे विरळ प्रमाण, डॉक्टरांचा अभाव, सेवा सुविधांचा अभाव या कारणांमुळेही घरीच प्रसूती होण्याचे प्रमाण जास्त आहे.

तक्ता क्र. ६.३० प्रसूतीसाठी मदत

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
बाळंतपण करणारी व्यक्ती	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
डॉक्टर	१७	२८.३	१९	३१.७	२२	२२	४४	३६.७	२०	३३.३	१००	३३.३
ए.एन.एम.	०	०.०	०	०.०	०	१	१	०.८	०	०.०	१	०.३
सुईण	३०	५०.०	३५	५८.३	२२	२५	४७	३९.२	३६	६०.०	१४८	४९.३
नातेवाईक	१३	२१.७	५	८.३	१५	१०	२५	२०.८	४	६.७	४७	१५.७
इतर	०	०.०	१	१.७	१	२	३	२.५	०	०.०	४	१.३
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.३० मध्ये प्रसूतीसाठी कोण मदत करते हे दर्शविण्यात आलेले आहे. सर्व्हेक्षण केलेल्या एकूण तिनशे कुटुंबांपैकी ३३.३ टक्के कुटुंबांनी प्रसूतीसाठी डॉक्टरांची मदत घेतली होती. सुईण मार्फत प्रसूती करण्याचे प्रमाण ४९.३ टक्के होते. तर नातेवाईक १५.७ टक्के, इतर १.३ टक्के व सहाय्यक परिचारीका दाई ०.३ टक्के असे प्रमाण होते.

घरीच सुईण मार्फत सर्वाधिक प्रसूती ठाणे जिल्ह्यात ६० टक्के, नाशिक ५८.३ टक्के व अहमदनगर ५० टक्के याप्रमाणे केल्या जातात. पुणे जिल्ह्यात तेच प्रमाण ३९.२ टक्के आहे. सुईण, नातेवाईक व इतर यांचा एकत्रित विचार करता चारही जिल्ह्यांत जवळजवळ ६५ टक्के पेक्षा अधिक प्रसूती त्यांच्यामार्फत केल्या जातात. अहमदनगर, नाशिक व ठाणे या जिल्ह्यांत साक्षरतेचे प्रमाण कमी असल्याने व अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा यांचे प्राबल्य अधिक असल्याने सुईण मार्फत प्रसूती करण्याचे प्रमाण जास्त आहे. पुणे या शैक्षणिक राजधानी जवळ पुणे जिल्ह्यातील आदिवासी भाग असल्याने साक्षरता थोडी जास्त आहे. त्यामुळे अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा यांचे काही प्रमाणात उच्चाटन झालेले आहे. परिणामी सुईण मार्फत प्रसूती करण्याचे प्रमाण तुलनेने कमी आहे. तसेच पुणे जिल्ह्यातील आदिवासी समाज हा इतर प्रगत समाजात मिसळलेला असल्याने त्याचाही प्रभाव सामाजिक, सांस्कृतिक व आरोग्यविषयक घटकांवर पडलेला आहे.

तक्ता क्र. ६.३१ ० ते ६ वयोगटातील मुलांचे लसीकरण प्रमाण

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
लसीकरण	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
होय	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००
नाही	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.३१ मध्ये ० ते ६ या वयोगटातील मुलांचे लसीकरण दर्शविण्यात आलेले आहे. लहानमुलांना साथीच्या तसेच इतर रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून शासनाच्या आरोग्य विभागातर्फे लसीकरण केले जाते. वरील तक्त्यावरून असे दिसते की अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यात १०० टक्के लसीकरण झालेले आहे.

आरोग्य विभागातर्फे प्रत्येक घरी जाऊन लहान मुलांना रोग प्रतिबंधक लस दिली जाते. त्यामुळे १०० टक्के लसीकरण झालेले आढळून येते.

तक्ता क्र. ६.३२ आहार सवयी

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण	%	मोखाडा			
घटक	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
चहा	५९	९८.३	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	२९९	९९.७
दूध	१	१.७	३	५.०	०	०	०	०.०	०	०.०	४	१.३
नाश्ता	४	६.७	७	११.७	५	३	८	६.७	०	०.०	१९	६.३
जेवण एकदा	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०

तक्ता क्र. ६.३२ पान क्र. २३२ वरून पुढे

जेवण दोनदा	४७	७८.३	५२	८६.७	४५	५५	१००	८३.३	६०	१००	२५९	८६.३
जेवण तिनदा	१३	२१.७	८	१३.३	१५	५	२०	१६.७	०	०.०	४१	१३.७
पौष्टिक आहार	१	१.७	४	६.७	०१	०	०१	०.८	०	०.०	६	२.०
मांसाहार	४९	८१.७	५४	९०.०	५१	५६	१०७	८९.२	६०	१००	२७०	९०

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.३२ मध्ये दैनंदिन आहार सवयी दर्शविण्यात आलेल्या आहेत. शारीरिक, मानसिक व बौध्दिक वाढ योग्य होण्यासाठी संतुलीत आहाराची आवश्यकता असते. आदिवासी समाज दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेला असल्याने संतुलीत आहार ही त्यांच्यासाठी दुर्लभ बाब आहे. आदिवासी **महादेव कोळी** जमातीच्या आहार सवयी वरील तक्ता क्र. ६.३२ मध्ये नमूद केलेल्या आहेत.

अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यांचा एकत्रित विचार करता चहा पिण्याचे प्रमाण हे ९९.७ टक्के आहे. ज्या व्यक्तींच्या घरी घरचे दूध उपलब्ध आहे ते दुधाचा चहा पितात व ज्यांच्याकडे दूध उपलब्ध नाही ते बिनदुधाचा कोरा चहा पितात. दूध पिण्याचे प्रमाण हे फक्त १.३ टक्के आहे. घरी दूध उपलब्ध असले तरी ते घरीच न पिता दूध विकूण दोन पैसे मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. नाश्ता करण्याचे प्रमाणही अंत्यत कमी म्हणजे ६.३ टक्के आहे. ज्या मोजक्या कुटुंबातील व्यक्तींची आर्थिक स्थिती चांगली आहे तसेच त्यांचा प्रगत समाजाशी संपर्क आलेला आहे अशा व्यक्तींच्या घरीच कधीतरी नाश्ता केला जातो. दिवसातून एकदा जेवण घेण्याचे प्रमाण ०० टक्के आहे. आदिवासींना दररोज अंगमेहनतीची कामे करावी लागतात. त्यामुळे ते दिवसातून केवळ एकवेळ जेवण घेऊन जगू शकत नाहीत. दिवसातून दोन वेळा जेवण घेण्याचे प्रमाण ८६.३ टक्के आहे. सकाळी व संध्याकाळी असे दोनवेळा जेवण घेतले जाते. दिवसातून तीन वेळा जेवण घेण्याचे प्रमाण १३.७ टक्के आहे. जे लोक अवजड शारीरिक कामे करतात, त्यांना दिवसभर तग धरून राहण्यासाठी दिवसातून तीन वेळा जेवण घ्यावे लागते. ते सकाळी ९ ते १० या वेळेत जेवण करून कामावर जातात. दुपारी २ ते ३ च्या दरम्यान कामावर सुट्टी घेऊन पुन्हा जेवतात व रात्री ८ ते ९ च्या दरम्यान संध्याकाळचे नियमीत

जेवण घेतात. त्यांच्या जेवणात भाकरी, कांदा, चटणी, पातळ कालवण व भात यांचा समावेश असतो. दुपारच्या जेवणात फक्त भाकरी, चटणी व कांदा किंवा बेसण यांचा समावेश असतो. ठाणे जिल्ह्यातील हवामान उष्ण व दमट असल्यामुळे अन्न पचण्यास वेळ लागतो. त्यामुळे ठाणे जिल्ह्यात दिवसातून तीन वेळा जेवण घेण्याचे प्रमाण शुन्य टक्के आहे. संतुलीत किंवा चौरस आहार घेण्याचे प्रमाण फक्त २ टक्के आहे. ज्या कुटुंबातील व्यक्ती सुशिक्षित आहेत व नोकरी करतात त्याच कुटुंबात कधीतरी चौरस आहार घेतला जातो. बहुसंख्य लोकांना चौरस किंवा संतुलीत आहार म्हणजे काय तेच माहित नसल्याने व तो घेण्यासाठी आवश्यक आर्थिक परिस्थितीही नसल्याने संतुलीत आहार घेण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. मांसाहार करण्याचे प्रमाण ९० टक्के आहे. शिकार करणे, मासेमारी करणे हा आदिवासींचा पूर्वापार छंद असल्याने व उदरनिर्वाहासाठी निसर्गावर अधिक अवलंबून असल्याने मांसाहाराचे प्रमाण अधिक आढळून येते. आदिवासी मांसाहारी असले तरी त्यांच्या रोजच्या जेवणात मांसाहार नसतो. कधी शिकार सापडली, मासे पकडले (फक्त पावसाळ्यात) तरच मांसाहार केला जातो. घरी पाहुणे आल्यास घरातीलच पाळलेली कोंबडी कापून त्यांच्यासाठी मटणाचे कालवण केले जाते. मांसाहार हा आठवड्यातून एकदा किंवा कधी-कधी तो तीन ते चार महिन्यातूनही एकदा होतो. ज्या गावांमध्ये वारकरी संप्रदायाचा प्रसार झालेला आहे त्या गावांत मांसाहाराचे प्रमाण कमी आढळले.

तक्ता क्र. ६.३३ राहत्या घराचा प्रकार

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
घरांचा प्रकार	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
कुडाची भिंत व गवती छप्पर	५	८.३	३	५.०	३	१	४	३.३	८	१३.३	२०	६.७
कुडाची भिंत व पत्रा	०	०.०	०	०.०	१८	१९	३७	३०.८	०	०.०	३७	१२.३
कुडाची भिंत व कौले	२	३.३	२०	३३.३	१	५	६	५.०	२०	३३.३	४८	१६.०
दगड वीट व कौले	५३	८८.३	३७	६१.७	३७	३५	७२	६०.०	३२	५३.३	१९४	६४.७
सिमेंट काँक्रिट	०	०.०	०	०.०	१	०	१	०.८	०	०.०	१	०.३
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.३३ मध्ये राहत्या घराचा प्रकार दर्शविण्यात आलेला आहे. आदिवासींची घरे ही विविध साधनांनी तयार केलेली, साधारणपणे एकच प्रकारची रचना असलेली, परिस्थिती प्रमाणे अत्यंत छोटी किंवा मध्यम व क्वचित प्रमाणात मोठी असतात. कुडाची भिंत व गवती छप्पर असलेली व आकाराने लहान व मध्यम असलेली घरे चारही जिल्ह्यांत आढळतात. त्यांना कुहिटारी (गवती छप्पर) घरे असे म्हणतात. त्यांचे प्रमाण अहमदनगर ५ (८.३ टक्के), नाशिक ३ (५ टक्के), पुणे ४ (३.३ टक्के) व ठाणे ८ (१३.३ टक्के) असे आहे. अत्यंत गरीब परिस्थिती असलेले लोक निसर्गातीलच साधने वापरून या प्रकारची घरे स्वतःच बांधतात. या घरांचे आयुष्य कमी असल्याने २ ते ३ वर्षानी त्यांची पुनर्रबांधणी करावी लागते. या घरात माणसे व जनावरे (शेळ्या, गाई, म्हशी, बैल) एकत्रच राहतात. घरातील अर्धाभाग माणसांसाठी व अर्धा जनावरांसाठी असतो. घराला पडवी असल्यास जनावरांची सोय पडवीत केली जाते.

कुडाची भिंत व पत्रे असलेल्या घरांचे प्रमाण अहमदनगर ०० (० टक्के), नाशिक ०० (० टक्के), पुणे ३७ (३०.८ टक्के) व ठाणे ०० (० टक्के) इतके आहे. अशा प्रकारची घरे लहान व मध्यम आकाराची असतात फक्त छप्पर पत्र्याचे असते. गवती छप्पर असलेल्या घरांना आग लागण्याचा धोका जास्त असतो. त्यामुळे सरकारने मोफत पत्रे पुरविले आहेत. एकाही व्यक्तीने स्वतः पत्रे विकत घेऊन छप्पर घातलेले नाही. पत्र्यामुळे धूर घरातच कोंडून राहतो त्यामुळे अहमदनगर, नाशिक व ठाणे जिल्ह्यात पत्रे वापरण्याचे प्रमाण ० टक्के आहे. या तीन जिल्ह्यांतील लोकांनी पत्र्याऐवजी मंगलोरी कौलांना प्राध्यान्य दिलेले आहे. पुणे जिल्ह्यातील लोकांनी घराची उंची वाढवून धूर जाण्याची व्यवस्था केल्याने कुड व पत्र्याचे छप्पर असलेली घरे दिसून येतात.

कुडाची भिंत व मंगलोरी कौलाचे छप्पर असलेल्या घरांचे प्रमाण चारही जिल्ह्यात अनुक्रमे पुढील प्रमाणे दिसून येते. अहमदनगर २ (३.३ टक्के), नाशिक २० (३३.३ टक्के), पुणे ६ (५ टक्के) व ठाणे २० (३३.३ टक्के) इत्यादी. मंगलोरी कौले ही सरकारने मोफत पुरविलेली आहेत. कुडासाठी उपलब्ध नैसर्गिक साधनांनुसार व आर्थिक परिस्थितीनुसार या घरांचे प्रमाण चारही जिल्ह्यात वेगवेगळे आहे.

दगड, विटा व मंगलोरी कौले या प्रकारच्या घरांचे प्रमाण चारही जिल्ह्यात अधिक दिसून येते. या प्रकारच्या घरांचे प्रमाण अनुक्रमे अहमदनगर ५३ (८८.३ टक्के) कुटुंबे, नाशिक ३७ (६१.७ टक्के) कुटुंबे, पुणे ७२ (६० टक्के) कुटुंबे व ठाणे ३२ (५३.३ टक्के) कुटुंबे

इतके आहे. कुडाची, कुहिटारी घरे २ ते ३ वर्षांनी नव्याने बांधावी लागतात. अलिकडे सरकार दारिद्र्य रेषेखालील लोकांना मोफत कौले पुरविते. त्यामुळे दगड, माती, विटा व कौले या प्रकारच्या घरांचे प्रमाण वाढलेले आहे. विटा या भाजलेल्या न वापरता स्वतः तयार केलेल्या मातीच्या कच्च्या विटांचा वापर केला जातो. पावसाचे प्रमाण जास्त असल्याने घरबांधणीसाठी दगडांचा अधिक वापर केलेला असतो. आर्थिक परिस्थितीनुसार घरांचा आकार निश्चित केला जातो. कुटुंबाच्या गरजेच्या मानाने घरे ही लहानच असतात.

सिमेंट काँक्रिटच्या घरांचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे चारही जिल्ह्यातील ३०० कुटुंबांपैकी फक्त पुणे जिल्ह्यातील एका कुटुंबाचे घर सिमेंट काँक्रिटचे होते. सदर कुटुंबप्रमुख हे राज्य शासनाच्या सेवेतून निवृत्त झालेले होते.

अशा प्रकारे आदिवासींची बहुसंख्य घरे ही बहुरंगी, गरजेच्या मानाने अपुरी, झोपण्यापुरता आसरा असलेली आढळून येतात.

वरील तक्ता क्र. ६.३३ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.१३) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.१३



तक्ता क्र. ६.३४ राहत्या घराची मालकी

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
घराची मालकी	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
स्वतःचे	६०	१००	५९	९८.३	६०	५८	११८	९८.३	५७	९५	२९४	९८
भाड्याचे	०	०.०	१	१.७	०	२	२	१.७	३	५	६	२.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.३४ मध्ये घरांची मालकी दर्शविण्यात आलेली आहे. अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यांचा विचार करता ९८ टक्के लोकांची स्वतःच्या मालकीची घरे होती. फक्त २ टक्के लोक भाड्याच्या किंवा दुसऱ्याच्या घरात राहत होते. घरातील भांडणे व त्यामुळे एकाच घरात राहण्याच्या प्रश्न या कारणामुळे काही लोक दुसरीकडे राहत होते.

तक्ता क्र. ६.३५ घरांचे क्षेत्रफळ (चौरस फूट)

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
घराचे क्षेत्रफळ चौ. फूट	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
१०० पेक्षा कमी	१	१.७	०	०.०	८	१४	२२	१८.३	२	३.३	२५	८.३
१०० ते २००	८	१३.३	८	१३.३	१८	१८	३६	३०.०	१०	१६.७	६२	२०.७
२०० ते ३००	१७	२८.३	५१	८५.०	३४	२८	६२	५१.७	४७	७८.३	१७७	५९.०
३०० ते ५००	३१	५१.७	१	१.७	०	०	०	०.०	१	१.७	३३	११.०
५०० पेक्षा जास्त	३	५.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	३	१.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.३५ मध्ये घरांचे क्षेत्रफळ दर्शविले आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने आदिवासींची घरे ही लहानच असतात. त्या लहान घरातच ते आपला संसार कसाबसा चालवीत असतात. १०० चौ. फुटांपेक्षा कमी क्षेत्रफळ असणाऱ्या घरांचे प्रमाण चारही जिल्ह्यात अनुक्रमे अहमदनगर १.७ टक्के, नाशिक ० टक्के, पुणे १८.३ टक्के व ठाणे ३.३ टक्के असे आहे. एकूण प्रमाण हे ८.३ टक्के आहे. पुणे जिल्ह्यात वडिलोपार्जित घरांतच स्वतंत्र संसार करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण जास्त असल्याने १०० चौ. फू. पेक्षा कमी क्षेत्रफळ असणाऱ्या घरांचे प्रमाण जास्त आहे. उर्वरित जिल्ह्यात ते प्रमाण कमी आढळले. विभक्त झालेल्या कुटुंबांनी स्वतंत्र घरे बांधलेली असल्याने त्यांचे क्षेत्रफळ जास्त आहे. १०० ते २०० चौ. फू. क्षेत्रफळ असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अहमदनगर १३.३ टक्के, नाशिक १३.३ टक्के, पुणे ३० टक्के व ठाणे १६.७ टक्के असे आहे. २०० ते ३०० चौ. फू. क्षेत्रफळ असणाऱ्या घरांचे प्रमाण चारही जिल्ह्यात जास्त आहे. ते अनुक्रमे अहमदनगर २८.३ टक्के, नाशिक ८५ टक्के, पुणे ५१.७ टक्के व ठाणे ७८.३ टक्के असे आहे. ३०० ते ५०० चौ. फू. क्षेत्रफळ असणाऱ्या घरांचे प्रमाण अहमदनगर जिल्ह्यात सर्वांधिक म्हणजे ५१.७ टक्के आहे उर्वरित जिल्ह्यात ते २ टक्के पेक्षा कमी आहे. ५०० चौ. फू. पेक्षा जास्त घराचे क्षेत्रफळ असलेली चारही जिल्हे मिळून फक्त तीन कुटुंबे अहमदनगर जिल्ह्यात आढळली.

वरील माहितीवरून असे दिसते की मध्यम आकाराच्या घरांचे प्रमाण जास्त आहे. अहमदनगर जिल्ह्यात थोडी मोठी घरे दिसून येतात. घर बांधणीसाठी लागणारी नैसर्गिक साधने नगर जिल्ह्यात मुबलक प्रमाणात असल्याने घरांचा आकार मोठा आहे. प्रगत समाजाच्या घरांच्या क्षेत्रफळाचा विचार करता आदिवासींची घरे अत्यंत लहान वाटतात. कुटुंबातील व्यक्ती संख्येच्या दृष्टीने, जनावरांच्या सोयीच्या दृष्टीने व इतर वस्तू साठवणूकीच्या दृष्टीने ती अत्यंत लहान आहेत.

वरील तक्ता क्र. ६.३५ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.१४) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.१४



तक्ता क्र. ६.३६ वीजमीटरची उपलब्धता

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
वीज मीटर आहे?	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
होय	२१	३५.०	४५	७५.०	३७	३१	६८	५६.७	४२	७०.०	१७६	५८.७
नाही	३९	६५.०	१५	२५.०	२३	२९	५२	४३.३	१८	३०.०	१२४	४१.३
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.३६ मध्ये स्वत:च्या वीजमीटरची उपलब्धता दर्शविण्यात आलेली आहे. भारतात ग्रामीण विद्युतीकरण कमी प्रमाणात झालेले आहे. आदिवासी दुर्गम भागात तर ते अत्यंत कमी आहे. विजेची उपलब्धता व आर्थिक परिस्थिती यानुसार चारही जिल्ह्यातील १७६ (५८.७ टक्के) कुटुंबांनी स्वत:चे वीजमीटर घेतलेले होते. उर्वरित १२४ (४१.३ टक्के)

कुटुंबांना विजेची उपलब्धता नव्हती. ते पारंपारिक रॉकेलचे दिवे वापरत होते. ज्यांना विजेची उपलब्धता होती त्यांना भारनियमनामुळे कमी प्रमाणात वीज उपलब्ध होती. अत्यंत दुर्गम असलेल्या गावांचा पावसाळ्यात वीजपुरवठा पुर्णपणे खंडीत केला जातो. त्यामुळे त्यांना पावसाळ्यात अंधारातच रहावे लागते. हिवाळा व उन्हाळ्यात भारनियमनामुळे वीज नसते. त्यामुळे दुर्गम गावांना वीज असून नसल्यासारखीच आहे. विजे अभावी आदिवासी लोकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

तक्ता क्र. ६.३७ पौढ शिक्षण योजनेची अंमलबजावणी

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
पौढ शिक्षण योजना राबविली	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
होय	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००
नाही	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.३७ मध्ये प्रौढ शिक्षण योजनेची अंमलबजावणी दर्शविण्यात आलेली आहे. भारतात निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. आदिवासींमध्ये ते सर्वाधिक आहे. सरकारतर्फे साक्षरता वाढविण्याच्या दृष्टीने प्रत्येक खेडेगावात, वाड्या व वस्त्यांवर प्रौढ शिक्षण योजना राबविण्यात आली.

तक्ता क्र. ६.३७ वरून असे दिसते की, अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यात १०० टक्के वरील योजनेची अंमलबजावणी झालेली आहे. परंतु चारही जिल्ह्यातील एकूण ३०० कुटुंबांपैकी सर्व व्यक्ती प्रौढ साक्षरता वर्गांना उपस्थित राहत नव्हत्या. जे उपस्थित राहत होते त्यांच्यात अनियमीतता होती. या योजनेचा लाभ ज्यांनी घेतला त्यापैकी काही व्यक्तींना फक्त स्वतःचे नाव लिहिता येत होते. त्यामुळे आदिवासींची साक्षरता कमी आहे. निरक्षरतेचे प्रमाण तक्ता क्र. ६.३ मध्ये नमूद केलेले आहे.

तक्ता क्र. ६.३८ आदिवासी विकास योजना राबविणाऱ्या कार्यालयाची/विभागाची/ आदिवासी विकास योजनांबाबत माहिती

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
आ.वि.यो. माहिती आहे?	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
होय	२८	४६.७	४१	६८.३	३६	४४	८०	६६.७	४०	६६.७	१८९	६३.०
नाही	३२	५३.३	१९	३१.७	२४	१६	४०	३३.३	२०	३३.३	१११	३७.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.३८ मध्ये आदिवासी विकास योजना राबविणाऱ्या कार्यालयाची/ विभागाची/ आदिवासी विकास योजनांची माहिती आदिवासी व्यक्तींना कितपत आहे हे दर्शविण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र राज्य सरकार आदिवासी विकास विभाग या खात्यामार्फत आदिवासी विकास योजना राबविते. या योजना राबविण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांची स्थापना करण्यात आलेली आहे. या कार्यालयामार्फत लोकांना विविध योजनांची माहिती दिली जाते तसेच योजनांची कार्यवाही व अंमलबजावणी केली जाते.

पाहणीसाठी निवडलेल्या अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यातील ३०० कुटुंबापैकी १८९ (६३ टक्के) कुटुंबांना आदिवासी विकास योजनांची माहिती होती. अहमदनगर जिल्ह्यातील ६० कुटुंबापैकी २८ (४६.७ टक्के) कुटुंबांना म्हणजे सर्वात कमी माहिती होती. उर्वरित तीन जिल्ह्यातील सरासरी ६९ टक्के कुटुंबांना आदिवासी विकास योजनांची माहिती होती. आदिवासी विकास योजनांची ज्या कुटुंबांना माहिती होती ती त्यांना राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ते व शेजाऱ्यांकडून मिळालेली होती. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून आदिवासी गावांमध्ये जाऊन माहिती दिली जात नाही. जेव्हा एखादी व्यक्ती त्या कार्यालयात येऊन एखाद्या योजनेविषयी माहिती विचारते तेव्हाच संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती दिली जाते. त्यामुळे ३०० कुटुंबांपैकी १११ (३७ टक्के) कुटुंबांना आदिवासी विकास विभाग, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, आदिवासी विकास योजना याबद्दल कोणतीही माहिती नव्हती.

तक्ता क्र. ६.३९ विविध योजनांमार्फत मिळालेला लाभ

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण	%	मोखाडा			
योजना	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	संख्या		संख्या	%	संख्या	%
आ.वि.यो. पासून वंचित	१२ (६०)	२०.०	३२ (६०)	५३.३	३८ (६०)	३१ (६०)	६९ (१२०)	५७.५	२७ (६०)	४५.०	१४० (३००)	४६.७
आश्रमशाळा	३४ (६०)	५६.७	३७ (६०)	६१.७	२४ (६०)	२३ (६०)	४७ (१२०)	३९.२	३७ (६०)	६१.७	१५५ (३००)	५१.७
जि.प. शाळा	४४ (६०)	७३.३	११ (६०)	१८.३	२८ (६०)	१५ (६०)	४३ (१२०)	३५.८	१२ (६०)	२०.०	११० (३००)	३६.७
बालवाडी	१८ (६०)	३०.०	१८ (६०)	३०.०	१५ (६०)	१२ (६०)	२७ (१२०)	२२.५	१७ (६०)	२८.३	८० (३००)	२६.७
अंगणवाडी	४१ (६०)	६८.३	१८ (६०)	३०.०	८ (६०)	१ (६०)	९ (१२०)	७.५	१८ (६०)	३०.०	८६ (३००)	२८.७
शालेय पोषण आहार	४४ (६०)	७३.३	११ (६०)	१८.३	२८ (६०)	१५ (६०)	४३ (१२०)	३५.८	१२ (६०)	२०.०	११० (३००)	३६.७
इंदिरा आवास/ घरकुल योजना	५ (६०)	८.३	१२ (६०)	२०.०	१० (६०)	७ (६०)	१७ (१२०)	१४.२	१२ (६०)	२०.०	४६ (३००)	१५.३
शिष्यवृत्ती	२१ (६०)	३५.०	२० (६०)	३३.३	१३ (६०)	१८ (६०)	३१ (१२०)	२५.८	१४ (६०)	२३.३	८६ (३००)	२८.७
वसतिगृह	१० (६०)	१६.७	४ (६०)	६.७	८ (६०)	८ (६०)	१६ (१२०)	१३.३	७ (६०)	११.७	३७ (३००)	१२.३
वीज/तेल पंप	१३ (६०)	२१.७	९ (६०)	१५.०	७ (६०)	१० (६०)	१७ (१२०)	१४.२	११ (६०)	१८.३	५० (३००)	१६.७
खावटी कर्ज	२५ (६०)	४१.७	१० (६०)	१६.७	२१ (६०)	२५ (६०)	४६ (१२०)	३८.३	३० (६०)	५०.०	१११ (३००)	३७.०
केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना	० (६०)	०.०	० (६०)	०.०	२ (६०)	० (६०)	२ (१२०)	१.७	० (६०)	०.०	२ (३००)	०.७
२७५ ब	० (६०)	०.०	० (६०)	०.०	० (६०)	० (६०)	० (१२०)	०.०	० (६०)	०.०	० (३००)	०.०
एकाधिकार खरेदी योजना	२ (६०)	३.३	० (६०)	०.०	१५ (६०)	१० (६०)	२५ (१२०)	२०.८	० (६०)	०.०	२७ (३००)	९.०
बैलजोडी व बैलगाडी	० (६०)	०.०	१७ (६०)	२८.३	३ (६०)	० (६०)	३ (१२०)	२.५	५ (६०)	८.३	२५ (३००)	८.३
स्वस्त धान्य दुकान	४९ (६०)	८१.७	५२ (६०)	८६.७	५० (६०)	५३ (६०)	१०३ (१२०)	८५.८	५७ (६०)	९५.०	२६१ (३००)	८७.०
इतर	४	६.७	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	४	१.३

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

टीपः- कंसातील आकडे एकूण कुटुंबे दर्शवितात.

तक्ता क्र. ६.३९ मध्ये आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, जिल्हा परिषदेमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळा, महसूल विभागामार्फत चालविण्यात येणारी स्वस्त धान्य दुकाने इ. मार्फत मिळालेला लाभ दर्शविला आहे. अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यातील पाहणीसाठी निवडलेल्या ३०० कुटुंबांना कमी अधिक प्रमाणात विविध योजनांचा लाभ मिळालेला आहे. काही कुटुंबांना आदिवासी विकास योजना, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व स्वस्त धान्य दुकान यांचा लाभ मिळालेला आहे. तर काही कुटुंबांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व स्वस्त धान्य दुकान यांचा लाभ मिळालेला आहे. त्यामुळे टक्केवारीचे प्रमाण काढतांना प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एकूण कुटुंबे (६०) व चारही जिल्ह्यातील एकूण कुटुंबे (३००) विचारात घेतलेली आहेत.

तक्ता क्र. ६.३९ चे वर्णन खालीलप्रमाणे

अ. आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना

१. **शासकीय आश्रमशाळा**:- या आश्रमशाळा आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जातात. वरील चार जिल्ह्यातील एकूण ३०० कुटुंबांपैकी १५५ (५१.७ टक्के) कुटुंबांतील मुले आश्रमशाळेत शिकत होती. अहमदनगर जिल्ह्यातील ६० कुटुंबांपैकी ३४ (५६.७ टक्के), नाशिक जिल्ह्यातील ३७ (६१.७ टक्के), पुणे जिल्ह्यातील ४७ (३९.२ टक्के) व ठाणे जिल्ह्यातील ३७ (६१.७ टक्के) कुटुंबांतील मुले आश्रमशाळेत शिकत होती. पुणे जिल्हा हा शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेला जिल्हा आहे. त्यामुळे इतर शाळांमध्ये मुले विखुरलेली असल्याने आश्रमशाळांतील मुलांचे प्रमाण कमी आहे. अहमदनगर, नाशिक व ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विभागात शैक्षणिक सुविधा अपुऱ्या आहेत. जिल्हा परिषद शाळा थोड्याच गावांत व त्याही १ ली ते ४ थी पर्यंतच असल्याने आश्रमशाळेत शिक्षण घेण्याचे प्रमाण अधिक आहे. आश्रम शाळेत मोफत निवास, जेवण व शिक्षण दिले जाते.

२. **शिष्यवृत्ती**:- भारत सरकारतर्फे देण्यात येणारी शिष्यवृत्ती एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत वितरीत केली जाते. ही शिष्यवृत्ती इयत्ता ५ वी पासून ते पुढे उच्च शिक्षणापर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येते. आर्थिक परिस्थिती अभावी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये व आदिवासींना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे

या उद्देशाने ही शिष्यवृत्ती दिली जाते. वर्षभरातील शैक्षणिक खर्चाची पूर्तता होईल इतपत शिष्यवृत्तीचे प्रमाण असते.

शिष्यवृत्ती मिळण्याचे प्रमाण हे चारही जिल्हे मिळून २८.७ टक्के होते. अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील अनुक्रमे ३५ टक्के व ३३.३ टक्के कुटुंबांना शिष्यवृत्तीचा लाभ झाला होता. तर पुणे व ठाणे जिल्ह्यातील २५.८ टक्के व २३.३ टक्के कुटुंबाना शिष्यवृत्तीचा लाभ मिळालेला होता.

३. **वसतिगृहे**:- राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत संपूर्ण राज्यात वसतिगृहे चालविली जातात. आदिवासी भागात शैक्षणिक सुविधा अपुऱ्या असल्याने व आदिवासी विद्यार्थी गरीब असल्याने ते दूर शहराच्या ठिकाणी जाऊन शिक्षण घेऊ शकत नाहीत. त्यामुळे सरकारने शैक्षणिक केंद्र असलेल्या ठिकाणी तसेच तालुक्याच्या व जिल्ह्याच्या ठिकाणी वसतिगृहे सुरू केलेली आहेत. आज अनेक विद्यार्थी या वसतिगृहांमध्ये राहून शिक्षण घेत आहेत. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत या वसतिगृहांवर नियंत्रण ठेवले जाते.

शासकीय वसतिगृहात राहणाऱ्या चारही जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे एकत्रित प्रमाण हे १२.३ टक्के (३०० कुटुंबे) तर हेच प्रमाण अनुक्रमे अहमदनगर १६.७ टक्के (६० कुटुंबे), नाशिक ६.७ टक्के (६० कुटुंबे), पुणे १३.३ टक्के (१२० कुटुंबे) व ठाणे ११.७ टक्के (६० कुटुंबे) असे होते. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे कमी दिसून येते. गरीब आर्थिक परिस्थिती, माहितीचा अभाव, बुजरेपणा, घर सोडून दुसरीकडे न जाण्याची मानसिकता, शहरांबद्दल वाटणारी भिती इ. कारणांमुळे हे प्रमाण कमी आहे.

४. **विद्युत/तेलपंप वाटप**:- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांमार्फत शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी विद्युत/तेलपंप यांचे वाटप केले जाते. ज्या कुटुंबांना शेती पाणी पुरवठ्याच्या ठिकाणी विजेची सोय आहे त्यांना विद्युतपंप दिले जातात व ज्या कुटुंबांना विजेची सोय नाही त्यांना तेलपंप दिले जातात.

या योजनेचा लाभ अहमदनगर १३ (६०) कुटुंबे, नाशिक ९ (६०) कुटुंबे, पुणे १७ (१२०) कुटुंबे व ठाणे ११ (६०) कुटुंबे, या प्रमाणे झालेला होता. ही आर्थिक

उन्नतीची योजना असूनही लाभाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी असणाऱ्या अटी व शर्ती किचकट असल्याने लाभाचे प्रमाण कमी आहे.

५. **खावटी कर्ज**:- ही योजना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येते. आदिवासी सहकारी पत संस्थांमार्फत या योजनेची कार्यवाही केली जाते. उन्हाळ्यात व विशेषतः पावसाळ्यात आदिवासीकडील अन्नधान्याचा साठा संपुष्ठात येतो. तेव्हा त्यांची उपासमार होऊ नये म्हणून त्यांना खावटी कर्ज दिले जाते. हे कर्ज प्रामुख्याने अल्प-भूधारक, भूमिहीन शेतमजूर व ग्रामीण कारागीर यांना दिले जाते. खावटी कर्ज ९० टक्के धान्यरूपाने व १० टक्के रोख रक्कम या स्वरूपात दिले जाते.

खावटी कर्जाचा लाभ अहमदनगर जिल्ह्यातील २५ (४१.७ टक्के) कुटुंबांना, नाशिक १० (१६.७ टक्के) कुटुंबे, पुणे ४६ (३८.३ टक्के) कुटुंबे व ठाणे ३० (५० टक्के) कुटुंबे या प्रमाणे झालेला होता. नाशिक जिल्ह्यातील शेती इतर जिल्ह्यांच्या तुलनेत चांगली असल्याने खावटी कर्जाचे प्रमाण कमी आहे. अहमदनगर, पुणे व ठाणे जिल्ह्यातील जमीन खडकाळ असून जमीन धारणा प्रमाणही कमी आहे. त्यामुळे खावटी कर्जाचे प्रमाण अधिक दिसून येते.

६. **केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना**:- महाराष्ट्रात राहणाऱ्या आदिवासींमध्ये भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक, आर्थिक तसेच रुढी, परंपरा, रितीरिवाज इ. बाबतीत विविधता आढळून येते. त्यामुळे त्यांच्या स्थानिक गरजा या वेगवेगळ्या आहेत. आदिवासी विकास योजनांमध्ये स्थल काळानुरूप लवचिकता आणने आवश्यक असल्याने १९८१-८२ पासून केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना सुरू करण्यात आली. या योजनेत सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने काही योजना स्थानिक पातळीवरच मंजूर करून तातडीने त्याचा लाभ गरजू आदिवासींना मिळवून दिला जातो.

केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचा लाभ फक्त पुणे जिल्ह्यातील २ कुटुंबांना झालेला आहे. इतर तीन जिल्ह्यातील एकाही कुटुंबाला या योजनेचा लाभ झालेला नाही. या योजनेविषयी असलेली अनभिज्ञता हे त्याचे प्रमुख कारण आहे.

७. २७५ **(ब)**:- भारतीय राज्यघटनेतील कलम २७५ (१) अनुसार आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आदिवासी विकास योजनांसाठी केंद्र सरकारकडून विशेष अर्थसहाय्य दिले जाते. या अर्थसहाय्याचा लाभ आदिवासींना घेता येतो, परंतु याची माहिती आदिवासींना नसल्याने चारही जिल्ह्यातील ३०० कुटुंबांपैकी एकाही कुटुंबाला या योजनेचा लाभ मिळालेला नाही.

८. **एकाधिकार खरेदी योजना**:- ही योजना महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येते. आदिवासींकडील धान्य तसेच गौण वनौपजांची खरेदी या योजने अंतर्गत केली जाते. अहमदनगर जिल्ह्यातील २ (६०) कुटुंबे व पुणे जिल्ह्यातील २५ (१२०) कुटुंबे यांना या योजनेचा लाभ मिळाला होता. नाशिक व ठाणे जिल्ह्यातील एकाही कुटुंबाला या योजनेचा लाभ झालेला नाही. या योजनेनुसार केली जाणारी खरेदी ही आठवडे बाजाराच्या दिवशी विशिष्ट ठिकाणी व विशिष्ट वेळेतच केली जाते. त्यामुळे आदिवासी आपला शेतमाल व गौण वनौपजे स्थानिक व्यापाऱ्यांना विकून टाकतात. एकाधिकार खरेदी योजनेला मिळालेला प्रतिसाद त्यामुळे कमी आहे.

ब) जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना

जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागात अनेक योजना राबविल्या जातात. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे हे त्या योजनांचे उद्दिष्ट असते. जिल्हा परिषेदमार्फत आदिवासी भागात शाळा, दवाखाने चालविले जातात. निवारा उपलब्ध करून देण्यासाठी घरकुल योजना राबविली जाते. जिल्हा परिषेदमार्फत राबविण्यात येणाऱ्या काही योजना खालील प्रमाणे.

१. **अंगणवाडी**:- जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण व आदिवासी भागात अंगणवाड्या चालविल्या जातात. तीन वर्षे वय असलेल्या मुलांना अंगणवाडीत प्रवेश दिला जातो. अंगणवाडीत असलेल्या मुलांना गोष्टी सांगितल्या जातात. गाणी म्हणायला शिकवतात. खेळ शिकविले जातात. मुलांचे मन अंगणवाडीत रमावे म्हणून मनोरंजनाचे कार्यक्रम केले जातात व अल्पोपहार दिला जातो.

अंगणवाडी योजनेचा लाभ एकूण ८६ कुटुंबांना मिळालेला होता. त्यापैकी अहमदनगर ४१ कुटुंबे, नाशिक १८ कुटुंबे, पुणे ९ कुटुंबे व ठाणे-१८ कुटुंबे या प्रमाणे

लाभ मिळालेला होता. सर्वाधिक लाभ अहमदनगर जिल्ह्यातील कुटुंबांना मिळाला असून सर्वात कमी पुणे जिल्ह्यातील कुटुंबांना मिळालेला आहे. लहान मुले जन्माला येण्याच्या प्रमाणानुसार लाभाच्या प्रमाणतही फरक दिसून येतो.

२. **बालवाडी**:- जिल्हा परिषदेमार्फत अंगणवाडीला संलग्न बालवाडी चालविली जाते. चार ते साडेपाच वर्ष वय असणाऱ्या मुलांना बालवाडीत प्रवेश दिला जातो. बालवाडीत मनोरंजनाच्या कार्यक्रमांबरोबरच प्राथमिक शिक्षणाचे धडेही दिले जातात. बालवाडीत एकूण ८० कुटुंबातील मुले शिक्षण घेत होती. त्यापैकी अहमदनगर-१८, नाशिक - १८, पुणे - २७ व ठाणे - १७ इत्यादी. या प्रमाणे वरील कुटुंबांना बालवाडी योजनेचा लाभ मिळालेला होता.

३. **जिल्हा परिषद प्राथमिक शाळा**:- जिल्हा परिषदेमार्फत आदिवासी ग्रामीण भागात प्राथमिक शाळा चालविल्या जातात. गावातील लोकसंख्येनुसार १ ली ते ३ री, १ ली ते ४ थी व १ ली ते ७ वी या प्रमाणे शाळा चालविल्या जातात. अहमदनगर जिल्ह्यातील ४४ कुटुंबांतील तर नाशिक - ११ कुटुंबे, पुणे - ४३ कुटुंबे व ठाणे - १२ कुटुंबे या प्रमाणे मुले जिल्हा परिषदेच्या शाळेत जात होती.

४. **शालेय पोषण आहार योजना**:- प्राथमिक शाळेत होणारी मुलांची गळती थांबविण्यासाठी सरकारने शालेय पोषण आहार योजना सुरू केली आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या मुलांना शालेय पोषण आहार दिला जातो. वरील चारही जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत जाणाऱ्या मुलांना शालेय पोषण आहार योजनेचा लाभ मिळालेला होता.

५. **इंदिरा आवास/घरकुल योजना**:- दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या मागासवर्गीय लोकांना निवारा उपलब्ध व्हावा म्हणून जिल्हा परिषदेमार्फत इंदिरा आवास/घरकुल योजना राबविली जाते. घरकुल योजनेचा लाभ एकूण ४६ कुटुंबांना मिळालेला होता. त्यापैकी अहमदनगर - ५, नाशिक - १२, पुणे - १७ व ठाणे - १२ याप्रमाणे लाभ मिळालेला होता. बहुसंख्य आदिवासी दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत असूनही या योजनेचा लाभ अत्यल्प प्रमाणत मिळालेला दिसून येतो. अधिकाऱ्यांची अनास्था, दप्तर दिरंगाई, भ्रष्टाचार, राजकीय हस्तक्षेप इत्यादी कारणांमुळे आदिवासींसाठी असलेल्या सर्वच योजना फक्त कागदावरच दिसून येतात. आदिवासींचे अज्ञान हा घटक त्यास

कारणीभूत असला तरी त्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी संबंधित विभागाचे प्रयत्न फारच अपुरे राहीले आहेत.

क) महसूली विभागाच्या योजना:- राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत स्वस्त धान्य दुकाने व रॉकेल विक्री केंद्रे चालविली जातात. दारिद्र्य रेषेखालील व कमी उत्पन्न गटातील लोकांना याचा लाभ घेता येतो.

१. **स्वस्त धान्य दुकान** :- स्वस्त धान्य दुकानामार्फत अन्नधान्य, साखर, वनस्पती तेल, वितरीत केले जाते. स्वस्त धान्य दुकानातून वस्तू खरेदी करण्याचे प्रमाण चारही जिल्ह्यात ८० टक्के पेक्षा जास्त आहे. एकूण ३०० कुटुंबांपैकी ८७ टक्के कुटुंबे स्वस्त धान्य दुकानातून वस्तू खरेदी करीत होती. ठाणे जिल्ह्यातील ९५ टक्के कुटुंबे स्वस्त धान्य दुकानातून वस्तू खरेदी करताना आढळली.

शेतीतून मिळणारे कमी उत्पादन रोजगाराचा अभाव व कमालीचे दारिद्र्य यामुळे बहुसंख्य कुटुंबांना स्वस्त धान्य दुकानांतून उदरनिर्वाहासाठी धान्य खरेदी करावे लागत होते.

ड) इतर योजना :- या योजनांमध्ये आपत्कालीन मदत, भजनी साहित्य, वाद्य साहित्य (बॅन्जो), मंडप व लाईट डेकोरेशन इ. योजनांचा समावेश होतो. या योजनांचा लाभ फक्त अहमदनगर जिल्ह्यातील चार कुटुंबांना झालेला होता. उर्वरित जिल्ह्यातील एकाही कुटुंबाला लाभ झालेला आढळला नाही.

वरील योजनांविषयी असणारी अनभिज्ञता, नामशेष झालेली भजनीमंडळे, बँजो साहित्य वाजविण्याकडे पाहण्याचा संकुचीत दृष्टीकोण इत्यादींमुळे या योजनांचा लाभ अत्यंत कमी प्रमाणात घेण्यात आलेला होता.

वरील तक्ता क्र. ६.३९ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.१५) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.१५


विविध योजनांपासून मिळालेला लाभ
टक्केवारी
१००
९०
८०
७०
६०
५०
४०
३०
२०
१०
०
४६.७
५१.७
३६.७
२६.७
२८.७
३६.७
१५.३
२८.७
१२.३
१६.७
३७
०.७
०
९
८.३
८७
१.३
आ.वि.यो. पासून वंचित
आश्रमशाळा
जि.प. शाळा
बालवाडी
अंगणवाडी
शालेय पोषण आहार
इंदिरा आवास/घरकुल
शिष्यवृत्ती
वसतिगृह
वीज/तेल पंप
खावटी कर्ज
केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना
२७५ ब
एकाधिकार खरेदी योजना
बैल जोडी/गाडी
स्वस्त धान्य दुकान
इतर
योजना

तक्ता क्र. ६.४० शेती विषयक योजनांमधून प्राप्त झालेला लाभ

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
शे.वि.यो. फायदा मिळाला?	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
होय	२४	४०	४०	६६.७	३६	३९	७५	६२.५	३७	६१.७	१७६	५८.७
नाही	३६	६०	२०	३३.३	२४	२१	४५	३७.५	२३	३८.३	१२४	४१.३
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.४० मध्ये शेतीविषयक योजनांपासून प्राप्त झालेला लाभ दर्शविण्यात आलेला आहे.

शेती सुधार योजना या आदिवासी विकास विभाग व कृषी विभाग (जिल्हा परिषद) यांच्या मार्फत राबविण्यात येतात. वित्तीय तरतूद ही आदिवासी विकास विभागच करतो. शेती विषयक योजनांपासून एकूण ३०० कुटुंबांपैकी १७६ (५८.७ टक्के) कुटुंबांना लाभ झालेला होता. तर १२४ (४१.३ टक्के) कुटुंबांना कोणताही लाभ मिळालेला नव्हता. या योजनांचा लाभ मिळण्याचे सर्वाधिक प्रमाण नाशिक जिल्ह्यात ६६.७ टक्के होते. सर्वात कमी प्रमाण अहमदनगर जिल्ह्यात ४० टक्के होते. अज्ञान, निरक्षरता, माहितीचा अभाव, योजनांचा लाभ घेण्यासाठी पूर्ण कराव्या लागणाऱ्या अटी व शर्ती याबाबत असमर्थता इत्यादी कारणांमुळे शेती विषयक योजनांचा पुरेसा लाभ मिळालेला नव्हता.

तक्ता क्र. ६.४१ विविध शेती विकास योजनांपासून प्राप्त झालेला लाभ

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
शे.वि.यो.	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
जमीन सुधारणा	४	१६.७	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	४	२.३
बैलगाडी	०	०.०	१०	२५.०	२	५	७	९.३	०	०.०	१७	९.९
बैलजोडी	०	०.०	७	१७.५	८	१४	२२	२९.३	२०	५४.१	४९	२८.५
पाईप लाईन	७	२९.२	११	२७.५	१५	२०	३५	४६.७	१५	४०.५	६८	३९.५
बी-बियाणे	३	१२.५	८	२०.०	११	६	१७	२२.७	२	५.४	३०	१७.४
विहीर व विहीर सुधारणा	६	२५.०	१	२.५	०	०	०	०.०	०	०.०	७	४.१
शेती सुधारणेची अवजारे व साहित्य	१	४.२	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	१	०.६
ठिबक/ तुषार सिंचन	०	०.०	३	७.५	०	०	०	०.०	०	०.०	३	१.७
इतर	३	१२.५	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	३	१.७

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.४१ मध्ये लाभ प्राप्त झालेल्या विविध शेती विकास योजना दर्शविण्यात आलेल्या आहेत. विविध शेती विकास योजनांमध्ये जमीन सुधारणा, बैलगाडी व बैलजोडी पुरवठा, पाईपलाईन, बी-बियाणे पुरवठा, विहीर खोदणे व विहीर दुरूस्ती, शेती सुधारणेची अवजारे व साहित्य, ठिबक/तुषार सिंचन तसेच इतर शेती विकासाशी संबंधित योजनांचा समावेश होतो.

जमिनीचे सपाटीकरण करणे, बांध-बंदिस्ती करणे, चराऊ कुरणांचा विकास करणे या योजनांचा फायदा फक्त अहमदनगर जिल्ह्यातील चार कुटुंबांना झालेला होता. नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यातील एकाही कुटुंबाला या योजनेचा फायदा झालेला नव्हता. या योजनेचा लाभ घेण्यासाठी मोठ्या धारणक्षेत्राची आवश्यकता असते. आदिवासींचे धारण क्षेत्र हे लहान असून बहुतांश जमीन ही खडकाळ असून डोंगराळ भागात आहे. त्यामुळे ही योजना प्रभावी ठरू शकली नाही.

शेतीकामास मदत व्हावी म्हणून सरकारतर्फे बैलगाडी व बैलजोडी पुरवठा केला जातो. बैलगाडी योजनेचा लाभ नाशिक जिल्ह्यातील १० कुटुंबांना मिळालेला आहे तर पुणे जिल्ह्यातील ७ कुटुंबांना मिळालेला आहे. अहमदनगर व ठाणे जिल्ह्यातील कोणत्याही कुटुंबाला या योजनेचा लाभ मिळालेला नाही. बैलजोडी योजनेचा लाभ नाशिक जिल्ह्यातील ७ कुटुंबांना, पुणे जिल्ह्यातील २२ कुटुंबांना व ठाणे जिल्ह्यातील २० कुटुंबांना मिळालेला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील एकाही कुटुंबांला या योजनेचा लाभ मिळालेला नाही. अटी व शर्ती पूर्ण करण्यातील असमर्थता हे लाभ न मिळण्याचे प्रमुख कारण असून, अज्ञान व निरक्षरता ही सुध्दा महत्वाची कारणे आहेत.

शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी पी.व्ही.सी. पाईपांचा पुरवठा आदिवासी विकास विभागातर्फे केला जातो. या याजनेचा लाभ अहमदनगर जिल्ह्यातील ७ कुटुंबांना, नाशिक-११ कुटुंबे, पुणे-३५ कुटुंबे व ठाणे-१५ कुटुंबे या प्रमाणे झालेला होता. शेतीस पाणी पुरवठ्याची अनुपलब्धता हे या योजनेचा लाभ न मिळण्याचे प्रमुख कारण होते.

कृषी विभागातर्फे शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी संकरित बियाणांचा पुरवठा केला जातो. या बियांणांचा लाभ अहमदनगर जिल्ह्यातील ३ कुटुंबे, नाशिक जिल्ह्यातील ८ कुटुंबे, पुणे - १७ कुटुंबे व ठाणे जिल्ह्यातील २ कुटुंबे याप्रमाणे झालेला होता. संकरित बियाणे वापराबद्दल अज्ञान, पारंपारिक बियाणे वापराकडील ओढा, अज्ञान, अंधश्रध्दा या कारणांमुळे या योजनेचा लाभ कमी प्रमाणात मिळालेल होता.

शेतीची उत्पादकता वाढावी, व्यापारी पिके घेता यावीत व एकूणच आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी आदिवासी विकास विभागातर्फे विहीर खोदणे व विहीर दुरूस्ती यासाठी अनुदान दिले जाते. या योजनेचा लाभ अहमदनगर ६ कुटुंबे, नाशिक - १ कुटुंब, पुणे व ठाणे - ०० कुटुंबे याप्रमाणे झालेला होता. या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी काही अटी व शर्तीची पूर्तता करावी लागते. अटी व शर्ती पूर्ण करण्यातील असमर्थता हे या योजनेचा लाभ अंत्यत कमी प्रमाणात मिळण्याचे प्रमुख कारण होते.

जिल्हा परिषदेच्या कृषी विभागातर्फे ठिबक व तुषार सिंचन साहित्याचा पुरवठा करण्यात येतो. या योजनेचा लाभ फक्त नाशिक जिल्ह्यातील ३ कुटुंबांना मिळालेला होता. आदिवासींची अविकसित शेती, पाणी पुरवठ्याच्या अपुऱ्या सोयी, आधुनिक शेती अवजारे वापराविषयीचे अज्ञान, निरक्षरता, डोंगराळ व खडकाळ जमीन ही या योजनेचा लाभ न मिळण्यामागील प्रमुख कारणे आहेत. नाशिक जिल्ह्यातील जमीन काही प्रमाणात सपाट असून

निसर्गता पाण्याची उपलब्धता काही गावांत आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ नाशिक जिल्ह्यातील ३ कुटुंबांना मिळालेला आहे.

एकात्मिक विकास कार्यक्रम, कडधान्य विकास कार्यक्रम, गळीत धान्य विकास कार्यक्रम या योजनांचा समावेश इतर योजनांमध्ये होतो. इतर योजनांचा फायदा फक्त अहमदनगर जिल्ह्यातील ३ कुटुंबांना झालेल होता.

वरील तक्ता क्र. ६.४१ चे संख्यात्मक प्रमाण खालील आलेखामध्ये (आलेख क्र. ६.१६) दर्शविले आहे.

आलेख क्र. ६.१६



तक्ता क्र. ६.४२ दुग्ध विकास योजनांपासून मिळालेला लाभ

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
दुग्ध विकास योजना	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
दुग्ध प्रक्रिया व शीतगृह	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
दुभत्या जनावरांचा पुरवठा	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
पशुखाद्य पुरवठा	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.४२ मध्ये दुग्ध विकास योजनांपासून मिळालेला लाभ दर्शविला आहे. अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यातील एकूण ३०० कुटुंबांपैकी कोणत्याही कुटुंबाला दुग्ध प्रक्रिया व शीतगृह, दुभत्या जनावरांचा पुरवठा, पशुखाद्यपुरवठा या योजनांचा फायदा झालेला नाही.

शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसायाला महत्व दिले जाते. आदिवासींना त्याचा लाभ मिळावा, त्यांची उन्नती व्हावी म्हणून आदिवासी विकास विभागातर्फे वरील योजना राबविल्या जातात. आदिवासी विकास विभागातर्फे ज्या प्रकारच्या दुभत्या जनावरांचा पुरवठा केला जातो, ती जनावरे आदिवासी विभागात जास्त पाऊस पडत असल्याने पावसाळ्यात टिकत नाहीत. त्यामुळे आदिवासी अशी जनावरे घेत नाहीत. दुभती जनावरे घेतली तरच पशुखाद्य पुरवठा केला जातो. परिणामी पशुखाद्य पुरवठा योजनेचा लाभही एकाही कुटुंबाला मिळालेला नाही. दुग्ध प्रक्रिया व शीतगृह या योजनेसाठी मोठ्या प्रमाणावर दूध उत्पादन असावे लागते ते आदिवासी विभागात होत नसल्याने या योजनेचाही लाभ कोणालाही मिळालेला नाही.

तक्ता क्र. ६.४३ मृदसंधारण योजनेपासून प्राप्त झालेला लाभ

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
योजना	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
नाला बंडिंग (माती)	१२	२०.०	२०	३३.३	२०	११	३१	२५.८	१०	१६.७	७३	२४.३
नाला बंडिंग (सिमेंट)	०	०.०	१	१.७	२	०	२	१.७	२	३.३	५	१.७
चर व बांध बंदिस्ती	२२	३६.७	२०	३३.३	२७	२०	४७	३९.२	२०	३३.३	१०९	३६.३

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.४३ मध्ये मृदसंधारण योजनेपासून प्राप्त झालेला लाभ दर्शविण्यात आलेला आहे.

आदिवासी विभागात पडीक जमिनीचे प्रमाण मोठे आहे. डोंगर उतारावरील जमीन अधिक प्रमाणत पडीक आहे. बांधबंदिस्ती नसल्याने जमिनीची धूप मोठ्या प्रमाणात होते. पडीक जमिनीतून कोणतेही शेती उत्पादन मिळत नाही. शेती उत्पादनात वाढ व्हावी, अधिक-अधिक जमीन लागवडी खाली यावी, जमिनीची धूप थांबावी या हेतूने शासनातर्फे मृदसंधारण योजनेचा लाभ शेतकऱ्यांना दिला जातो. आदिवासींच्या शेती उत्पादकतेत वाढ होण्यासाठी ही योजना महत्वाची आहे.

वरील तक्ता क्र. ६.४३ नुसार नालाबंडिंग (माती) या योजनेचा लाभ अहमदनगर जिल्ह्यातील १२ कुटुंबांना मिळालेला होता तर नाशिक - २० कुटुंबे, पुणे ३१ कुटुंबे व ठाणे - १० कुटुंबे याप्रमाणे लाभ मिळाला होता. एकूण ३०० कुटुंबांपैकी फक्त ७३ (२४.३ टक्के) कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळाला होता.

नाला बंडिंग (सिमेंट) या योजनेचा लाभ अहमदनगर - ०० कुटुंबे, नाशिक - १ कुटुंब, पुणे - २ कुटुंबे व ठाणे - २ कुटुंबे अशा एकूण ५ कुटुंबांना मिळालेला होता. एकूण लाभाशी

असणारे प्रमाण फक्त १.७ टक्के होते. म्हणजेच ९८.३ टक्के कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला नव्हता.

जमिनीची धूप होऊ नये म्हणून चर खोदाई व बांध-बंदिस्ती केली जाते. या योजनेचा लाभ अहमदनगर - २२ कुटुंबे, नाशिक-२० कुटुंबे, पुणे-४७ कुटुंबे व ठाणे-२० कुटुंबे अशा एकूण-१०९ कुटुंबांना मिळालेला होता. त्याचे एकूण लाभाशी प्रमाण ३६.३ टक्के होते. जवळ-जवळ २९१ कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला नव्हता.

वरील योजनांचा विचार करता नालाबंडिंग (माती) व चर व बांध-बंदिस्ती या योजनांचा लाभ चारही जिल्ह्यांना काही प्रमाणात मिळालेला आहे. नाला बंडिग (सिमेंट) या योजनेचा लाभ अहमदनगर जिल्ह्यातील कोणत्याही व्यक्तीला मिळालेला नाही. नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यातील अत्यल्प कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे. या योजनांचा लाभ घेण्यासाठी जो आर्थिक सहभाग द्यावा लागतो तो नसल्याने तसेच जमीन स्वतःच्या नावावर असावी लागते ती अत्यंत कमी प्रमाणात असल्याने या योजनांचा लाभ कमी प्रमाणात मिळालेला आहे.

तक्ता क्र. ६.४४ फलोत्पादन योजनांपासून प्राप्त झालेला लाभ

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
योजना	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
फलोत्पादन रोप संरक्षण योजना	०	०.०	०	०.०	१	३	४	३.३	०	०.०	४	१.३
रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन योजना	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
फळझाडे/रोपे लागवडीकरिता अनुदान	३	५	१०	१६.७	४	७	११	९.२	१०	१६.७	३४	११.३

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.४४ मध्ये फलोत्पादन योजनांपासून प्राप्त झालेला लाभ दर्शविण्यात आलेला आहे. फलोत्पादन विभागामार्फत आदिवासी क्षेत्रात फलोद्यान विकासाच्या योजना राबविल्या जातात. पडीक जमिनीवर तसेच शेताच्या बांधावर फळझाडांची लागवड करून त्यापासून उत्पन्न मिळावे या उद्देशाने या योजना राबविल्या जातात. काही योजना १०० टक्के अनुदानावर तर काही योजना ५० टक्के अनुदानावर दिल्या जातात.

फलोत्पादन रोप संरक्षण योजनेचा लाभ फक्त पुणे जिल्ह्यातील ४ कुटुंबांना झालेला आहे. अहमदनगर, नाशिक व ठाणे या जिल्ह्यांतील कोणत्याही कुटुंबाला या योजनेचा लाभ मिळालेला नाही. रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन योजनेचा लाभ चारही जिल्ह्यांतील एकाही कुटुंबाला मिळालेला नाही. फळझाडे/रोपे लागवडीकरिता अनुदान या योजनेचा लाभ अहमदनगर - ३ कुटुंबे, नाशिक-१० कुटुंबे, पुणे-११ कुटुंबे व ठाणे-१० कुटुंबे अशा एकूण ३४ कुटुंबांना मिळालेला आहे. एकूण लाभाशी त्याचे प्रमाण फक्त ११.३ टक्के आहे.

वरील योजना ५० टक्के अनुदानावर दिल्या जातात. या योजनांचा लाभ घेण्यासाठी स्वतःच्या नावावर जमीन असावी लागते तसेच पाणी पुरवठ्याची सोय असावी लागते. आदिवासींमध्ये स्वतःच्या नावावर जमीन असण्याचे प्रमाण कमी आहे. आदिवासी विभागात उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई असते. त्यामुळे फळझाडांना पाणी पुरवठा करता येत नाही. फळझाडे जगविली नाहीत तर त्याचे अनुदान परत करावे लागते. या कारणांमुळे फलोत्पादन योजनांपासून मिळालेला लाभ अत्यल्प प्रमाणात आहे.

तक्ता क्र. ६.४५ तलंग (कोंबडीची पिल्ले) वाटप योजनेचा लाभ

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
तलंग योजनेचा लाभ झाला	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
होय	१	१.७	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	१	०.३
नाही	५९	९८.३	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	२९९	९९.७
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.४५ तलंग वाटप योजनेचा लाभ दर्शविण्यात आलेला आहे. कुक्कुटपालन करणे हा शेतकऱ्यांचा महत्वाचा जोडधंदा आहे. प्रत्येक आदिवासी कुटुंब कोंबड्या पाळत असते. आदिवासींनी व्यावसायिक दृष्टीकोणातून कुक्कुटपालन करावे या उद्देशाने आदिवासी विकास विभागातर्फे विलायती कोंबड्यांच्या पिलांचा (तलंग) पुरवठा केला जातो. या योजनेचा लाभ फक्त अहमदनगर जिल्ह्यातील एका कुटुंबाला मिळालेला आहे. नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यातील एकाही कुटुंबाला या योजनेचा लाभ मिळालेला नाही.

विलायती तलंगांची वाढ ही ठराविक वयापर्यंत विशिष्ट तापमानात करावी लागते. आदिवासींकडे त्याची सुविधा नसल्याने या योजनेचा लाभ घेतला जात नाही. अहमदनगर जिल्ह्यातील एका कुटुंबाने प्रायोगिक तत्वावर वरील योजनेचा लाभ घेतला होता. आदिवासी गावठी कोंबड्या पाळण्यासच प्राधान्य देतात. कुटुंबामागे गावठी कोंबड्यांची संख्या सरासरी ३ ते ५ इतकी असते.

तक्ता क्र. ६.४६ मत्स्य व्यवसायाच्या योजनांपासून प्राप्त झालेला लाभ

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
योजना	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
मत्स्यबीज उत्पादन योजना	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
अवरुध्द पाण्यात मत्स्य संवर्धन	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
मच्छीमार सहकारी संस्थेचा फायदा	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
मासेमारी साधनांच्या खरेदीसाठी अर्थसहाय्य	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा स्थापना करण्यासाठी मदत	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेसाठी मार्गदर्शन/मदत	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
एकूण	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.४६ मध्ये मत्स्य व्यवसायाच्या योजनांपासून प्राप्त झालेला लाभ दर्शविण्यात आलेला आहे. मासेमारी करणे हा आदिवासींचा पारंपारिक छंद आहे. त्यांनी व्यावसायिक दृष्टीकोणातून मासेमारी करावी या हेतूने आदिवासी विकास विभागाने वरील योजना सुरू केल्या आहेत. परंतु वरील योजनांचा फायदा अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यांतील एकाही कुटुंबाला झालेला नाही. योजना फक्त कागदावरच राहिली आहे.

मत्स्यव्यवसायाच्या योजना या समुद्र किनाऱ्यालगतची गावे, धरणांकाठची गावे, नदी काठची गावे अशा गावांनाच फायदेशीर आहेत. परंतु शासन ही योजना सरसकट राबविते. वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रशिक्षण घ्यावे लागते ते आदिवासी विकास विभागातर्फे दिले जात नाही. मासेमारीसाठी लागणारी साधने महागडी असतात. मासेमारी करण्यासाठी जलसंपदा विभागाची परवानगी घ्यावी लागते, ती मिळण्यात अडचणी येतात. व्यावसायिक मासेमारी करण्याचा परवाना गरीब आदिवासींना देण्याऐवजी धनदांडग्या व्यापाऱ्यांना दिला जातो. संशोधनासाठी निवडलेली बहुतेक गावे ही समुद्र, धरणे, तलाव व नद्या यांपासुन खुप दूर होती. या कारणांमुळे मत्स्यव्यवसाय योजनांचा लाभ एकाही कुटुंबाला मिळालेला नाही.

तक्ता क्र. ६.४७ मातृत्व अनुदान योजनेपासून प्राप्त झालेला लाभ

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
मातृत्व अनुदान योजना	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
होय	१२	२०	०	०.०	२	१	३	२.५	६	१०.०	२१	७.०
नाही	४८	८०	६०	१००	५८	५९	११७	९७.५	५४	९०.०	२७९	९३.०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.४७ मध्ये मातृत्व अनुदान योजनेचा लाभ दर्शविण्यात आलेला आहे.

भारतात स्त्रियांचे विवाहाचे सरासरी वय कमी आहे. त्यामुळे त्या लवकर गरोदर राहतात. परंतु त्यांची पुरेशी शारीरिक व मानसिक वाढ झालेली नसते. परिणामी सुदृढ बालके जन्माला येत नाहीत. त्याचा सामाजिक स्वास्थ्यावर अनिष्ट परिणाम होतो. तो होऊ नये म्हणून आरोग्य विभागातर्फे गरोदर स्त्रियांना मातृत्व अनुदान दिले जाते.

आदिवासी जमातींमध्ये अल्पवयातच विवाह लावले जातात. त्यामुळे अल्पवयातच मुली गरोदर राहतात. परिणामी कुपोषित बालके जन्माला येतात. माता व अर्भकाची वाढ व्यवस्थित व्हावी यासाठी मातृत्व अनुदान दिले जाते. या योजनेचा लाभ अनुक्रमे अहमदनगर-१२ कुटुंबे, नाशिक- ०० कुटुंबे, पुणे ३ कुटुंबे व ठाणे ६ कुटुंबे या प्रमाणे मिळालेला होता. एकूण ३०० कुटुंबांपैकी फक्त २१ कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला होता व त्याचे एकूण लाभाशी प्रमाण फक्त ७ टक्के होते. ९३ टक्के कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला नव्हता.

अल्पवयीन विवाह, लज्जा रक्षणाची काळजी, जवळ अंतरावर दवाखाण्यांची अनुपलब्धता, सक्तीने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली जाईल याची भिती, तपासणीसाठी वारंवार दवाखाण्यात जावे लागणे, अनुदान रक्कमेचा ठेवावा लागणारा हिशोब, अज्ञान, अंधश्रध्दा या सर्व कारणांमुळे आदिवासी समाजाकडून या योजनेचा लाभ घेतला जात नाही. त्यामुळे मातृत्व अनुदान योजनेचा लाभ मिळण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

तक्ता क्र. ६.४८ पशुवैद्यकीय दवाखान्यांची उपलब्धता

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
प.वै.द.	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
होय	२०	३३.३	३०	५०	२०	२०	४०	३३.३	३०	५०	१२०	४०
नाही	४०	६६.७	३०	५०	४०	४०	८०	६६.७	३०	५०	१८०	६०
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.४८ मध्ये पशुवैद्यकीय दवाखान्यांची उपलब्धता दर्शविण्यात आलेली आहे. पाळीव जनावरे ही आदिवासींची मौल्यवान संपत्ती असते. त्यांच्यावर त्यांचे जीवन अवलंबून

असते. त्यामध्ये गायी, बैल, म्हशी, शेळ्या व कोंबड्या यांचा समावेश असतो. या प्राण्यांना एखादा आजार झाला किंवा एखाद्या रोगाचा प्रादुर्भाव झाला तर ती दगावतात. त्यामुळे आदिवासींचे अपरिमीत असे आर्थिक नुकसान होते. ते होऊ नये म्हणून सरकारने आदिवासी भागात पशुवैद्यकीय दवाखाने सुरू केले आहेत. त्याची उपलब्धता वरील तक्त्यात दिली आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील संशोधनासाठी निवडलेल्या ६ गावांपैकी फक्त २ गावांत पशुवैद्यकीय दवाखाना होता. हेच प्रमाण अनुक्रमे नाशिक-३ (६ गावे), पुणे-४ (१२ गावे) व ठाणे-३ (६ गावे) असे होते. कंसात प्रत्येक जिल्ह्यातील निवडलेली गावे दिली आहेत. म्हणजेच सह्याद्री विभागातील निवड केलेल्या चार जिल्ह्यातील ३० गावांपैकी १२ गावांमध्ये पशुवैद्यकीय दवाखाण्याची उपलब्धता होती व १८ गावांना पशुवैद्यकीय दवाखाण्याची उपलब्धता नव्हती.

आदिवासी विभागातील गावे दूर-दूर अंतरावर असतात. ज्या गावात पशुवैद्यकीय दवाखाना उपलब्ध आहे त्याच गावातील लोकांना त्याचा लाभ होतो. उर्वरित गावातील लोकांना आपल्या आजारी जनावरांना दवाखाण्याच्या ठिकाणी घेऊन जाणे शक्य होत नाही. डॉक्टर दवाखाना सोडून दुसऱ्या ठिकाणी जाण्यास तयार नसतात. त्यामुळे बहुतेक जनावरे दगावतात व आदिवासींचे नुकसान होते. वरील काही गावांत पशुवैद्यकीय दवाखाण्यांची उपलब्धता असली तरी बहुतेक वेळेस तेथे डॉक्टर उपलब्ध नसतात तसेच औषधांची टंचाई असते. त्यामुळेही आदिवासींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

तक्ता क्र. ६.४९ पशुवैद्यकीय दवाखान्यातून प्राप्त झालेल्या सोयी/सेवा

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
सेवा	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
जनावरांची औषधे	३१	५१.७	५६	९३.३	३९	५०	८९	७४.२	५२	८६.७	२२८	७६.०
उपचार	२५	४१.७	३१	५१.७	३९	२६	६५	५४.२	२१	३५.०	१४२	४७.३
शस्त्रक्रिया	०	०.०	१	१.७	०	१	१	०.८	०	०.०	२	०.७
कृत्रिम रेतन	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०
इतर	०	०.०	०	०.०	०	०	०	०.०	०	०.०	०	०.०

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.४९ मध्ये पशुवैद्यकीय दवाखान्यातून प्राप्त झालेल्या सोयी / सेवा दर्शविण्यात आलेल्या आहेत.

सह्याद्रीतील आदिवासी विभागात जनावरांच्या तुलनेत पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या कमी असली तरी या दवाखान्यांमार्फत वरीलप्रमाणे सेवा पुरविण्यात येतात. अहमदनगर जिल्ह्यातील ३१ कुटुंबांकडील जनावरांना औषधे दिली गेली होती. २५ कुटुंबांकडील जनावरांवर विविध उपचार करण्यात आले होते. तर शस्त्रक्रिया, कृत्रीम रेतन व इतर सेवांचे प्रमाण शुन्य होते. नाशिक जिल्ह्यातील ५६ कुटुंबांकडील जनावरांना औषधे, ३१ कुटुंबांकडील जनावरांवर उपचार, एक शस्त्रक्रिया, कृत्रिम रेतन व इतर सेवांचा लाभ कोणालाही मिळालेला नव्हता. हेच प्रमाण पुणे जिल्ह्यात अनुक्रमे जनावरांना औषधे-८९ कुटुंबे, जनावरांवर उपचार-६५ कुटुंबे, शस्त्रक्रिया-१ कुटुंब, कृत्रिम रेतन-०० व इतर सेवा-०० असे प्रमाण होते. तसेच ठाणे जिल्ह्यात या सेवांचे प्रमाण अनुक्रमे जनावरांना औषधे-५२ कुटुंबे, उपचार-२१ कुटुंबे, शस्त्रक्रिया-००, कृत्रिम रेतन-०० व इतर सेवा-०० असे लाभ मिळण्याचे प्रमाण होते. एकूण ३०० कुटुंबांचा विचार करता ७६ टक्के कुटुंबांकडील जनावरांना औषधोपचार मिळाले होते. शस्त्रक्रिया करण्याचे प्रमाण फक्त ०.७ टक्के होते. कृत्रिम रेतन ०० टक्के होते. व इतर सेवांचे प्रमाणही ०० टक्के होते.

आदिवासी भागात अलिकडे पशुवैद्यकीय डॉक्टर घरोघरी जाऊन जनावरांना औषधे देतात किंवा ग्रामसेवकांमार्फत ती पुरविली जातात. त्यामुळे जनावरांना औषधे मिळण्याचे प्रमाण अधिक आहे. परंतु काही लोक आजही परंपरागत वनौषधींचा वापर करतात. प्रत्यक्ष उपचार करण्याचे प्रमाण मात्र कमी आहे. पशुवैद्यकीय दवाखान्यांची कमी संख्या, दवाखाना गावापासून दूर असणे, डॉक्टर वेळेवर उपलब्ध नसणे, पारंपारिक औषधोपचार करणे या कारणांमुळे प्रत्यक्ष उपचारांचे प्रमाण कमी आहे. आदिवासी लोक हवामानाच्या दृष्टीने गावठी जातीचीच जनावरे पाळतात. संकरित जनावरे पाळण्याचा कल कमी आहे. त्याच प्रमाणे वरील कारणांमुळे कृत्रिम रेतनाचे प्रमाण शुन्य आहे.

तक्ता क्र. ६.५० रोगनियंत्रणासाठी जनावरांना दिलेल्या लसीकरणाचे प्रमाण

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव	एकूण संख्या	%	मोखाडा			
लसीकरण झाले	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या			संख्या	%	संख्या	%
होय	३०	५०.०	५१	८५.०	२२	५१	७३	६०.८	५५	९१.७	२०९	६९.७
नाही	३०	५०.०	९	१५.०	३८	९	४७	३९.२	५	८.३	९१	३०.३
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.५० मध्ये रोगनियंत्रणासाठी जनावरांच्या लसीकरणाचे प्रमाण दर्शविण्यात आलेले आहे. वेगवेगळ्या ऋतूत वेगवेगळ्या रोगांचा प्रादुर्भाव जनावरांना होत असतो. या रोगांमुळे मोठ्या प्रमाणात जनावरे दगावतात. त्यामुळे रोगनियंत्रणासाठी लसीकरण करणे आवश्यक असते.

जनावरांना लसीकरण करण्याचे प्रमाण अनुक्रमे अहमदनगर- ३०, नाशिक-५१, पुणे-७३ व ठाणे-५५ इत्यादी. अशा प्रकारे एकूण ३०० कुटुंबांपैकी २०९ कुटुंबांतील जनावरांना लसीकरण करण्यात आले होते. तर ९१ कुटुंबांतील जनावरांचे लसीकरण झालेले नव्हते. लसीकरणाचे एकूण प्रमाण हे ६९.७ टक्के होते.

अहमदनगर जिल्ह्यात लसीकरणाचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ५० टक्के आहे. तर ठाणे जिल्ह्यात हे प्रमाण सर्वाधिक म्हणजेच ९१.७ टक्के आहे. ठाणे जिल्ह्यात जनावरांना विविध रोगांचा प्रादुर्भाव होण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यात पशुवैद्यकीय विभागातर्फे लसीकरणाची मोहीम प्रभावीपणे राबविली जाते. परिणामी लसीकरणाचे प्रमाण त्या जिल्ह्यात सर्वाधिक आहे. इतर जिल्ह्यात हे प्रमाण कमी असण्याची कारणे म्हणजे, लसीकरणाची चुकीची वेळ, जनावरे चरायला रानात जाणे, दळण-वळण साधनांचा अभाव, औषधांचा अपुरा पुरवठा इत्यादीमुळे अहमदनगर, नाशिक व पुणे जिल्ह्यात लसीकरणाचे प्रमाण कमी आहे.

तक्ता क्र. ६.५१ वैरण उत्पादनासाठी मिळालेला आर्थिक लाभ

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
आर्थिक लाभ झाला	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
होय	२	३.३	०	०.०	२	०	२	१.७	०	०.०	४	१.३
नाही	५८	९६.७	६०	१००.०	५८	६०	११८	९८.३	६०	१००.०	२९६	९८.७
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोत: - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.५१ मध्ये वैरण उत्पादनासाठी मिळालेला आर्थिक लाभ दर्शविलेला आहे.

आदिवासींना उन्हाळ्यात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न नेहमी भेडसावत असतो. जून महिन्यात पाऊस वेळेवर पडला नाहीतर चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनतो. तो प्रश्न सोडविण्यासाठी वैरण उत्पादन योजने अंतर्गत अनुदान दिले जाते. हे अनुदान सुधारीत वैरणीचे बी व खते या स्वरूपात दिले जाते.

वरील योजनेचा लाभ अहमदनगर जिल्ह्यातील दोन व पुणे जिल्ह्यातील दोन अशा एकूण फक्त चार कुटुंबांना मिळालेला होता. नाशिक व ठाणे जिल्ह्यातील कोणत्याही कुटुंबाला या योजनेचा लाभ मिळालेला नव्हता. एकूण ३०० कुटुंबांपैकी २९६ कुटुंबे या लाभापासून वंचित होती. लाभ न मिळण्याचे प्रमाण ९८.७ टक्के इतके मोठे होते.

वैरण उत्पादन योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रशिक्षण घ्यावे लागते. ते कोठे मिळते? किती दिवस असते? त्याच्या अटी व शर्ती काय आहेत? याची माहिती आदिवासींना मिळत नाही. संकरित वैरण गावठी जातीच्या जनावरांना पोषक असेल किंवा नाही, याचीही माहिती दिली जात नाही. म्हणजेच आदिवासी विकास विभागाकडून आवश्यक सेवा पुरविल्या जात नाहीत. या कारणांमुळे वैरण उत्पादन योजनेचा लाभ मिळण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

तक्ता क्र. ६.५२ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून भेट

जिल्हा	अहमदनगर		नाशिक		पुणे				ठाणे		एकूण	
प्रकल्प	राजूर		नाशिक		घोडेगांव				जव्हार			
तालुका	अकोले		इगतपूरी		जुन्नर	आंबेगांव			मोखाडा			
ए.आ.वि.प्र. कार्या. कर्मचाऱ्यांकडून भेट	संख्या	%	संख्या	%	संख्या	संख्या	एकूण संख्या	%	संख्या	%	संख्या	%
होय	२	३.३	३	५.०	२	१	३	२.५	०	०.०	८	२.७
नाही	५८	९६.७	५७	९५.०	५८	५९	११७	९७.५	६०	१००.०	२९२	९७.३
एकूण	६०	१००	६०	१००	६०	६०	१२०	१००	६०	१००	३००	१००

स्त्रोतः - आदिवासी व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून गोळा केलेली माहिती.

तक्ता क्र. ६.५२ मध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून लाभार्थी व्यक्तींना देण्यात आलेली भेट दर्शविण्यात आलेली आहे

संशोधनासाठी अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यातील ३०० कुटुंबांना भेट दिली असता असे आढळून आले की, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून ज्या व्यक्तींना योजनांचा लाभ दिला गेलेला आहे त्या व्यक्तींनी योजनांचा योग्य वापर केला आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी लाभार्थी कुटुंबापैकी फक्त ८ (२.७ टक्के) कुटुंबांना संबंधित अधिकाऱ्यांनी भेट दिलेली होती. उर्वरित २९२ (९७.३ टक्के) कुटुंबांना दिलेल्या योजनांची पाहणी/परीक्षण/मूल्यमापन करण्याच्या निमित्ताने किंवा आदिवासी विकास योजनांची माहिती देण्याच्या निमित्ताने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांनी भेट दिलेली नव्हती. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांकडून विकास योजनांची योग्य अंमलबजावणी झालेली नव्हती. तसेच अनेक व्यक्ती या लाभांपासून वंचित होत्या.

६.३ प्रकल्प अधिकारी मुलाखत – प्रतिसादाचे विश्लेषण

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी विकास विभागाकडे राज्यातील आदिवासी जमातींच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींचे जीवनमान सुधारण्याच्या उद्देशाने स्वतंत्र आदिवासी उपयोजना राबविण्यात येते. आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी उपयोजना तयार करणे व तिच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करण्याचे कार्य केले जाते. आदिवासी विकास विभागाच्या क्षेत्रिय स्तरावरील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांमार्फत आदिवासी विकासाच्या विविध योजना राबविल्या जातात. प्रकल्प कार्यालयांमार्फतच त्यांची अंमलबजावणी व कार्यवाही केली जाते. महाराष्ट्रात एकूण २४ आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये आहेत.

सह्याद्री विभागात अहमदनगर, नाशिक, पुणे, ठाणे व रायगड या जिल्ह्यांचा समावेश होतो. संशोधनासाठी निवडलेल्या अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यांसाठी अनुक्रमे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर, ता. अकोले जिल्हा अहमदनगर, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक ता. जिल्हा नाशिक व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, जव्हार, तालुका जव्हार, जिल्हा ठाणे ही क्षेत्रीय स्तरावरील प्रकल्प कार्यालये आहेत. या कार्यालयांत प्रकल्प अधिकारी हे प्रमुख अधिकारी असतात. प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मुलाखतीचा प्रतिसाद खालीलप्रमाणे.

६.३.१ सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, राजूर, ता. अकोले, जिल्हा-अहमदनगर

सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर, यांनी दिलेल्या माहितीनुसार प्रकल्प कार्यालयात अनेक पदे रिक्त होती. त्यामुळे उर्वरित कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत होता. मागील काही वर्षांत राबविलेल्या आदिवासी विकास योजनांची माहिती देण्यास वेळे अभावी त्यांनी असमर्थता दर्शविली.

योजना राबविताना येणाऱ्या अडचणी - माहिती

१. नियोजन करताना जिल्हास्तरीय यंत्रणांकडून पुरेसे सहकार्य मिळत नसल्याने अडचणी येतात. सामुहिक प्रयत्नांअभावी नियोजन सदोष होते.

२. सदोष नियंत्रणामुळे लाभार्थ्यांपर्यंत पोहचता येत नाही. खर्च मर्यादेमुळे मागणी प्रमाणे निधी उपलब्ध होत नाही.

३. योजनांची संख्या वाढल्याने नियंत्रण करता येत नाही. रिक्त पदांमुळे अनेक अडचणी येतात. अधिकार मर्यादित आहेत.

४. प्रकल्प कार्यालयाचे कार्यक्षेत्र मोठे असल्याने योजनांचा पाठपुरावा करताना अडचणी येतात. कार्यान्वयीन यंत्रणेकडून पुरेसा प्रतिसाद मिळत नाही.

५. अधिकारी व कर्मचाऱ्यांना योजना राबविण्यास पुरेसा वेळ मिळत नाही.

६. प्रशासकीय अधिकार नाहीत, वित्तीय अधिकार मर्यादित आहेत.

७. आदिवासी विकास विभागाच्या सर्व योजना आवश्यक आहेत. परंतु लाभार्थी निवड महत्वाची आहे.

८. कृषी सिंचन, घरकुल योजना, दुभत्या जनावरांचा पुरवठा, स्वयंरोजगार, तेलपंप व वीजपंप यांचे वाटप, भूमिहीनांना जमीन वाटप या योजना आदिवासी विकासाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत.

९. आदिवासी लाभार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. मूल्यमापनासाठी वेळ मिळत नाही.

१०. काही योजनांचे अंशतः मूल्यमापन केले आहे.

११. सहाय्यक प्रकल्प अधिकारी या नात्याने मधुमक्षिका पालन, पर्यटन रोजगार या योजना राबविण्याची सूचना वरिष्ठ कार्यालयाला केली आहे.

१२. आदिवासी कार्याक्षेत्राबद्दल योजना अंमलबजावणीच्या वार्षिक अहवालात उणिवा, अडचणी, सूचना यांचा अंतर्भाव केला जातो.

१३. प्रकल्प अधिकाऱ्यांना 'यशदा' पुणे व 'आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था' पुणे यांच्यामार्फत प्रशिक्षण दिले जाते.

१४. आदिवासी योजनांच्या लाभार्थ्यांना वापराबद्दल प्रशिक्षण देण्यात येते.

१५. आदिवासी लोकसंख्या, कुटुंबे, लाभार्थी संख्या, लाभ न मिळालेल्या व्यक्तींची संख्या यांची माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नाही.

१६. आदिवासी विकास विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे राजूर प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील आदिवासींची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती काही प्रमाणात साध्य झालेली आहे. चिरस्थायी विकासासाठी सामाजिक न्यायातून विकास होणे शिल्लक आहे.

६.३.२ सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक, तालुका व जिल्हा-नाशिक

सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक यांनी दिलेल्या माहितीनुसार नाशिक प्रकल्प कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त होती. त्यांनी मागील आर्थिक वर्षात राबविण्यात आलेल्या काही योजनांची, केलेल्या तरतुदीची, लाभार्थ्यांची त्रोटक माहिती उपलब्ध करून दिली.

योजना राबविताना येणाऱ्या अडचणी - माहिती

१. राज्यसरकार व केंद्र सरकारकडून येणाऱ्या निधिचे नियोजन स्थानिक स्तरावरच केले जात असल्याने नियोजन करताना अडचणी येत नाहीत.
२. आदिवासी लोकसंख्या जास्त असल्याने व ती दुर्गम भागात राहत असल्याने योजना राबविताना अडचणी येतात.
३. काही योजना इतर विभागाकडून राबविण्यात येत असल्याने नियंत्रण करताना अडचणी येतात. दुर्गम आदिवासी भागात पोहचता येत नाही. त्यामुळे आदिवासींना योजनांचा लाभ मिळण्यास विलंब होतो.
४. योजनांचा पाठपुरावा करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध आहे.
५. दुर्गम आदिवासी भाग व कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या यामुळे योग्य अंमलबजावणी करण्यास वेळ अपुरा पडतो.
६. प्रकल्प अधिकारी म्हणून प्रशासकीय व वित्तीय अधिकार आहेत.
७. स्थानिक गरजा विचारात घेऊन योजना राबविल्या जात असल्यामुळे सर्वच योजना आदिवासींना लाभदायक आहेत.
८. कोणतीही योजना अनावश्यक नाही.
९. आदिवासी लाभार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी आदिवासी विकास निरिक्षकांमार्फत आढावा घेण्यात येतो.
१०. प्रकल्प कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या योजनांचे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत मूल्यमापन केले जाते.
११. प्रकल्प अधिकारी या नात्याने नवीन उपक्रम म्हणून कातकरी या आदिवासी जमातीसाठी नवीन विकास आराखडा तयार केला आहे.

१२. प्रकल्प अधिकारी कार्यक्षेत्राच्या वार्षिक अहवालात उणिवा, अडचणी, सूचना यांचा अंतर्भाव नसतो.

१३. 'यशदा' पुणे या संस्थेमार्फत प्रकल्प अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

१४. जेथे आवश्यक आहे त्या योजनांच्या वापराचे आदिवासी लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

१५. एकूण आदिवासी लोकसंख्या, एकूण कुटुंबे, लाभार्थी संख्या इत्यादींची माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नाही.

१६. आदिवासी विकास योजनेमुळे आदिवासींचा आर्थिक स्तर उंचावला आहे. राहणीमानात व शिक्षणाच्या दर्जातही सुधारणा झाली आहे. आदिवासी विकास योजनेच्या लाभामुळे अनेक आदिवासी सरकारी व खाजगी क्षेत्रात नोकरी करीत आहेत.

६.३.३ सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, जव्हार, तालुका जव्हार, जिल्हा-ठाणे

सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्याल, जव्हार, ता. जव्हार, जिल्हा-ठाणे यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांच्या कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांची काही पदे रिक्त होती. मागील आर्थिक वर्षात प्रकल्प कार्यालयामार्फत राबविण्यात आलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यास त्यांनी असमर्थता दर्शविली.

योजना राबविताना येणाऱ्या अडचणी - माहिती

१. नियोजन करताना अडचणी येतात.

२. मनुष्यबळ कमी असल्याने व बहुतेक योजनांचा निधी संबंधीत विभागाकडे जात असल्याने नियंत्रण राहत नाही.

३. नियंत्रण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. कामाचा व्याप सांभाळून नियंत्रण करणे अवघड जाते.

४. वरील कारणांमुळे पाठपुरावा करताना अडचणी येतात.

५. दिवसेंदिवस योजना वाढत आहेत. परंतु त्या प्रमाणात सुविधा व कर्मचारी नाहीत. त्यामुळे प्रभावीपणे योजना राबविण्यास वेळ कमी पडतो.

६. प्रशासकीय व वित्तीय अधिकारांचे विकेंद्रीकरण नसल्याने स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेताना अडचणी येतात.

७. आदिवासी विकास विभागाच्या सर्व योजना आदिवासींना लाभदायक आहेत.

८. कोणतीही योजना अनावश्यक नाही.

९. लाभार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही.

१०. फार कमी योजनांचे मूल्यमापन झालेले आहे.

११. प्रकल्प अधिकारी या नात्याने स्थानिक परिस्थितीनुसार काही योजना प्रस्तावित केल्या आहेत.

१२. प्रकल्प अधिकारी कार्यक्षेत्राबद्दल वार्षिक अहवालात उणिवा, अडचणी, सूचना इत्यादींचा अंतर्भाव केला जातो.

१३. प्रकल्प आधिकारी या नात्याने योजना अंमलबजावणीसाठी सरकारतर्फे प्रशिक्षण दिले जाते.

१४. लाभार्थ्यांना विविध योजनांच्या वापराबद्दल प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळते.

१५. एकूण आदिवासी लोकसंख्या, एकूण कुटुंबे, लाभार्थ्यांची संख्या, लाभ न मिळालेल्या व्यक्ती इत्यादींची माहिती उपलब्ध नाही.

१६. आदिवासी विकास योजनांमुळे आदिवासी क्षेत्रातील आदिवासींची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात प्रगती झाली आहे.

६.३.४ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव, तालुका आंबेगाव, जिल्हा - पुणे

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव, जिल्हा पुणे यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांच्या कार्यालयातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त होती. मागील आर्थिक वर्षात राबविण्यात आलेल्या योजनांची सविस्तर माहिती देण्यास त्यांनी असमर्थता दर्शविली. कामाचा व्याप अधिक असल्याने ते माहिती देऊ शकले नाहीत.

योजना राबविताना येणाऱ्या अडचणी - माहिती

१. योजनांची संख्या अधिक व कमी कर्मचारी यामुळे नियंत्रण करताना अडचणी येतात.

२. कार्यक्षेत्र मोठे असल्याने योजना राबविताना अडचणी येतात.

३. दुर्गम व अतिदुर्गम भागात योजनांचा पाठपुरावा करताना अडचणी येतात.

४. काही योजना इतर विभागांमार्फत राबविल्या जात असल्याने नियंत्रण राहत नाही.

५. योजनांची संख्या अधिक, मोठे कार्यक्षेत्र, कर्मचाऱ्यांची संख्या कमी यामुळे योजना राबविण्यास पुरेसा वेळ मिळत नाही.

६. प्रशासकीय अधिकार आहेत. वित्तीय अधिकार मर्यादित आहेत.

७. आदिवासी विकास विभागाच्या सर्व योजना आदिवासींना लाभदायक आहेत.

८. कोणतीही योजना अनावश्यक नाही.

९. मूल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही.

१०. राबविलेल्या योजनांपैकी फार कमी योजनांचे मूल्यमापन झालेले आहे.

११. प्रकल्प अधिकारी या नात्याने स्थानिक परिस्थितीस अनुकूल काही योजना शासनाला सुचविल्या आहेत.

१२. प्रकल्प अधिकारी कार्यक्षेत्राच्या वार्षिक अहवालात उणिवा, अडचणी, सूचना इत्यादींचा अंतर्भाव केला जातो.

१३. 'यशदा' पुणे व 'आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था', पुणे या संस्थांमार्फत प्रशिक्षण दिले जाते.

१४. योजनांच्या वापराबद्दल लाभार्थ्यांना र्मागदर्शन केले जाते.

१५. एकूण आदिवासी लोकसंख्या, एकूण कुटुंबे, लाभार्थी संख्या, लाभ न मिळालेल्या व्यक्ती इत्यादींबाबत माहिती उपलब्ध नाही.

१६. आदिवासी विकास योजनेमुळे आदिवासींची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती काही प्रमाणात झालेली आहे.

६.४ आश्रमशाळा मुख्याध्यापक मुलाखत - प्रतिसादाचे विश्लेषण

आदिवासी विकास विभागातर्फे आदिवासींच्या शैक्षणिक उन्नती करिता आदिवासी भागात १९५३ पासून आश्रमशाळा चालविल्या जातात. या आश्रमशाळांमध्ये मुलांच्या राहण्याची, जेवणाची व शिक्षणाची मोफत सोय केली जाते. सध्या राज्यात एकूण १११४ निवासी आश्रमशाळा असून त्यापैकी ५६० शासकीय आश्रमशाळा, २ आदर्श आश्रमशाळा, १३ इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा सरकारकडून चालविल्या जातात. उर्वरित ५५४ शाळा या राज्य सरकारच्या सहाय्याने स्वेच्छा संस्थांमार्फत चालविल्या जातात. या शाळांमधील विद्यार्थी संख्या ३.७२ लाख एवढी आहे. त्यामध्ये जवळजवळ ३

लाख निवासी विद्यार्थी आहेत. मुले व मुली यांची संख्या अनुक्रमे २.२४ लाख व १.४८ लाख एवढी आहे. आश्रमशाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली असली तरी आदिवासींचा शैक्षणिक विकास प्रगत समाजाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. त्याची कारणे शोधण्याच्या उद्देशाने प्रातिनिधीक स्वरूपात अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यांतील अकोले, इगतपूरी, जुन्नर, आंबेगाव व मोखाडा या तालुक्यांतील प्रत्येकी एक आश्रमशाळा याप्रमाणे तेथील मुख्याध्यापकांची मुलाखत घेण्यात आली आहे. मुख्याध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

६.४.१ मुख्याध्यापक, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, शिरपुंजे, तालुका अकोले, जिल्हा- अहमदनगर.

मा. मुख्याध्यापक, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, शिरपुंजे यांनी दिलेल्या माहितीनुसार त्या आश्रमशाळेच्या कार्यक्षेत्रात पाच गावे येत होती. त्या गावांची लोकसंख्या शाळेकडे उपलब्ध होती. परंतु पाच वर्षाखालील व पाच वर्षांवरील मुला-मुलींची माहिती उपलब्ध नव्हती. आश्रमशाळेत शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त होती. शाळेत इयत्ता पहिली ते दहावी या वर्गांत १७७ मुले व १७४ मुली असे एकूण ३५१ विद्यार्थी शिक्षण घेत होते. एकूण विद्यार्थ्यांमध्ये ३४७ विद्यार्थी **'महादेव कोळी'** या आदिवासी जमातीचे होते तर ४ विद्यार्थी 'ठाकर' या जमातीचे होते. रोजगारासाठी पालकांच्या होणाऱ्या स्थलांतरामुळे विद्यार्थ्यांची शाळेतून गळती होत होती.

आश्रमशाळेतील आदिवासी मुलांना पिण्याचे पाणी, वापरासाठी पाणी, संडास, न्हाणीघर, गाद्या, खेळाचे मैदान इत्यादी सुविधांची उपलब्धता होती. पंखे, मच्छरदाण्या, आजारी मुलांसाठी स्वतंत्र खोली या सुविधांची उपलब्धता नव्हती. विद्यार्थ्यांना सर्वसाधारण आजार झाल्यास स्थानिक पातळीवर उपचार केले जातात. असाधारण आजार असेल तर ग्रामीण रुग्णालयात नेऊन उपचार केले जातात. वर्षातून चारवेळा विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली जाते.

आश्रमशाळेतील मुलांना दररोज सकाळी कडधान्यांची उसळ नाश्ता म्हणून दिली जाते. दुपारच्या व संध्याकाळच्या जेवणात चपाती, वरण, भात, भाजी यांचा समावेश असतो. महिन्यातून दोन वेळेस मांसाहारी व मिष्ठान्न जेवण दिले जाते. मुख्याध्यापकांच्या मते आश्रमशाळेतील मुलांना सकस आहार दिला जातो.

आदिवासी विकास विभागाकडून गणवेश, वह्या, पुस्तके, शैक्षणिक साहित्य खेळाचे साहित्य व इतर साहित्य जून किंवा ऑगस्ट महिन्यात दिले जाते. आश्रमशाळेत शैक्षणिक उपक्रमांबरोबरच वक्तृत्व स्पर्धा, वाद-विवाद स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, संगीत शिक्षण, अभिनय शिक्षण, हस्ताक्षर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वैयक्तिक खेळ इत्यादी उपक्रम राबविले जातात. मुख्याध्यापकांच्या मते विद्यार्थ्यांना क्रिडाप्रशिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

आश्रमशाळेतील शिक्षणामुळे आदिवासी विद्यार्थ्यांची भाषा सुधारते, वैचारिक पातळी वाढते तसेच राहणीमान सुधारते. आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा चांगला आहे. विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या, चांगले मार्गदर्शन उपलब्ध करून दिले तर आदिवासी विद्यार्थी सध्याच्या जागतिक स्पर्धेत नक्कीच टिकाव धरू शकतील.

६.४.२ मुख्याध्यापक, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, खेड, तालुका इगतपूरी, जिल्हा- नाशिक

वरील आश्रमशाळेच्या कार्यक्षेत्रात पाच गावे येत होती. त्या गावांची लोकसंख्या आश्रमशाळेकडे उपलब्ध होती. परंतु पाच वर्षाखालील व पाच वर्षांवरील मुले व मुली यांची माहिती उपलब्ध नव्हती. आश्रमशाळेत शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त होती. खेडच्या आश्रमशाळेत इयत्ता पहिली ते दहावी या वर्गांत १७१ मुले व १७४ मुली असे एकूण ३४५ विद्यार्थी शिक्षण घेत होते. एकूण विद्यार्थ्यांपैकी १९३ विद्यार्थी **'महादेव कोळी'** जमातीचे होते. तर १५२ विद्यार्थी 'ठाकर' या जमातीचे होते. रोजगारासाठी पालकांचे स्थलांतर व विद्यार्थ्यांनी शाळा बदलणे यामुळे गळती होताना दिसून येत होती.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी पिण्याचे पाणी, वापरासाठी पाणी, संडास, न्हाणीघर, गाद्या, खेळाचे मैदान इत्यादींची उपलब्धता होती. पंखे, मच्छरदाण्या, खेळाच्या साहित्याची खोली, आजारी मुलांसाठी स्वतंत्र खोली इत्यादींची उपलब्धता नव्हती. यावरून विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आश्रमशाळा काळजी घेत नाही असे स्पष्ट होते. विद्यार्थ्यांना सर्वसाधारण आजार झाल्यास स्थानिक पातळीवर गोळ्या, औषधे देऊन

उपचार केले जातात. असाधारण आजार झाल्यास ग्रामीण रुग्णालयात नेले जाते. वर्षातून चारवेळा सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली जाते.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना रोज नाश्त्यासाठी उसळ दिली जाते. दुपारच्या व संध्याकाळच्या जेवणात वरण, भात, भाजी व चपाती यांचा समावेश असतो. वरण व भाजी बदलून-बदलून दिली जाते. महिन्यातून दोनदा मांसाहारी व गोड जेवण दिले जाते. थोडक्यात मुलांना सकस आहार दिला जातो.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश, शैक्षणिक साहित्य, खेळाचे साहित्य व इतर साहित्य जुलै-ऑगस्ट मध्ये उपलब्ध करून दिले जाते. आश्रमशाळेत शैक्षणिक उपक्रमांबरोबरच वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, अभिनय शिक्षण, हस्ताक्षर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, खेळाच्या स्पर्धा इ. उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

आश्रमशाळेतील शिक्षणामुळे आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती झालेली आहे. त्यांना अधिक चांगले मार्गदर्शन उपलब्ध करून दिल्यास ते सध्याच्या जागतिक स्पर्धेत टिकाव धरू शकतील.

६.४.३ मुख्याध्यापक, शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सोमलवाडी, ता. जुन्नर, जिल्हा- पुणे

सोमलवाडी शासकीय माध्यमिक आश्रमशाळेच्या कार्यक्षेत्रात बारा गावे येतात. या गावांची एकूण लोकसंख्या तसेच पाच वर्षांखालील व पाच वर्षांवरील मुले व मुली यांची संख्या शाळेकडे उपलब्ध नव्हती. आश्रमशाळेत शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त होती. शाळेत पहिली ते दहावी या वर्गात २८७ मुले व १८७ मुली असे एकूण ४६५ विद्यार्थी शिक्षण घेत होते. या विद्यार्थ्यांमध्ये ४३२ विद्यार्थी **'महादेव कोळी'** या जमातीचे तर ३३ विद्यार्थी 'ठाकर' या जमातीचे होते. शाळेत गळतीचे प्रमाण अत्यंत कमी होते. वारंवार नापास झाल्याने काही मुलांनी शाळा सोडली होती.

सोमलवाडी येथील आश्रमशाळेत मुलांना पिण्याचे पाणी, आंघोळ व कपडे धुण्यासाठी पाणी, संडास, न्हाणीघर, पंखे, गाद्या, खेळाचे मैदान इत्यादी सुविधा उपलब्ध होत्या. मच्छरदाण्या, खेळाच्या साहित्याची खोली, आजारी मुलांसाठी स्वतंत्र व्यवस्था या

सुविधा उपलब्ध नव्हत्या. सर्वसाधारणपणे संसर्गजन्य रोग मुलांना होतात. प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यावर उपचार केले जातात. असाधारण विकार अद्यापपर्यंत आढळलेले नाहीत. विद्यार्थ्यांची वर्षातून चारवेळा सक्तीने वैद्यकीय तपासणी केली जाते. फिरत्या आरोग्य पथकांमार्फतही वैद्यकीय तपासणी केली जाते. मुख्याध्यापिकांच्या मते मुलांना आंघोळीसाठी गरम पाण्याची सोय असावी.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना रोज सकाळी उसळ नाश्ता म्हणून दिली जाते. दुपारच्या व संध्याकाळच्या जेवणात वरण, भात, भाजी व चपाती यांचा समावेश असतो. महिन्यातून दोनदा मांसाहारी व मिष्ठान्न जेवण दिले जाते.

आदिवासी विकास विभागाकडून जुलै किंवा ऑगस्ट महिन्यात गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले जाते. शाळेत शैक्षणिक अभ्यासक्रमांबरोबर वक्तृत्व स्पर्धा, वाद-विवाद स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, एकांकिका स्पर्धा, संगीत शिक्षण, अभिनय शिक्षण, नृत्यकला इत्यादी उपक्रम राबविले जातात.

आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा उत्तम असून, शिक्षणामुळे आदिवासी मुलांचा गुणात्मक विकास झालेला आहे. आश्रमशाळेतील शिक्षणामुळे आदिवासी मुले जागतिक स्पर्धेत कोठेही कमी पडणार नाहीत.

६.४.३.१ मुख्याध्यापक, शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा गोहे बु.।।, तालुका आंबेगाव, जिल्हा - पुणे.

आंबेगाव तालुक्यातील वरील आश्रमशाळेच्या कार्यक्षेत्रात दहा गावांचा समावेश आहे. कार्यक्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या दहा गावांची एकूण लोकसंख्या तसेच पाच वर्षांखालील व पाच वर्षांवरील मुले व मुलींची संख्या शाळेकडे उपलब्ध नव्हती. शाळेत फक्त माध्यमिक शिक्षकाचे एक पद रिक्त होते. आश्रमशाळेत इयत्ता पहिली ते बारावी या वर्गांत २७० मुले व २६३ मुली असे एकूण ५३३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. एकूण विद्यार्थ्यांपैकी ५२० विद्यार्थी **'महादेव कोळी'** या जमातीचे होते तर १३ विद्यार्थी 'ठाकर' या जमातीचे होते. विद्यार्थी परगावी शिक्षणासाठी गेल्यामुळे शैक्षणिक गळती दिसून येते परंतु प्रत्यक्षात गळती नाही.

आश्रमशाळेत मुलांना पिण्याचे पाणी, आंघोळ व कपडे धुण्यासाठी पाणी, संडास, न्हाणीघर, पंखे, गाद्या, खेळाचे मैदान इत्यादी सुविधा उपलब्ध होत्या. मच्छरदाण्या, खेळाच्या साहित्याची खोली व आजारी मुलांसाठी स्वतंत्र व्यवस्था या सुविधा नव्हत्या. मुख्याध्यापकांच्या मते शाळेस त्यांची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांना सर्वसाधारण आजार झाल्यास प्राथमिक आरोग्य केंद्रात नेऊन उपचार केले जातात. असाधारण विकार सहसा आढळत नाहीत. खरूज, सर्दी, जुलाब यासारख्या संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव अनेकदा होतो. शाळेतील विद्यार्थ्यांची वर्षातून चारवेळा वैद्यकीय तपासणी केली जाते.

आश्रमशाळेतील मुलांना रविवार ते शुक्रवार रोज सकाळी कडधान्यांची उसळ नाश्ता म्हणून दिली जाते. शनिवारी नाश्त्यासाठी पोहे दिले जातात. दररोजच्या दुपारच्या व संध्याकाळच्या जेवणात वरण, भात, भाजी व चपाती यांचा समावेश असतो. महिन्यातून दोनवेळा मांसाहारी व तीनवेळा मिष्ठान्न दिले जाते. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा आहार हा सकस असतो.

शासकीय आश्रमशाळेतील मुलांना आदिवासी विकास विभागाकडून जुलै किंवा ऑगस्ट महिन्यात गणवेश, वह्या, पुस्तके, खेळाचे साहित्य व इतर शैक्षणिक साहित्य इत्यादी उपलब्ध होते. शाळेत शैक्षणिक अभ्यासक्रमांबरोबरच विविध स्पर्धा, संगीत शिक्षण, अभिनय शिक्षण, नृत्यकला, रांगोळी स्पर्धा तसेच इतर उपक्रम राबविले जातात.

आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा उत्तम असून योग्य मार्गदर्शन लाभल्यास आदिवासी मुले जागतिक स्पर्धेत टिकाव धरू शकतील.

६.४.४ मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रमशाळा, मोखाडा, तालुका - मोखाडा, जिल्हा-ठाणे.

मोखाडा येथील आश्रमशाळेच्या कार्यक्षेत्रात दहा गावे येतात. या गावांची एकूण लोकसंख्या तसेच पाच वर्षांखालील व पाच वर्षांवरील मुले व मुली यांची संख्या शाळेकडे उपलब्ध नव्हती. शाळेत शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त होती. इयत्ता पहिली ते दहावी या वर्गांत २३५ मुले व १६० मुली असे एकूण ३९५ विद्यार्थी होते. आदिवासी जमाती निहाय विद्यार्थी संख्या मुख्याध्यापकांनी उपलब्ध करून दिली नाही. त्यांच्यामते शैक्षणिक गळती आढळून आली नाही.

मोखाडा येथील आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, आंघोळ व कपडे धुण्यासाठी पाणी, संडास, न्हाणीघर, पंखे, खेळाच्या साहित्याची खोली, खेळाचे मैदान, आजारी मुलांसाठी स्वतंत्र खोली इत्यादी सुविधा उपलब्ध होत्या. मच्छरदाण्या, गाद्या यांची उपलब्धता नव्हती. विद्यार्थ्यांच्या सर्वसाधारण आजारांवर मोखाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार केले जात होते. असाधारण आजार आढळले नाहीत. विद्यार्थ्यांची वर्षातून चारवेळा वैद्यकीय तपासणी केली जाते.

माध्यमिक आश्रमशाळा मोखाडा येथील विद्यार्थ्यांना कडधान्याची उसळ दररोज नाश्ता म्हणून दिली जाते. दुपारच्या व संध्याकाळच्या जेवणात वरण, भात, भाजी व चपाती यांचा समावेश असतो. महिन्यातून तीन वेळा मांसाहारी व मिष्ठान्न जेवन दिले जाते. विद्यार्थ्यांच्या रोजच्या जेवणात सकस आहार असतो.

शालेय साहित्य, गणवेश, खेळाचे साहित्य, निवासाचे साहित्य यांची उपलब्धता आदिवासी विकास विभागाकडून जुलै किंवा ऑगस्ट महिन्यात करून दिली जाते. शाळेत शैक्षणिक अभ्यासक्रमांबरोबर विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. विविध खेळ शिकविले जातात. तारपा नृत्य, ढोलनाच, वारली चित्रकला या आदिवासी कलांची विशेष जोपासना केली जाते. आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा उत्तम असून सध्याच्या जागतिक स्पर्धेत आदिवासी मुले नक्कीच टिकाव धरण्यास पात्र आहेत.

६.५ आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे अध्यक्ष/ संचालक यांच्या मुलाखतीच्या प्रतिसादाचे विश्लेषण.

भारतात १९०४ साली सहकारी चळवळीला सुरूवात झाली. भारताच्या आर्थिक विकासात सहकारी चळवळीने फार मोठा हातभार लावलेला आहे. देशात महाराष्ट्र राज्य सहकारी विकासात अग्रेसर आहे. सहकारी संस्थांचा महाराष्ट्राच्या विकासात सिंहाचा वाटा आहे. राज्य सरकारच्या सहकार्यामुळे सहकारी चळवळ ही आदिवासी क्षेत्रात आर्थिक विकासाचे एक महत्वाचे साधन ठरली आहे. निरनिराळ्या योजनांची यशस्वी अंमलबजावणी करून आदिवासी लोकसंख्येचे राहणीमान उंचावण्यासाठी सहकार क्षेत्र हे प्रभावी माध्यम सिध्द झालेले आहे. सध्या महाराष्ट्रात ९३८ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था कार्यरत असून त्या आदिवासींच्या विकासात महत्वाची भूमिका बजावत

आहेत. या संस्थांमार्फत आदिवासींच्या विकासासाठी विविध योजनांची कार्यवाही व अंमलबजावणी केली जाते.

संशोधनासाठी निवडलेल्या सह्याद्री विभागातील अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यांतील अकोले, इगतपूरी, जुन्नर, आंबेगाव व मोखाडा या पाच तालुक्यांतील प्रत्येकी एक या प्रमाणे पाच आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाचे अध्यक्ष/ संचालकांकडून संस्थांच्या कार्याचा आढावा जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. अध्यक्ष/ संचालकांनी दिलेल्या प्रतिसादाचे वर्णन खालीलप्रमाणे.

६.५.१ अध्यक्ष, आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, राजूर, तालुका- अकोले, जिल्हा - अहमदनगर.

अ) अध्यक्ष/संचालकांची सर्वसाधारण माहिती

राजूर येथील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांचे पद सन २००४ पासून धारण केलेले होते. त्यांच्या मालकीची १ एकर बागायत व ३ एकर २० गुंठे कोरडवाहू अशी एकूण ४ एकर २० गुंठे जमीन होती. त्यांच्याकडे बैल, म्हशी, शेळ्या, कोंबड्या इत्यादी पाळीव प्राणी होते. पाळीव प्राण्यांपासून व शेतीपासून त्यांना ३६,००० रु. वार्षिक उत्पन्न मिळत होते.

ब) आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था सर्वसाधारण माहिती

आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची नोंदणी १९९० मध्ये झालेली होती. मार्च २००५ अखेर ७३९ सभासद होते. अधिकृत भांडवल, वसूल भांडवल, कर्जाची येणे रक्कम, ठेवी रक्कम, कर्ज मर्यादा, लाभांश दर इत्यादीची त्यांना माहिती नव्हती. संस्थेत दोन पूर्णवेळ कर्मचारी होते. संस्था कर्ज देण्या-व्यतिरिक्त शेतमाल व गौण वनौपजांची एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत खरेदी करीत होती. २७० सभासदांनी कर्ज घेतलेले होते. संस्थेला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कोणतीही अडचण न येता पुरेसे कर्ज मिळत होते. संस्थेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता नव्हती. सरकारने भांडवलाच्या स्वरूपात संस्थेला मदत दिलेली होती. अध्यक्षांच्या मते आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थामुळे आदिवासींची गैरसोय दूर होते.

क) व्यवस्थापना संबंधी माहिती

संस्थेचे एकूण १३ संचालक होते. त्यापैकी एक दारिद्र्यरेषेखालील व एक महिला संचालक होती. संस्थेच्या संचालकांची महिन्यातून एक सभा घेतली जात होती. संस्थेत कोणताही राजकीय हस्तक्षेप नव्हता. संस्थेचा दैनदिन खर्च संस्थेच्या नफ्यातून भागविला जात होता. संस्थेतर्फे सभासदांच्या पिकांचा विमा उतरविला जात होता. संचालकांना कोणतेही मानधन देण्यात येत नव्हते.

ड) कार्यालयीन काम व हिशोब तपासणी

संस्थेच्या कार्यालयीन कामासाठी दोन कर्मचारी होते. संस्थेचे हिशोब विविध नोंदी पुस्तकांत नियमित ठेवले जात होते. संस्थेच्या लेखापुस्तकांची नियमित तपासणी केली जात होती. तपासणीत आढळलेले दोष दूर करण्यासाठी उपाय योजना केली होती. संस्थेला हिशोब तपासणीचा 'ब' वर्ग मिळालेला होता.

इ) कर्जासंबंधी माहिती

कर्ज देताना तारण व शेतजमीन विचारात घेतली जाते. पीकनिहाय कर्जाचे दर माहिती नव्हते. पीक कर्ज देताना शेतजमिनीची कागदपत्रे विचारत घेतली जातात. पीक कर्जावरील व्याजदर ६ टक्के होता. किती शेतकरी कर्ज घेतात? किती घेत नाहीत? याची माहिती नव्हती. तसेच मागील तीन वर्षातील कर्जपुरवठ्याची आकडेवारीही माहिती नव्हती. कर्ज न घेणाऱ्या शेतकऱ्यांची जमीन, कर्ज मिळण्यायोग्य जमीन याचीही माहिती नव्हती. ज्या क्षेत्रावर कर्ज घेतले गेले नाही त्याची कारणेही सांगता आली नाहीत. कर्ज देताना संस्था पीक कर्ज, जनावरांसाठी कर्ज, शेती औजारांसाठी कर्ज यावर ५ टक्के भाग भांडवल कापून घेते. प्रत्येक कर्जाच्या वेळी ५ टक्के भाग भांडवल कापून घेतले जाते. भाग भांडवलाचा अंतिम मर्यादा १०,००० रू. आहे. अंतिम मर्यादेनंतर भाग भांडवल कापून घेतले जात नाही. खावटी कर्जावर भाग भांडवल कापून घेतले जात नाही. शेतकरी कर्ज घेताना स्वेच्छेने भाग भांडवल कापून देतात. त्यावर लाभांश दिला जात नाही.

शेतकरी घेतलेल्या कर्जाचा वापर इतर कारणांसाठी करीत नाहीत. अनेक शेतकरी कर्ज थकबाकीदार आहेत. थकबाकी वसूलीसाठी कायदेशीर उपाय योजले

जातात. मागील पाच वर्षात संस्थेच्या कामकाजात सभासदांनी घेतलेल्या सहभागाची माहिती देण्यात आली नाही. तसेच मागील पाच वर्षातील संस्थेच्या नफा-तोट्याची माहिती नव्हती. परंतु संस्था अवसायानात नव्हती. शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायांना कर्ज दिले जाते. संचालकांनाही कर्ज दिले जाते. त्याबदल्यात तारणही घेतले जाते. संचालकांकडे कोणतीही थकबाकी नव्हती. अध्यक्षांनी संस्थेबद्दल आपले सर्वसाधारण मत नोंदविले नाही.

अशा प्रकारे आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था अध्यक्षांना विविध प्रश्न विचारण्यात आले होते. परंतु त्यांना फारच थोड्या प्रश्नांची माहिती होती. थोडक्यात संस्थेच्या कारभाराबाबत अध्यक्षांना फारच थोडे ज्ञान होते.

६.५.२ संचालक, आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित वासाळी, तालुका - इगतपूरी, जिल्हा - नाशिक

अ) अध्यक्ष/संचालकांची सर्वसाधारण माहिती

आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे संचालक हे स्थानिक रहिवासी होते. त्यांच्या स्वतःच्या मालकीची चार एकर कोरडवाहू जमीन होती. त्यांच्याकडे तीन गायी, दोन म्हशी व दोन बैल होते. शेती व जनावरांपासून त्यांना मिळणारे वार्षिक उत्पन्न २५,००० रु. होते. ते सन २००३ पासून संस्थेचे संचालक होते.

ब) आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था सर्वसाधारण माहिती.

सन १९९३ मध्ये संस्थेची नोंदणी झालेली होती. मार्च २००५ अखेर ४७० सभासद होते. अधिकृत भांडवल ४ लाख रु. होते. वसूल भांडवल २ लाख २५,००० रु. होते. संस्था भागधारकांना लाभांश देत नव्हती. कर्ज मर्यादा रूपये २ लाख होती. सभासदांच्या ठेवींची संचालकांना माहिती नव्हती. कर्ज देण्याव्यतिरिक्त संस्थेची कार्येही माहिती नव्हती. संचालकांनी मंजूरी दिल्यानंतर शेतकऱ्यांचे कर्ज मंजूर केले जात होते.

ड) कार्यालयीन काम व हिशोब तपासणी

वासाळी येथील आदिवासी सहकारी संस्थेत दोन कर्मचारी होते. संस्थेच्या हिशोब नोंदी पुस्तकांत नियमित हिशोब ठेवले जातात. सरकारी नियमाप्रमाणे खर्चाचे नियंत्रण केले जाते. सहा महिन्यांतून तेरीज पत्रक तयार केले जाते. संस्थेची नियमितपणे हिशोब तपासणी केली जाते. तपासणीत दोष असल्यास ते दुरूस्त केले जातात. संस्थेचा तपासणी वर्ग 'ब' होता.

इ) कर्जासंबंधी माहिती.

शेतकऱ्यांना शेतजमिनीच्या तारणावर कर्ज दिले जाते. पीकनिहाय दर्जाचे दर माहित नव्हते. चार टक्के व्याजदराने पीक कर्ज दिले जाते व त्यासाठी सातबाराचा उतारा व जातीचा दाखला घेतला जातो. २३३ शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेले होते तर २७३ शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेले नव्हते. मागील तीन वर्षातील कर्ज पुरवठ्याबद्दलची माहिती नव्हती. कर्ज न घेणारे शेतकरी त्यांची एकूण शेतजमीन, कर्ज मिळण्यायोग्य शेतजमीन, कर्ज न घेण्याची कारणे याचीही माहिती संचालकांना नव्हती. संस्था पीक कर्ज, जनावरांसाठी कर्ज, शेती औजारांसाठी कर्ज, व खावटी कर्जावर भागभांडवल कापून घेत नाही. दिर्घकालीन प्रत्येक कर्जावर ५ टक्के भाग भांडवल कापून घेतले जाते. भाग भांडवलाची अंतिम मर्यादा २०,००० रू. आहे. कर्जदार स्वेच्छेने भागभांडवल देतात. त्यावर लाभांश दिला जात नाही. कर्जाच्या वापरावर संचालक मंडळाचे लक्ष असते. कर्जाचा वापर शेतकरी इतर कारणांसाठी करीत नाहीत. शेतकरी कर्ज थकबाकीदार असतात. थकबाकी वसूलीसाठी कायदेशीर उपाययोजना केल्या जातात.

संस्थेच्या कामकाजात सभासदांच्या सहभागाची माहिती नव्हती. संस्थेच्या मागील पाच वर्षातील नफा-तोटा पत्रकाची माहिती नव्हती. संस्था अवसायानात आहे किंवा नाही याची माहिती नव्हती. शेतकऱ्यांना शेती पूरक व्यवसायासाठी कर्ज दिले जात होते. संचालकांनाही आवश्यक ते तारण घेऊन कर्ज दिले जात होते. काही संचालकही कर्ज थकबाकीदार होते.

संचालक, आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था वासाळी यांच्या मते सरकारने शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कर्जाची मर्यादा वाढवावी. कर्मचाऱ्यांना पगार द्यावा, कार्यक्षम व्यवस्थापनासाठी अधिक कर्मचारी नेमावेत.

अशा प्रकारे उपरोक्त नमूद केलेल्या संचालकांना त्यांच्या संस्थेची बऱ्यापैकी माहिती होती. परंतु कार्यक्षम कारभार करण्यासाठी आवश्यक असणारी महत्वाची माहिती नव्हती.

६.५.३ आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, खामगाव, तालुका जुन्नर, जिल्हा-पुणे.

आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, खामगाव, तालुका-जुन्नर, जिल्हा-पुणे. या संस्थेच्या अध्यक्षांची भेट घेऊन त्यांची मुलाखत घेण्यासाठी त्यांना विनंती केली असता त्यांनी यातले मला काहीही सांगता येणार नाही असे उत्तर दिले. संस्थेच्या सचिवांची भेट घालून देऊन त्यांना संस्थेच्या कामकाजाविषयी माहिती देण्यास सांगितले. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था खामगाव या संस्थेच्या सचिवांनी दिलेल्या माहितीचे वर्णन खालीलप्रमाणे.

अ) अध्यक्ष/संचालकांची सर्वसाधारण माहिती.

खामगाव येथील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष साक्षर आहेत व त्यांना फक्त सही करता येते. त्यांच्या मालकीची दोन ते तीन एकर कोरडवाहू जमीन आहे. त्यांच्याकडे गायी, बैल व कोंबड्या आहेत. ते सन २००४ पासून संस्थेचे अध्यक्ष आहेत.

ब) आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था सर्वसाधारण माहिती.

संस्थेची नोंदणी १९९० मध्ये झालेली आहे. मार्च २००५ अखेर संस्थेचे ५७४ सभासद आहेत. अधिकृत भांडवल ५ लाख रु. असून मार्च २००५ अखेर वसूल भांडवल २.५ लाख रु. आहे. कर्ज थकबाकीची रक्कम पाच ते सात लाख रु. आहे. संस्था लाभांश देत नाही. संस्थेची कर्ज मर्यादा २.५ लाख रु. आहे. संस्थेत ३ पूर्णवेळ कर्मचारी आहेत. संस्थेतर्फे कर्ज तसेच खावटी कर्ज दिले जाते.

संचालकांनी मंजुरी दिल्यानंतर कर्ज मंजूर केले जाते. ७४ सभासदांनी कर्ज घेतलेले आहे.

क) व्यवस्थापना संबंधी माहिती.

खामगाव येथील आदिवासी सहकारी संस्थेत ११ संचालक आहेत. दोन महिला संचालक व एक दारिद्र्यरेषेखालील संचालक आहे. संचालकांची महिन्यातून एक सभा होते. संस्थेवर कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रभाव नाही. संस्थेचा कार्यालयीन खर्च संस्थेच्या मिळकतीतून भागविला जातो. सभासदांच्या पिकांचा विमा उतरविला जात नाही. संचालकांना मानधनही दिले जात नाही.

ड) कार्यालयीन काम व हिशोब तपासणी.

आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था खामगाव या संस्थेत ३ पूर्णवेळ कर्मचारी आहेत. विविध नोंदी पुस्तकांमध्ये संस्थेचे हिशोब नियमित ठेवले जातात. खर्च व्यवहारांवर नियंत्रण ठेवले जाते. सहा महिन्यातून तेरीज पत्रक तयार केले जाते. संस्थेच्या व्यवहारांची नियमित हिशोब तपासणी केली जाते. संस्थेचा हिशोब तपासणी वर्ग 'ब' आहे.

इ) कर्जासंबंधी माहिती.

आदिवासी शेतकऱ्यांना शेतजमिनीच्या तारणावर कर्ज दिले जाते. कमीत-कमी २० गुंठे जमीन असावी लागते. पीक निहाय कर्जाचे दर माहित नाहीत. सातबारा उताऱ्याच्या आधारावर पीक कर्ज दिले जाते. पीक कर्जावरील व्याजदर ६ टक्के आहे. व्याज सवलत योजनेखाली आदिवासी कर्जदारांना अनुदान मिळते. एकूण ५७४ सभासदांपैकी फक्त ७४ सभासदांनी कर्ज घेतलेले आहे. मागील ३ वर्षातील कर्ज-पुरवठ्याबद्दल आकडेवारी सध्या उपलब्ध नाही असे उपरोक्त संस्थेच्या सचिवांनी सांगितले. कर्ज न घेणारे शेतकरी, त्यांची जमीन, कर्ज मिळण्यायोग्य जमीन, त्यांची कर्ज न घेण्याची कारणे इत्यादींची माहिती दिली नाही. संस्था प्रत्येक कर्ज देताना ५ टक्के भागभांडवल कापून घेते. भांगभांडवलाची अंतिम मर्यादा ३०,००० रू. आहे. खावटी कर्जावर भागभांडवल घेतले जात नाही. कर्जदार स्वेच्छेने भागभांडवल देतात व त्यावर लाभांशही दिला जातो. कर्जदार

कर्जाचा वापर इतर कारणांसाठी करीत नाहीत. अनेक शेतकरी कर्ज थकबाकीदार आहेत. कर्जथकबाकी वसुलीसाठी कायदेशीर उपाययोजना केल्या जातात.

वार्षिक सर्व साधारण सभांमधील सभासदांच्या सहभागाची मागील पाच वर्षांची आकडेवारी उपलब्ध नाही. मागील दोन वर्षांपासून संस्था तोट्यात आहे परंतु अवसायानात नाही. शेतीपूरक व्यवसायांना कर्ज दिले जाते. संचालकांनाही योग्य ते तारण घेऊन कर्ज दिले जाते. काही संचालक कर्ज थकबाकीदार आहेत. सरकारने/जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्ज मर्यादा वाढवून देण्याची आवश्यकता आहे. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांकडून जी कर्जे दिली जातात, त्या कर्जांचा आदिवासींच्या विकासासाठी नक्कीच उपयोग होतो. फक्त त्या कर्जांचा वापर योग्य पध्दतीने झाला पाहिजे. विशेषता खावटी कर्जे आदिवासींना अधिक उपयुक्त ठरतात.

थोडक्यात खामगाव येथील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे सचिव पदवीधर असल्याने व ते संस्थेचे सर्व कामकाज सांभाळत असल्याने त्यांनी अधिक सखोल माहिती उपलब्ध करून दिली.

६.५.४.१ अध्यक्ष, आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, शिनोली, तालुका आंबेगाव, जिल्हा - पुणे.

अ) अध्यक्ष/संचालकांची सर्वसाधारण माहिती.

शिनोली येथील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची अध्यक्ष स्त्री होती. त्यांच्या पतीच्या नावावर दोन एकर कोरडवाहू जमीन होती. त्यांच्याकडे पाच शेळ्या व सात कोंबड्या होत्या. त्यांना सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न २१,००० रु. होते. सन २००४ पासून त्यांनी संस्थेचे अध्यक्षपद धारण केलेले होते.

ब) आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था सर्वसाधारण माहिती.

संस्थेच्या अध्यक्षांनी दिलेल्या माहितीप्रमाणे संस्थेची नोंदणी सन १९९८ मध्ये झालेली होती. मार्च २००५ अखेर ४६१ सभासद होते. संस्थेचे अधिकृत भांडवल १० लाख रुपये होते. वसूल भांडवल, सर्वसाधारण निधी, कर्जाची येणे

रक्कम, लाभांश/लाभांशाचा दर, कर्ज देण्याव्यतिरिक्तची इतर कामे इत्यादींची माहिती अध्यक्षांना नव्हती. १९७ सभासदांनी कर्ज घेतलेले होते. संचालक मंडळाच्या मंजुरीनंतर सभासदांना कर्ज दिले जाते.

क) व्यवस्थापना संबंधी माहिती.

शिनोली येथील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेत एकूण १२ संचालक होते. प्रत्येक महिन्याला संचालकांची सभा होते. संस्थेत कोणताही राजकीय हस्तक्षेप नाही. संस्थेच्या मिळकतीतून कार्यालयीन खर्च भागविला जातो. संचालकांना मानधन दिले जात नाही.

ड) कार्यालयीन काम व हिशोब तपासणी.

आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था शिनोली येथे एक पूर्णवेळ कर्मचारी होता. संस्थेचे हिशोब नियमित ठेवले जातत. तरतुदीप्रमाणे खर्च केला जातो. संस्थेच्या लेखापुस्तकांची व संस्थेची नियमित हिशोब तपासणी केली जाते. तपासणीतील दोष दुरूस्त केले जातात. संस्थेला हिशेब तपासणी वर्ग 'ब' मिळालेला होता.

इ) कर्जासंबंधी माहिती.

शेतकऱ्यांना शेतजमिनीच्या तारणावर कर्ज दिले जाते. पीकनिहाय कर्जावरील दर माहित नव्हते. सातबारा उताऱ्याच्या आधारावर पीक कर्ज दिले जाते. पीक कर्जावरील व्याजदर ६ टक्के होता. १९७ सभासदांनी कर्ज घेतलेले होते. मागील ३ वर्षांची कर्जपुरवठ्याबद्दलची माहिती नव्हती. कर्ज न घेणारे शेतकरी, त्यांची एकूण जमीन, कर्ज मिळण्यायोग्य जमीन, त्यांनी कर्ज न घेण्याची कारणे इत्यादींचीही माहिती संस्थेच्या अध्यक्षांना नव्हती. पीक कर्जावर ५ टक्के भागभांडवल कापून घेतले जाते. दिर्घकालीन कर्जावर १० टक्के भागभांडवल कापून घेतले जाते. खावटी कर्जावर भागभांडवल कापून घेतले जात नाही. कर्जदार स्वेच्छेने भागभांडवल देतात व त्यावर लाभांश दिला जातो. कर्जाच्या वापरावर संस्थेची देखभाल असते. कर्जदार शक्यतो कर्जाचा गैरवापर करीत

नाहीत. अनेक कर्जदार थकबाकीदार आहेत. कर्ज थकबाकी जवळ-जवळ ३ लाख रू. आहे. थकबाकी वसुलीसाठी योग्य ते कायदेशीर उपाय केले जातात.

संस्थेच्या कामकाजातील सभासदांच्या सहभागाची मागील पाच वर्षांची संस्थेच्या अध्यक्षांना माहिती नव्हती. तसेच मागील पाच वर्षांचा संस्थेचा नफा तोटाही माहिती नव्हता.

संस्थेकडून शेती पूरक व्यवसायांना कर्ज दिले जाते. संचालकांनाही तारणावर कर्ज दिले जाते. एकही संचालक कर्ज थकबाकीदार नाही. अध्यक्षांच्या मते संस्था चांगली चालण्यासाठी सरकारने कर्ज मर्यादा वाढवून दिली पाहिजे. जास्तीत जास्त लोकांना सभासद करून घेतले पाहिजे. संस्थेला शेती कर्जव्यातिरिक्त इतरही व्यवसायांना कर्ज देता आले पाहिजे.

अशा प्रकारे शिनोली येथील संस्थेच्या अध्यक्षांना संस्थेच्या कामकाजाबद्दल फारच कमी माहिती होती. सर्व कामकाज सचिव पाहत होते. अध्यक्षांचे काम फक्त सही करण्यापुरते मर्यादित होते.

६.५.५ अध्यक्ष, आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मोखाडा, तालुका - मोखाडा, जिल्हा - ठाणे.

अ) अध्यक्ष/संचालकांची सर्वसाधारण माहिती.

मोखाडा येथील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था अध्यक्षांच्या मालकीची पाच एकर कोरडवाहू जमीन होती. त्यांच्याकडे चार म्हशी व दोन बैल होते. त्यांना सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न ३५,०००रु. होते. ते सन २००५ पासून संस्थेचे अध्यक्ष होते.

ब) आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था सर्वसाधारण माहिती.

मोखाडा आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची सन १९९९ मध्ये नोंदणी झालेली होती. संस्थेचे ३२१ सभासद होते. अधिकृत भांडवल १,५०,००० रु. होते व वसूल भांडवल ५०,००० रु. होते. मार्च २००५ अखेर ६०,००० रु. सभासदांकडून कर्जाची येणे बाकी होती. संस्थेची कर्ज मर्यादा १

लाख रु. होती. संस्था भागभांडवलावर लाभांश देते. संस्थेकडून कर्जदेण्याव्यतिरिक्त आदिवासी शेतकऱ्यांकडून शेतमालाचीही खरेदी केली जाते. संचालक मंडळाने मंजुरी दिल्या नंतर शेतकऱ्यांचं कर्ज मंजूर केले जाते. ११३ सभासदांनी कर्ज घेतलेले होते.

क) व्यवस्थापना संबंधी माहिती.

आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मोखाडा येथे १२ संचालक होते. त्यापैकी चार महिला संचालक होत्या. संचालकांची महिन्यातून एकदा सभा होते. संस्थेत कोणताही राजकीय हस्तक्षेप नव्हता. संस्थेच्या मिळकतीतून कार्यालयीन खर्च भागविला जातो. सभासदांच्या पिकांचा विमा उतरविलेला होता. संचालकांना मानधन दिले जात नव्हते.

ड) कार्यालयीन काम व हिशोब तपासणी

मोखाडा आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेत एक पूर्णवेळ कर्मचारी होता. संस्थेचे विविध लेखापुस्तकांत नियमित हिशोब ठेवले जात होते. लेखापुस्तकांची व संस्थेच्या व्यवहारांची नियमित हिशोब तपासणी केली जाते. तपासणीत दोष आढळल्यास ते दूर केले जातात. संस्थेचे व्यवहार नियंत्रित आहेत. संस्थेला हिशोब तपासणीचा 'ब' वर्ग मिळालेला आहे.

इ) कर्जासंबंधी माहिती

आदिवासी शेतकऱ्यांना कर्ज देताना शेत जमीन किती आहे ते पाहिले जाते. पीकनिहाय कर्ज दरांची माहिती अध्यक्षांना नव्हती. व्याज सवलत योजनेखाली मिळणाऱ्या अनुदानाची माहिती सचिवांना होती परंतु अध्यक्षांना नव्हती. २०८ सभासद शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेले नव्हते. मागील ३ वर्षांची कर्जपुरवठ्याबद्दलची माहिती अध्यक्षांना नव्हती. कर्ज न घेणारे शेतकरी, त्यांची कर्ज मिळण्यायोग्य जमीन, कर्ज न घेण्याची कारणे इत्यादी माहिती संस्थेच्या अध्यक्षांना नव्हती.

पीक कर्जावर ५ टक्के व दीर्घ मुदत कर्जावर १० टक्के भागभांडवल कापून घेतले जाते. खावटी कर्जावर भागभांडवल घेतले जात नाही. कर्जदार

स्वेच्छेने भागभांडवल देतात व त्यावर लाभांशही दिला जातो. कर्जाच्या वापरावर देखरेख ठेवली जाते. शेतकरी कर्जाचा गैरवापर करीत नाहीत. अनेक शेतकरी कर्ज थकबाकीदार आहेत. थकबाकी वसुलीसाठी कायदेशीर उपाय-योजना केल्या जातात.

मागील पाच वर्षांच्या सर्वसाधारण सभांमधील सभासदांचा सहभाग यांची माहिती संस्थेच्या अध्यक्षांना नव्हती. मागील पाच वर्षांच्या नफा-तोटा पत्रकांचीही माहिती त्यांना नव्हती. परंतु २००५-०६ साली संस्थेला ९०,००० रु. नफा झालेला होता. संस्था शेतीपूरक व्यवसायांनाही कर्ज देते. संचालकांनाही तारण घेवून कर्ज दिले जाते. संचालकांकडे कोणतीही थकबाकी नव्हती.

मोखाडा आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्षांच्या मते कर्मचारी बळ वाढविणे आवश्यक आहे. सरकारने संस्थेला वाढीव आर्थिक मदत केली पाहिजे. तसेच कर्ज मर्यादाही वाढवून दिली पाहिजे.

सह्याद्री विभागातील अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यातील पाच आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे अध्यक्ष/संचालक यांच्याकडून मुलाखतीद्वारे माहिती मिळविली असता असे आढळले की, सर्व संस्थांचे अध्यक्ष/संचालक हे **महादेव कोळी** या आदिवासी जमातीचे होते. त्यापैकी एक स्त्री होती. जे अध्यक्ष/संचालक कमी शिकलेले होते, त्यांना संस्थेच्या कामकाजाची अत्यंत कमी माहिती होती. त्या संस्थांचे सचिवच सर्व कामकाज पाहत होते. ज्या संस्थांचे अध्यक्ष अधिक शिकलेले होते, त्या संस्थांच्या कारभाराची त्यांना चांगल्या प्रकारे माहिती होती. त्यांच्या त्या माहितीचा उपयोग आदिवासी सभासदांना स्वतःची उन्नती करून घेण्यासाठी होत होता.

***

संदर्भ (**References**)

१) घाटोळे रा. ना., समाजशास्त्रीय संशोधन व तत्व, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर २००८-२००९ पृ. २१३, २१६

२) डॉ. संत दु. का., संशोधन : पध्दती, प्रक्रिया व अंतरंग, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, जानेवारी, २००७ पृ. २१०

प्रकरण सातवे

निरीक्षणे, निष्कर्ष व सूचना तथा शिफारशी

७.१	प्रस्तावना	२९०
७.२	आदिवासी कुटुंब प्रमुखांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक अभ्यासाबाबतची निरीक्षणे व निष्कर्ष	२९०
७.३	प्रकल्प अधिकायांच्या मुलाखतीवरून काढलेले निष्कर्ष	३०६
७.४	आश्रमशाळा मुख्याध्यापकांच्या मुलाखतीवरून काढलेले निष्कर्ष	३०९
७.५	आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या पदाधिकायांच्या मुलाखतीवरून काढलेले निष्कर्ष	३११
७.६	संशोधनावरून काढलेल्या निष्कर्षांची गृहीतकांशी पडताळणी	३१३
७.७	सूचना व शिफारशी	३१६
	संदर्भ (References)	३३०

प्रकरण सातवे

निरीक्षणे, निष्कर्ष व सूचना तथा शिफारशी

७.१ प्रस्तावना

वैज्ञानिक पध्दतीने तथ्यसंकलन करणे, त्यातील वस्तूनिष्ठता तपासणे हा सामाजिक संशोधनाचा महत्वाचा उद्देश असतो. गोळा केलेल्या तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करून निष्कर्ष काढावे लागतात. निष्कर्षांमुळे जुन्या ज्ञानात नवीन ज्ञानाची भर पडते. संशोधन विषयासंबंधीची वास्तविक स्थिती समजते. सामाजिक संशोधनाद्वारे काढलेले निष्कर्ष हे सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक व प्रशासकीय धोरण ठरविण्यास उपयुक्त ठरतात. संशोधक, अभ्यासक यांनी काढलेल्या निष्कर्षांचा नवीन संशोधनासाठी उपयोग होतो. तसेच निष्कर्षांचे पुनर्रपरीक्षण करता येते. संशोधना आधारे काढलेले निष्कर्ष हे जनहितासाठी अत्यंत उपयोगी ठरतात.

सह्याद्री विभागातील आदिवासींच्या गुणात्मक जीवनमानावर आदिवासी विकास विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या आदिवासी विकास योजनांचा काय परिणाम झालेला आहे, याचे परीक्षण करण्यासाठी अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यांतील अनुक्रमे अकोले, इगतपूरी, जुन्नर, आंबेगांव व मोखाडा या पाच तालुक्यांतील ३० गावांमधून **महादेव कोळी** या आदिवासी जमातीतील ३०० व्यक्तींची निवड करण्यात आलेली होती. ३०० व्यक्तींकडून सविस्तरपणे प्रश्नावल्या भरून घेण्यात आलेल्या आहेत. तसेच आदिवासी विकास योजना राबविणारे प्रकल्प अधिकारी, शासकीय आदिवासी आश्रमशाळांचे मुख्याध्यापक व आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी पतसंस्थांचे पदाधिकारी यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे काही महत्वपूर्ण निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

७.२ आदिवासी कुटुंबप्रमुखांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक अभ्यासाबाबतची निरीक्षणे व निष्कर्ष

सह्याद्री विभागातील अकोले, इगतपूरी, जुन्नर, आंबेगांव व मोखाडा या तालुक्यात आदिवासी **महादेव कोळी** या जमातीची वस्ती मोठ्या प्रमाणात आहे. वरील पाच तालुक्यांतील तीस आदिवासी बहुल गावांतून तिनशे कुटुंब प्रमुखांना प्रत्यक्ष भेटून माहिती गोळा केली आहे. त्या माहितीच्या आधारे काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) **पुरुषांचे प्राबल्य**

आदिवासी **महादेव कोळी** या जमातीत कुटुंबप्रमुख म्हणून पुरुषांचे प्राबल्य आढळून आले. एकूण ३०० कुटुंबांपैकी २९८ कुटुंबप्रमुख हे पुरुष हाते तर फक्त २ स्त्रिया कुटुंबप्रमुख होत्या. भारतीय समाज व्यवस्थेतील पुरुषसत्ताक पध्दती आदिवासी **महादेव कोळी** या जमातीतही आढळून आली. कुटुंबात स्त्रियांचे स्थान हे दुय्यम होते. कुटुंबप्रमुखांमध्ये २० ते ६० या वयोगटातील व्यक्तींची संख्या अधिक होती. म्हणजेच कर्त्या लोकांचे कुटुंबांवर प्रभुत्व होते.

२) **अशिक्षितपणा**

शैक्षणिकदृष्ट्या विचार करता आदिवासींमध्ये निरक्षरता मोठ्या प्रमाणात आहे. ३०० कुटुंबप्रमुखांपैकी १६० कुटुंब प्रमुख हे निरक्षर होते. त्याचे प्रमाण ५३.३ टक्के होते. २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण ७६.९ टक्के आहे. त्यामध्ये पुरुष साक्षरता ८६.६ टक्के, तर स्त्री साक्षरता ६७ टक्के आहे. महाराष्ट्रातील साक्षरतेची सह्याद्री विभागातील आदिवासींशी तुलना करता त्यांच्यात मोठ्या प्रमाणात अशिक्षितपणा आढळून येतो.

३) **विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण अधिक**

सह्याद्री विभागातील आदिवासी **महादेव कोळी** या जमातीत शाळेत प्रवेश घेणाऱ्या मुलांचे प्रमाण अधिक आढळले. परंतु शाळेतून गळती होण्याचे प्रमाणही सर्वाधिक आहे. मुलांपेक्षा मुलींची गळती होण्याचे प्रमाण अधिक आढळले. सर्वाधिक गळती ही इयत्ता १० वी नंतर होते. बहुतेक मुले १० वी च्या वर्गात नापास होतात. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव हे त्यामागचे प्रमुख कारण आहे. शाळेत प्रवेश घेणाऱ्या एकूण मुला-मुलीं पैकी ८१.६ टक्के मुले-मुली पदवी पूर्वीच शैक्षणिक प्रवाहातून बाहेर पडलेली असतात. उर्वरित मुले-मुली कसेबसे पदवीपर्यंतचे शिक्षण घेतात. पदव्युत्तर शिक्षण घेण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. तसेच तांत्रिक, व्यावसायिक व उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. व्यवस्थापकीय व पी.एच्.डी. पर्यंतचे शिक्षण घेणारा एकही विद्यार्थी आढळला नाही. थोडक्यात आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गळतीचे प्रमाण अधिक आहे.

४) विवाहाचा सार्वत्रिकपणा

प्रत्यक्ष भेट दिलेल्या सर्व कुटुंबप्रमुखांचे विवाह झालेले होते. एकही कुटुंबप्रमुख अविवाहित आढळला नाही. त्यावरून असे आढळून आले की अविवाहित व्यक्तीला कुटुंबप्रमुख होता येत नाही किंवा भेट दिलेल्या कुटुंबप्रमुखांपैकी एकही व्यक्ती अविवाहित नव्हती. आदिवासी जमातींमध्ये आजही बालविवाह सर्रास केले जात असल्याने २० ते ६० या वयोगटातील सर्व कुटुंबप्रमुख विवाहित आढळून आले.

५) कुटुंबाचा मोठा आकार

अदिवासी **महादेव कोळी** जमातींमध्ये कुटुंबातील व्यक्तींची संख्या अधिक आढळून आली. प्रत्येक कुटुंबामध्ये सरासरी पाचपेक्षा अधिक व्यक्ती आढळून आल्या. कमाविणारे हात कमी व खाणारी तोंडे जास्त यामुळे त्यांच्यात दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे. मुले ही देवाची देणगी असतात असा त्यांच्यात समज आहे. तसेच अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, निरक्षरता या कारणांमुळे आदिवासींमध्ये अधिक मुले आढळून येतात. तुटपुंजी शेती, बेरोजगारी त्यामुळे कमी उत्पन्न परंतु खाणाऱ्यांची संख्या अधिक त्यामुळे आदिवासींना कुपोषण, उपासमार यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते.

६) पराकोटीचे दारिद्र्य

जीवनाच्या किमान गरजा प्राप्त करण्याची असमर्थता अशी दारिद्र्याची व्याख्या केली जाते. या व्याख्येनुसार सह्याद्री विभागातील बहुतेक आदिवासी दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकलेले आढळले. उत्पन्न गटानुसार विचार करता जवळ-जवळ ९० टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली आढळून आले. महाराष्ट्र शासनाच्या उत्पन्न अटीनुसार ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न १५००० रु. पेक्षा कमी आहे, त्यांचा समावेश दारिद्र्य रेषेखाली करण्यात यावा. या अटीनुसार विचार करता **महादेव कोळी** या आदिवासी जमातीतील बहुतेक कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होती. ठाणे जिल्ह्यात दारिद्र्याचे प्रमाण सर्वाधिक आढळून आले. महाराष्ट्र राज्य आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने केलेल्या १९९६-९७ च्या बेंचमार्क सर्वेक्षणानुसार आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ९१.११ टक्के आदिवासी कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होती. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या निष्कर्षांशी व गृहीतकाशी वरील निष्कर्ष मिळते-जुळते आहेत.

७) कौटुंबिक सरासरी खर्चाचे प्रमाण कमी

कोणत्याही व्यक्तीला किमान जीवन जगण्यासाठी जो किमान सरासरी खर्च करावा लागतो त्यापेक्षा आदिवासी व्यक्तींचा सरासरी खर्च अत्यंत कमी आहे. वार्षिक सरासरी कौटुंबिक उत्पन्नाशी वार्षिक सरासरी कौटुंबिक खर्चाची तुलना करता असे आढळते की आदिवासींचा खर्च हा उत्पन्नापेक्षा अधिक आहे. म्हणजेच त्यांचे कौटुंबिक अंदाजपत्रक तुटीचे आढळून आले. उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असल्याने कर्जबाजारीपणा अधिक आढळून आला. आदिवासींचा सर्वाधिक खर्च अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत गरजांवरच अधिक होत होता. त्यानंतर सण, उत्सव, रुढी व परंपरा यांवर अधिक खर्च केला जात होता. शिक्षण व आरोग्य या आवश्यक बाबींवर अत्यंत कमी खर्च केला जात होता.

नियोजन आयोगाने नेमलेल्या नॅशनल कमिशन फॉर इंटरप्रायझेस इन अनऑर्गनाइझड् सेक्टरचे अध्यक्ष डॉ. अर्जुन सेनगुप्ता यांच्या मते देशातील ८३.६ कोटी जनतेचे दर दिवशीचे उत्पन्न फक्त २० रु. म्हणजे दरमहा ६०० रु. आहे. देशातील ही ७७ टक्के जनता गरिबीची शिकार बनली आहे. त्यातील ८५ टक्के लोक मागासवर्गीय, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीमधील आहेत. त्यांच्या मते भारतातील ८५ टक्के जनतेला पुरेसे अन्न मिळत नाही व ते दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत.

दारिद्र्यरेषा ठरवितांना नियोजन मंडळाने प्रति व्यक्ती खर्च हे प्रमाण मानले आहे. त्यानुसार डॉ. आरकंड यांच्या मते व्यक्तीच्या दैनंदिन आवश्यक गरजांचा विचार करता प्रतिमाणशी, प्रतिदिनी ७५ रु. चे उत्पन्न मिळाले तरच ती व्यक्ती दारिद्र्यरेषेच्या वर येईल. चार व्यक्तींच्या कुटुंबातील तीन कमावत्या व्यक्तीचे दर दिवशीचे उत्पन्न २२५ रु. गृहीत धरल्यास मासिक उत्पन्न ६७५० रु. ही दारिद्र्यरेषा निश्चित होईल.

डॉ. अर्जुन सेनगुप्ता व डॉ. आरकंड यांचे दारिद्र्याचे उत्पन्न व खर्चाच्या बाबतीतील निष्कर्ष वरील चारही जिल्ह्यातील ३०० कुटुंबांना लागू केल्यास **महादेव कोळी** या आदिवासी जमातीतील सर्व कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली समाविष्ट होतील. संयुक्त राष्ट्र संघाच्या मते, "दारिद्र्य हा मानवतेला मिळालेला शाप आहे."

८) व्यसनाधिनतेचे प्रमाण अधिक

"व्यसनाधिनता हा आदिवासी समाजाला मिळालेला शाप आहे." आदिवासी **महादेव कोळी** ही जमातही त्याला अपवाद नाही. दारू पिण्याचे व तंबाखू खाण्याचे व्यसन आदिवासींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळून आले. स्त्रिया व पुरुष दोघेही सर्रासपणे तंबाखू खाताना आढळले. दारू पिण्याचे व्यसन फक्त पुरुषांमध्ये आढळून आले. आदिवासी **महादेव कोळी** जमातीतील स्त्रिया दारू पीत नाहीत असे आढळले. बिड्या ओढण्याचे व गुटखा खाण्याचे प्रमाण कमी आढळून आले. एकूण वार्षिक सरासरी खर्चाच्या १० टक्के खर्च हा व्यसनावर होताना आढळून आला. थोडक्यात व्यसनाधिनतेमुळे आदिवासींच्या दारिद्र्यात भरच पडली आहे.

९) जमीन धारणेचे प्रमाण कमी

जमीन ही आदिवासींच्या जीवन जगण्याचा प्रमुख आधार आहे. आदिवासी **महादेव कोळी** जमातीमध्ये ९९ टक्के लोकांकडे स्वतःच्या मालकीची जमीन असल्याचे आढळून आले. परंतु त्यांच्या जमीन धारणेचे प्रमाण अत्यंत कमी होते. बहुसंख्य शेतकरी हे सीमांत शेतकरी होते. उपलब्ध असलेल्या जमिनीमध्ये कोरडवाहू जमिनीचे प्रमाण अधिक होते. अल्प जमीन धारणेमुळे वर्षभर पुरेल इतक्याही धान्याचे उत्पादन होत नव्हते.

१०) मागासलेली शेती

जुनाट व कालबाह्य तंत्रज्ञानाचा वापर, पारंपारिक बियाणांचा वापर, शेती मशागतीच्या तांत्रिक व आधुनिक माहितीचा अभाव, रासायनिक खतांचा अल्प वापर, औषधे व किटकनाशके यांचा कमी वापर, जलसिंचनाचा अभाव, पावसावरील अधिक अवलंबित्व या तांत्रिक कारणांमुळे तसेच अज्ञान, अंधश्रध्दा, निरक्षरता, रुढी, परंपरा, आधुनिकतेच्या जाणीवेचा अभाव, गरिबी या सामाजिक कारणांमुळे आदिवासींची शेती ही मागासलेली आहे. त्यामुळे आदिवासींच्या प्रगतीत मागासलेली शेती हा एक प्रमुख अडथळा आहे.

११) रोजगाराचा अभाव

रोजगाराच्या उपलब्धतेवर राहणीमान अवलंबून असते. आदिवासी **महादेव कोळी** जमातीत मोठ्या प्रमाणात बेकारी आढळून आली. लहान आकाराच्या धारण शेती

क्षेत्रात प्रमाणापेक्षा अधिक व्यक्ती काम करीत होत्या. त्यामुळे सुप्त बेकारीचे प्रमाण मोठे होते. दुसऱ्याच्या शेतावर शेतमजूर म्हणून काम मिळण्याचे प्रमाण कमी होते. तसेच मिळणारा मजूरीचा दरही अत्यंत कमी होता. शेती व्यतिरिक्त इतर ठिकाणी रोजगार उपलब्ध होण्याचे प्रमाण अल्प होते. जवळजवळ सर्वच शेतकऱ्यांना फक्त शेती हंगामातच स्वतःच्या शेतावर तसेच दुसऱ्याच्या शेतावर रोजगार उपलब्ध होता. त्यामुळे बहुतेक लोकांना शेती हंगामानंतर सक्तीने बेकार रहावे लागत होते. हिवाळ्याच्या व उन्हाळ्याच्या दिवसात सरकारतर्फे रोजगार हमीची कामे सुरू केली जातात. आदिवासी विभागात रोजगार हमी योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने तेथेही लोकांना रोजगार उपलब्ध होत नाही. नोकरी करणाऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

थोडक्यात रोजगाराच्या अभावामुळे निकृष्ट राहणीमानाच्या दुष्टचक्रात आदिवासी समाज अडकून पडलेला आहे.

१२) अर्थार्जनासाठी स्थलांतर करण्याचे प्रमाण अधिक

स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होण्याचे प्रमाण कमी असल्याने आदिवासींना उदरनिर्वाहासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतर करावे लागते. आदिवासी **महादेव कोळी** या जमातीतील बहुतेक लोकांच्या मालकीची जमीन असल्याने व त्यांचे गावात, पाड्यात, वाडीत, वस्तीवर, शेतात स्वतःच्या मालकीचे घर/झोपडी असल्याने कुटुंबांचे स्थलांतर होताना आढळले नाही. परंतु कुटुंबातील अनेक सदस्यांना मात्र रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत होते. ज्या आदिवासी जमातींमध्ये भूमिहीनांचे प्रमाण अधिक आहे त्या आदिवासी जमातींची कुटुंबेच्या-कुटुंबे रोजगारासाठी स्थलांतर करतात.

१३) शुध्द व पुरेशा पिण्याच्या पाण्याची अनुपलब्धता

सह्याद्रीच्या पर्वत रांगांमध्ये पावसाळ्यात भरपूर पाऊस पडतो. त्यामुळे आदिवासींना पावसाळ्यात पिण्यासाठी व वापरासाठी मुबलक पाणी उपलब्ध असते. पावसाळ्यात ओढे, नद्या, नाले, झरे, विहिरी पाण्याने तुडुंब भरलेल्या असतात. त्यांच्यातील स्वच्छ दिसणाऱ्या पाण्याचा वापर आदिवासी पिण्यासाठी करतात. स्वच्छ दिसणाऱ्या पाण्यालाच ते शुध्द समझतात. मात्र हे पाणी पिण्याच्या दृष्टीने शुद्ध नसते

आणि त्यामुळे आदिवासी लोकांना अतिसार, जुलाब, पोटाचे विकार अशा रोगांना मोठ्या प्रमाणावर बळी पडावे लागते.

पावसाळ्यानंतर वरील सर्व पाण्याचे स्त्रोत आटतात. सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेमार्फत नळाद्वारे पिण्यासाठी जो पाणीपुरवठा केला जातो त्यालाही पाणी उपलब्ध नसते. त्यामुळे आदिवासींना उन्हाळ्यात पिण्याचे पाणी आणण्यासाठी दररोज दोन ते चार किलोमीटर पायपीट करावी लागते. उपलब्ध असलेले पाणी शुध्द व पुरेसे नसते. अशुध्द पाणी प्यावे लागत असल्याने उन्हाळ्यात आदिवासींमध्ये अनेक साथींचे आजार फैलावतात.

१४) स्वच्छतेचे प्रमाण कमी

पावसाळ्याच्या दिवसांत मुबलक पाणी उपलब्ध असल्याने पुरुष, स्त्रिया व मुले यांचे आंघोळ करण्याचे प्रमाण अधिक असते. आंघोळीसाठी साबण, काथ्या, रिठा व दगड या साधनांचा वापर केला जातो. स्नान गृहांची उपलब्धता निम्म्यापेक्षा अधिक असली तरी बहुतेक स्नानगृहे ही फक्त आडोसा या स्वरूपात होती. त्यामुळे स्त्रियांचे आंघोळ करण्याचे प्रमाण कमी दिसून आले. उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचाच तुटवडा असल्याने पुरुष, स्त्रिया व मुले या सर्वांनाच सक्तीने आंघोळीविना रहावे लागते तसेच कपड्यांचीही स्वच्छता ठेवता येत नाही.

१५) शौचालयांची अनुपलब्धता

शौचालयांच्या अनुपलब्धतेमुळे उघड्यावरच विष्ठा केली जाते. त्यामुळे दुर्गंधी पसरते व अनेक साथीच्या रोगांचा फैलाव होतो. सार्वजनिक आरोग्य धोक्यात येऊन समाज स्वास्थ्य बिघडते. त्याचे दूरगामी परिणाम आदिवासींच्या जीवनावर होत असतात.

सह्याद्रीतील आदिवासी विभागाचा विचार करता प्रत्यक्ष भेट दिलेल्या एकूण ३०० कुटुंबांपैकी फक्त ४३ कुटुंबांकडे शौचालयांची उपलब्धता होती. म्हणजेच फक्त १४.३ टक्के लोकांकडे शौचालये आहेत. उर्वरित ८५.७ टक्के लोकांना उघड्यावरच शौचास जावे लागते. यावरून असा निष्कर्ष निघतो की उघड्यावर शौचास जावे लागत असल्याने आदिवासींना अनेक रोगांचा सामना करावा लागतो.

१५) वैद्यकीय उपचार घेण्याच्या प्रमाणात वाढ

दिर्घायुषी जीवन जगण्यासाठी आजारपणात योग्य ते वैद्यकीय उपचार घेण्याची आवश्यकता असते परंतु आदिवासी समाज अज्ञानी, अंधश्रध्दाळू, रुढीवादी, परंपराप्रिय असल्याने तो आधुनिक वैद्यकीय उपचार घेण्याऐवजी परंपरागत भगत, पुजारी, झाडपाल्याची औषधे देणारा वैद्य यांच्याकडूनच उपचार करून घेतो. अलिकडील काळापर्यंत हीच परिस्थिती होती. काही आदिवासी जमातींमध्ये परंपरागत पध्दतीने उपचार करून घेण्याची पध्दती आजही अस्तित्वात आहे.

ज्या आदिवासी जमाती शिक्षणाच्या माध्यमातून संक्रमणावस्थेत आहेत व ज्यांच्यावरील अज्ञान, अंधश्रध्देचा पगडा कमी झालेला आहे, अशा आदिवासी जमाती वैद्यकीय उपचार घेण्यात पुढाकार घेत आहेत. सह्याद्री विभागातील **महादेव कोळी** आदिवासी जमातीतीलही बहुतांश लोक वैद्यकीय उपचार घेत होते. तरीही ४.३ टक्के लोक भगत, पुजारी, वैद्य यांच्याकडून उपचार करवून घेणारे होते. त्यावरून असे म्हणता येते की **महादेव कोळी** जमातीत अजूनही अंधश्रध्देचे पूर्णपणे उच्चाटण झालेले नाही.

१६) घरीच प्रसूती होण्याचे प्रमाण अधिक

बालमृत्यू व बाळंतपणातील स्त्रियांचे मृत्यू प्रमाण कमी होण्यासाठी शास्त्रीय पध्दतीने स्त्रियांची प्रसूती होणे आवश्यक असते. अशास्त्रीय पध्दतीने प्रसूती केली जात असेल तर नवजात अर्भकाच्या तसेच मातेच्या मृत्यूचा धोका अधिक संभवतो. भारतात बालमृत्यू व माता मृत्यूचे प्रमाण अधिक आहे. ते कमी करण्यासाठी स्त्रियांची प्रसूती ही दवाखाण्यात डॉक्टरांच्या देखरेखीखाली होणे आवश्यक आहे.

आदिवासी **महादेव कोळी** जमातीच्या संशोधनावरून असे आढळले की ६४ टक्के स्त्रियांची प्रसूती ही घरीच होते. प्रसूतीसाठी अप्रशिक्षित सईण, नातेवाईक व इतरांची मदत घेतली जाते. थोडक्यात आदिवासी जमातींमध्ये घरीच प्रसूती होण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे आदिवासी जमातींमध्ये अर्भकमृत्यू, बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण अधिक आहे.

१७) लहान मुलांच्या लसीकरणाचे प्रमाण सर्वाधिक

अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यातील सर्व कुटुंबांतील ० ते ६ या वयोगटातील सर्व लहान मुलांचे लसीकरण झालेले होते. वैद्यकीय उपचारांचे पटलेले महत्व यातून अधोरेखीत होते. तसेच सरकारही लसीकरण मोहीम आदिवासी भागात प्रभावीपणे राबवित असल्याचे दिसून येते.

१८) सकस आहार घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी

उच्च प्रतीचे जीवनमान जगण्यासाठी दैनंदिन आहारात सकस आहाराचे प्रमाण अधिक असावे लागते. असे म्हटले जाते की सुदृढ शरीरात सुदृढ मन असते. सुदृढ शरीरासाठी सकस आहाराची गरज असते. तसेच आहार सवयींवर सरासरी आयुर्मानही अवलंबून असते. आदिवासी **महादेव कोळी** जमातीच्या आहार सवयींचे निरीक्षण केले असता असे आढळले की, त्यांच्यात चहा पिण्याचे प्रमाण (९९.७ टक्के) सर्वाधिक आहे. दूध पिण्याचे प्रमाण (१.३ टक्के) अत्यल्प आहे. नाश्ता करण्याचे प्रमाणही (६.३ टक्के) अत्यंत कमी आहे. दिवसातून दोन वेळा जेवण करण्याचे प्रमाण (८६.३ टक्के) सर्वाधिक आहे. दिवसातून तीन वेळा जेवण करण्याचे प्रमाण (१३.७ टक्के) कमी आहे. मांसाहार करण्याचे प्रमाणही अधिक आहे. परंतु पौष्टिक किंवा सकस आहार घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे फक्त २ टक्के आहे.

सकस आहारा अभावी आदिवासी पुरुष, स्त्रिया व मुले यांची शरीर प्रकृती ही कृश, मलूल चेहरा व पोट खपाटीला गेलेले अशा प्रकारची आढळते.

१९) स्वतःच्या मालकीची परंतु लहान आकाराची घरे

राहत्या घराचा प्रकार हा राहणीमानाचा निर्देशक मानला जातो. व्यक्तीचे राहण्याचे घर हे मोठे, स्वच्छ, सुंदर व आकर्षक असेल तर त्या व्यक्तीचे राहणीमान उच्च समजले जाते. आदिवासी **महादेव कोळी** जमातीतील बहुतेक कुटुंबांची स्वतःच्या मालकीची घरे होती. परंतु बहुतेक घरे ही कुड, गवत, दगड, कच्च्या विटा, माती, लाकूड, कौले व पत्रे या साधनांचा वापर करून बांधलेली होती. घरबांधनीची ही सर्व साधने अल्पायुशी असतात. **महादेव कोळी** या जमातीतील कुटुंबांच्या घरांचे क्षेत्रफळही अत्यंत लहान होते. स्वच्छ हवा व सुर्यप्रकाश यांचा अभाव होता. अशा कोंदट

वातावरणातील लहान जागेत माणसे, जनावरे, शेळ्या व कोंबड्या हे एकत्रच राहत होते.

२०) विजेची उपलब्धता कमी

अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यांतील एकूण ३०० कुटुंबांपैकी १७६ कुटुंबांकडे स्वतःचे वीजमीटर होते. म्हणजेच त्यांना विजेची उपलब्धता होती. उर्वरित कुटुंबांना विजेची उपलब्धता नव्हती. विजेची उपलब्धता असलेली कुटुंबे विजेचा वापर फक्त रात्री प्रकाश मिळवण्यासाठी करीत होती. भारनियमनामुळे उन्हाळ्यात व हिवाळ्यात दिवसांतील काही तासच वीज उपलब्ध असते. पावसाळ्यात आदिवासी दुर्गम भागातील विजपुरवठा सुरक्षेच्या कारणास्तव पूर्णपणे खंडीत केला जातो. थोडक्यात आदिवासींना विजेची उपलब्धता नावापुरती होती.

२१) प्रौढ शिक्षण योजनेची अंमलबजावणी पूर्ण

सह्याद्रीतील आदिवासी विभागात प्रौढ शिक्षण योजनेची अंमलबजाणी १०० टक्के झालेली आढळली. योजनेची अंमलबजावणी प्रत्येक गावात झालेली असली तरी ती प्रत्येक निरक्षर व्यक्ती पर्यंत पोहचली नाही. त्यामुळे निरक्षरतेचे प्रमाण अधिक आढळले.

२२) आदिवासी विकास विभागाच्या योजनांबाबत अनभिज्ञता

आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासींसाठी आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नतीच्या योजना राबविल्या जातात. परंतु सह्याद्री विभागातील बहुतेक आदिवासींना त्या विभागाची व योजनांची माहितीच नव्हती. त्याचे प्रमाण ६३ टक्के इतके होते. फक्त ३७ टक्के लोकांना योजनांच्या बाबतीत माहिती होती. विकास योजनांच्या माहिती अभावी ते या योजनांच्या लाभापासून वंचित होते. त्यामुळे योजनांची माहिती नसणारे लोक गरिबीतच परंपरागत जीवन जगत होते.

२३) आदिवासी विकास विभागाच्या योजनांपासून मिळणाऱ्या लाभाचे प्रमाण कमी

आदिवासी विकास विभागातर्फे आदिवासींच्या सर्वांगीण उन्नतीकरिता विविध योजना राबविल्या जातात. त्या योजनांचा आदिवासींना लाभ मिळाल्यास त्यांची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते. परंतु संशोधनाअंती

असे आढळले की, ४६.७ टक्के आदिवासींना कोणत्याही योजनेचा लाभ मिळालेला नव्हता. बहुतेक आदिवासी कुटुंबातील मुलांना शैक्षणिक योजनांचा लाभ मिळालेला होता. त्यामध्ये आश्रमशाळेच्या लाभाचे प्रमाण अधिक होते. त्यानंतर जिल्हा परिषद शाळा, बालवाडी व अंगणवाडी यांचा क्रम होता. घरकुल योजनेचा लाभ फक्त ४६ कुटुंबांना मिळालेला होता. शिष्यवृत्ती व वसतिगृह योजनेचा लाभ अनुक्रमे २८.७ टक्के व १२.३ टक्के म्हणजेच फारच थोड्या विद्यार्थ्यांना मिळालेला होता.

आर्थिक उन्नतीच्या योजनांचा विचार करता वीजपंप/तेलपंप पुरवठा, खावटी कर्ज, केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना, २७५ ब, एकाधिकार खरेदी योजना, बैलजोडी व बैलगाडी पुरवठा या योजनांचा लाभही कमी प्रमाणात मिळालेला होता. केंद्रवर्ती अर्थसंकल्प व २७५ ब या योजनांपासून मिळालेला लाभ अत्यल्प होता. आदिवासी विकास योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहचविणे हे प्रकल्प कार्यालयांचे काम आहे. परंतु योजनांची माहिती लोकांपर्यंत पुरेशी पोहचलेली नाही. यावरून असा निष्कर्ष निघतो की, आदिवासी विकास विभागाची यंत्रणा माहिती व प्रसारण कार्यात कमी पडत आहे.

शेतीतून अल्प प्रमाणात धान्योत्पादन होत असल्याने आदिवासींना अन्नधान्याची टंचाई नेहमी जाणवते त्यामुळे उदरनिर्वाहासाठी स्वस्त धान्य दुकानातून जीवनावश्यक वस्तू खरेदी करण्याचे प्रमाण अधिक दिसून येते. थोडक्यात सर्व योजनांचा एकत्रितपणे विचार करता असे आढळते की, आदिवासी विकास विभागा मार्फत सर्वांगीण उन्नतीसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांपासून आदिवासींना मिळणाऱ्या लाभाचे प्रमाण कमी आहे.

२४) शेतीविषयक योजनांपासून प्राप्त झालेला लाभ कमी

आदिवासी विकास विभागातर्फे आदिवासींची शेती सुधारण्यासाठी विविध योजना राबविल्या जातात. काही योजना आदिवासी विकास विभाग स्वतः राबवते तर काही योजना इतर विभागामार्फत राबविल्या जातात. त्या विभागांना आदिवासी विकास विभागाकडून निधी उलब्ध करून दिला जातो. शेतीविषयक योजनांचा लाभ प्राप्त झालेल्या कुटुंबांचे प्रमाण ५८.७ (३०० कुटुंबे) टक्के होते. उर्वरित ४१.३ टक्के कुटुंबांना कोणत्याही शेतीविषयक योजनेचा लाभ मिळालेला नव्हता.

२५) विविध शेती विकास योजनांपासून प्राप्त झालेल्या लाभाचे प्रमाण कमी

आदिवासींची शेती सुधारण्यासाठी काही योजनांचा लाभ वस्तूरुपाने तर काही योजनांचा लाभ अनुदान या स्वरूपात दिला जातो. **महादेव कोळी** या आदिवासी जमातीतील लोकांना पाईपलाईन या योजनेचा लाभ अधिक प्रमाणात मिळालेला होता. त्याचे प्रमाण ३९.५ टक्के होते. त्यानंतर बैलजोडी, बी-बियाणे पुरवठा या योजनांचा लाभ मिळालेला होता. विहीर व विहीर दुरूस्ती, बैलगाडी, जमीन सुधारणा, शेती मशागतीच्या अवजारांचा पुरवठा, ठिबक/तुषार सिंचन व इतर योजना या सर्व योजनांचा लाभ मिळण्याचे प्रमाण हे १० टक्क्यांपेक्षाही कमी होते.

शेती विकास विषयक योजनांच्या लाभाची वर्गवारी केली असता असे आढळते की, या योजनांपासून आदिवासींना मिळालेल्या लाभाचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

२६) दुग्ध विकास योजनांपासून कोणताही लाभ नाही

अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यांतील कोणत्याही कुटुंबाला दुग्ध विकास योजनांचा फायदा झालेला नाही. दुग्ध प्रक्रिया व शीतगृह या योजनेसाठी यंत्रे लागतात, वीज लागते, मोठ्या प्रमाणात दुधाची उपलब्धता असावी लागते, यंत्र हाताळण्याचे कौशल्य असावे लागते, भांडवल लागते व बाजारपेठ असावी लागते. हे सर्व घटक आदिवासींजवळ नसल्याने वरील योजनेचा फायदा कोणीही घेतलेला नव्हता. तसेच दुभत्या जनावरांचा पुरवठा न पशुखाद्य पुरवठा या योजनांचा लाभही एकाही कुटुंबाला झालेला नव्हता.

२७) मृदसंधारण योजनेपासून प्राप्त झालेल्या लाभाचे प्रमाण कमी

जमिनीची धूप होऊ नये, अधिक-अधिक जमीन लागवडी खाली यावी, जमिनीतील पाण्याची पातळी वाढावी व त्यामुळे शेती उत्पादनात वाढ व्हावी यासाठी सरकारतर्फे मृदसंधारण योजना राबविली जाते. त्यामध्ये नाला बंडिंग करणे, चर व बांधबंदिस्ती करणे या योजनांचा समावेश होतो. या योजनांपासून चारही जिल्ह्यांतील आदिवासी कुटुंबांना मिळणाऱ्या लाभाचे प्रमाण कमी होते.

२८) फलोत्पादन योजनांपासून प्राप्त झालेल्या लाभाचे प्रमाण अत्यल्प

आदिवासी शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीत फळझाडे लागवड करून त्यापासून अधिक उत्पन्न मिळवावे व आपली आर्थिक परिस्थिती सुधारावी यासाठी फलोत्पादन योजना राबविली जाते. या योजने अंतर्गत येणाऱ्या योजनांपासून अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यांतील एकूण ३०० शेतकरी कुटुंबांपैकी फक्त ३८ (१२.६ टक्के) शेतकऱ्यांना फलोत्पादन योजनांचा लाभ मिळालेला होता. म्हणजेच जवळ-जवळ २६२ कुटुंबांना कोणताही लाभ मिळालेल नव्हता. फलोत्पादन योजनांपासून मिळणाऱ्या लाभाच्या प्रमाणाचा विचार करता असे आढळते की मिळालेल्या लाभाचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

२९) तलंग (कोंबडीची पिल्ले) वाटप योजना अयशस्वी

बहुतेक सर्वच आदिवासी लोक कोंबड्या पाळतांना आढळतात. त्यांनी व्यापारी हेतूने कुक्कुट पालन करावे यासाठी आदिवासी विकास विभागतर्फे तलंग वाटप योजना राबविली जाते. या योजनेचा लाभ चारही जिल्हे मिळून फक्त एका व्यक्तीला मिळालेला होता. यावरून ही योजना अयशस्वी ठरलेली दिसून येते.

३०) मत्स्य व्यवसाय योजना अयशस्वी

मत्स्य व्यवसाय योजनेपासून अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यातील एकाही व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा लाभ मिळालेला नाही. सरकारच्या चुकीच्या ध्येय-धोरणांमुळे ही योजना फक्त कागदावरच असून वरील चारही जिल्ह्यांत ही योजना पूर्णपणे अयशस्वी ठरलेली दिसून येते.

३१) मातृत्व अनुदान योजनेपासून मिळालेला लाभ अत्यल्प

गर्भाची वाढ व्यवस्थित व्हावी व सशक्त मुले जन्माला येऊन सुजान नागरिक निर्माण व्हावेत त्यासाठी गरोदर मातांना मातृत्व अनुदान दिले जाते. सह्याद्री विभागातील चारही जिल्ह्यांतील आदिवासी गरोदर मातांना मातृत्व अनुदान योजनेचा लाभ फक्त ७ टक्के मिळालेला होता. म्हणजेच ९३ टक्के कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही.

३२) पशुवैद्यकीय दवाखाण्यांची कमतरता

शेती मशागतीसाठी बैल, दूध उत्पादनासाठी गायी, म्हशी व जोडधंदा म्हणून शेळ्या, कोंबड्या यांची आदिवासींना अत्यंत आवश्यकता असते. परंतु वेगवेगळ्या ऋतूत त्यांना वेगवेगळ्या रोगांची लागण होते. त्यामुळे आदिवासींचे खूप नुकसान होते. ते होऊ नये म्हणून सरकारने आदिवासी विभागात पशुवैद्यकीय दवाखाने सुरू केलेले आहेत. अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यांतील संशोधनासाठी निवडलेल्या तीस गावांपैकी बारा गांवामध्ये पशुवैद्यकीय दवाखाण्यांचे उपकेंद्र होते. अनेक उपकेंद्रे बंद होती. थोडक्यात आदिवासी विभागात पशुवैद्यकीय दवाखान्यांची उपलब्धता कमी होती.

पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत पुरविण्यात येणाऱ्या औषधांचे प्रमाण अधिक होते. कारण वर्षातून एकदा रोगप्रतिबंधक औषधे घरोघरी जाऊन दिली जातात. प्रत्यक्ष उपचार करण्याचे प्रमाण मात्र कमी होते. आदिवासी विभागात जनावरांना रोग प्रतिबंधकारक लस देण्याचे प्रमाण जवळ-जवळ सत्तर टक्के होते. औषधोपचार, लसीकरण वर्षातून एकदाच केले जाते. त्यामुळे त्याचे प्रमाण अधिक दिसून येते परंतु उर्वरित काळात जनावरांना आजार झाल्यास लवकर पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध होत नाही. त्यामुळे आदिवासींना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

३३) वैरण उत्पादनासाठी झालेला आर्थिक लाभ अत्यल्प

उन्हाळ्यात अनेकदा जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होत असतो. त्याचे निवारण करण्यासाठी आदिवासी विकास विभागातर्फे वैरण उत्पादन करण्यासाठी आर्थिक लाभ दिला जातो. या योजनेच्या लाभाचा विचार करता असे आढळते की चारही जिल्ह्यातील एकूण ३०० कुटुंबांपैकी फक्त ४ (१.३ टक्के) कुटुंबांना वरील योजनेचा लाभ मिळालेला होता. म्हणजेच जवळ-जवळ २९६ कुटुंबांना कोणताही लाभ मिळालेला नव्हता. थोडक्यात वैरण उत्पादन योजनेचा लाभ मिळण्याचे प्रमाण अत्यल्प होते.

३४) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून भेट देण्याचे प्रमाण अत्यल्प

कोणत्याही योजनेचे यशापयश पडताळून पाहण्यासाठी त्या योजनेचे मूल्यमापन करणे गरजेचे असते. आदिवासी विकास विभागामार्फत ज्या विविध योजना राबविल्या जातात त्यांची कार्यवाही व अंमलबजावणी करण्याचे काम एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाला करावे लागते. या कार्यालयामार्फत ज्या विविध योजनांची कार्यवाही केली जाते त्या योजनांचे मूल्यमापन करण्याची जबाबदारी याच कार्यालयावर येऊन पडते. ज्या आदिवासींनी वेगवेगळ्या प्रकारच्या योजनांचा लाभ घेतलेला आहे त्यांनी त्या योजनेचा सदुपयोग केला आहे की दुरूपयोग केला आहे हे पाहणेही आवश्यक आहे. तसेच लाभ घेतलेली योजना कितपत यशस्वी झाली आहे त्याची पडताळणी करणेही आवश्यक असते.

महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पात प्रतिवर्षी आदिवासींच्या विकासासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात वित्तीय तरतूद केली जाते. त्यानुसार आजपर्यंत आदिवासींच्या विकासासाठी लाखो कोटी रूपये खर्च करण्यात आलेले आहेत. झालेल्या खर्चाची तुलना आदिवासी लोकांच्या विकासाशी केल्यास असे दिसते की, खर्चाच्या तुलनेत अत्यल्प प्रमाणात विकास झालेला आहे. खर्च झालेला पैसा आदिवासींपर्यंत न पोहचता नेमका जातो कोठे याचा शोध घेण्याची गरज आहे. त्यासाठी आदिवासी विकास योजनांचे काटेकोरपणे मूल्यमापन करणे आवश्यक आहे.

आदिवासी विकास योजनांचे परीक्षण तसेच मूल्यमापन करण्याची जबाबदारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयावर टाकण्यात आलेली आहे. अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चारही जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांना भेट दिली असता लोकांकडून असे समजले की, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातर्फे योजनांची कार्यवाही केली जाते. परंतु ज्या व्यक्तींनी विविध योजनांचा लाभ घेतलेला आहे, त्या व्यक्तींनी घेतलेल्या योजनेचा योग्य उपयोग केला आहे किंवा नाही त्याची पाहणी प्रकल्प कार्यालयातर्फे केली जात नाही. वरील चारही जिल्ह्यांतील ३०० कुटुंबापैकी फक्त ८ (२.७ टक्के) कुटुंबातील व्यक्तींनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी भेट दिली असे सांगितले. उर्वरित २९२

कुटुंबांना प्रकल्प कार्यालयातील कोणत्याही कर्मचाऱ्याने कोणत्याही कारणास्तव भेट दिलेली नव्हती.

आदिवासी विकास विभागात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात फोफावलेला आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील अधिकारी आदिवासींकडून लाच घेऊन योजना मंजूर करतात. त्यामुळे ते योजनांच्या मूल्यमापनाकडे दुर्लक्ष करतात. अलिकडील काळात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघड झाली आहेत.

थोडक्यात वरील विश्लेषणावरून असा निष्कर्ष निघतो की, आदिवासी विकास विभागाच्या योजनांचे मूल्यमापन अत्यल्प प्रमाणात झालेले आहे. योजना यशस्वी होण्यासाठी सरकारने काटेकोर मूल्यमापन करण्याची गरज आहे. तसेच सरकारने एखाद्या खाजगी संस्थेमार्फत मूल्यमापन केल्यासही अधिक पारदर्शकता येऊ शकेल.

३५) आदिवासी विकास योजनांचा लाभ घेतलेल्या आदिवासींच्या गुणात्मक जीवनमानात सुधारणा

शेती विषयक योजनांचा लाभ ज्या आदिवासींनी घेतलेला होता त्यांच्या धान्य उत्पादनात वाढ झालेली होती. पिकांच्या उत्पादनाबाबतीत विविधता आलेली होती. पारंपारिक पिकांबरोबरच काही प्रमाणात आधुनिक पिकेही घेतली जात होती. भाजीपाल्याचे उत्पादनही काही प्रमाणात घेतले जात होते. विक्रेय वाढावा जरी मोठ्या प्रमाणात उत्पादित होत नसला तरी घरगुती वापरासाठी विविध प्रकारचे अन्नधान्य, भाजीपाला उपलब्ध होत होता. त्याचा शारीरिक वाढीवर सकारात्मक परिणाम होताना दिसून आला. तसेच कुपोषण, उपासमार यापासूनही सुटका होण्यास मदत होत होती.

शैक्षणिक विकास योजनांचा लाभ बहुतेक सर्व कुटुंबांतील आदिवासी मुलांना झालेला आहे. ज्या मुलांनी माध्यमिक शाळेपर्यंत शिक्षण घेतलेले होते त्यांची बोलीभाषा सुधारलेली आहे. ज्या मुलांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले होते त्यांच्या राहणीमानात बदल झालेला आहे. त्यांनी आधुनिक पध्दतीच्या राहणीमानाचा स्विकार केलेला आहे. तसेच त्यांचा जीवनाकडे पाहण्याचाही दृष्टीकोण बदललेला आहे. शिक्षणामुळे अनेकांना संघटीत तसेच असंघटीत क्षेत्रात रोजगार उपलब्ध झालेला आहे. ज्या मुलांनी उच्च शिक्षण घेतलेले होते त्यांना सरकारी क्षेत्रात चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळालेल्या

आहेत. काहींना स्वयंरोजगार उपलब्ध झालेला आहे. रोजगाराच्या उपलब्धतेमुळे उत्पन्नात वाढ झाली आहे व त्यामुळे जीवनामानही सुधारलेले आहे.

सामाजिक व शैक्षणिक विकासाच्या योजनांमुळे अलिप्तपणा, बुजरेपणा कमी झाला आहे. अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी व परंपरा यांचा पगडा कमी झालेला आहे. संघटितपणा, समाजहित, सहकार्य करण्याची प्रवृत्ती यात वाढ झालेली आहे. या सर्वांमुळे आधुनिक जीवनशैलीचा स्विकार करण्यास सुरूवात झालेली आहे.

आदिवासी विकास विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नतीच्या योजनांचा लाभ ज्या आदिवासींना झालेला आहे. त्यांच्या जीवनमानात, राहणीमानात काही प्रमाणात गुणात्मक वाढ झालेली आढळली. थोडक्यात आदिवासींच्या गुणात्मक जीवनमानात झालेली वाढ अत्यल्प होती. प्रगत समाजाप्रमाणे चांगले जीवनमान आदिवासींना उपलब्ध होण्यासाठी आदिवासी विकास योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे.

७.३ प्रकल्प अधिकाऱ्यांच्या प्रश्नावलीवरून काढलेले निष्कर्ष

आदिवासी जमातींच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकारच्या आदिवासी विकास विभागातर्फे ज्या विविध योजना राबविल्या जातात त्यांची कार्यवाही व अंमलबजावणी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांमार्फत केली जाते. प्रकल्प अधिकारी हे त्या कार्यालयाचे प्रमुख असतात. त्यांचे योजनांच्या कार्यवाहीवर व अंमलबजावणीवर नियंत्रण असते. प्रकल्प अधिकारी या नात्याने त्यांचा लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संबंध येत असतो. आदिवासी विकास योजनांची कार्यवाही व अंमलबजावणी करतांना प्रकल्प अधिकारी म्हणून त्यांना कोण-कोणत्या अडचणी येतात हे जाणून घेण्यासाठी त्यांच्याकडून मुलाखतीद्वारे माहिती घेतलेली आहे. आदिवासी विकास योजनांच्या लाभार्थ्यांनी दिलेली माहिती पडताळून पाहण्याचा प्रयत्नही वरील मुलाखतीमार्फत करण्यात आलेला आहे.

सह्याद्री विभागातील अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या जिल्ह्यांत अनुक्रमे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय राजूर, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगांव व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, जव्हार ही चार प्रकल्प कार्यालये आहेत. या चार प्रकल्प कार्यालयातील प्रकल्प अधिकारी किंवा सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांच्याकडून मुलाखतीच्या

आधारे माहिती घेतलेली आहे. त्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून काढलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१. राजूर, नाशिक, घोडेगांव व जव्हार येथील चारही प्रकल्प कार्यालयांत कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त होती.

२. मागील काही वर्षात राबविलेल्या आदिवासी विकास योजनांची माहिती सविस्तरपणे कोणत्याही प्रकल्प कार्यालयातून मिळाली नाही. अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये कामचुकारपणा, असहकार्य व उदासिनता आढळून आली.

३. राजूर, घोडेगांव व जव्हार येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या/सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते योजनांचे नियोजन करताना अडचणी येतात. नाशिक येथील सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते नियोजन करताना अडचणी येत नाहीत. म्हणजेच प्रकल्प अधिकाऱ्यांच्या कार्यात एकमत दिसून येत नाही.

४. चारही प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते योजनांची संख्या जास्त व दुर्गम आदिवासी भाग यामुळे योजना राबविताना व त्यांचे नियंत्रण करताना अडचणी येतात.

५. राजूर, घोडेगाव व जव्हार येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते योजनांचा पाठपुरावा करताना अडचणी येतात. नाशिक येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते योजनांचा पाठपुरावा करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध आहे.

६. प्रकल्प कार्यालयाचे मोठे कार्यक्षेत्र, योजनांची संख्या जास्त, दुर्गम आदिवासी भाग, कमी कर्मचारी इत्यादींमुळे चारही प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडतो.

७. प्रशासकीय व वित्तीय अधिकारांच्या बाबतीत चारही प्रकल्प अधिकाऱ्यांमध्ये एकमत आढळून आले नाही.

८. चारही प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते आदिवासी विकास विभागाच्या सर्व योजना आवश्यक आहेत व त्या आदिवासींना लाभदायक आहेत.

९. राजूर येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते कृषी सिंचन, घरकुल योजना, दुभत्या जनावरांचा पुरवठा, स्वयंरोजगार, तेलपंप व विजपंप वाटप, भूमिहीनांना जमीन वाटप या योजना आदिवासींच्या विकासासाठी अधिक महत्वाच्या आहेत. नाशिक, घोडेगाव व जव्हार येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते आदिवासी विकास विभागात सर्वच योजना आदिवासींच्या विकासासाठी आवश्यक आहेत.

१०. राजूर, घोडेगाव व जव्हार येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते आदिवासी लाभार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. नाशिक येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते आदिवासी विकास निरीक्षकांमार्फत लाभार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी आढावा घेण्यात येतो तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत आदिवासी लाभार्थ्यांचे मूल्यमापन केले जाते.

११. प्रकल्प अधिकारी या नात्याने चारही प्रकल्प अधिकाऱ्यांनी स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन काही नवीन योजना राबविण्याची सूचना वरिष्ठ कार्यालयाला केली होती.

१२. राजूर, घोडेगाव व जव्हार येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते आदिवासी कार्यक्षेत्राबद्दल योजना अंमलबजावणीच्या वार्षिक अहवालात उणिवा, अडचणी व सूचना यांचा अंतर्भाव केला जातो. तर नाशिक येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते उणिवा, अडचणी व सूचना यांचा वार्षिक अहवालात अंतर्भाव नसतो.

१३. राजूर व घोडेगाव येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते 'यशदा' पुणे व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, येथे त्यांना प्रशिक्षण दिले जाते. नाशिक व जव्हार येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते त्यांना 'यशदा' पुणे येथे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणा संदर्भात प्रकल्प अधिकाऱ्यांमध्ये एकमत दिसून येत नाही.

१४. चारही प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते काही योजनांच्या वापराबद्दल आदिवासी लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

१५. प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील एकूण आदिवासी लोकसंख्या, एकूण कुटुंबे, लाभार्थी संख्या व लाभ न मिळालेल्या व्यक्तींची संख्या इत्यादींची माहिती कोणत्याही कार्यालयाकडे उपलब्ध नव्हती.

१६. राजूर, नाशिक, घोडेगाव व जव्हार येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते आदिवासी विकास योजनांमुळे आदिवासींची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक प्रगती काही प्रमाणात साध्य झालेली आहे. राजूर येथील प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मते चिरस्थायी विकास साध्य होण्यासाठी सामाजिक न्यायातून विकास होणे गरजेचे आहे.

अशा प्रकारे राजूर, नाशिक, घोडेगाव व जव्हार येथील प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवरून वरील निष्कर्ष काढले आहेत. त्या निष्कर्षांची पडताळणी केली असता असे आढळते की राज्य शासनाची नियमावली सर्व प्रकल्प अधिकाऱ्यांना सारखी असतानाही वरील चारही प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीमध्ये अनेक बाबतीत विसंगती दिसून येते. यावरून

असा निष्कर्ष काढता येतो की, प्रकल्प अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्याची व्यवस्थित माहिती नसेल तर ते आदिवासी विकास योजनांची योग्य प्रकारे कार्यवाही व अंमलबजावणी करू शकणार नाहीत. थोडक्यात सदोष प्रशासन हा सुध्दा आदिवासी विकासामधील एक प्रमुख अडथळा आहे.

७.४ आश्रमशाळा मुख्याध्यापकांच्या मुलाखतीवरून काढलेले निष्कर्ष

मनुष्यबळाच्या विकासासाठी शिक्षण हा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. शिक्षणामुळे ज्ञानाचा प्रसार होतो. ज्ञानामुळे व्यक्तींना आर्थिक उन्नतीचा मार्ग सापडतो. शिक्षणामुळे व्यक्तींचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास होतो. तसेच आर्थिक परिस्थिती सुधारल्याने राहणीमानाच्या दर्जातही सुधारणा होते. शिक्षण हा व्यक्तीच्या सर्वांगीण उन्नतीचा पाया आहे. पाया जर कच्चा असेल तर व्यक्तींच्या सर्वांगीण प्रगतीत असंख्य अडथळे येतात.

आदिवासी जमाती या शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत मागासलेल्या आहेत. निरक्षरतेच्या पोटी आलेल्या अज्ञानामुळे नवीन आर्थिक संधींचा फायदा घेणे आदिवासींना शक्य होत नाही. शिक्षणाच्या अभावामुळे आदिवासींचे अनेक बाबतीत शोषण होते. त्यामुळे त्यांची अवस्था अधिक हलाखीची होते. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने आदिवासींच्या विकासासाठी अनेक शैक्षणिक संस्था सुरू केलेल्या आहेत. परंतु त्यांचा फारसा अनुकूल परिणाम आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीवर झालेला दिसून येत नाही. कारण आजही प्रगत समाजाच्या तुलनेत आदिवासी हे शैक्षणिक दृष्ट्या मागासलेलेच आहेत.

सह्याद्री विभागातील अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यांतील अकोले, इगतपूरी, जुन्नर, आंबेगाव व मोखाडा या चार तालुक्यांत असणाऱ्या शासकीय आश्रम शाळेतील मुख्याध्यापकांकडून आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सद्यःस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न संशोधनाच्या माध्यमातून केला आहे. प्रत्येक तालुक्यातून एक या प्रमाणे पाच शासकीय आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांकडून मुलाखतीद्वारे माहिती घेतली आहे. मुख्याध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादावरून काढलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१. अकोले व इगतपूरी तालुक्यातील आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांकडे आश्रमशाळेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावांची लोकसंख्या उपलब्ध होती. जुन्नर, आंबेगाव व मोखाडा या तालुक्यांतील आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांकडे आश्रमशाळेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावांची लोकसंख्या उपलब्ध नव्हती. यावरून असा निष्कर्ष निघतो की, मुख्याध्यापकांना

आपल्या कार्याची पूर्णपणे माहिती नव्हती किंवा ते आपले कार्य व्यवस्थित पार पाडत नव्हते.

२. पाचही तालुक्यांतील आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांकडे आश्रम शाळेच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावांतील पाच वर्षांखालील व पाच वर्षांवरील मुला-मुलींची माहिती उपलब्ध नव्हती. म्हणजेच किती मुले शिक्षण घेतात व किती मुले शिक्षणापासून वंचित राहतात याची माहिती त्यांना नव्हती.

३. अकोले, इगतपूरी, जुन्नर, आंबेगाव व मोखाडा या पाचही तालुक्यांतील संशोधनासाठी निवडलेल्या पाचही आश्रमशाळांमध्ये शिक्षक व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त होती. यावरून असा निष्कर्ष निघतो की, सरकार आदिवासी आश्रमशाळांकडे दुर्लक्ष करते.

४. आश्रमशाळांमध्ये सर्वाधिक विद्यार्थी **'महादेव कोळी'** या जमातीचे होते. त्यानंतर 'ठाकर' या जमातीचा क्रमांक होता.

५. पाच तालुक्यांतील पाचही आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी व निवासासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांची उपलब्धता होती. परंतु आधुनिक खेळ, चांगल्या वैद्यकीय सुविधा अशा काही महत्वाच्या सुविधांची उपलब्धता नव्हती.

६. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची वर्षातून चार वेळा वैद्यकीय तपासणी केली जाते. विद्यार्थी आजारी पडल्यास आजारानुसार त्यावर जवळच्या सरकारी रुग्णालयात नेऊन उपचार केले जातात.

७. आश्रमशाळेतील मुलांना दररोज सकाळी नाश्ता, दुपारी व संध्याकाळी जेवण दिले जाते. महिन्यातून दोन वेळेस मांसाहारी व मिष्ठान्न जेवण दिले जाते.

८. आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य जुलै किंवा ऑगस्ट महिन्यात उपलब्ध करून दिले जाते. शैक्षणिक वर्ष जूनमध्ये सुरू होते. शैक्षणिक साहित्य ऑगस्ट महिन्यात उपलब्ध होत असल्यास ते विद्यार्थ्यांना दोन महिने उशिरा मिळते. म्हणजेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते.

९. आश्रमशाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी शिक्षणाबरोबरच विविध उपक्रम राबविले जातात.

१०. मुख्याध्यापकांच्या मते शासकीय आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षणाचा दर्जा चांगला आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक व तांत्रिक शिक्षण व त्यासाठी चांगले मार्गदर्शन उलपब्ध

करून दिल्यास आदिवासी विद्यार्थी सध्याच्या जागतिक स्पर्धेत नक्कीच टिकाव धरू शकतील.

११. मोखाडा येथील आश्रमशाळेत तारपा नृत्य, ढोलनाच व वारली चित्रकला या आदिवासी कलांची विशेष जोपासना केली जाते. इतर आश्रमशाळांमध्ये आदिवासी कलांची जोपासना केली जात नाही.

७.५ आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे पदाधिकारी यांच्या मुलाखतीवरून काढलेले निष्कर्ष

महाराष्ट्र राज्यात सहकार क्षेत्राने आर्थिक विकासात महत्वाचे योगदान दिलेले आहे. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण शेतकरी, कारागीर, लहान-मोठे व्यावसायिक, संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगार इत्यादींनी आपला विकास साध्य केला आहे. सहकाराने महाराष्ट्राच्या विकासात बजावलेली भूमिका विचारात घेऊन सरकारने आदिवासी भागात आदिवासींच्या विकासासाठी सहकारी चळवळ रुजविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची स्थापना आदिवासी विभागात केलेली आहे. या संस्था आदिवासींच्या आर्थिक विकासास हातभार लावीत आहेत. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची सद्यःस्थिती जाणून घेण्यासाठी सह्याद्री विभागातील अहमदनगर, नाशिक, पुणे व ठाणे या चार जिल्ह्यांतील अकोले, इगतपूरी, जुन्नर, आंबेगाव व मोखाडा या पाच तालुक्यांतील प्रत्येकी एक याप्रमाणे आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे पदाधिकारी यांच्याकडून मुलाखतीद्वारे माहिती घेतली आहे. त्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून काढलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१. संशोधनासाठी ज्या आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना भेट दिली ते सर्व आदिवासी **महादेव कोळी** या जमातीचे होते.

२. पाचही आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे पदाधिकारी शेतकरी होते. राजूर व खामगाव येथील संस्थांचे पदाधिकारी प्राथमिक शिक्षण घेतलेले होते. वासाळी, शिनोली व मोखाडा येथील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे पदाधिकारी माध्यमिक शिक्षण घेतलेले होते.

३. अकोले, इगतपूरी, जुन्नर, आंबेगाव व मोखाडा या पाचही तालुक्यांतील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची स्थापना १९९० व त्यानंतर झालेली आहे.

४. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे अधिकृत भांडवल, वसूल भांडवल, कर्जाची येणे रक्कम, ठेवी रक्कम, कर्ज मर्यादा, लाभांश दर, कर्ज थकबाकी इ. बाबींची पूर्णपणे माहिती कोणत्याही पदाधिकाऱ्यांना नव्हती.

५. पाचही आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या बहुतेक सभासदांनी कर्जे घेतलेली होती. जमिनीच्या तारणावर सभासदांना कर्ज दिले जात होते.

६. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे व्यवस्थापन सहकाराच्या नियमाप्रमाणे केले जात होते.

७. पाचही तालुक्यांतील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे हिशोब नियमीतपणे ठेवले जात होते. लेखापुस्तकांची तपासणी नियमीतपणे केली जात होती. तपासणीत दोष आढळल्यास ते दूर करण्यासाठी उपाययोजना केल्या जात होत्या.

८. पाचही आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना हिशोब तपासणीचा 'ब' वर्ग मिळालेला होता.

९. कोणत्याही सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना पीकनिहाय कर्जाचे दर माहित नव्हते.

१०. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील किती शेतकरी कर्ज घेतात, किती शेतकरी घेत नाहीत याची माहिती पदाधिकाऱ्यांना नव्हती.

११. कर्ज न घेणाऱ्या शेतकऱ्यांची जमीन, कर्ज मिळण्यायोग्य जमीन याची माहितीही पदाधिकाऱ्यांना नव्हती.

१२. पीक कर्ज, खावटी कर्ज, जनावरांसाठी कर्ज, शेती औजारांसाठी कर्ज यावरील व्याजाचे दर पाचही सहकारी संस्थांमध्ये वेगवेगळे होते.

१३. मंजूर कर्जातून कापून घेतलेल्या भाग-भांडवलावरील लाभांशाचे दरही वेगवेगळे होते.

१४. पदाधिकाऱ्यांच्या मते शेतकरी घेतलेल्या कर्जाचा वापर योग्य त्या कारणांसाठी करतात.

१५. पाचही सहकारी संस्थांमध्ये अनेक शेतकरी कर्ज थकबाकीदार होते.

१६. मागील पाच वर्षात सभासदांनी संस्थेच्या कामकाजात घेतलेला सहभाग, मागील पाच वर्षांचा संस्थांचा नफा तोटा याची माहिती कोणत्याही संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना नव्हती.

१७. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांकडून शेतीपूरक व्यवसायांनाही कर्ज दिले जात होते.

१८. काही संस्थांनी संचालकांनाही कर्ज दिलेले होते.

१९. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या मते सरकारने तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कर्ज मर्यादा वाढवून द्यावी.

२०. सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या मते खावटी कर्ज आदिवासींना अधिक उपयुक्त आहे.

२१. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या मते आदिवासींनी कर्जाचा उपयोग योग्य पध्दतीने केल्यास त्यांची आर्थिक परिस्थिती निश्चितच सुधारेल.

२२) अकोले, इगतपूरी, जुन्नर, आंबेगांव व मोखाडा या तालुक्यांतील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे पदाधिकारी कमी शिकलेले असल्याने त्यांना संस्थांबाबत अत्यंत कमी प्रमाणात माहिती होती.

अशा प्रकारे आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेतल्यावर असा निष्कर्ष काढता येतो की, आदिवासींचा सहकाराच्या माध्यमातून विकास करावयाचा असेल तर उच्चशिक्षित, कार्यक्षम, प्रामाणिक, भविष्याचा वेध घेणारे नेतृत्व आदिवासींना सहकारी क्षेत्रात लाभणे गरजेचे आहे. त्याचबरोबर पदाधिकाऱ्यांना सातत्याने प्रशिक्षण देणे, त्यांचे उद्‌बोधन व उजळणी वर्ग घेणे असे क्षमता वृध्दीचे कार्यक्रम उपयुक्त ठरतील. अशा उपक्रमांमुळे सहकारी चळवळ ही आदिवासींच्या विकासाची चळवळ निर्माण होईल.

७.६ संशोधनावरून काढलेल्या निष्कर्षांची गृहीतकांशी पडताळणी

समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीत गृहीतकांना (*Hypothesis*) विशेष महत्वाचे स्थान आहे. गृहीतकांमुळे संशोधनास चालना व योग्य दिशा मिळते. गृहीतके निश्चित निष्कर्ष काढण्यास मदत करतात. निष्कर्षांच्या आधारावरच गृहीतकांची सत्यता पडताळून पाहता येते. तसेच त्यांचे पुनर्निरीक्षण करता येते. शास्त्रीय संशोधन पद्धतीत पुनर्निरीक्षण हा एक महत्वाचा घटक आहे. ज्या वेळी नवीन माहिती उजेडात आणली जाते त्या वेळी निरनिराळ्या मार्गांनी तिची विश्वसनीयता सिद्ध करणे आवश्यक असते. त्यासाठी गृहीतके निष्कर्षांशी कितपत मिळती-जुळती आहेत हे पाहणे गरजेचे ठरते. निष्कर्ष हे गृहीतकांशी मिळते-जुळते असतील तर नवीन ज्ञानाची निर्मिती होते आणि विसंगत असतील तर वास्तविक सत्य कळून येते व चुकीच्या धारणा दूर करता येतात. त्यामुळे गृहीतकांचे पुनर्निरीक्षण करणे शास्त्रीय संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

निष्कर्षांच्या आधारे गृहीतकांचे पुनर्निरीक्षण खालील प्रमाणे

गृहीतक क्र. १ : आदिवासी समाज आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला आहे.

सह्याद्री विभागातील आदिवासी **'महादेव कोळी'** या जमातीच्या अभ्यासावरून असे निदर्शनास आले की, या जमातीत दारिद्र्याचे प्रमाण जवळजवळ ९० टक्के आहे. उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असल्याने कर्जबाजारीपणा मोठ्या प्रमाणात आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या व्यसनांवरही मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. जमीन धारणेचे प्रमाण लहान आहे. दोन हेक्टर पर्यंत जमीन असणाऱ्यांचे प्रमाण ५७.५ टक्के आहे. शेती मागासलेली आहे. सुप्त बेकारी, हंगामी बेकारी मोठ्या प्रमाणात आहे. रोजगारासाठी स्थलांतर करण्याचे प्रमाण ७९ टक्के आहे. कुटुंबाचा आकार मोठा असल्याने उपभोग खर्च अधिक आहे. यावरून असे सिद्ध होते की, आदिवासी समाज आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे.

'आदिवासी 'महादेव कोळी' जमातीत निरक्षरतेचे प्रमाण मोठे आहे. एकूण ३०० कुटूंबप्रमुखांपैकी १६० कुंटुंबप्रमुख निरक्षर आढळून आले. त्याचे प्रमाण ५३.३ टक्के होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण अधिक आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील आदिवासी साक्षरता प्रमाण ६४.४ टक्के आहे. थोडक्यात आदिवासी समाज शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आहे.

सामाजिक प्रगतीचा विचार करता आदिवासी समाज मागासलेला दिसून येतो. शुद्ध व पुरेशा पिण्याच्या पाण्याचा अभाव, स्नानगृहांची व शौचालयांची अनुपलब्धता, स्वच्छतेचे कमी प्रमाण, लहान आकाराची घरे, घरीच प्रसूती होण्याचे प्रमाण सर्वाधिक व सकस आहाराचा अभाव या सर्व बाबी आदिवासी **'महादेव कोळी'** जमातीचे सामाजिक मागासलेपण निर्देशित करतात.

आदिवासी **'महादेव कोळी'** जमातीच्या आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक अभ्यासावरून काढलेले निष्कर्ष पहिल्या गृहीतकाशी मिळते-जुळते आहेत. त्यामुळे संशोधनासाठी निश्चित केलेले पहिले गृहीत सत्य ठरते.

गृहीतक क्र. २ : कोणत्याही समाजाचा गुणात्मक विकास हा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीत दडलेला असतो.

प्रगत देशातील लोकांचे राहणीमान उच्च दर्जाचे आहे. त्यांनी आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीतून ते साध्य केलेले आहे. भारतातही ज्या समाजाने किंवा लोकांनी आपली आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगती साध्य केलेली आहे त्यांचे राहणीमान उच्च दर्जाचे दिसून येते. त्यावरून स्पष्ट होते की, कोणत्याही समाजाचा गुणात्मक विकास हा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक प्रगतीत दडलेला असतो. त्यामुळे दुसरे गृहीतही सत्य ठरते.

गृहीतक क्र. ३ : 'महाराष्ट्र शासनामार्फत आदिवासी जमातींसाठी अनेक विकास योजना राबविल्या जात असल्या तरी त्यांचा आदिवासींच्या विकासावर परिणाम झालेला नाही.'

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी जमातींच्या विकासासाठी विविध विकासाच्या योजना राबविल्या जातात. त्यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक विकासाच्या योजना, आर्थिक उन्नतीच्या योजना, शेती विकासाच्या योजना, नव संजीवन योजना, केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना व महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा समावेश होतो.

उपरोक्त विविध आदिवासी विकास योजनांवर प्रतीवर्षी हजारो कोटी रूपये खर्च केले जातात. परंतु आजही जवळजवळ ९० टक्के आदिवासी दारिद्र्यातच जीवन जगत आहेत. त्यांची शैक्षणिक प्रगती झालेली नाही, पिण्यास शुद्ध व पुरेसे पाणी उपलब्ध नाही, पुरेशा वीजपुरवठा उपलब्ध नाही, रोजगाराचे साधन नाही, शेती मागासलेली आहे. आदिवासी भागात मूलभूत सेवा सुविधांची मोठी कमतरता आहे. आरोग्य सुविधा उपलब्ध नाहीत. पशुवैद्यकीय सेवा मिळत नाही. सामाजिक प्रगती झालेली नाही. अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, रीतिरिवाज यांचा पगडा पूर्णपणे कमी झालेला नाही. यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्र सरकारमार्फत आदिवासींच्या विकासासाठी अनेक योजना राबविल्या जात असल्या व मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असला तरी आदिवासींच्या विकासावर त्याचा अपेक्षित परिणाम दिसून येत नाही. त्यामुळे तिसरे गृहीतही सत्य ठरते.

गृहीतक क्र. ४ : 'आदिवासी विकास योजना प्रभावीपणे राबविल्यास आदिवासी समाजाचा गुणात्मक विकास होतो.'

संशोधनावरून असे आढळले की, ज्या आदिवासी कुटुंबांना आदिवासी विकास योजनांचा लाभ मिळालेला होता व त्यांनी मिळालेल्या लाभाचा योग्य उपयोग केलेला होता त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झालेली होती, शेती विकास काही प्रमाणात साध्य झालेला होता, शैक्षणिक प्रगतीत वाढ झालेली होती, राहणीमान सुधारले होते. वेशभूषा व केशभूषा यांत बदल झालेला होता. अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा इत्यादींचा पगडा कमी झालेला होता. यावरून असे स्पष्ट होते की, ज्या आदिवासी लोकांना विकास योजनांचा लाभ मिळालेला आहे त्यांच्या गुणात्मक जीवनमानात प्रगतीच्या दिशेने सुरूवात झालेली आहे. परंतु गुणात्मक जीवनमानातील सुधारणा संथ गतीने होत आहे. जलद गतीने आदिवासींचा विकास साध्य करावयाचा असेल व त्यांच्या गुणात्मक जीवनमानात सुधारणा करावयाची असेल तर आदिवासी विकास योजना प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता आहे. थोडक्यात वरील विश्लेषणावरून चौथे गृहीतही सत्य ठरते.

सह्याद्री विभागातील आदिवासी **'महादेव कोळी'** या जमातीच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक अभ्यासासाठी चार गृहीते निश्चित करण्यात आलेली होती. संशोधनावरून काढलेल्या निष्कर्षांच्या आधारे निश्चित केलेल्या गृहीतकांचे पुनर्रपरीक्षण केले असता चारही गृहीते सत्य ठरतात. त्यामुळे आदिवासींच्या अभ्यासावरून त्यांच्या सद्यःस्थितीची माहिती नव्याने उपलब्ध होण्यास मदत झाली आहे.

७.७ सूचना तथा शिफारशी

सह्याद्री विभागातील आदिवासींच्या गुणात्मक जीवनमानावर आदिवासी विकास योजनांचा झालेला परिणाम अभ्यासण्यासाठी जे तथ्य संकलन केले त्या तथ्यांचे वर्गीकरण व निर्वचन करून काही निष्कर्ष काढले आहेत. त्या निष्कर्षांचे अवलोकन केले असता आदिवासी विकास योजनांच्या कार्यवाहीत व अंमलबजावणीत काही दोष आढळून आले. त्या दोषांमुळे आदिवासी विकास योजनांचा आदिवासींच्या गुणात्मक जीवनमानावर कमी प्रमाणात प्रभाव पडलेला आहे. आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांच्या जीवनमानाचा गुणात्मक दर्जा सुधारण्यासाठी ते दोष दूर करणे अत्यावश्यक आहे. ते दोष दूर करण्यासाठी पुढील सूचना तथा शिफारशी करण्यात येत आहेत.

१. आदिवासींना शिक्षणाचे महत्व पटवून देऊन शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणे

प्रगत समाजाच्या तुलनेत आदिवासींमध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे. तसेच शैक्षणिक गळतीचे प्रमाणही मोठे आहे. अज्ञानामुळे, निरक्षरतेमुळे आदिवासींना विकासाच्या अनेक संधीपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे ते अत्यंत मागासलेले आहेत. ज्ञानाचे महत्व अद्याप त्यांच्यापर्यंत पोहचलेले नाही. त्यामुळे आदिवासींचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोण उदासीन आहे. ती उदासीनता दूर करण्यासाठी त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देण्याची गरज आहे. त्यासाठी गावोगांव कार्यशाळा घेऊन शिक्षणाचे महत्व पटवून देणे आवश्यक आहे. तसेच ज्या व्यक्ती शिक्षण घेऊन मोठ्या पदावर पोहोचलेल्या आहेत त्यांची आदिवासींशी प्रत्यक्ष भेट घालून देऊन त्यांच्यात संवाद घडवून आणल्यास आदिवासींचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलेल. सरकारने आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे.

शैक्षणिक गळती कमी करण्यासाठी आदिवासी मुले शाळेत रममान होतील असे उपक्रम राबविण्याची गरज आहे. त्यामध्ये विविध प्रकारचे खेळ, व्यक्तीमत्व विकासाचे उपक्रम, करमणुकीचे कार्यक्रम, विविध स्पर्धा इ. शाळेमध्ये सुरू केल्यास विद्यार्थी गळतीचे प्रमाण कमी होईल. तसेच पालकांनाही शिक्षणाचे महत्व पटवून दिल्यास ते आपल्या पाल्यांना घरकामासाठी शाळेतून काढून घेणार नाहीत. इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी विशेष अभ्यास वर्ग सुरू केल्यास नापास होण्याचे प्रमाण कमी होईल. त्यामुळे १० वी नंतर मोठ्या प्रमाणात होणारी शैक्षणिक गळती थांबण्यास मदत होईल.

२. कुटुंब नियोजनाचे महत्व पटवून देणे

आदिवासी कुटुंबांमध्ये व्यक्तींची संख्या अधिक आढळून येते. व्यक्तींची संख्या जास्त व उत्पन्न कमी त्यामुळे कुपोषण व उपासमार होते. परिणामी आदिवासी दारिद्र्याच्या दुष्टचक्रात अडकतात. त्यांना दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी छोट्या कुटुंबाचे महत्व पटवून देणे आवश्यक आहे. त्याच बरोबर त्यांना कुटुंब नियोजनाची साधने मोफत पुरविणे आवश्यक आहे. जाहिराती, मेळावे, समाज प्रबोधन इ. मार्गांद्वारे कुटुंबनियोजनाचा प्रचार व प्रसार करणे आवश्यक आहे. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचे महत्व पटवून दिल्यास व सरकारने अशी शस्त्रक्रिया करण्याची सोय मोफत

उपलब्ध करून दिल्यास आदिवासी कुटुंबातील व्यक्तींची संख्या मर्यादित होईल. त्यामुळे त्यांच्या आर्थिक विकासास मदत होईल.

३. विविध उत्पन्नाची साधने निर्माण करून दारिद्र्याचे प्रमाण कमी करणे

आदिवासींमध्ये दारिद्र्याचे प्रमाण जवळ-जवळ ९० टक्के आहे. उत्पन्नाची तुटपुंजी साधने हे त्याचे प्रमुख कारण आहे. जमीन धारणेचे प्रमाण कमी, शेतीचे पावसावरील अवलंबीत्व यामुळे शेती उत्पादन कमी आहे. शेतीस आदिवासी विकास योजनांच्या माध्यमातून पाणीपुरवठा उपलब्ध करून दिल्यास व प्रकर्षित शेतीस प्रोत्साहन दिल्यास, शेती उत्पादनात वाढ होऊन उत्पन्नात वाढ होईल. दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, मधुमक्षिका पालन, हस्तकलेच्या वस्तू बनविणे इ. शेती पूरक उद्योगांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबविल्यास रोजगारात वाढ होऊन उत्पन्नात वाढ होईल व आदिवासींची दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून सुटका होण्यास मदत होईल.

४. अत्यावश्यक बाबींवरील खर्चात वाढ करणे.

आदिवासींचा वार्षिक सरासरी खर्च हा सरासरी उत्पन्नापेक्षा जास्त आहे. त्यामुळे कर्जबाजारीपणा आढळून येतो. जीवनावश्यक वस्तूंवर अधिक खर्च केला जातो. आदिवासींना स्थानिक पातळीवर रोजगाराची विविध साधने उपलब्ध करून दिल्यास त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल त्यामुळे कर्जबाजारीपणा कमी होईल. शिक्षण, आरोग्य, राहणीमान यावरील खर्चही वाढेल व त्यामुळे त्यांच्या गुणात्मक विकासात वाढ होण्यास मदत होईल.

५. व्यसनमुक्ती करणे काळाची गरज

तंबाखू, दारू, बिडी यांच्या व्यसनाचे प्रमाण आदिवासींमध्ये मोठे आहे. दारूच्या आहारी बहुतेक समाज गेलेला आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक विकासात व्यसनाधिनता हा सर्वात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. व्यसनाधिनता कमी करण्यासाठी आदिवासी समाजामध्ये कालबध्द कार्यक्रम राबविण्याची गरज आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, व्यसनाधिनतेचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम यांची जाणीव करून देणे, व्यसनमुक्ती अभियान राबविणे, गावात दारूबंदी, गुटखा बंदी, तंबाखू बंदी करणे, दारू

पिणाऱ्या व्यक्तीस शिक्षेची तरतूद करणे इत्यादी उपायांमुळे आदिवासींमधील व्यसनाधिनतेचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. आदिवासींची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न केल्यासही व्यसनाधिनतेचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. ज्या आदिवासी गावांमध्ये वारकरी संप्रदायाचा प्रसार झालेला आहे, त्या गावांमध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे उर्वरित आदिवासी गावांमध्ये वारकरी संप्रदायाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केल्यास व्यसनाधिनतेचे प्रमाण कमी होईल. गावा-गावांत भजन व किर्तनाद्वारे समाज प्रबोधन केल्यास वारकरी संप्रदायाचा प्रसार होईल व परिणामी व्यसनाधिनता कमी होण्यास मदत होईल. व्यसनाधिनतेच्या विळख्यातून जोपर्यंत आदिवासींची सुटका होत नाही तोपर्यंत त्यांचा सर्वांगीण विकास होणे अशक्य आहे.

६. सरासरी जमीन धारणा प्रमाण वाढविणे

आदिवासींमध्ये सरासरी जमीन धारणेचे प्रमाण अत्यंत कमी आहे. वारसा हक्क पध्दतीमुळे त्याच्यात अधिकच भर पडलेली आहे. बहुतेक शेती उत्पादन योग्य जमीन बांधांमध्ये अडकलेली आहे. त्यामुळे शेती उत्पादनही घटलेले आहे. बांधांवरून भांडणे होत असल्याने कोर्ट-कचेरीतही आदिवासींचा वेळ व पैसा खर्च होतो. त्यामुळे त्यांच्या दारिद्र्यात अधिकच भर पडते. आदिवासी भागात सहकारी शेती तसेच व्यावसायिक शेतीला प्रोत्साहन दिल्यास बांधांमध्ये अडकलेली जमीन मोकळी होईल व जमीन धारणेचे प्रमाण वाढेल. तसेच शेती उत्पादनातही वाढ होईल. व्यावसायिक शेतीमुळे आदिवासी शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्न तर मिळेलच शिवाय त्यांना त्यांच्याच शेतात रोजगार उपलब्ध होईल. थोडक्यात त्यामुळे आदिवासींच्या शेती उत्पन्नात वाढ होईल व त्यांच्या विकासास मदत होईल.

७. मागासलेली शेती सुधारणे

जुनाट व कालबाहय तंत्रज्ञान, पाणीपुरवठ्याचा अभाव, अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, निरक्षरता इत्यादीमुळे आदिवासींची शेती मागासलेली आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, पाणीपुरवठ्याच्या सोयी उपलब्ध करून देणे. आधुनिक शेती करण्याचे प्रशिक्षण देणे, समाज प्रबोधनाद्वारे अज्ञान, अंधश्रध्दा कमी करणे या उपयांमुळे

मागासलेली शेती सुधारण्यास मदत होईल. त्यामुळे आदिवासींच्या विकासासही हातभार लागेल.

८. सुप्त बेकारी कमी करणे तसेच रोजगारासाठी होणारे स्थलांतर रोखणे.

सह्याद्रीतील आदिवासी भागातील शेतीक्षेत्रात सुप्त बेकारीचे प्रमाण मोठे आहे. तसेच रोजगारासाठी होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाणही अधिक आहे. सुप्त बेकारीमुळे उत्पादनात व उत्पन्नातही वाढ होत नाही. स्थलांतरामुळे मुलांचे शिक्षण बुडते तसेच सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येते. स्थानिक पातळीवर स्वयंरोजगार, शेळी-पालन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, गौण वनौपजे गोळा करण्यास प्रोत्साहन, लघुउद्योग, ग्रामोद्योग सुरू करण्यास आर्थिक मदत व प्रोत्साहन दिल्यास मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल. त्यामुळे सुप्त बेकारी कमी होण्यास व रोजगारासाठी होणारे स्थलांतर नष्ट होण्यास मदत होईल. रोजगाराच्या उपलब्धतेमुळे उत्पन्नात वाढ होऊन राहणीमान व जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

९. शुध्द व पुरेशा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा वाढविणे

आदिवासी भागात उन्हाळ्यात तिव्र पाणीटंचाई जाणवते. पाणी आणण्यासाठी मोठी पायपीट करावी लागते. अशुध्द पाणी पिण्यामुळे अनेक आजार उद्‌भवतात. सहयाद्रीतील आदिवासी भागात भूगर्भातील पाण्याची पातळी खोलवर असल्याने विहिरी व बोअरवेल यांना पाणी लागत नाही. त्यामुळे सरकारने ज्या ठिकाणी नदी, तलाव व धरणे असतील तेथून पाईपलाईनद्वारे आदिवासी गावांना बारमाही शुध्द व पुरेशा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा मोफत करणे आवश्यक आहे. त्यामुळे आदिवासींचे कष्ट व वेळ वाचेल तसेच त्यांचे आरोग्यही उत्तम राहील.

१०. स्वच्छतेचे महत्व पटवून देणे

आदिवासींचे राहणीमान निकृष्ठ दर्जाचे आहे. आदिवासी भागात शौचालयांची अनुपलब्धता आहे. त्यामुळे आदिवासींना नेहमी विविध आजारांचा सामना करावा लागतो. आदिवासी भागात पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देणे, स्वच्छतेचे महत्व, आरोग्याचे महत्व याची विविध मार्गांनी जाणीव करून देणे असे उपक्रम सरकारने राबविल्यास परिस्थिती सुधारेल व आदिवासींच्या विकासास मदत होईल. शौचालये

बांधन्यास सरकारने आर्थिक मदत दिल्यास स्वच्छता वाढून साथीचे रोग आटोक्यात येण्यास मदत होईल.

११. वैद्यकीय उपचारांचे महत्व पटवून देणे

अलिकडे आदिवासींमध्ये वैद्यकीय उपचार घेण्याचे प्रमाण वाढलेले आहे. परंतु अजुनही अदिवासी समाजावर अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा यांचा पगडा मोठा आहे. तो कमी करण्यासाठी शिक्षणाचे प्रमाण वाढविणे गरजेचे आहे. आदिवासींच्या मनात डॉक्टरांबद्दल असणारी भिती कमी करणे गरजेचे आहे. वैद्यकीय सेवांची उपलब्धता जवळ उपलब्ध नसल्याने अनेक लोक पांरपारिक उपचार घेतात व त्याचे त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतात. आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या वाढविल्यास तसेच फिरते दवाखाने सुरू केल्यास व वैद्यकीय उपचारांचे महत्व पटवून दिल्यास आदिवासींचे वैद्यकीय सेवा घेण्याचे प्रमाण वाढेल व त्यामुळे त्यांचे आरोग्य उत्तम राहून ते उच्च दर्जाचे जीवन जगू शकतील. त्यासाठी सरकारने आदिवासींना वैद्यकीय सेवा मोफत किंवा नाममात्र दरात उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

१२. बालमृत्यू व माता मृत्यूचे प्रमाण कमी करणे

घरीच प्रसूती होण्याचे प्रमाण आदिवासींमध्ये आधिक आहे. त्यामुळे बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाणही जास्त आहे. ते कमी करण्यासाठी प्रत्येक गाव पातळीवर स्थानिक सुशिक्षित स्त्री नेमून तिच्या मार्फत गरोदर मातांची नोंदणी केल्यास व त्यांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्यास अर्भक मृत्यूचे तसेच बालमृत्यूचे प्रमाण कमी होईल. गरोदर स्त्रियांना डॉक्टरांकडून प्रसूती करण्याचे महत्व पटवून दिल्यास तसेच सरकारी दवाखान्यात प्रसूतीची मोफत सोय केल्यास माता मृत्यूचेही प्रमाण कमी होईल.

१३. सकस आहाराचे प्रमाण वाढविणे

आदिवासींमध्ये सकस आहार घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे त्यांचे सरासरी आयुर्मानही कमी आहे. आदिवासी विकास योजना प्रभावीपणे राबविल्यास आदिवासींच्या शेती उत्पादनात तसेच आर्थिक उत्पन्नातही वाढ होईल व त्यामुळे आदिवासी अधिक सकस आहार घेऊ शकतील. परिणामी त्यांच्या सरासरी आयुर्मानातही वाढ होईल तसेच राहणीमान व जीवनमानही सुधारेल.

१४. घरांचे क्षेत्रफळ वाढविणे आवश्यक

आदिवासींच्या घरांचे क्षेत्रफळ लहान आहे. त्या लहान क्षेत्रफळातच माणसे, जनावरे, अन्नधान्य व सामान-सुमान हे सर्व एकत्रच असते. त्याचा आदिवासींच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. सरकारने आदिवासींना घर बांधण्यासाठी आर्थिक स्वरूपात तसेच वस्तू स्वरूपात मदत दिल्यास ते आपल्या घरांचे क्षेत्रफळ वाढवू शकतील व त्यामध्ये माणसे, जनावरे व सामान-सुमान यासाठी वेगवेगळी सोय करू शकतील. त्यामुळे माणसे व जनावरे एकत्रित राहण्यामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टळतील.

१५. आदिवासी भागात विद्युतीकरण करणे गरजेचे

सह्याद्रीतील आदिवासी भागात वीजपुरवठा व विजेचा वापर अत्यंत कमी आहे. सरकारने वीज उत्पादन वाढवून आदिवासी भागात चोवीस तास वीजपुरवठा करणे गरजेचे आहे. आदिवासी गावे डोंगर-दऱ्यात, जंगल भागात वसलेलली असल्याने त्यांना विजेची अत्यंतिक गरज आहे. आदिवासींची परिस्थिती गरिबीची असल्याने त्यांना सद्यस्थितीतील दराने वीजवापर परवडत नाही. त्यामुळे सरकारने वीजवापराचे दर आदिवासींसाठी कमी करणे गरजेचे आहे. थोडक्यात सरकारने आदिवासी भागात कायम वीज पुरवठा केला व सवलतीच्या दराने वीज उपलब्ध करून दिली तर आदिवासींच्या आयुष्यातील अंधकार दूर होण्यास मदत होईल.

१६. आदिवासी विकास विभागाच्या योजनांचा प्रचार व प्रसार करणे

आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासींच्या उन्नतीसाठी विविध योजना राबविल्या जातात. संशोधनावरून असे आढळले की बहुतेक आदिवासी त्या योजनांच्या माहितीपासून अनभिज्ञ आहेत. उदा. २७५ ब, केंद्रवर्ती अर्थसंकल्प इ. त्यामुळे ते त्या योजनांपासून वंचित आहेत. परिणामी विकासापासून वंचित आहेत. आदिवासी विकास विभागाने योजनांची माहिती जाहिरातींच्या माध्यमातून आदिवासी गावांमध्ये प्रसारीत केल्यास लोकांना त्याची माहिती होईल. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने गावोगाव मेळावे भरवून आदिवासी विकास योजनांची माहिती सविस्तरपणे आदिवासींना दिल्यास ते योजनांचा मोठ्या प्रमाणात लाभ घेऊ शकतील. आदिवासी विकास योजनांचा जास्तीत जास्त लाभ आदिवासींना मिळवून देण्यासाठी सरकारने

प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र संपर्क अधिकारी हे पद निर्माण करून त्या अधिकाऱ्यामार्फत विविध योजनांची माहिती आदिवासीपर्यंत पोहोचविण्याची सोय करावी.

१७. आदिवासी विकास विभागाच्या योजनांपासून मिळणाऱ्या लाभाचे प्रमाण वाढविणे

आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक उन्नतीच्या योजनांचा लाभ घेण्याचे प्रमाण कमी आहे. योजनांचा लाभ घेण्यासाठी काही अटी व शर्ती पूर्ण कराव्या लागतात. अज्ञान, निरक्षरता, माहितीचा अभाव, गरिबी यामुळे आदिवासी अटी व शर्ती पूर्ण करण्यात असमर्थ ठरतात. परिणामी ते लाभांपासून वंचित राहतात. सर्वात महत्वाची अडचण कागदपत्रांची पूर्तता करण्यासंबंधी येते. पिढ्यानपिढ्या खातेवाटप न झाल्याने एकच शेतजमीन अनेकांच्या नावावर असते. योजनांचा लाभ घेण्यासाठी ती स्वतःच्या नावावर असावी लागते. त्यामुळे बहुसंख्य आदिवासी विकास योजनांच्या लाभांपासून वंचित आहेत. सरकारने महसूल विभागामार्फत आदिवासींच्या जमिनीचे न्याय वाटप करून खातेफोड केल्यास जमीन आदिवासी व्यक्तीच्या स्वतःच्या नावावर होईल व त्यामुळे आर्थिक उन्नतीच्या विविध योजनांचा लाभ घेणे आदिवासींना शक्य होईल. योजनांचा लाभ घेण्यासाठी कोणती कागदपत्रे कोठे उपलब्ध होतात याची माहिती प्रकल्प कार्यालयात उपलब्ध करून दिल्यास तसेच गावोगाव मेळावे घेऊन तेथे सविस्तर माहिती दिल्यास जास्तीत-जास्त आदिवासी आर्थिक उन्नतीच्या योजनांचा लाभ घेऊ शकतील. आदिवासी विकास योजनांचा जास्तीत जास्त आदिवासींना लाभ झाल्यास त्यांचे गुणात्मक जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

१८. योजनांचे सुसूत्रीकरण करणे आवश्यक

महाराष्ट्रातील प्रत्येक आदिवासी जमातीची भौगोलिक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती वेगवेगळी आहे. त्यामुळे त्यांच्या स्थानिक पातळीवरील गरजाही वेगवेगळ्या आहेत. सरकार आदिवासी विकास योजनांची अंमलबजावणी करताना सर्व महाराष्ट्रात एकच निकष वापरते. त्यामुळे अनेक योजना काही आदिवासी भागात अनावश्यक ठरतात. उदा. मासेमारी, मत्स्य व्यवसायाच्या योजना इत्यादी अशा योजना ज्या आदिवासी भागात मासेमारी करणे शक्य आहे त्याच भागात राबविण्यात याव्यात.

थोडक्यात आदिवासींची स्थानिक परिस्थिती व स्थानिक गरजा विचारात घेऊन योजनांचे सुसूत्रीकरण करण्यात यावे.

१९. शेती विकासाला प्रोत्साहन देण्याची गरज

बहुसंख्य आदिवासी हे शेतीवर अवलंबून आहेत. शेती हा त्यांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परंतु आदिवासींची शेती अत्यंत मागासलेली आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक विकासात अडथळे निर्माण झालेले आहेत. आदिवासींची शेती ही कोरडवाहू आहे. शेतीत पडीक व रेताड जमिनीचे प्रमाण अधिक आहे. बांधांमध्ये मोठ्या प्रमाणात शेतजमीन अडकलेली आहे.

कोरडवाहू शेतीच्या बांधांवर सिताफळ, बोर, आंबे यांसारख्या कमी पाण्यावर येणाऱ्या फळ झाडांची लागवड करण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तसेच पडीक व रेताड जमिनीवर कोरफड व इतर वनौषधींची लागवड केल्यास आदिवासींना मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकेल. प्रतिहेक्टरी उत्पादकता वाढविण्यासाठी कृषी विस्तार सेवा अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता आहे. ज्यामुळे त्यांची आर्थिक उन्नती होण्यास मदत होईल.

दुग्धोत्पादन, मृदसंधारण व फलोत्पादन योजनांचा लाभ आदिवासींना अत्यल्प प्रमाणात मिळालेला आहे. या योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे.

२०. मातृत्व अनुदान योजनेचा लाभ आदिवासींपर्यंत पोहचविणे आवश्यक

मातृत्व अनुदान योजनेचा लाभ आदिवासींना अत्यंत कमी प्रमाणात मिळालेला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिचारिकेमार्फत किंवा दाईमार्फत गरोदर मातांची गणना करण्यात यावी व मातृत्व अनुदान योजनेचा लाभ गरोदर आदिवासी मातांपर्यत पोहचविण्यात यावा.

२१. पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या वाढविणे

आदिवासी भागात पशुवैद्यकीय दवाखाण्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे आदिवासींच्या जनावरांना वेळेवर उपचार मिळत नाहीत म्हणून सरकारने आदिवासी भागात पशुवैद्यकीय दवाखाने, उपकेंद्रे तसेच फिरते पशुवैद्यकीय दवाखाने सुरू करणे आवश्यक आहे.

२२. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून योजनांचे मूल्यमापन करणे आवश्यक

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी विकास योजनांची कार्यवाही व अंमलबजावणी केली जाते. ज्या व्यक्तींना योजनांचा लाभ दिलेला आहे त्या व्यक्तींनी त्या योजनांचा उपयोग योग्य कारणासाठी केला आहे किंवा नाही याचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. मूल्यमापन न केल्यास योजनांचा दुरूपयोग होण्याची शक्यता असते. तथ्य संकलनात असे आढळले की एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून लाभार्थ्यांना भेट देण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे आदिवासी विकास योजनांची माहिती फारच थोड्या आदिवासींना आहे, तसेच त्यामुळे आदिवासी विकास योजनांचा दुरूपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी प्रकल्प कार्यालय स्तरावर किंवा वरिष्ठ कार्यालयामार्फत किंवा एखाद्या खाजगी संस्थेमार्फत योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे गरजेचे आहे. तसे केल्यास सरकारी पैशाचा दुरूपयोग होणार नाही आणि आदिवासींच्या विकासासही मदत होईल.

२३. सिंचन क्षेत्रात वाढ करणे

सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात पावसाळ्यात भरपूर पाऊस पडतो. ते सर्व पाणी वाहून जाते. पावसाचे पाणी अडविल्यास त्याचा शेतीसाठी उपयोग होईल व सिंचन क्षेत्रात वाढ होईल. लहान बंधारे, कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, मध्यम तलाव, शेततळे असे लहान प्रकल्प सुरू केल्यास सिंचनाखालील जमिनीचे प्रमाण वाढेल. मोठ्या प्रकल्पांमुळे लोकांचे विस्थापन होते. त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होतो. स्थानिक लोकांचे विस्थापन होणार नसेल आणि पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होणार नसेल तरच मोठे जलसिंचन प्रकल्प हाती घ्यावेत अन्यथा ते टाळावेत. एक गाव एक बंधारा हे तत्व वापरल्यास शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल. ज्या ठिकाणी विहिरी खोदणे, बोअरवेल घेणे शक्य आहे तेथे विहिरी खोदाव्यात व बोअरवेल घ्यावेत. आदिवासी विकास विभागाने त्यासाठी अधिक अनुदान द्यावे. पाणी आडवा पाणी जिरवा, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम असे उपक्रम राबवून सिंचन क्षेत्रात वाढ केल्यास आदिवासींच्या शेती उत्पादनात वाढ होईल व त्यांचा विकास होईल.

२४. सरकारने शेतकऱ्यांना आधुनिक पध्दतीने शेती करण्यासाठी संकरित बी-बियाणे, आधुनिक शेती औजारे, खते, किटकनाशके यांचा स्वस्तात पुरवठा करावा. तसेच त्यांच्या वापराचे प्रशिक्षण देण्यात यावे. कृषी विस्तार सेवा कार्य अधिक प्रभावी करावे.

२५. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाने आदिवासी भागात शेतमाल प्रक्रिया उद्योग सुरू करावेत तसेच शेतमाल, गौण वनौपजे यांची बाजारभावापेक्षा अधिक दराने खरेदी करावी त्यामुळे आदिवासींना अधिक उत्पन्न मिळेल.

२६. सह्याद्रीतील आदिवासी भागात पायाभूत सुविधांची अत्यंत कमतरता आहे. सरकारने या सुविधा निर्माण कराव्यात. त्यामुळे निर्सगसंपन्न आदिवासी भागात पर्यटन विकासाला चालना मिळेल.

२७. आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी अल्पकालीन, मध्यमकालीन व दिर्घकालीन नियोजन करण्याची गरज आहे.

२८. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील रिक्त पदे त्वरित भरण्यात यावीत. त्यामुळे आदिवासींना विविध योजनांखालील सुविधा जलद गतीने मिळू शकतील आणि इतर कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी होईल.

२९. संशोधनासाठी तसेच लोकांच्या माहितीसाठी प्रकल्प कार्यालयाने केलेल्या कार्याची माहिती उपलब्ध करून द्यावी.

३०. प्रकल्प अधिकाऱ्यांना योजनांचे नियोजन करताना, योजना राबविताना, त्यांचे नियंत्रण करताना व त्यांचे मुल्यमापन करताना अडचणी येतात. त्या अडचणी सरकारने दूर कराव्यात.

३१. प्रकल्प कार्यालयांचे कार्यक्षेत्र मोठे आहे ते कमी करण्यात यावे किंवा उपकार्यालये सुरू करण्यात यावीत.

३२. प्रकल्प अधिकाऱ्यांना प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात यावेत. कार्यक्षम प्रशासनासाठी भारतीय प्रशासन सेवा (IAS) व भारतीय वन सेवा (IFS) मधील अधिकाऱ्यांची नियुक्ती प्रकल्प अधिकारी म्हणून करावी. सध्या प्रकल्प अधिकाऱ्यांची

पदे पदोन्नतीने व सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे पदोन्नतीने तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जातात.

३३. आदिवासी विकास योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी प्रकल्प कार्यालयांत स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात यावी.

३४. आदिवासी विकास आयुक्तालय व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्या मार्फतही आदिवासी विकास योजनांचे प्रतिवर्षी परीक्षण करण्यात यावे.

३५. आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी प्रकल्प अधिकारी तसेच प्रकल्प कार्यालयातील कर्मचारी यांना 'यशदा' पुणे व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्यामार्फत सक्तीने प्रशिक्षण देण्यात यावे.

३६. आदिवासींच्या विकासासाठी उल्लेखनीय कामगिरी करणारे अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना सरकारतर्फे पुरस्कार देण्यात यावेत.

३७. प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील आदिवासी लोकसंख्या, योजनांचा लाभ घेललेल्या व्यक्तीची संख्या, लाभ न घेतलेल्या व्यक्तीची संख्या व त्याची कारणे इत्यादींची माहिती प्रकल्प कार्यालयाकडे असावी. त्यासाठी आदिवासी विकास विभागाने प्रकल्प कार्यालयात स्वतंत्र व्यवस्था करावी.

३८. आदिवासी भागातील प्रत्येक आश्रमशाळेकडे कार्यक्षेत्रातील गावे, त्यांची लोकसंख्या, ० ते ५ वयोगटातील मुलांची संख्या, ५ ते १० वयोगटातील मुलांची संख्या, शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या, शाळेत न जाणाऱ्या मुलांची संख्या इत्यादींची माहिती असावी. तसेच जी मुले शाळेत येत नसतील ती मुले शाळेत येण्यासाठी आश्रमशाळेतर्फे विशेष प्रयत्न करण्यात यावेत.

३९. आश्रमशाळांमधील शिक्षकांची व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे त्वरित भरण्यात यावीत.

४०. आश्रमशाळांना आवश्यक त्या सर्व सुविधा सरकारने उपलब्ध करून द्याव्यात.

४१. आश्रमशाळेतील मुलांना वेळेवर, पोटभर व सकस आहार दिला जातो किंवा नाही त्याचे परीक्षण प्रकल्प कार्यालय तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांतर्फे करण्यात यावे.

४२. विद्यार्थ्यांची प्रत्येक महिन्याला वैद्यकीय तपासणी करण्यात यावी.

४३. आश्रमशाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेण्याची सोय उपलब्ध करून द्यावी. औपचारिक शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षणही देण्यात यावे.

४४. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलण्यासाठी वेगवेगळ्या विषयातील तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आश्रमशाळांमध्ये आयोजित करण्यात यावीत.

४५. आदिवासी आश्रमशाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आदिवासी विकास मंत्रालय व शिक्षण मंत्रालयातर्फे त्यांचे परीक्षण करण्यात यावे.

४६. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसाठी शिक्षणाची अट घालण्यात यावी. पदाधिकाऱ्यांना सहकाराचे प्रशिक्षण सक्तीने देण्यात यावे. पदाधिकाऱ्यांनी सहकारी संस्थांच्या कार्यात अधिक योगदान देण्याची आवश्यकता आहे.

४७. सावकार, व्यापारी व दलाल यांच्याकडून आदिवासींची कर्जासाठी होणारी पिळवणूक व शोषण थांबविण्यासाठी आदिवासी भागात सहकारी संस्थांची संख्या वाढविण्यात यावी.

४८. आदिवासी शेतकरी, भूमिहीन शेतमजूर, ग्रामीण कारागीर, स्वयंरोजगार करणाऱ्या व्यक्ती यांना अल्प दराने कर्जपुरवठा करण्यात यावा.

४९. आदिवासी शेतकऱ्यांना पीकनिहाय बिनव्याजी किंवा १ ते ३ टक्के दराने कर्ज देण्यात यावे. शासनामार्फत आदिवासींच्या पिकांचा मोफत विमा उतरविण्यात यावा.

५०. आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर, स्वयंरोजगार उपलब्ध करणाऱ्या व्यक्ती यांना अधिक-अधिक संख्येने कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी संस्थांनी प्रयत्न करावेत. दिलेल्या कर्जांचे काटेकोरपणे मूल्यमापन करावे.

५१. खावटी कर्ज आदिवासींना अधिक उपयुक्त असल्याने त्यावरील व्याजाचे दर अत्यल्प ठेवावेत. कर्ज थकबाकी कमी करण्यासाठी उपाय-योजना करण्यात याव्यात.

५२. सरकारने आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमार्फत आदिवासींना देण्यात येणाऱ्या कर्जाची मर्यादा वाढवून द्यावी.

महाराष्ट्र सरकारच्या आदिवासी विकास विभागातर्फे आदिवासींच्या उन्नतीकरिता ज्या विविध विकासाच्या योजना राबविल्या जातात त्या आदिवासींच्या विकासासाठी निश्चितच फायदेशीर आहेत. विकास योजनांची कार्यवाही व अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नसल्याने आदिवासींच्या विकासात अडथळे निर्माण झाले आहेत. योजनांचे सुसूत्रिकरण करणे आवश्यक आहे. लाभार्थी निवड, लाभार्थ्यांना प्रशिक्षण, लाभाचा योग्य उपयोग, योजनांची योग्य अंमलबजावणी व योजनांचे मूल्यमापन या बाबी अधिक महत्वाच्या आहेत. विशेषता आर्थिक उन्नतीच्या योजना अधिक चांगल्या रितीने राबविणे आवश्यक आहे.

आदिवासी भागात शिक्षण, आरोग्य सुविधा, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, वाहतूक व दळणवळण सुविधा, रोजगाराची उपलब्धता या सर्व सुविधा चांगल्या प्रतीच्या उपलब्ध करून दिल्या व आदिवासी विकास योजना अधिक प्रभावीपणे राबविल्या तर आदिवासींचे गुणात्मक जीवनमान निश्चितच उंचावेल.

***

संदर्भ (References)

१. डॉ. संत दु. का.- संशोधन पध्दतीः प्रक्रिया व अंतरंग, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, जानेवारी २००७ पृ. २१४

२. वर्मा आर. सी. (अनुवाद-क्षीरसागर मनोज) - भारतीय जमाती काल, आज आणि उद्या, प्रकाशन विभाग, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार २००३ पृ. १९४,१९५

३. डॉ. गारे गोविंद - आदिवासींच्या समस्या विचार आणि विश्लेषण, आदिवासी समाजविज्ञान प्रकाशन नाशिक, १९७६ पृ.- ३१ ते ३७, ९० ते १२०, १३७ ते १४८.

४. Dr. Gare G. M. (Edited) - Review of Tribal Research Studies, TRTI Pune, 1988, page no. 15, 22, 23, 86, 87, 103, 107, 134, 163 to 167

५. वार्षिक आदिवासी उपयोजना, महाराष्ट्र शासन २००४-०५ पृ. ४३७,४४७

६. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, ११ ऑगस्ट, २००८

७. दैनिक लोकसत्ता, ४ ऑगस्ट, २००८

संदर्भ सूची (Bibliography)

संदर्भ ग्रंथ

१. अवचट अनिल – *'कार्यरत'* मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, नोव्हेंबर १९९७

२. आत्रे त्रि. ना. – *'गाव गाडा'* वरदा, सेनापती बापट मार्ग, पुणे-१६, तिसरी आवृत्ती १९८७

३. आगलावे प्रदीप – *'संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र'* विद्या प्रकाशन, नागपूर, २०००

४. ओडिआर सुशिला – *'सामाजिक संशोधन'* अजब पुस्तकालय, कोल्हापूर, पहिली आवृत्ती १९८१

५. कसबे रावसाहेब – *'मानव आणि धर्मचिंतन'* सुगावा प्रकाशन, पुणे.

६. कशाळीकर माधव व कांबळे जयंत – *'आदिवासी भारत'* अजब प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १९८८

७. कर्वे इरावती – *'मराठी लोकांची संस्कृती'* देशमुख आणि कंपनी, पुणे प्रथम आवृत्ती १९६२

८. कारखानीस सरला (अनु.) – *'आर्थिक सिद्धांत व अर्धविकसित प्रदेश'* महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

९. कुलकर्णी कृ. पा. – *'मराठी भाषाः उद्‌गम व विकास'* मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, १९७३

१०. कुलकर्णी वि. श्री. – *'भारतातील आदिवासी वंश'* महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२

११. कुलकर्णी शरद – *'आदिवासींच्या जमीनींचे हस्तांतर-नवा कायदा'* ग्रामायान प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९७४

१२. केतकर श्रीधर – *'महाराष्ट्रीय ज्ञानकोष विभाग ११'* महाराष्ट्रीय मंडळ, लि. नागपूर, १९७१

१३. गारे गोविंद –

१. *'सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी'* आदिम साहित्य, श्रीधरनगर, धनकवडी, पुणे, द्वितीय आवृत्ती (सुधारित) २००३

२. *'आदिवासी प्रश्न'* आदिम प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९७५

३. *'आदिवासींच्या समस्याः विचार आणि विश्लेषण'* आदिम साहित्य, पुणे, प्रथम आवृत्ती १९७५

४. *'भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती'* आदिम प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९८६

५. *'आदिवासी कला विश्व'* आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, प्रथम

आवृत्ती १९८६

६. ***'महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती समस्या व विकास'*** रौप्य महोत्सवी विशेषांक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, १९८८

७. ***'आदिवासी विकासाचे शिल्पकार'*** श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९१

८. ***'आदिवासी प्रश्न आणि परिवर्तन'*** अमृत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९९४

९. ***'आदिवासींचे शिक्षण'*** साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९९७

१०. ***'आदिवासी विकास योजना'*** आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे, प्रथम आवृत्ती १९९८

११. ***'आदिवासींच्या समस्या आणि बदलते संदर्भ'*** सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती जुलै २०००

१२. ***'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती : सामाजिक व सांस्कृतिक मागोवा'*** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०००

१३. ***'बदलाच्या उंबरठ्यावरील कोकणा आदिवासी'*** श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०००

१४. ***'वारली चित्र संस्कृती'*** श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २०००

१५. ***'सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील ठाकूर (ठाकर) आदिवासी'*** श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००२

१६. ***'आदिवासी बंडखोर'*** आदिवासी विकास प्रतिष्ठाण, पुणे,२००२

१७. ***'नक्षलवादी आणि आदिवासी'*** सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती,२००३

१८. ***'आदिवासी साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषणे'*** सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १५ ऑगस्ट २००५

१४. गावीत नजुबाई – ***'आदोर'*** अभिजात प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती ७ नोव्हेंबर १९९५

१५. घारपुरे विठ्ठल – ***'भूगोल परिचय'*** पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पहिली आवृत्ती जुलै २००२

१६. घोटाळे रा. ना. – ***'समाजशास्त्रीय संशोधन तत्त्व'*** श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

१७. जाधव सुदाम – ***'आदिवासी साहित्य'*** सुलबा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९९९

१८. जोशी पंडित महादेवशास्त्री – ***'भारतीय संस्कृती कोष खंड १, २, ३, ४'***, भारतीय संस्कृती कोष मंडळ, पुणे, १९६२-७०

१९. जोशी लक्ष्मणशास्त्री – ***'मराठी विश्वकोष खंड १,२,३,४,१२'***, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष मंडळ, महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६

२०. जोशी सिताराम (संपा.) – ***'आदिवासी विकास योजना'*** आदिवासी समाज कृती समिती, पुणे

२१. जोगळेकर स. आ. – ***'सह्याद्री'*** प्रसाद प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९३

२२. तुमराम विनायक –

१. ***'आदिवासी साहित्य स्वरुप व समीक्षा'*** विजय प्रकाशन, नागपूर, १९७४

२. ***'कोष्टी व हलबा-हलबी शोध आणि बोध'*** हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, २०००

२३. दास्ताने संतोष -

१. ***'महाराष्ट्र-२००२'*** दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे

२. ***'महाराष्ट्र-२००५'*** दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे

३. ***'महाराष्ट्र-२००७'*** दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे

४. ***'भारत एक पाहणी'*** दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९९५

२४. दांडेकर वि. म. व जगताप म. आ. – ***'महाराष्ट्राची ग्रामीण समाज रचना'*** गोखले अर्थशास्त्र संशोधन संस्था, पुणे, १९५७

२५. दीक्षित मिनाक्षी (अनु.) – ***'वंश आणि वंशवाद'*** महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथम आवृत्ती १ जुलै १९८४

२६. देशमुख आण्णासाहेब – ***'डोंगराने कात टाकली'*** श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९९५

२७. देशमुख प्र. रा. – ***'सिंधु संस्कृती, ऋग्वेद आणि हिंदू संस्कृती'*** प्रज्ञा पाठशाळा मंडळ, वाई, १९६६

२८. देवगावकर शैलजा –

१. ***'महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य'***, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९८३

२. ***'वैदर्भिय आदिवासी जीवन आणि संस्कृती'*** मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८

२९. देसाई श्री. मु. व भालेराव निर्मल – ***'भारतीय अर्थव्यवस्था'*** निराली प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती

३०. देशपांडे श्रीधर व देशपांडे विनायक – ***'भारतीय अर्थव्यवस्था'*** (संक्रमण आणि विकास) हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, पहिली आवृत्ती २००४

३१. नाडगोंडे गुरुनाथ – ***'भारतीय आदिवासी'*** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९

३२. **'नागरिकांची सनद'** – आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, १९९५

३३. नारगोळकर कुसूम – ***'जंगलचे राजे'*** मौनी विद्यापीठ प्रकाशन, गारगोटी, कोल्हापूर, १९५५

३४. परूळेकर गोदावरी – ***'जेव्हा माणूस जागा होतो'*** मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९८२

३५. पराडकर म. शा. – ***'भारतीय सामाजिक समस्या'*** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, मुंबई,

प्रथम आवृत्ती १९७४

३६. पिंगळे भीमराव – ***'वनवासी व उपेक्षित जग'*** अभिनव जीवन प्रकाशन, बीड, प्रथम आवृत्ती १९९०

३७. पुजारी कृष्णकुमार – ***'समाज व्यवस्था, सामाजिक परिवर्तन व सामाजिक संस्था'*** राधेय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती १९७४

३८. फडके सुधीर – ***'महाराष्ट्रातील आदिवासी व त्यांचे प्रश्न'*** जोशी व लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६३

३९. बाबर सरोजिनी – ***'आदिवासींचे सण उत्सव'*** महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य मंडळ, पुणे, १९८३

४०. बोरुडे रा. र. – ***'संशोधन पद्धतीशास्त्र'*** पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००५

४१. भगत एस. जे. – ***'कोळी समाज दर्शन'*** कोळी समाज दर्शन प्रकाशन, मुंबई, १९८३

४२. भांडारकर पु. ल. – ***'सामाजिक संशोधन पद्धती'*** महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९९९

४३. मंडलिक वसंत – ***'मागासवर्गीय जाती-जमातींसाठी जातीचा दाखला कसा मिळवावा?'*** नवनीत प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९९१

४४. मांडवकर भाऊ –

१. ***'कोलाम'*** सेवा प्रकाशन, अमरावती, प्रथम आवृत्ती १९६६

२. ***'आदिम'*** सेवा प्रकाशन, अमरावती, प्रथम आवृत्ती १९८३

४५. मुठे सुमन – ***'आदिवासी स्त्री जीवन'*** सुगावा प्रकाशन, पुणे

४६. मोरे माधव बडू – ***'आदिवासी बोलू लागला'*** सुगावा प्रकाशन, पुणे

४७. सहस्त्रबुद्धे अनिल – ***'डांगाणी'*** परिमल प्रकाशन, औरंगाबाद

४८. संत दु. का. – ***'संशोधन पद्धती : प्रक्रिया व अंतरंग'*** पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, जानेवारी २००७

४९. संगवे विलास – ***'आदिवासींचे सामाजिक जीवन'*** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती १९७८

५०. सातोस्कर बा. द. –

१. ***'रामायण काळातील जमाती व संस्कृती'*** शुभदा प्रकाशन, पुणे, १९८९

२. ***'गोमंतक : प्रकृती आणि संस्कृती'*** सारस्वत प्रकाशन, पुणे

५१. साळुंके आर. एम. – ***'महाराष्ट्रातील सहकारी कृषी पतपुरवठा'*** संवेदन प्रकाशन, औरंगाबाद, २००२

५२. हळवे एस. के. – ***'समाजशास्त्र विकास आणि भारतीय समाज'*** अहमदनगर कॉलेज प्रकाशन, अहमदनगर, पहिली आवृत्ती १९६४

५३. Borse M. N. – '***Research Methodology, Modern Methods and New Techniques'***.
५४. Chapekar L. N. – '***Thakurs of Sahyadri***', University of Bombay (1964)
५५. Datt Ruddar & Sundharam K. P. M. – '***Indian Economy***' S. Chand and Company Ltd. Ram Nagar, New Delhi, Fifty Fifth Edition (2007)
५६. Gare G. M. – '***Tribals in an Urban Setting***', Shubhade Saraswati, Pune, 1975
५७. Gare G. M. – '***Tribals in Maharashtra***', Tribal Research & Training Institute, Pune, 1962
५८. Gare G. M. (Ed.) – '***A Review of Tribal Research Studies***', TRTI, Pune, 1988
५९. Gandhi Malli – '***Denotified Tribes: Dimensions of Change***' Kanishka Publishers & Distributors, New Delhi, 1st Edition, 2008
६०. Ghurye G. S. – '***The Mahadev Koli's***', Popular Prakashan, Bombay, 2nd Edition, 1963
६१. Ghurye G. S. – '***Caste and Race in India***', Popular Prakshan, Bombay, 1st Edition, 1969
६२. Ghurye G. S. – '***The Scheduled Tribes***', Bombay, 1963
६३. Gupta Santosh – '***Research Methodology and Statistical Techniques'***
६४. Jain Navinchandra & Tribhuwan Robin – '***Mirage of Health and Development***', Vidya Nidhi Publication, Pune, 1st Edition, 1996
६५. Kharche R. M. – '***Sugar co-ops in Developing Economy***' Parimal Prakashan, Aurangabad, 1st Edition, 1989
६६. Kothari C. R. – '***Research Methodology, Methods & Techniques***', New Age International Publishers, 2nd Edition, 2004
६७. Krishnaswami O. R. & Ranganathan M. – '***Methodology of Research in Social Sciences***' Himalaya Publishing House, Delhi, 2nd Edition, 2005
६८. Negi R. S. & Gaikwad John – '***Socio-Cultural Dynamics of Tribal Development***', TRTI, Pune
६९. Sadhu A. N. & Singh Amarjit – '***Research Methodology in Social Sciences***', Himalaya Publishing House, New Delhi, 1st Edition 1999
७०. Sen Amartya – '***Development as Freedom***', Oxford University Press, New Delhi
७१. Singh K. S. – '***The Scheduled Tribes***' Oxford University Press, New Delhi
७२. Young P. V. – '***Scientific Social Survey and Research***' Prentice Hall of India, New Delhi, 4th Edition – 1968

पी.एच्.डी. प्रबंध

१. जाधव छाया – *'एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा सन १९९०-९५ या कालखंडातील अभ्यास व मूल्यमापन – विशेष संदर्भ आंबेगाव तालुका, जिल्हा पुणे'*. पुणे विद्यापीठ, २००५

२. देशमुख बी. वाय.– *'आदिवासी विकास योजनांचा अकोले तालुक्यातील आदिवासींच्या शेती, शेतकरी व संलग्न व्यवसायावर झालेला परिणाम एक चिकित्सक अभ्यास'* पुणे विद्यापीठ, २००४

३. Bhosekar V. V. – '***Co-operative Movement in Dhulia District***', Pune University, 1979

४. Gare G. M. – '***Tribals in an Urban Setting - A Case Study of Mahadeo Koli's***' Ghokhale Institute of Politics and Economics, Pune University, 1971

५. Gautam Manu – '***Public Distribution System and Sustains of Tribals a Study of Western Tribal Belt of Madhya Pradesh***', University of Pune, 2003

६. Jagabandhu Samal – '***Some Aspects of Tribal Economy – A Case Study of Koraput District (Orissa)***' Gokhale Institute of Politics & Economics, Pune, 1992

७. Kambale B. N. – '***Effectiveness of Development Programmes for Scheduled Castes and Scheduled Tribes in Maharashtra***' University of Pune, 1995

८. Pol Amrut V. – '***Economic Change Among Tribals***' University of Bombay, 1985

९. Sathe M. D. – '***Economic Study of a Region with Special Reference to the Consumption Pattern – A Tribal Region in a Ahmednagar District, Maharashtra State'***, Gokhale Institute of Politics and Economics, University of Pune, 1967

१०. Shah Niranjan – '***Economics of Shifting Cultivation in Assam***', University of Pune,1970

११. Upadhya Ashok – '***Peasantisation of Adivasis in Thane District 1818 to 1947***', University of Pune, 1982

एम.फिल. लघुप्रबंध/ लघुप्रबंधिका

बच्छाव अे. वाय. – ***'महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या कार्याचे मूल्यमापन – विशेष संदर्भ साक्री तालुका (१९७८-७९ ते १९९०-९१)'*** पुणे विद्यापीठ, १९९३

चौधरी विनायक नामदेव– ***'वाडा तालुक्यातील आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था : एक अध्ययन'*** पुणे विद्यापीठ, १९९२

शासन निर्णय, अहवाल, गॅझेटिअर्स, जनगणना अहवाल व इतर

१. अनुसूचित जाती व जमाती आदेश सुधारित कायदा १९७६ मधील भाग ९ क्र १९७६ चा १०८

२. अनुसूचित जाती-जमातीच्या कल्याणाच्या योजना आणि १९८८-८९ च्या अर्थसंकल्पासाठी केलेल्या तरतुदी, महाराष्ट्र शासन, १९८८

३. महाराष्ट्र - रोड ॲटलास, समर्थ उद्योग प्रकाशन, औरंगाबाद

४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (२००६ पर्यंत सुधारित)

५. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादित, नाशिक

१. ३१ वा वार्षिक अहवाल – २००२-२००३

२. ३२ वा वार्षिक अहवाल – २००३-२००४

१. ३३ वा वार्षिक अहवाल – २००४-२००५

४. ३४ वा वार्षिक अहवाल – २००५-२००६

६. वार्षिक आदिवासी उपयोजना – २००४-०५, २००५-०६, २००६-०७, २००८-०९, २००९-१० आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

७. शासन निर्णय क्र. आ.उ.यो. १०९१/प्र.क्र.११/का.६/आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २१ सप्टेंबर १९९२

८. शासन निर्णय क्र. न्यु.ब.यो. – २०००/प्र.क्र.१४४/अ.का.-५, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, ३१ मे २००१

९. शासन निर्णय क्र. संकीर्ण २००३/प्र.क्र.५३/का.९ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २५ फेब्रुवारी २००४
१०. शासन निर्णय क्र. टी.एस.पी. २००३/प्र.क्र.१०१/मा.६ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २६ जुलै २००४
११. Census of India 2001, Maharashtra Series 28, Volume-II
१२. Census of India 2001, Scheduled Tribe Atlas of India
१३. Gazeteer of Ahmednagar District
१४. Gazeteer of Nashik District
१५. Gazeteer of Pune District
१६. Gazeteer of Thane District
१७. Krishnan S. Raju – 'Changing Socio-Economic Profile of the Tribal Population in India', During (1961-1991)
१८. Kulkarni M. G. – ' Problems of Tribal Development – A Case Study of Harsul Block, Nashik District (Maharashtra), Gokhale Institute Mimeograph, Pune, Series No.3, 1968
१९. Report of the Depressed Classes and the Aboriginal and Hill Tribes Inquiry Committee (Starte Committee), Bombay State, 1929
२०. Report on Aboriginal and Hill Tribes in Partially Excluded Area of Bombay Province Government (Symington Report), Central Press Bombay, 1938
२१. Universal Bench Mark Survey 1996-97, Tribal Research and Training Institute, Pune

नियतकालिके, त्रैमासिके, मासिके, वृत्तपत्रे इ.

१. ऋषी मेसराज – *'आदिवासींच्या सामाजिक चळवळी'* हाकारा, एप्रिल-जून १९८३
२. गायकवाड जॉन – *'आदिवासी विकासातील सामूहिक लाभाच्या योजना'* आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, मार्च १९८५
३. गोसावी मो. रा. – *'आदिवासींसाठी कल्याणकारी योजना'* आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, मार्च १९९७
४. जोशी सीताराम – *'आदिवासी विकास योजना'* आदिवासी समाज कृती समिती, पुणे, १९८८
५. तिकोने पी. आर – *'आदिवासी शेतकऱ्यांकरिता राबविण्यात येत असलेल्या राज्य व केंद्र शासनाच्या कृषी व तत्संबंधीच्या निवडक योजना'* आदिवासी संशोधन

पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, सप्टेंबर १९८८

६. देशमुख वैशाली व कुलकर्णी शरद – **'आदिवासी मातांचे त्यांच्या बालकांच्या स्वास्थ्य व पोषणाविषयी ज्ञान, मतप्रणाली व अवलंबन मानसिकता, मूल्यांकनात्मक दृष्टीकोन'**, आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, मार्च २०१०

७. शेवकरी सो. रा. – **'आदिवासी उपयोजना, आदिवासी विकासाचा मानबिंदू'**, आदिवासी संशोधन पत्रिका, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, मार्च १९९५

८. ***दैनिक सम्राट*** - सोमवार ४ एप्रिल २००५

९. ***दैनिक सम्राट*** - शुक्रवार ८ एप्रिल २००५

१०. ***दैनिक लोकसत्ता*** – ४ ऑगस्ट २००८

११. ***दैनिक महाराष्ट्र टाईम्स*** – ११ ऑगस्ट २००८

Webliography

Following websites referred from 2005 to 2010.

1. www.ilo.org/indigenons
2. www.tribal.maharashtra.gov.in
3. www.trti.mah.nic.in
4. www.rapidshare.com
5. www.freebooksonline.com

पुणे विद्यापीठ, अर्थशास्त्र विभाग,
आदिवासी विकास योजनांचा सह्याद्री विभागातील आदिवासींच्या गुणात्मक जीवनमानावर झालेला परिणाम

मार्गदर्शकाचे नांव : डॉ. आर. एम. खर्चे
संशोधकाचे नांव : प्रा. एस. एस. देशमुख

(I) क्षेत्र ओळख

(१) जिल्हा (२) तालुका
(३) गांव (४) पाडा
(५) प्रकल्प

(II) वैयक्तिक माहिती

२.१ नांव
२.२ वय
२.३ लिंग
२.४ जमात
२.५ कुटुंबांची बोलीभाषा

२.६ शिक्षण

☐ निरक्षर ☐ प्राथमिक ☐ माध्यमिक
☐ उच्च माध्यमिक ☐ महाविद्यालय ☐ विद्यापीठ
☐ पी.एच.डी

२.७ वैवाहिक स्थिती

☐ अविवाहित ☐ विधवा/विधूर ☐ विवाहित
☐ घटस्फोटीत ☐ इतर

(III) कुटुंबाची माहिती

अ.क्र.	नांव	माहिती देणाऱ्याशी नाते	लिंग	वय	शिक्षण	शाळा सोडली	व्यवसाय	वार्षिक उत्पन्न
१	२	३	४	५	६	७	८	९

३.१ शाळा गळतीचे प्रमाण

अ.क्र.	शिक्षणाचे वर्गीकरण	माहिती देणाऱ्याशी नाते	लिंग	वय	शिक्षण	शाळा सोडली	व्यवसाय	वार्षिक उत्पन्न
१	२	३	४	५	६	७	८	९
१.	प्राथमिक							
२.	माध्यमिक							
३.	उच्च माध्यमिक							
४.	पदवी							
५.	पदव्युत्तर							
६.	तांत्रिक शिक्षण							
७.	बिगर तांत्रिक							
८.	पदविका							

(IV) आर्थिक उत्पन्नाचे साधन

(अ) जमीन

अ.क्र.	साधन		१ हे पेक्षा कमी	१ ते २ हेक्टर	२ ते ३ हेक्टर	३ हे पेक्षा जास्त
१.	जमीन क्षेत्रफळ	(अ) बागायत				
		(ब) जिरायत				

२. **शेतीस पाणी पुरवठा?**

विहिरीद्वारे ☐ तलाव ☐ कुपनलिका ☐ नदी/नाला ☐

(ब) उदर निर्वाहासाठी स्थलांतर करावे लागते का? होय ☐ नाही ☐ कालावधी ☐

(क)	इतर उत्पन्न	संख्या	वय/वर्ष	रूपये
१.	मोलमजूरी			
२.	वीटभट्टी मजूरी			
३.	शेतमजूरी			
४.	मोळ्या विकणे			
५.	जंगलातील उत्पादन वस्तू			
६.	इतर			
७.	नोकरी/दुकान			
			एकूण	

(ड) मजूरी मिळण्याचा कालवधी दिवस

१.	जानेवारी ते मार्च	→	
२.	एप्रिल ते जून	→	
३.	जुलै ते ऑक्टोबर	→	
४.	ऑक्टोबर ते डिसेंबर	→	
			एकूण

(इ) जमिनीची मशागत

१) जमिनीची मशागत कशाच्या साह्याने करतात?

बैल ☐ ट्रॅक्टर ☐

२) नांगरणी

एकेरी ☐ दुहेरी ☐ वखरणी ☐

३) बियाणांचा वापर

पारंपारिक ☐ संकरित ☐ प्रमाणित ☐ औषधेयुक्त बियाणे ☐

४) रासायनिक खते, किटकनाशके, तृणनाशके यांचा वापर करतात का? होय ☐ नाही ☐

५) शेती मशागतीची तांत्रिक माहिती आहे काय? होय ☐ नाही ☐

६) असल्यास ती कोठून मिळाली?

कृषी अधिकारी ☐ आदिवासी विकास विभाग ☐ पंचायत समिती ☐
वर्तमानपत्र ☐ रेडिओ ☐ दूरदर्शन ☐

ई) धान्य उत्पादन

मागील वर्षात मालकीच्या जमिनीतून प्राप्त झालेले अन्नधान्य

अ.	तांदूळ	किलो
ब.	नाचणी	किलो
क.	वरई	किलो
ड.	ज्वारी	किलो
इ.	बाजरी	किलो
फ	इतर	किलो
फ		किलो

उ) सदर धान्य किती महिने पुरते?

१ ते २ महिने ☐ २ ते ४ म. ☐ ४ ते ६ म ☐ ६ ते ८ म. ☐ वर्षभर ☐

ऊ) **तुमच्या शेतात कोणते कडधान्य व पालेभाज्या होतात?**

(V) संपत्ती

	संपत्ती	**नग**	**दर**	**एकूण**
१.	सायकल			
२.	मोटार सायकल/स्कूटर			
३.	दागदागिने			
४.	टी.व्ही.			
५.	पंखा			
६.	फ्रिज			
७.	भांडे			
८.	घडयाळ			
९.	टेबल/खुर्ची			
१०.	गॅस			
११.	स्टोव्ह			
१२.	पशुधन			
	१. गाय			
	२. बैल			
	३. म्हैस			
	४. शेळ्या			
	५. कोंबड्या			
	६. इतर			

१३. पशुधन संख्या

अ.क्र.	गाई			म्हशी			बैल	खोंड/ गोऱ्हे	रेडे	शेळ्या	वराह	कोंबड्या
	दुभत्या	भाकड	कालवडी	दुभत्या	भाकड	कालवडी						

१४. गाय/म्हैस- दुग्ध उत्पादन

१४.१ गाय/म्हैस किती दूध देते?

१ ते ३ लिटर ☐ ३ ते ५ लिटर ☐ ५ ते ७ लिटर ☐ ७ लि. पेक्षा जास्त ☐

अ) घरी किती दूध वापरतात? १ लि.पेक्षा कमी ☐ १ ते २ लि. ☐ २लि.पेक्षा जास्त ☐

ब) किती दूध विकतात?

१ ते २ लि. ☐ २ ते ५ लि ☐ ५ ते ७ लि ☐ ७ लि. पेक्षा जास्त ☐

१५.शेती अवजारे

अ.	बैलजोडी	संख्या
ब.	नांगर	
क.	वीज पंप / तेलइंजिन	
ड.	पाईप लाईन	
इ.	फावडे/कुदळ	
ई.	पाट्या/टोपल्या	
फ.	विळे/कोयते	

(VI) जीवनमान

अ) आरोग्य व पिण्याचे पाणी

६.१ पिण्याचे पाणी कोठून उपलब्ध होते?

बोलरवेल ☐ विहीर ☐ हातपंप ☐ नदी/ओढा ☐ नळ योजना ☐ इतर ☐

६.२ पिण्याचे पाणी वर्षभर पुरेसे मिळते का? होय ☐ नाही ☐

६.३ पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण केले जाते का? होय ☐ नाही ☐

६.४ पिण्याचे पाणी घरात उकळून पीता का? होय ☐ नाही ☐

६.५ गेल्या दोन वर्षात तुमच्या कुटुंबात ० ते ५ वयोगटातील मुलगा-मुलगीचा मृत्यु झाला आहे का? होय ☐ नाही ☐

होय असल्यास-

अ.क्र.	मुला/मुलीचे नाव	लिंग	वय	मृत्युचे कारण
१.				
२.				
३.				

६.६ गेल्या दोन वर्षात तुमच्या कुटुंबात १८ ते ६० वयोगटातील स्त्रिया मरण पावल्या आहेत का?

होय ☐ नाही ☐

होय असल्यास

अ.क्र.	स्त्रीचे नांव	वय	मृत्युचे कारण
१.			
२.			
३.			
४.			

६.७ गेल्या वर्षात तुमच्या कुटुंबांतील व्यक्तींना कोण-कोणते आजार झाले?

अ.क्र.	आजार	रोगी		
		नाव	लिंग	वय
१.				
२.				
३.				

६.८ सदर रोग्याचा उपचार कोठे केला?

प्राथमिक आरोग्य केंद्र ☐ खाजगी दवाखाना ☐ भगत ☐
वैदू ☐ दाई ☐ इतर ☐

६.९ प्रसूती सुविधा

तुमच्या मुलांचे बाळंतपण कोठे झाले?

प्राथमिक आरोग्य केंद्र ☐ खाजगी प्रसूतीगृह ☐
ग्रामीण रुग्णालय ☐ उपकेंद्र ☐ घरी ☐ इतर ☐

तुमचे बाळंतपण कोणी केले?

सुईण ☐ ए.एन.एम ☐ डॉक्टर ☐
दाई ☐ इतर ☐

६.१० आजारी असल्यास औषध कोठून घेतात?

प्राथमिक आरोग्य केंद्र ☐ औषधांचे दुकान ☐ भगत ☐
ग्रामीण रुग्णालय ☐ उपकेंद्र ☐ इतर (स्पष्ट करा)

६.११ गेल्या दोन वर्षात घरी भेट देण्यास प्रा.आ.केंद्राचे कोणते कर्मचारी आले होते?

डॉक्टर ☐ ए.एन.एम. ☐ आरोग्य सेवक ☐ इतर ☐

आरोग्यावर किती खर्च होतो? रुपये ☐

६.१२ गावात अंगणवाडी आहे का?

होय ☐ नाही ☐

६.१३ तुमच्या कुटुंबात अंगणवाडीतून कोणत्या सेवा प्राप्त झाल्या?

_____

_____

ब) आहार सवयी

१) तुम्ही कोणत्या धान्याचा वापर करता?

तादूळ ☐ गहू ☐ ज्वारी ☐ बाजरी ☐ नाचणी ☐ इ. ☐

२) तुम्ही कोणत्या कडधान्याचा वापर करता?

तूर ☐ मूग ☐ मटकी ☐ चवळी ☐ हरबरा ☐ इ. ☐

३) तुमच्या आहारात पालेभाज्या कोणत्या असतात?

_____

४) तुमच्या आहारात फळे कोणती असतात?

_____

५) तुमच्या आहारात मासे असतात का?

_____

६) तुमच्या आहारात मटण/मांस असते का?

_____

७) नाष्टा करता का? होय ☐ नाही ☐

_____

८) सकाळी कोणते पेय घेता? चहा ☐ दूध ☐ काहीच नाही ☐

९) **लहान मुले सकाळी दूध पितात का?** होय ☐ नाही ☐

पित असल्यास किती? १ कप ☐ २ कप ☐ ३ कप ☐ ३ पेक्षा जास्त ☐

१०. तुम्ही दिवसातून किती वेळा जेवण करता?

१		२		३		४	

११. पौष्टिक आहार घेता का? (आहारातः दूध, अंडी, पालेभाज्या, फळे, तूप इ. असते का?)

होय ☐ नाही ☐

१२. पौष्टिक आहार आवठवड्यातून किती वेळा घेता?

एकदा ☐ दिवसा आड ☐ दररोज ☐ एकदाही नाही ☐

क. वार्षिक उत्पन्न व खर्च

१. तुमचे वार्षिक उत्पन्न किती आहे? (शेती, मजूरी व इतर)

रूपये ☐ /-

२. एकूण उत्पन्नापैकी खालील बाबींवर किती खर्च होतो?

२.१) अन्नधान्य	रुपये	/-
२.२) किराणा व दिवाबत्ती	रुपये	/-
२.३) कपडा लत्ता	रुपये	/-
२.४) आरोग्य व औषधोपचार	रुपये	/-
२.५) शिक्षण	रुपये	/-
२.६) सामाजिक कार्य	रुपये	/-
२.७) लग्न समारंभ	रुपये	/-
२.८) सण व धार्मिक विधी	रुपये	/-
२.९) रुढी, परंपरा	रुपये	/-
२.१०) इतर	रुपये	/-

३) **व्यसन आहे काय?** होय ☐ नाही ☐

असल्यास कोणते? तंबाखू ☐ बिडी ☐ सिगारेट ☐ दारु ☐ इतर ☐

४) **उत्पन्ना पैकी व्यसनावर किती खर्च होतो? (रूपये)**

तंबाखू ☐ /- बिडी ☐ /- सिगारेट ☐ /- दारू ☐ /- इतर ☐ /-

(VII) राहत्या घराचा प्रकार

७.१ कुडाची भिंत व छप्पर ☐
कुडाची भिंत व पत्रा ☐
कुडाची भिंत व कौले ☐
दगड/वीट व कौले ☐
सिमेंट काँक्रीट ☐

७.२ राहत्या घराचा प्रकार स्वतःचे ☐ भाडयाचे ☐

७.३ घराचे क्षेत्रफळ

१०० चौ.फू.पेक्षा कमी ☐
१०० ते २०० चौ.फूट ☐
२०० ते ३०० चौ.फूट ☐
३०० ते ५०० चौ.फूट ☐
५०० चौ.फूट चे वर ☐

(VIII) विजेची उपलब्धता

८.१ तुमच्या गाव/पाड्यामध्ये किती तास वीज मिळते? _____

८.२ आपले स्वतःचे वीज मीटर आहे का? _____

८.३ आपल्या शेतीस किती तास वीजपुरवठा मिळतो? _____

(IX) मतदार यादी/ग्राम सभा

९.१ तुमच्या मतदार संघाचे नाव काय आहे? _____

९.२ शेवटची ग्रामसभा केव्हा झाली? _____

९.३ गेल्या वर्षी ग्रामपंचायतीने कोणकोणती कामे केली? _____

९.४ गेल्या वर्षी ग्रामसभा किती वेळा भरली?

एक ☐ दोन ☐ तीन ☐ चार ☐

(X) रोजगार हमी योजना

१०.१ गेल्या दोन वर्षात तुमच्या कुटुंबातील कोणास रोजगार हमी योजनेवरील काम मिळाले काय? _____

१०.२ असल्यास, कोठे (कामाचे व ठिकाणाचे नांव) _____

१०.३ गेल्या वर्षी रोजगार हमी योजनेमध्ये किती दिवस काम मिळाले? _____

१०.४ सदर कामाचे किती पैसे मिळाले? _____

१०.५ दिवसाचा रोज/मजूरी किती मिळते स्त्री - रु.

पुरुष- रू.

१०.६ रोजगार हमी योजनेची कामे कोणत्या ठिकाणी मिळते?

रस्ते	☐	सपाटीकरण	☐	वने	☐	पाणलोट	☐
धरण	☐	सामाजिक वनीकरण	☐	इतर	☐		

(XI) गौण वनौपजाबाबत

११.१ वनातून कोणकोणत्या प्रकारच्या वस्तू गोळा करून त्याची विक्री करण्यात आली? उदा. लाकूड, डिंग, पाने, इ.

१. २.

३. ४.

५. ६.

११.२ वरील वस्तूंपासून किती उत्पन्न मिळाले?

_____

_____

११.३ वनातून गोळा करण्यात आलेल्या वस्तूंची विक्री कोणास केली जाते?

१. टीडीसी

२. स्थानिक व्यापारी

३. बाजार/जत्रा

४. इतर

११.४ वनातून वस्तू गोळा करण्यासाठी किती कि.मी. लांब जावे लागते?

० ते १ ☐ १ ते २ ☐ २ ते ५ ☐ ५ ते १० ☐ १०पेक्षा जास्त ☐

(XII) आदिवासी विकासाच्या योजनांची माहिती

१२.१ शासकीय योजना राबविणाऱ्या कार्यालयाची/विभागाची माहिती आहे काय? होय/नाही

१२.२ तुम्हाला आदिवासी विकासाच्या कोणकोणत्या योजनांची माहिती आहे?

१. २.

३. ४.

१२.३ तुम्ही व तुमच्या कुटुंबांतील व्यक्तीने किती योजनांचा लाभ घेतला?

१. २.

३. ४.

१२.४ आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून मागील तीन वर्षात आपणास कोणी भेट दिली होती काय? होय/नाही

१२.५ तुम्हांला आदिवासी जमातीचा दाखला केव्हा मिळाला?

_____

_____

१२.६ तुमच्या कुटुंबांत खालील योजनेचा लाभ प्राप्त झाला आहे का?

आश्रमशाळा	☐	जि.प.शाळा	☐	बालवाडी	☐
अंगणवाडी	☐	शालेय पोषण आहार	☐	शिष्यवृत्ती	☐
इंदिरा आवास/घरकुल	☐	वसतिगृह	☐	वीज/तेलपंप	☐
खावटी कर्ज	☐	न्युक्लिअस बजेट	☐	२७५ (ब)	☐
एका.खरेदी योजना	☐	बैल गाडी/जोडी	☐	रेशन	☐
इतर	☐				

(XIII) शेती विकास योजना

१३.१ खालील कोणकोणत्या योजनांचा लाभ आपणास झाला?

१. जमीन सुधारणा	होय / नाही
२. बैलगाडी	होय / नाही
३. बैलजोडी	होय / नाही
४. पाईपलाईन	होय / नाही
५. बी-बियाणे	होय / नाही
६. विहीर व विहीर दुरुस्ती	होय / नाही
७. शेती सुधारणाची अवजारे व साहित्य	होय / नाही
८. तुषार ठिबक सिंचन	होय / नाही

९. इतर _____

१३.२ वरील योजनांचा लाभ घेतल्याने तुमच्या आर्थिक व सामाजिक जीवनामध्ये कशाप्रकारे बदल झाला?

_____

_____

(IX) दुग्ध विकास योजना

१४.१ खालील कोणकोणत्या योजनाचां लाभ आपणास झाला?

१. दुग्ध प्रक्रिया आणि शीतगृह होय / नाही
२. आपण दूध सोसायटीचे सभासद आहात का होय / नाही
३. आपणास दुभत्या जनावरांचा पुरवठा झाला काय? होय / नाही
४. असल्यास, किती व कोणते? होय / नाही
५. दुग्ध उत्पादन वाढविण्यास पशुखाद्य मिळाले काय? होय / नाही
६. इतर _____

१४.२ वरील योजनांचा लाभ घेतल्याने तुमच्या आर्थिक व सामाजिक जीवनामध्ये कशाप्रकारे बदल झाला?

_____

_____

(XV) मृद संधारण योजना

१५.१ खालील कोणकोणत्या योजनांचा लाभ आपणास झाला?

१. नाला बंडिग (माती) होय / नाही
२. नाला बंडिग (सिमेंट) होय / नाही
३. चर व बांधबंदिस्ती होय / नाही
४. इतर _____

१५.२ वरील योजनांचा लाभ घेतल्याने तुमच्या आर्थिक व सामाजिक जीवनामध्ये कशाप्रकारे बदल झाला?

_____

_____

(XVI) फलोत्पादन योजना

१६.१ खालील कोणकोणत्या योजनांचा लाभ आपणास झाला?

१. फलोत्पादन रोप संरक्षण योजना होय / नाही
२. रोजगार हमी योजनेशी निगडीत फलोत्पादन योजना होय / नाही
३. फळ झाडे किंवा इतर रोपे लागवडीकरिता अनुदान प्राप्त योजना होय / नाही

४. इतर _____

१६.२ वरील योजनांचा लाभ घेतल्याने तुमच्या आर्थिक व सामाजिक जीवनामध्ये कशाप्रकारे बदल झाला?

_____

_____

(XVII) प्रौढ शिक्षण योजना

१७.१ आपल्या गावात प्रौढ शिक्षणाची योजना राबविली गेली आहे काय? होय/ नाही

१७.२ वरील योजनेचा लाभ घेतल्याने तुमच्या आर्थिक व सामाजिक जीवनामध्ये कशाप्रकारे बदल झाला?

_____

_____

(XVIII) लसीकरण

१८.१ आपल्या कुटुंबातील ० ते ६ वयोगटातील मुलांचे लसीकरण झाले आहे काय? होय/ नाही

होय असल्यास, कार्ड दाखला आहे काय? होय/ नाही

(IXX) तलंग वाटप योजना

१९.१ आपणास तलंग वाटप योजनेचा लाभ झाला आहे काय? होय/ नाही

१९.२ मिळालेल्या तलंगांची संख्या किती होती? संख्या _____

१९.३ मिळालेल्या तलंगातून किती मरण पावल्या/ विकल्या? _____

(XX) वैयक्तिक स्वच्छता

२०.१ घरातील स्त्रियांसाठी आंघोळीचे ठिकाण (मोरी) आहे काय? होय / नाही

२०.२ घरातील स्त्रियांसाठी शौचालय आहे का? होय / नाही

२०.३ आंघोळ करण्यासाठी कुटुंबातील लोक काय वापरतात?

साबण ☐ दगड ☐ काथ्या ☐ रिठा ☐ इतर ☐

२०.४ जेवणाच्या अगोदर हात कशाने धुतात?

साबण ☐ माती ☐ हात धुतच नाही ☐ इतर ☐

२०.५ घरातील लोक आंघोळ केव्हा करतात?

अ) मुले	रोज	☐	दिवसा आड	☐	तीन दिवसात एकदा	☐
ब) पुरुष	रोज	☐	दिवसा आड	☐	तीन दिवसात एकदा	☐
क) स्त्रिया	रोज	☐	दिवसा आड	☐	तीन दिवसात एकदा	☐

२०.६ दिवसातून किती वेळा कपडे बदलतात?

१ वेळा ☐ २ वेळा ☐ ३ वेळा ☐

२०.७ कोणते कपडे वापरतात? पारंपारिक ☐ आधुनिक ☐

(XXI) पशुवैद्यकीय

२१.१ तुमच्या पाड्यात / गांवात पशुवैद्यकीय दवाखाना आहे काय? होय / नाही

२१.२ सदर दवाखान्यापासून तुमच्या जनावरांना गेल्या ३ वर्षात कोणत्या सेवा प्राप्त झाल्या

अ) जनावरांना औषध मिळाले ☐
ब) जनावरांवर उपचार झाले ☐
क) जनावरांची शस्त्रक्रिया झाली ☐
ड) कृत्रिम रेतन ☐
इ) इतर ☐

२१.३ तुमच्या जनावरांना तोंडाचे व पायाचे रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी तुमच्या जनावरांना लस देण्यात आली आहे काय? होय / नाही

२१.४ तुमच्या जनावरांच्या रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तुम्हाला अर्थसहाय्य मिळाले आहे काय? होय / नाही

२१.५ मिळाले असल्यास किती रुपये _____

२१.६ सदर पैशाचा वापर कशासाठी केला? _____

(XXII) वैरण उत्पादन योजना

२२.१ गेल्या ३ वर्षात आपणास आपल्या शेतावर वैरण उत्पादन करण्यासाठी आर्थिक लाभ झाला काय? होय / नाही

२२.२ सदर वैरणीचा वापर काय केला?

अ) स्वतःच्या जनावरांसाठी ☐

ब) बाजारात विक्रीसाठी ☐

क) उपयोग झालाच नाही ☐

ड) इतर ☐

(XXIII) मत्स्य व्यवसाय

२३.१ आपणास गेल्या ३ वर्षात खालील मत्स्य व्यवसायाच्या खालील कोणत्या योजनांचा लाभ झाला

१ मत्स्यबीज उत्पादन योजना ☐

२ अवरुद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धन ☐

३ मच्छिमार सहकारी संस्थेचा फायदा ☐

४ मासेमारी साधनांच्या खरेदीसाठी अर्थसहाय्य ☐

५ मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणा स्थापन करण्यासाठी मदत ☐

६ निमखारे पाणी मत्स्य संवर्धन विकास यंत्रणासाठी मार्गदर्शन अथवा मदत ☐

(XXIV) मातृत्व अनुदान योजना

२४.१ आपल्या कुटुंबातील लग्न झालेल्या स्त्रियांना मातृत्व अनुदान योजनेचा लाभ झाला आहे काय? होय / नाही

२४.२ असल्यास किती रूपयांचा _____

२४.३ सदर योजनेमार्फत कोणती औषधे मिळाली?

असल्यास, दाखवा _____

(XXV) इतर योजना

२५.१ शासनामार्फत खालील योजनांपासून आपणास आपल्या कुटुंबातील व्यक्तींना लाभ झाला काय?

१. ☐ सहकार खात्यामार्फत ग्राहक भांडार भाग भांडवल खरेदीसाठी कर्ज
२. ☐ सहकारी साखर कारखान्याचे भागभांडवल खरेदीसाठी अर्थसहाय्य
३. ☐ इंदिरा आवास/ घरकुल योजनेमार्फत घर मिळाले का?
४. ☐ १०० % अनुदानित उपसा जलसिंचन योजनेचा लाभ
५. ☐ सुशिक्षित बेरोजगारांसाठी बीज भांडवल अर्थसहाय्य
६. ☐ दुर्बल घटकातील मुलींना नियमित शाळेत येण्यासाठी उपस्थिती भत्ता
७. ☐ राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रम
८. ☐ पल्स पोलिओ लाभ
९. ☐ कुपोषित ग्रेड ३ व ४ आपल्या कुटुंबातील बालकांना लाभ मिळाला का?
१०. ☐ कुटुंबातील मुलांना शुल्क / परीक्षा शुल्क मिळाले काय?
११. ☐ शिष्यवृत्ती
१२. ☐ आश्रमशाळा
१३. ☐ वसतिगृहे
१४. ☐ गळती थांबविण्यासाठी शिष्यवृत्ती
१५. ☐ घरात अपंग असल्यास शिष्यवृत्ती व प्रवासभत्ता इ. ८ वी ते १२ वी पर्यंत
१६. ☐ कन्यादान योजना
१७. ☐ भूमिहीन दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना जमीन खरेदीसाठी अर्थसहाय्य
१८. ☐ इ. ५ वी मधील आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे

ठिकाण　　मुलाखत घेणाऱ्याचे नांव

दिनांक　　सही

मुलाखत देणाऱ्याचे नांव　　सही/अंगठा

पुणे विद्यापीठ, अर्थशास्त्र विभाग,
आदिवासी विकास योजनांचा सहयाद्री विभागातील आदिवासींच्या
गुणात्मक जीवनमानावर झालेला परिणाम

मार्गदर्शकाचे नाव: डॉ. आर.एम.खर्चे
संशोधकाचे नाव : प्रा. एस.एस.देशमुख

(प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प)

प्रश्नावली

१) ओळख

अ) जिल्हा ब) तहसील

क) आय.टी.डी.पी ड) कार्यालय पत्ता

२) वैयक्तिक माहिती

नाव: _____

लिंग: _____

वय: _____

शिक्षण: _____

जात/जमात: _____

रूजू होण्याचा दिनांक _____

३) प्रकल्प कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी संख्या

अ.क्र.	पद	रिक्त	भरलेले

४) गेल्या.....वर्षात आपल्या प्रकल्पाच्या माध्यमातून राबविलेल्या योजना :

अ.क्र.	योजना	वर्ष	तरतूद	लाभार्थी

५) योजना राबविताना येणाऱ्या अडचणी

१. नियोजन करताना

_____

_____

२. राबविताना

_____

_____

३. नियंत्रण करताना

_____

_____

४. पाठपुरावा करताना

_____

५. वरील योजना राबविण्यास आपणास व आपल्या कर्मचाऱ्यांना पुरेसा वेळ मिळतो का?

_____

_____

६. प्रकल्प अधिकारी म्हणून आपणास प्रशासकीय व वित्तीय अधिकार आहेत का? असल्यास किती?

_____

_____

७. आपल्या मते विभागाच्या कोणत्या योजना आदिवासींना लाभदायक आहेत?

_____

_____

८. कोणत्या योजना अनावश्यक आहेत?

_____

_____

९. आदिवासी लाभार्थ्याचे मूल्यमापन आपण प्रकल्प अधिकारी म्हणून कशा प्रकारे करता?

_____

_____

१०. ज्या विविध योजना राबविल आहेत त्यांचे मुल्यमापन केले आहे काय?

_____

_____

११. प्रकल्प अधिकारी म्हणून आदिवासींसाठी काही नवीन उपक्रम, योजना सुचविल्या आहेत काय?

_____

_____

१२. प्रकल्प अधिकारी कार्यक्षेत्राबद्दल योजना अंमलबजावणीच्या झालेल्या फायद्याच्या वार्षिक अहवालात उणिवा अडचणी, सूचना इत्यादींचा अंतर्भाव असतो का?

_____

_____

१३. प्रकल्प अधिकारी या नात्याने विविध योजना अंमलबजावणी बाबतीत शासनाकडून प्रशिक्षण मार्गदर्शन व लाभार्थ्यांवरील देखरेखीबाबत मार्गदर्शन मिळते काय?

_____

_____

१४. लाभार्थ्यांना विविध योजनांच्या वापराबद्दल प्रशिक्षण/ मागदर्शन केले जाते काय?

_____

_____

१५.

एकूण आदिवासी लोकसंख्या	एकूण कुटुंबे	लाभार्थी संख्या	कोणकोणत्या योजना	किती लोकांना काहीच मिळाले नाही

१६. या योजनांमुळे आपल्या अखत्यारीतील आदिवासी क्षेत्रातील आदिवासींची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उन्नती झाली का? स्पष्ट करा.

_____

_____

पुणे विद्यापीठ, अर्थशास्त्र विभाग,
आदिवासी विकास योजनांचा सहयाद्री विभागातील आदिवासींच्या गुणात्मक जीवनमानावर झालेला परिणाम

मार्गदर्शकाचे नाव : डॉ. आर. एम. खर्चे
संशोधकाचे नाव : प्रा. एस. एस. देशमुख

(आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांसाठी)

प्रश्नावली

१) ओळख

अ) जिल्हा ब) तहसील

क) आय.टी.डी.पी ड) आश्रमशाळेचा पत्ता

२) वैयक्तिक माहिती

नाव: _____

लिंग: _____

वय: _____

शिक्षण: _____

जात/जमात: _____

रूजू होण्याचा दिनांक _____

३) आश्रमशाळेचे कार्यक्षेत्र

गावे	लोकसंख्या	पाचवर्षाखालील		पाच वर्षावरील	
		मुले	मुली	मुले	मुली

४) आश्रमशाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांची संख्या

अ.क्र.	पद	रिक्त	भरलेले
	एकूण		

५) आश्रमशाळेतील मुलांची इयत्ता निहाय संख्या

अ.क्र.	इयत्ता	मुले	मुली	एकूण	गळती
१.	पहिली				
२.	दुसरी				
३.	तिसरी				
४.	चौथी				
५.	पाचवी				
६.	सहावी				
७.	सातवी				
८.	आठवी				
९.	नववी				
१०.	दहावी				
११.	अकरावी				
१२.	बारावी				
	एकूण				

६) जमात निहाय विद्यार्थ्यांची संख्या

अ. क्र.	जमात	मुले	मुली	एकूण
	एकूण			

७) अ) एकूण विद्यार्थी संख्या _____

ब) एकूण शिक्षकांची संख्या _____

क) एकूण शिक्षकांमागे एकूण विद्यार्थी किती? _____

८) आश्रमशाळेतील आदिवासी मुलांसाठी कोणकोणत्या सुविधा आहेत?

अ) पिण्याचे पाणी _____

ब) अंघोळ / कपडे धुण्यासाठी _____

क) संडास _____

ड) न्हाणीघर _____

इ) पंखे _____

ई) मच्छरदाण्या _____

फ) गाद्या _____

घ) खेळाच्या साहित्याची खोली _____

म) आजारी मुलांसाठी स्वतंत्र खोली _____

ज) खेळाचे मैदान _____

न) इतर _____

९) आश्रम शाळेतील मुलांची गळती होण्याचे कारण?

_____

_____

१०) आश्रमशाळेमुळे मुलांच्या सामाजिक व शैक्षणिक जीवनावर कोणते परिणाम होतात?

_____

_____

११) दर वर्षी निधी किती मिळतो?

_____

_____

१२) कोण-कोणत्या योजनेची आश्रमशाळेस गरज आहे?

_____

_____

१३) एका आठवड्याचा आश्रमशाळेच्या मुलांसाठी आहार तक्ता कसा असतो?

अ. क्र.	वार	नाश्ता	दुपारचे जेवण	संध्याकाळचे जेवण
१.	रविवार			
२.	सोमवार			
३.	मंगळवार			
४.	बुधवार			
५.	गुरूवार			
६.	शुक्रवार			
७.	शनिवार			

१४) गेल्यावर्षी आश्रमशाळेच्या मुलांना खालील वस्तू केव्हा मिळाल्या :

१) युनिफॉर्म / गणवेष _____

२) वह्या _____

३) पुस्तके _____

४) शैक्षणिक साहित्य _____

५) इतर _____

१५) खेळाचे साहित्य आपल्या मुलांना मिळते का असल्यास कोणते?

_____

_____

१६) आश्रमशाळेतील शिक्षणाचा दर्जा कसा आहे?

_____

_____

१७) आश्रमशाळेतील मुलांना सकस आहार दिला जातो का?

_____

_____

१८) शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर व्यक्तिमत्व विकासाचे कोण-कोणते उपक्रम राबविले जातात?

१) वक्तृत्व स्पर्धा _____

२) वाद-विवाद स्पर्धा _____

३) निबंध लेखन स्पर्धा _____

४) एकांकिका स्पर्धा _____

५) संगीत शिक्षण _____

६) अभिनय शिक्षण _____

७) इतर _____

१९) आरोग्य तपासणी वर्षातून किती वेळा केली जाते?

एकदा	☐
दोनदा	☐
तीनदा	☐
चारवेळा	☐
त्यापेक्षा जास्त	☐

२०) आरोग्य तपासणीमधील निष्कर्ष

अ) सर्वसाधारण विकार असल्यास कोणते?

_____

_____

ब) असाधारण विकास असल्यास कोणते?

_____

_____

२१) अ) साधारण विकांरावर उपचार कशाप्रकारे केले जातात?

_____

_____

ब) असाधारण विकारांवर उपचार कसे केले जातात?

_____

_____

२२) सध्याच्या जागतिक स्पर्धेत आश्रमशाळेतील मुले टिकाव धरू शकतील काय?

_____

_____

दिनांक :

ठिकाण :

हुद्दा

सही

नाव

पुणे विद्यापीठ, अर्थशास्त्र विभाग
आदिवासी विकास योजनांचा सहयाद्री विभागातील आदिवासींच्या गुणात्मक जीवनमानावर झालेला परिणाम

मार्गदर्शकाचे नाव : डॉ. आर.एम.खर्चे
संशोधकाचे नाव : प्रा. एस.एस.देशमुख

आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या पदधिकाऱ्यांसाठी प्रश्नावली

आदिवासी विविध कार्यकारी सह. संस्थेचे नाव व पत्ता

(नम्र सूचना :- प्रत्येक प्रश्नांच्या पर्यायासमोर चौकट आहे. तरी योग्य पर्यायासमोर चौकटीत (√) अशी खुन करावी)

अ) गटः अध्यक्षांची / संचालकांची सर्वसाधारण माहिती :

१) पत्ता : मु. _____ पो._____ ता._____ जि. _____

२) शैक्षणिक पात्रता : अशिक्षित ☐ प्राथमिक ☐ माध्यमिक ☐

पदवीधर ☐ इतर ☐

३) लिंग : स्त्री ☐ पुरूष ☐

४) वय : _____ ५) जात : _____ ब) _____

६) वार्षिक उत्पन्न रू. _____

७) वैवाहिक स्थिती : विवाहित ☐ अविवाहित ☐ विधवा स्त्री ☐

विधूर पुरूष ☐ विभक्त ☐ घटस्फोटित ☐

८) अ) आपल्या मालकीची जमीन आहे काय? होय ☐ नाही ☐

ब) असल्यास : बागायत ☐ कोरडवाहू ☐ पडीक ☐ जंगल ☐ एकूण क्षेत्र ☐

क्षेत्रः एकर गुंठे	एकर	गुंठे	एकर	गुंठे	एकर	गुंठे	एकर	गुंठे

९) जनावरे : गायी ☐ म्हशी ☐ बैल ☐ शेळ्या ☐

कोंबड्या ☐ इतर ☐

१०) जनावरांपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न _____ रूपये

११) आपल्या कुटुंबातील एकूण वार्षिक उत्पन्न _____

१२) संस्थेमधील आपला हुद्दा कोणता? _____

१३) हे पद आपण केव्हापासून धारण केलेले आहे? _____

गट ब) आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेबाबत सर्व साधारण माहिती :

१) संस्था नोंदणीची तारीख व वर्ष _____

२) ३१ मार्च २००५ रोजी एकूण सभासद संख्या _____

३) अधिकृत भागभांडवल :- रूपये _____

४) ३१ मार्च २००५ रोजी एकूण वसूल झालेले भांडवल _____

५) ३१ मार्च २००५ रोजी सर्वसाधारण निधी / गंगाजळी : _____

६) ३१ मार्च २००५ रोजी सभासदांकडून कर्जाची येणे रक्कम : _____

७) अ) संस्था लाभांश वाटप करते का? होय ☐ नाही ☐

ब) ३१ मार्च २००५ रोजी दिलेला लाभांशाचा दर किती.....टक्के आहे?

८) ३१ मार्च २००५ रोजी सभासदांच्या ठेवी :- रूपये

९) ३१ मार्च २००५ रोजी सभासद नसणारांच्या ठेवी :- रूपये _____

१०) संस्थेची कर्ज मर्यादा किती आहे? _____

११) आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेत किती सेवक नोकरीस आहेत?

पूर्ण वेळ ☐ अर्धवेळ ☐ एकूण ☐

१२) कर्ज देण्याव्यतिरिक्त आणखी कोणती कार्ये संस्थेकडून पार पाडली जातात?

अ) _____

ब) _____

☐

१३) कर्ज मंजूर करण्याची पद्धत कशी आहे?

अ) अर्ज मिळाल्याबरोबर कर्जाचा चेक सभासदाला दिला जातो ☐

ब) संचालकांची मंजुरी मिळाल्यानंतर कर्जाचा चेक सभासदाला दिला जातो ☐

क) इतर _____

१४) किती सभासद कर्ज घेतात? _____

१५) किती सभासद कर्ज घेत नाहीत?

१६) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज मिळवताना कोणत्या अडचणी येतात?

अ) दिरंगाई ☐ ब) राजकारण ☐ क) टाळाटाळ केली जाणे ☐

क) वरील सर्व ☐ इ) इतर ☐

१७) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून पुरेशी कर्जे मिळतात काय? होय ☐ नाही ☐

१८) संस्थेच्या मालकीची काही मालमत्ता आहे काय?

अ) इमारत ☐ ब) वाहन ☐ क) जमीन ☐

ड) गोदामे ☐ इ) इतर ☐

१९) अ) आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेस सरकारकडून काही मदत मिळते काय? होय ☐ नाही ☐

ब) सरकारी मदत मिळत असेल तर कोणत्या रूपाने?

१) अनुदान ☐ २) भांडवल ☐ ३) इतर सहाय्य ☐

२०) अ) सरकारी धारेणाचे संस्थेवर काही परिणाम होतात काय? होय ☐ नाही ☐

ब) होत असल्यास कोणते?

१) कर्ज माफीमुळे परत फेडीबाबत उदासिनता ☐

२) संस्थेची प्रगती / शेतीची प्रगती होते ☐

३) सभासदांना सुविधा मिळतात ☐

४) संस्थेच्या कामात अडथळे येतात ☐

५) वरील सर्व ☐ ६) इतर ☐

२१) संस्थेने भविष्य काळात कोणत्या योजना सुरू करण्याचे ठरविले आहे?

_____

_____

२२) सर्व साधारणपणे आदिवासी सेवा सहकारी संस्थेविषयी आपले मत काय आहे?

_____

_____

क) गट व्यवस्थापनासंबंधी

१) आदिवासी सेवा सहकारी संचालक मंडळाची रचना कशी आहे? (संख्येत सांगा)

अ) एकूण संचालक ☐ ब) सबळ घटक संचालक ☐

क) दुर्बल घटक संचालक ☐ ड) महिला राखीव संचालक ☐

२) संस्थेच्या संचालकांच्या सभा किती दिवसांनी होतात?

अ) एक महिन्यातून ☐ ब) तीन महिन्यातून ☐

क) सहा महिन्यातून ☐ ड) वर्षातून ☐

ड) इतर ☐

३) राजकीय प्रभावाखाली संस्था काम करते काय? होय ☐ नाही ☐

४) राजकीय हस्तक्षेपाचा संस्थेच्या कामकाजावर परिणाम होतो काय?

होय ☐ नाही ☐

५) आदिवासी सेवा सहकारी संस्था आपला व्यवस्थापकीय/कार्यलयीन खर्च कसा भागविते?

अ) संस्थेला झालेल्या नफ्यांतून ☐ ब) संस्थेच्या इतर उत्पन्नातून ☐

क) इतर _____

६) संस्थेमार्फत सभासदांच्या पिकांचा विमा उतरविला जातो काय? पूर्वी उतरविला होता काय?

होय ☐ नाही ☐

७) संचालकाना मानधन दिले जाते काय? होय ☐ नाही ☐

ड) गट कार्यालयीन काम व हिशोब तपासणी संबंधी

१) आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेत अधिकारी व कर्मचारी किती?

अ) अधिकारी ☐ ब) कर्मचारी ☐

२) संस्थेचे हिशोब नियमित ठेवले जातात काय? ☐

३) हिशोब नोंदी करण्यासाठी कोणकोणती पुस्तके ठेवली आहेत?

अ) रोजकीर्द ☐ ब) खतावणी ☐ क) रोकड पुस्तिका ☐

ड) कर्ज वाटप पुस्तिका ☐ इ) कर्ज वसुली पुस्तिका ☐

फ) वरील सर्व ☐ ज) इतर ☐

४) अ) संस्थेच्या खर्च व्यवहार नियंत्रणासाठी उपाययोजना केली आहे का?

होय ☐ नाही ☐

ब) केली असल्यास कोणती? _____

_____

५) प्रत्येक महिन्याला तेरीज पत्रक (ट्रायल बॅलन्स) तयार केले जाते काय?

होय ☐ नाही ☐

६) संस्थेची लेखापुस्तकांची हिशोब तपासणी केली जाते काय?

होय ☐ नाही ☐

७) संस्थेची हिशोब तपासणी नियमित केली जाते काय?

होय ☐ नाही ☐

८) हिशोब तपासणीमध्ये दाखविलेले दोष दुरूस्त केले जातात काय?

होय ☐ नाही ☐

९) संस्थेचा हिशोब तपासणी वर्ग कोणता

अ वर्ग ☐ ब वर्ग ☐ क वर्ग ☐ ड वर्ग ☐

१०) संस्थेला जॉय वर्गणी भरावी लागते ती किती?

_____

इ) कर्जासंबंधी

१) कर्ज देतांना कोणत्या गोष्टींना प्राधान्य दिले जाते? अग्रक्रमाने सांगा.

अ) अर्जदाराची पत ☐ ब) कर्ज फेडीची आर्थिक क्षमता ☐

क) तारण ☐ ड) शेतजमीन किती आहे ☐

इ) मागील व्यवहारांचा अनुभव ☐ फ) वरील सर्व ☐

उ) इतर ☐

२) संस्था पीकनिहाय कोणत दाराने कर्ज देते?

अ) जिरायत :	**पीके**	**हेक्टरी**	**पीक कर्जदार**
	तांदूळ		
	गहू		
	ज्वारी		
	बाजरी		
	डाळी		
	भुईमूग		
	नाचणी		
	वरई		
	सावा		
ब) बागायत :			
	ऊस		
	कापूस		
	पालेभाज्या		
	फळभाज्या		

३) वरील कर्जाचे दर पुरसे आहेत काय?

होय ☐ नाही ☐

४) नसल्यास यापेक्षा किती अधिक दर असावेत? _____

५) पीक कर्ज देताना संस्था कोणती कागदपत्रे घेते?

_____

_____

६) ही कागदपत्रे मिळविताना अडचणीची वाटतात काय?

होय ☐ नाही ☐

७) पीक कर्जावरील व्याजदर किती आहे? _____

८) व्याज सवलत योजनेखाली किती अनुदान मिळते?

_____

_____

९) अ) किती शेतकरी कर्ज घेतात?

ब) किती शेतकरी कर्ज घेत नाहीत?

१०) अ) संस्थेची मागील ३ वर्षाची कर्जपुरवठ्याबद्दल आकडेवारी

शेतकरी	**कर्ज घेणारे शेतकरी**	**त्यांचे एकूण क्षेत्र (हेक्टर)**	**कर्ज किती क्षेत्रावर घेतले आहे (हेक्टर)**

ब) ज्या जमिनीवर / क्षेत्रावर कर्ज घेतले आहे नाही ते का?

अ) गरज नाही म्हणून? _____

ब) मिळत नाही म्हणून? _____

क) पात्रता नाही म्हणून? _____

ड) थकबाकीदार आहे म्हणून? _____

क) कर्ज न घेणारे शेतकरी

संख्या	**जमीन (हेक्टर)**	**कर्ज मिळण्यायोग्य जमीन (हेक्टर)**

११) कर्ज देताना संस्था किती टक्के भागभांडवल कापून घेते?

अ) पीक कर्ज _____

ब) जनावरांसाठी कर्ज _____

क) शेती औजारांसाठी कर्ज _____

ड) खावटी कर्ज _____

इ) ग्रामोद्योगासाठी कर्ज _____

ई) लघु उद्योगांसाठी कर्ज _____

१२) कर्ज देताना कपात केलेले भागभांडवल देण्यासाठी कर्जदार स्वेच्छेने तयार असतो काय?

_____

_____

१३) कपात केलेल्या भागभांडवलावर लाभांश दिला जातो काय?

_____

_____

१४) कर्जाच्या वापरावर संस्थेची देखभाल कशाप्रकारे असते?

_____

_____

१५) कर्जदाराने दिलेल्या कारणापेक्षा वेगळ्या कारणासाठी कर्जाचा वापर करण्याच्या घटना आपल्या संस्थेत कधी घडतात का?

अ) बऱ्याच प्रमाणात ☐ ब) अल्प प्रमाणात ☐

क) काही प्रमाणात ☐ ड) अजिबात नाही ☐

१६) थकबाकीदार असतात का? होय ☐ नाही ☐

असल्यास थकबाकी कमी करण्यासाठी तुम्ही कोणते विशेष उपाय योजता?

अ) कर्जदारास नोटीस देणे ☐ ब) जामीनदारास नोटीस देणे ☐

क) कोर्टात दावा दाखल करणे ☐

ड) तारण मालमत्ता ताब्यात घेणे व विकणे इ) वरील सर्व ☐

फ) इतर _____

१७) संस्थेच्या कामकाजात सभासदांचा सहभाग (मागील ५ वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभांमधील हजेरी)

वर्ष	**एकूण सभासद**	**वार्षिक सर्वसाधारण सभेला हजर सभासद**	**हजेरी टक्केवारी**
२००१-०२ २००२-०३ २००३-०४ २००४-०५ २००५-०६			

१८) संस्थेचा मागील ५ वर्षाचा नफा / तोटा

वर्षे	**नफा**	**तोटा**
२००१-०२		
२००२-०३		
२००३-०४		
२००४-०५		
२००५-०६		

१९) संस्था अवसायानात आहे काय? होय ☐ नाही ☐

असल्यास कारणे

_____

_____

_____

२०) शेती पूरक व्यवसाय उदा. गाई / म्हशी / इतर खरेदीसाठी कर्ज दिले जाते का?

होय ☐ नाही ☐

२१) सरकारकडून / जिल्हा सहकारी बँकेकडून आपल्या अपेक्षा काय आहेत?

अ) कर्ज शेतीच्या आकारानुसार देण्याऐवजी पिकांच्या प्रकारानुसार द्यावे ☐

ब) कर्ज रक्कम मर्यादा वाढवावी ☐ क) कर्जाचे दर कमी करावे ☐

ड) वरील सर्व ☐ इ) इतर ☐

२२) संचालकांना कर्ज दिले जाते का? होय ☐ नाही ☐

२३) संचालकांकडे कर्जाबद्दल तारण घेतले जाते काय? होय ☐ नाही ☐

२४) संचालकांकडे थकबाकी आहे काय? होय ☐ नाही ☐

२५) संस्थेबद्दल आपले सर्वसाधारण मत काय आहे?

_____

_____

_____

_____

_____

दिनांक :- / / २००७

स्थळ :-

नाव

सही

संक्षिप्त रूपे

१.	*आ.वि.वि.*	*आदिवासी विकास विभाग*
२.	*आ.वि.यो.*	*आदिवासी विकास योजना*
३.	*आ.वि.म.*	*आदिवासी विकास महामंडळ*
४.	*आ.जं.का.स.सं.*	*आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था*
५.	*आ.वि.का.स.सं.*	*आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था*
६.	*इ.*	*इत्यादी*
७.	*ए.ख.यो.*	*एकाधिकार खरेदी योजना*
८.	*ए.आ.वि.प्र*	*एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प*
९.	*ए.आ.वि.प्र.का.*	*एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय*
१०.	*ए.ग्रा.वि.का.*	*एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम*
११.	*औ.प्र.स.*	*औद्योगिक प्रशिक्षण संस्था*
१२.	*कि.मी.*	*किलो मीटर*
१३.	*कु.*	*कुटुंबे*
१४.	*कें.अ.यो.*	*केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना*
१५.	*ग्रा.रू.*	*ग्रामीण रूग्णालय*
१६.	*ग्रा.रो.ह.यो.*	*ग्रामीण रोजगार हमी योजना*
१७.	*चौ.फू .*	*चौरस फूट*
१८.	*जि. प.*	*जिल्हा परिषद*
१९.	*जि.प.प्रा.शा.*	*जिल्हा परिषद प्राथमिक शाळा*
२०.	*जि.म.स.बँ.*	*जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक*
२१.	*प्र.अ.*	*प्रकल्प अधिकारी*
२२.	*प्रा.आ.कें.*	*प्राथमिक आरोग्य केंद्र*
२३.	*प्रा.आ.उ.कें.*	*प्राथमिक आरोग्य उपकेंद्र*
२४.	*म.रा.स.आ.वि.म.*	*महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ*
२५.	*यशदा*	*यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी*
२६.	*रु.*	*रुपये*
२७.	*रो.ह.यो.*	*रोजगार हमी योजना*
२८.	*स.प्र.अ.*	*सहाय्यक प्रकल्प अधिकारी*
२९.	*सा.पा.पु.यो.*	*सार्वजनिक पाणी पुरवठा योजना*
३०.	*शा.पो.आ.यो.*	*शालेय पोषण आहार योजना*
३१.	*शे.वि.यो.*	*शेती विकास योजना*